सन १९९५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ९३५
REFBK-0001176
REFBK-0001176

सान १८१५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. ११८६
ग्रंथ शाखा स्थळ

एरचुरे, पुराणिक आणि मंडळी.
बुकसेलर्स माधवबाग, मुंबई नं. ४,

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

गीता

# मुलांचा महाराष्ट्र

( मराठ्यांचा गोष्टीरूप इतिहास )

ग्रंथालय
दा. क्र. ११७८६

लेखक
गोविंद अनंत मोडक बी. ए.

प्रकाशक
जनार्दन विनायक ओक एम. ए.

लोकशिक्षण कचेरी तळेगांव दाभाडे ( पुणें )

REFBK-0001176

किंमत १ रुपया

हें पुस्तक पुणें येथें ' आर्यभूषण ' छापखान्यांत रा. नटेश अप्पाजी
द्रविड यांनी छापिलें व रा. जनार्दन विनायक ओक
यांनीं तळेगांव दाभाडे येथें प्रसिद्ध केलें

# आधारभूत ग्रंथांची यादी.

प्रस्तुत पुस्तकांत ज्यांतील आधार दिले आहेत त्या ग्रंथांची यादी खालीलप्रमाणें:--


१. मल्हार रामराव चिटणीसकृत शिवछत्रपतींचें सप्त-प्रकरणात्मक चरित्र ( चिटणीस बखर ).
२. मराठी साम्राज्याची छोटी बखर.
३. शिवदिग्विजय.
४. मराठी रिसायत.
५. राजवाडे यांचा संकीर्ण लेखसंग्रह.
६. चिटणीसकृत शाहूचें चरित्र.
७. दाभाडे यांची बखर.
८. श्रीब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार.
९. साष्टीची बखर.
१०. काव्येतिहाससंग्रह पत्रें, यादी वगैरे.
११. भाऊसाहेबांची बखर.
१२. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १ (म. इ. साधनें )
१३. ऐतिहासिक लेखसंग्रह भाग २ रा.
१४. " " भाग ३ रा.
१५. ॲस्क्वर्थ व शाळिग्रामकृत पोवाडे ( अ. शा. पोवाडे )
१६. हरिवंशाची बखर.
१७. ग्रँट डफकृत मराठ्यांचा इतिहास.

# चुकीची दुरुस्ती

प्रस्तुत पुस्तकांतील ' सवाई माधवरावाचा मृत्यु ' या प्रकरणांत श्री. सवाई-माधवराव यांनीं कारंजावर उडी टाकून आत्मघात केला, व त्याला नाना आपणास जाच करतात, ही त्यांची समजूतच कारण झाली, अशा अर्थाचें विधान केलें आहे; परंतु तें चुकीचें आहे हें सन १९०७ मार्च ५ चे केसरींत रा. वासुदेव गोविंद आपटे यांचें जें ' श्रीमंत सवाईमाधवराव पेशवे यांच्या मृत्यूचा खरा प्रकार ' म्हणून पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यावरून दिसून येईल.

ही कारंजीवर उडी टाकल्याची दुःखकारक गोष्ट घडली त्यावेळीं पुण्यांत असलेल्या तुकोजी होळकरांनीं आपले चिरंजीव काशीराव होळकर यांस लिहिलेलें पत्र रा. आपटे यांनीं आपल्या पत्रांत दिलें आहे. त्यांत खालील महत्त्वाचें वाक्य आहे. ' प्रस्तुत आज शु० १२ रविवारीं श्रीमंत मुखमार्जन करून गणपतीचे दिवाणखान्यांतील माडीवर प्रातःकाळचा चार घटका दिवस आला ते समई कठड्याशीं टेकून बसले होते, समीप त्यांची आजी गंगाजलनिर्मल ताई साठी व शागीर्द व खिजमदगार वगैरे मंडळी असतां श्रीमंत उठून उभे ठाकले तों **भोंड येऊन** तेथून सावर न धरतां खालीं दक्षिणेकडे कारंजी हौद आहेत तेथें येऊन पडले. ते जागा बहुत अडचणीची आणि संगीन, तशांत सावर न धरतां पडले त्यामुळें पायाची मांडी बहुत जरबेंत येऊन दोन दांत जाया होऊन तोंडाचा जबडा व डोकें ठेचून एक हात दुखावला येणेंकरून दोन घटका बेहोष होते. ' याशिवाय काशीराव होळकर यांस त्यांचे पुण्याचे वकील राजश्री शिवाजी बाबूराव यांनीं आश्विन व० १२ रोजीं म्हणजे सवाईमाधवरावाचे मत्यूनंतर लवकरच एक पत्र लिहिलें आहे; त्यांतीलही उतारा वरील पत्रांतील विधानाच्या पुष्टीकरणार्थ रा. आपटे यांनीं दिला आहे. तो पुढीलप्रमाणें:-- श्रीमंत पंतप्रधान यासी **वायूचा उपद्रव होऊन** तीन मजल्याचे बंगल्यावरून उडी टाकून खालीं कारंजावर पडले होते. ' ज्या दिवशीं हें वर्तमान घडलें त्याचे कांहीं दिवस अगोदर श्रीमंतांस ताप येत होता, ही गोष्ट नानाच्या जाचामुळें श्रीमंतांनीं आत्मघात केला असें लिहिणारे ग्रँट डफ साहेब कबूल करतात. तेव्हां तापामुळें क्षीणता येऊन भोवंड येणें किंवा उघड्या गच्चीवर बसल्यामुळें झटका येणें या गोष्टी स्वाभाविक असल्यामुळें श्री. तुकोजीराव होळकरांचे पत्रांत वर्णिलेला प्रकार खरा असला पाहिजे असें कोणाही निःपक्षपाती माणसास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

# प्रस्तावना

१. आपल्या पूर्वजांच्या थोर व उदात्त कृतींचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवणें ह्यासारखें समाजाच्या उन्नतीला दुसरें उपकारक साधन नाहीं असें म्हटल्यास फारशी अतिशयोक्ति होणार नाहीं. एका इंग्रज ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, ज्या राष्ट्राला गतकाल नाहीं त्या राष्ट्राला भावि काल येण्याची आशाच नको. आज आपल्या राष्ट्राची स्थिति सर्व बाजूंनीं अगदीं खालावलेली आहे, याबद्दल मतभेद होईल असें वाटत नाहीं. ह्या अवनतीचीं कारणें व पुनरपि उन्नति होण्याचे खरे उपाय ह्याबद्दल भिन्न मतें पडतील; पण वस्तुस्थितीबद्दल ऐकमत्य होईल. देशस्थिति सुधारण्याचे सर्व बाजूंनीं प्रयत्न चालले आहेत. अस होणें वाजवीच आहे. कारण राष्ट्र हें विराटस्वरूपी असल्यामुळें त्याच्या उन्नतीला सर्व प्रकारचे प्रयत्न चालले पाहिजेत. तथापि शिक्षण हें सर्व प्रयत्नांमध्यें प्रमुख धरलें पाहिजे. कारण राष्ट्राची सर्व मदार तरुण पिढीवर असते व तरुण पिढी चांगली किंवा वाईट निपजणें हें तिला मिळणाऱ्या शिक्षणावरच अवलंबून असणार हें उघड आहे. राष्ट्रीय सद्‌गुणांची उत्पत्ति व विकास तरुण विद्यार्थ्यांच्या मनांत झाल्याशिवाय त्यांच्या हातून समाजाची योग्य सेवा व्हावयाची नाहीं. स्वाभिमान, स्वदेशप्रीति, समाजस्थितीबद्दल कळकळ, स्वार्थत्याग, धाडस वगैरे गुण तरुण पिढीचे अंगीं बाणले तरच तिचा राष्ट्रकार्याला उपयोग होईल. ह्या गुणांचा विकास होण्यास योग्य गुरूंच्या देखरेखीखालीं व उत्तम शिस्तीखालीं मुलांचें शिक्षण झालें पाहिजे. असें शिक्षण पूर्वी गुरुकुलांमध्यें मिळत असे; पण आज त्या शिक्षणाचा पूर्ण अभाव झाला आहे. तसें या राष्ट्रांत केव्हां होऊं लागेल तें खरें. पण प्रत्यक्ष शिक्षणाच्या अभावीं उत्कृष्ट ग्रंथांच्या वाचनानें तरी जितके चांगले संस्कार मुलांच्या मनावर करतां येतील तितके करण्याकडे तरुण पिढीच्या शिक्षणाची कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक पालकाचें व शिक्षकाचें लक्ष असलें पाहिजे. वाङ्मय व इतिहास हे दोन विषय अशा कामीं फार उपयोगी पडतात. गद्य व पद्य ग्रंथांतील उदात्त वेंचे मनावर उत्तम संस्कार केल्याशिवाय रहात नाहींत. इतिहासाच्या वाचनानें स्फूर्ति व तेज उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. मात्र पुस्तकांची रचना व निवड योग्य रीतीनें झाली पाहिजे.

२. **समर्थविद्यालया**करितां प्रत्येक विषयावर राष्ट्रीय दृष्टीनें लिहिलेलीं पुस्तकें तयार करण्याचा हेतु होता त्याप्रमाणें **संस्कृतप्रवेश, इंग्रजीप्रवेश,**

**प्रथमगुच्छ, बीजगणित** हीं चार पुस्तकें आजपर्यंत लिहिलीं व प्रसिद्ध केलीं. **गीर्वाणलघुकोश** ( संस्कृत-मराठी ) चालू आहे. **मुलांचा महाराष्ट्र** हें पुस्तक आज बरेच दिवस लिहून पडलें होतें, पण प्रसिद्ध करण्याचा योग आजपर्यंत आला नव्हता. मराठींतून शिक्षण द्यावें याबद्दल राष्ट्रीय शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनीं ओरड केल्यावर सामान्य मत त्या पद्धतीस अनुकूल होऊं लागलें आहे. सरकारानेंही हें तत्त्व कागदोपत्रीं कबूल केलें आहेच. त्याची अंमलबजावणी मात्र अजून झाली नाहीं. अशा स्थितींत मराठींत लिहिलेल्या पुस्तकांना खासगी लोकाश्रयावरच अवलंबून रहावें लागतें व त्यामुळें हा एक आंतबट्ट्याचाच व्यापार होण्याची फार भीति असते; तथापि महाराष्ट्रीयांच्या गुणग्राहकतेवर भिस्त ठेवून हा प्रयत्न त्यांना सादर करीत आहों. हा प्रयत्न फलद्रूप झाल्यास विद्यार्थ्यांना मनोरंजन, माहिती व बोध यांचा लाभ मिळेल अशा तऱ्हेनें इतर देशांचे इतिहासही लिहून प्रसिद्ध करितां येतील. आजच्या परिस्थितीचें योग्य ज्ञान होऊन सर्व राष्ट्रांच्या मानानें आपली काय स्थिति आहे हें कळण्यास व प्रचलित युगामध्यें आपलें कर्तव्य काय आहे हें जाणण्यास निरनिराळ्या राष्ट्रांचे इतिहास समजून घेणें अत्यंत अवश्य होय.

३. अलीकडे इतिहाससंशोधनाकडे आपल्या लोकांचें पुष्कळच लक्ष लागलें आहे, हें पाहून प्रत्येक राष्ट्राभिमानी पुरुषास समाधान झाल्याशिवाय राहत नाहीं. मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें आज २०।२५ वर्षांमध्यें बरींच प्रकाशित झालीं आहेत व दिवसेंदिवस आणखी प्रसिद्ध होतील. ह्या नवीन सामुग्रीमुळें आपल्या पूर्वेतिहासाबद्दलचे अनेक चुकीचे ग्रह दूर होत आहेत व पुष्कळ राजकारणी प्रकरणांसंबंधानें जास्त बिनचूक कल्पना होत आहेत. पण ह्या सर्व सामुग्रीच्या दृष्टीनें प्रचलित शालोपयोगी इतिहासाच्या पुस्तकांचें परीक्षण होऊन सर्व नवीन माहितीचा त्यांत समावेश करणें अत्यंत जरूर आहे. प्रथम चुकीचीं मतें व माहिती विद्यार्थ्यांनीं ग्रहण करावी व नंतर मोठेपणीं इतिहासाच्या साधनांचे खंड वाचून पूर्वीची माहिती व पूर्वीचे ग्रह पुसून टाकण्याचा खटाटोप करावा, ही स्थिति ठीक आहे असें कोण म्हणेल ? आज जर पुष्कळ गोष्टींसंबंधानें अस्सल कागदपत्रांचे नक्की आधार मिळत आहेत तर त्या माहितीच्या अनुरोधानें चालू इतिहासाची दुरुस्ती करून हा दुरुस्त केलेला इतिहासच एकदम मुलांच्या हातीं द्यावा हेंच केव्हांही श्रेयस्कर होईल.

४. परंतु सत्यासत्यतेची विचक्षणा होऊन खरा इतिहास मुलांचे हातीं पडावा एवढाच आमचा हेतु नाहीं, तर प्रकाशित होणाऱ्या साधनांमध्यें मराठ्यांच्या कर्तब-

गारीचे पुष्कळ प्रसंग उघडकीस येत आहेत तिकडेही तरुण पिढीचें लक्ष जावें, अशी आमची इच्छा आहे. ह्या प्रसंगांचें सविस्तर वर्णन ते ते ग्रंथ मुळांत वाचल्यास सहज मिळणारें आहे व हीं सविस्तर वर्णनें अत्यंत स्फूर्तिदायक होतील असा आमचा भरंवसा आहे. याचकरितां ठिकठिकाणीं टीपेमध्यें मूळ ग्रंथ व त्या त्या प्रसंगाचें त्या ग्रंथांतील स्थल दर्शविलें आहे.

५. इतिहास शिकविण्याच्या अर्वाचीन पद्धतींमध्यें Source method म्हणून एक पद्धत पाश्चात्य राष्ट्रांत जारीनें सुरू आहे. ह्या रीतीनें इतिहास शिकवितांना ज्या काळाचा इतिहास वाचावयाचा असेल तत्कालीन व्यक्तींचीं पत्रें, ग्रंथ, नाणीं व इतर साधनांचा उपयोग करून प्राचीन काळच्या घडामोडींचें प्रत्यक्ष चित्रच विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर उभें राहील अशी विषयाची मांडणी करावयाची असते. हेतु हा कीं विषय मनोरंजक व्हावा, स्फूर्तिदायक प्रसंगांचा मनावर कायम ठसा उमटावा व चिकित्सक अध्ययनास जरूर अशा संशोधक पद्धतींची आवड लागावी. प्रस्तुत पुस्तकांत ह्या महत्वाच्या पद्धतीचें अवलंबन केलें आहे हें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

६. शालोपयोगीं एखादें पुस्तक पाहिलें असतां त्यामध्यें ठराविक सन, तारखा, तहाचीं कलमें इ. जंत्री दिलेली असते. त्यामुळें विषय कंटाळवाणा होतो. शिक्षकालाही राजांचीं नांवें व तारखा इत्यादि घोकून घेण्यापलीकडे कांहीं या विषयांत आहे याची जाणीव नसते. हा दोष चालू शिक्षणपद्धतीचा होय. ही पद्धत बदलून त्याप्रमाणें पुस्तकांच्या रचनेंतही बदल झाला पाहिजे. अलीकडे गोष्टींच्या रूपानें महाराष्ट्राच्या इतिहासाची माहिती देण्याचा प्रयत्न दोघांतिघांनीं केलेला आहे; पण पूर्वीं सांगितलेल्या विशिष्ट गुणांनीं हें पुस्तक अधिक सरस ठरेल अशी उमेद आहे. एकएका गोष्टीमध्यें एकेक प्रसंग वर्णिलेला असून सर्व गोष्टी मिळून मराठ्यांचा संगतवार इतिहास विद्यार्थ्यानें शिकल्याप्रमाणें व्हावें अशी योजना केली आहे व निवडलेले प्रसंग मुलांच्या मनास उदात्त वळण लावणारे असेच आहेत.

७. मराठी साम्राज्याच्या उत्कर्षकाळीं अनेक नररत्नें होऊन गेलीं. त्यांच्यासंबंधानें पुष्कळ मनोरंजक व बोधपर अशा आख्यायिका प्रचलित आहेत. त्यांपैकीं कांहीं परिशिष्टामध्यें दिल्या आहेत. त्यांपासून करमणूक होऊन विद्यार्थ्यांस बोधही मिळेल अशी आशा आहे. इतिहास व भूगोल या दोन विषयांचा एकजीवच आहे. नुसता भूगोल पाठ करून घेणें हा शिक्षणपद्धतींतील अनेक दोषांपैकीं एक होय.

इतिहास शिकतांना जसजसें कारण पडेल तसतशी भूगोलाची माहिती दिल्यानें भूगोल मनावर चांगला ठसतो; व वर्णिलेल्या ऐतिहासिक प्रसंगांचा विद्यार्थ्यांच्या मनावर स्पष्ट ठसा उमटतो, अर्थात् इतिहास वाचतांना नकाशा हा नेहमीं जवळ ठेविला पाहिजे. नकाशाशिवाय इतिहासाचें पुस्तक वाचणें अगदीं नीरस व कंटाळवाणें होतें. म्हणून प्रस्तुत पुस्तकास दोन नकाशे जोडले आहेत. गांवें, प्रांत वगैरेंचीं जुनीं नांवें स ाजच्या नांवांशीं जुळत नाहींत. त्यामुळें पूर्वीच्या काळाचा दर्शक असा नकाशा करणें फार अवघड काम असतें. तथापि बरेच श्रम करून तीं तीं स्थलें ठरवून नकाशा तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. अजूनही कांहीं स्थलांचा निकाल लागत नाहीं अशीं स्थलें नकाशांत अदाजानें भरलीं आहेत. मराठी साम्राज्याचा बिनचूक व साधारण नकाशा भारतेतिहाससंशोधक मंडळानें तयार केल्यास एक महत्कार्यच केल्यासारखें होईल.

८. जुन्या मराठीमध्यें कांहीं मराठी व कांहीं उर्दू मिळून बरेच दुर्बोध शब्द येतात.प्रस्तुत पुस्तकांत असे शब्द मधून मधून आले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांचा बोध व्हावा म्हणून त्यांपैकीं प्रमुख शब्दांची अर्थासह यादी शेवटीं जोडली आहे.

९. आजपर्यंत झालेलें इतिहाससंशोधन विचारांत घेऊन प्रस्तुत पुस्तकांतील माहितीची चिकित्सापूर्वक तपासणी करण्याचें काम भा. इ. सं. मंडळाचे प्रसिद्ध सभासद रा. रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए. व रा. रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन या दोघांनीं वेळांत वेळ काढून केलें याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

१०. रा. रा. चिं. वि. वैद्य, एम्. ए, एल् एल्.बी. व रा. रा. द. गो. लिमये बी. ए., यांनीं प्राचीन भारतेतिहासासंबंधानें माहिती देणारीं व तरुण पिढीला वाचण्यालायक अशीं **श्रीरामचरित्र** व **भारतीय युद्ध** हीं सुंदर पुस्तकें लिहिलीं आहेत, तसेंच हें अर्वाचीन काळच्या मराठ्यांच्या तेजस्वी चरित्राचें पुस्तक तयार केलें आहे; तें तरुण पिढीस स्फूर्तिदायक व मार्गदर्शक होवो, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

तळेगांवदाभाडे धनसंक्रांत
मार्गशीर्ष व. १३ शके १८३६. } **जनार्दन विनायक ओक**

# अनुक्रमणिका


| | पृष्ठांक |
|---|---|
| १ उपोद्घात ... ... ... ... ... ... ... ... | १ |
| २ भोंसले घराण्याचें पूर्ववृत्त ... ... ... ... ... ... | ३ |
| ३ शहाजीची कर्तबगारी ... ... ... ... .... ... | ७ |
| ४ शिवबाचें बालपण ... ... ... ... .... ... ... | १० |
| ५ स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी ... ... ... ... ... | १४ |
| ६ स्वराज्यस्थापना ... ... ... ... ... ... ... | १५ |
| ७ शहाजीचा बंदिवास ... ... ... ... ... ... | २३ |
| ८ चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य ... ... ... ... ... | २६ |
| ९ अफजलखानाचा वध .... ... ... ... ... ... | २८ |
| १० बाजी प्रभूचा पराक्रम ... ... ... ... ... ... | ३२ |
| ११ शाएस्तेखानाची स्वारी ... ... ... ... ... | ३५ |
| १२ रणशूर मुरारबाजी ... ... ... ... ... ... | ३९ |
| १३ बादशहाशीं समेट ... ... ... ... ... ... | ४१ |
| १४ कपटानें धरलें पण युक्तीनें सुटलें ! ... ... ... ... | ४४ |
| १५ स्वराज्यव्यवस्था ... ... ... ... ... ... ... | ४९ |
| १६ गड आला पण सिंह गेला ! ... ... ... ... ... | ५४ |
| १७ सालेरचें युद्ध ... .... ... ... ... ... ... | ६० |
| १८ विजापूरकरांशीं युद्ध ... ... ... ... .... ... | ६२ |
| १९ राज्याभिषेक ... ... ... ... ... ... ... | ६५ |
| २० दक्षिण दिग्विजय ... ... ... ... ... ... ... | ७० |
| २१ विजापूरकरांस साहाय्य ... ... ... ... ... ... | ७५ |
| २२ संभाजीस राज्यप्राप्ति ... ... ... ... ... ... | ७८ |
| २३ सिद्दी व पोर्तुगीज यांच्याशीं दोन हात ... ... ... ... | ८२ |
| २४ वादळ वाहूं लागलें ... ... ... ... ... ... | ८५ |
| २५ तारूं भडकलें ! ... ... ... ... ... ... ... | ८८ |

पृष्ठांक

२६ कर्णधारांचा निश्चय ... ... ... ... ... .... ९३
२७ स्थलांतर ... ... ... ... ... ... ... ... ९५
२८ जगण्यासाठीं पराकाष्ठा ... ... ... ... ... ... ९९
२९ पुनः वादळ ... ... ... ... ... ... १०३
३० तारूं बुडतें कीं काय ? ... ... ... ... ... ... १०९
३१ आणखी लाटा उसळतात ! ... ... ... ... ... ११३
३२ बचावलें ! ... ... ... ... ... ... ... ... ११६
३३ मराठी राज्यांत दुही ... ... ... ... ... ... १२३
३४ बाळाजी विश्वनाथाचा उदय ... ... ... ... ... १२७
३५ बंडखोर मराठे सरदार ... ... ... ... ... ... १२९
३६ बाळाजी विश्वनाथास पेशवाई कशी मिळाली ? ... ... ... १३३
३७ राज्यव्यवस्था ... ... ... ... ... ... ... १३७
३८ स्वराज्याची सनद ... ... ... ... ... ... १४०
३९ मुळावरच घाव घालूं कीं खांद्या आपोआप खालीं येतील ... १४५
४० निजामाची खोड माडिली ... ... ... ... ... १४७
४१ शिंदेहोळकरांचा उदय ... ... ... ... ... ... १५१
४२ गजेंद्रमोक्ष ... ... ... ... ... ... ... ... १५४
४३ कोल्हापूरकर संभाजीशीं समेट ... ... ... ... ... १५७
४४ गृहकलह ... ... ... ... ... ... ... ... १६०
४५ धन्य बाबूराव ! धन्य उमाबाई ! ... ... ... ... १६३
४६ जंजिऱ्याच्या सिद्दीचा बंदोबस्त ... ... ... ... ... १६८
४७ दिल्लीची स्वारी ... ... ... ... ... ... ... १७३
४८ भोपाळचा वेढा .... ... ... ... ... ... ... १७७
४९ माझें मस्तक तरी किल्ल्यांत पडूं दे ... ... ... ... १८१
५० आतां हिंदुमुसलमानांनीं एक झालें पाहिजे ! ... ... ... १८५
५१ बाळाजी बाजीरावास पेशवाई कशी मिळाली ? ... ... ... १८९
५२ माळव्याची सनद ... ... ... ... ... ... ... १९३
५३ आधीं एकी मग मुलूखगिरी ... ... ... ... ... १९८

| | | पृष्ठांक |
|---|---|---|
| ५४ | शाहूचा मृत्यु ... ... ... ... ... ... ... | २०१ |
| ५५ | सांगोल्याची स्वारी ... ... ... ... ... ... | २०७ |
| ५६ | ताराबाईचें कारस्थान ... ... ... ... ... ... | २१० |
| ५७ | शाबास ! शिंदेहोळकर, शाबास ! ... ... ... ... | २१३ |
| ५८ | निजामची हड्डी जिरविली ... ... ... ... ... ... | २१६ |
| ५९ | राघोबाची हिंदुस्थानांत पहिली भरारी ... ... ... ... | २२१ |
| ६० | शिंद्यांचे मारवाडांतील पराक्रम ... ... ... ... ... | २२४ |
| ६१ | मराठी राज्याचा कर्नाटकांत विस्तार ... ... ... ... | २२८ |
| ६२ | निजामच्या दरबाराशीं तंटा ... ... ... ... ... | २३२ |
| ६३ | भगवा झेंडा अटकेवर फडकतो ! ... ... ... ... | २३६ |
| ६४ | अर्धी दक्षिण सर झाली ! ... ... ... ... ... | २४० |
| ६५ | विश्वासघातकी नजिबानें पुरता दगा दिला ! ! ... ... ... | २४३ |
| ६६ | स्वारीची जंगी तयारी ... ... ... ... ... ... | २४७ |
| ६७ | घनघोर संग्राम ! भाऊ ! भाऊ ! ... ... ... ... | २५४ |
| ६८ | पेशव्यांच्या घरांत कलीनें प्रवेश केला ! ... ... ... ... | २६१ |
| ६९ | निजामाशीं युद्ध ... ... ... ... ... ... | २६६ |
| ७० | हैदरचा पुंडावा ... ... ... ... ... ... ... | २७२ |
| ७१ | हैदरअलीवरील पहिली स्वारी ... ... ... ... ... | २७५ |
| ७२ | राघोबाची उत्तर हिंदुस्थानावरील तिसरी स्वारी ... ... ... | २८० |
| ७३ | राज्यकारभार ... ... ... ... ... ... ... | २८४ |
| ७४ | गृहशत्रूचा मोड ... ... ... ... ... ... ... | २८७ |
| ७५ | भासल्यावर दुसरी स्वारी ... ... ... ... ... ... | २९१ |
| ७६ | हैदरअलीवरील तिसरी स्वारी ... ... ... ... ... | २९७ |
| ७७ | पानिपतचा सूड ... ... ... ... ... ... ... | ३०४ |
| ७८ | दक्षिणचा दिवा मालवला ! हिरा हारपला ! ! ... ... ... | ३०९ |
| ७९ | नारायणराव पेशवे ... ... ... ... ... ... | ३१३ |
| ८० | ‘ ध ’ चा ‘ मा ’... ... ... ... ... ... | ३१५ |
| ८१ | आटघटकेचं राज्य ... ... ... ... ... ... | ३२० |

पृष्ठांक

८२ राज्यक्रान्ति–बारभाई ... ... ... ... ... ... ३२४
८३ राघोबाचा पळ ... ... ... ... ... ... ... ३२७
८४ इंग्रजांशीं लढाई ... ... ... ... ... ... ... ३३१
८५ मराठी राज्यांतील दंग्यांचा मोड ... ... ... ... ... ३३४
८६ इंग्रजांचा पराभव ... ... ... ... ... ... ... ३३७
८७ इंग्रजांशीं चाललेल्या लढाईचा शेवट ... ... ... ... ३४२
८८ भाग्यवान् सवाई माधवराव पेशवे ... ... ... ... ३४८
८९ टिपूशीं लढाई ... ... ... ... ... ... ... ३५१
९० महादजी शिंद्याचा उत्कर्ष ... ... ... ... ... ३५५
९१ महादजीचा पेशव्यांचे कारभारी होण्याचा प्रयत्न ... ... ३५९
९२ खर्ड्यांची लढाई ... ... ... ... ... ... ... ३६३
९३ सवाई माधवरावाचा मृत्यु... ... ... ... ... ... ३६७
९४ पेशवे परतंत्र झाले ! ! ... ... ... ... ... ... ३७१
९५ स्वातंत्र्याकरितां धडपड ... ... ... ... ... ... ३७५
९६ मराठी राज्याचा शेवट ... ... ... ... ... ... ३७९
९७ सातारचे नामधारी छत्रपती ... ... ... ... ... ३८३
९८ मराठी राज्याची अंतर्व्यवस्था ... ... ... ... ... ३८५
९९ उपसंहार ... ... ... ... ... ... ... ... ३९१
१०० परिशिष्ट ( आख्यायिका )... ... ... ... ... ... १-१५
१०१ कठिण शब्दांचा कोश ... ... ... ... ... ... १-४

# मुलांचा महाराष्ट्र.

## उपोद्धात.



उत्तरेस नर्मदा नदी, पश्चिमेस आरबी समुद्र, ईशान्येच्या टोंकास असलेल्या नागपूर शहरापासून नैर्ऋत्येच्या गोंवें शहरापर्यंत असलेली एक वांकडीतिकडी रेघ, ह्याच आपल्या महाराष्ट्रदेशाच्या ठोकळ मर्यादा होत. पूर्वीं या देशांत शालिवाहन वंशांतील राजे राज्य करीत होते. त्यांचें राजधानीचें शहर गोदावरी नदीच्या उत्तरतीरीं असलेलें पैठण हें होतें. या वंशांतील राजांनीं सुमारें तीनशें वर्षें राज्य केलें. या राजांच्या नांवावरून आलेला शालिवाहन शक अजूनही महाराष्ट्रांत चालू आहे. या राजांनीं शके १४० पर्यंत राज्य केलें. यांच्या मागून सुमारें तीन शतकेंपर्यंत कोणीं राज्य केलें हें प्रसिद्ध नाहीं.

शके ४७२ च्या सुमारास बदामींतील चालुक्यवंशाचे राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. या वंशांतील चौथा राजा पुलकेशी हा फारच पराक्रमी निघाला. शके ५४२ त कनोजचा महत्त्वाकांक्षी राजा हर्ष हा बरोबर सैन्य घेऊन स्वतः महाराष्ट्रावर चाल करून आला. परंतु पुलकेशीपुढें त्याचें कांहीं न चालून त्यास तसेंच चुरमुरे खात कनोजास परत जावें लागलें. पुलकेशीची कीर्ति केवळ हिंदुस्थानांतच नव्हे तर

इराणापर्यंत पसरली. इराणच्या राजानें पुलकेशीचा स्नेह संपादन करण्याकरितां त्याजकडे एक वकील पाठविला. पुलकेशीच्या मागून चालुक्यवंशाचे आणखी पांच राजे झाले.

शके ६७५ त चालुक्य वंशांतील शेवटचा राजा कीर्तिवर्मा यास राष्ट्रकूट वंशांतील दन्तिदुर्ग नांवाच्या एका पराक्रमी पुरुषानें पदच्युत केलें व त्या वेळेपासून राष्ट्रकूट वंशांतील राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. या राष्ट्रकूट राजांची राजधानी मालखेड येथें होती. याच वंशाच्या कारकीर्दींत वेरुळचीं लेणीं खोदिलीं गेलीं. राष्ट्रकूटांनीं शके ८९५ पर्यंत राज्य केलें. या सालापासून फिरून चालुक्य घराण्याचा अम्मल सुरू झाला. या चालुक्यघराण्यानें फिरून सव्वादोनशें वर्षेपर्यंत महाराष्ट्रांत राज्य केलें. यांची राजधानी मोंगलाईतील कल्याण ही होती. चालुक्यांच्या मागून शके १११२ त देवगड येथील यादव वंशांतील राजे महाराष्ट्रावर राज्य करूं लागले. यादव वंशांत सिंघण यादव या नांवाचा मोठा पराक्रमी राजा झाला. त्यानें गुजराथ, माळवा इत्यादि भोंवतालच्या प्रांतांवर स्वाऱ्या करून राष्ट्रकूटांच्या ताब्यांत होता तितका मुलूख आपल्या ताब्यांत आणिला. शके ११९३ त रामदेवराव जाधव हा गादीवर आला. त्याचा कारभारी हेमाद्री या नांवाचा होता. त्यासच पुढें हेमाडपंत असें नांव पडलें. हा हेमाडपंत मोठा शूर असून बुद्धिमान् होता. त्यानेंच पहिल्यानें मोडी लिपी प्रचलित केली. रामदेवराव जाधवाच्या कारकीर्दींतच ज्ञानेश्वरानें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२ त संपविला. रामदेवराव राज्य करीत असतां शके १२१६ त दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीनें देवगडावर स्वारी केली. रामदेवरावाचा पराभव होऊन त्याला अल्लाउद्दिनास मोठी खंडणी भरून त्याची परत रवानगी करणें भाग पडलें. फिरून शके १२२९ त अल्लाउद्दीन खिलजीचा सरदार मलिक काफूर देवगडावर चालून आला व त्यानें रामदेवरावास पकडून दिल्लीस नेलें. नियमितपणें खंडणी देण्याचें कबूल करून

रामदेवरावानें दिल्लीहून आपली सुटका करून घेतली. रामदेवराव शके १२३१ त वारला. त्याचा मुलगा शंकरदेव हा बापाप्रमाणें दिल्लीस खंडणी पाठवीना, म्हणून मलिक काफुरानें शके १२३४ त फिरून दक्षिणेवर स्वारी करून शंकरदेवास ठार केलें व यादवांचें राज्य खालसा केलें. यानंतर सातआठ वर्षांनीं रामदेवाचा जांवई हरपाळदेव यानें मुसलमानांचा परकीय अम्मल झुगारून देऊन फिरून हिंदू राज्य स्थापण्याचा प्रयत्न केला. परंतु दिल्लीच्या मुबारीक खिलजीनें दक्षिणेंत येऊन हरपाळास पकडून त्याचा वध केला व तेव्हांपासून (शके १२४० इ. स. १३१८) महाराष्ट्रांत मुसलमानांचा परकीय अम्मल चालू झाला !

---

## २ भोंसले घराण्याचें पूर्ववृत्त.



मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें शके १२४० त महाराष्ट्रावर दिल्लीच्या मुसलमान बादशहांचा अम्मल बसला; परंतु तो फार दिवस टिकला नाहीं. शके १२६९ त महाराष्ट्रांतील जाफरखान नांवाच्या मुसलमान सरदारानें बंड केलें व बेदर येथें आपली स्वतंत्र गादी स्थापिली. हा जाफरखान पूर्वी दिल्लीस एका कांगो नांवाच्या ब्राह्मणाचा गुलाम होता. ‘ तूं पुढें राजा होशील, ’ असें भविष्य कांगोनें जाफरखानास सांगितलें होतें. त्या वेळीं जाफरखानानें ‘ मी राजा झाल्यास राज्यास तुमचें नांव ठेवीन ’ असें कबूल केलें होतें. त्यावरून त्यानें बेदर येथें स्थापिलेल्या स्वतंत्र राज्यास ‘ ब्राह्मणीराज्य ’ असें नांव दिलें. या ब्राह्मणी राज्याचीं दीडशें वर्षांत पांच स्वतंत्र राज्यें झालीं. तीं सर्व मुसलमानांचींच होतीं. त्यांतील तीन प्रबळ होतीं.

तीं अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही हीं होत. हीं राज्यें प्रबळ होतीं खरीं, पण तीं केवळ मुसलमानांच्या पराक्रमामुळें होतीं असें नाहीं. या राज्यांतून मोठमोठे मराठे सरदार असत, व त्यांच्या पराक्रमावरच मुसलमानी राज्याचा जोर किंबहुना जीवित अवलंबून होतें. या सर्व मराठ्यांच्या घराण्यांची माहिती असणें अगत्याचें आहे, परंतु प्रस्तुत स्थळीं ती सर्व सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. महाराष्ट्रभूमीवर स्वातंत्र्याचा प्रकाश पाडणारा तेजोराशि सूर्य ज्या घराण्यांत उदय पावला तेवढ्याच घराण्याची पूर्वस्थिति काय होती ती आज आपण पाहूं.

निजामशाहींत मराठ्यांचीं दोन घराणीं विशेष प्रसिद्धीस आलीं. एक भोंसल्यांचें व दुसरें जाधवांचें. यांपैकीं जाधवांचें घराणें भोसल्यांच्या आधींच लौकिकास चढलें होतें. लखुजी जाधवराव हा दहा हजारांची मनसब चालवून एक बडा सरदार म्हणून निजामशाहींत गाजत होता. तेव्हां मालोजी भोंसले वेरूळास कांहीं गांवांच्या पाटिलक्या करीत बसला होता. आपल्या वयाच्या सत्ताविसाव्या वर्षीं जाधवरावाच्या वतीनें मालोजी शिलेदारी करूं लागला. मालोजी शिलेदारी करीत असतां बरींच वर्षें गेलीं. त्यास मुलगा झाला नाहीं. तेव्हां नगरच्या किल्ल्यांत शहासरीफ पीर नांवाचें मोठें जागृत स्थान आहे असें ऐकल्यावरून त्याची स्त्री दिपाबाई हिनें त्या पिराला नवंस केला. पुढें तिला दोन मुलगे झाले, हें त्या पिराच्या कृपेचें फळ होय अशा समजुतीनें मालोजीनें त्यांचीं नांवें शहाजी व सरफजी अशीं ठेविलीं.

शहाजी रूपवान् होता व लहानपणापासूनच मधुर भाषण करण्याची त्याला संवय लागून गेली होती; यामुळें मालोजीची त्याच्यावर विशेष प्रीति होती. दरबारांत व इतर ठिकाणीं मालोजी त्याला आपल्याबरोबर नेत असे. जाधवराव याचे घरीं एकदां रंगपंचमीचा समारंभ होता. नेहमींप्रमाणें मालोजी शहाजीला चांगला पोषाक घालून त्या

समारंभाला घेऊन गेला. या वेळीं शहाजीचें वय पांच वर्षांचें होतें. तेथें जाधवरावाची मुलगी जिजाऊ ही आली होती. ती तीन वर्षांची होती. लहान मुलें एके ठिकाणीं आल्यावर त्यांचे खेळ सुरू होण्यास उशीर लागत नाहीं, हें सर्वांस ठाऊकच आहे. त्यास अनुसरून शहाजी व जिजाऊ एकमेकांच्या अंगावर रंग उडवूं लागलीं. हें पाहून जाधवरावानें जिजाऊला हांक मारून आपल्या मांडीवर घेतलें व शहाजीला दुसऱ्या मांडीवर बसविलें. त्या दोघांचीं रूपें पाहून तो गहिंवरून गेला व त्यानें जिजाऊला विचारिलें "हा नवरा तुला पाहिजे का ?" व मग सर्व जमलेल्या मंडळीकडे पाहून तो म्हणाला "उभयतां जोडा चांगला दिसतो." मालोजीनें हें ऐकलें तेव्हां सर्व सभाजन बसले होते त्यांना " जाधवराव काय बोलतात तें ऐका " असें तो म्हणाला. सभा विसर्जन झाली व मंडळी आपआपल्या घरीं निघून गेली. नंतर जाधवराव पोस्ताचे जेवणाचें निमंत्रण करण्यास आला. तेव्हां मालोजीनें त्यास निक्षून सांगितलें कीं, ' आतां लग्नांत तुमचें आमचें भोजन होईल. मधीं व्हावयाचें नाहीं. ' हें त्याचें निग्रहाचें बोलणें ऐकून जाधवराव मनांत चपापला, व रंगाच्या भरांत आपण हें काय बोलून गेलों असें वाटून त्यास पश्चात्ताप झाला. हें वर्तमान त्याच्या बायकोला कळल्यावर तिच्या तळव्याची आग मस्तकास गेली व ती जाधवरावास रागानें म्हणाली, " आपण मातबर थोर असें असून आपले सेवकाचे घरीं मूल दिली. बराबरीचे निंबाळकर, शिर्के, महाडीक, पातशाही चाकर यांच्या घरीं मुलगे आहेत; ते टाकून याची मातबरी आपण काय पाहिलीत ? " जाधवरावाला तिचें म्हणणें पटलें व त्यानें मालोजीला बोलावून आणून आपण बोललों तें थट्टेनें बोललों; वास्तविक त्यांत कांहींच नाहीं असें सांगून निरोप दिला.

जाधवराव बोलले तर खरेंच, पण आतां थट्टेवारी नेतात, तेव्हां आतां हें लग्न कसें होईल याची मालोजीला चिंता पडली. शेवटीं त्यानें मनांत

पक्की खूणगांठ बांधिली कीं, जर नांवाचा मालोजी असेन तर हरयत्न करून हें लग्न जमवून आणीन; असा निश्चय करून मालोजी वेरुळास परत आला व तेथें काय करावें या विचारांत होता, इतक्यांत त्याला आपल्या बागेंतील वारुळांत द्रव्य सांपडलें. तें नेऊन शेषाप्पा नाईक पुंडे म्हणून एक भला गृहस्थ श्रीगोंदें येथें राहत होता त्याजकडे ठेविलें. मालोजीनें हळू हळू आपली पागा वाढविण्याची तयारी चालविली. " घरीं घोडीं खरेदी करून पागा वाढविली, हजार पांचशें केलीं. श्रीशिखर महादेव येथें चैत्री यात्रा बहुत येणें, उदक नाहीं, यात्रेस फार श्रम होतात, जाणून मोठें विस्तीर्ण तळें बांधिलें. त्यांत उदक अपरिमित राहूं लागलें. याजमुळें यात्रेस फार सुखावह झालें.[१] " श्रीवेरुळ येथील घृष्णेश्वराच्या देवालयाचा जीर्णोद्धार केला व शिवालय बांधिलें. अशीं लोकोपयोगी कृत्यें केलीं व लग्नाच्या मसलतीचा घाट घातला, तो असाः— जगपाळराव निंबाळकर हा मालोजीचा मेहुणा होता; त्याच्या सहाय्यानें रानडुकरें मारून दौलताबादेंत येऊन तीं गळ्यांत चिठ्या बांधून मशिदींत टाकिलीं. चिठ्यांत निजामशहा बादशहास अर्ज लिहिला कीं, " लखूजी जाधवराव यांनीं आपली कन्या जिजाई आमचे पुत्र शहाजी यास देऊं केली. शिमग्याचे पोस्तांत हुजूरमजलसींत बोलून स्त्रियांचेयोगें नाकबूल झाले आणि आम्हांस चाकरीवरून दूर केलें. यास्तव आपण जगपाळ निंबाळकर यांचा आश्रय करून मशिदींत डुकरें मारिलीं. याउपरी पादशहा आमची दाद घेऊन सोयरीक आम्हांस करून देवावितील तर उत्तम. " दुसरे दिवशीं सकाळीं मुसलमान येऊन मशिदीपुढें पाहतात तों त्यांना डुकरें मेलेलीं दिसलीं, मग मुसलमानांचा राग अनावर झाला. हें वृत्त बादशहास कळल्यावर तोही संतापला. या वेळीं दिल्लीच्या पादशहाची निजामशाहीवर वक्रदृष्टि झाली होती. तेव्हां निजामशहाच्या वजिरांनीं असा बेत केला कीं, या वेळीं मालोजीची समजूत पाडिली

१ चिटणिसबखर, पृ. १७. मराठी साम्राज्याची छोटी बखर, पृ. ६.

पाहिजे. म्हणून त्यांनीं त्याला बोलावून आणिलें व रुसण्याचें कारण विचारिलें, तेव्हां त्यानें सर्व हकीकत सांगितली. तेथील सर्व मंडळींची खात्री झाली कीं, जाधवरावानें वचन मोडिलें म्हणून तो अपराधी आहे. पण त्याला शासन करणें शक्य नव्हतें. गोड बोलूनच लग्न करून टाकण्याचा दरबारच्या मंडळींनीं विचार केला. नंतर जाधवरावास बोलावून आणिलें तेव्हां त्यानें लग्न न करण्याचीं कारणें सांगितलीं, तीं ऐकून पादशहा बोललाः " मग कांहीं हरकत नाहीं; ही मी त्यास तुमच्या सवाई मनसब देतों. " असें म्हणून पंचहजारी मनसब, राजे असा किताब, शिवनेरी व जुन्नर वगैरे तालुके, सरंजाम व साहेबनौबत दिली. जाधवरावही मुलगी खुषीनें देण्यास तयार झाला. मग बादशहानें स्वतः जाऊन लग्नसमारंभ मोठ्या थाटानें साजरा केला.

---

## ३ शहाजीची कर्तबगारी.



मालोजी वाराल ( शके १५४१ ) तेव्हां शहाजी सुमारें पंचवीस वर्षांचा होता. तो बापासारखाच शूर असल्यामुळें त्यास बापाच्या मृत्यूनंतर लागलींच मनसब मिळाली. या वेळीं निजामशाही राज्यांत मलकंबर नांवाचा प्रमुख वजीर होता. दिल्लीचे पादशहा तर राज्य गट्ट करण्याकरितां सारखे प्रयत्न करीत होते; व हा वेळपावेतों मलकंबरानें मोठ्या शौर्यानें मोंगलांशीं दोन हात करून निजामशाही राखिली होती. शहाजी आपली मनसब करूं लागल्यास वर्ष होतें न होतें तोंच मोंगलांची धाड फिरून एकदां निजामशाही मुलखावर आली. ही धाड परतवून लावण्यांत मलकंबरास शहाजीची फारच मदत झाली व शहाजीची योग्यता त्याच्या ध्यानांत येऊन त्याचें शहाजीवर अति-

शयच प्रेम जडलें. तें इतकें कीं, पुढें थोड्याच दिवसांनीं शहाजीचा सासरा लखूजी जाधवराव याच्या मनांत मत्सर उत्पन्न होऊन त्यानें निजामशाहींतील आपली नोकरी सोडली आणि तो मोंगलास जाऊन मिळाला.

मलकंबर शके १५४८ त ( १६२६ इ. स. ) वारला व त्यानें गादीवर बसविलेला मुर्तजा निजामशहाही वारला. तेव्हां मुर्तजाचा लहान मुलगा हुसेन हा गादीवर आला व राज्यांतील मुख्य सत्ता शहाजीच्या हातांत आली. हें मलकंबराचा मुलगा फत्तेखान यास सहन झालें नाहीं. त्यानें जाधवरावाशीं सख्य केलें व मोंगलांस वश करून घेऊन शहाजीचा पुरता नाश करण्याचा बेत केला. जाधवराव व फत्तेखान हे मोंगलांची मदत घेऊन शहाजीवर चालून आले. तेव्हां गादीवर बसविलेला छोटा बादशहा व बेगम यांस बरोबर घेऊन त्यांजपुढें हटत हटत शहाजी कोंकणांत माहुली किल्ल्यांत उतरला व तेथें शत्रूशीं सहा महिने त्यानें टक्कर दिली. पण इतक्यांत त्यास असें कळलें कीं, बेगमही त्या मंडळीस मिळाली आहे; तेव्हां निजामशाहीचा संभाळ करण्याच्या भरीस यापुढें न पडतां आपल्या संरक्षणाच्या खटपटीस लागण्याचा विचार त्यानें कायम केला व नाणें घाटानें तो देशावर आला. वाटेनें येतांना शत्रु त्याचा सारखा पाठलाग करीत होते. त्याची स्त्री जिजाबाई गरोदर होती म्हणून तिला त्यानें शिवनेरीच्या किल्ल्यांत ठेविलें व तो स्वत: अहमदनगराजवळ येऊन राहिला.

मोंगलांनीं फत्तेखानास खूष करण्याकरितां कांहीं जहागीर दिली, त्यांत शहाजीचे कांहीं प्रांत होते. त्यामुळें शहाजीस राग आला व मोंगलांचा सरदार महाबतखान दौलताबादेस होता त्यावर विजापूरकरांच्या मदतीनें स्वारी करण्याचा शहाजीनें बेत केला. फत्तेखानासही त्यानें आपल्या बाजूकडे वळविलें. या युद्धांत मोंगलांना जय मिळाला. त्यांनीं फत्तेखान व निजामशहा या दोघांस कैद करून ग्वाल्हेरच्या

किल्ल्यांत पाठविलें. याच स्वारींत एक गोष्ट घडली. ती शहाजीच्या अकलेचें उत्तम उदाहरण आहे. एकदां शहाजी व विजापूरकर यांच्या फौजेचा मुक्काम भीमा-इंद्रायणीच्या संगमावर पडला होता. त्या दिवशीं सोमवार असून सूर्यग्रहण पडलें होतें. तेव्हां विजापूरचा सरदार मुरार जगदेव यानें उत्तम पर्वकाळ आहे असें पाहून सुवर्णतुळा दान केली. त्या प्रसंगीं हत्तीची तुळा कशी करावी हा प्रश्न निघाला तेव्हां कोणाचीही मति चालेना. अशा वेळीं शहाजीनें युक्ति सुचविली. " हत्ती नावेंत घालून हत्तीचे भारें नाव जितकी पाण्यांत बुडेल तेथें खूण करून हत्ती काढून द्रव्य त्यांत घालून खूण जमली म्हणजे तुळा झाली. " मुरारपंत शहाजीवर फार खूष झाला व त्यानें त्या गांवचें नांव ' नागरगांव ' होतें तें बदलून ' तुळापूर ' असें ठेविलें तें अद्याप चालत आहे.

यापुढें एक वर्षानें शहाजहान बादशहानें महाबतखानास परत बोलाविलें व दक्षिणेकडे मोंगलांचे सुभे रिकामेच राहिले. शहाजीनें हें पाहून फिरून निजामशाहीची स्थापना करण्याचा निश्चय करून एका लहान मुलास निजामशाहीच्या तक्तावर बसविलें व मोंगलांनीं घेतलेला बराच मुलूख परत मिळविला. दिल्लीच्या शहाजहान बादशहास वाटत होतें कीं, आतां निजामशाही कायमची बुडाली व म्हणून तो स्वस्थ होता; पण इतक्यांत शहाजीच्या पराक्रमाची त्यास खबर लागली. त्यानें शहाजीच्या पारिपत्याकरितां दोन सरदारांची रवानगी केली. पण शहाजीस विजापूरकरांची मदत आहे असें कळल्यावर निजामशाहीचा मोड करण्याकरितां बादशहा स्वतःच मोठें सैन्य बरोबर घेऊन दक्षिणेंत आला. कांहीं दिवस युद्ध चालल्यावर विजापूरकरांनीं शहाजहानाशीं तह केला. हें वर्तमान शहाजीस कळतांच त्यानें बादशहाशीं तहाचें बोलणें लाविलें व निजामशाही वांचविण्याचा आपला दुसरा प्रयत्न मोठ्या कष्टानें सोडून दिला.

---

१ शके १५५५ भाद्रपद वद्य ३० सोमवार ता. २३।९।१६३३.

# ४ शिवबाचें बालपण.



शहाजी कोकणांतल्या माहुली किल्ल्यावरून मोंगलांपुढें येत असतां वाटेंत जिजाबाई गरोदर असल्यामुळें तीस शिवनेरीवर ठेवावें लागलें, म्हणून मागील गोष्टींत सांगितलेंच आहे. तेथें असतां आपल्या नवऱ्याचें व बापाचें भांडण व मधल्यामध्यें आपल्या नवऱ्यावर पडलेली मोंगलांची धाड या गोष्टींचा विचार जिजाबाईच्या मनांत रात्रंदिवस येत असल्यामुळें ती सारखी काळजींतच असे. त्या संकटकाळीं तिनें तेथें किल्ल्यावर असलेल्या शिवाई देवीला " मला मुलगा होऊं दे, मी त्याला तुझें नांव ठेवीन " असा नवस केला. तिला शके १५४९ च्या वैशाख शु० २ ( इ. स. १६२७ ) स मुलगा झाला, तेव्हां तिला फार आनंद झाला. व हें देवीला केलेल्या नवसाचें फळ म्हणून तिनें त्याचें नांव ' शिवाजी ' असें ठेविलें.

शिवाजीचें लहानपण शिवनेरी किल्ला व त्याच्या आसपासचा पुणें-प्रांत यांतच गेलें. तेव्हां त्याची जोपासना करणारी त्याची आई जिजाबाई हीच काय ती होती. जिजाबाईला माहेरचें सुख पहिल्यापासून नव्हतेंच. आतां तर जाधव हे भोंसल्यांचे वैरीच झाले होते ! इकडे नवऱ्याकडून तिनें सुखाची आशा करावी तर शहाजीचें तिजशीं काय बिनसलें होतें कोणास ठाऊक ! त्यानें मोहित्यांची कन्या तुकाबाई हिजशीं दुसरें लग्न केलें. अशी जिजाबाईची अगदीं निराशा झाली होती. कोणीकडूनच तिला सुख नव्हतें; पण ईश्वराची लीला अगाध आहे. तिला त्यानें जो मुलगा दिला होता त्याची भक्ति तिजवर कांहीं विलक्षणच होती ! शिवाजीची एकंदर चालचालणूक पाहून तिला अतिशय समाधान होई व असा मुलगा लाभला म्हणून तिला धन्यता वाटे.

म. ३. १३५

शिवाजी म्हणजे तिचा जीव कीं प्राण. नवऱ्याविषयीं किंवा बापाविषयीं स्मरण होऊन तिला दुःखाचा आवेग येई; परंतु इतक्यांत जर कां शिवाजी दिसला तर तें दुःख पार कोठल्याकोठें विरघळून जाई. इतकें त्या माउलीचें शिवाजीवर प्रेम होतें. तिनें शिवाजीला जवळ बोलावून कधीं रामायणांतल्या तर कधीं महाभारतांतल्या वीरांच्या कथा सांगाव्या. रावणाच्या दुष्टाव्याच्या गोष्टी ऐकून शिवाजीनें क्रोधानें लाल व्हावें. रामाच्या वनवासानें त्याचें मन द्रवून जावें. 'शत्रूचें पारिपत्य करून कुळाचा उद्धार करणारा शककर्ता राजा आपल्या कुळांत निपजणार आहे, म्हणून देवीचे दृष्टांत झाले आहेत; परंतु ते केव्हां खरे होतील कोण जाणे!' असे दुःखोद्गार जिजाबाईनें कधीं कधीं काढावे. हा आपल्या अत्यंत प्रिय मातेचा उपदेश शिवाजीच्या डोक्यांत सारखा घोळत असे.

शिवाजीचा दुसरा गुरु म्हटला म्हणजे पुणें प्रांतावरचा शहाजीचा कारभारी दादाजी कोंडदेव मलठणकर हा होय. दादाजी कोंडदेव फारच करारी होता. एके दिवशीं दादाजीपंतानें सरकारबागेंतील एक पाडाचा आंबा तोडला. पुढें आपण हा मालकाला न विचारतां तोडला याबद्दल वाईट वाटून, त्यानें ज्या हातानें तो आंबा तोडला होता तो हात तोडून टाकण्याचा निश्चय केला. शिवाजीनें व जवळच्या इतर मंडळींनीं फार निषेध केला, तेव्हां पंतानें या चुकीचें आपल्याला जन्मभर स्मरण रहावें व आपल्या हातून फिरून चूक होऊं नये, म्हणून त्या हाताची अस्तनी जन्मभर लांडी ठेविली! दादाजी कोंडदेवानें पुणेंप्रांत अगदीं उजाड पडला होता तो लागवडीस आणण्याची फार खटपट केली. मुलखांत लांडगे फार झाले होते म्हणून त्यानें लोकांस बक्षिसें देऊं करून लांडगे मारून टाकविले; व लोकांस कांहीं वर्षांची सूट देऊन जमिनी लागवडीस आणिल्या. या प्रांतांत राहणाऱ्या लोकांस मावळे म्हणत. ते दिसण्यांत अडाणी असले तरी प्रामाणिक असून मोठे

उद्योगी व चपळ असत. दादाजीनें प्रांताचा बंदोबस्त करण्यांत यांचा चांगला उपयोग करून घेतला. बिनकवाइती लोकांचें एक पलटणच त्यानें तयार केलें व गांवोगांव चौक्या पहारे बसवून चोरांची भीति नाहींशी केली. आपल्या हद्दींतील किल्ले दुरुस्त केले व त्यांजवर शिबंदी ठेवून दिली. या दादाजीच्या व्यवस्थेनें प्रांतांत शांतता नांदूं लागली, लोकांस उद्योगधंदा मिळाला आणि पुणें प्रांताची लवकरच भरभराट झाली. अशा रीतीनें ज्या मावळे लोकांच्या साहाय्यानें शिवाजीनें पुढें स्वराज्यस्थापना केली व मोठमोठीं युद्धें केलीं त्या लोकांस योग्यतेस चढविण्याचा दादाजींनें आरंभ केला होता! त्यानें शिवाजीला घोड्यावर बसणें, तिरंदाजी करणें, भाला मारणें, तरवार वगैरे हत्यारें उत्तम रीतीनें चालविणें इत्यादि राजपुत्रास अवश्य असें सर्व मर्दानी शिक्षण दिलें. शिवाय जमाबंदी, वसूल इत्यादि हिशेबी कामांतही शिवाजीची त्यानें बरीच गति करून दिली. पुढें जी शिवाजीनें आपल्या राज्यांतील वसूल वगैरे मुलकी बाबींची उत्कृष्ट व्यवस्था लाविली, ती लावतां येण्यास दादाजी कोंडदेवापासून लहानपणीं मिळालेल्या शिक्षणाचा त्याला फार उपयोग झाला हें उघड आहे.

शिवाजी सुमारें तेरा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या गुणांची फार तारीफ ऐकल्यामुळें शहाजीस त्याची भेट घेण्याची इच्छा झाली व त्यानें त्यास कांहीं दिवस विजापुरास नेलें. तेथें असतां लहानपणीं आईच्या तोंडून ऐकलेलीं यवनांचीं दुष्ट कृत्यें शिवाजीच्या प्रत्यक्ष दृष्टीस पडूं लागलीं. या गोष्टी डोळ्यांनीं पाहून त्याचें अंतःकरण खवळून जाई व गोवध करणाऱ्या यवनांचें पारिपत्य करून गोवध केव्हां बंद करीन असें त्यास होऊन जाई. एकदां शहाजीनें पादशहाच्या दर्शनास येण्याविषयीं शिवाजीस आग्रह केला. तेव्हां शिवाजीनें खिन्न होऊन उत्तर केलें. "अमीर वजीर यांचें घरीं जाणें, हें माझें चित्तास योग्य वाटत नाहीं."[1]

१ चिटणीसबखर पृष्ठ २७.

हें बोलणें शहाजीस रुचलें नाहीं व त्यानें शिवाजीचा निषेध केला कीं, " पृथ्वीचे अधिपति ते, तेव्हां आपला धर्म आपण रक्षून सेवा करून असावें. " तरी शहाजीस वाटलें कीं, आपण यास दरबारांत घेऊन जावें, मग तेथें कांहीं हा वांकड्या रीतीनें वागावयाचा नाहीं. म्हणून त्यानें अत्याग्रहानें एक दिवस शिवाजीस आपल्याबरोबर दरबारास नेलें. शहाजी रीतीप्रामाणें मुजरा करून आपल्या जागीं जाऊन बसला; परंतु शिवाजी मुजरा न करितां तसाच आपल्या जागीं जाऊन बसला. तेव्हां दरबारांत सर्वांस आश्चर्य वाटलें व जिकडेतिकडे चुळबूळ सुरू झाली. इतक्यांत मुरारपंत म्हणाला " लेंकरूं आहे, दरबार पाहून घाबरलें, त्याला लौकर दरबारांतून जाऊं द्या. " असें म्हटल्यावर विडे देऊन निरोप दिला. शिवाजीच्या वागण्याची ही रीत पाहून शहाजीस चिंता पडली. त्याला एक थोरला मुलगा संभाजी म्हणून होता तो युद्धांत मारला गेला; शिवाजी हा धाकटा होता, हा तरी नीट वागेल व दौलतीचें रक्षण करील असें त्यास वाटत होतें; पण याच्या वागण्याची ही रीत. आतां काय करावें म्हणून शहाजी मोठ्या फिकीरींत पडला. एके दिवशीं शिवाजी विजापुरांत हिंडत होता, तेव्हां एका कसायाच्या घरीं वध होत असतां गाईनें हंबरडा फोडला तो त्यानें ऐकला. तेव्हां त्याला कळवळा येऊन त्या कसायाचा संताप आला. कसायास धरून कमच्याचा मार दिला. गाय सोडून दिली व तिची किंमत कसायाच्या हातावर ठेवून कसायास घालविलें. हें वृत्त साऱ्या गांवभर कळलें. तेव्हां लोक म्हणूं लागले कीं, " आज यवनी पादशाही नष्ट झाली कीं काय ? " हें वृत्त शहाजीस समजलें तेव्हां त्याला आपल्या मुलाविषयीं मोठी काळजी लागून राहिली व याला कोठें तरी लांब ठेविला पाहिजे असा त्यानें विचार केला. दादाजी कोंडदेव हिशेब देण्यास विजापुरीं आला होता. त्याजबरोबरच शिवाजीस पुणेप्रांतांत त्यानें पाठवून दिलें. ( शके १५६५ इ. स. १६४३ ).

## ५ स्वराज्यस्थापनेची पूर्वतयारी.

शिवाजीस पुण्यास पाठवितांना शहाजीनें दादाजीस शिवाजीला फार जपण्यास सांगितलें होतें. यामुळें दादाजीही शिवाजीवर जास्त नजर ठेवूं लागला. आतां शिवाजीही मोठाच झाला होता, तेव्हां वसूल करायास पंत निघाले कीं शिवाजीस आपल्याबरोबर नेत. आपल्या जहागिरीचा बंदोबस्त कशा तऱ्हेनें उत्तम राहील याबद्दल शिवाजीला वारंवार कांहीं माहिती देत. जमाबंदी कशी करावी हेंही त्यास शिकवीत. शिवाजी जसा मोठा होऊं लागला तसतशा त्याच्या बालपणच्या कल्पना दृढावत चालल्या. आतां तर त्याला जास्त समजूं लागलें. महम्मदी ( मुसलमानांच्या ) धर्मांत मूर्तिध्वंस पवित्र मानलेला आहे. त्यामुळें हिंदूंच्या देवळांतील मूर्तींचा ध्वंस कधीं कधीं त्यांजकडून होत असे. शिवाय गाई व ब्राह्मण यांस हिंदु धर्म जसा पूज्य मानतो तसें महम्मदी धर्मांतील लोक मानीत नसल्यामुळें या दोहोंचाही त्यांजकडून योग्य बोज राखला जात नसे. रामायण व महाभारत यांच्या श्रवणानें हिंदुधर्माचीं मूलतत्वें शिवाजीच्या मनावर पक्कीं बिंबलीं होतीं व गाई, देव ( मूर्ति ) आणि ब्राह्मण यांच्याठायीं त्याची अढळ निष्ठा बसून गेली होती. म्हणून त्यांचा उपमर्द झाल्याच्या गोष्टी जेव्हां त्याच्या कानावर येत तेव्हां शिवाजी अगदीं क्रोधायमान होई व या कृत्यांचा नायनाट कसा करावा यासंबंधींचे विचार त्याच्या मनांत नेहमीं येत. आपल्या हातांत सामर्थ्य, अधिकार व सत्ता आल्याशिवाय आपल्याला हीं कृत्यें बंद करतां यावयाचीं नाहींत असें त्यास वारंवार वाटे, व त्यासाठीं आपल्या अंगांत सामर्थ्य असून हातांत सत्ता आल्याशिवाय कांहीं उपयोग नाहीं. आपलें हिंदूंचें राज्य स्थापण्याची खटपट आपण केली पाहिजे अशी कल्पना

त्याच्या मनांत येई व केव्हां केव्हां तर ती इतकी जोरदार होई कीं, "आम्हीं हिंदु कुळीं जन्म घेऊन ब्राह्मणउच्छेद, गोवधादि दुष्ट कृत्यांचा नाश होईल तरी जन्मास आलियाचें फळ, नाहीं तरी गर्भीचे ठिकाणीं हा देह झाल्याचें दुःख नाहीं; परंतु जीवित असल्यानी दुःसह" असें मनांत येऊन त्यास अगदीं चैन पडेनासें होई. असें चाललें असतां शेवटीं त्यानें निश्चय केला कीं, "**धर्मरक्षणार्थ** प्राणही वेंचून धर्म रक्षूं व आपलें पराक्रमें नवीन दौलत संपादूं तें अन्न भक्षूं. नवें साधावें हें या कुलांत जन्मल्याचें सार्थक. दैव पंगु आहे. यास्तव प्रयत्नें अबळ करावें. त्यास दैव जसें अधिक साहाय्य होईल तसतसें अधिक करित जावें. दैव परिणामास नेणार समर्थ आहे."

दादाजीच्या हाताखालीं शामराज नीळकंठ, बाळकृष्ण मुजुमदार, सोनोपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे ही ताज्या दमाची तरुणबांड मंडळी होती. शिवाजीचा निश्चय कायम झाल्यावर या घरच्या मंडळीसच आपल्या मताकडे ओढण्याची त्यानें खटपट चालविली व त्यांत यश येण्यास वेळ लागला नाहीं. शिवाय दादाजीपंत शिवाजीस प्रांतांत हिंडण्यास घेऊन जाऊं लागला होताच. तेव्हां डोंगरांत राहणाऱ्या मावळे लोकांपासून त्यानें त्या प्रांतांतील सर्व जागांची माहिती करून घेतली. या वेळींच तीन मावळे शिवाजीला अतिशय प्रिय झाले व ते यावज्जन्म त्याच्या प्रीतींत राहिले. ते तानाजी मालुसरा, बाजी पसलकर व येसाजी कंक हे होत. या सर्व लोकांची शिवाजीवर फारच भक्ति होती. एकदां शिवाजीनें विचारलें, "आम्हीं कांहीं कार्यावलंब केला असतां तुमची अनुकूळता कशी आहे?" लोकांनीं उत्तर केलें, "महाराज, तुम्ही धणी कसे मायबाप आहां. तुमचे शब्द तेथें आमचें शीर. जी आज्ञा कराल ती मान्य. वरकड विषयांचा पदार्थच मानित नाहीं." मावळ्यांचा आपल्यावरील दृढविश्वास पाहून आपल्या कल्पना त्यांच्या

१ पृष्ठ ११५ शिवदिग्विजय.

मनांत रुजविण्याचा शिवाजीनें क्रम ठेविला. शिवाजीचे विचार मावळ्यांस पटले व ते वाटेल त्या बिकट कामांत त्यास साहाय्य करण्यास तयार झाले. पुढें " कारकून सरदार वगैरे ममतेंत, मसलतींत येतील त्याप्रमाणें घेऊन आणखी चांगले मर्द शिपायी पाहून त्यांस जवळ ठेवावें. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेंच राजकारणें करावीं; मातबर चहूं जागचे मराठे यांसी आप्तपणा करावा. पत्रें लिहावीं. त्यांस आणून भेट घ्यावी. आपण त्यांजकडे जाऊन 'आम्हांस अनुकूळ असावें असें बोलावें' असें करण्यांत ज्यांनीं महाराजांचें ( शिवाजीचें ) बोलणें परम आदराचें व पराक्रमाचें ऐकावें यास वेध लागून वाटावें कीं हे परम थोर आहेत. यांचेच संमतें चालावें हें सांगतील तसें चालावें. प्राणही गेले तरी जावोत. परंतु सेवा करून यांचे आज्ञेंत चालावें. अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं. "

शिवाजी व त्याचे अनुयायी एकत्र जमत व पहिल्यानें काय करावें यासंबंधीं त्यांचीं बोलणीं होत. त्यांत पुष्कळ वादविवाद झाल्यावर आपल्या भोंवतालचे देशमुख आपण अंकित करून घेतले पाहिजेत असें ठरलें. मग या मंडळींनीं तें कार्य करण्यास आरंभ केला. प्रथम गोडीगुलाबीनें, " मी तुमचा अंकित आहें. " असा दस्त लिहून दे अशी देशमुखास ते विनंति करीत. गोडीगुलाबीनें कार्य होत नाहीं असें दिसल्यास धाकदपटशास सुरुवात होई, मग त्या दस्त लिहून न देणाऱ्या देशमुखास अडून म्हणा उघड म्हणा त्रास देत. अशा रीतीनें बारा मावळांतील देशमुख

१ चिटणीस बखर पृ. ३०. २ जुन्नरापासून चाकणपर्यंत १२ मावळें व पुण्यापासून शिरवळापर्यंत १२ मावळें. जुन्नरापासून चाकणपर्यंत. शिवनेर, जुन्नेर, मोन्नेर, घोडनेर, भीमनेर, भामनेर, जामनेर ,पिंपळनेर, पारनेर, सिन्नर, संगमनेर, अकोळनेर, पुण्याखालील बारा खालीलप्रमाणें; अंदरमावळ, नाणेमावळ, पवनमावळ, घोटपमावळ, पौडखोरें, मासेंमावळ, गुंजणमावळ, वेळवंडमावळ, भोरखोरें, शिवतरखोरें, व हिरडसमावळ.

शिवाजीनें बांधून घेतले. याकरितां त्याला कांहीं अधिकारी नेमावे लागले. देशमुखाचें मन वळविणारास त्यानें डबीर नेमिलें. जो त्याजकडून दस्त करून घेई त्यास मुख्य प्रधान नेमिलें, व ज्या छोट्या सैन्याच्या जोरावर ही खटपट चालली होती त्याच्या व्यवस्थापकास सबनीस केलें. " हीं सर्व कृत्यें आपल्या जहागिरीच्या संरक्षणाकरितां करीत आहें " असें शिवाजी म्हणे.

हीं कृत्यें चालू होतीं तेव्हां दादाजी कोंडदेवास फार वाईट वाटलें. आपल्या धन्याची जहागीर ओसाड पडली होती ती आपण इतक्या नांवारूपास आणिली, पण या आपल्या धन्याच्या मुलास तिची कांहींच किंमत वाटत नाहीं, व तो कांहीं निराळ्याच फंदांत असतो हें पाहून त्याला अन्न अगदीं गोड लागेना. एके दिवशीं शिवाजीस जवळ बोलावून तो म्हणाला, " आपण म्हणतां तें कार्य चांगलें खरें, पण याचा शेवट लागणें परमदुर्घट आहे. या करण्यास आपणास मातबर स्थलें असावीं, हिंदु राजे व हिंदु फौजा जागजागीं साह्यकर्त्या असाव्या, त्या समयीं ईश्वराची अनुकूलता व सिद्धपुरुषांचा आशीर्वाद असतां अशा गोष्टी घडतील. साहेब मनांत आणतात हें कठीण. वडिलें योग्यता मेळवून दौलत संपादन केली. याचा विचार म्हणावा तरी हें युग विपरीत, तेव्हां दिवसेंदिवस धर्म क्षयास जाणार, तेव्हां हें घडणें दुरासद. कालदेशवर्तमान तिहींकरून मनसब्यास येत नाहीं. वडिलीं दौलत संपादली ती गमावली हे वांट्यास न यावें.[1] " पण शिवाजीचा निश्चय अगदीं कायम झाला होता, म्हणून धर्मरक्षणासाठीं दौलत, किंबहुना प्राण गेला तरी जावो, प्रयत्न करावा, असा फिरून एकदां निर्धार करून तो आपल्या कार्यास लागला. या वेळीं त्याचें वय सतरा वर्षांचें होतें.

---

१ चिटणीसबखर, पृ. २९.

शिवाजी पुण्यास येऊन राहिला तेव्हांच त्याचीं दोन लग्नें झालीं होतीं. पहिली स्त्री निंबाळकरांची सईबाई; हिलाच पुढें संभाजी झाला. दुसरी शिर्क्यांची सोयराबाई; हिजपासून त्यास राजाराम झाला.

---

१ स्वराज्यस्थापनेला दादाजी पहिल्यानें अनुकूल नव्हता अशी आजपर्यंत सामान्य कल्पना असे. परंतु अलीकडे प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांस शिवाजीनें दादाजी नरस प्रभू यास इ. स. १६४५ त पाठविलेलें एक पत्र मिळालें आहे, त्यावरून दादाजीचें शिवाजीस पहिल्यापासूनच साहाय्य होतें इतकेंच नव्हे तर त्या वेळचा ' हिंदवी स्वराज्य ' स्थापण्याचा उद्योग करणाऱ्या सूत्रधारांत तो अग्रणी होता असा अंदाज करणें वाजवी होईल. सदरील पत्र म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १५, यांतील २६८ वा लेखांक होय. या मुद्यावरील नवें मत विस्तारानें प्रतिपादिलेलें पाहणें असल्यास लोकशिक्षण, वर्ष १, अंक ११, मधील ' ऐतिहासिक सूक्ष्मावलोकन ' हा लेख पहावा.

लेखांक २६८ येणेंप्रमाणें आहे.

श्री. १५६७ वैशाख शु० १.

सिका नक्कल

राजश्री दादाजी नरस प्रभू देशपांडे व कुळकर्णी ता। रोहिरखोरें व वेलवंड खोरें यासि प्रति सिवाजी राजे सु॥ खमस अर्बैन अलफ तुम्हास ( सिका ) चि मेहेरबान वजिराचा विजापुराहून हुकूम आला तो ठाणें सिरवलाहून ठाणेअमिनानी तुम्हांकडे पाठविला त्याजवरून तुमचे बाप नरसीबावा हवालदिल जाले कित्येक बहुतेक लि॥ त्यास शहास बेमानगिरी तुम्ही व आम्ही करीत नाहीं. श्रीरोहिरेश्वर तुमचे खोरियांतील आदि कुलदेव तुमचा डोंगरमाथा पठारावर शेंद्री ( सह्याद्री ) लगत स्वयंभू आहे. त्याणीं आम्हास यश दिलें व पुढें तो मनोरथ ' हिंदवी स्वराज्य ' करून पुरविणार आहे, त्यास बाबास हवाल होऊं

[ पुढें चालू. ]

## ६ स्वराज्यस्थापना.

शिवाजी देशमुखांस बांधून घेत असतां त्याच्या मनांत अशी कल्पना आली कीं, आपला मुलूख डोंगराळ, तेव्हां यावर सत्ता चालवूं इच्छिणारानें किल्ल्या-सारख्या बळकट जागा आपल्या ताब्यांत घेतल्या पाहिजेत; एक एक किल्ला हातांत आला कीं, भोंवतालचा सर्व मुलूख काबीज करण्यास अवघड पडणार नाहीं; व एकदां आपल्या ताब्यांत मुलूख आला कीं, किल्ल्यावरून त्याच्या आसपासच्या सर्व मुलुखाचा बंदोबस्त ठेवणेंही सोईचें होईल. हे विचार त्याच्या सोबत्यांस पसंत पडून किल्ले घेण्याचा विचार कायम झाला. शके १५६८ त एसाजी कंक, तानाजी मालुसरे, बाजी पसलकर या मावळ्यांनीं तोरणा किल्ल्यावरच्या किल्ले-कऱ्यास वश केलें व शिवाजीनें तोरणा घेऊन स्वराज्यमंदिराचें तोरण बांधिलें. त्या किल्ल्याची डागडुजी करीत असतां त्यास एक मोहरांचा हंडा सांपडला; तेव्हां ' देवी मला प्रसन्न झाली आहे व तिनें मला हा

---

[ मागील पानावरून समाप्त. ]

नये खामाखा सांगावा आणि तुम्ही ता कागद घेऊन सिताब हुजूर येणें, राजश्री दादाजीपंताचे ( दादाजी कोंडदेव ) विद्य-मानें बावाचे व तुमचे व आमचे श्रीपासीं इमान झाले तें कायम वज्रप्राय आहे, त्यांत अंतर आम्ही व आमचे वंशज लेकराचे लेकरीं वतन वगैरे चालविण्याविसी कमतर करणार नाहीं. हे राज्य व्हावें हे श्रीचें मनांत फार आहे. याप्रमाणें बावाचे मनाची खातरी करून तुम्ही येणें रा। छ० २९ सफर बहुत काय लिहिणे. ( मोहोर )

रुज सुरलीस, माहे फफर बार.

प्रसाद दिला आहे' असें शिवाजीनें लोकांत प्रसिद्ध केलें. तेव्हां शिवाजीच्या कृत्यास ईश्वरी आशीर्वाद आहे असें कळल्यावर लोकांची शिवाजीवर निष्ठा बसली व ते त्यास देवाप्रमाणें भजूं लागले.

तोरण्याजवळ दुर्गादेवीचा डोंगर आहे, त्यावर तोरण्यांत सांपडलेलें द्रव्य खर्चून राजगड किल्ला शिवाजीनें बांधिला. ही सर्व हकीकत विजापुरास कळली; तेव्हां बादशहानें शिवाजीस किल्ला बांधण्याचें काम बंद ठेविण्याविषयीं हुकूम केला; व शहाजीपाशीं त्याच्या मुलाच्या दांडगाईबद्दल जाब मागितला. शहाजीनें दरबारची कशीबशी समजूत केली व दादाजी कोंडदेवास एक खरमरित पत्र लिहिलें. तें पत्र वाचून पंतास फार वाईट वाटलें. आपण धन्याचें काम आजपर्यंत इतक्या प्रामाणिकपणें केलें त्याचा शेवट असा झालेला पाहून त्याच्या डोळ्यांस पाणी आलें. त्यानें शिवाजीस जवळ बोलावून आणिलें व "आपण पाया घातला हा युक्त नव्हे. दैवावर भरंवसा ठेवून हें कर्म आरंभिलें. आपलें स्वामित्व तें किती? महाराज वारंवार लिहितात. केलें कर्म सिद्धीस न गेल्यास फार गैर" इत्यादि उपदेश केला; परंतु शिवाजीनें आपला पूर्वक्रम तसाच चालू ठेविला. 'याजपाशीं कारभार करणें युक्त दिसत नाहीं. यांचें करण्यांनीं महाराजास पेंच पडणार, अपयश आपणावर येईल' इत्यादि विचार सारखे येऊन काळजीनें तो अगदीं खंगला. तो इतका कीं, थोड्याच दिवसांत तो अगदीं मरण्यास टेंकला. त्याला शिवाजीची व आपल्या मालकाच्या जहागिरीची सारखी हुरहुर लागली होती. शेवटीं अगदीं मरतांना त्यानें शिवाजीस आपल्याजवळ बोलावून पुढीलप्रमाणें बोध केला:—
"गोब्राह्मणांचें प्रतिपालन करण्याचा जो उद्योग तुम्हीं आरंभिला आहे तो तसाच चालवून धर्मस्थापना करा. ह्यांत देव तुम्हांला यश देईल."
दादाजी वारल्यावर शहाजीकडून वसूल मागण्यास लोक आले. त्यांस

१ चिटणीसबखर, पृष्ठ ३१.

'येथला जमाखर्च वाढला आहे सबब आम्हांस कांहीं देतां येत नाहीं' असें सांगून शिवाजीनें परत पाठविलें.

मराठी ... ठाणे

दादाजीच्या मरणाच्या वेळच्या उपदेशानें शिवाजीस उत्तेजनच आलें. त्यानें आपले किल्ले घेण्याचें व आपल्या प्रांतांतील लोकांस कह्यांत आणण्याचें काम जोरांत चालविलें. बाजी मोहिते म्हणून शहाजीचा मेहुणा सुप्यास होता; तो शिवाजीस दाद देईना. शिवाजीनें सुप्यावर छापा घालून त्यास पकडिलें व शहाजीकडे पाठवून दिलें. चाकणचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा ह्यास वश करून घेतलें व तो किल्ला त्याजकडेच ठेविला. अशाच रीतीनें कोंडाणें व पुरंदर हेही किल्ले शिवाजीनें आपल्या ताब्यांत आणिले. आतां शिवाजीचें सामर्थ्य बरेंच वाढलें व जास्त धारिष्टाचीं कृत्यें करण्याचा त्यास हुरूप आला. कल्याणचा सुभेदार विजापूरकडे खजिना पाठवीत आहे अशी त्यास बातमी लागली. तो खजिना हस्तगत करून घेण्याचा बेत त्यानें केला, व शेलके लोक बरोबर घेऊन तो सर्व खजिना त्यानें मिळविला. यापुढें तुंग, तिकोना, लोहगड, राजमाची हे किल्ले घेतले व कोंकणांतल्या लोकांनीं बोलावल्यावरून तिकडे उतरून तळें, घोसाळें हे किल्ले त्यानें काबीज केले. याच वेळीं कोंकणांत गोवळकर सांवत भेटले. त्यांनीं तीनशें होनांची एक तलवार शिवाजीस अर्पण केली. हीच नामांकित भवानी तलवार होय. दक्षिण कोंकणांत राजापुरावर शिवाजीनें स्वारी केली. याच स्वारींत शिवाजीस बाळाजी आवजी चिटणीस हा येऊन मिळाला. बाळाजीचे वडील आवजी हरि चित्रे, हे जंजिऱ्याच्या हब्श्याजवळ दिवाणगिरी करीत होते. एकदां हब्श्याचा त्यांच्यावर राग होऊन त्यानें त्यांस ठार मारिलें व त्यांच्या मुलामाणसांस गलबतांत घालून मस्कत येथें नेऊन गुलाम म्हणून विकण्याकरितां पाठवून दिलें. बाळाजी व त्याची आई गुलबाई यांवर केवढा तरी हा भयंकर प्रसंग ! पण त्या गुलबाईचा धूर्तपणा कांहीं अजब होता ! तिनें गलबतावरील खलाशाचें

मन वळवून ती राजापुरास उतरली. तेथें तिचा भाऊ मोठा व्यापारी होता. त्यानें ही आपली बहीण अशी खलाशास ओळख न देतां तीस खलाशापासून विकत घेतलें. पुढें ती आपल्या मुलांसह भावापाशींच होती. शिवाजी राजापुरास आला तेव्हां जे कांहीं लोक पकडले गेले त्यांत बाळाजी होता. हें त्याच्या आईस समजलें, तेव्हां तिनें येऊन शिवाजीच्या पायांवर लोटांगण घातलें, व आपली सर्व हकीकत मोठ्या काकुळतीला येऊन सांगितली. शिवाजीनें त्या मुलाची हुषारी पाहून आपली चिटणिशी त्यास सांगितली, व बाईचें समाधान करून तीस घरीं धाडून दिलें.

शिवाजी कोंकणांत असतां कल्याणचा सुभेदार मुल्लाना अहमद यास शिवाजीचा विश्वासू सेवक आबाजी सोनदेव यानें पकडिलें, व सर्व कल्याणप्रांत काबीज केला. ही आबाजीची कामगिरी पाहून शिवाजी फार खूष झाला व त्यानें आबाजीस कल्याणचा सुभेदार नेमिलें. या वेळेस एक गोष्ट घडली ती फारच महत्वाची आहे. आबाजीनें मुल्लाना अहमदास पकडिलें तेव्हां त्याचीं इतर माणसेंही पकडलीं होतीं. त्यांतील त्याची सून फार सुंदर आहे असें पाहून शिवाजीस नजर करण्याकरितां म्हणून त्यानें तीस ठेविलें. शिवाजीनें तीस दरबारांत आणण्यास सांगितलें. आबाजीनें दरबारांत आणून नजर केली. तिचें लावण्य पाहून शिवाजी बोलला " हे स्त्री लावण्यवती आहे, आमचे मातुश्रीची तसबीर अशी असती तर आम्हीही विशेष सौंदर्यवान् आमचे मातुश्रीचे उदरीं जन्मलों असतों " इतकें बोलून त्यानें तीस वस्त्रें, अलंकार दिले व पालखी देऊन मोठ्या सन्मानानें परत पाठविलें. केवढी उज्ज्वल नीतिमत्ता ! कोण मनाचा थोरपणा ? अशांवर ईश्वराचा कृपाहस्त कां असणार नाहीं ?

१ शिवदिग्विजय, पृष्ठ १८९.

## ७ शहाजीचा बंदिवास.

शिवाजी किल्ले घेऊं लागला तेव्हांपासून विजापूर-दरबारांत त्याच्याविरुद्ध गवगवा होऊं लागला होता. शिवाजीनें खजिना कसा लुटला व सर्व कल्याण प्रांत काबीज करून आपल्याला कसें पकडिलें, हीं दुःखकारक वर्तमानें सांगण्यास मुल्लाना अहमदच स्वतः विजापुरास दाखल झाला. त्या दरबारांतील सर्व सरदारांच्या तोंडून शिवाजीविषयीं व विशेषतः शहाजीविषयीं द्वेषाचे उद्गार निघूं लागले. बादशहा फारच संतापला व त्यानें शहाजीस त्या रागांतच एक पत्र लिहिलें. शहाजीनें मोठ्या नम्रपणानें त्याचें उत्तर पाठविलें. त्यांत " माझा मुलगा कांहीं माझें ऐकत नाहीं. तो जसा आपला अपराधी आहे, तसा माझाही आहे. आपण फौज पाठवून त्याचें खुशाल पारिपत्य करावें. माझी बिलकुल ना नाहीं" असा मजकूर होता. परंतु तें पत्र वाचून बादशहाचें मुळींच समाधान झालें नाहीं; त्याला शहाजीचा जास्तच संशय येऊं लागला; पण त्याला पकडणें म्हणजे कांहीं सोपी गोष्ट नव्हती. तो फौजबंद सरदार असून अतिशय पराक्रमी होता. यामुळें एखादा सरदार त्याजवर पाठवून त्याशीं लढून त्यास कैद करून आणणें सोईचें नव्हतें. त्याला धरण्यास कपटाची योजना करणें भाग होतें. हें कारस्थान बादशहानें बाजी घोरपडे यास पार पाडण्यास सांगितलें. हा बाजी घोरपडे मुधोळचा देशमुख असून शहाजीच्या हाताखालीं काम करीत असे. तो नीच स्वभावाचा असल्यामुळें आपल्या धन्यास कपटानें धरून देण्याचें काम त्यानें मोठ्या हौसेनें पत्करिलें. एके दिवशीं तो मोठ्या लगबगीनें शहाजीकडे गेला व आपल्या घरीं त्यास जेवावयास बोलावण्याचें सोंग करून शहाजीस

पकडण्याचें दुष्ट कृत्य त्यानें घडवून आणलें. शहाजीस पकडण्याची मोठी कामगिरी आपण केलेली पाहून बादशहा आपल्यावर खूष होईल अशा भरावर बाजी घोरपडे शहाजीस टोंचून बोलला. "तुम्ही हरामखोर; सरकारचें अन्न खाऊन लेक मुलुख मारीत फिरतो तरी तुम्हांस त्याबद्दल कांहींच वाटत नाहीं ?"

बाजी घोरपड्यानें शहाजीला विजापुरास बादशहापुढें आणिलें. बादशहानें विचारिलें तेव्हां त्यानें 'मुलगा माझें ऐकत नाहीं' असें सांगितलें. शहाजी लबाड आहे, खऱ्या गोष्टी सांगत नाहीं, असें बादशहास वाटून याचा छळ केल्याशिवाय कांहीं हा खरें सांगावयाचा नाहीं, असा त्यानें आपल्या मनाशीं विचार केला. त्यानें शहाजीस एका कोनाड्यांत घातलें व हवा आंत जाण्यापुरती वाट ठेवून कोनाडा बंद केला. व शेवटीं त्यानें शहाजीस अशी धमकी दिली कीं, "मुलाला वठणीवर तरी आण, नाहीं तर कोनाडा अगदीं बंद करून टाकतों." शहाजीचा असा छळ चालला होता तरी शिवाजीला पत्रें पाठविण्याची त्याला परवानगी होती. त्याप्रमाणें त्यानें "आम्हांवर बादशहाची तुमच्या कृत्यांमुळें गैरमर्जी झाली आहे. तुम्ही सर्व उद्योग टाकून बादशहास शरण आलां तर आमची धडगत आहे नाहीं तर आम्ही खास मरतों" अशा अर्थाचीं पत्रें पाठविलीं. तीं वाचून शिवाजीस दुःख झालें व तो चिंताग्रस्त झाला. "वडील मला देवाप्रमाणें; त्यांची आज्ञा ती शिरसावंद्य; परंतु धर्म रक्षावा म्हणून हा मार्ग अवलंबिला. आतां आम्हांकरितां वडिलांवर बादशहाची गैरमर्जी यास्तव वडिलांस फार त्रास होत असेल तर आतां काय करावें?" हे विचार त्याच्या मनांत सारखे येऊन काय करावें, याविषयीं त्याच्या मनाचा निश्चय होईना. एके दिवशीं त्याची बायको सईबाई जवळ होती. तिला आपल्या मनांतील हे विचार सांगून 'आतां काय करावें' म्हणून

१ चिटणीसबखर, पृ. ३६.

शिवाजीनें विचारिलें. तेव्हां 'आम्ही बायका. आम्हांस राजकारण काय कळतें?' इत्यादि चुकवाचुकवी करून शेवटीं जेव्हां फारच आग्रह पडला तेव्हां ती म्हणाली, "माझे मतें राज्य साधावें, देवब्राह्मणांची स्थापना करावी, धर्म रक्षावा ही इच्छा धरली तें योग्य. देवावर भार घालावा. यश देणारा तो समर्थ आहे. **राज्य साधणें त्याअर्थीं मोह काय उपयोग?**"[1] इतर सरदारांनाही विचारलें तेव्हां त्यांनींही 'राज्य साधावें' हेंच उत्तर केलें. त्यामुळें शिवाजीचें बरेंच समाधान झालें; परंतु शहाजीचा त्रास दिवसेंदिवस वाढतच होता. तो कसा चुकवावयाचा, या विवंचनेंत तो होता. अशा निकराच्या वेळेस सर्व अडचणींतून अचूक मार्ग शोधून काढण्याचा गुण शिवाजीच्या अंगांत होता. या वेळेस तो गुण त्याच्या उपयोगी पडला. त्यानें असें पाहिलें कीं, विजापूरचा बादशहा आपल्या मानानें तर मोठाच सामर्थ्यवान् आहे. आपणा स्वतःला त्याविरुद्ध कांहीं खटपट करतां यावयाची नाहीं. पण दिल्लीचा बादशहा शहाजहान त्याहूनही सामर्थ्यवान् आहे. त्याचें विजापूरकरावर दडपण आणिल्यास आपल्या बापाची सुटका करतां येईल. या सर्व गोष्टींचा विचार करून त्यानें शहाजहान बादशहास आपली सर्व हकीकत सांगितली, व 'माझ्या बापाची तेवढी सुटका करा. मी आपली सेवा करण्यास तयार आहें.' असेंही लिहिलें. बादशहाला शहाजीचा पराक्रम माहीत होताच; हे दोघे बापलेक आपल्यास मिळाल्यास आपला मोठा फायदा आहे असें त्यास वाटलें; व शहाजीस सोडण्याविषयीं त्यानें विजापूरकरांस लिहिलें. खुद्द विजापुरांत रणदुल्लाखान, मुरारपंत वगैरे मंडळी शहाजीच्या तर्फेनें रदबदली करीत होतीच. या दुहेरी जोरामुळें बादशहानें शहाजीस कोनाड्यांतून सोडून दिलें. याप्रमाणें दिल्लीकडून शह लावून शिवाजीनें आपल्या बापाची सुटका करून घेतली.

---

१ चिटणीसबखर, पृ. ३७.

# ८ चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य.



कोनाड्यांतून सुटल्यावर शहाजी कर्नाटकांत जाण्याची बादशहाजवळ परवानगी मागूं लागला; पण बादशहानें ती दिली नाहीं. म्हणून शहाजीस चार वर्षें विजापुरींच नजरकैदेंत रहावें लागलें. शहाजी विजापुरांतच आहे, आपण कांहीं गडबड केल्यास त्यास त्रास होईल असें शिवाजीस वाटल्यामुळें तोही स्वस्थच होता. विजापूरचा बादशहा मात्र स्वस्थ बसला नाहीं; त्याच्या मनास शिवाजीचा कसा नाश करावा, याची सारखी काळजी लागली होती. त्यानें आपल्याजवळचा एक शिलेदार बाजी शामराज यास शिवाजीस पकडण्याकरितां पाठवून दिलें. या वेळीं शिवाजी महाडास होता. बाजी शामराज चंद्रराव मोऱ्याच्या मुलुखांत ( आला ) व शिवाजीस पकडण्याच्या कार्यास त्यानें मोऱ्याची संमति मिळविली. चंद्रराव मोरे हा जावळीचा सरदार मोठा बलाढ्य होता. पण त्या दोघांचें कारस्थान पूर्ण होण्याच्या आंतच शिवाजीनें बाजी शामराजावर एकाएकीं छापा घातला व त्याचें सैन्य उधळून लाविलें. बाजी शामराज आपल्या सैन्याची झालेली दुर्दशा पाहून विजापुराकडे पळून गेला.

चंद्रराव मोऱ्यानें बाजी शामराजास मदत केली तेव्हांपासून शिवाजीस मोऱ्याचा राग आला. हा शत्रूच्या पक्षास मिळालेला आहे, हा आपला केव्हां घात करील याचा नेम नाहीं, म्हणून याची क्षमा करून उपयोग नाहीं, असें त्यानें ठरविलें. मग या शत्रूस नाहींसा कसा करावयाचा ? शिवाजीस लढाई किंवा रक्तपात यापेक्षां सामोपचार फार आवडत असे व ज्या ठिकाणीं सामोचारानें कार्य होत नाहीं अशी त्याची खात्री होई त्याच ठिकाणीं केवळ तो लढाईनें किंवा रक्तपातानें

आपलें कार्य घडवून आणी. या आपल्या नेहमींच्या पद्धतीस अनुसरून शिवाजीनें सामाचें बोलणें करण्यास माणसें पाठविलीं, पण तो जावळीचा 'राजा' शिवाजीसारख्यास काय दाद देतो ? शिवाजीचे वकील निराश होऊन परत आले. मोऱ्याचा ताठा पाहून शिवाजीनें त्याचें पारिपत्य करण्याचा निश्चय कायम केला.

इकडे कर्नाटकांत बंडें उद्भवूं लागलीं म्हणून बादशहानें शहाजीस कर्नाटकांत जाण्याची परवानगी दिली. वडील कर्नाटकांत गेले हें कळतांच शिवाजीनें आपला बंद ठेवलेला उद्योग फिरून चालू केला, व मोऱ्याचें पारिपत्य करण्याचें काम पहिल्यानें करून टाकण्याचें त्यानें ठरविलें. त्यानें आपले सरदार राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांस जावळीस पाठविलें. त्यांनीं तेथें जाऊन चौकशी करून शिवाजीस कळविलें कीं, येथलें काम आम्ही पार पाडतों; तुम्ही मात्र फौज घेऊन जावळीच्या लगतयास असावें. शिवाजी जावळीपासून आठ कोसांवर महाबळेश्वरास येऊन राहिला. इकडे राघो बल्लाळानें; 'शिवाजीस तुमची मुलगी द्याल काय ? त्याची लग्न करण्याची इच्छा आहे,' असें सांगून लग्नाच्या वाटाघाटी करण्याकरितां चंद्रराव मोरे व त्याचा भाऊ सूर्यराव यांच्या भेटी घेतल्या. एका भेटींत त्या दोघां मोऱ्यांस राघो बल्लाळ व संभाजी कावजी यांनीं ठार केलें. लागलीच मोऱ्याच्या लोकांत गलबला सुरू झाला. इतक्या अवकाशांत राघो बल्लाळ व संभाजी कावजी रानांत घुसले, व जवळच असणाऱ्या शिवाजीच्या फौजेस त्यांनीं सूचना केली. मग शिवाजी जावळीवर चालून गेला. दोन प्रहरपर्यंत युद्ध झालें. मोऱ्यांचा दिवाण हणमंतराव युद्धांत पडला व चंद्ररावाचे दोघे मुलगे कैद झाले. प्रारंभीं त्या दोघांना पुण्यास कैदेंत ठेविलें होतें, पण त्यांनीं सुटका करून घेण्याकरितां विजापूरकराशीं कारस्थान केल्यामुळें शिवाजीनें त्यांचा शिरच्छेद कराविला.

या मोऱ्यांच्या पारिपत्यापासून शिवाजीस जावळी प्रांत मिळाला. त्या प्रांताचें रक्षण करण्याकरितां शिवाजीनें एका उंच डोंगरावर प्रतापगड

नांवाचा किल्ला बांधला. त्या कामीं मोरो त्रिमळ पिंगळे यांचें फार कौशल्य दिसून आलें; त्यामुळें शिवाजीची त्याच्यावर फार मर्जी बसली. शिवाय मोऱ्यांच्या पारिपत्यामुळें मोऱ्याचें ढळढळीत उदाहरण पुढें असल्यामुळें इतर मराठे सरदारांच्या मनावर चांगलाच वचक बसला व ते शिवाजीस शरण आले.

तुळजापुरास अंबाबाईचें दर्शन घ्यावयास जावयाचें म्हणजे फार लांब पडतें व नेहमीं दर्शन घडत नाहीं, याकरितां शिवाजीनें प्रतापगडावर देवीची स्थापना करण्याचा निश्चय केला. तुळजापूरच्यासारखीच एक प्रतिमा एका चतुर कारागिराकडून करून घेऊन सुमुहूर्तानें प्रतापगडावर देवीची स्थापना केली. या देवीवर शिवाजीची फारच निष्ठा होती.

## ९ अफजलखानाचा वध.

( शके १५८१; इ. स. १६५९. )

शिवाजीनें चंद्रराव मोऱ्याचें पारिपत्य करून जावळी प्रांत घेतला व इतर मराठे सरदारही त्याला शरण जाऊं लागले, ही बातमी विजापुरास समजली. बादशहास दुःख झालें व शिवाजीचें पारिपत्य कसें होईल, याविषयीं चिंता पडली. त्यानें दरबार भरविला व विजापूरचे सर्व मानकरी आल्यावर “ हें शिवाजीचें बंड वाढलें आहे, त्यामुळें मला अन्न गोड लागेनासें झालें आहे; ज्या कोणास विजापूरच्या अदिलशाहीची–या गादीची–एकनिष्ठ सेवा करून दाखवावयाची असेल त्यानें शिवाजीचें पारिपत्य करावें” असें तो बोलला. अफजलखान म्हणून वाईचा सुभेदार होता तो उठला व प्रतिज्ञा करून म्हणाला “ शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे ? आपणास आज्ञा करावी म्हणजे

जाऊन धरून आणतों किंवा मारून टाकतों. " ही प्रतिज्ञा ऐकून बादशहा खूष झाला व त्यानें मोत्याचा तुरा, पदक, एक तलवार व घोडा देऊन तेथल्या तेथें खानाचा सन्मान केला.

खान बारा हजार फौज घेऊन निघाला तो तुळजापुरास आला. तेथें भवानी देवीची मूर्ति फोडून त्यानें तिचें पीठ केलें! पुढें पंढरपुरास आला, तेथें त्याची स्वारी विठोबाच्या मूर्तीसही भोंवली. त्या वेळीं शिवाजी राजगडास होता. खान आपल्यावर चालून येत आहे ही बातमी ऐकून तो प्रतापगडावर गेला. खानही पुण्याचा रस्ता सोडून वाईस गेला. खानानें वाटेनें येतांना सर्व हिंदूंस पूज्य अशा देवांची विटंबना केली होती, त्यामुळें सर्व हिंदु प्रजा अगदीं चिडून गेली होती. वाईस आल्यावर या अडचणीच्या जागेंत शिवाजी आपल्या हातीं लागणें कठीण असें खानास वाटलें. म्हणून शिवाजीस तह करण्याचा घाट दाखवून पकडावें असा त्यानें बेत केला, व वाईचा कुळकर्णी कृष्णाजी भास्कर यास शिवाजीकडे पाठविलें.

कृष्णाजी भास्कर वकील शिवाजीकडे आला व " तुम्ही बादशहाचा घेतलेला सर्व मुलूख परत द्या म्हणजे मी तुमचे सर्व गुन्हे माफ करतों. एकदां भेटीस या म्हणजे निकाल करून टाकूं " असा खानाचा निरोप त्यानें शिवाजीस सांगितला. शिवाजीनें तें सर्व ऐकून घेतलें व त्याचा स्वधर्माभिमान जागृत करण्यासाठीं मोठ्या कळकळीचें भाषण केलें. त्या भाषणाचा कृष्णाजीपंताच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. तो शिवाजीस खानाचे अंतस्थ हेतू कळविण्यास तयार झाला. 'खानाचा बेत भेटीच्या वेळीं तुम्हांस दगाबाजी करण्याचा आहे' असें त्यानें सांगितलें. शिवाजीनें कृष्णाजी भास्कराबरोबर आपला वकील पंताजी गोपिनाथ दिला व त्याच्याबरोबर खानास निरोप पाठविला कीं, " तुम्ही म्हणतां तें सर्व आम्हांस कबूल आहे, आम्हीं जो मुलूख घेतला, किल्ले वगैरे बांधले, फौज ठेविली ही सर्व पातशहाचीच दौलत वाढविली आहे. मी भेट घेण्यास तयार

आहे. आपण जावळींत यावें म्हणजे भेट होईल." खानास हा निरोप पोंचला तेव्हां त्यास फारच आनंद झाला. शिवाजी आपण होऊन भेट घेण्यास तयार झाला आहे, आतां दगा करावयास कांहीं उशीर नाहीं, असे तो आपल्या मनांत मांडे खाऊं लागला. शेवटीं त्यानें 'जावळींत भेट घेण्यास मी राजी आहें' असें शिवाजीस कळविलें.

शिवाजीनें प्रतापगडाखालीं भेटीसाठीं एक मंडप तयार करविला. वाटेंतील झाडी काढून टाकून खानास येण्यास एक चांगली वाट केली. खानाच्या मनांत कपट असल्यामुळें फौजेचा बंदोबस्त करणें शिवाजीस भाग होतें. त्यानें नेताजी पालकर सरनौबत यास फौज घेऊन सिद्ध असण्यास सांगितलें. अशी तयारी झाल्यावर खानास भेटीस येण्याविषयीं शिवाजीनें सूचना दिली. दोघांनींही सडेच भेटीस यावयाचें असें ठरलें होतें. खान सैद बंडू नांवाच्या एका इसमास बरोबर घेऊन भेटीच्या जागीं आला. खान शिवाजीच्या दर्शनास फारच उतावीळ झाला होता. शिवाजी केव्हां येतो व मी त्यास केव्हां धरतों, असें खानास झालें होतें. इकडे शिवाजीनेंही निघण्याची तयारी केली. जाण्यापूर्वीं किल्ल्याचा चांगला बंदोबस्त केला. सर्व बाजूंना माणसें ठेविलीं. किल्ल्यावर जिजाबाई व संभाजी यांपाशीं कोणीतरी अधिकारी असावेत म्हणून मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सचीव व बाळाजी आवजी चिटणीस, इत्यादि ठेविले. जिजाबाई व संभाजी यांस त्यांचे हवालीं केलें. "आम्हीं ही होड आरंभिली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् वांकडेंही पडल्यास तुम्ही घाबरें न होतां शत्रूस बुडवावें, राज्य रक्षावें," असें सांगून शिवाजी निघावयाच्या तयारीस लागला. त्यानें अंगांत आधीं चिलखत घालून वर झगा घातला. तसेंच डोक्यावर जिरेटोप घालून वर पागोटें घातलें. उजव्या हातांत भवानी तलवार व बाहींत

१ चिटणीसबखर, पृ. ५९.

बिचवा आणि डाव्या हातांत वाघनखें अशीं हत्यारें घेतलीं. देवीचा व जिजाबाईचा आशीर्वाद घेऊन शिवाजी निघाला. जिऊमहाला व संभाजी कावजी बरोबर होते. खान अगोदरच मंडपांत आला होता. शिवाजी आला तेव्हां त्यास सामोरा येऊन खान भेटला. खान उंच असून धिप्पाड होता. भेटत असतां त्यानें शिवाजीस डाव्या हाताखालीं दाबून धरिलें; व तो आपल्या हातांतील तलवार शिवाजीच्या कुशीवर चालवूं लागला. शिवाजीच्या अंगांत चिलखत असल्यामुळें ती त्यावर खरखरली, इतक्यांत शिवाजीनें डाव्या हातांत वाघनख होतें तें खानाच्या पोटांत खुपसलें. खानाच्या अंगांत नुसता अंगरखाच होता. पोटांत वाघनख जातांच आंतडीं बाहेर आलीं. खानानें शिवाजीस धरिलें होतें तें सोडिलें, आणि 'दगा ! दगा !' म्हणून मोठ्यानें ओरडला. लागलीच खानानें शिवाजीच्या डोक्यावर तलवारीचा वार केला. पण जिरेटोप घातला असल्यामुळें वार लागला नाहीं. किंचित् गव्हाइतकी जखम झाली. शिवाजीनें खानावर उलट तलवारीचा वार केला. तो खांद्यापासून पोटापर्यंत गेला. खान मुर्दा होऊन जमिनीवर पडला; सैंद बंडू अंगावर आला तेव्हां जिऊमहाल्यानें वार करून त्याला ठार केलें. इतक्यांत भोई खानाचें प्रेत पालखींत घालून नेत होते त्यांना थांबवून खानाचें शिर घेऊन जिऊमहाला व संभाजी कावजी यांस बरोबर घेऊन शिवाजी किल्ल्यावर गेला. खानाची फौज सतावून चाल करून आली. शिवाजीच्या फौजेनें चांगलाच सामना देऊन तीस पळायास लाविलें. विजापूरच्या फौजेचे लोक जेव्हां पळूं लागले तेव्हां शरण येतील त्यांस कैद करण्याचा व जे शरण न येतील त्यांची कत्तल करण्याचा शिवाजीच्या फौजेनें सपाटा चालविला. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हा शिवाजीच्या फौजेच्या हातींच सांपडावयाचा, पण काकडे नांवाच्या एका मावळ्यानें द्रव्यलोभानें त्यास सोडून दिलें, म्हणून तो वांचला. या काकड्यानें देशद्रोह

केल्यामुळें त्यासही अफजलखानासारखें शिवाजीनें यमसदनास पाठविलें हें सांगणें नकोच. हा अफजलखानाचा वध शके १५८१ मार्गशीर्ष शु॥ ५ ( इ. स. १६५९ नोव्हेंबर ता. ७ ) रोजीं घडला.

## १० बाजी प्रभूचा पराक्रम.



अफजलखानाचा वध झाल्यावर शिवाजी स्वस्थ बसला नाहीं, विजापूरकरांपासून कोल्हापूर प्रांत घेण्याचा निश्चय करून तो निघाला आणि हिंदु किल्लेदारास वश करून पन्हाळा किल्ला त्यानें प्रथम काबीज केला. त्या प्रांतावरचा विजापूरकरांचा सुभेदार शिवाजीवर चालून आला, तेव्हां शिवाजीनें त्याचा हां हां म्हणतां धुव्वा उडविला. इतकें झाल्यावर शिवाजी थेट विजापुरापर्यंत खंडण्या घेत गेला व इतक्या सपाट्यानें पन्हाळ्याकडे परत आला कीं, विजापूरकराकडील कोणाही सरदारास त्याचा पाठलाग करतां आला नाहीं. शिवाजीनें अफजलखानाचा नाश केल्याचें वर्तमान ऐकून विजापूरचा बादशहा अगदीं खचून गेला होता. त्यास पुढें काय करावें, हेंच सुचेना. शिवाजीनें कोल्हापूर प्रांत घेतला, विजापुरापर्यंत खंडण्या वसूल केल्या, तेव्हां याचा हा क्रम असाच चालूं दिल्यास हा अनावर होईल म्हणून त्यानें सिद्दी जोहार नांवाच्या एका कर्नाटकांतील सरदारास शिवाजीवर पाठविलें. अफजलखानाचा मुलगा फाजलखान हाही आपल्या बापाचा सूड उगविण्याकरितां त्याच्याबरोबर मोठ्या ईर्षेनें आला होता. वाडीकर सांवत व जंजिऱ्याचा सिद्दी यांनींही बादशहास मदत करण्याचा बेत केला. अशा रीतीनें शिवाजीवर चोहोंकडून शत्रू उठले पण त्यानें न डगमगतां सांवतावर बाजी पासलकर यास पाठविलें; सिद्दीचें पारिपत्य करण्यास राघो बल्लाळ अत्रे यास धाडिलें

आणि आपण स्वतः कोल्हापूर प्रांताच्या रक्षणाकरितां पन्हाळ्यावर बंदोबस्तानें राहिला. ते पावसाळ्याचे दिवस होते तरी शत्रूनें येऊन पन्हाळ्यास वेढा दिला. तीन महिनेपर्यंत वेढा सारखा बसला होता. सिद्दी जोहारास वाटलें कीं आतां शिवाजी खचित आपल्या हातीं सांपडणार. शिवाजीनें बरेच दिवस झाले, वेढा उठत नाहीं तेव्हां तह करणें भाग असें समजून तहाचें बोलणें लाविलें. एके दिवशीं शिवाजी सिद्दीस एका चौकीजवळ भेटला व त्या भेटींत दुसरे दिवशीं किल्ला स्वाधीन करावयाचा असें ठरलें. वेढ्याच्या कामास मुसलमानांचें सैन्य अगदीं त्रासलें होतें. मुलूख डोंगराळ आणि त्यांतून पावसाळचे दिवस, त्यामुळें त्यांना अतिशयच त्रास झाला. तह ठरला हें ऐकून त्यांना आनंद झाला व त्या रात्रीं पहिल्याप्रमाणें ते सावध राहिले नाहींत. ती रात्र काळोखी होती. मध्यरात्रीच्या सुमारास एक मावळे लोकांची टोळी बरोबर घेऊन शिवाजी पन्हाळा किल्ल्यावरून खालीं आला; व मोठ्या हुषारीनें शत्रूचे चौकी पहारे चुकवीत रांगणा किल्ल्याकडे चालला. बराच वेळपर्यंत मुसलमानांस याची कांहींच दाद नव्हती. पण शिवाजी गेला याची पक्की खबर लागतांच फाजलखान व सिद्दी जोहाराचा मुलगा सिद्दी अजीज हे दोघे, घोडेस्वार घेऊन शिवाजीच्या पाठलागास निघाले. सकाळीं नऊ दहा वाजतां शिवाजी रांगण्याचा घाट चढत होता तेव्हां त्यानें शत्रु आपल्या पाठीवर येत आहेत हें पाहिलें. तेव्हां शत्रूस खिंडींतून पुढें न येऊं देण्याकरितां कांहीं सैन्य ठेविलें पाहिजे, असें शिवाजीस वाटलें. पूर्वीं हिरडस मावळच्या देशमुखाशीं युद्ध करीत असतां बाजी प्रभू देशपांडे देशमुखाच्या बाजूनें लढत होता. त्या युद्धांत शिवाजीनें त्याचा पराक्रम व स्वामिनिष्ठा पाहून त्यास आपल्या चाकरीस ठेविलें होतें. तो आतां शिवाजीबरोबर होता. त्यास हांक मारून “ आम्ही जवळच्या किल्ल्यांत पोहोंचेपर्यंत तुम्हीं हें सैन्य घेऊन येथें शत्रूस थोपवून धरावें. आम्ही किल्ल्यांत गेल्यावर तुम्हांस तोफेची इशारत करूं, नंतर तुम्हीं निघून

यावें " असें सांगितलें. " साहेबीं निघून जावें. गनिम थोपवून धरतों, खिंड चढूं देत नाहीं " असें त्यानें शिवाजीस उत्तर केलें. शिवाजी किल्ल्याकडे निघून गेला व बाजी देशपांडे आपल्या फौजेचा बंदोबस्त करून खिंड धरून राहिला. थोडक्याच वेळांत शत्रूचे घोडेस्वार खिंड चढूं लागले. बाजीनें शत्रूवर निकराचा हल्ला करून त्यास खिंडीच्या खालीं उधळून लाविलें. पुढें विजापूरकरांचें पायदळ येऊन पोंचलें. पायदळानें केलेले दोन हल्ले बाजीनें मोठ्या शौर्यानें लढून मागें परतविले. इतक्यांत फाजलखान हा बरोबर ताज्या दमाचे लोक घेऊन तिसरा हल्ला करून आला. त्या वेळीं दुपारचें ऊन मी म्हणत होतें. बाजींचे बरेच लोक पडले. अशांत हा हल्ला त्याच्यावर आला. तथापि बाजी मुळींच न डगमगतां शौर्यानें लढत होता. आतां त्याचें लक्ष किल्ल्यावरच्या तोफेच्या आवाजाकडे सारखें लागलें होतें. शत्रु ताज्या दमाचा व मावळे दमलेले, यामुळें बरेच मावळे या युद्धांत पडले. बाजी प्रभूलाही एक गोळी लागली. इतक्यांत ज्या तोफेच्या आवाजाकडे त्याचें चित्त सारखें लागलें होतें तो ऐकूं आला. तो आवाज ऐकतांच बाजीच्या तोंडून ' मीं आपलें कर्तव्यकर्म केलें ' असे शब्द निघाले, व लागलीच त्याचें प्राणोत्क्रमण झालें !

शिवाजी रांगण्यांत पोहोंचल्यावर ' वरातीमागून घोडें ' या म्हणीप्रमाणें सिद्दी जोहार व फाजलखान तेथें आले. परंतु ती जागा अवघड आहे असें पाहून अफजलखानासारखा आपला नाश होईल अशी त्यांस धास्ती वाटली तेव्हां ते परत गेले. हें कळल्यावर विजापूरचा बादशहा स्वतः शिवाजीवर स्वारी करून आला. पण कर्नाटकांत दंगे होऊं लागल्यामुळें त्याला परत जावें लागलें. शेवटीं शिवाजीशीं तह करण्याचा बादशहानें विचार केला. शहाजीस त्यानें मुलाची भेट घेण्याची परवानगी देऊन ' शिवाजीचा व आमचा तह करून द्या ' म्हणून लिहिलें. शहाजीनें भेटीस जाण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें व ' तह करून

देतों ' म्हणून सांगितलें. बापलेंकांची भेट होऊन फार वर्षे झालीं होतीं. भेटीस बारा वर्षांवर दिवस झाले म्हणजे देवळांत भेट घेण्यांची चाल आहे, त्याप्रमाणें त्यांची भेट जेजुरीच्या देवळांत झाली. भेट झाल्यावर राहण्याच्या ठिकाणीं येण्याकरितां शहाजी पालखींत बसला. तेव्हां शिवाजी पायांत जोडा न घालतां पालखी धरून घरापर्यंत पायींच आला. मग शहाजीला सर्व राज्यांतील मुख्य मुख्य गोष्टी दाखविल्या. दोन महिने शहाजी राहिला. त्यानें विजापूरकर व शिवाजी यांचा तह करून दिला व मग तो कर्नाटकांत परत गेला. या तहानें शिवाजीनें आजपर्यंत मिळविलेला सर्व मुलूख त्याच्याकडे कायम झाला. या वेळीं कल्याणपासून गोव्यापर्यंत कोकणपट्टी व भीमा आणि वारणा या दोन नद्यांमधील शंभर मैल रुंदीचा प्रांत इतका मुलूख शिवाजीच्या ताब्यांत आला. ( इ. स. १६६२. )

## ११ शाएस्तेखानाची स्वारी.

शिवाजीचा विजापूरकरांशीं तह झाला त्या वेळीं औरंगजेब हा दिल्लीचा बादशहा होता. हा मोठा महत्वाकांक्षी होता. सर्व हिंदुस्थानदेश पादाक्रांत करण्याचा त्याचा विचार होता. अहमदनगरचें राज्य त्याचा बाप शहाजहान यानें बुडविलें होतेंच. आतां विजापूर, गोवळकोंडें व नवीनच उदय पावणारे मराठे हे सर्व कबजांत आणण्याचा त्याचा विचार होता. पण उत्तरेकडे कांहीं महत्वाचीं कामें निघाल्यामुळें हा त्याचा बेत लांबणीवर पडला होता. थोडी सवड मिळतांच त्यानें शिवाजीचा कल्याण–भिवंडी प्रांत घेतला. विजापूरकरांशीं चाललेल्या युद्धांतून मोकळा होतांच शिवाजीस मोंगलांशीं युद्ध करण्याची तयारी

करावी लागली. त्यानें मोरोपंत पेशवे याजबरोबर पायदळ देऊन जुन्नरच्या उत्तरेकडचे किल्ले काबीज करण्यास त्यास पाठविलें. नेताजी पालकर हा घोडेस्वार बरोबर घेऊन मोगलांचा औरंगाबादेपर्यंत मुलूख मारून परत आला. या गोष्टी ऐकून औरंगजेब बादशहा फार संतापला. त्यानें दक्षिणचा सुभेदार आपला मामा शाएस्तेखान यास शिवाजीची खोड मोडण्याविषयीं मोठ्या त्वरेनें हुकूम पाठविला. हुकूम पाहतांच खानास मोठा संतोष झाला. त्याला वाटलें कीं, आपण आतां कामगिरी करून दाखवूं; म्हणजे बादशहापाशीं आपली बडेजाव झाल्याशिवाय रहाणार नाहीं. तो औरंगाबादेहून निघाला व नगरावरून पुण्याकडे आला. त्यानें शिवाजीचे किल्ले घेण्याचा निश्चय केला व पहिल्यानें चाकणास वेढा घातला.

त्या किल्ल्यावर फिरंगोजी नरसाळा हा मराठा किल्लेदार होता. खानास वाटलें कीं आपण सहज किल्ला घेऊन टाकूं, पण वेढा बसून दोन महिने झाले तरी किल्ला हातीं येईना. खानाची फारच निराशा झाली. शेवटीं एक सुरुंग लागला होता तो उडाला तेव्हां तटाला एक खिंडार पडलें. मोंगलांनीं आंत शिरण्याचा फार जोर केला तरी फिरंगोजीनें एक सबंध दिवसभर शत्रूस आंत येऊं दिलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन फिरंगोजीनें किल्ला मोंगलांच्या हवालीं केला. शाएस्तेखानानें फिरंगोजीचा पराक्रम पाहिला होताच. तो फिरंगोजीस म्हणाला, “ तुम्ही शिपाई खरे मर्द आहांत तुम्हांस वाढवितों आम्हांपाशीं राहावें ” एखादा सामान्य मनुष्य असता तर सहज हो म्हणता, परंतु फिरंगोजी शिवाजीच्या तालमींत तयार झालेला अस्सल मराठा होता. त्यानें खानास उत्तर केलें “ मला तुमची बढती नको. मला माझ्या धन्याकडे जाऊं द्या म्हणजे झालें.” खानानें सन्मान करून फिरंगोजीस शिवाजीकडे लावून दिलें. फिरंगोजी शिवाजीकडे गेला तेव्हां शिवाजीला ही सर्व हकीकत कळली. शिवाजीला त्या आपल्या सेवकाबद्दल प्रेमाचें भरतें आलें. त्यानें फिरंगोजीची पाठ थोपटली व ‘ शर्थ केलीस ’ असें म्हणून त्यास भूपाळ-

गडचा किल्लेदार नेमलें. धन्य शिवाजी आणि धन्य त्याचा एकनिष्ठ सेवक फिरंगोजी ! अशी स्वामिसेवकांची जोडी सांपडणें विरळा.

शाएस्तेखानास चाकणचा किल्ला घेण्यास दोन महिने लागले. तेव्हां किल्ले घेण्याचा नाद त्यानें सोडून दिला. शिवाय आतां पावसाळा झाला होता त्यामुळें त्यानें पुण्यास छावणी दिली. सर्व शहराची नाकेबंदी करून सशस्त्र मराठ्यांस गांवांतून फिरण्याची मनाई केली. हीं खानाचीं कृत्यें शिवाजीला कळलीं तेव्हां तो कोंडाण्यावर ( सिंहगड ) होता. खान पुण्यांत बंदोबस्तानें राहिला आहे असें पाहून शिवाजीनें त्याच्या पारिपत्याची एक खाशी युक्ति योजिली. खान शिवाजीच्या वाड्यांत उतरला होता. एके रात्रीं कोंडाण्याच्या वाटेनें आपले लोक ठेवीत शिवाजी पुण्यापर्यंत आला. व एका लग्नाच्या वरातीच्या समारंभांत मिसळून तो शहरांत आला. बरोबर एसाजी कंक, तानाजी मालुसरे वगैरे निवडक पंचवीस लोक होते. मग मध्यरात्र झाल्यावर जिकडे तिकडे सामसूम झालें. अशा वेळीं स्वयंपाकघराच्या भिंतीस लहानसें भोंक पाडून शिवाजी कांहीं लोकांसह वाड्यांत शिरला; व वाड्यांतल्या एकूणएक वाटा माहित असल्यामुळें भराभर आंत गेला. इतक्यांत कांहींसें वाजलें. त्यामुळें खानाच्या बायका जाग्या झाल्या. त्यांना कोणीतरी बाहेरचे लोक आंत शिरले आहेत हें कळलें तेव्हां त्या घाबरल्या. त्यांनीं खानास जागें केलें तेव्हां त्याचीही पांचावर धारण बसली. त्यानें दिवा मालवला व तो खिडकींतून पळूं लागला. इतक्यांत त्याच्या बोटावर वार लागून एक बोट तुटलें. पण तो कसाबसा जिवंत सुटला. त्याचा मुलगा दुसऱ्या दालनांत निजला होता तो मात्र ठार झाला. इतकें झाल्यावर शिवाजी व त्याचे लोक परत निघून गेले. मागें मोंगल सैन्यांत मोठी गडबड उडाली. ते शत्रूच्या पाठलागास निघाले तों शिवाजीनें त्यांना चकविण्याची आधींच तरतूद करून ठेविली होती. त्यानें कात्रजच्या घाटाच्या बाजूस बैलांच्या शिंगांस व झाडांना पोत गुंडाळून ठेवण्यास सांगितलें होतें.

शिवाजी पुण्यांतलें कृत्य आटोपून परत फिरल्याबरोबर ते पोत पेटविण्याची सूचना करण्याकरितां करणे वाजले, व पोत पेटले तेव्हां साहजिकच मागून पाठलाग करणाऱ्या मोंगलांना शिवाजी कात्रजकडे गेला असें वाटलें व ते तिकडे गेले. शेवटीं उजडतांच त्यांस खरी बातमी कळली आणि ते कोंडाण्याकडे आले. ते जवळ येईपर्यंत शिवाजीनें कांहीं केलें नाहीं. पण जेव्हां शत्रु तोफांच्या माऱ्यांत आला तेव्हां किल्ल्यावरून गोळीबार होऊं लागला. मोंगल लोक जाया होऊं लागले. खान मोठ्या चिंतेंत पडला. इतक्यांत तोफेचा गोळा लागून खाशा खानाचा हत्तीच मारला गेला. तेव्हां तर खानाचा अगदींच धीर सुटला. पावसाचे दिवस, शिवाजी दगेखोर, काय प्रसंग येईल नेम नाहीं, पावसाळा गेल्यावर काय तें करूं, असा विचार करून खान परत फिरला. आणि पेडगांवीं छावणी देऊन राहिला. शाएस्तेखानाच्या झालेल्या फजितीचें वर्तमान जेव्हां औरंगजेब बादशहाच्या कानावर गेलें तेव्हां त्याला फार वाईट वाटलें व आपल्या मामाचा फार राग आला. त्यानें लागलीच आपल्या मामास दिल्लीस परत बोलावून नेलें आणि त्याची निर्भर्त्सना केली. शिवाजीविषयीं औरंगजेबाची अशी कल्पना होती कीं शिवाजी म्हणजे कांहीं मोठा बलवान् नाहीं, त्याला चिरडून टाकण्यास मुळींच उशीर लागणार नाहीं. पण आतां औरंगजेबास शिवाजीच्या पराक्रमाची चुणूक दिसतांच तो बोलला कीं, "शिवाजी तो बडा सैतान पैदा हुवा."

## १२ रणशूर मुरारबाजी.

शाएस्तेखानाच्या पराभवामुळें औरंगजेबास अनावर राग आला व मनस्वी दुःख झालें. हा रागाचा वेग उतरतो न उतरतो तोंच एका मागूनएक अशा कांहीं बातम्या दिल्लीस येऊन थडकल्या, कीं त्यामुळें त्याचा क्रोधाग्नि भडकला व शिवाजीचा पुरा मोड करण्याचा त्यानें निश्चय केला. शिवाजीचा बहिरजी नाइक नांवाचा एक हुषार हेर होता. हा शिवाजीस फार महत्त्वाच्या बातम्या गुप्तपणें कळवीत असे. त्यानें सुरतेची खडानूखडा माहिती शिवाजीस कळविली; तेव्हां शिवाजी निवडक लोक बरोबर घेऊन सुरतेवर आला व त्या शहराची त्यानें सहा दिवसपर्यंत खंडणी बिनधोक वसूल केली तरी मोंगल सरदारास त्या गोष्टींची दादही नव्हती. शिवाजी सर्व पैसा घेऊन सुरक्षितपणें परत रायगडास आला. शिवाजीच्या आरमारावरील अधिकाऱ्यांनीं मक्केच्या यात्रेकरूंनीं भरलेलीं गलबतें पकडलीं व मोठा खंड घेऊन सोडून दिलीं, ही गोष्ट औरंगजेबास कळली तेव्हां तर त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. बादशहा स्वतःच शिवाजीवर आला असता; पण उत्तरेकडे बंडें उद्भवल्यामुळें त्याला येतां येईना. तरी त्यानें जयपूरचा राजा मिरजा जयसिंग व पठाण दिलेरखान या दोघांस ताबडतोब रवाना केलें. जयसिंग व दिलेरखान मोठी फौज घेऊन निघाले; व मजल दर मजल पुण्यास आले. शिवाजी या वेळेस आरमार घेऊन दक्षिणेस गोकर्णाकडे गेला होता; त्या दोघांनीं किल्ले घेण्याचा निश्चय केला. दिलेरखानानें पुरंदरास वेढा घातला आणि जयसिंग कोंडाण्यास गराडा देऊन बसला. दिलेरखान पठाण मोठा मर्द व पराक्रमी होता. बादशहाचा निरोप त्याच्या मनांत घोळत होता. या स्वारींत आपण पराक्रम केला तर बादशहाची मर्जी

आपल्यावर खात्रीनें बसेल हें त्यानें ताडलें व शौर्यानें लढेन व नांव मिळवीन अशा ईर्षेनें त्यानें वेढ्याचें काम चालविलें.

पुरंदर किल्ल्यावर मुरारबाजी महाडकर हा मुख्य होता आणि त्याच्या हाताखालीं दोन हजार लोक होते. मोंगलांचें सैन्य किल्ल्यास वेढा घालण्यास येतें असें कळल्याबरोबर मुरारबाजीनें मोंगलांस दाणा-वैरण मिळूं नये अशी व्यवस्था केली आणि त्यांच्या दारूगोळ्यास आग लावून दिली. तथापि दिलेरखानानें सर्व व्यवस्था नीट लावून वेढा घातला. चोरवाटांनीं किल्ल्यावर धान्य जात होतें. शिवाय किल्ल्यावरील लोकां-पाशीं दारूगोळ्याचा चांगलाच संग्रह होता. त्यामुळें बरेच दिवस मोंगलांचा उपाय चालेना. शेवटीं एके दिवशीं मोंगलांनीं शिकस्त केली तेव्हां त्यांचा खालच्या कोटांत प्रवेश झाला. किल्ल्यावरील मराठ्यांची शिबंदी सर्व वरच्या कोटांत गेली तेव्हां मोंगलांना वाटलें कीं आतां काय? शत्रू आपणांस भिऊन पळाले आहेत म्हणून ते खालच्या कोटांतल्या घरांतून लुटालूट करण्याच्या नादीं लागले. मोंगली लष्कराची ही अ-व्यवस्था पाहून किल्लेकऱ्यांनीं वरून तोफा झाडण्यास सुरुवात केली. तेव्हां मोंगलांची अतिशय तारांबळ उडाली. बरेच मोंगल पटापट मरून पडले; कांहीं खालीं पळून गेले व कांहीं कानाकोंपरा पाहून लपून बसले. इतक्यांत हेटकरी व मावळे मोंगलांच्या पाठीस लागले. मुरारबाजीनें तर असा जोराचा पाठलाग केला कीं तो खुद्द दिलेरखानाच्या तंबूशीं आला. ही आपल्या फौजेची झालेली फजिती पाहून खानास त्वेष आला. त्यानें भिऊन पळणाऱ्या आपल्या लोकांची भित्रेपणाबद्दल निर्भर्त्सना करून त्यांना धीर येईल असें भाषण केलें व सर्व लोकांस परत फिरवून फिरून हल्ला केला. त्या वेळीं मराठ्यांची व मोंगलांची फार निकराची लढाई झाली. मुरारबाजी मोठ्या आवेशानें लढत होता. इतक्यांत दुर्दैवानें त्याची ढाल तुटली. तेव्हां त्या वीरानें मुळींच न घाबरतां कंबरेचा शेला सोडला व शत्रूचे घाव तो त्या शेल्यावर झेलून घेऊं लागला. इतक्या अवकाशांत

दिलेरखानानें एक बाण सोडला. मुरारबाजीचें शीर उडालें व तो रणांगणावर पडला. मुरारबाजी पडला तेव्हां दिलेरखानास किल्ला आतां सहज स्वाधीन होईल, असें वाटलें. त्यानें वरपर्यंत हल्ला नेला व वरच्या शिबंदीस शरण येण्यास सांगितलें. तेव्हां वरच्या लोकांनीं उत्तर केलें, " एक मुरारबाजी पडला तरी काय झालें ? आम्ही तसेच शूर आहों. ऐशी हिंमत धरून भांडतों. " शेवटीं त्यांनीं मोंगलांस किल्ला घेऊं दिला नाहींच.

---

## १३ बादशहाशीं समेट.

( कोंडाण्याचा तह इ. स. १६६५. )

शिवाजी दक्षिण कोंकणांतल्या समुद्रावरची स्वारी करून परत आला तोंच दिलेरखान व जयसिंग हे दोन सरदार मोठी फौज घेऊन आपल्या राज्यावर चाल करून आले आहेत ही बातमी त्याला समजली. हे सरदार मोठे पराक्रमी आहेत आणि यांच्यापाशीं फौजही पुष्कळ आहे; तेव्हां आपण आतां काय करावें, याचा शिवाजीस मोठा विचार पडला. इतक्यांत दिलेरखानानें पुरंदर किल्ल्याला वेढा घातला होता त्यामुळें झालेल्या झटापटींत आपला शूर व एकनिष्ठ सरदार मुरारबाजी पडला ही दुःखकारक बातमी शिवाजीच्या कानांवर येऊन आदळली. ' मुरारबाजी गेला, आतां पुरंदर जाण्यास कांहींच वेळ लागणार नाहीं व आपले किल्ले हे मोंगल एकामागून एक घेतील ' असे विचार मनांत येऊन शिवाजी कांहीं काळ सचिंत असा होता. शिवाजीवर अतिभयंकर संकटें येत, त्याला दुःखही होई, परंतु त्याची ईश्वरावर निष्ठा होती; यामुळें संकटकाळीं निभावून जाण्याचें त्याला सामर्थ्य येत असे व प्रत्येक संकटाला तोंड देऊन शिवाजी

त्यांतून निभावून जाई. मोंगल किल्ले घेतात. आज एक घेतला, उद्यां दुसरा व असेच ते बळावत जाणार. अशा तऱ्हेचा प्रसंग पाहून त्यानें मोंगलाशीं समेट करून वेळ मारून नेण्याचें ठरविलें.

आपल्या पारिपत्याकरितां पाठविलेल्या सरदारांपैकीं राजा जयसिंग तर हिंदु आहे; तेव्हां तो आपल्यास कांहींसा अनुकूळ झाल्याशिवाय राहणार नाहीं, असा विचार करून शिवाजीनें वस्त्रें अलंकार बरोबर देऊन आपण भेटीस येतों, हें सांगण्याकरितां रघुनाथ पंडित यास पाठविलें. जयसिंगानें पंडिताचा सन्मान केला आणि शिवाजीचा निरोप मोठ्या खुषीनें ऐकून घेतला. शाएस्तेखानाची फजिती झाल्यापासून शिवाजी-विषयीं मोंगलांच्या दरबारांत धाक बसून गेला होता. शिवाय जयसिंगाच्या लष्करासही रात्रीं त्रास देण्याचें मराठ्यांनीं सोडलें नाहीं. या कारणांनीं जयसिंगासही लढाई चालविली तर जय मिळेल अशी खात्री नव्हती; म्हणून तो तह करण्यास तयार होता. त्यानें पंडितरावास म्हटलें, " औरंगजेब बादशहा बलवान् पृथ्वीपती, त्याशीं तुम्हीं सख्य करावें; शत्रुत्वानें राहून या काळीं परिणाम लागणार नाहीं; आम्ही हिंदु जयपूरचे राजे, तुम्हीही उदेपूरच्या थोर घराण्याचे वंशज. तुम्ही हिंदु-धर्म स्थापन करतां यास्तव आम्ही तुम्हांस अनुकूल आहोंत. तुम्ही बाद-शहास शरण याल तर त्याजकडून माफी देववून कांहीं मुलूखही जहा-गीर देववूं. याजबद्दल रजपुतांची आणभाक घेऊन तुमची खात्री कर-ण्यास आम्ही तयार आहों." असें सांगून शिवाजीस अवश्य भेटीस यावें, असा त्यानें उलट निरोप पाठविला.

जयसिंगाचा निरोप पोहोंचल्यावर शिवाजीनें त्याच्या भेटीस जा-ण्याची तयारी केली. आपण स्वतः साधा पोषाक केला. बरोबर फौज घेतली. फौजेंतील लोकांनीं बराच थाट केला होता. भेटीचें स्थल कोंडा-

१ चिटणीसबखर पृ. १०२.

ण्याच्या पायथ्याशीं होतें. तेथें आपल्या फौजेसह शिवाजी येऊन पोहों-चला. त्या लष्कराचें वैभव पाहून मोंगलाकडचे लोक दिपून गेले. इतकी संपत्ति ज्या राजाची आहे तो किल्लेकोट घेतो हें साहजिक आहे, असें त्यांस वाटलें. शिवाजीनें साधाच पोषाक केल्यामुळें त्याची तर मोंग-लास ओळखही पटेना. भेट घेण्याकारितां जयसिंग पुढें सामोरा आला होता. तो आणि शिवाजी एका अंबारींत बसून बैठकीच्या जागीं गेले. जयसिंगानें शिवाजीस आपल्या उजव्या बाजूस बसविलें. शिवाजीनें जयसिंगाची औदार्याची वर्तणूक पाहून त्याशीं भाषण केलें:—"तुम्हांस जे गड पाहिजेत ते मी देतों. निशाण चढवितों. पण मुसलमानास यश न देणें. मी हिंदु आपण रजपूत. तेव्हां हिंदूच. राज्य मूळचें सर्व हिंदूंचें व हिंदुधर्माचें रक्षण करणाऱ्या थोर पुरुषापुढें मी आपलें डोकें एकदां सोडून दहादां नमवीन. आपण आपल्या देशाची व धर्माची मानहानि होईल असें कधींही करणार नाहीं." हें भाषण ऐकून जयसिंगाचा धर्माभिमान जागृत झाला, व त्यानें तह करण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. पुढें तह कराव-याचा पण हिंदूस हिंदु मिळाला असा गवगवा होईल याकरितां अगो-दर दिलेरखानाची भेट घ्यावी, असें जयसिंगानें शिवाजीस सुचविलें. दिलेरखानाच्या भेटीस शिवाजी निघाला. तेथें जयसिंगानें त्याजबरोबर आपला मामा सुधानसिंग यास पाठविलें. शिवाजी भेटीस येत आहे हें खानास कळतांच तो मोठा खिन्न झाला. कारण अजून पुरंदर कांहीं त्याच्या हातीं आला नव्हता. तेव्हां त्याला पुरंदर सर करण्याचें यश आपल्या हातीं लागत नाहीं असें वाटलें. हेंच तो खिन्न होण्याचें कारण. भेटीच्या प्रसंगीं दिलेरखान म्हणाला, "या किल्ल्यावर उद्यां निशाण चढवून मी तिकडे येतों." सुधानसिंगानें "शिवाजी पाहिजे ते किल्ले देऊन तह करण्यास आला आहे." असें म्हटलें, तेव्हां खान म्हणालाः— "तुम्ही मिळून जयसिंगाकडे जा. ते वडील आहेत. ते करतील त्यांत आपण आहों."

शिवाजी व सुधानसिंग जयसिंगाकडे गेल्यावर तह ठरला. शिवाजीनें बारा किल्ले आपणाकडे ठेवून बाकी राहिलेले वीस मोंगलांस देण्याचें कबूल केलें. शिवाजीचा आठ वर्षांचा मुलगा संभाजी यास बादशहाकडून पांच हजार घोडेस्वारांची मनसब मिळाली. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, विजापूरच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क वसूल करण्याची शिवाजीस परवानगी मिळाली. कुलाबा जिल्ह्यांतील हब्शांच्या सत्तेखालचा जंजिरा आपल्याला मिळावा म्हणून त्यानें फार खटपट केली; पण बादशहानें असें लिहून धाडिलें कीं, 'जंजिऱ्याचें बोलणें इतक्यांत बोलूं नये. हुजूरभेटीला याल तेव्हां दिल्ली मुक्कामीं त्या गोष्टीचा निकाल करूं.' शिवाजी दिल्लीला भेटीस गेला त्यासंबंधीं पुढें सांगूं. जंजिरा मिळण्यासाठीं शिवाजीनें खटपट केली त्यावरून त्याला समुद्रकिनाऱ्याचें महत्व कळत होतें यांत संशय नाहीं.

---

## १४ कपटानें धरलें पण युक्तीनें सुटले !



कोंडाण्याचा तह झाल्यावर जयसिंगानें विजापुराशीं युद्ध करण्यास सुरुवात केली, त्यांत शिवाजीनें त्याला चांगली मदत केली. शिवाजीनें केलेल्या साहाय्याचें वर्णन जयसिंगानें दिल्लीस लिहून पाठविलें. तें वाचून बादशहा अगदीं खूष झाला. त्यानें दिल्लीस भेटीस येण्याविषयीं शिवाजीस आग्रहाचें बोलावणें केलें. शिवाजीच्या मनांतही एकदां दिल्लीस जाऊन तेथील स्थिति बारकाईनें पाहून येण्याचें होतेंच. त्यानें दिल्लीस जाण्याचा निश्चय केला. जाण्याच्यापूर्वीं किल्ल्यांचा बंदोबस्त केला. सर्व कारभार मोरोपंत

पेशवे, अण्णाजी दत्तो सचीव, निळो सोनदेव मुजुमदार या त्रिवर्गांनीं मिळून चालवावा अशी व्यवस्था केली. आपल्याबरोबर संभाजी, तानाजी मालुसरे, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद हे लोक घेतले व हजार फौजही घेतली. निघतांना शिवाजीनें मोरोपंत वगैरे कारभाऱ्यांस जवळ बोलावून " दिल्लीस माझें बरें वाईट झालें तर तुम्हीं न डगमगतां राजारामास गादीवर बसवून राज्य रक्षण करावें " असा निरोप सांगितला आणि शिवाजी निघाला तो औरंगाबादेस आला. तेथें जयसिंगाची भेट झाली. अगोदरच त्यानें आपला पुत्र रामसिंग यास शिवाजीस हरएक प्रकारचीं मदत करण्याविषयीं लिहिलें होतें. शिवाजी तेथून निघाला तो मजल दर मजल करीत दिल्लीस चालला. वाटेंतल्या सर्व अम्मलदारांस बादशहानें असा हुकूम केला होता कीं, शिवाजी आमच्या भेटीस येत आहे तर त्यास भेटून ठिकठिकाणच्या अम्मलदारांनीं त्याची सर्व प्रकारची तरतूद करावी. त्यामुळें शिवाजीस कोणत्याही प्रकारची दगदग न पडतां निघाल्यापासून दोन महिन्यांनीं तो दिल्लीस पोंचला. शहराबाहेर स्वागताकरितां रामसिंग आला होता. बादशहानें शिवापुरा नांवाची स्वतंत्र हवेली शिवाजीकरितां ठेविली होती तींत शिवाजी उतरला.

मग एक सुमुहूर्त पाहून त्या दिवशीं दरबारांत जाण्याचें शिवाजीनें ठरविलें. त्या दिवशीं बादशहानें आज शिवाजी दरबारांत येणार असें कळवून सर्व सरदारांस दरबारास येण्याविषयीं आमंत्रण केलें होतें. त्याप्रमाणें सर्व मानकरी हजर राहिले. दरबारास जातांना रामसिंगानें शिवाजीस बरोबर घेतलें. दरबारांत बादशहास सलाम करणें, नजर देणें, या गोष्टी झाल्यावर बादशहानें शिवाजीस जसवंतसिंग मारवाडचा राजा उजवे बाजूस होता त्याचे खालीं उभें राहण्यास सांगितलें. बादशहाच्या तोंडचे शब्द कानीं पडतांच शिवाजीस क्रोध आला आणि त्या जागीं जातांना तो मराठींत "जसवंतसारख्या उमरावाच्या खालच्या बाजूस मला उभें करावें म्हणजे काय ?" असे कांहीं शब्द पुटपुटला. हें पाहून बाद-

शिवाजी व सुधानसिंग जयसिंगाकडे गेल्यावर तह ठरला. शिवाजीनें बारा किल्ले आपणाकडे ठेवून बाकी राहिलेले वीस मोंगलांस देण्याचें कबूल केलें. शिवाजीचा आठ वर्षांचा मुलगा संभाजी यास बादशहाकडून पांच हजार घोडेस्वारांची मनसब मिळाली. सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे ही कीं, विजापूरच्या राज्यांत चौथाई व सरदेशमुखी हे दोन हक्क वसूल करण्याची शिवाजीस परवानगी मिळाली. कुलाबा जिल्ह्यांतील हब्शांच्या सत्तेखालचा जंजिरा आपल्याला मिळावा म्हणून त्यानें फार खटपट केली; पण बादशहानें असें लिहून धाडिलें कीं, ' जंजिऱ्याचें बोलणें इतक्यांत बोलूं नये. हुजूरभेटीला याल तेव्हां दिल्ली मुक्कामीं त्या गोष्टीचा निकाल करूं.' शिवाजी दिल्लीला भेटीस गेला त्यासंबंधीं पुढें सांगूं. जंजिरा मिळण्यासाठीं शिवाजीनें खटपट केली त्यावरून त्याला समुद्रकिनाऱ्याचें महत्व कळत होतें यांत संशय नाहीं.

---

## १४ कपटानें धरलें पण युक्तीनें सुटले !



कोंडाण्याचा तह झाल्यावर जयसिंगानें विजापुराशीं युद्ध करण्यास सुरुवात केली, त्यांत शिवाजीनें त्याला चांगली मदत केली. शिवाजीनें केलेल्या साहाय्याचें वर्णन जयसिंगानें दिल्लीस लिहून पाठविलें. तें वाचून बादशहा अगदीं खूष झाला. त्यानें दिल्लीस भेटीस येण्याविषयीं शिवाजीस आग्रहाचें बोलावणें केलें. शिवाजीच्या मनांतही एकदां दिल्लीस जाऊन तेथील स्थिति बारकाईनें पाहून येण्याचें होतेंच. त्यानें दिल्लीस जाण्याचा निश्चय केला. जाण्याच्यापूर्वीं किल्ल्यांचा बंदोबस्त केला. सर्व कारभार मोरोपंत

पेशवे, अण्णाजी दत्तो सचीव, निळो सोनदेव मुजुमदार या त्रिवर्गांनीं मिळून चालवावा अशी व्यवस्था केली. आपल्याबरोबर संभाजी, तानाजी मालुसरे, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जंद हे लोक घेतले व हजार फौजही घेतली. निघतांना शिवाजीनें मोरोपंत वगैरे कारभाऱ्यांस जवळ बोलावून " दिल्लीस माझें बरें वाईट झालें तर तुम्हीं न डगमगतां राजारामास गादीवर बसवून राज्य रक्षण करावें " असा निरोप सांगितला आणि शिवाजी निघाला तो औरंगाबादेस आला. तेथें जयसिंगाची भेट झाली. अगोदरच त्यानें आपला पुत्र रामसिंग यास शिवाजीस हरएक प्रकारचीं मदत करण्याविषयीं लिहिलें होतें. शिवाजी तेथून निघाला तो मजल दर मजल करीत दिल्लीस चालला. वाटेंतल्या सर्व अम्मलदारांस बादशहानें असा हुकूम केला होता कीं, शिवाजी आमच्या भेटीस येत आहे तर त्यास भेटून ठिकठिकाणच्या अम्मलदारांनीं त्याची सर्व प्रकारची तरतूद करावी. त्यामुळें शिवाजीस कोणत्याही प्रकारची दगदग न पडतां निघाल्यापासून दोन महिन्यांनीं तो दिल्लीस पोंचला. शहराबाहेर स्वागताकरितां रामसिंग आला होता. बादशहानें शिवापुरा नांवाची स्वतंत्र हवेली शिवाजीकरितां ठेविली होती तींत शिवाजी उतरला.

मग एक सुमुहूर्त पाहून त्या दिवशीं दरबारांत जाण्याचें शिवाजीनें ठरविलें. त्या दिवशीं बादशहानें आज शिवाजी दरबारांत येणार असें कळवून सर्व सरदारांस दरबारास येण्याविषयीं आमंत्रण केलें होतें. त्याप्रमाणें सर्व मानकरी हजर राहिले. दरबारास जातांना रामसिंगानें शिवाजीस बरोबर घेतलें. दरबारांत बादशहास सलाम करणें, नजर देणें, या गोष्टी झाल्यावर बादशहानें शिवाजीस जसवंतसिंग मारवाडचा राजा उजवे बाजूस होता त्याचे खालीं उभें राहण्यास सांगितलें. बादशहाच्या तोंडचे शब्द कानीं पडतांच शिवाजीस क्रोध आला आणि त्या जागीं जातांना तो मराठींत "जसवंतसारख्या उमरावाच्या खालच्या बाजूस मला उभें करावें म्हणजे काय ?" असे कांहीं शब्द पुटपुटला. हें पाहून बाद-

शहा गडबडला आणि त्यानें जवळच्या मंडळीस शिवाजी काय म्हणतो, हें विचारलें. नंतर बादशहानें कांहींएक काम जास्त न करतां 'शिवाजीस उतरल्या ठिकाणीं घेऊन जा' म्हणून रामसिंगास सांगितलें. शिवाजी उतरल्या ठिकाणीं येऊन पोंचल्यावर थोड्याच वेळानें बादशहाकडून "यापुढे तुम्हीं दरबारांत येऊं नये, काय बोलणें असेल ते वकिलामार्फत कळवीत जावें" असा निरोप आला. शिवाजीनें बादशहास वारंवार निरोप पाठवून कळविलें कीं 'माझी दुसरी कांहीं इच्छा नाहीं, विजापूर, गोंवळकोंडें येथील राज्यें मोडून बादशहाची सेवाचाकरी करावी येवढीच इच्छा आहे. भेटीस येण्यासही माझ्या मनांत कांहींच वाटत नाहीं.' पण औरंगजेबासारख्या संशयी बादशहाचा विश्वास यावर काय बसणार ? अगोदरच औरंगजेबाचा शिवाजीवर भरंवसा नव्हता. त्यांतून दरबारांतलें त्याचें वर्तन पाहून बादशहा संशयग्रस्त झाला. मग आपण काय वचन दिलें आहे, या गोष्टीची बादशहानें मुळींच फिकीर न करितां पोलादजंग कोतवालास पांचहजार स्वारांनिशीं शिवाजीवर पहारा ठेवण्यास सांगितलें. आतां शिवाजी मोठ्या संकटांत पडला, पण त्यानें रामसिंगाकडून बादशहास विनंति केली कीं, आमच्या देशास जाण्याची आम्हांस परवानगी द्यावयाची नसली तरी आमच्याबरोबरच्या लोकांस कांहीं येथील हवापाणी मानवत नाहीं तेव्हां त्यांना परत जाण्याचा हुकूम व्हावा. बादशहास वाटलें कीं, हें चांगलें झालें. शिवाजी आपण होऊनच आपली फौज परत करतो हें बरेंच, आतां तो येथें राहिल्यावर काय करणार आहे ? असा विचार करून औरंगजेबानें शिवाजीच्या फौजेस परत जाण्याचा हुकूम दिला. मग दिल्लीस कांहीं निवडक मंडळी मात्र शिवाजीजवळ राहिली.

शिवाजीनें औरंगजेबाकडे मला दक्षिणेंत जाण्याची परवानगी व्हावी असे बरेच निरोप पाठविले, पण औरंगजेबाकडून परवानगी मिळेना. औरंगजेबास शिवाजीचा स्वाभिमानी स्वभाव पहिल्या दिवशींच दर-

बारांत कळून चुकला होता. शिवाजीला दक्षिणेंत जाऊं दिलें तर तेथें तो आपली सेवां करून राहील हें त्या धोरणी बादशहास मुळींच खरें वाटलें नाहीं. त्यानें शिवाजीला दिल्लीसच ठेवून घेण्याचा विचार केला. बादशहास असें वाटत होतें कीं, शिवाजी प्रत्यक्ष आपल्याजवळच आला तर त्याच्या शौर्याचा आपणास उपयोग करून घेतां येईल. शिवाय शिवाजी दिल्लीस राहण्यास कबूल होईपर्यंत त्यावर सक्त पहारा ठेवावयाचा, असें रामसिंगास त्यानें एके प्रसंगीं सांगितलें. हा बाहशहाचा बेत शिवाजीच्या अगोदरच ध्यानांत आला होता. शिवाजीला आतां काय करावें, हा प्रश्न पडला--दिल्लीस बाशहाचा सरदार म्हणून राहण्यास कबूल व्हावें तर आपण मोठ्या मेहनतीनें आरंभिलेला स्वराज्यस्थापनेचा उद्योग सोडून द्यावा लागणार; बरें दक्षिणेंत जाण्यास बादशहा सरळपणें परवानगी देत नाहींच; पहारा तर कडक आहे. या संकटांतू न सुटावें कसें ? इत्यादि विचार शिवाजीच्या मनांत आले. शेवटीं जीव धोक्यांत कां पडेना, पण दिल्लीहून निसटून जाण्याचा शिवाजीनें निश्चय केला.

मी दिल्लीस राहण्यास कबूल आहें, अशा अर्थाचे निरोप शिवाजी बादशहास पाठवूं लागला. दरबारांतील लोकांच्या घरीं भेटीस जाण्याचा त्यानें प्रघातही पाडला. मग हळुहळू नजराणे म्हणून मिठाईनें भरलेले पटारे शिवाजीकडून जाऊं लागले. पहिल्यापहिल्यानें पहारेकरी पेटारे तपासून पहात, पण पुढें पुढें यांत मिठाईच असते त्यांत काय पहावयाचें, असें म्हणून तपासण्याचा ते कंटाळा करूं लागले. इतक्यांत पाहरेकऱ्यांस शिवाजीच्या लोकांनीं सांगितलें कीं ‘ महाराजांचें कपाळ दुखतें तुम्ही गलबला करूं नका. ’ मेवाईचे पेटारे मागच्याप्रमाणें जात होते. शिवाजी आजारी आहे, उशिरां उठतो, आपल्या नजरेस फारसा पडत नाहीं, याचें पहारेकऱ्यांस आश्चर्य वाटलें नाहीं. असे दहापंधरा दिवस

१ ही गोष्ट आग्रा येथें झाल्याचें आतां सिद्ध झालें आहे. मॉडर्न रिव्ह्यू १९०९ जुलै प्रो. जदनाथ यांचा ‘ औरंगजेब.’

गेले. मग एके दिवशीं संध्याकाळीं शिवाजी एका पेटाऱ्यांत व संभाजी एका पेटाऱ्यांत असे कुलस्वामीचें चिंतन करून बसले. पेटारे रोजच्या प्रमाणें तपासणी न होतां चालले. ते गांवाबाहेर पूर्वींच ठरलेल्या जागीं आले. तेथें तानाजी वगैरे शिवाजीची दोस्तमंडळी होतीच. वेष पालटून ते कसेबसे मथुरेस पोंचले. इकडे हिरोजी फर्जंद हा शिवाजीचा पोषाख करून डोळ्यांवर पांघरूण घेऊन निजला होता, तो लवकर उठला आणि पहारेकऱ्यांस 'महाराज जास्त आजारी आहेत, मी औषध आणण्यास जातों. तुम्ही कोणी आंत जाऊं नका' असें सांगून निघाला, आणि त्यानें दक्षिणेचा मार्ग धरला. दुपार झाली तरी कांहीं हालचाल नाहीं, असें पाहतांच पाहरेकरी आंत गेले आणि पाहतात तों शिवाजी तेथें नाहीं. हें वर्तमान पोलादखानानें बादशहास कळविलें तेव्हां बादशहा पोलादखानावर फारच रागवला व त्याची मनसब त्यानें जप्त केली. औरंगजेबास आपल्या शहाणपणाची घमेंड होती. त्याला वाटत होतें कीं, आपण शिवाजीस आतां अडकवून टाकलें, पण ईश्वरी संकेत निराळा. शिवाजी बादशहाचे हातावर तुरी देऊन दक्षिणेकडे निघून गेला. मथुरेस मोरोपंत पेशव्यांचे मेहुणे होते त्यांच्या घरीं संभाजीस ठेविलें. बैराग्याच्या वेषानें काशीयात्रा करून शिवाजी गेल्यापासून १० महिन्यांनीं ( १६६६ दिसेंबर ) रायगडास आला, त्या प्रसंगीं जिजाबाई व कारभारी मंडळी यांस किती आनंद झाला तें सांगतां येत नाहीं. शिवाजीचें दिल्लीस गमन व तेथील त्याचा बंदिवास हें एक मराठ्यांच्या राज्यावर गंडांतरच येऊन गेलें! या वेळीं कारभाऱ्यांनीं व्यवस्थितपणें राज्यकारभार चालविला होता; जणूं काय शिवाजी कोठें गेलाच नाहींसें भासत होतें, हें शिवाजीस कळल्यावर त्यास फार आनंद झाला यांत कांहीं नवल नाहीं. आपल्या मागें आपलें काम चालविण्यास योग्य माणसें आहेत हें पाऊन कर्त्या पुरुषास फारच समाधान वाटतें, तसेंच या प्रसंगीं शिवाजीसही झालें. दहा महिने मालक जाग्यावर नसतां महाराष्ट्रांतील एकही मराठा स्वराज्य सोडून

फितूर होऊन त्या वेळीं चहूंकडे गाजणाऱ्या मोंगलांस मिळाला नाहीं. उघडच आहे, महाराष्ट्रांतील सर्व लोकांस हिंदुराज्य हें आपलें राज्य असें मानण्याची संवय लागली होती. संभाजीला घेऊन पेशव्यांचे मेहुणे थोड्याच दिवसांनीं दक्षिणेंत आले. वाटेंत उज्जनीस संभाजीविषयीं लोक चौकशी करूं लागले, तेव्हां ‘ हा आमचा भाचा आहे ’ असें त्यांनीं सांगितलें. ‘तुमचा जर तो भाचा आहे तर तुम्ही एका ठिकाणीं जेवा पाहूं’ असा तेथील लोकांनीं आग्रह धरिला. ‘याची मुंज झाली आहे तेव्हां एके ठिकाणीं जेवतां येत नाहीं, ’ असें ते म्हणाले. लोकांना तें कारण पटलें. नंतर त्यांनीं दहीं पोहे कालवून एकत्र खाल्ले, तेव्हां लोकांचा संशय दूर झाला. अशा संकटांतून आपला मुलगा आणला हें पाहून शिवाजीनें देणग्या देऊन त्यांची योग्य संभावना केली.

---

## १५ स्वराज्यव्यवस्था.

शिवाजी दिल्लीहून सुटून गेला तेव्हां या कामीं त्यास रामसिंगाची मदत असावी असा औरंगजेबास संशय आला आणि त्यानें रामसिंगास दरबारांत येण्याची मनाइ कली. शिवाजी दिल्लीस गेल्यावर जयसिंगानें विजापुरास वेढा घातला होता, पण त्याला जय मिळाला नाहींच; उलट अति त्रास झाला, म्हणून तो वेढ्याचें काम टाकून देऊन औरंगाबादेस परत गेला. त्याचा हा झालेला पराभव व शिवाजी हा दक्षिणेंत नुकताच गेलेला असल्यामुळें त्या दोघांचें ऐक्य होण्याची भीति, या दोन कारणांनीं बादशहाचें मन जयसिंगाविषयीं साशंक झालें. यामुळें त्यानें त्यास परत बोलाविलें. दिलेरखानास माळव्याच्या सुभ्यावर बदललें, आणि दक्षिणच्या सुभ्यावर आपला मुलगा

मुअज्जम व जोधपूरचा राणा जसवंतसिंग या दोघांची रवानगी केली. दिल्लीस असतां या दोघांचाही स्वभाव शिवाजीस माहिती झाला होता. त्यानें जसवंतसिंगास पैसे भरून व मुअज्जमशीं गोड बोलून मोंगलांशीं पूर्वी झालेला तह कायम करण्याविषयीं बादशहास लिहिण्यास सांगितलें. बादशहाही तह कायम करण्यास कबूल झाला. शिवाजीशीं औदार्याची वर्तणूक करून फिरून त्यास फसवून दगा करण्याचा त्या कपटी बादशहाचा विचार होता. यासाठीं तो नुसता तह करून थांबला नाहीं. भोंसले घराण्यांत राजे हें उपपद पूर्वींपासून चालू होतेंच; परंतु खुद्द बादशहानें आतां शिवाजीस राजा हा किताब दिला. कोंडाणा, पुरंदर या किल्ल्यांशिवाय पुणें व सुपें हे जहागिरीचे परगणे परत दिले. आणखी वऱ्हाडप्रांत जहागीर दिला. ह्या वऱ्हाडप्रांतांतील जहागिरीच्या बंदोबस्ताकरितां व कोंडाण्याच्या तहांत बादशहाकडून संभाजीला मिळालेली पांचहजारांची मनसब चालविण्याकरितां शिवाजीनें प्रतापराव गुजर यांस पांच हजार फौजेनिशीं मोंगलांच्या छावणींत औरंगाबादेस ठेवून दिलें. या तहानें शिवाजीस विजापूरकरांच्या राज्यांतून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाला होता. यामुळें विजापूरकर घाबरून गेले आणि आपल्या राज्यास त्रास न पोंचावा म्हणून त्यांनीं दरसाल तीन लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. गोवळकोंड्याच्या सुलतानानें याचप्रमाणें पांच लक्ष खंडणी कबूल केली. हे तिन्ही तह झाल्यावर दोन वर्षेपर्यंत परराज्यांशीं शिवाजीचें सख्य कायम राहिलें. या दोन वर्षांचा काळ शिवाजीनें आपल्या राज्याची व्यवस्था लावण्यांत खर्च केला. ती राज्यव्यस्था कशी होती हें आतां सांगावयाचें.

ज्या सैन्याच्या जोरावर शिवाजीनें विजापुरच्या सुलतानास शरण यावयास लाविलें, औरंगजेबास नरम आणिलें व सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजे स्वराज्य स्थापना केली, त्या सैन्याची व्यवस्था कशी होती हें

पाहूं. शिवाजीच्या पायदळांत घाटमाथ्यावर राहणारे मावळे व कोंकणांत राहणारे हेटकरी असत. त्यांचीं शस्त्रें म्हणजे तलवार, ढाल, बंदुक किंवा बाण. डोंगर चढण्याच्या कामांत ते अगदीं पटाईत असत. इतके कीं, ज्या कड्यावरून चढण्यास इतर माणसांनीं प्रयत्न केल्यास तीं ठिकऱ्या ठिकऱ्या होऊन प्राणास मुकतील असले अवघड कडे ते सहज चढून जात. त्यांतल्या त्यांत शिवाजीचे हेटकरी अचुक नेम मारीत आणि मावळे लढाईला तोंड लागलें म्हणजे तलवार घेऊन निकरानें लढण्यांत तरबेज असत. शिवाजीनें राज्यस्थापनेचा आरंभ केला तेव्हां प्रथम किल्ले सर केले. हे किल्ले घेतांना त्याच्या पायदळाची त्याला उत्कृष्ट मदत झाली. त्यावर मुख्य एसाजी कंक हा होता.

शिवाजीचे घोडेस्वार दोन प्रकारचे असत. एक शिलेदार व दुसरे बारगीर. शिलेदार जरा श्रीमंत असून घोडीं, दारूगोळा, हत्यारें वगैरे त्यांचीं स्वतःचीं असत. कांहींकांहीं शिलेदार आपल्या हाताखालीं पांच पन्नास स्वार बाळगून असत. बारगीर हे गरीब असत. त्यांस वापरावयास घोडीं, हत्यारें इत्यादि सरकारांतून मिळे. शिवाजीचा बारगिरांवर विशेष भरंवसा असे. त्यांचीं हत्यारें ढाल, तलवार व भाला हीं असत. बंदुकीही कित्येकांपाशीं असत. परमुलखावर स्वाऱ्या करतांना शिवाजीला घोडेस्वारांची मदत विशेष असे. घोडेस्वारांचा सरनोबत प्रतापराव गुजर हा होता.

शिवाजीनें स्वराज्य स्थापिलें तें गोब्राह्मणांचें प्रतिपालन करण्याकरितां होय. मुसलमानांच्या राज्यांत महाराष्ट्रांतील लोकांचा छळ चालला होता, तो छळ नाहींसा करून लोकांस सुख व्हावें याकरितांच शिवाजी आणि त्याचे अनुयायी यांनीं जिवापाड मेहनत करून स्वराज्य स्थापण्याची खटपट केली. तेव्हां आपल्या सैन्यापासून प्रजेस त्रास होऊं नये याबद्दल शिवाजी फारच जपत असे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. एकदां शिवाजीच्या कांहीं फौजेची छावणी कोंकणांत होती. त्या फौजेच्या

अधिकाऱ्यांस शिवाजीनें एक पत्र लिहिलें; त्यांत पुढील अर्थाचा मजकूर आहे:-" **सैन्यांतील लोक जातील, कोणी कुणब्याचे दाणे आणील, कोणी भाकरी, कोणी गवत. त्यांना असें होईल कीं मागल मुलुखांत आहे त्याहूनही अधिक तुम्ही. ऐसा तळतळाट होईल, हें जाणून तुम्हीं बहुत यादी धरून वर्तणूक करणें. कोणी पागेंत अगर मुलुखांत गांवोगांव राहिले असाल त्यांणीं रयतेस त्रास द्यावयाची गरज नाहीं. खजिन्यांतून पगार दिले आहेत. ज्याला जो जिन्नस लागेल तो त्यानें बाजारांत जाऊन विकत आणावा. कोणावर जुलूम अगर कोणाशीं तंटा करण्याचें कारण नाहीं.**" हा हुकूम करितांना शिवाजीला आपल्या प्रजेला त्रास होईल कीं काय म्हणून किती चिंता पडली असेल बरें ! शिवाजीच्या वेळेस सारख्या लढाया चालल्या होत्या. पण अशा वेळींही आपल्या सैन्यापासून लोकांस मुळींच त्रास पोंचूं नये इकडे लक्ष देणारा शिवाजी किती प्रजावत्सल असेल ! आपल्या प्रजेवर त्याचें कितीतरी प्रेम असेल बरें ! आम्ही जे त्याला शंकराचा अवतार समजतों तें यथार्थ नव्हे काय !

शिवाजीची सैन्यव्यवस्था सांगतांना त्यानें केलेला किल्ल्यांचा बंदोबस्त अवश्य माहीत करून दिला पाहिजे. शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला तेव्हां त्याच्या राज्यस्थापनेस सुरुवात झाली हें मागें आलेंच आहे. तोरणा किल्ला घेतल्यावरही किल्ले घेण्याचाच तडाका कांहीं वर्षें चालला होता. शिवाजीनें राज्यस्थापनेचा उद्योग महाराष्ट्राच्या पश्चिमेस सह्याद्रीला लागून असणारा प्रदेश म्हणजे हल्लींच्या पुणें व सातारा ह्या जिल्ह्यांचे पश्चिमभाग, त्यांत केला. हा मुलूख डोंगराळ आहे व तो ताब्यांत ठेवावयाचा म्हणजे किल्लेच ताब्यांत आणणें भाग होतें. मोंगल आणि विजापूरकर यांनीं या किल्ल्यांचा नीट बंदोबस्त केला नाहीं व त्यांची सत्ता ह्या भागांत पूर्ण बसली नव्हती. किल्ल्यांचें महत्व शिवाजीच्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं. त्यानें जुने किल्ले घेतले, पडले होते त्यांची

डागडुजी केली व इतकेंच करून न थांबतां त्यानें पुष्कळ नवे किल्ले बांधले. किल्ले-कोट हे माझ्या राज्याचे जीव प्राण आहेत असें तो नेहमीं म्हणे; आणखी आपल्या किल्ले-कोटांचा नीट बंदोबस्त असल्यावर मोठ्या बलाढ्य शत्रूचाही हिशेब धरावयास नको अशी त्याची खात्री होती. किल्ल्यावर धान्य व दारूगोळा नेहमीं सांठविलेला असे. राज्यांत शत्रु शिरला असतां त्याच्याशीं झुंजण्यास किल्ल्यांचा उपयोग फार होई; शिवाय शत्रूच्या मुलुखांत स्वारी करावयाची तेव्हां जवळच्या किल्ल्यांत स्वारीवर काय मिळेल तें आणून टाकलें म्हणजे शत्रूचा कांहीं इलाज चालत नसे. प्रत्येक किल्ल्यांवरचा मुख्य अधिकारी एक मराठा हवालदार असे. त्याच्या मदतीस एक ब्राह्मण सबनीस व प्रभु कारखाननीस असत. सबनीस लिहिण्याचें काम करी, व कारखाननीस धान्य, दारूगोळा, शिबंदीचे पगार इत्यादि गोष्टींची व्यवस्था पाही.

आपल्या राज्यांतला वसूल करण्याचीही शिवाजीनें उत्तम व्यवस्था केली होती. जमिनीवरील कराशिवाय इतर सर्व कर त्यानें काढून टाकले. जमिनीवरील करही एकंदर उत्पन्नाच्या दोनपंचमांशापेक्षां कधींही ज्यास्त घ्यावयाचा नाहीं असा ठराव केला. लोकांचे तंटे तोडण्याकरितां गांवपंचायतीच्या सभा असत; त्यांजकडून हें काम बिनबोभाट होत असे. शास्त्री, पंडित वगैरे विद्वानांस नानाप्रकारच्या देणग्या देऊन विद्येच्या प्रसारार्थ आपल्या हातून होईल तितकी खटपट केल्याशिवाय तो राहिला नाहीं. शिवाजीच्या राज्यव्यवस्थेच्या मुळाशीं त्यानें स्थापन केलेली अष्टप्रधानाची पद्धति होती. पण तिच्याविषयीं सविस्तर माहिती पुढें राज्याभिषेक प्रकरणीं येईल.

# १६ गड आला पण सिंह गेला !

औरंगजेबानें आपला मुलगा मुअज्जम याच्या वतीनें शिवाजीशीं तह केला; व प्रतापराव गुजराच्या हाताखालीं आपल्या फौजेची छावणी शिवाजीनें औरंगाबादेस मोंगलांच्या लष्करांत ठेवून दिली असें मागील भागांत सांगितलें; पण हा तह फार वेळ टिकला नाहीं. कारण औरंगजेब मोठा संशयी स्वभावाचा होता. आपला मुलगा शिवाजीशीं मैत्री करून आपल्याविरुद्ध बंड तर करणार नाहींना ? असा औरंगजेबाच्या मनांत विचार आला, मग काय तो थोडाच थांबणार ! त्यानें लागलींच आपल्या मुलास एक हुकूम खरडला. त्यांत शिवाजी व त्याचे सरदार जितके सांपडण्यासारखे असतील त्यांस कैद करून इकडे पाठवावें असा मजकूर होता. मुअज्जीमास तो हुकूम मिळण्याच्या पूर्वींच ही बातमी कळली. त्याला मराठ्यांचा विश्वासघात करण्याची जरूर वाटली नाहीं व प्रतापराव गुजरास त्यानें बादशहाचा मतलब सांगून आपल्या सैन्यासह परत जाण्यास सांगितलें. औरंगजेब किती कपटी, दुष्ट व आंतल्या गांठीचा आहे हें दिल्लीस झालेल्या भेटीच्या प्रसंगापासून शिवाजी ओळखूनच होता. पण आपल्यास पकडण्याच्या या हुकुमानें त्या बादशहाच्या दुष्टपणाचें एक ताजें उदाहरण शिवाजीच्या डोळ्यांपुढें आलें; व त्या बादशहाचा त्याला अनावर क्रोध आला व बादशहाला दिलेले किल्ले व मुलूख परत घेण्याचा त्यानें निश्चय केला.

याच सुमारास एक दिवशीं जिजाबाई प्रतापगडावर सहज बसली होती, तों तिची नजर पूर्व दिशेकडे गेली आणि कोंडाणें किल्ला तिच्या दृष्टीस पडला. तो पाहिल्यावर तिला काय वाटलें कोणास ठाऊक. तिनें शिवाजीला बोलावून आणा म्हणून जवळच्या कारभाऱ्यास सांगितलें.

शिवाजी राजगडावर होता. त्याला जिजाबाईकडून ‘ राजगडावर जेवीत असशील तर प्रतापगडावर अंचवावयास ये ’ इतक्या निकडीचा निरोप गेला; निरोप कळल्याबरोबर शिवाजी अगदीं तांतडीनें प्रतापगडास आला ! आल्याबरोबर “ काय आज्ञा ” म्हणून जिजाबाईस विचारतां ‘ मला तुजबरोबर फांशांचा डाव खेळावयाचा आहे ’ असें ती म्हणाली. ‘ बरें ’ असें शिवाजीनें म्हटलें व दोघें खेळूं लागलीं. त्या दिवशीं शिवाजीला मुळींच दान पडलें नाहीं. जिजाबाईला मात्र ती जें म्हणे तें पडे. शेवटीं जिजाबाईनें डाव जिंकला. तेव्हां शिवाजी म्हणाला ‘ आई, मला तूं जिंकलेंस तर तुला काय मागावयाचें तें माग, मी तुला देतों. ’ जिजाबाई म्हणाली. “ मला कांहीं नको, पुण्याजवळचा कोंडाणें किल्ला तेवढा घेऊन दे. ” शिवाजी चपापला व म्हणतो, “ आई, तेवढा नको मागूं. तो किल्ला आधींच किती बळकट. शिवाय त्यावर मोंगलांची मोठी छावणी आहे. तेव्हां तो सध्यां घेणें फार अवघड. इतर काय थोडे किल्ले माझ्या सत्तेखालीं आहेत ? त्यांतील माग. ” जिजाबाई मुलाचे उगीच लाड करणारी नव्हती. शिवाजीचे शब्द ऐकून ती जास्तच हट्टास पेटली व म्हणाली “ द्यावयाचा असला तर कोंडाणा दे, नाहीं तर तोंड दाखवूं नकोस. ”

शिवाजी मोठा मातृभक्त. त्यानें विचार केला कीं, किल्ला तर घेतलाच पाहिजे. पण तो कसा घ्यावा याचा लवकर निश्चय होईना. हें काम करण्यास योग्य माणूस कोण याचा शिवाजी सारखा विचार करीत बसला होता. इतक्यांत या कामगिरीवर तानाजीस पाठवावें हा विचार त्याला सुचला. त्याबरोबर त्याची चिंता नाहींशी झाली. त्यानें एक लखोटा लिहिला व तो लखोटा पोंचविण्यास एका जासूदास सांगितलें.

तानाजी कांहीं दिवसांपासून उमरठें नांवाच्या आपल्या कोंकणांतल्या गांवांत जाऊन राहिला होता. शिवाजीचा बादशहाशीं तह झाला होता व दक्षिणेंतलीं दोन्हीं मुसलमान राज्येंही त्याला खंडण्या देऊं लागलीं

होतीं. तेव्हां एकंदरीनें ते स्वस्थतेचे दिवस होते. यामुळेंच तानाजीस आपल्या गांवास जाण्यास थोडी फुरसत झाली. सुभेदार तानाजीराव हल्लीं घरींच असल्यामुळें त्याच्या घरांतलीं सर्व माणसें सुखांत होतीं. शिवाय आतां माघ महिना होता, व माघ व॥ ९ मीला तानाजीरावाचा मुलगा रायबा याचें लग्न ठरलें होतें. या लग्नाचें साहित्य करण्यांत बायका दंग होत्या. पुरुष मंडळी लग्नाला वऱ्हाडी बोलवावयाच्या गडबडींत होती. आतां लग्नाला अगदीं थोडे दिवस होते. हळदीसुद्धां लागल्या होत्या. मग त्या वेळीं त्या गांवांतील सर्व माणसें विशेषतः तानाजीरावांच्या येथील माणसें फारच आनंदांत होतीं हें काय सांगितलें पाहिजे ? अशा ऐन वेळीं शिवाजीचा जासूद जाऊन पोहोंचला.

मजकूर वाचल्याबरोबर शिवाजीचा जासूद आला म्हणून भोंवतालीं मंडळी जमली होती. त्यांस तानाजी म्हणाला " मला शिवाजीमहाराजांनीं कोंडाणा घेण्याची आज्ञा केली आहे; तेव्हां आधीं लगीन कोंडाण्याचें, मग रायबाचें करीन. " तें त्याचें भाषण ऐकून शेलारमामा ऐशीं वर्षांचा म्हातारा होता, तो म्हणाला " कोंडाणें किल्ला अतिशय अवघड शिवाय वर मोंगल अगदीं बंदोबस्तानें आहे, तो घेण्याचा प्रयत्न व्यर्थ होईल. तूं या भानगडींत पडूं नको. " त्या म्हाताऱ्यानें दिलेला हा भित्रेपणाचा सल्ला तानाजीस अगदीं रुचला नाहीं. व मोठ्या आवेशानें तो म्हणाला, " मामा असें काय बोलतोस. हें तुला शोभत नाहीं. आपण कोण आहोंत ! आम्ही शूर मर्द क्षत्रिय, नाहीं भिणार मरणाला. " असें बोलून त्यानें लग्नाची बाब अगदीं बाजूला ठेविली. आपला भाऊ सूर्याजी यास हजार मावळे बरोबर घेऊन येण्यास सांगून तो स्वतः सिंहगडची बारीक माहिती मिळविण्याकरितां पुढें निघाला. तानाजी आपल्या मुलाचें मंगलकारक लग्न टाकून शिवाजीच्या एका चिठ्ठीवर कोंडाणें घेण्यास चालता झाला. केवढा हा स्वराज्यप्रेमा ! केवढी ही देशभक्ति !

जयसिंगाशीं झालेल्या तहानें कोंडाणें मोंगलांच्या ताब्यांत गेला होता, त्याला आतां पांच वर्षें होऊन गेलीं होतीं. तो किल्ला ह्या वेळीं

उदयभानू नांवाच्या किल्लेदाराच्या ताब्यांत होता. हा उदयभानू मूळचा रजपूत पण बाटून मुसलमान झाला होता. त्याच्या हाताखालीं गडाच्या संरक्षणास रजपुतांचें व पठाणांचें मिळून अठराशें सैन्य होतें. किल्ल्याच्या पायथ्याशीं कोळ्यांचा व तटाजवळ बाहेरच्या अंगास महारांचा असे पहारे होते. या सैन्याची व पहाऱ्यांची व्यवस्था उदयभानूनें सक्त ठेविली होती. तानाजी सुगावा काढीत काढीत आला तों त्यास समजलें कीं, कोळ्यांचा मुख्य रायाजी कोळी आहे. तानाजीनें स्वतः त्याची गांठ घेतली. त्याचा धर्माभिमान व देशाभिमान जागृत करण्यासारखें त्याशीं भाषण करून त्याच्याकडून गडावरील सर्व व्यवस्थेची माहिती मिळविली व सूर्याजीच्या सैन्यास येऊन तो मिळाला.

रात्र पडतांच तानाजीनें सैन्याच्या पांचशेंपांचशेंच्या अशा दोन टोळया केल्या व एक पांचशांची टोळी सूर्याजीच्या हाताखालीं देऊन "मध्यरात्र होण्यापूर्वींच गडाच्या दक्षिणेकडच्या कल्याणदरवाज्याच्या बाहेर यावें, आम्ही दुसरीकडून गडांत शिरून तो दरवाजा उघडतों असें सांगितलें व आपण आपल्या हाताखालच्या पांचशें लोकांसह किल्ल्याच्या पश्चिमेच्या बाजूला गेला. या बाजूचा कडा उभाच्या उभा आहे यामुळें वर असलेल्या मोंगलांस या बाजूनें किल्ल्यास भीति नाहीं असें वाटत होतें. म्हणून या बाजूचा बंदोबस्त चांगलासा नव्हता. तानाजीनें तरी याच गोष्टीचा फायदा घेण्याकरितां या बाजूनें किल्ल्यांत उतरण्याचा निश्चय केला. कड्याच्या पायथ्याशीं आल्याबरोबर 'यशवंती' घोरपड कमरेला

१ ही सरड्याच्या जातीची असते. ती अत्यंत चपल असून तिचीं नखें तीक्ष्ण असतात; तीं रोंवून डोंगराच्या कड्यासारख्या अवघड जागी वर चढून जाऊन एखाद्या ठिकाणीं चिकटून बसण्याची तिची शक्ति अजब असते. या तिच्या गुणाचा फायदा घेऊन पूर्वीं अवघड कडे चढून जाण्यास तिचा उपयोग करीत. कंबरेला दोर अथवा सांखळदंड बांधून तिला कड्यावर सोडावयाची व मग ती वर जाऊन घट्ट चिकटून बसली कीं लोंबत्या दोरावरून लोकांनीं चढून जावयाचें अशी पद्धति असे.

सांखळदंड बांधून कड्यावर सोडिली, ती पहिल्यानें मागें फिरली पण तानाजीनें दटाविल्याबरोबर पुन्हां वर जाऊन नखें रोंवून बसली. तानाजी वर चढला. मग कांहीं मावळे वर गेले. मेखा ठोकून आणखी दोन चार दोर खालीं लोंबते सोडले. व त्यांवरून पटापट तीनशें मावळे चढून गेले.

इतक्यांत किल्ल्यावरच्या शिबंदीस किल्ल्याच्या पश्चिम बाजूला कांहीं गडबड आहे असें वाटलें. त्यावरून त्यांनीं मशाली पेटविल्या व पाहूं लागले तों त्यांना वर चढून आलेले तीनशें मावळे दिसले. मग ते रज़पूत व पठाण शिपाई चाल करून आले. मावळेही सज्जच होते. लागलीच लढाईस सुरवात झाली. मोठें घनचक्कर युद्ध सुरू झालें कांहीं मावळयांनीं जाऊन कल्याण दरवाजा काबीज केला. आणि तेथें ते सूर्याजीरावाची वाट पहात बसले. किल्ल्यांत युद्ध चाललेंच होतें. तो मध्यरात्रीचा समय होता. सिंहगड किल्ल्यावर तलवारींचा खणखणाट चालला होता. असें युद्ध चालू असतां मोंगलांचा मुख्य उदयभानू व तानाजीराव या दोघांचें द्वंद्व युद्ध चालू झालें. दोघेही शूर व कसलेले लढवय्ये, दोघांच्या तलवारी सारख्या चालल्या होत्या, डाव्या हातांतल्या ढालीनें आपल्या शत्रूच्या तलवारीचे वार चुकविण्याची दोघेही शिकस्त करीत होते. थोड्याच वेळांत दोघांना पांच सात वार लागून त्यांच्या अंगांतून रक्ताच्या धारा चालल्या, इतक्यांत उदयभानूचा एक जोराचा वार तानाजीच्या ढालीवर पडून ती तुटली. आतां तानाजीस दुसरी ढाल कोठली मिळणार! पण त्यानें न डगमगतां उजव्या हातानें आपला पट्टा फिरवित राहून डाव्या हातानें कमरेचा शेला सोडला व तसाच त्या हातावर तो गुंडाळून घेऊन तो लढूं लागला. फिरून दोघांचें कडाक्याचें युद्ध सुरू झालें. कांहीं वेळानें दोघेही एकमेकांचे वार लागून पडले.

जेव्हां तानाजीच्या मृत्यूची बातमी मावळे लोकांत पसरली तेव्हां त्यांचा धीर सुटला व ते ज्या दोरांवरून चढले होते तिकडेच उतरण्याकरितां पळूं लागले. रजपुतांना दुप्पट जोर चढला. मरा-

ठ्यांचा पराभव होण्याची वेळ आली. पण इतक्यांत तानाजीरावांचा भाऊ सूर्याजी कल्याण दरवाज्यानें नुकताच आंत येऊन पश्चिमच्या बाजूला लढत होता, त्यास ही बातमी समजली. तेव्हां त्या पळणाऱ्या लोकांस थांबवून तो वीरश्री चढल्यामुळें मोठ्या आवेशानें म्हणाला, " षंढांनो, धिःकार असो तुम्हांला ! अरे तुमचा सेनापति–तुमचा बाप–मेला असतां तुम्हीं त्याच्याबद्दलचा सूड उगविल्यावांचून असे बायकांसारखे पळून कोठें चाललां ? काय ? तुम्हीं दोरावरून खालीं उतरून जाणार ? मीं ते दोर अगोदरच तोडून टाकिले आहेत. आतां तुम्हीं कड्यावर जाऊन भागूबाईसारखे जीव द्या किंवा मागें उलटून मर्दासारखें या, शत्रूशीं लढा व जय मिळवा. " हें उत्तेजनाचें भाषण ऐकून ते मावळे लज्जेनें परत फिरले आणि जिवावर उदार होऊन लढले. रजपुतांची तारंबळ उडाली. बरेच रजपूत मेले. कांहींनीं कड्यावरून उड्या टाकिल्या व कांहीं शस्त्रें खालीं ठेवून शरण आले. किल्ला फत्ते झाला. पहाटचा सुमार होता. तेव्हां सूर्याजीनें एका गवताच्या गंजीस आग लावण्यास सांगितलें. त्या जाळावरून शिवाजीस किल्ला सर झाला हें समजलें. तेव्हां त्यास अतिशय आनंद झाला व ही बातमी त्यानें जिजाबाईस कळवितांच तिनें तानाजीला फार फार आशीर्वाद दिले. दुसरे दिवशीं सकाळीं शिवाजीकडे किल्ल्यावरची हकीकत विस्तृतपणें कळविण्याकरितां जासूद आला. शिवाजीस किल्ला सर झाल्याची बातमी अगोदरच कळली असल्यामुळें तो आनंदानें जासुदाजवळचें पत्र वाचूं लागला. तानाजीच्या मृत्यूची बातमी पाहिल्याबरोबर कागद हातांतून गळाला व शिवाजी देहभान विसरला. त्याला फार दुःख झालें व तो एक दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाला " गड आला पण सिंह गेला ! " यावरून त्या किल्ल्याचें नाव सिंहगड पडलें.

सांखळदंड बांधून कड्यावर सोडिली, ती पहिल्यानें मागें फिरली पण तानाजीनें दटाविल्याबरोबर पुन्हां वर जाऊन नखें रोंवून बसली. तानाजी वर चढला. मग कांहीं मावळे वर गेले. मेखा ठोकून आणखी दोन चार दोर खालीं लोंबते सोडले. व त्यांवरून पटापट तीनशें मावळे चढून गेले.

इतक्यांत किल्ल्यावरच्या शिबंदीस किल्ल्याच्या पश्चिम बाजूला कांहीं गडबड आहे असें वाटलें. त्यावरून त्यांनीं मशाली पेटविल्या व पाहूं लागले तों त्यांना वर चढून आलेले तीनशें मावळे दिसले. मग ते रजपूत व पठाण शिपाई चाल करून आले. मावळेही सज्जच होते. लागलीच लढाईस सुरवात झाली. मोठें घनचक्कर युद्ध सुरू झालें कांहीं मावळयांनीं जाऊन कल्याण दरवाजा काबीज केला. आणि तेथें ते सूर्याजीरावाची वाट पहात बसले. किल्ल्यांत युद्ध चाललेंच होतें. तो मध्यरात्रीचा समय होता. सिंहगड किल्ल्यावर तलवारींचा खणखणाट चालला होता. असें युद्ध चालू असतां मोंगलांचा मुख्य उदयभानू व तानाजीराव या दोघांचें द्वंद्व युद्ध चालू झालें. दोघेही शूर व कसलेले लढवय्ये, दोघांच्या तलवारी सारख्या चालल्या होत्या, डाव्या हातांतल्या ढालीनें आपल्या शत्रूच्या तलवारीचे वार चुकविण्याची दोघेही शिकस्त करीत होते. थोड्याच वेळांत दोघांना पांच सात वार लागून त्यांच्या अंगांतून रक्ताच्या धारा चालल्या, इतक्यांत उदयभानूचा एक जोराचा वार तानाजीच्या ढालीवर पडून ती तुटली. आतां तानाजीस दुसरी ढाल कोठली मिळणार ! पण त्यानें न डगमगतां उजव्या हातानें आपला पट्टा फिरवित राहून डाव्या हातानें कमरेचा शेला सोडला व तसाच त्या हातावर तो गुंडाळून घेऊन तो लढूं लागला. फिरून दोघांचें कडाक्याचें युद्ध सुरू झालें. कांहीं वेळानें दोघेही एकमेकांचे वार लागून पडले.

जेव्हां तानाजीच्या मृत्यूची बातमी मावळे लोकांत पसरली तेव्हां त्यांचा धीर सुटला व ते ज्या दोरांवरून चढले होते तिकडेच उतरण्याकरितां पळूं लागले. रजपुतांना दुप्पट जोर चढला. मरा-

ऱ्यांचा पराभव होण्याची वेळ आली. पण इतक्यांत तानाजी-रावांचा भाऊ सूर्याजी कल्याण दरवाज्यानें नुकताच आंत येऊन पश्चिमच्या बाजूला लढत होता, त्यास ही बातमी समजली. तेव्हां त्या पळणाऱ्या लोकांस थांबवून तो वीरश्री चढल्यामुळें मोठ्या आवेशानें म्हणाला, “ षंढांनो, धिःकार असो तुम्हांला ! अरे तुमचा सेनापति– तुमचा बाप–मेला असतां तुम्हीं त्याच्याबद्दलचा सूड उगविल्यावांचून असे बायकांसारखे पळून कोठें चाललां ? काय ? तुम्हीं दोरावरून खालीं उतरून जाणार ? मीं ते दोर अगोदरच तोडून टाकिले आहेत. आतां तुम्हीं कड्यावर जाऊन भागूबाईसारखे जीव द्या किंवा मागें उलटून मर्दांसारखें या, शत्रूशीं लढा व जय मिळवा. ” हें उत्तेजनाचें भाषण ऐकून ते मावळे लज्जेनें परत फिरले आणि जिवावर उदार होऊन लढले. रजपुतांची तारंबळ उडाली. बरेच रजपूत मेले. कांहींनीं कड्यावरून उड्या टाकिल्या व कांहीं शस्त्रें खालीं ठेवून शरण आले. किल्ला फत्ते झाला. पहाटचा सुमार होता. तेव्हां सूर्याजीनें एका गवताच्या गंजीस आग लावण्यास सांगितलें. त्या जाळावरून शिवाजीस किल्ला सर झाला हें समजलें. तेव्हां त्यास अतिशय आनंद झाला व ही बातमी त्यानें जिजाबाईस कळवितांच तिनें तानाजीला फार फार आशीर्वाद दिले. दुसरे दिवशीं सकाळीं शिवाजीकडे किल्ल्यावरची हकीकत विस्तृतपणें कळविण्याकरितां जासूद आला. शिवाजीस किल्ला सर झाल्याची बातमी अगोदरच कळली असल्यामुळें तो आनंदानें जासुदाजवळचें पत्र वाचूं लागला. तानाजीच्या मृत्यूची बातमी पाहिल्याबरोबर कागद हातांतून गळाला व शिवाजी देहभान विसरला. त्याला फार दुःख झालें व तो एक दीर्घ सुस्कारा टाकून म्हणाला “ गड आला पण सिंह गेला ! ” यावरून त्या किल्ल्याचें नाव सिंहगड पडलें.

# १७ सालेरचें युद्ध.

## मराठ्यांचा मोंगलांशीं प्रत्यक्ष समरांगणावर झालेला पहिला झगडा.



सिंहगड सर झाल्यावर एक महिन्याच्या अं सूर्याजी मालुसऱ्यानें पुरंदर किल्ला घेतला. मोरोपंत पेशव्यानें सर्व कल्याण प्रांत हस्तगत केला. पावसाळा संपल्यावर शिवाजीनें सुरतेवर हल्ला केला, व तीन दिवसपर्यंत त्या शहरांत खंडणी वसूल केली. यानंतर मोरोपंत पिंगळे बागलाणांत शिरला आणि औंध पट्टा आणि सालेर हे किल्ले त्यानें मोंगलांपासून हां हां म्हणतां सर केले. प्रतापराव गुजरानें फौज घेऊन खानदेशावर चाल केली व त्या मोंगलांच्या परगण्यांतून चौथाई वसूल केली. त्यानें गांवोगांवच्या पाटील कुळकर्ण्यांपासून “ आम्ही मराठ्यांस वसुलाचा चौथा हिस्सा देत जाऊं ” असें लिहून घेतलें; आणि असें ज्यांनीं लिहून दिलें त्यांस, ‘ तुम्हांला मराठ्यांपासून त्रास होणार नाहीं, ’ असें आश्वासन दिलें. येणेंप्रमाणें शिवाजीनें मोंगलांना पूर्वी दिलेले किल्ले परत मिळविले. इतकेंच नव्हे तर मोंगलांच्या प्रत्यक्ष अंमलाखालच्या प्रांतांतून खंडणी वसूल केली. या बातम्या औरंगजेबास जेव्हां समजल्या तेव्हां त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. त्याला शिवाजीचा अत्यंत राग आलाच, पण मुअज्जम व जसवंतसिंग हे शिवाजीस मिळाले असावेत असें त्यास वाटलें. त्यानें जसवंतसिंगास परत येण्याचा हुकूम पाठविला व महाबतखान यास स्वतंत्र अधिकार देऊन दक्षिणेंत पाठविलें. त्याच्या हाताखालीं दिलेर-खानास दिलें. महाबतखानानें आल्याबरोबर औंध व पट्टा हे किल्ले परत मिळविले. इतक्यांत पावसाळा सुरू झाला. पावसाळा संपतांच दिलेरखानानें आपल्या फौजेचे दोन भाग केले व एका भागानें चाकणास वेढा घातला

आणि दुसरी टोळी सालेरीस वेढा देऊन बसली. सालेरीचा किल्ला नाशिक जिल्ह्यांतील बागलाण तालुक्याच्या पश्चिमेस आहे. या वेळेस गुजराथेंत उतरावयाची वाट त्या किल्ल्याजवळून असे. शिवाय तो किल्ला म्हणजे बागलाण प्रांताचें नाक होतें.

तो किल्ला असा महत्त्वाचा असल्यामुळें मोंगलांनीं वेढा दिला असें कळतांच शिवाजीनें प्रतापराव गुजरास व मोरोपंत पिंगळ्यास त्या किल्ल्याच्या मदतीस जाण्याचे हुकूम पाठविले. मराठ्यांची फौज किल्ल्याच्या मदतीस आली असें समजतांच त्यांना मागें हटविण्यास महाबतखानानें इकलासखान नांवाच्या सरदाराबरोबर मोठी फौज देऊन त्यास पाठविलें. मराठ्यांच्या फौजेच्या आघाडीस प्रतापराव गुजर होता. इकलासखानाची फौज अंगावर येतांच प्रतापरावानें आपण भ्यालों असें दाखविलें व मराठ्यांची फौज पळूं लागली. मग मोंगलांस कां बरें आवेश चढणार नाहीं ? हे मरगठे आपल्याला भिऊन पळत आहेत. आतां यांना आपलें शौर्य दाखवावयाची वेळ आहे असा विचार करून तें मोंगल सैन्य मराठ्यांचा पुरा मोड करण्याकरितां त्यांच्या पाठीस लागलें. हा हल्ला भ्यालेल्या शत्रूवर, तेव्हां मोंगलांचे सैनिक स्वच्छंदानें वागूं लागले. पण त्या मोंगलांस मराठ्यांचा गनिमी कावा काय माहीत ? मोंगलांच्या सैन्यांत अव्यवस्था झालेली पहातांच प्रतापरावानें आपल्या फौजेस मोंगलांवर एकदम हल्ला करण्याचा हुकूम केला. या वेळीं मोरोपंताचेंही सैन्य त्या ठिकाणीं येऊन पोंचलें होतें. मराठ्यांनीं उलट खातांच जें कांहीं रणकंदन झालें तें अवर्णनीयच !

धुळीचे लोट असे उडाले कीं पांच मैलांच्या घेरांत आपल्या समोरचा माणूस आपल्याकडचा आहे कीं शत्रूकडचा आहे हें ओळखावयास पंचाईत पडे. रक्ताचे पूर वाहिले. मोंगलांची अगदीं फटफजीती उडाली. त्यांचा पूर्ण पराजय झाला. त्यांचे नामांकित बावीस सरदार पडले व लहान मोठे दहा हजार लोक पडले. पुष्कळ लोक मराठ्यांस पाडाव

सांपडले. शिवाय सव्वाशें हत्ती, सहा हजार उंट, सहा हजार घोडे मराठ्यांस सांपडले. मराठ्यांचा नांव घेण्यासारखा एक पंच हजारी सरदार सूर्यराव काकडे हा पडला. सालेरची लढाई मराठ्यांच्या इतिहासांत फार महत्वाची आहे. मोंगलांशीं समोरा समोर असें हेंच पहिलें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचा जय तर झालाच पण मुख्य गोष्ट ही कीं, मोंगलांना मराठ्यांचा वचक बसला, व मराठ्यांनाही मोंगलाशीं प्रत्यक्ष लढाई देण्याचा प्रसंग आला तरी तें काम आपल्याला सहज करितां येतें, हा आत्मविश्वास आला. सालेरची लढाई झाल्याबरोबर सालेरी किल्ल्याचा वेढा उठवून मोंगल औरंगाबादेस गेले. हें वृत्त औरंगजेबास कळतांच त्यास फार वाईट वाटलें. त्यानें महाबतखानास परत बोलाविलें व त्याच्या जागीं खानजहान बहादुराची नेमणूक केली. खानजहान बहादुरास मराठ्यांशीं युद्ध चालूं ठेवण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत नाहीं असें वाटलें, त्यावरून शिवाजीशीं तह करून भीमेच्या कांठीं पेडगांवास छावणी देऊन तो राहिला.

---

## १८ विजापूरकरांशीं युद्ध.

**( प्रतापराव गुजराचा मृत्यु व हंबीरराव मोहित्याचा उदय. )**

मोंगलांशीं चाललेलें युद्ध संपतें न संपतें तोंच विजापुरचा सुलतान अल्ली अदीलशहा मृत्यु पावला. ( १६७२ डिसेंबर. ) त्याचा मुलगा शिकंदर गादीवर बसला पण तो अगदीं लहान असल्यामुळें सरदार लोकांच्या हातांत सर्व सत्ता गेली. त्या सरदारांचीं परस्पर भांडणें सुरू झालीं व त्या दरबारांत फार घोंटाळा माजला. विजापूरच्या दरबारांत घोंटाळा माजावयाला व शिवाजी मोंगलां-

च्या युद्धांतून मोकळा व्हावयाला एकच गांठ पडली. आतां आपण आपल्या राज्याच्या दक्षिण बाजूकडे लक्ष देऊन त्या बाजूकडे आपलें राज्य वाढविण्याची हीच संधी आहे हें चाणाक्ष व हुशार शिवाजीनें तेव्हांच ताडलें. त्यानें विशाळगडीं मोठ सैन्य जमा केलें. त्या सैन्यांतली एक टोळी पाठवून पन्हाळा किल्ला काबीज केला. दुसरी टोळी जी निघाली ती हां हां म्हणतां हुबळी शहरावर जाऊन आदळली. या टोळीवर मुख्य अण्णाजी दत्तो हा होता. हुबळी ही दक्षिण महाराष्ट्रांतील व्यापारी पेठ होती. तेथें इंग्रज, फेंच, डच इत्यादि परकीय लोकांच्याही वखारी होत्या. त्या गबर शहरांतील सर्व व्यापाऱ्यांपासून मराठ्यांनीं फार मोठी खंडणी घेतली. शिवाजीनें आरमार पाठवून कारवार इत्यादि विजापूरकरांचीं ठाणीं घेतलीं, तिकडल्या देशमुखांना आपल्या ताब्यांत आणलें व मुसलमान ठाणेदारांस हांकून दिलें. ही पश्चिम किनाऱ्यावरची गडबड पाहून बेदनूरचा राजा घाबरला व शिवाजीस खंडणी भरून आपण होऊनच तो त्याचा अंकित बनला. यापुढें ताथोड्यापासून पन्हाळ्यापर्यंतची किल्ल्यांची रांग शिवाजीनें काबीज केली. शिवाजीच्या या कृत्यांची हकीकत जेव्हां विजापुरांत लागोपाठ जाऊन पोहोंचली तेव्हां अव्यवस्थित सरदारांतही ऐक्य उत्पन्न झालें व अबदुल करीम हा मोठें सैन्य घेऊन पन्हाळा प्रांतावर चाल करून आला. इतक्यांत शिवाजीनें प्रतापराव गुजर यास खुद्द विजापूरकडे पाठविलें. तो जाऊन विजापुरजवळच्या मुलुखांत खंडणी घेऊं लागला. हें पाहतांच विजापूरचा कारभारी खवासखान यानें अबदुल करिमास परत येण्याविषयीं हुकूम पाठविला. या हुकुमाप्रमाणें तो विजापुरास परत जाण्याकरितां निघणार तोंच ही बातमी प्रतापरावास समजून तो खानावर चाल करून गेला. उंबराणी येथें दोघांची गांठ पडली. मोठें कडाक्याचें युद्ध झालें. शेवटीं विजापूरकरांच्या सैन्यास प्यावयास पाणीसुद्धां मिळेना. अबदुल करीम अगदीं हताश होऊन प्रतापरावास शरण आला. प्रतापरावासही त्याची

दया आली. त्यानें " मी फिरून शिवाजीमहाराजांच्या मुलखांत येणार नाहीं " असा ठराव करून घेऊन त्यास सोडून दिलें. प्रतापरावानें अबदुल करीमास सोडून दिल्याचा हा वृत्तांत शिवाजीस कळला तेव्हां हें सेनापतीचें कृत्य त्यास मुळींच पसंत पडलें नाहीं व त्याला त्याचा अगदीं राग आला. प्रतापराव त्या मुसलमान सरदाराची गय करण्यांत कसा सपशेल चुकला होता हें थोड्याच दिवसांत स्पष्ट झालें. अबदुल करीम विजापुरास परत गेल्यावर थोड्याच दिवसांनीं सरंजाम घेऊन पन्हाळा प्रांतावर चाल करून आला. शिवाजीनें लागलींच प्रतापरावास हुकूम केला. " तुम्हीं ज्यास सोडून दिलें तो अबदुल करीम फिरून स्वारी करून येत आहे. तुम्ही लष्कर घेऊन त्याचा पराजय करा नाहीं तर मला तोंड दाखवूं नका. " शिवाजीचा हा रागाचा हुकूम पाहून प्रतापरावास अबदुल करीमाची विशेष चीड आली. त्यानें चवताळून विजापूरकरांच्या सैन्यावर एकदम हल्ला केला. पण तो घाईनें केलेला हल्ला बरोबर लागूं झाला नाहीं. त्या दिवशीं प्रतापराव मोठ्या आवेशानें लढला. शेवटीं तो रणांगणीं पडला. तेव्हां मात्र मराठी फौजेचें धैर्य गळून जाऊन ती पळून जाऊं लागली. पण न्यायी परमेश्वरास तें कसें रुचणार ? विश्वासघातकी विजापुरकरास तो कसचा जय मिळवून देतो ? हंसाजी मोहिते नांवाचा एक सरदार पुढें झाला व मराठ्यांच्या फौजेस धीर देऊन त्यानें आपल्या वीरश्रीच्या भाषणानें तिच्या अंगांत आवेश उत्पन्न केला. लागलींच मराठे लोकांस वारश्रा चढला व तिच्या भरांत त्यांनीं शत्रूवर असा निकराचा हल्ला केला कीं, तेणेंकरून शत्रूनें विजापुराकडे पळच काढला. साध्या व्यवहारांत एकदां बिघडलेली घडी फिरून सुरळीत करून देणें मोठें अवघड असतें. मग लढाईची गोष्ट तर काय विचारावी ! एकदां लोक कच खाऊन पळूं लागले असतां फिरून एक करून त्या लोकांकडून अगोदरच शिरजोर झालेल्या शत्रूवर हल्ला करणें हेंच फार अवघड. त्यांतून तो हल्ला यशस्वी करून

पळून जाण्याइतका शत्रूचा पूर्ण पराभव करणें म्हणजे तर जवळ जवळ असंभवनीयच ! ! पण शिवाजीच्या वेळचे मराठे म्हणजे वाघाचे बच्चे होते, त्यांना कांहींच अशक्य वाटत नसे. पहा ! हंसाजी मोहित्यानें पळून चाललेली मराठी फौज एक करून शत्रूवर हल्ला केला व त्यास पळावयास लाविलें कीं नाहीं ! याच लढाईंत धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या तरुण दुकलीनें आपला छोटासा पराक्रम दाखविला. त्यांची हकीकत पुढें येईलच. शिवाजीस या युद्धाचें वृत्त कळतांच प्रतापरावाच्या मरणाबद्दल त्यास फार दुःख झालें. प्रतापराव म्हणजे शिवाजीचा केवळ उजवा हातच होता. त्यानें प्रतापरावाची मुलगी जानकीबाई हिचें राजारामाशीं लग्न करून तिला आपली सून केली. याच लढाईंत हंसाजी मोहित्यानें केलेली कर्तबगारी पाहून शिवाजी त्याच्यावर खुष झाला. त्यानें त्यास हंबीरराव हा किताब दिला व प्रतापरावाची जागा त्यानें जेसरीच्या लढाईंत जशी भरून काढली होती तशीच तो नेहमीं भरून काढील या उमेदीनें हंबीररावास त्यानें सेनापति केलें.

## १९ राज्याभिषेक.



दक्षिणच्या मोंगल सुभेदारानें शिवाजीशीं तह केला व शिवाजीच्या राज्याच्या दक्षिणेकडे विजापुरकरांशीं युद्ध चालून त्यांत त्यांचें सैन्य पळून गेलें. महाराष्ट्रावर अंमल करणारीं दोन्हीं मुसलमानी राज्यें शिवाजीशीं विरोध करण्याचें सोडून देऊन स्वस्थ बसलीं. शिवाजीनें शके १५६८ त तोरणा किल्ला घेतला व स्वराज्याचें तोरण बांधलें. आतां शके १५९६ ( सन १६७४ ) हें वर्ष सुरू झालें होतें. या वेळीं

दया आली. त्यानें " मी फिरून शिवाजीमहाराजांच्या मुलुखांत येणार नाहीं " असा ठराव करून घेऊन त्यास सोडून दिलें. प्रतापरावानें अबदुल करीमास सोडून दिल्याचा हा वृत्तांत शिवाजीस कळला तेव्हां हें सेनापतीचें कृत्य त्यास मुळींच पसंत पडलें नाहीं व त्याला त्याचा अगदीं राग आला. प्रतापराव त्या मुसलमान सरदाराची गय करण्यांत कसा सपशेल चुकला होता हें थोड्याच दिवसांत स्पष्ट झालें. अबदुल करीम विजापुरास परत गेल्यावर थोड्याच दिवसांनीं सरंजाम घेऊन पन्हाळा प्रांतावर चाल करून आला. शिवाजीनें लागलींच प्रतापरावास हुकूम केला. " तुम्हीं ज्यास सोडून दिलें तो अबदुल करीम फिरून स्वारी करून येत आहे. तुम्ही लष्कर घेऊन त्याचा पराजय करा नाहीं तर मला तोंड दाखवूं नका. " शिवाजीचा हा रागाचा हुकूम पाहून प्रतापरावास अबदुल करीमाची विशेष चीड आली. त्यानें चवताळून विजापूरकरांच्या सैन्यावर एकदम हल्ला केला. पण तो घाईनें केलेला हल्ला बरोबर लागूं झाला नाहीं. त्या दिवशीं प्रतापराव मोठ्या आवेशानें लढला. शेवटीं तो रणांगणीं पडला. तेव्हां मात्र मराठी फौजेचें धैर्य गळून जाऊन ती पळून जाऊं लागली. पण न्यायी परमेश्वरास तें कसें रुचणार ? विश्वासघातकी विजापुरकरास तो कसचा जय मिळवून देतो ? हंसाजी मोहिते नांवाचा एक सरदार पुढें झाला व मराठ्यांच्या फौजेस धीर देऊन त्यानें आपल्या वीरश्रीच्या भाषणानें तिच्या अंगांत आवेश उत्पन्न केला. लागलींच मराठे लोकांस वारश्रा चढला व तिच्या भरांत त्यांनीं शत्रूवर असा निकराचा हल्ला केला कीं, तेणेंकरून शत्रूनें विजापुराकडे पळच काढला. साध्या व्यवहारांत एकदां बिघडलेली घडी फिरून सुरळीत करून देणें मोठें अवघड असतें. मग लढाईची गोष्ट तर काय विचारावी ! एकदां लोक कच खाऊन पळूं लागले असतां फिरून एक करून त्या लोकांकडून अगोदरच शिरजोर झालेल्या शत्रूवर हल्ला करणें हेंच फार अवघड. त्यांतून तो हल्ला यशस्वी करून

पळून जाण्याइतका शत्रूचा पूर्ण पराभव करणें म्हणजे तर जवळ जवळ असंभवनीयच !! पण शिवाजीच्या वेळचे मराठे म्हणजे वाघाचे बच्चे होते, त्यांना कांहींच अशक्य वाटत नसे. पहा ! हंसाजी मोहित्यानें पळून चाललेली मराठी फौज एक करून शत्रूवर हल्ला केला व त्यास पळावयास लाविलें कीं नाहीं ! याच लढाईत धनाजी जाधव आणि संताजी घोरपडे या तरुण दुकलीनें आपला छोटासा पराक्रम दाखविला. त्यांची हकीकत पुढें येईलच. शिवाजीस या युद्धाचें वृत्त कळतांच प्रतापरावाच्या मरणाबद्दल त्यास फार दुःख झालें. प्रतापराव म्हणजे शिवाजीचा केवळ उजवा हातच होता. त्यानें प्रतापरावाची मुलगी जानकीबाई हिचें राजारामाशीं लग्न करून तिला आपली सून केली. याच लढाईत हंसाजी मोहित्यानें केलेली कर्तबगारी पाहून शिवाजी त्याच्यावर खुष झाला. त्यानें त्यास हंबीरराव हा किताब दिला व प्रतापरावाची जागा त्यानें जेसरीच्या लढाईत जशी भरून काढली होती तशीच तो नेहमीं भरून काढील या उमेदीनें हंबीररावास त्यानें सेनापति केलें.

---

## १९ राज्याभिषेक.



दक्षिणच्या मोंगल सुभेदारानें शिवाजीशीं तह केला व शिवाजीच्या राज्याच्या दक्षिणेकडे विजापुरकरांशीं युद्ध चालून त्यांत त्यांचें सैन्य पळून गेलें. महाराष्ट्रावर अंमल करणारीं दोन्हीं मुसलमानी राज्यें शिवाजीशीं विरोध करण्याचें सोडून देऊन स्वस्थ बसलीं. शिवाजीनें शके १५६८ त तोरणा किल्ला घेतला व स्वराज्याचें तोरण बांधलें. आतां शके १५९६ ( सन १६७४ ) हें वर्ष सुरू झालें होतें. या वेळीं

शिवाजीचें राज्य उत्तरेस तापीपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंतच्या प्रदेशावर पसरलें होतें. त्यांत रायगड, पन्हाळा, सिंहगड यांसारखे शेंकडों किल्ले होते. सुरतेपासून कारवारापर्यंत कोंकणपट्टी त्याच्या ताब्यांत होती. तिच्या रक्षणार्थ विजयदुर्ग, सिंधुदुर्ग वगैरे बळकट जंजिरे होते. या कोंकणपट्टींत पोर्तुगीज, इंग्रज, हबशी, वाडीकर सावंत यांचा कांहीं मुलूख होता. पण शिवाजीचा त्या सर्वांना चांगला वचक होता. १५६८ त स्वराज्याचें तोरण बांधल्यावर जो अठ्ठावीस वर्षांचा काळ गेला त्यांत शिवाजीनें स्वराज्याची ही भव्य इमारत उठवून दिली होती.

शिवाजीनें एवढा मोठा मुलूख काबीज केला खरा, पण सर्व लोकांस हें स्वराज्य स्थापन झालें आहे व शिवाजी हे आपले हिंदुराजे आहेत, ही कल्पना जितकी स्पष्ट यावयास पाहिजे तितकी आली नाहीं. शिवाजीच्या अंगांत कर्तबगारी आहे तेव्हां तो पुष्कळ मुलूख मिळवीत आहे, अशी लोकांची समजूत होई. शिवाजी व त्याचे अनुयायी मात्र पहिल्यापासून आपण काय करीत आहों हें पक्कें जाणून होते. आपल्या देशांत हिंदु स्वराज्य स्थापावयाचें याच उद्देशानें त्यांनीं आपल्या कामास सुरुवात केली होती व आतां त्यांच्या संकल्पाप्रमाणें बराच मोठा मुलूख त्यांच्या ताब्यांत आला होता. हा मिळविलेला मुलूख आपलें स्वराज्य, व आपले राजे छत्रपति शिवाजीमहाराज होत, हें आतां प्रसिद्धपणानें लोकांस कळविण्याचा योग्य समय आला होता. हें कसें कळवावयाचें ? यास मार्ग म्हणजे शिवाजीनें आपल्या हिंदुधर्मांत सांगितल्याप्रमाणें छत्रचामरें धारण करावयाचीं व मोठ्या समारंभानें राज्याभिषेक करून घ्यावयाचा.

राज्याभिषेक करून घेण्याचें शिवाजीच्या मनांत आलें त्यास आणखीही कारणें होतीं. जाधव, घाटगे, माने, निंबाळकर, घोरपडे इत्यादि जुन्या प्रसिद्ध मराठा घराण्यांतील सरदार शिवाजीशीं सारख्या दर्जाच्या माणसाप्रमाणें वागत. शिवाजीनें राज्य मिळविलें होतें व हे सरदार खरें

म्हटलें तर त्याच्या नोकरींत असत. पण त्यांना आपले पूर्वज भोंसल्यांच्या बरोबरीचे किंबहुना त्यांहून वरचढ असें वाटत असल्यामुळें ते शिवाजीशीं वागतांना तो मागला डौल आणीत. शिवाजीनें विजापुरकरांपासून मुलूख मिळविला होता व दिल्लीच्या बादशहापासूनही मिळविला होता. दोन्ही बादशहांचा रोंख निदान दरबारी भाषेंत व्यवहार करतांना शिवाजी हा आपला एक सरदार आहे असें मानण्याचा असे. शिवाजी हा एक स्वतंत्र असा निराळा राजा आहे व त्याशीं त्या नात्यानें आपण लढाई किंवा तह करीत आहोंत असें, विजापूरचा सुलतान किंवा दिल्लीचा बादशहा यांपैकीं कोणीच म्हणत नसत. यामुळें राज्याभिषेकसमारंभ करून आपलें राज्य स्वतंत्र आहे व आपण स्वतंत्र निराळे राजे आहोंत हें सिद्ध करणें भाग पडलें.

शिवाजी आणि त्याचे कारभारी या सर्व जणांच्या मनांत अलीकडे हा राज्याभिषेकाचा विषय सारखा घोळत होता. एके दिवशीं शिवाजीनें कारभारी मंडळींना जमवून राज्याभिषेकाचा प्रश्न काढला. सर्वांच्या मनांत घोळत होतेंच. लागलींच सर्व कारभाऱ्यांनीं ही गोष्ट अवश्य आहे व हें लवकरच झालें पाहिजे असा सल्ला दिला. राज्याभिषेक करण्याचा निश्चय ठरला. या समारंभास विद्वान् ब्राह्मणांची जरूरी होती. गागाभट्ट नांवाचे एक विद्वान् पंडित काशीक्षेत्राहून पैठणास आले होते. त्यांनाच राज्याभिषेकाकरितां आणण्याचें ठरलें. बाळाजी आवजी चिटणीस यानें आपलीं कांहीं माणसें पाठवून मोठा सत्कार करून त्या पंडितांस आणलें. त्यांस आणल्यावर राजधानी कोणती करावी हा प्रश्न निघाला. शत्रूस दुःसाध्य ठिकाण असावें म्हणून रायगड हीच राजधानी ठरली. राज्याभिषेकास मुहूर्त ज्येष्ठ शु॥ १३ शके १५९६ हा ठरला. शिवाजीचा व्रतबंध अजून झाला नव्हताच. तो ज्येष्ठ शु॥ ४ थी या दिवशीं उरकून घेण्याचें ठरलें. अशा रीतीनें राज्याभिषेकासंबंधीं मुख्य गोष्टी निश्चित झाल्यावर रायगडास त्या समारंभाची जंगी तयारी सुरू झाली. समारंभा-

करितां आपल्या राज्यांतील जे लोक यावयाचे त्यांस व परकीय राजांस आमंत्रणें गेलीं. समारंभाच्या वेळची व्यवस्था ठेवण्याविषयीं सर्व नियम झाले. पुण्यनद्यांचीं उदकें आणविलीं.

समारंभाचे दिवस जवळ आले, तशीं लाखों माणसें जमलीं. ज्येष्ठ शु॥ ४ थीच्या दिवशीं व्रतबंध झाला. मग त्रयोदशीपर्यंत निरनिराळे धार्मिक संस्कार चालले होते. एकदांचा त्रयोदशीचा दिवस उगवला. त्या दिवशीं लोकांत जिकडे तिकडे आनंदी आनंद दिसत होता. रायगडावर गडबड उडून गेली होती. सर्व सकाळच्या प्रहरींच मंगल स्नान करून उंची पोषाख घालून सभामंडपांत दाखल झाले. प्रात:काळीं शिवाजी स्त्रीपुत्रांसह मंगल स्नान करून आसनावर विराजमान झाला. अष्टप्रधानही भोंवतीं अष्टदिशांस उभे राहिले. त्यांभोंवतालून कोश वगैरेवरचे अधिकारी उभे राहिले. मांडलिक राजेही भोंवतीं उभे राहिले. मध्यें वैदिक ब्राह्मण महानद्यांचें व समुद्राचें उदक घेऊन उभे होते. त्यांनीं मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. व आम्रपत्रांनीं उदक घेऊन भोंवतालच्या राजपुरुषांवर ते अभिषेक करूं लागले. त्या वेळीं मंगल वाद्यें वाजूं लागलीं. तो शब्द आकाशांत मावेना. अभिषेकाचें काम आटपल्यावर शिवाजी सिंहासनावर आरूढ झाला. त्या वेळेस तर मंगल वाद्यांचा कडाकाच उडाला. पूर्वींच ठरविल्याप्रमाणें निरनिराळ्या किल्ल्यांवरून तोफांची सरबत्ती झाली. मग शिवाजीनें तांबडीं वस्त्रें परिधान केलीं. अंगावर चौकडे, कंठ्या, शिरपेंच इत्यादि अलंकार घातले. मंत्रविधि झाले. ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले. ब्राह्मणांस दक्षिणा वांटल्या. गागाभट्टजींची पांच लक्ष रुपये देऊन संभावना केली. प्रधान, सरदार वगैरे सर्व अधिकाऱ्यांस ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें पोषाख अलंकार दिले. हा सिंहासनावर विराजमान होण्याचा समारंभ संपल्यावर एक मोठ्या थाटाची मिरवणूक निघाली. शिवाजी उंची वस्त्रें व अलंकार घालून एका सजविलेल्या हत्तीवर आरूढ झाला. मग गडावरच्या मुख्य रस्त्यांनीं

मिरवित मिरवित ती मिरवणूक राजवाड्यांत येऊन पोंचली. मेजवान्या कित्येक दिवसपर्यंत सारख्या चालल्याच होत्या. मिरवणुकीनंतर समारंभ संपला. शिवाजीनें ज्येष्ठ शु॥ १३ शके १५९६ पासून नवीन 'राज्याभिषेक शक' सुरू केला. मराठ्यांच्या इतिहासांत सर्व राजकीय व्यवहारांत याच शकाचा उपयोग करीत. शिवाजीनें आपली सुवर्णतुला केली. त्याचें वजन १६००० होन भरलें. ते होन ब्राह्मणांस दक्षिणा म्हणून वांटण्यांत आले.

याच वेळीं शिवाजीनें अष्टप्रधानांचीं फारसी नांवें बदलून संस्कृत नांवें ठेविलीं, आणि त्यांचीं कामें कायम केलीं. १ शिवाजीच्या प्रधानांत त्याचा **मुख्य प्रधान** हा श्रेष्ठ असे. हा राजाच्या हाताखालचा असून सर्व लष्करी व मुलकी कामावर त्याची देखरेख असे. शिवाजीचा हल्लींचा मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हा होता. २ **सेनापतीकडे** सर्व लष्कराचा आधिकार होता. सेनापतीच्या जागेवर हंबीरराव मोहितें होता. ३ **अमात्याची** सर्व वसुलावर देखरेख असे. अमात्याच्या हुद्यावर रामचंद्र निळकंठ बहुतकर होता. ४ **सचिवाकडे** सर्व राज्यांतील दप्तरांच्या सांभाळाचें काम होतें. ही जागा अण्णाजी दत्तोकडे होती. ५ **सुमंताकडे** परकीय राजांशीं कोणताही व्यवहार करण्याचें काम असे. या कामावर जनार्दनपंत हणमंते होता. ६ मंत्री हा राजाचा खाजगी कारभार पाही. या जागेवर दत्ताजीपंत होता. ७ **न्यायाधीश** राज्यांतील न्यायाचीं कामें पाही. या जाग्यावर बाळाजीपंत हा होता. ९ **पंडितराव** हा धार्मिक भानगडी राज्यांत उपस्थित झाल्या तर त्यांची निरवानिरव करी. राज्याभिषेकाच्या वेळीं रघुनाथपंत पंडितराव होता. ही अष्टप्रधानांची व्यवस्था शिवाजीच्या राज्यव्यवस्थेच्या मुळाशीं आहे, म्हणून मागें म्हटलें आहे. शिवाजीनें आपल्या राज्यकारभारांत निरनिराळीं खातीं उत्पन्न केलीं व एकेका खात्यावर एकेका प्रधानाची स्वतंत्र नेमणूक केली.

[library stamp]

उदाहरणार्थ धर्मखातें, न्यायखातें, वसूल खातें, लष्कर खातें, इत्यादि सर्व खात्यांचा नीट बंदोबस्त झाला म्हणजे सर्व राज्याची व्यवस्था लागली हें सहज समजण्यासारखें आहे.

## २० दक्षिणदिग्विजय.



कर्नाटकांत तंजावरकडे शहाजीची जहागीर होती. तिचा उपभोग शिवाजीचा सावत्र भाऊ व्यंकोजी घेत होता. व्यंकोजीच्या अंगांत पराक्रम व कर्तबगारी फारशी नव्हती. त्याचा कारभारी रघुनाथराव नारायण हणमंते हा होता. तो शहाजीपासून दिवाणगिरीच्या कामावर असे. तो मोठा पाणीदार व महत्वाकांक्षी होता. पण व्यंकोजीच्या भित्र्या स्वभावामुळें त्याला कांहींच मोठी कामागिरी करून दाखवितां येईना. शेवटीं एके दिवशीं कंटाळून रघुनाथपंत व्यंकोजीस खोंचून बोलला. व्यंकोजीला त्याचें भाषण सहन झालें नाहीं. " तुम्ही चाकर, सांगूं तितकें काम करून असावें. " येवढेंच त्यानें रागारागानें उत्तर दिलें. व्यंकोजीचें उत्तर ऐकतांच " तुमच्या मांडीस मांडी लावून बसेन तरच नांवाचा रघुनाथ. " असें कांपऱ्या आवाजांत बोलून तो तापट रघुनाथपंत तेथून चालता झाला.

व्यंकोजीशीं भांडण होऊन बाहेर पडण्यापूर्वींच रघुनाथपंताच्या मनांत शिवाजीकडे जाण्याचें आलें होतें. बरोबरच आहे. कर्तृत्ववान् मनुष्यास माशा मारीत स्वस्थ बसणें कसें आवडणार ? आपल्या स्वतःचें कर्तृत्व जेथें दाखवितां येईल त्या ठिकाणीं जाण्याची त्याला उत्कंठा असणें अगदीं साहजिक आहे. शिवाजी पराक्रमी, हुशार व मोठा कर्तबगार आहे हें ध्यानांत आल्यापासून रघुनाथपंताला त्याच्याकडे जावें

असें वाटत असे. व्यंकोजीशीं झालेल्या भांडणाची संधि साधून त्यानें हा बेत कायम केला. पण शिवाजीकडे नुसते हात हालवीत जाऊन काय करावयाचें ? कांहीं तरी मोठी कामगिरी घेऊन जाऊं असा पंतानें मनांत विचार केला. तो हैद्राबादेस गेला. तेथें गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीचा दिवाण मादण्णापंत यास भेटला. मादण्णानें त्याच्या एकंदर बोलण्यावरून हा मोठा हुशार आहे असें सहज ।डलें. " शिवाजीशीं सख्य करून देतों " असें रघुनाथपंत म्हणाला हो ।ा, त्यावरून तर मादण्णास विशेष समाधान झालें. त्यानें पंताचा सत्कार करून शिवाजीस देण्याकरितां बादशहाकडून त्याच्याबरोबर पत्रें दिलीं. पंतानें तीं पत्रें घेतलीं व शिवाजीस जाऊन भेटला. पंताच्या भेटीकरितां शिवाजी सामोरा आला होता. त्यानें तीं कुतुबशहाचीं पत्रें पाहून व कर्नाटकांत मोठा मुलुख जिंकितां येईल अशा अर्थाचीं भाषणें ऐकून दक्षिण-दिग्विजयास निघण्याचें ठरविलें. निघण्यापूर्वीं रामचंद्रपंत अमात्याच्या जागेवर होता, त्यास दूर करून रघुनाथपंतास तें पद दिलें. शके १५९७ (इ. स. १६७६) सरतां सरतां शिवाजी पाऊणलाख फौज घेऊन कर्नाटकच्या मोहिमेवर निघाला. राज्याच्या बंदोबस्ताकरितां मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो हे दोघे हुशार कारभारी मागें ठेविले. पहिल्यानें हैद्राबादेस जाण्याचें ठरलें. कुतुबशहाच्या राज्यांतून चालत असतां लष्कर फारच बंदोबस्तानें चालत होतें. प्रजेस काडीइतकाही त्रास न देतां दाणा, वैरण, लांकूड इत्यादि लागणारें सर्व सामान विकत घेण्यांत येत होतें. हैद्राबादेस पोंचतांच कुतुबशहानें शिवाजीचा मोठा सन्मान केला. त्या शहरीं शिवाजीचा मुक्काम महिनाभर होता. कुतुबशहा लष्कर पाहण्यास येत असे. एके दिवशीं कुतुबशहा म्हणाला, माझ्या " हत्तीबरोबर झुंजेल असा कोणी माणूस तुमच्या लष्करांत आहे काय ? " " हत्तीबरोबर झुंजणें कठीण. पण त्यांतून पहावें काय होतें तें, हत्ती तर सोडा " असें शिवाजीनें उत्तर केलें. मग पादशहाचा सर्वांत मस्त हत्ती सोडला.

त्याबरोबर शिवाजीनें एसाजी काळे यास खुणेनें उठण्यास सांगितलें. एसाजी काळे पुढें झाला. त्याजवर हत्तीनें चालविलेल्या दोन तीन झटापटी होतांच हत्तीची सोंड तुटून तो परत फिरला. हें पाहून सर्वांस व विशेषतः कुतुबशहास आश्चर्य वाटलें. तो अगदीं खुष झाला, काळ्यांस त्यानें मोठें बक्षीस दिलें. एके प्रसंगीं बाळाजी आवजीची हुशारी व स्वामिनिष्ठा पाहून कुतुबशहानें आम्हांस तुमचा हा चिटणीस द्या म्हणून म्हटलें. शिवाजीनें उत्तर केलें " एक एक माणूस मिळवून माळेस मणी लाविले आहेत, ते माळेचे मणी कसे काढतां येतील ? "

कुतुबशहाशीं स्नेह दृढ करून शिवाजी हैद्राबादेहून कर्नाटकाकडे जाण्यास निघाला. निवृत्तिसंगमावर तो स्नान करून, सडा होऊन श्रीशैलाचें रम्य स्थान पाहण्यास गेला. फौज तुंगभद्रा उतरून त्या प्रांतांतील किल्ले घेण्यास पुढें पाठविली. श्रीशैलाचें दर्शन होतांच शिवाजीस राज्य सोडून अशा एखाद्या देवस्थानीं रहावें अशी उत्कट इच्छा झाली पण खोल विचाराअंतीं त्यानें तो बेत रहित केला. मग तुंगभद्रा उतरून शिवाजी कांहीं फौज घेऊन थेट मद्रासेकडे गेला. त्या प्रांतांतील सर्व किल्ले काबीज केले. विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा किल्ला म्हणजे जिंजीचा होय. याच किल्ल्याचा राजारामाच्या वेळेस अत्यंत उपयोग झाला.

व्यंकोजीच्या स्वभावासंबंधानें मागें थोडें सांगितलेंच आहे. व्यंकोजी शिवाजीचा भाऊ खरा, पण त्याला स्वराज्याची कल्पना नव्हती. त्याला विजापूरकर आदिलशहा हेच काय ते राजे असें वाटून त्यांच्या हाताखालीं सरदारी करणें हें मोठें भूषण, असें तो समजत असे. रघुनाथपंतानें व्यंकोजीच्या डोक्यांतील या अपवित्र कल्पनांचा शिवाजीपुढें पाढा वाचला. तेव्हां त्या स्वराज्यभक्त शिवाजीस अत्यंत खेद झाला. त्यानें आपल्या भावाच्या समजुतींत योग्य पालट केला पाहिजे, याकरितां अर्धा वांटा घेण्याच्या मिषानें कर्नाटकची मोहीम काढिली. त्रिवादी येथें दोघां भावांची भेट झाली, तेव्हां शिवाजीनें वडि-

लोपार्जित जिंदगीचा अर्धा वांटा मागितला. हें मागणें व्यंकोजीस रुचेना. तो कांहींच बोलला नाहीं. दोन अडीच महिने दोघे भाऊ एके ठिकाणीं होते. शेवटीं शिवाजीनें कंटाळून व्यंकोजीस निरोप दिला. व्यंकोजी तंजावरास गेल्यावर फिरून शिवाजीनें वकील पाठवून दौलतीचा वांटा मागितला. यावर आविचारी व्यंकोजीनें शिवाजीस लिहिलें. "वडील असतां तुम्हीं बादशहापाशीं बंडपणा केला. त्यामुळें वडिलांस इजा झाली. आम्ही शहाचे चाकर. यांत तुमचा संबंध नाहीं." इतकें भावास लिहून तो थांबला नाहीं. त्यानें विजापूरकरांस "तूं व्यंकोजीपाशीं वांटा मागूं नको" अशी ताकीद शिवाजीस पोंचवा असें लिहिलें. पण शिवाजीचें सामर्थ्य विजापूरकरांस माहीत असल्यामुळें शिवाजीस अर्ध वांटा द्यावा, असाच त्यांनीं उलट व्यंकोजीस हुकूम केला. यापुढें कांहीं मुसलमानांनीं शिवाजीशीं युद्ध करण्याची व्यंकोजीस भर दिली. त्याचें सैन्य व शिवाजीनें कर्नाटकांत ठेविलेलें सैन्य यांचें युद्ध झालें. त्यांत व्यंकोजीचा सपशेल पराभव झाला. या लढाईचें वर्तमान ऐकून शिवाजीस वाईट वाटलें. त्यानें व्यंकोजीस तंटा वाढविण्याची बुद्धि झाली याबद्दल खेद व्यक्त करून आतां तरी लवकर तह करा म्हणून एक पत्र[1] लिहिलें. तुम्हांस कबूल असेल तर पन्हाळा प्रांतांत तीन लक्षांची जहागीर देतों, कर्नाटकांतला मुलूख सोडा असें त्यांत लिहिलें होतें. पुढें त्याप्रमाणें झालें नाहीं. व्यंकोजी तंजावरास कायम राहिला. पण यावरून शिवाजीची कर्नाटकावरील स्वारी केवळ स्वराज्याच्या विस्ताराकरितां होती हें उघड दिसतें.

शिवाजीनें पूर्व कर्नाटकांत–मद्रासेकडे–राज्य जिंकिलें त्याच्या बंदोबस्तास रघुनाथपंत हणमंते यास ठेविलें. प्रांतांत पूर्ण व्यवस्था लागेपर्यंत त्याच्या मदतीस सेनापति हंबीरराव मोहिते यास ठेविलें. मग शिवाजी पश्चिम कर्नाटकांत आला. तेथें बंगलूर, कोलार, हुस्कोटें, शिरे इत्यादि परगणे त्यानें काबीज केले. हे प्रांत हल्लींच्या म्हैसूरच्या राज्यांत आहेत.

१ मराठी रिसायत पृष्ठ २१४.

मग तुंगभद्रेच्या उत्तरतीरीं येऊन त्या प्रांतांत खंडणी घेतली. परत येत असतां औरंगजेबानें आपल्या पारिपत्याची जय्यत तयारी केली आहे, असें शिवाजीनें ऐकिलें म्हणून तो फारच जलद परत आला. मोहिमेस निघाल्यापासून सुमारें १८ महिन्यांनीं रायगडास पोहोंचला. शिवाजीनें कर्नाटकांतील जिंकलेल्या मुलुखाच्या व्यवस्थेस ठेवलेल्या सैन्यास विजापूरकरांच्या फौजेशीं बरेंच झगडावें लागलें. तुंगभद्रा व कृष्णा या दोन नद्यांमधील मुलुखास दुआब म्हणतात. या दुआबांत विजापूरकरांचा युसफखान मायणा या नांवाचा अंमलदार होता. तो हंबीररावावर चालून आला. पण हंबीरराव अशा निकरानें लढला कीं, त्यानें विजापूरकराच्या सैन्याची रेवडी उडविली. खुद्द मायणा कैद झाला. ही बातमी विजापूरकरांस कळतांच दरबारांत अगदीं हलकल्लोळ उडून गेला. मायणास सोडविण्याकरितां एका मोठ्या सैन्याची रवानगी झाली. हें सैन्य आलें तेव्हां हंबीरराव सावधच होता. शिवाय त्याच्या मदतीस धनाजी जाधव येऊन पोहोंचला, मग काय ! त्या दोघांनीं त्या सैन्यास विजापूरपर्यंत पिटाळून लाविलें. हें युद्ध झाल्यावर धनाजी जाधव शिवाजीस भेटण्याकरितां रायगडास आला. शिवाजीनें लढाईचें वृत्त ऐकिलें तेव्हां तो धनाजीस म्हणाला, " तुमच्या सारखीं माणसें प्रतिसृष्टी निर्माण करितील. आमच्या साह्यास देवलोकाहून मनुष्यरूप घेऊन निर्माण झालां असें वाटतें. पंचवीसतीस हजार माणसांशीं पांच सहा हजार असून तुम्हीं झुंज घेतलें आणि त्यांस पिटाळलें ना ! शाबास धनाजीराव ! शाबास हंबीरराव ! "

# २१ विजापूरकरांस साहाय्य.



शिवाजीनें कर्नाटक प्रांतीं स्वारीवर जातांना गोवळकोंडेकरांशीं सख्य केलें होतें. हें विजापूरचा कारभारी अबदुल करीम यास रुचलें नाहीं. त्याला गोवळकोंडेकरांचा राग आला. औरंगजेबाचा दक्षिणचा सुभेदार दिलेरखान तर दक्षिणेंतील या दोन्ही पादशहांस निःसत्व करण्यास बसला होता. त्यानें विजापूरकराशीं ऐक्य करून गोवळकोंड्यावर स्वारी केली. पण मादण्णापंतानें मोठी मेहनत घेऊन सैन्य जमविलें असल्यामुळें विजापूरकर व मोंगल यांचा पराभव झाला. लौकरच अबदुल करीम वारला. त्याच्या जागीं मसाऊदखान सिद्दी हा कारभारी झाला. दिलेरखानाच्या गोवळकोंड्याच्या स्वारीची हकीकत ऐकून औरंगजेबास मुळींच बरें वाटलें नाहीं. त्यानें दिलेरखानास विजापुरावर एकदम स्वारी करण्याविषयीं हुकूम केला. या हुकुमाप्रमाणें दिलेरखानानें विजापुरावर चालून जाऊन त्या शहरास वेढा घातला. या मोंगलांच्या वेढ्यानें मसाऊद्खान अगदीं हताश होऊन गेला. आतां काय करावें ? मोंगलापासून आपलें रक्षण कोण करील ? याचा तो विचार करूं लागला. शेवटीं शिवाजीस विनंति करून पहावी, त्यानें आपलें रक्षण केलें तर बरेंच झालें, असा विचार मसाऊदच्या मनांत आला. लागलींच त्यानें मिनतवारीचें एक पत्र शिवाजीस पाठविलें. शिवाजीस पत्र पोहोंचतांच विजापूरकरांचें साहाय्य करण्याचें त्यानें मोठ्या खुषीनें ठरविलें. विजापुरास दिलेरखानानें घातलेला वेढा उठविणें हेंच शिवाजीचें मुख्य काम होतें. तो उठविण्यास गनिमी काव्याचा उपयोग करण्याचा शिवाजीनें निश्चय केला. तो घोडेस्वार घेऊन निघाला तो तडक गोदावरी उतरून जालना शहरास आला. सुलतान

मुअज्जम औरंगाबादेस होता तरी त्याची फारशी फिकीर न करितां त्यानें तीन दिवसपर्यंत जालन्याचा खंड वसूल केला. हें सर्व करण्यामध्यें त्याचा असा हेतु होता कीं, आपला प्रांत उध्वस्त होत आहे या भीतीनें दिलेरखान वेढा उठवून परत येईल व विजापुरावरचें संकट टळेल. त्यानें त्या मोंगलांच्या परगण्यांत धुमाकूळ मांडला. पण दिलेरखान वेढा उठवीना. दिलेरखानाचें कोणतेंच कृत्य औरंगजेबास पसंत पडत नव्हतें. तेव्हां त्यानें या वेळीं हुकुमाप्रमाणें विजापूर काबीज करण्याचा निश्चय केला होता. शिवाजीवर मुअज्जमानें रणमस्तखानास दहा हजार फौज देऊन पाठविलें. तो पाठलाग करीत आला. त्यानें शिवाजीस संगमनेरास गांठिलें. तेथें मोठी निकराची लढाई झाली. तींत पहिल्यानें मराठ्यांचा पराजय होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. सिधोजी निंबाळकर पडला. संताजी घोरपडे कच खाऊन मागें फिरला. तेव्हां स्वतः शिवाजीनें सैन्यास उत्तेजन देऊन मोंगलांवर निकराचा हल्ला केला. त्याबरोबर मोंगलांची तारांबळ उडून ते पळून गेले.

शिवाजी रायगडास पोंचतांच विजापुराहून अगदीं काकुळतीचा निरोप आला कीं "लवकर येऊन आदिलशाहीचें रक्षण करा." शिवाजी सैन्य घेऊन थेट विजापुरास जाण्यास निघाला. वाटेंत त्याचा थोरला मुलगा संभाजी फितूर होऊन मोंगलांस मिळाल्याची हकीकत समजली. ती बातमी ऐकून शिवाजीस किती दुःख झालें म्हणून सांगावें ! हंबीररावास विजापुरास जाण्याचें काम सांगून मोठ्या कष्टानें तो संभाजीची व्यवस्था लावण्यास मागें फिरला.

संभाजी हा शिवाजीचा वडील मुलगा. लहानपणापासून त्याचें शौर्य दिसूं लागलें होतें. पण दुर्दैवानें त्याच्या अंगांत व्रात्यपणाही शिरला होता. कांहीं वाईट वर्तन केल्यामुळें शिवाजीनें त्यास पन्हाळ्यास बंदोबस्तानें ठेविला होता. तेथून तो निसटला व दिलेरखानास जाऊन मिळाला. संभाजी आपल्याकडे आल्याचें पाहून खानास मोठा

हर्ष झाला व त्यानें मोठ्या घाईनें ती बातमी औरंगजेबास कळविली व संभाजीस हातीं धरून मराठ्यांचा निःपात सहज करितां येईल असें सुचविलें. औरंगजेबास ही सूचना मुळींच पसंत पडली नाहीं. त्यानें संभाजीस कैद करून दिल्लीस पाठवून देण्याचा दिलेरखानास हुकूम पाठविला. दिलेरखानानें संभाजीचा फार मान केला होता. त्याला संभाजीचा विश्वासघात करणें बरें वाटलें नाहीं. संभाजीची समजूत करण्यास शिवाजीकडून माणसें आलीं होतींच. त्यांजबरोबर त्यानें संभाजीस परत पाठवून दिलें.

औरंगजेबाचा आपल्यास कैदेंत घालण्याचा बेत पाहून संभाजीच्या लक्षांत आपली चूक आली होतीच. म्हणून मोंगलांकडे गेल्याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला होताच. तेव्हां शिवाजीनें त्याचें मन न दुख-वितां सुधारेपर्यंत त्यास पन्हाळ्यास ठेविलें. त्याच्यावर देखरेखीकरितां हिरोजी फर्जंद व आणखी कांहीं मंडळी होती.

विजापुराकडे हंबीरराव गेला होता. त्यानें दिलेरखानाच्या सैन्यास दाणा-वैरण मिळूं न देण्याचा अटोकाट प्रयत्न चालविला. शिवाय मराठे मदतीस आले त्यामुळें मसाउदखानास शहरचें रक्षण करण्यास विशेष नेट आला. शेवटीं दिलेरखान अगदीं कंटाळून गेला. त्याला विजापूर हस्तगत होणें हें अशक्य वाटलें. याच वेळीं मोरोपंत पेशव्यानें औंध व नाहागड हे किल्ले घेऊन आपलें सैन्य सर्व खानदेशभर पसरविलें होतें. त्यामुळें दिलेरखान वेढा उठवून परत गेला व विजापूरकरांस शिवाजीनें मदत केली म्हणूनच त्या शहराचा बचाव झाला आणि आदि-लशाही आणखी कांहीं वर्षें जगली. मसाऊदखानही हे शिवाजीचे उपकार जाणून होता. त्याची व शिवाजीची विजापुराजवळ भेट झाली. तींत त्यानें मराठ्यांस कर्नाटकांत शिवाजीनें जिंकलेला सर्व मुलूख देऊन शहाजीच्या जहागिरीचा मुलूख शिवाजीस दिला व त्यावरचे सर्व हक्क सोडले.

विजापूरकरांस सहाय्य करणें हेंच शिवाजीच्या आयुष्यांतील त्याचें शेवटचें मोठें कृत्य होय. यापुढें तो फार दिवस वांचला नाहीं. शके १६०२ (इ. स. १६८०) च्या आरंभास त्याला गुढगा रोग झाला. त्यांतच त्याला ताप येऊन तो आल्यापासून सातवे दिवशीं (चैत्र शु॥ १५) रायगडावर त्याचें देहावसान झालें. जिजाबाई त्याच्या अगोदर कांहीं महिने वारली होती. शिवाजीचें मृत्युसमयीं वय अवघें ५३ वर्षांचें होतें. त्याला दुर्दैवानें अकालीं मृत्यु आला.

---

## २२ संभाजीस राज्यप्राप्ति.

शिवाजी मरण पावला तेव्हां त्याचा वडील मुलगा संभाजी पन्हाळा किल्ल्यावर नजरबंदींत होता. शिवाजीच्या मरणाची बातमी एकतांच मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो हे रायगडास आले. तेथें आतां गादीवर कोणास बसवावें हा प्रश्न निघाला. संभाजी हा शिवाजीचा वडील मुलगा खरा, पण दुर्वर्तनी व अविचारी असल्यामुळें तो गादीवर आला तर राज्यावर संकट आल्याशिवाय राहणार नाहीं असें सर्व कर्त्या मंडळीस वाटलें. औरंगजेब स्वतः दक्षिणेंतील सर्व राज्यें नाहींशीं करण्याच्या निश्चयानें लवकरच महाराष्ट्रांत येणार, त्याकरितां या वेळीं दक्षिणेंत राज्य सुयंत्रित चालणें तर अत्यंत जरूरीचें होतें. सोयराबाईनें सुचविलें कीं, माझा मुलगा राजाराम यास गादीवर बसवून कारभार चालवा. अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांना हा विचार पटला. त्यांनीं इतर कर्त्या पुरुषांस अनुकूल करून घऊन राजारामास गादीवर बसविण्याचा बेत

कायम केला. कोल्हापुरास जनार्दनपंत हणमंते सुमंत होता. त्यास पन्हाळचा बंदोबस्त फार कडेकोट ठेवण्याविषयीं लिहिलें. शिवाजीच्या मृत्यूची बातमी संभाजीस मुळींच कळूं देऊं नका व जास्त नजर राखा, अशा अर्थाच्या चिठ्या पन्हाळ्यावर हिरोजी फर्जंदास पाठविल्या. येणेंप्रमाणें राज्यांतील सर्व कर्त्या पुरुषांनीं संभाजीस बाजूला ठेवून राजारामास गादीवर बसवून सुरळीतपणानें राज्य हांकण्याची मसलत केली. शिवाजीच्या मरणानंतर सुमारें एक महिन्यानें राजारामास राज्याभिषेक झाला. पण ही मसलत शेवटास गेली नाहीं. रायगडाहून हिरोजी फर्जंदास गुप्तपणा राखण्याविषयीं हुकूम गेले होते.पण गुप्तपणा शेवटपर्यंत राखला गेला नाहीं. संभाजीस शिवाजीच्या मृत्यूची बातमी कर्णोपकर्णीं कळली. त्यानें हिरोजी फर्जंदास आलेले हुकूम ज्यानें आणिले होते त्यास बोलावून आणून धमकी देऊन विचारिलें तेव्हां कारभाऱ्यांची सर्व मसलत त्याला कळली. त्यानें लगेच उग्रस्वरूप धारण केलें. हुकूम आणणाऱ्या लोकांचा कडेलोट केला. हिरोजी फर्जंद कोंकणांत पळून गेला. लगेच पन्हाळा किल्ला संभाजीच्या हस्तगत सहज झाला. जनार्दनपंत कोल्हापुरास सैन्य घेऊन होता. त्याच्या सैन्यांत संभाजीनें फितूर केला व त्याच्यावर चाल करून त्याच्या पायांत बिड्या ठोकल्या. हंबीरराव मोहिते सेनापति कऱ्हाडास होता. संभाजीचीं हीं धाडसाचीं कृत्यें पाहून सेनापतीच्या मनांत आदर उत्पन्न झाला, व तो तत्काल संभाजीस मिळाला. मोरोपंत पिंगळे पन्हाळ्याकडे जात होता. सेनापति मसलतींतून फुटला असें पहातांच तोही संभाजीस जाऊन मिळाला. मग संभाजीनें रायगडावर चाल केली तेव्हां तो गड त्याच्या हातीं लागण्यास कांहींच उशीर लागला नाहीं. रायगड काबीज होतांच आपल्या विरुद्ध असलेल्या लोकांस त्यानें शिक्षा करण्याचा सपाटा चालविला. अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे या दोघांस कैदेंत टाकलें. राजारामाची आई सोयराबाई हीस तर त्यानें फारच क्रूरपणाची भयंकर

शिक्षा दिली; भिंतीच्या कोनड्यांत तिला चिणून टाकलें. तथें तिचा तिसरे दिवशीं प्राण गेला.

औरंगजेब बादशहाचा मुलगा महंमद अकबर यानें बादशहाविरुद्ध बंड केलें; तेव्हां त्याला धरण्यास बादशहानें सरदार पाठविले. अकबर दक्षिणेंत पळून आला व संभाजीपाशीं आश्रय मागूं लागला. संभाजीनें त्याचा सत्कार करून त्याला रायगडाजवळ धोंडसें गांवीं ठेवून दिला. अण्णाजी दत्तो आदिकरून मंडळींनीं अकबरापाशीं राजारामास गादीवर बसविण्याचें कारस्थान केलें आहे असें संभाजीस कळलें. हें ऐकतांच तो वाघासारखा चवताळून रायगडास आला आणि कटांत सामील असल्याबद्दल त्याला संशय आला त्यां सर्वांस त्यानें देहान्त शिक्षा दिली. अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी चिटणीस यांस हत्तीच्या पायीं दिलें. संभाजी या वेळेला अगदीं चिडून गेला होता. त्याचा कलुशा नांवाचा एक दुष्ट सल्लागार होता त्यानें व इतर सल्लागारांनीं संभाजीच्या रागाचा फायदा घेऊन शिवाजीच्या उत्तम नररत्नांची अशी वाट लाविली. संभाजीची बायको येसूबाई त्याला म्हणाली " बहुतदिवसांचे कर्ते पुरुष तुम्हीं काय म्हणून जिवें मारले ? त्यांणीं काय अपराध केला होता ? हलक्या लोकांच्या मसलती घेऊन राज्य कसें चालेल ? " संभाजीचा राग गेला होता. आपली चूक त्याच्या लक्षांत आली. त्यानें बाळाजी आवजीचे मुलगे खंडो व निळो या दोघांसही वडिलांचीं कामें दिलीं. पण मन शांत ठेवून विचारानें चालण्याचें संभाजीच्या हातून निभावणें शक्य नव्हतें. कारण त्याचा सर्व विश्वास त्याचा मुख्य सल्लागार कलुशा याजवर; आणि तो तर शिवाजीच्या वेळेचीं माणसें निघतील तितकीं काढण्यास टपलेला. त्याचें संभाजीवर जास्त जास्त वजन पडत चाललें होतें.

संभाजीस सुधारावें या इच्छेनें दोघां मोठ्या व्यक्तींनीं प्रयत्न केला. पहिली व्यक्ति म्हणजे शिवाजीचे गुरु रामदास यांनीं संभाजी गादी-

वर बसला असें ऐकतांच त्यास एक उपदेशपर पत्र पाठविलें. त्यांतील महत्वाचा भाग खालीं दिला आहे.

मागलि अपराध क्षमावे । कारभारी हातीं धरावे ॥
सुखी करूनि सोडावे । कामाकडे ॥ १ ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ॥
तरी मग जाणावें फावलें । गनीमासी ॥ २ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे भांडतां तिसऱ्या जये ॥
धीर धरूनी महाकार्य । समजूनि करावें ॥ ३ ॥
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणीक मेळवावें ॥
महाराष्ट्र राज्यचि करावें । जिकडे तिकडे ॥ ४ ॥
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप ॥
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥ ५ ॥

हा उपदेश केल्यावर थोड्याच दिवसांनीं म्हणजे माघ वद्य ९ शके १६०३ या दिवशीं समर्थ रामदासस्वामी समाधिस्थ झाले. संभाजीस ताळ्यावर आणण्याची खटपट करणारा दुसरा गृहस्थ रघुनाथ नारायण हणमंते शिवाजीचा कर्नाटकांतील अम्मलदार हा होय. हा संभाजीच्या भेटीकरितां बरोबर मोठें सैन्य घेऊन आला. बरोबर त्यानें कर्नाटक प्रांताच्या वसुलाचे ४० लक्ष रुपये आणले होते. संभाजीनें बीरवाडीस एका शोभिवंत मंडपांत त्याची भेट घेतली. सरदार वगैरे राज्यांतील मानकरी हजर होते. त्या सर्वांसमक्ष त्यानें संभाजीस चार उपदेशपर शब्द सांगितले " तुम्ही राज्यांतील सर्व कर्ती माणसें ठार मारलीं. आतां औरंगजेब उत्तरेकडून स्वारी करून येत आहे त्याचा प्रतिकार करण्याची तुम्हीं काय तयारी केली आहे ? " पण हें सर्व बोलणें संभाजीस रुचलें नाहीं. औरंगजेब दक्षिणेंतील सर्व राज्यें बुडविण्याच्या उद्देशानें येणार, असें कळल्यावर रघुनाथपंताचा दक्षिणेंतील सर्व तीन राज्यांचा एकोपा करण्याचा विचार होता. पण संभाजीचें मन कलुशानें

अगदीं भारून टाकलें आहे हें पाहून त्यास आपली मसलत सिद्धीस जाईल असें वाटलें नाहीं. म्हणून तो कर्नाटकांत परत निघून गेला. तिकडे तो थोडक्याच दिवसांनीं वारला.

---

## २३ सिद्दी व पोर्तुगीज यांच्याशीं दोन हात.



संभाजी व्यसनी होता, हट्टी होता पण तो शूरही होता. जंजिरा किल्ला समुद्रांत आहे व तो मुंबईहून आगबोटींत बसून कोंकणांत जातांना लागतो. हा किल्ला सिद्दीच्या ताब्यांत होता. आणि या किल्ल्यावर राहून सिद्दीनें बरीच कोंकणपट्टी आपल्या ताब्यांत आणली होती. मराठ्यांच्या मुलखास हा सिद्दी वरचेवर त्रास देई; पण त्याचें शासन करण्यास मराठ्यांनीं जावें तर तो जंजिऱ्याच्या बळकट किल्ल्यांत जाऊन बसे म्हणून शिवाजीनें हा जंजिरा घेण्याकरितां अतिशय खटपट केली. तथापि तो किल्ला कांहीं त्याच्या हातीं आला नाहीं. शिवाजी वारल्यावर सिद्दी मराठ्यांच्या प्रांतांत आला व पुष्कळ माणसांस गुलाम म्हणून विकण्याकरितां त्यानें पकडून नेलें. आणखी एका प्रसंगीं मराठे लोक आगबोटींतून चालले होते. त्यांवर एकाएकीं छापा घालून ८० असामींस सिद्दीनें ठार केलें.

त्याचवेळीं औरंजेबानें तुम्हीं मराठ्यांस होईल तितका त्रास द्यावा असा हुकूम पाठविला, मग काय ! हुकुमाची अम्मलबजावणी करण्याकरितां सिद्दीनें आपलें आरमार वाढविलें. या गोष्टी संभाजीस कळल्या, तेव्हां संभाजीस त्याचा फार राग आला व सिद्दीचा नायनाट करण्याचा त्यानें निश्चय केला. खंडोजी फर्जंद यानें जंजिऱ्यांत फितूर करण्याचें काम पत्करलें व जंजिऱ्यास जाऊन सिद्दीची नोकरी

धरली. पण एका दासीनें खंडोजीची सर्व हकीकत सिद्दीस कळविली; सिद्दीनें चौकशी केली तों खरें बाहेर पडलें. फर्जंदास मग तो कसची क्षमा करतो ? त्यानें त्यास एकदम ठार केलें. दादाजी रघुनाथ देशपांडे यानें (कलुशा) कब्जीमार्फत संभाजीकडे बोलणें लाविलें कीं मी जंजिरा घेऊन देतों. संभाजी जंजिरा घेण्याविषयीं फार उत्सुक झाला होता. त्यानें दादाजीस जंजिरा घेण्याच्या कामगिरीवर नेमिलें व जर जंजिरा फत्ते करून द्याल तर अष्ट प्रधानांत जागा देईन असें कबूल केलें. दादाजीनें जंजिऱ्यास वेढा घातला. संभाजी महमद अकबरास बरोबर घेऊन स्वतः जंजिरा घेण्याकरितां कोंकणांत गेला, व त्यानें जंजिरा घेण्याची एक अजब युक्ति काढली त्यानें किल्ल्यापर्यंत समुद्रच मुळीं भरून काढण्याचा विचार केला होता. केवढा साहसाचा विचार हा ! जरी शेवटीं संभाजीस जंजिरा मिळाला नाहीं तरी या त्याच्या कल्पनेवरून जंजिरा घेण्याविषयीं त्यास किती उत्सुकता झाली होती, हें समजतें. परंतु, हें सर्व कल्पनेचें साम्राज्य ! संभाजीस प्रत्यक्ष कांहींच करतां आलें नाहीं. कारण रणमस्तखान नांवाचा मोंगल सरदार येऊन कल्याण प्रांत लुटूं लागला. त्यामुळें संभाजीस कल्याणाकडे जाणें भाग पडलें. दादाजी रघुनाथ यानें वेढा घातला होता; परंतु पावसाळ्यांत त्याचा टिकाव लागला नाहीं. सिद्दीनें दादाजीचा अगदीं पराभव केला व महाडापर्यंत मराठ्यांचा मुलूख लुटला. यापुढें मराठ्यांचीं व सिद्दीचीं कांहीं युद्धें झालीं पण तीं विशेष महत्वाचीं नाहींत.

सोळाव्या शतकापासून कोंकणांत युरोपांतील निरनिराळे लोक येऊन आपलीं ठाणीं करून राहिले होते. त्यांतील पोर्तुगीज हे त्या वेळीं प्रबळ होते. यांनीं व्यापाराबरोबरच आपलें राज्य वाढविण्याचें धोरण ठेवून कोंकणपट्टीतील बराच मुलूख आपल्या सत्तेखालीं आणला होता. परंतु मुसलमान व मराठे यांमध्यें जेव्हां युद्धाचा प्रसंग येई तेव्हां या लोकांची लुडबुड फार असे. संभाजीचें सिद्दीशीं युद्ध चाललें होतें तेव्हां पोर्तु-

गीजांनीं संभाजीच्या मार्गांत फार अडचणी आणल्या. आपल्या बंदरां-तून त्याचीं जहाजेंच जाऊं देऊं नयेत, शिवाय सिद्दीस मदत करावी वगैरे त्यांच्या लटपटी सारख्या चालल्या होत्या. संभाजीनें पोर्तुगीज लोकांची खोड मोडण्याचा विचार केला. आणि त्यांच्या बंदरास वेढा घातला. त्यांचा गव्हर्नर गोंव्यास रहात होता. त्यास हें कसचें खपतें ? त्यानें मराठ्यांच्या मुलखांत दंगा आरंभिला. हें संभाजीस कळतांच तो तडक तिकडे गेला. फोंड्यामध्यें मराठ्यांची व पोर्तुगीजांची फार निक-राची लढाई झाली. पोर्तुगीजांचा पूर्ण पराभव झाला. ते गोंव्यास जाण्या-करितां मागें हटूं लागले. त्याबरोबर संभाजीनें त्यांचा असा जोराचा पाठलाग केला कीं, दोनशें पोर्तुगीज व एक हजार शिपाई प्राणास मुकले. पोर्तुगीज व मराठे यांमधील हा पहिलाच सामना होय. त्यांत मराठ्यांस जय येऊन त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली. पोर्तुगीजांस तर त्यांचा धाकच बसला. त्यांनीं औरंगजेबापाशीं आश्रय मागितला व त्यानें त्यांचें मागणें कबूल केलें.

संभाजी फार साहसी असे. पोर्तुगीज लोक होड्यांत बसून जाऊं लागले. तेव्हां त्यानें त्यांचा पाठलाग चालूं ठेवण्याकरितां आपला घोडा खाडींत घातला. खाडीस भरती आली व संभाजीचा घोडा पोहो-णीस लागला. खंडो बल्लाळ चिटणीस यानें आपल्या घोड्यावरून खालीं उडी घेतली व संभाजीचा घोडा धरून तो शूर व इमानी सरदार त्यास कांठास घेऊन आला. खंडो बल्लाळाच्या या कृत्यानें संभाजी त्यावर फार खूष झाला. खंडो बल्लाळाचा बाप बाळाजी आवजी यास संभाजीनें ठार मारलें होतें. तरी राष्ट्रहिताकडे लक्ष देऊन तें कृत्य यत्किंचित्‌ही मनांत न आणतां, तो संभाजीच्या उपयोगीं पडला. केवढा हा राष्ट्रा-भिमान ! ! संभाजीनें फोंडें येथें एक बळकट किल्ला बांधला. व पोर्तुगीज लोकांचा गोंव्याच्या उत्तरेकडील सर्व मुलूख जाळून लुटून फस्त केला. पोर्तुगीज लोक अगदीं टकीस आले व संभाजीशीं त्यांनीं तहाचें बोलणें

लाविलें. संभाजीचा पोर्तुगीजांस समूळ हांकून देण्याचा विचार होता. जांजिरा घेऊन सिद्दीचीही वाट लावण्याचा त्याचा बेत होता. या दोघांचा समूळ उच्छेद केला असता म्हणजे कोंकणपट्टी अगदीं मोकळी झाली असती. परंतु उत्तरेकडून औरंगजेबाचें अरिष्ट येऊन कोसळल्यामुळें त्या अरिष्टापासून आपला बचाव करण्याकरितां त्याला हे सर्व बेत बाजूस ठेवावे लागले, यास त्याचा उपाय नव्हता.

---

## २४ वादळ वाहूं लागलें.



औरंगजेबानें दक्षिणेवर शाएस्तेखान, जयसिंग, दिलेरसिंग, महाबतखान यांच्यासारखे मोठे मोठे सरदार एकामागून एक पाठविले होते. त्याच्या मनांत या सरदारांनीं शिवाजीस पकडून आणावें आणखी विजापूर व गोवळकोंडें येथील पादशाह्या अगदीं खिळखिळया करून टाकाव्या असें होतें. एवढें झाल्यावर अलमगीर स्वतः दक्षिणेंत येऊन आपला जयस्तंभ रोंवून जाणार होता. परंतु औरंगजेबाच्या या विचारांपैकीं एक देखील काम त्याच्या बड्या सरदारांनीं बजाविलें नाहीं. शिवाजी तर जास्त जास्त बलवान् होत होता. विजापूरकरांनीं व गोवळकोंडेकरांनीं मोंगलांचें सैन्य परतविलें होतेंच. आपल्या सरदारांचीं ढिलाई पाहून औरंगजेबास वाईट वाटलें. परंतु करितो काय ? उत्तरेकडे एकामागून एक दंगे होत होते. अफगाण लोकांचा मोठ्या शिकस्तीनें पराभव केला, तोंच रजपूत बंडें करूं लागले. रजपुतांचें बंड निष्कारण नव्हतें. त्याला कारण असें झालें कीं, औरंगजेबानें सर्व हिंदूंवर झिझिया कर बसविला, त्यांचीं देवस्थानें फोडलीं, अर्थातच रजपुतांस चेव आला व बादशहास सळो कीं पळो झालें. इतक्यांत बाद-

शहाचा मुलगा महमद अकबर यानें बापाविरुद्ध बंड केलें व तो रजपुतांस मिळाला. तेव्हां तर बादशहाची अत्यंत त्रेधा उडाली. औरंगजेबानें रजपुतांशीं कसाबसा तह केला. व अकबरास धरण्यास लोक पाठविले. अकबर उत्तरेंतून निसटला व मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें संभाजीस येऊन मिळाला. आतां मात्र उत्तरेंतील सर्व गडबड नाहींशी होऊन बादशहाचें तिकडचें काम संपलें. सरदारांच्या हातून दक्षिणेंतील कांहींच काम झालें नव्हतें, आतां औरंगजेबास फुरसत मिळाली. त्यानें स्वतःच दक्षिण काबीज करण्याकरितां मोठी स्वारी काढण्याचा बेत केला. शिवाजी मृत्यु पावला होताच. तेव्हां दक्षिण जिंकण्याचे मोहिमेस फार झालें तर दोन तीन वर्षें लागतील असा त्यानें दिल्लीहून निघतांना अंदाज केला होता.

औरंगजेब बादशहा दिल्लीहून निघाला तेव्हां त्यानें बरोबर चार लाख फौज घेतली होती. याशिवाय त्याच्याबरोबरचें बाजारबुणगें आणखी होतेंच. अफगाणिस्थान व पंजाब या प्रांतांतले उंच बांध्याचे लोक त्या फौजेंत होते. दक्षिणेच्या डोंगराळ मुलखांत लढाई करण्यास उपयोगीं पडावे म्हणून त्यानें बुंदेले, मेवाडी वगैरे पहाडी लोकही बरोबर घेतले होते. त्याचेबरोबर उत्कृष्ट तोफखाना होता व त्यावर युरोपियन गोलंदाजांची नेमणूक केली होती. अशा जंगी फौजेसह औरंगजेबानें दिल्लीहून कूच केलें. त्याच्या स्वारीचा थाटही प्रेक्षणीय होता व एकंदर वैभव पाहून कोणाचेही डोळे दिपून गेल्याशिवाय राहिले नसते. औरंगजेबानें ही जी मोठ्या थाटाची स्वारी काढली त्यांत त्याचा असा हेतु होता कीं, लोकांनीं आपलें ऐश्वर्य पाहून गार होऊन जावें व आपणास शरण यावें. त्याच्या लष्कराचा एखादे ठिकाणीं तळ पडला कीं, तेथें एखादें मोठें शहर वसल्यासारखें होई. औरंगजेबाचे बरोबरचें सर्व सामान दुहेरी असे. तंबू वगैरे पुढल्या मुक्कामाचे ठिकाणीं सर्व व्यवस्था लागल्यावर मग मागल्या मुक्कामाहून सैन्याचा तळ हालविण्यांत येई.

अशा डौलानें औरंगजेब ब्ऱ्हाणपुरास शके १६०५ (इ. स. १६८३) त येऊन पोहोंचला.

पहिल्यानें मराठ्यांचा मुलूख जिंकण्याचा विचार त्यानें ठरविला होता. त्यास अनुसरून त्यानें आपले मुलगे मुअज्जम व अजीम या दोघांस पुढें पाठविलें. अजीमानें मराठ्यांच्या उत्तरेकडील प्रांतावर हल्ला केला, व मुअज्जम जुन्नराहून निघून कल्याण प्रांतांत उतरला.

अजीमानें सालेरीचा किल्ला फितूर करून सहज घेतला. सेनापति हंबीरराव मोहिते व अजीमशहाचें सैन्य या दोघांमध्यें रामसेजच्या किल्ल्याजवळ मोठी लढाई झाली. हंबीररावाचा पराभव झाल्यानें तो सातारा–मिरजेकडे परत आला. त्याचे मागोमाग मोंगल आले. परंतु मोंगलांच्या या पाठलागानें फायदा न होतां उलट ते तोंडघशी पडले. मराठ्यांचे मुलखांत बरेंच आंत आल्यावर मराठ्यांनीं मोंगल सैन्यावर वेळोवेळीं हल्ले करून त्यास अगदीं जिकीरीस आणिलें. औरंगजेबास हें कळतांच त्यानें अजिमास परत बोलाविलें. रामसेज किल्ल्याला मोंगलांनीं वेढा घातला. पण किल्लेकरी शौर्यानें लढले. त्यामुळें किल्ला हस्तगत झाला नाहीं.

इकडे मुअज्जम कल्याण प्रांतांत उतरल्याबरोबर लुटालूट करीत दक्षिण कोंकणांत वेंगुर्ल्यापर्यंत गेला. मराठ्यांनीं मोंगलांशीं कधींही समोरासमोर सामना दिला नाहीं. मुअज्जमनें प्रांत उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला होता. परंतु यांत त्यानें आपलाच तोटा करून घेतला. आधींच कोंकण प्रांतांत धान्य कमी; तें त्यानें पहिल्यानें नाहींसें केलें. मराठे लोक किल्ल्यांतून रहात असल्यामुळें त्यांचेजवळ सामुग्री असे. मोंगली सैन्यास उपास पडूं लागले. आपल्या मुलाच्या हालांची बातमी औरंगजेबास समजली. लागलेच त्यानें सुरतेच्या अम्मलदारास मुअज्जमकडे धान्य पाठवून देण्याचा हुकूम केला; आणखी शहाबुद्दीन नांवाच्या एका सरदाराबरोबर फौज देऊन मदतीस पाठविलें. सुरतेहून

धान्य भरून कांहीं गलबतें आलीं. त्यांपैकीं संभाजीच्या जहाजांनीं बरींच पकडून नेलीं. मुअज्जमच्या लष्करांत रोगांची सांथ जोरानें सुरू झाली. यामुळें तो तर फार संकटांत पडला. औरंगजेबानें आणखी दोन सरदार कल्याण प्रांतांत पाठविले. संभाजी त्यांचे पारिपत्यास कल्याणाकडे गेला कीं मुअज्जमला घाटावर चढून जाणें सोपें होईल असा बादशहाचा समज होता. शेवटीं मुअज्जम मोठ्या संकटानें घाट चढून वाळव्यास येऊन तळ देऊन राहिला.

संभाजी फौज घेऊन भडोचवर चाल करून गेला; व तेथें त्यानें पुष्कळ खंडणी गोळा केली. दहा हजार मराठ्यांची टोळी बादशहाच्या सैन्यास न कळत दौड मारीत गेली आणि बऱ्हाणपूर गांठून त्या प्रांतांत बराच धुमाकूळ उडवून परत आली. औरंगजेबास ही बातमी लागली, तेव्हां त्यानें त्या टोळीवर खानजहान बहादुरास पाठविलें. परंतु ती त्याच्या हातांत कशी सांपडणार ? बहादुराच्या हातावर तुरी देऊन मराठे स्वस्थपणें आपल्या प्रांतांत परत आले. औरंगजेबानें आपला धाकटा मुलगा कामबक्ष यास बऱ्हाणपूरच्या बंदोबस्ताकरितां लावून दिलें; येणेप्रमाणें तीन वर्षें घालविल्यावर औरंगजेबास तूर्त मराठ्यांचा नाद सोडून द्यावा असें वाटूं लागलें. विजापूरची आदिलशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही यांचा अगोदर समाचार घ्यावा, मग मराठे जिंकतां आले तर पहावें असा विचार करून औरंगजेबानें आपला मोर्चा विजापुराकडे वळविला. अजीमशहास विजापुरास वेढा घालण्याकरितां पाठविलें. गोवळकोंडेकरांस विजापूरकरांची मदत करितां येऊं नये म्हणून मुअज्जमास गोवळकोंड्याच्या टेहळणीस पाठविलें; याप्रमाणें औरंगजेबाचा तात्पुरता हल्ला मराठ्यांना परतवितां आला; कारण संभाजी अद्यापि कलुशाच्या पुरेतपणीं तावडींत सांपडला नव्हता.

## २५ तारूं भडकलें !



औरंगजेबानें मराठ्यांचा नाद सोडून तो विजापूरकडे गेला हें मागील गोष्टींत सांगितलें. औरंगजेब विजापूरास गेल्यावर संभाजीस कांहींशी फुरसत मिळाली. परंतु दुर्दैवानें त्या फुरसतीचा उपयोग करून घेण्याची बुद्धि त्याला झाली नाहीं. खरें म्हटलें म्हणजे ह्यावेळीं महाराष्ट्रांतील तिन्ही राज्यांच्या जिवावर प्रसंग आला होता. औरंगजेबाचा विजारपूचें राज्य, गोवळकोंड्याचें राज्य, आणि मराठ्यांचें राज्य या तिन्ही राज्यांची चटणी करण्याचा विचार होता. तेव्हां या तिघांनीं एक होऊन औरंगजेबाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करणें जरूरीचें होतें. असा प्रयत्न जर तिन्ही राज्यांनीं मिळून केला असता तर औरंगजेबाचा सहज प्रतिकार झाला असता. औरंगजेबाचें सैन्य अवाढव्य होतें हें खरें आहे, परंतु त्यांत चैनी व लहरी लोकांचा भरणा भारी होता. बादशहानें आपले सैन्यांत ठेविलेली व्यवस्थाही लढाई करण्यास सोईची नव्हती. या गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे महाराष्ट्रांतील राज्यांनीं औरंगजेबाच्या सैन्याचा सहज धुव्वा उडविला असता, ह्यांत संशय नाहीं. परंतु हें ऐक्य करण्याची खटपट कोणींच केली नाहीं. विजापूर व गोवळकोंडें येथील राजे फार शूर नव्हते; आणि त्यांची सर्व भिस्त राज्यांतील सेवक सरदारांवरच होती; परंतु त्या दोन्ही राज्यांतील पुष्कळ सरदार औरंगजेबानें फितविलेले होते. औरंगजेब महाकपटी, त्याच्या कपटाचा फार उपयोग झाला व ज्या सरदारांनीं आदिलशाहीचे व कुतुबशाहीचे प्राण रक्षण करण्याकरितां झटावें तेच सरदार औरंगजेबानें देऊं केलल्या इनामाच्या आशेनें आदिलशाही व कुतुबशाही यांचीं प्रेतें आपण बादशहापुढें केव्हां नेऊन टाकतों व प्रेत वाहून मिळणारी दक्षिणा केव्हां उपटतों याची डोळ्यांत तेल घालून वाट पहात

होते. ज्यांवर राज्याचे जीव वाचविण्याचें काम येऊन पडलें होतें तेच सरदार लोक असे फितल्यावर त्या राज्यांचें काय झालें असावें बरें ? दुसरें काय ? आदिलशाही मेली व कुतुबशाहीनें प्राण सोडला.

संभाजीनें तिन्ही राज्यांचें ऐक्य तर केलें नाहींच. निदान आपल्या स्वतःच्या राज्याची तरी व्यवस्था लावून बादशहाशीं टक्कर देण्याची कांहीं तरी तयारी त्यानें करावयास नको होती काय ? परंतु दुर्दैव महाराष्ट्राचें ! परंतु दुर्दैव तरी कां म्हणावें ? एका अर्थी सुदैवच. कारण महाराष्ट्र त्यासमयीं संकटांतून पारखून निघावयाचा होता. संभाजीनें कांहींच तयारी केली नाहीं. इतकेंच नव्हे तर उलट दिवसेंदिवस तो राज्य करण्यासच नालायक होत चालला. कोणचीही गोष्ट करावयाची म्हणजे अगोदर कलुशाचें मत विचारावयाचें असें होऊं लागलें. यामुळें कलुशाचें वजन अतोनात वाढलें. त्याचा मंत्रतंत्रावर अतिविश्वास. बादशहाच्या स्वारीची गोष्ट निघाली कीं कलुशा म्हणे 'बादशहाचा नाश करावयास सैन्याची काय जरूर ? मी कांहीं चेटकें करतों कीं बादशहाचा फन्ना उडेल.' संभाजीस दुर्दैवानें घेरलें असल्यामुळें तोही कलुशाच्या अशा भाषणानें खूष होऊन त्याचा मोठा गौरव करी. विनाशकाल आला म्हणजे विपरीत बुद्धि होते असें म्हणतात ते खोटें नाहीं. कब्जी बोले आणि दळ हाले असें झालें. संभाजीनें सर्व राज्यकारभार कलुशावर टाकला; व तो स्वतः व्यसनांत चूर होऊन गेला. राज्याचा वसूल नीट होईना. राज्यकारभाराची सर्व शिस्त बिघडली. सैन्याची अव्यवस्था झाली. शिवाजीनें केलेले नियम सैन्यांत मुळींच पाळले जाईनात. प्रजेला लष्करी लोकांपासून त्रास होऊं लागला. बरोबरच आहे. कब्जीला राज्य कसें चालवितां येणार ? त्याचा जन्म जादूटोणा, मंत्रतंत्र व वाक्पांडित्य यांत गेला होता. मग असला अनुभव घेतलेले कब्जी राज्य करूं लागल्यावर असें झालें यांत कांहीं नवल नाहीं. शिवाय स्वतः संभाजी राजे म्हणजे सर्व व्यसनांत गढून गेलेले,

लहरी व आपल्या चैनीकरितां सदा सर्व लोकांस त्रास देणारे. प्रधान आणि राजे यांची जोडी जमली व सर्व राज्यांत अंदाधुंदी माजली !

औरंगजेबानें आदिलशाही व कुतुबशाही बुडवून मराठ्यांचें राज्य घेण्याचा बेत केला तेव्हां मराठी राज्याची वर वर्णन केल्याप्रमाणें शोचनीय स्थिति झाली होती. बादशहानें मराठ्यांच्या राज्यावर एकदम तीन टोळ्या पाठविल्या. एक अजीमशहाच्या हाताखालीं खानदेशाकडे, दुसरी झुलफिकारखानाच्या हाताखालीं कोंकणांत आणि तिसरी तकरीबखानाच्या हाताखालीं कोल्हापूरकडे. तकरीबखानास संभाजी संगमेश्वरीं आहे हा बातमी कळली. तो व्यसनाधीन होऊन अगदीं बेसावध असतो अशीही आणखी बातमी लागली. हें सर्व ऐकून तकरीबखानास फारच आनंद झाला. आतां संभाजीस धरावें व बादशहापुढें नेऊन उभें करावें असा त्यानें बेत केला.

त्यानें त्या प्रांताचा माहितगार वाटाड्या बरोबर घेतला, व तो कोल्हापुराहून निघून विशाळगडच्या घाटानें संगमेश्वरास गेला. वाटेनें जातांना 'बादशहाकडून संभाजीमहाराजाकडे वकिलीस मी जात आहें, असें तो सांगत असे. संगमेश्वराजवळ मोंगल आले हें पाहून जवळच्या लोकांनीं संभाजीस ती बातमी घाबऱ्या घाबऱ्या कळविली. परंतु संभाजीला अम्मल चढला होता. त्यानें त्या लोकांस झिडकारून "तुम्ही खोट्या बातम्या सांगतां. येथें मोंगल कोठून येतील ? पुन्हां तर खोटी बातमी आणा कीं तुमचीं नाकेंच कापतों गुलामांनो" असें म्हटलें. तकरीबखानाचे लोक गढींत शिरू लागले तेव्हां पहाऱ्यावरचे लोक दरवाजा लावूं लागले. मोंगलांनीं त्या पहारेवाल्यांस ठार केलें तों मोंगल आले म्हणून आंतील बरेच लोक पळून गेले. कलुशा व आणखी कांहीं लोक राहिले होते. त्यावरून तकरीबखानानें संभाजीस ओळखून पकडलें. खानानें ही बातमी बादशहास कळविली तेव्हां बादशाहानें संभाजीस तुळापुरास आणण्याचा हुकूम ताबडतोब पाठविला. संभाजीस खान तुळापुरास

घेऊन गेला. बादशहाच्या जवळच्या सरदारांनीं ‘ संभाजीस हातीं धरून मराठे सरदारांच्या हातांतील सर्व किल्ले काबीज करावे म्हणजे किल्ले घेण्यास त्रास पडणार नाहीं ’ असें सुचविलें. औरंगजेबास हा सल्ला पटला व त्यानें संभाजीस जिवंत ठेवण्याचा निश्चय केला. परंतु त्याला बाटवून मुसलमान करावें व मग त्याच्याकडून किल्ले घ्यावे असा बादशहाचा बेत होता. त्याप्रमाणें त्यानें संभाजीस निरोप पाठविला कीं, “ तुम्हीं मुसलमान झालां तर तुम्हांस जीवदान देण्याचा बादशहाचा विचार आहे. ” संभाजी दुर्व्यसनी असला तरी वीराचा बच्चा होता. त्याला बादशहाच्या सैन्यानें कैद केलें तेव्हांपासूनच तो जिवास कंटाळून गेला होता, त्याचा पदोपदीं अपमान होत होता, तेव्हां या जांचांतून मी केव्हां सुटेन असें त्यास झालें होतें. बादशहाच्या निरोपास खरमरीत उत्तर पाठविलें म्हणजे बादशहा आपल्यास देहांत शिक्षा करील, व आपण या त्रासांतून सुटूं असें त्यास वाटलें, व म्हणून त्यानें बादशहास असें सांगून पाठविलें कीं ‘ जर तुझी बेटी मला देशील तर मी मुसलमान होतों ’ इतकें बोलून शिवाय त्यानें पैगंबरास शिव्या हांसडल्या. औरंगजेबास तो निरोप व शिव्या ऐकून संभाजीचा अत्यंत क्रोध आला व त्यानें त्याची जीभ तोडून, डोळे काढून, हालहाल करून त्यास ठार मारण्याचा हुकूम केला. त्या हुकुमाप्रमाणें अत्यंत क्रूरपणानें संभाजीचा वध झाला. ( इ. स. १६८९. )

संभाजीचा अशा भयंकर रीतीनें वध केल्यावर औरंगजेबास वाटलें कीं, आतां मराठ्यांचें राज्य आपल्या हातीं आलेंच. विजापूरचें शहर काबीज केल्यावर आदिलशाही जशी नष्ट झाली, गोंवळकोंडें ताब्यांत आल्यावर जशी कुतुबशाही ताब्यांत येण्यास कांहींच त्रास पडला नाहीं तसेंच आतां संभाजी हातीं येऊन त्यास यमसदनास पाठविल्यावर मराठे असे निराळे काय उरले ? अशी त्याची कल्पना होती. तेव्हां आतां दक्षिण जिंकण्याचें काम संपलें असे तो बादशहा आपल्या मनांत मांडे खाऊं लागला.

---

## २६ कर्णधारांचा निश्चय.

संभाजीचा भयंकर रीतीनें औरंगजेबानें वध केला, ही बातमी महाराष्ट्रभर पसरली तेव्हां जिकडे तिकडे हाहाःकार झाला. सर्व लोक दुःखाचे सुस्कारे टाकूं लागले. बादशहानें संभाजीराजाचा वध केला. आतां तो महाराष्ट्रराज्य बुडविल्याशिवाय राहणार नाहीं असें मनांत येऊन सर्व मराठे लोकांना अगदीं उद्वेग उत्पन्न झाला. त्यांना संभाजीच्या दुर्गुणांचा अगदीं विसर पडला व संभाजीच्या वधाचा सूड उगविण्याचा विचार त्यांच्या मनांत आला. मराठ्यांचें राज्य बुडविण्यास बादशहा टपलेला आहे, व संभाजीस त्यानें ठार केलें हें तरी मराठी राज्य नाहींसें करण्याकरितांच, असें बादशहाच्या कृत्यांवरून त्यांनीं ताडलें. आपलें राज्य जाणार हा विचार मनांत आल्यामुळें पहिल्यानें लोकांस दुःख झालें खरें; परंतु थोडक्याच वेळांत स्वराज्य जाणार मग आम्हांला तरी जगून काय करावयाचें आहे ? जिवांत जीव आहे, तेथवर स्वराज्याचें रक्षण करणें अवश्य अशी विचारपरंपरा सुरू होऊन महाराष्ट्रभर स्वराज्यरक्षणाकरितां जिवावर उदार होऊन शेंकडों लोक आपआपल्यापरी खटपट करूं लागले. राजारामास संभाजीनें रायगडावर नजर कैदेंत ठेविलें होतें. संभाजीची बायको येसूबाई आपल्या पांच वर्षांच्या मुलासह रायगडावरच रहात असे. तिच्या शहाणपणाच्या गोष्टी मागें सांगितल्या आहेतच. संभाजीच्या वधाची बातमी कळतांच मराठे सरदार पुढें काय करावयाचें हें ठरविण्याकरितां रायगडावर जमा झाले. जनार्दनपंत हणमंते, प्रल्हाद निराजी, रामचंद्रपंत बावडेकर, खंडो बल्लाळ चिटणीस, महादजी नाईक पाणसंबळ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव व खंडेराव दाभाडे हे त्यांपैकीं प्रमुख होत. येसूबाईकडे जाऊन तीस राज्याची व्यवस्था काय करावयाची

म्हणून विचारलें. ती शहाणी व हुशार होती. तिनें राज्यावर आलेला कठीण प्रसंग ओळखून मोठा उत्कृष्ट सल्ला दिला. “ माझ्या मुलाचें वय लहान तेव्हां त्याला आतां गादीवर बसविणें धोक्याचें आहे. तुम्ही माझे दीर यांचे हातांत राज्य कारभार देऊन त्यांना घेऊन येथून निघा. सर्वांनीं एके ठिकाणीं राहणें या प्रसंगीं बरें नाहीं. एके ठिकाणीं राहिल्यास एकदम सर्व माणसें बादशहाच्या हातांत सांपडूं. हा किल्ला मजबूत आहे, यावर बालशिवाजीस घेऊन मी रहातें. तुम्हीं सर्व बाहेर पडल्यावर शत्रू तुमचे अंगावर जातील. तुमचा सर्वांचा जमाव एके ठिकाणीं झाला म्हणजे आम्हांस काढून तिकडे न्यावें. ” किती शहाणपणा या सल्ल्यांत भरला आहे बरें ? केवढें स्वराज्यप्रेम ! केवढी स्वार्थनिरपेक्षिता ! ! येसूबाईचें म्हणणें सर्वांस पसंत पडलें. राजाराम स्वभावानें थोडा उदार व मनमिळाऊ होता. त्यानें भावजयीचा निरोप ऐकून राज्य करण्याचें काम पत्करलें; परंतु तो आजन्म गादीवर बसला नाहीं. त्यानें कारभारी या नात्यानें सारा जन्म राज्य चालविलें.

येसूबाईस मागें एकटें टाकून निघून जाणें राजारामाच्या जिवावर आलें, तथापि प्रसंगावर दृष्टि देऊन हें करणें जरूर म्हणून तसें करण्याचा त्यानें निश्चय केला. मग सर्व सरदारांस एके ठिकाणीं जमविलें. तेथें येसूबाई व बालशिवाजी होतींच. सर्वांचें समाधान करून राजाराम बोलला, “ राज्याचे अधिकारी शिवाजी राजे पूर्वींचे तेच हे, ऐसें लक्ष ठेवून, आम्ही कारभारी, आमचे आज्ञेंत राहून, पूर्वींहून विशेष पराक्रम करून, औरंगजेबास जिंकून राज्य रक्षावें. येविशीं सर्वांचीं शपथा प्रमाणें व्हावीं ” इतकें बोलून ‘ जिवंत जीव आहे तेथवर स्वराज्य रक्षण करण्यास झटेन ’ अशा अर्थाची त्यानें शपथ घेतली व सर्व सरदारांनींही घेतली.

ह्या वेळीं महाराष्ट्रांत स्वराज्यरक्षणाचा आवेश चोहोंकडे उत्पन्न झाला होताच. शिवाजीनें जन्मभर कष्ट करून स्थापिलेलें मराठी राज्य बुड-

विण्यास औरंगजेब आला आहे, तेव्हां तें त्याच्या तडाक्यांतून वांचविणें हें आपलें पवित्र कर्तव्यकर्म आहे, असें महाराष्ट्रांतील सर्व लोकांस वाटूं लागलें होतें. हें रक्षणाचें पवित्र कर्तव्य करीत असतां आपल्या प्राणावर बेतली तरी फिकीर नाहीं, इतकी पुष्कळांच्या मनाची तयारी झाली होती. अशा वेळीं रायगडावर मराठे सरदार जमून त्यांनीं हें स्वराज्य रक्षणाचें काम कोणच्या धोरणावर करावयाचें हें ठरविलें. मग रायगडचा चांगला बंदोबस्त करून राजाराम निघाला व प्रतापगडावर आला. तेथें देवीचें दर्शन घेऊन महाराष्ट्रांतील किल्लेकोटांच्या बंदोबस्तास तो लागला. या कारभारांत त्याला सल्ला देणारा प्रल्हाद निराजी म्हणून शिवाजीच्या न्यायाधिशाचा मुलगा होता. तो मोठा हुशार व फारच स्वराज्यनिष्ठ होता. किल्ल्यावर वेढा पडला तर किल्ला पुष्कळ दिवस झुंजण्याकरितां सामुग्रीची नीट व्यवस्था ठेवावी व होईल तितकें सामर्थ्य खर्च करून मोंगलांस किल्ले देऊं नयेत, असे सर्व किल्लेकऱ्यांस हुकूम पाठविण्यांत आले. येणेप्रमाणें राजाराम व त्याचे कारभारी यांनीं स्वराज्य रक्षण करण्याचा निश्चय केला; व ते मोठ्या उमेदीनें त्या उद्योगास लागले.

---

## २७ स्थलांतर.



**झुलफिकारखानास** औरंगजेबानें एका टोळीवर मुख्य नेमून मराठ्यांचा कोंकणांतील अम्मल उठविण्याकरितां पाठविलें म्हणन मागें एका गोष्टींत सांगितलें. तो मोहिमेवर निघाला आणि पावसाळा संपल्याबरोबर त्यानें पहिल्याप्रथम रायगडासच वेढा दिला. या वेळीं रायगडावर येसूबाई व तिचा मुलगा शिवाजी ( हाच पुढें शाहू झाला ) हीं होतीं. त्यांस मोठ्या बंदो-

बस्तानें ठेविलें होतें. रायगड किल्ला मूळचाच मजबूत आहे. तेव्हां मोंगलांचें कांहीं चालेना. झुलफिकारखानास जंजिऱ्याचा सिद्दीही मदत करीत होता. मोंगलांनीं पुष्कळदां हल्ले चढविले, परंतु किल्लेकऱ्यांपुढें त्यांचें कांहींच चालेना. शेवटीं झुलफिकारखान फितूर करण्याच्या प्रयत्नास लागला. त्यानें दाखविलेल्या लालुचीस भुलून स्वजनद्रोह करण्यास सूर्याजी पिसाळ नांवाचा देशमुख सिद्ध झाला. या पिसाळाला वाईची देशमुखी मला केव्हां मिळते असें झालें होतें. ती मिळविण्याकरितां तो वाटेल तसलें नीचपणाचें कृत्य करण्यास तयार होता. झुलफिकारखानास रायगड घ्यावयाचा होता व पिसाळास कसेंही करून आपला तळीराम गार करावयाचा होता. झुलफिकारखानानें फूस देतांच त्यानें स्वतःस वाईची देशमुखी मिळाली तर मी तुम्हांस रायगड घेऊन देतों, असें खानास सांगितलें. झुलफिकारखानानें देशमुखी देण्याचें आनंदानें कबूल केलें व पिसाळानें मोंगलांस गुप्त वाटा दाखविल्या. त्याबरोबर मोंगल फौज चढून गेली व रायगड मोंगलांच्या हातीं गेला. स्वार्थासाठीं माणूस किती नीचपणाचीं कृत्यें करावयास तयार होतो, याचें पिसाळ हें एक ठळक उदाहरण आहे. या अधमानें आपल्या राजपुरुषांस व राजधानीस शत्रूच्या स्वाधीन करून दिलें ! ! येसूबाई व शिवाजी मोंगलांच्या हातीं लागलीं. त्यांस झुलफिकारखानानें ताबडतोब औरंगजेबाच्या लष्करांत पाठवून दिलें. झुलफिकारखानानें रायगड घेतला, व मराठ्यांच्या राजघराण्यांतील माणसें कब्जांत आणलीं तेव्हां त्याच्यावर औरंगजेब बादशहा फार खूष झाला हें काय सांगावयास पाहिजे ! येसूबाई व शिवाजी या दोघांस औरंगजेबानें आपल्या लष्करांतच ठेवून घेतलें.

औरंगजेबाच्या मुलीची शाहूवर फारच प्रीति जडली. औरंगजेबही शिवाजीशीं गोडीगुलाबीनें वागे. ‘ हा तेवढा सांव व इतर चोर ’ असें

तो लडिवाळपणानें म्हणे, यावरून शिवाजीचें नांव शाहू असें पडलें. अशी एक आख्यायिका सांगतात. पण असो.

संभाजीचा भाऊ राजाराम आणि कित्येक मराठे सरदार एकत्र होऊन फौज जमा करीत आहेत अशी औरंगजेबास बातमी लागली होती. त्यानें राजारामाचा पाठलाग करून त्यास पकडून आणण्याकरितां कांहीं फौज रवाना केली. राजाराम पन्हाळा किल्ल्यावर होता. मोंगलांच्या फौजा आपल्या मागें लागल्या असें कळतांच तो विशाळगडाला गेला. तेथून रांगण्यास पळाला, परंतु मोंगली फौजेचें झिंगट त्याच्या मागचें कांहीं केल्यासुटेना. राजाराम व त्याचे कारभारी मोठ्या पंचाइतींत पडले. आतां जर आपण मोंगलांच्या हातीं सांपडलों तर आमचे स्वराज्यरक्षणाचे सर्व मनोरथ व्यर्थ होतील, असा विचार मनांत येऊन त्यांचें चित्त कांहीं वेळ उद्विग्न झालें. परंतु लवकरच त्यांस एक उपाय सुचला, तो उपाय करून पाहण्याचा आवेश त्यांस आला. महाराष्ट्रांत राहून कांहीं उपयोग नाहीं. आपण आतां दक्षिणेस जिंजीकडे पळावें, असें राजारामाच्या मनांत आलें. सर्वांस हा उपाय योग्य वाटला. जिंजीस जाण्याचे तयारीस राजाराम व त्याचे कारभारी लागले. पहिल्यानें महाराष्ट्राच्या व्यवस्थेकरितां कोणी तरी राहिलें पाहिजे, असें ठरून रामचंद्रपंत बावडेकर याच्या हातीं महाराष्ट्राची सर्व व्यवस्था देण्यांत आली. त्याला हुकमतपन्हा हा किताब दिला. सिधोजी गुजर व त्याच्या हाताखालीं कान्होजी आंग्रे या दोघांनीं समुद्रकांठचा बंदोबस्त ठेवावा असें ठरलें. महादजी नाईक पानसंबळ शिलेदार हा एक म्हातारा होता. त्यास राजारामानें सेनापति नेमून महाराष्ट्रांत ठेवलें. राजाराम, प्रल्हाद निराजी, खंडोबल्लाळ चिटणीस, धनाजी जाधव, संताजी घोरपडे व खंडेराव दाभाडे यांनीं लिंगाईत यात्रेकरूंचा वेष घेऊन जिंजीची वाट धरली. ते रांगण्याहून निघाले ते गोकर्णास जाऊन बंगलुराकडे चालले. इतक्यांत त्यांची कर्ना-

१ या व्युत्पत्तीबद्दल वाद आहे. राजवाडे ' संकीर्ण लेखसंग्रहांतील शाहू ' पहा.

टकाकडे जाण्याची बातमी बादशहास कळली. बादशहानें कर्नाटक प्रांताचा फौजदार कासीमखान यास ही बातमी कळवून सांपडतील तेथें या टोळींतील मंडळीस पकडण्याचा हुकूम पाठविला. कासीमखानानें ठिकठिकाणच्या ठाणेदारांस या टोळींचा छडा लावून तीस पकडण्याची सक्त ताकीद दिली. राजाराम बंगलुरास पोंचण्याच्या अगोदरच कर्नाटकांत त्याचा बारीक रीतीनें शोध सुरू झाला होता. राजाराम व त्याचे सरदार बंगलुरास पोंचले, तेथें ते एका धर्मशाळेंत उतरले होते. एका क्षुल्लक गोष्टीवरून ते सर्व पकडले जाण्याचा संभव होता; परंतु खंडो बल्लाळ चिटणिसाच्या सावधगिरीनें तें संकट टळलें.

तो प्रसंग असा. राजारामाचे पाय धुवावयाचे होते, त्यावेळीं एका गड्यानें त्याच्या पायांवर पाणी घातलें. तें एका कानड्यानें पाहून जवळच्या माणसास म्हणाला ' हे जंगम दिसतात, पण या एका माणसाच्या पायांवर दुसऱ्याने पाणी घातलें; तेव्हां हे कोणी तरी वेषांतर केलेले असावे' झालें, ही बातमी पसरतां पसरतां सर्व गांवभर पसरली. राजारामाबरोबरच्या कानडी जाणणारांनीं तें सर्व ऐकून सर्व मंडळींस सांगितलें. खंडो बल्लाळानें हें ऐकतांच हें चिन्ह बरोबर नाहीं असें सांगितलें व निरनिराळे फुटून तावडतोब निघून जाण्याविषयीं राजारामास विनंति केली. ही विनंति सर्वांस पसंत पडली. राजारामादिकरून मंडळी चालती झाली. व खंडो बल्लाळ व आणखी दोघे तिघे तेथें स्वयंपाक करीत राहिले. त्या सर्वांस पकडून ठाण्यांत नेलें. ठाणेदारानें विचारलें "तुम्ही कोण ? कोठें चाललांत ?" यांनीं उत्तर केलें "आम्ही यात्रेकरू, रामेश्वरास जात आहों. आम्ही उतरलों होतों तेथें जवळच आणखी कांहीं यात्रेकरू उतरले होते. परंतु ते जेवण करून अगोदरच निघून गेले." ठाणेदारानें त्यांच्या डोक्यावर तीन तीन मणांचे दगड ठेविले, त्यांना चाबकांनीं मारलें, राखेचे तोबरे दिले, तरीही त्यांचा आरंभींचाच जाबसाल शेवटपर्यंत कायम होता ! हा केवढा दृढनिश्चय ! केवढी स्वामिभक्ति ! तीन

दिवस झाले. त्यांनीं सांगितलें 'आम्हांला सोडल्याशिवाय अन्न घेणार नाहीं'. त्यांचा इतका निग्रह पाहून ठाणेदाराचा संशय फिटला, व त्यानें त्यांस सोडून दिलें. तेथून जे निघाले ते प्रल्हाद निराजीच्या टोळीस मिळाले, आणि मग जिंजीस सुखरूप पोंचलें. राजाराम, संताजी व धनाजी तेथें अगोदरच पोंचले होते.

---

## २८ जगण्यासाठीं पराकाष्ठा.



राजारामानें जिंजीस पोंचल्यावर अष्टप्रधान नेमले. निळो मोरेश्वर पिंगळे यास मुख्य प्रधान नेमलें. महादजा नाईक पाणसंबळ वारला म्हणून संताजी घोरपडे यास सेनापति नेमलें. प्रल्हाद निराजी हरघडीस उपयोगीं पडत होता. त्याला पंतप्रतिनिधी म्हणून नवेंच पद काढून त्यावर त्याची नेमणूक केली. जिंजीस हरजी राजे महाडीक व निळो मोरेश्वर अगोदरपासूनच होते. त्यांनीं तेथील व्यवस्था चांगली ठेविली होती. त्या प्रांतांतील किल्ल्यांचा बंदोबस्त त्यांनीं चांगला ठेविला होता. तेव्हां संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांची या प्रांतांत विशेष जरूर नाहीं असें पाहून त्यांस महाराष्ट्रांत पाठविलें. मग प्रल्हाद निराजीच्या सल्ल्यानें, राजारामानें इनामें व पदव्या देण्यास सुरुवात केली. इनाम देत तें बादशहाच्या मुलखांत. इनामें व पदव्या मिळाव्यात म्हणून मराठे लोकांत मोठीच चढाओढ सुरू झाली; व इनामें मिळाल्यावर तीं बादशहाच्या मुलखांत असल्यामुळें, आयताच बादशहाच्यां मुलखांत धुमाकूळ माजून गेला. औरंगजेबास राजाराम जिंजीस गेल्याचें कळतांच त्यानें झुल्फिकारखानास फौज देऊन, तें स्थळ काबीज करण्याकरितां पाठविलें व खानानें जिंजीस वेढा घातला. याची हकीकत

पुढील गोष्टींत सांगू. इकडे महाराष्ट्रांत काय काय हालचाली झाल्या त्या आधीं पाहूं. राजाराम जिंजीस गेला तेव्हां रामचंद्रपंत बावडेकर यास विशाळगडास महाराष्ट्राचा सर्व बंदोबस्त करण्याचें काम सोंपवून, ठेविलें होतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. राजाराम गेल्याबरोबर मोंगलांनीं पन्हाळा सर केला व त्यांच्या फौजा विशाळगडास वेढा घालून बसल्या. रामचंद्र-पंतानें पुष्कळ वेळ किल्ला लढविला. पण हा किल्ला आपल्या हातीं टि-कणें शक्य नाहीं अशी त्याची खात्री झाली. म्हणून तो जो त्यावरून निसटला तो साताऱ्यास आला. तेथून त्यानें स्वतः किल्लोकिल्लीं फिरून जे जे किल्ले मराठ्यांच्या ताब्यांत राहिले होते तेथील शिबंदी, दारूगोळा व दाणावैरण इत्यादि बंदोबस्त केला. त्याला ही व्यवस्था लावतांना दोन मनुष्यें उपयोगीं पडलीं. एक परशुराम त्रिंबक कुळकर्णी हा हल्लींच्या औंधच्या पंतप्रतिनिधीचा मूळपुरुष; दुसरा संक्राजीनारायण गौंडेकर हा हल्लींच्या भोरच्या पंतसचिवाचा मूळपुरुष. हे दोघेही मोठे हुषार व मेह-नती होते. मोंगल लोकांच्या ताब्यांत कांहीं किल्ले होतेच. त्यांचे लोक धान्याकरितां त्या किल्ल्यांच्या आसपास फिरत असत. असे लोक सांप-डले कीं त्यांस मार देण्याचा क्रम रामचंद्रपंतानें चालविला त्यामुळें मोंगलांना मराठ्यांचा चांगला वचक बसला व ते इकडे तिकडे फिर-ण्याससुद्धां घाबरूं लागले.

बादशहानें विजापूर, गोवळकोंडा व महाराष्ट्र हे तिन्ही प्रांत जिंकले खरे, पण खरोखरी पाहिलें तर त्या तिन्ही प्रांतांतून त्यास कवडीचाही वसूल होईना. विजापूर व गोवळकोंड्याच्या शेकडों घोडेस्वारांनीं निरनिरा-ळ्या टोळ्या टोळ्या करून व "मराठे" हें टोपण नांव घेऊन नाशीक, बीड व बेदर या ठिकाणीं लुटण्याचा सपाटा लाविला. त्यामुळें बादशहा-च्या फौजेस मुख्य मुख्य शहरें व किल्ले यांचा बदोबस्त ठेवतां ठेवतांच पुरे पुरेसें झालें. इतक्यांत धनाजी जाधव व संताजी घोरपडे महाराष्ट्रांत

११७६

परत आले. मग तर काय विचारावें ? महाराष्ट्रांत जी दंगल माजली त्यायोगें बादशहास सळो कीं पळो झालें.

धनाजी व संताजी परत येतांच रामचंद्रपंतानें वाईच्या मोंगल फौजदारावर हल्ला करण्याची त्यांस सूचना केली. त्यांना काय अवकाश ? त्यांनीं एकाएकीं हल्ला करून फौजदारास कैद केलें व तेथें आपलें ठाणें बसाविलें. संताजीनें दुसरी मोहीम करून मिरजेच्या फौजदारावर हल्ला करून तेंही ठाणें मारलें. रामचंद्रपंतानें त्यास या पराक्रमाबद्दल मिरजेच्या देशमुखीची सनद दिली. धनाजी व संताजी यांचे हे पराक्रम पाहतांच इतर मराठे शिलेदारांस उमेद आली, व त्यांनीं ईर्षेनें मोंगलांच्या मुलखांतून खंडणी उपटण्यास आरंभ केला. या शिलेदार मंडळींत पवार, आटोळे, थोरात हे मुख्य होते. ते चौथाई व सरदेशमुखीबरोबर फौजेच्या गुजाऱ्याकरितां घांसदाणा या नवीन कराची वसुली करूं लागले. राजारामास त्यांच्या पराक्रमाची बातमी लागतांच त्यांनीं दुप्पट जोरानें आपलें काम चालवावें याकरितां त्यानें या तिन्ही शिलेदारांस गौरवाचीं पत्रें पाठविलीं; व पवार यास विश्वासराव, आटोळे यास ‘ समशेरबहादुर ’, थोरातास ‘ दिनकरराव ’ असे किताब दिले. या वेळेस संक्राजी नारायण गांडेकर यानें युक्तीनें राजगड किल्ला मोंगलांपासून घेतला. त्याच्या मागून परशुराम त्रिंबक यानें पन्हाळा सर केला; अशी ही महाराष्ट्रांत दंगल माजली व जिकडे तिकडे मराठ्यांची फत्ते व बादशहाची फजिती सुरू होती. औरंगजेबास जिंजीकडे सैन्याचा पुरवठा करतां येऊं नये म्हणून धनाजी व संताजी या दोघांनीं एक जंगी स्वारी करण्याचें मनांत योजिलें. त्यांनीं बरेंच सैन्य जमा करून गोदावरीच्या कांठच्या सर्व प्रदेशांत दंगा माजवून देण्याचा बेत केला. हा प्रदेश मोठा सुपीक होता. धनाजी व संताजी यांचे हाताखालीं लष्कराची धाड जी निघाली ती या प्रदेशावर येऊन पडली. मग स्वदेशरक्षणार्थ बादशहाचा पराभव करण्यासाठीं झटणाऱ्या मराठे वीरांनीं

त्या सुपीक प्रदेशाचा अगदीं फन्ना उडविला. तो प्रदेश उध्वस्त पडल्यामुळें, बादशहाच्या सैन्याचें फारच नुकसान झालें. शिवाय उत्तरेकडून धान्य घेऊन मोठमोठे तांडे येत, त्यांजबरोबर फौजेचा बंदोबस्त असे; पण मराठ्यांच्या सैन्यापुढें ती फौज किती ! संताजीनें असे भले मोठे तीन तांडे वाटेंत गांठले व लुटले. त्यांच्या बंदोबस्तास मोठमोठे मोंगल सरदार फौजेसकट होते. त्यांजवर संताजीनें निकराचा हल्ला केला, सरदारांस पकडलें, व त्यांजपासून मोठमोठ्या खंडण्या घेतल्यावर त्यांस जीवदान देऊन सोडलें. धान्याचा पुरवठा जेव्हां बंद पडूं लागला तेव्हां बादशहास फार काळजी लागली. त्यानें जिंजी घेऊन राजारामास पकडलें म्हणजे हा मराठ्यांचा त्रास बंद पडेल असें समजून जिंजीकडे आपला मुलगा कामबक्ष व झुल्फिकारखानाचा बाप असदखान या दोघांबरोबर आणखी फौज देऊन जिंजीचें काम लवकर उरकण्यास झुल्फिकारखानास लिहिलें. त्यानें आपल्या लष्करचा मुक्कामहीं हालविला; व जिंजीच्या रोखें आपण चाललों असें दाखविलें. परंतु बादशहाची अटकळ अगदीं चुकली. संताजीनें आपला मुलूख लुटण्याचें काम पहिल्यासारखेंच जोरांत चालविलें. वऱ्हाडाकडे परसोजी भोंसल्यानें धुमाकूळ मांडला. खंडेराव दाभाड्यानें गुजराथेचा पिच्छा पुरविला. हैबतराव निंबाळकर गंगथडी ( गोदावरीच्या कांठचा मुलूख ) उजाड करीत होता. या सर्वांवर संताजी घोरपडे व धनाजी जाधव ताण करीत होते. औरंगजेबाची निराशा होऊन फिरून त्यानें आपला मुक्काम भीमेच्या कांठीं आणला. औरंगजेब अगदीं मेटाकुटीस आला. तो म्हणाला " यांच्यावर फौज पाठवावी तर हे मराठे पळून जातात. माझी फौज जरा लांब गेल्याचें यांनीं पाहिलें कीं झाला यांचा धुमाकूळ सुरू. पाऊस, थंडी, ऊन व अंधार कांहींही न पाहतां घोड्यांवरच हरभरे, भाकरी, चटणी, कांदे खाऊन धांवतात. यांस कसें जिंकावें ? एका

मुलखात दंगा करतात म्हणून यांजवर फौज पाठवावी तर दुसरीकडे जाऊन ठाणीं घेतात; मुलूख मारितात. खरोखर हे अदमी नव्हत हा भूतखाना आहे ”

---

## २९ पुनः वादळ.



**राजाराम** जिंजीस गेल्याची बातमी औरंगजेबास कळतांच त्यानें आपला पराक्रमी सरदार झुल्फिकारखान यास जिंजी काबीज करण्याकरितां पाठविलें. झुल्फिकारखानानें रायगड घेऊन नुकतीच बादशहाची मर्जी संपादन केली होती. झुल्फिकारखान हा बादशहाचा वजीर आसद्खान याचा मुलगा होता. तेव्हां दरबारांत त्यानें रायगड घेऊन बजावलेल्या कामगिरीची अतिशय तारीफ झाली; व जिंजी घेण्याचें महत्वाचें काम निघतांच त्याची त्या कामावर नेमणूक झाली. झुल्फिकारखान सैन्य घेऊन येत आहे असें कळतांच प्रल्हाद निराजीनें पूर्वी विजापुराकडे असलेल्या एका मुसलमान सरदारास त्याजवर पाठविलें; परंतु तो सरदार झुल्फिकारखानास मिळाला व झुल्फिकारखान जिंजीवर चालून आला. हा किल्ला अनेक डोंगर सांधून बांधलेला आहे. त्यामुळें त्याचा घेर फार आहे. झुल्फिकारखानास आपल्याजवळ असलेली फौज वेढा घालण्यास पुरणार नाहीं असें वाटलें. म्हणून त्यानें बादशहास आणखी फौज पाठविण्याविषयीं लिहिलें, व नवी फौज येईपर्यंत तंजावर वगैरे ठिकाणें काबीज करण्याकरितां तो दक्षिणेंत गेला. तंजावरकडील ठिकाणांपासून जबर खंडणी उकळून खान परत आला तरी बादशहाकडून मदत आली नाहीं. दलपतराम नांवाच्या बुंदेले सरदाराच्या हाताखालीं कांहीं फौज आली, पण ती फारच थोडी होती. यामुळें लढाईचें काम ढिलाईनें चाललें होतें. औरंग-

जेब तरी काय करील ? तो फौज कोठली पाठविणार ? महाराष्ट्रांत चाललेली दंगल थांबवितां थांबवितां ह्याच्या नाकीं नव आले होते, त्याच कामास त्याच्याजवळची फौज पुरेना. इकडे झुल्फिकारखान आणखी फौज पाठवा म्हणून सारखें टुमणें लावून बसला होता. शेवटीं मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें प्रथम जिंजी घ्यावी व राजारामास पकडावें, मग महाराष्ट्रांतील गोंधळ आपोआप शमेल अशा समजुतीनें बादशहानें वजीर आसदखान व आपला मुलगा कामबक्ष यांस झुल्फिकारखानास कुमक करण्याकरितां कर्नाटकांत पाठविलें.

बादशहानें मदत पाठविली खरी परंतु मध्यंतरीं एक तिसरेंच कुलंगडें उत्पन्न होऊन वेढ्याचें काम रें रें करीत चाललें. त्याचें कारण असें. बादशहानें कामबक्ष यास या कामावर मुख्य नेमिलें हें पाहून झुल्फिकारखान असंतुष्ट झाला. मी रायगड घेऊन बादशहाची उत्कृष्ट कामगिरी बजावली असतां मुख्य अधिकार बादशहानें कामबक्षास दिला याबद्दल झुल्फिकारखान यास अत्यंत वाईट वाटलें. आसदखान झुल्फिकारखानाचा बापच ! अर्थातच आपल्या मुलाचा झालेला अपमान त्यास मुळींच सहन झाला नाहीं. यामुळें ते दोघे बापलेंक वेढ्याचें काम नेटानें न करतां सर्वदा उदासीन असत. मराठेही कांहीं स्वस्थ बसले नव्हते. मोंगलांच्या मुख्य सरदारांत फूट पडली आहे असें पाहतांच राजारामानें झुल्फिकारखानाशीं गुप्तपणें बोलणें सुरू केलें. खानाचें मन बादशहाविरुद्ध फारच विटलें होतें. तो मराठ्यांच्या बोलण्यास वश झाला व असें ठरलें कीं, कामबक्षाची जिंजी घेण्याची मसलत मुळींच सिद्धीस जाऊं द्यावयाची नाहीं. औरंगजेब मात्र मनांत समजत होता कीं, आतां जिंजी हस्तगत होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. जिंजीस वेढा घालणाऱ्या मोंगल सरदारांत अशी फूट पडली असतां त्यांवर आणखी धोंड कोसळली. संताजी व धनाजी हे महाराष्ट्रांत बादशहाच्या सैन्याचा पिच्छा पुरवीत होते. त्यांनीं पाहिलें कीं, बादशहाचें बरेंच सैन्य जिंजीकडे गेलें आहे.

तेव्हां त्याचा समाचार घेण्यासाठीं ते दोघेजण वीस हजार सैन्य घेऊन निघाले व बादशहाच्या सैन्यास गुंगारा देऊन कर्नाटकांत उतरले. धनाजी सात आठ हजार सैन्य घेऊन अगदीं जिंजीजवळ आला व पोहोंच याबरोबर त्यानें बादशहाच्या सैन्याचे मोर्चावर हल्ला केला. मोंगल सैन्य अस्ताव्यस्त पसरलें होतें. व्यवस्था करून युद्धाची तयारी करण्यापूर्वींच एकीकडून धनाजीच्या सैन्यानें व दुसरीकडून किल्ल्यांतील सैन्यानें असे दोन जोराचे हल्ले त्याजवर केल्यामुळें मोंगल सैन्यांत कत्तल उडाली. इतक्यांत अलीमर्दानखान नांवाच्या मोंगल फौजदाराचा कावेरीपाक येथें सपशेल पराभव करून संताजीही जिंजीस येऊन दाखल झाला, मग काय विचारावें ? मोंगलांची जी कांहीं तारांबळ उडाली ती सांगतां पुरवत नाहीं. त्यांना दाणावैरण मुळींच मिळेनाशी झाली. बादशहाचें आणि त्या फौजेचें दळणवळण बंद पडलें. इकडील बातमी तिकडे नाहीं व तिकडील इकडे नाहीं. अशा विपत्तींत मोंगल फौज दिवस कंठीत असतां पहिल्यानें बादशहास वेड लागलें अशी बातमी उठली. मागून तर अशी कंडी पिकली कीं, बादशहा मरण पावला. मग त्या फौजेंत अत्यंत गोंधळ माजला. त्या फौजेंत उडालेला गोंधळ पाहून मराठ्यांनीं कामबक्षाशीं बोलणें लावलें कीं, आम्हीं तुला दिल्लीच्या बादशहाच्या गादीवर बसवितों. तें ऐकून कामबक्ष खूष झाला. व त्यानें आपल्या फौजेस कूच करावयास तयार होण्याचा हुकूम दिला. लागलींच आसदखान व झुल्फिकारखान या दोघांनीं कामबक्षावर मराठ्यांशीं ऐक्य केल्याचें कुभांड रचून त्यास नजरकैद केलें. असा मोंगल फौजेंत गोंधळ माजला असतां मराठ्यांनीं तिजवर हल्ल्यांवर हल्ले करून तीस अगदीं टेंकीस आणलें. शेवटीं आसदखानानें संताजीशीं तह ठरविला. त्यांत मोंगलांस मराठ्यांनीं वांदिवाशास जाऊं द्यावें व तेथें असतां बादशहाचा हुकूम येईल त्याप्रमाणें मोंगलांनीं वागावें, मराठ्यांनीं त्रास देऊं नये, असें ठरलें, वजिराचें पत्र पोंचतांच बादशहानें वजीर व मुलगा पाठवि-

जेब तरी काय करील ? तो फौज कोठली पाठविणार ? महाराष्ट्रांत चाललेली दंगल थांबवितां थांबवितां ह्याच्या नाकीं नव आले होते, त्याच कामास त्याच्याजवळची फौज पुरेना. इकडे झुल्फिकारखान आणखी फौज पाठवा म्हणून सारखें टुमणें लावून बसला होता. शेवटीं मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें प्रथम जिंजी घ्यावी व राजारामास पकडावें, मग महाराष्ट्रांतील गोंधळ आपोआप शमेल अशा समजुतीनें बादशहानें वजीर आसदखान व आपला मुलगा कामबक्ष यांस झुल्फिकारखानास कुमक करण्याकरितां कर्नाटकांत पाठविलें.

बादशहानें मदत पाठविली खरी परंतु मध्यंतरीं एक तिसरेंच कुलंगडें उत्पन्न होऊन वेढ्याचें काम रें रें करीत चाललें. त्याचें कारण असें. बादशहानें कामबक्ष यास या कामावर मुख्य नेमिलें हें पाहून झुल्फिकारखान असंतुष्ट झाला. मी रायगड घेऊन बादशहाची उत्कृष्ट कामगिरी बजावली असतां मुख्य अधिकार बादशहानें कामबक्षास दिला याबद्दल झुल्फिकारखान यास अत्यंत वाईट वाटलें. आसदखान झुल्फिकारखानाचा बापच ! अर्थातच आपल्या मुलाचा झालेला अपमान त्यास मुळींच सहन झाला नाहीं. यामुळें ते दोघे बापलेक वेढ्याचें काम नेटानें न करतां सर्वदा उदासीन असत. मराठेही कांहीं स्वस्थ बसले नव्हते. मोंगलांच्या मुख्य सरदारांत फूट पडली आहे असें पाहतांच राजारामानें झुल्फिकारखानाशीं गुप्तपणें बोलणें सुरू केलें. खानाचें मन बादशहाविरुद्ध फारच विटलें होतें. तो मराठ्यांच्या बोलण्यास वश झाला व असें ठरलें कीं, कामबक्षाची जिंजी घेण्याची मसलत मुळींच सिद्धीस जाऊं द्यावयाची नाहीं. औरंगजेब मात्र मनांत समजत होता कीं, आतां जिंजी हस्तगत होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. जिंजीस वेढा घालणाऱ्या मोंगल सरदारांत अशी फूट पडली असतां त्यांवर आणखी धोंड कोसळली. संताजी व धनाजी हे महाराष्ट्रांत बादशहाच्या सैन्याचा पिच्छा पुरवीत होते. त्यांनीं पाहिलें कीं, बादशहाचें बरेंच सैन्य जिंजीकडे गेलें आहे.

तेव्हां त्याचा समाचार घेण्यासाठीं ते दोघेजण वीस हजार सैन्य घेऊन निघाले व बादशहाच्या सैन्यास गुंगारा देऊन कर्नाटकांत उतरले. धनाजी सात आठ हजार सैन्य घेऊन अगदीं जिंजीजवळ आला व पोहोंच याबरोबर त्यानें बादशहाच्या सैन्याचे मोर्चावर हल्ला केला. मोंगल सैन्य अस्ताव्यस्त पसरलें होतें. व्यवस्था करून युद्धाची तयारी करण्यापूर्वींच एकीकडून धनाजीच्या सैन्यानें व दुसरीकडून किल्ल्यांतील सैन्यानें असे दोन जोराचे हल्ले त्याजवर केल्यामुळें मोंगल सैन्यांत कत्तल उडाली. इतक्यांत अल्लीमर्दानखान नांवाच्या मोंगल फौजदाराचा कावेरीपाक येथें सपशेल पराभव करून संताजीही जिंजीस येऊन दाखल झाला, मग काय विचारावें ? मोंगलांची जी कांहीं तारांबळ उडाली ती सांगतां पुरवत नाहीं. त्यांना दाणावैरण मुळींच मिळेनाशी झाली. बादशहाचें आणि त्या फौजेचें दळणवळण बंद पडलें. इकडील बातमी तिकडे नाहीं व तिकडील इकडे नाहीं. अशा विपत्तींत मोंगल फौज दिवस कंठीत असतां पहिल्यानें बादशहास वेड लागलें अशी बातमी उठली. मागून तर अशी कंडी पिकली कीं, बादशहा मरण पावला. मग त्या फौजेंत अत्यंत गोंधळ माजला. त्या फौजेंत उडालेला गोंधळ पाहून मराठ्यांनीं कामबक्षाशीं बोलणें लावलें कीं, आम्हीं तुला दिल्लीच्या बादशहाच्या गादीवर बसवितों. तें ऐकून कामबक्ष खूष झाला. व त्यानें आपल्या फौजेस कूच करावयास तयार होण्याचा हुकूम दिला. लागलींच आसदखान व झुल्फिकारखान या दोघांनीं कामबक्षावर मराठ्यांशीं ऐक्य केल्याचें कुभांड रचून त्यास नजरकैद केलें. असा मोंगल फौजेंत गोंधळ माजला असतां मराठ्यांनीं तिजवर हल्ल्यांवर हल्ले करून तीस अगदीं टेंकीस आणलें. शेवटीं आसदखानानें संताजीशीं तह ठरविला. त्यांत मोंगलांस मराठ्यांनीं वांदिवाशास जाऊं द्यावें व तेथें असतां बादशहाचा हुकूम येईल त्याप्रमाणें मोंगलांनीं वागावें, मराठ्यांनीं त्रास देऊं नये, असें ठरलें, वजिराचें पत्र पोंचतांच बादशहानें वजीर व मुलगा पाठवि-

ण्यांत आपण चूक केली असें ताडलें व त्या दोघांना परत येण्याचा हुकूम पाठविला. जिंजीस वेढा देणाऱ्या सर्व मोंगल फौजेचा अधिकार झुल्फिकारखानाकडे आला. तो मराठ्यांनीं घेतलेले किल्ले परत घेण्याकरतां तंजावरकडे गेला.

या अवकाशांत संताजीनें मोंगलांच्या ताब्यांतील कर्नाटकांत धुमाकूळ उडविला. त्याची बातमी औरंगजेबास लागतांच त्यानें आपल्याजवळची कांहीं फौज त्याच्या पारिपत्याकरितां पाठविली. विजापूरकर्नाटकाचा फौजदार कासीम हाही तीस मिळाला. मोंगल फौज संताजीवर चाल करून येऊं लागली. संताजी कसला वस्ताद ! त्यानें मोंगलांस तसेंच पुढें येऊन दिलें. मग एके दिवशीं मोंगल फौज मुक्काम करण्याच्या विचारांत होती, व अघाडीचे लोक तंबू ठोकीत होते. त्यांना दाणावैरण मिळूं देऊं नये, दिवसा हल्ले करावे, रात्रीं बाण टाकावे असें करून त्या मोंगल फौजेचे मराठ्यांनीं फार हाल मांडले. मोंगलांची फौज अगदीं गांगरून गेली होती. शेवटीं त्यांना दुधारी येथील गढींत कांहींसा आश्रय मिळाला. परंतु भोंवतालीं मराठ्यांनीं वेढा दिला तेव्हां आंत मोंगलांना उपास पडूं लागले. या फौजेची झालेली अशी दशा बादशहास कळून त्यानें हिम्मतखान नांवाच्या एका सरदाराबरोबर तिच्या मदतीस कांहीं फौज पाठविली. परंतु संताजीनें हिम्मतखान जवळ येतांच त्याच्यावर हल्ला करून असा मारा केला कीं, कसा तरी तो जीव वांचवून पळून गेला. शेवटीं गढींत अडकलेली फौज मराठ्यांस शरण आली. संताजीनें मोंगल सरदारांपासून मोठमोठ्या खंडण्या घेऊन त्यांस सोडून दिलें. कासीमखानास मराठ्यांस खंडणी भरून स्वतःचा जीव बचावण्याची लाज वाटली. म्हणून त्यानें विष खाऊन प्राण दिला. हिम्मतखान पराभव पावून गेला. तो फिरून आणखी फौज घेऊन परत आला. मराठ्यांची व मोंगलांची एका मैदानांत गांठ पडली. पहिल्यानें मराठे हुलकावणीदाखल पळून गेले. मोंगलांस वाटलें कीं, मराठे घाबरले म्हणून पळतात

आहेत. मोंगल पाठलाग करूं लागले. मग जरा डोंगराळ जागा लागतांच मराठे उलटले व मोंगलांवर त्यांनीं जोरानें चाल केली. कापाकापी सुरू होऊन खुद्द हिम्मतखानच पडला. तेव्हां मोंगलांच्या सैन्याची दाणादाण होऊन त्यांचें सर्व सामानसुमान मराठ्यांच्या हातीं लागलें.

तंजावरकडील मोहीम संपवून झुल्फिकारखानानें जिंजीस फिरून वेढा घातला. परंतु त्यानें वेढ्याचें काम ढिलाईनें चालविलें होतें. औरंगजेब आतां अगदीं म्हातारा झाला होता. त्याचें वय ऐंशीच्यावर गेलें होतें. तेव्हां त्याच्या मरणानंतर आपली व्यवस्था काय ? असा प्रत्येक मोंगल सरदारापुढें प्रश्न होता. त्याच्या कोणत्याही मुलांत सर्व हिंदुस्थानांत एक सत्ता चालविण्याची कुवत नव्हती हें उघड दिसत होतें. तेव्हां ठिकठिकाणीं स्वतंत्र राज्यें होणार हें अगदीं निश्चित होतें. झुल्फिकारखानास आपणास दक्षिणेकडे एखादें राज्य मिळावें असें वाटत होतें; व राज्य मिळण्यास जवळ सैन्य पाहिजे तें सैन्य आयतेंच त्याच्या हाताखालीं होतें; याकरितां त्यानें जिंजीचा वेढा तसाच लांबणीवर टाकण्याचा विचार केला होता. परंतु त्याला असें कळलें कीं बादशहा अगदीं निकरावर आला आहे व जिंजी लवकर हस्तगत न झाल्यास त्याचा आपणास परत बोलाविण्याचा विचार आहे. हें ऐकतांच हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागण्यांत अर्थ नाहीं अशी झुल्फिकारखानाची खात्री झाली; व त्यानें वेढ्याचें काम पुन्हां जोरांत चालविलें.

मोंगलांनीं वेढ्याचें काम जोरांत चालविलें; तेव्हां राजाराम व त्याचे कारभारी यांना चिंता पडली. जिंजीस येऊन सात वर्षें झालीं होतीं. या सात वर्षांत औरंगजेब बादशहाची मराठ्यांच्या सामर्थ्याविषयीं बरीच खात्री झाली होती. महाराष्ट्रांत तर शिलेदारांस असा कांहीं आवेश चढला होता कीं, त्याच्यायोगानें बादशहा अगदीं टेकीस आला. मग आतां महाराष्ट्रांत परत जाण्यास कांहीं हरकत नाहीं असें जिंजींतील मराठे कारभाऱ्यांनीं ठरविलें. परंतु मोंगलांच्या वेढ्यांतून कसें सुटावयाचें ?

मोंगल सैन्यांत मराठे सरदार नोकरीस आहेत व त्यांचें मन वळवून पहावें असा बेत झाला. खंडो बल्लाळ चिटणिसानें ती कामगिरी पत्करिली. राणोजी व गणोजी शिर्के हे दोघे नैर्ऋत्येच्या बाजूस मोर्च्यांत होते. त्यांचें मन वळविण्याचा बेत करून खंडो बल्लाळ त्यांजकडे गेला. शिर्के यांचा भोंसले घराण्यावर, संभाजीनें मागें ' शिरकाण ' ( जो जो शिर्के दिसेल त्याची कत्तल करावयाची ) केलें होतें, तेव्हांपासून दांत होता. खंडो बल्लाळानें ' राजाराम वगैरेंची तुम्हीं सुटका करावी ' अशी गोष्ट काढतांच शिर्के यांनीं साफ सांगितलें कीं ' आमच्यानें हें होणार नाहीं. भोंसल्यांचा वंश अजिबात नष्ट झाला तरी आम्हांला आनंदच होईल. हें शिर्क्यांचें भाषण ऐकून खंडो बल्लाळास वाईट वाटलें. तो मोठ्या आर्जवानें शिर्क्यांस म्हणाला ' या समयास तुम्ही बोलतां हें योग्य नव्हे. तुमचें शिरकाण केलें तसें माझ्या प्रत्यक्ष वडिलांस संभाजीनें हत्तीच्या पायीं दिलें. पण त्यांचें आतां काय ? आतां आम्ही मोंगलांशीं झगडत आहों ते काय भोंसल्यांसाठीं ? हा क्षुद्र विचार तुम्हीं आपल्या मनांत सुद्धां येऊं देऊं नका. आम्हीं झटत आहों ते **हिंदूंच्या दौलतीसाठीं** झटत आहों. आज राजाराम वगैरे मंडळी वांचली तर हिंदूंचें राज्य वांचेल हें तुम्हीं लक्षांत आणा व मग काय करावयाचें तें करा. "
धन्य खंडो बल्लाळ, धन्य आहे तुझी ! तूं आपलें धर्मराज्य कायम ठेविण्याकरितां प्रत्यक्ष पित्याचा खून विसरलासना ! केवढें हें तुझें स्वराज्यप्रेम ! केवढी स्वार्थनिरपेक्षता ! जणूं मूर्तिमंत राष्ट्राभिमान तुझ्या देहांत शिरून तूं राष्ट्राभिमानाचा दिव्य पुतळा बनून गेलास ! तें दिव्य भाषण ऐकल्यावर शिर्के मराठ्यांस जाऊं देण्याचें काम करण्यास तयार झाले यांत काय नवल ? शिर्क्यांनीं ' दाभोळचें वतन आम्हांस द्यावें ' असें खंडो बल्लाळास म्हटलें. खंडो बल्लाळाचें स्वतःचेंच तें वतन होतें. कसेंही करून राजाराम आतां सुटला पाहिजे असें खंडो बल्लाळास वाटत असल्यामुळें तो त्या वतनावर पाणी सोडण्यास तयार झाला. वतन मिळतांच

शिर्के खूष झाले व राजाराम आदिकरून मंडळीस संतोषानें सोडून देण्यास तयार झाले. एके रात्रीं शिर्क्यांच्या गोटांतून राजाराम व त्याचे कारभारी निघून गेले. मागन शके १६१९ ( सन १७९८ ) च्या शेवटीं झुल्फिकारखानानें जिंजीचा किल्ला सर केला. परंतु राजाराम निसटून गेल्यानंतर तो घेतल्यामुळें धान्य गेल्यावर भूस मिळालें तर जसा आनंद होत नाहीं तसेंच तो किल्ला हातीं आल्याबद्दल औरंगजेबास आनंद वाटला नाहीं हें उघड आहे.

---

## ३० तारूं बुडतें कीं काय ?



**राजाराम** जिंजीहून महाराष्ट्रांत आल्याचें मागील गोष्टींत सांगितलें. त्याच्यामागें कर्नाटकांत धनाजी जाधव व संताजी घोरपडे हे होते. या दोन मराठे वीरांनीं एकीनें वागून मोंगलांशीं सामना दिला असता तर मोंगलांचा चुराडा उडण्यास मुळींच अवकाश लागला नसता. परंतु दुर्दैवानें संताजी व धनाजी या दोघांत तंटे उत्पन्न होऊं लागले. राजाराम जिंजीस असतांना त्याच्याही मनांत संताजी मोंगलांस फितूर असावा असा संशय आला होता, पण प्रल्हाद निराजी या हुशार व स्वामिकार्यतत्पर मुत्सद्यानें संताजीची बाजू संभाळली होती. पण प्रल्हाद निराजी जिंजीचा वेढा चालूं असतांनाच वारला. धनाजी व संताजी यांजमधील तंटा फिरून बळावला. राजाराम महाराष्ट्राकडे निघून गेल्यावर एके दिवशीं धनाजीनें संताजीवर हल्ला केला. संताजीची शिस्त कडक असे, त्यामुळें त्याच्या लष्करांतील लोक त्याच्यावर खूष नसत म्हणून त्याचें लष्करही धनाजीच्या लष्करास मिळालें. संताजी प्राण बचाविण्याकरितां पळूं लागला. एके प्रसंगीं त्याचा मुक्काम

म्हसवडास प्रडला. तेथील देशमुख माने याचें पारिपत्य संताजीनें जिंजीच्या स्वारींत केलें होतें तो दंश मनांत धरून माने याची स्त्री राधाबाई म्हणून होती तिनें संताजीस मेजवानीच्या मिषानें राहवून घेतलें. नंतर दुसरे दिवशीं अडचणीच्या जाग्यांत माने याच्या स्त्रीनें दोनशें बरकंदाज दबा धरून बसविले होते त्यांनीं संताजी व त्याजबरोबरची बहुतेक मंडळी गोळ्या घालून ठार केली. संताजीसारख्या सेनापतीचा वध झाला यांत कांहीं नवल नाहीं. पण मान्याच्या स्त्रीसारखीं नीच कुलांगार माणसें त्यावेळीं महाराष्ट्रांत निपजलीं हें मात्र अत्यंत आश्चर्यकारक व आतिशय दुःखकारक आहे. संताजीच्या मृत्यूनें मराठ्यांचें फार मोठें नुकसान झालें.

राजाराम जिंजीहून निघून विशाळगडास सुखरूप येऊन पोहोंचला. तेथें आल्यावर राज्यव्यवस्थेंत त्यानें कांहीं फेरफार केले. आजपर्यंत रायगड ही मराठी राज्याची राजधानी होती ती बदलून आतां सातारा शहर हें मराठ्यांच्या गादीचें मुख्य ठिकाण झालें. इतके दिवस किल्ल्यांच्या आश्रयानेंच मोंगलांशीं युद्धें करावीं लागत, पण आतां मराठ्यांचें सामर्थ्य वाढलें होतें, तेव्हां मैदानाच्या मुलखांत देखील मोंगलांशीं झुंज देणें मराठ्यांस सोपें वाटूं लागलें होतें. तेव्हां मैदानांतल्या मुख्य शहरीं गादी असणें सोईचेंच होतें. धनाजी जाधव यास सेनापतिपद देण्यांत आलें.

१ संताजीच्या मृत्यूसंबंधाचा मुद्दा वादग्रस्त आहे. पत्रें यादींतील पृष्ठ ३६२ मध्यें घोरपड्यांचे हकीकतींत हा मजकूर आहेः– "श्रीमन्महाराज राजारामसाहेब छत्रपती यांनीं किल्ले शिवगड येथें शके १६२१ सालीं कैलासवास केला. पुढें संतांजी घोरपडे यास म्हसवडकर माने यांनीं दगाफटका करून शके १६३५ (इ. स १७१३।१४) या सालीं मारिलें." प्रो. यदुनाथ सरकार (पाटणा कॉलेज), यांनीं आपल्या औरंजेबाच्या चरित्रांत राजाराम वारल्यानंतर धनाजी व संताजी असे दोघे मराठे सेनापती मोंगल सैन्याचा सारखा पिच्छा पुरवीत होते, असें लिहिलें आहे. त्यावरून राजारामानंतर संताजी वारला असेंच त्यांचें मत आहे असें दिसतें.

जनार्दनपंत हणमंते आमात्य जिंजी येथें वारल्यामुळें फिरून आमात्यपद रामचंद्रपंतास मिळालें. संक्राजी मल्हार सचिव काशीस निघून गेल्यामुळें संक्राजी नारायण गौडेकर याची सचिवाच्या जागीं नेमणूक झाली. मराठ्यांचा आरमारापैकीं सरदार सिधोजी गुजर वारला होता. तेव्हां कान्होजी आंग्रे यास आरमारसंबंधीं सर्व अधिकार दिले. सुवर्णदुर्ग व कुलाबा हीं समुद्रावरचीं मुख्य ठाणीं होतीं. खंडो बल्लाळ चिटणीस यानें जिंजीस फारच महत्वाची कामगिरी केली होती त्याजबद्दल त्याला चौल प्रांतीं वतन दिलें. तसेंच परशुराम त्रिंबक, आटोळे, दाभाडे, पवार इत्यादि ज्या ज्या मंडळींनीं महाराष्ट्रांत मोंगलांशीं युद्ध चालवून राष्ट्राची कामगिरी बजाविली होती त्या सर्वांस जहागिरी व इनामें देण्यांत आलीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, या सर्व मराठे सरदारांस आपआपल्यापरी मोंगलांची रग जिरविण्याचा दुप्पट हुरूप चढला व आपआपलें काम ते जास्त नेटानें व उत्साहानें करूं लागले.

राजारामानें शके १६२१ चा पावसाळा सरतांच खानदेश-वऱ्हाडाकडे एक मोठी मोहीम करण्याचा निश्चय केला. त्याला परसोजी भोंसले, हैबतराव निंबाळकर, नेमाजी शिंदे, आटोळे वगैरे मराठे सरदार येऊन मिळाले. त्या वेळीं मराठ्यांची जितकी फौज एकत्र जमली तितकी पूर्वीं कधींही जमली नव्हती. राजारामानें बादशहाच्या छावणीवर हल्ला करून शाहूस सोडविण्याचा प्रयत्न केला, पण थोडी चुकामूक पडली. शाहू व बादशहा दोघेही बेगमेच्या गोटाकडे गेले होते, म्हणून राजारामाचा बेत फसला. मग तें मराठी लष्कर उत्तरेकडे चाललें. वाटेनें जातांना चौथाई व सरदेशमुखी हे हक्क वसूल करण्याचा मराठ्यांनीं सपाटा चालविला. जे मुकाट्यानें वसूल देत त्यांस मराठ्यांचा मुळींच त्रास होत नसे. ज्यांच्या अंगांत वसूल देण्याचें सामर्थ्य नसे त्यांजपासून खतें लिहून घेण्यास मराठे खुषी असत. परंतु जे मराठ्यांचा वसूल करण्याचा हक्क धाब्यावर बसविण्याचा प्रयत्न करीत त्यांचें मात्र

कडक शासन केल्याशिवाय मराठी फौज रहात नसे. अशा रीतीनें हक्क वसूल करीत करीत मराठ्यांच्या फौजा गंगथडी (गोदावरीकांठ), बागलाण, खानदेश, वऱ्हाड, येथवर जाऊन पोहोंचल्या. परत येतांना राजारामानें एकएक सरदार एकएका प्रांतांत नेहमीं वसूल करण्याकरितां ठेविला. परसोजी भोंसल्यानें वऱ्हाडचा वसूल करावा म्हणून त्यास वऱ्हाडांत ठेविलें. व त्याचप्रमाणें खानदेशांत नेमाजी शिंदे, बागलाणांत खंडेराव दाभाडे, गंगथडींत हैबतराव निंबाळकर असे सरदार ठेविले. अशी व्यवस्था लावून राजाराम माघारीं फिरला. तो जालना शहरची खंडणी वसूल करीत होता. इतक्यांत झुल्फिकारखानाच्या हाताखालीं एक मोंगलांच्या फौजेची टोळी मराठ्यांवर आली. मोंगल मोठ्या तयारीनें आले होते. असा हा अचानक हल्ला आल्यामुळें राजारामास आपली फौज बचावून नेण्यास बराच त्रास पडला. वाटेंत दगदगीनें त्याला ताप आला; तो नवज्वराचा ताप होता. तो सिंहगडास पोंचला तोंच रक्त ओकूं लागला. थोडे दिवस गेल्यावर शके १६२१ च्या माघ वद्यांत (स. १७००) तो मृत्यु पावला. त्याला चार स्त्रिया होत्या. पहिली प्रतापराव गुजराची मुलगी जानकीबाई, ती अगोदरच वारली होती. दुसरी हंबीरराव मोहित्याची मुलगी ताराबाई, हिला शिवाजी म्हणून दहा वर्षांचा एक मुलगा होता. तिसरी कागलकर घाटग्यांची मुलगी राजसबाई, हिला संभाजी या नांवाचा तीन वर्षांचा मुलगा होता. चौथी अंबिकाबाई, ही राजारामाच्या मृत्यूची बातमी ऐकून सती गेली.

# ३१ आणखी लाटा उसळतात !



राजारामास पकडण्याकरितां जिंजी किल्ला हस्तगत करण्याचा औरंगजेबानें झुल्फिकारखानास आग्रहाचा हुकूम पाठविला. परंतु जिंजी किल्ला हातीं आला तरी राजाराम सुटला त्यामुळें औरंगजेबास बरें वाटलें नाहीं म्हणून मागे एका गोष्टींत सांगितलेंच आहे. राजाराम जिंजीहून सुटून महाराष्ट्रांत आला तेव्हां तर मराठे लोकांस विशेषच हुरूप आला; व ते बादशहाच्या सैन्यास व मुलखास त्रास देऊं लागले. आपण जों जों यांचा नाश करावयाचे प्रयत्न करावे तों तों मराठ्यांची शक्ति वाढतेच आहे हें पाहून औरंगजेबास अत्यंत दुःख झालें. पण तो हट्टी होता म्हणून मराठ्यांचा पराभव करण्याचा त्यानें निश्चय केला. कितीही संकटें आलीं तरी त्यानें त्यांस जुमानिलें नाहीं. त्याचा मराठ्यांचें राज्य नष्ट करण्याचा मूळचा निश्चय जास्तच दृढ झाला व त्यानें आतां एक नवीनच मसलत काढली.

राजाराम महाराष्ट्रांत आल्यावर आतां कर्नाटकांत लढाईचें कांहीं कारण नव्हतें. धनाजी जाधवाच्या व झुल्फिकारखानाच्या कांहीं झटापटी तिकडे चालल्या होत्या; पण त्या म्हणजे जिंजीच्या वेढ्याचें शेंपूट, यापेक्षां त्यांत जास्त कांहीं अर्थ नव्हता. राजाराम महाराष्ट्रांत आला तेव्हां आतां महाराष्ट्रांत युद्धास तोंड लागणार हें उघड दिसत होतें. राजारामानें राज्यकारभाराची व्यवस्था लावल्याबरोबर मोंगलांच्या मुलखावर स्वारी केली. मोंगलांच्या मुलखाची खंडणी मराठे शिलेदारांनीं गोळा केल्यामुळें बादशहाच्या सैन्यास धान्य इत्यादि पदार्थ त्या मुलखांत मुळींच मिळेनासे झाले. या मराठ्यांच्या स्वाऱ्या कशा बंद कराव्या, याचा औरंगजेब विचार करूं लागला. या बंद झाल्याच पाहिजेत, नाहीं तर दिवसेंदिवस आपली फौज कमकुवत होऊन हे मराठे मात्र बलिष्ठ होतील; मग त्यांना कसें

जिंकावयाचें ? असा तो मोठ्या पेंचांत पडला. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं, मराठ्यांचे सर्व किल्ले घ्यावेत म्हणजे यांच्या शक्तीचें मूळच तुटल्यासारखें होईल. एकीकडे किल्ले घ्यावेत व दुसरीकडे मराठ्यांच्या ज्या टोळ्या मुलखास त्रास देत असतील त्यांजवर फौज पाठवून त्या अगदीं नष्ट करून टाकाव्या असा त्यानें मराठ्यांवर दुहेरी हल्ला करण्याचा बेत केला व झुल्फिकारखानास कर्नाटकांतून जलद परत येण्याविषयीं हुकूम पाठविला. मग त्यानें आपल्या सैन्याचे दोन भाग केले. एका टोळीनें किल्ले सर करावयाचे व दुसरीनें मोंगली मुलखांत दंगा करणाऱ्या मराठ्यांचा निःपात करावयाचा. किल्ले घेणारी टोळी बादशहानें स्वतः आपल्या हाताखालीं घेतली व देशावर मराठ्यांचें पारिपत्य करण्याच्या कामावर कामबक्षाचा मुलगा बेदरबक्त व झुल्फिकारखान या दोघांची नेमणक केली. हे दोघे मैदानांत मराठे फौजेशीं लढण्याकरितां निघाले आणि राजाराम जालना शहरची खंडणी घेत असतां, मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें, त्यांनीं त्यांस गांठलें.

औरंगजेब ब्रह्मपुरीहून निघाला व विसाव्या दिवशीं वसंतगडास त्यानें वेढा घातला. तीन दिवसांत तो किल्ला मोंगलांच्या हातीं आला. या मोहिमेवर निघाल्यावर पहिल्यानें हा किल्ला हस्तगत झाला म्हणून औरंगजेबानें त्याचें नांव ‘ कलीद इ फत्ते ’ ( जयाची किल्ली ) असें ठेविलें. पुढें औरंगजेबानें तडक जाऊन साताऱ्यास वेढा घातला. मराठ्यांस वाटत होतें कीं, औरंगजेब वसंतगड घेतल्याबरोबर पन्हाळा घेण्यास जाईल; त्यामुळें सातारा किल्ल्यावर कांहीं व्यवस्था केली नव्हती. दोन महिने पुरेल इतकेंही धान्य त्या किल्ल्यावर नव्हतें. अशा स्थितींत किल्ल्यास मोंगलांचा वेढा पडला. साताराचा किल्ला फार उंच नाहीं, पण चाळीस फूट उंचीचा कडा चोहों बाजूंनीं तुटला असल्यामुळें तो किल्ला मजबूत आहे. औरंगजेबाचें सैन्य पुष्कळ होतें. त्यामुळें चहूं बाजूंनीं मोगली सैन्याचा चांगला वेढा बसला. अशा स्थितींत किल्लेकऱ्यांपाशीं

धान्यसामुग्री नसल्यामुळें लवकरच तो किल्ला मोंगलांच्या हातीं आला असता. परंतु परशुराम त्रिंबक कुळकर्णी परळी किल्ल्यावर होता, त्यानें बादशहाच्या सैन्यांत फितूर करून अजीमशहाच्या वतीनें किल्ल्यावर धान्य पुरविण्याची तजवीज केली. त्यामुळें बरेच दिवस किल्ला मोंगलांच्या हातीं लागेना.

किल्लेकऱ्यांचा मुख्य प्रयागजी प्रभु हा होता. किल्लेकरी पहिल्यापासून नेटानें किल्ल्याचें संरक्षण करूं लागले. मोंगल सैन्यांतील लोक जवळ येऊं लागले तर किल्लेकरी वरून मोठमोठे दगड लोटीत. त्यामुळें बरेच लोक ठार होत. किल्ल्याच्या ईशान्येच्या टोंकाला मंगळाई बुरूज आहे. त्याखालीं मोंगलांनीं दोन सुरुंग तयार केले होते. ते उडवून किल्ल्यांतील सर्व लोकांचा नाश करण्याचा मोंगलांचा विचार होता. बादशहा मोठ्या थाटामाटानें किल्ल्याच्या त्या भागाकडे चालला. किल्ल्यावरच्या शिबंदींतील लोकांस सुरुंगाची बातमी नव्हती. औरंगजेबानें एक थाटामाटाची स्वारी काढली आहे, असें त्यांस वाटलें व ती पाहण्याकरितां सर्व किल्लेकरी मंगळाई बुरुजावर जमले. इतक्यांत मोंगलांनीं पहिल्या सुरुंगास बत्ती दिली. त्याबरोबर एक मोठा आवाज होऊन सर्व माची हदरली, व बुरुजाचा तट उडून बादशहाची स्वारी पाहण्याकरितां जमलेल्या मराठ्यांच्या अंगावर पडली. त्यामुळें पुष्कळ लोक ठार झाले. प्रयागजी मात्र मोठ्या सुदैवानें वांचला. त्याच्यावर जे दगड पडले त्यांत दोन दोहोंकडे उभे व वर तिसरा आडवा असे पडले त्यामुळें त्याला इजा न होतां तो आंत पुरला गेला ! मग त्याला उकरून काढलें तेव्हां तो जिवंत निघाला. मोंगलांनीं शिबंदीचा पूर्ण नाश करण्यासाठीं दुसऱ्या सुरुंगास बत्ती दिली. परंतु तो सुरुंग नीट लागूं न होतां त्यानें डोंगर बाहेर कोसळला व मोंगल सैन्यापैकीं दोन हजार लोक प्राणास मुकले. त्यामुळें मोंगल सैन्याचा विरस झाला. आणखी कांहीं दिवस वेढा चालला असता; पण अजीमशहास आपल्या फितुरीची

बातमी बापास कळेल अशी भीति वाटून तो आंत धान्य जाऊं देईना. त्यामुळें किल्ला मोंगलांच्या स्वाधीन करण्याचें ठरलें. अजीमशहाच्या वतीनें किल्ला हस्तगत झाला म्हणून औरंगजेबानें किल्ल्याचें नांव 'अजीमतारा' ठेविलें. किल्ला मोंगलांच्या हातीं लागण्यापूर्वीं एक महिना राजाराम वारला होता. राजाराम मृत्यु पावला व सातारचा किल्ला हस्तगत झाला या दोन गोष्टींनीं औरंगजेबास आपली नवी मसलत लवकरच यशस्वी होणार असें वाटूं लागलें व त्यानें किल्ले घेण्याचें काम सपाट्यानें चालवून आपली दक्षिणची मोहीम लवकरच संपविण्याचा निश्चय केला.

---

## ३२ बचावलें !



सातारा हातीं येतांच औरंगजेबानें परळीस वेढा घातला. हा किल्ला दोन महिन्यांनीं हस्तगत झाला. परंतु वेढा चालूं असतांनाच पावसाळा लागला होता; त्यामुळें पावसाच्या सरीवर सरी येऊन त्या डोंगराळ मुलखांत त्याच्या सैन्याचे फार हाल झाले. किल्ला घेतल्यावर पावसाळ्यांत मैदानांत छावणी देण्याकरितां मोंगल सैन्य परत जाऊं लागले तेव्हां कृष्णा नदीस उतार नव्हता. सैन्य तसेंच पुरांतून जाऊं लागलें. तेव्हां मोंगलांची फारच दुर्दशा उडाली. शेंकडों लोक मेले, सामान वाहून गेलें. अशा अडचणींत कृष्णा उतरून औरंगजेबानें आपल्या फौजेची माण नदीच्या कांठीं पावसाळ्यापुरती छावणी केली. छावणीस असतांना त्यानें फिरून फौजेंत व्यवस्था लाविली. उत्तर हिंदुस्थानांतून मुबलक पैसा आणविला व निरनिराळ्या मोंगल सुभ्यांतून नवी फौज जमविली. पावसाळा संपल्यानंतर त्यानें पन्हाळ्यास वेढा घातला. वेढा घालणाऱ्या फौजेस धनाजीनें बराच त्रास

दिला, पण दोन महिन्यांनीं आंतील लोक जेरीस येऊन त्यांनीं किल्ला औरंगजेबाच्या स्वाधीन केला. प्रत्येक किल्ल्याच्या वेढ्याची हकीकत देण्याचें कारण नाहीं. औरंगजेबानें किल्ले घेण्याची जी मोहीम सुरू केली ती पुढें पांच वर्षें सारखी चालली होती. शेवटीं त्यानें सिंहगड, राजगड, पुरंदर, इत्यादि उत्तरेकडचे किल्ले सर केले. हे किल्ले घेण्याचें तर काम औरंगजेबानें केलेंच; पण मराठ्यांचा खात्रीनें पराभव करण्याचा उपाय—त्यांच्यांत दुही करणें—हाही त्यानें करून पाहिला. सातारा किल्ल्यावर मोंगलांनीं जेव्हां हल्ला केला तेव्हां त्यावर धान्य सांठविलें नव्हतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. रामचंद्रपंत अमात्यानें मोंगलांस फितूर होऊन त्या किल्ल्याचा बंदोबस्त केला नाहीं, असा ताराबाईस संशय आला होता. औरंगजेबास ही बातमी कळली. तो जन्मतःच कपट शिकला होता. त्यानें रामचंद्रपंतास आपण लिहून धाडलेलें असें एक खोटेंच पत्र तयार करून तें ताराबाईच्या हातीं पडेल असें केलें. ताराबाई व रामचंद्रपंत या दोघांमध्यें कांहीं दिवस वांकडें आलें. परंतु रामचंद्रपंताचें वजन चांगलेंच असल्यामुळें औरंगजेबास कायमची फूट पाडतां आली नाहीं.

राजाराम वारल्यावर ताराबाईनें आपला मुलगा शिवाजी यास गादीवर बसविलें. ताराबाई स्वतः कर्तृत्ववान् होती. तिची परशुराम त्रिंबकावर फार मर्जी होती. तिनें त्याला ‘ पंत प्रतिनिधी ’ हें पद दिलें. अमात्याविषयीं तिचें मन निर्मळ नव्हतें म्हणून मागें सांगितलेंच आहे. राजाराम, संताजी, प्रल्हाद निराजी, इत्यादि औरंगजेबाशीं टक्कर देणारीं कर्तीं माणसें निघून गेलीं. धनाजी जाधव, रामचंद्रपंत, परशुराम त्रिंबक व संक्राजी नारायण येवढे प्रमुख लोक कायते राहिले होते, परंतु त्यांच्यांत देखील पूर्ण ऐक्य नव्हतें. मग औरंगजेब बादशहा अशावेळीं अगदीं हुरळून गेला यांत नवल नाहीं. त्यानें किल्ले घेण्याचें काम जोरांत चालविलेंच, पण येवढेंच करून तो थांबला नाहीं. त्यानें बेदरबक्त व झुल्फि-

कारखान यांस ‘ मैदानावर लढून मराठ्यांचा फन्ना उडविण्यास उत्तम संधि आहे ’ असे निरोप वरचेवर पाठविले. खरोखर बादशहा यावेळीं अतिशय हट्टास पेटला होता.

मराठ्यांकडचे कांहीं कर्ते पुरुष मरून गेले व उरले होते त्यांत पूर्ण ऐक्य नव्हतें या गोष्टी खऱ्या; पण असें झालें तरी राजारामाच्या वेळेस मराठ्यांस जो अनुभव आला होता तो ते मुळींच विसरले नाहींत. मोंगलांच्या मुलखांत आपण धुमाकूळ मांडला तर मोंगलांचें कांहीं चालत नाहीं, मोंगल चैनी, त्यांच्या पुढून आपण पळून गेलों तर त्यांच्या अंगांत आपला पाठलाग करण्यासारखी कुवत नाहीं, इत्यादि गोष्टी त्यांच्या पक्क्या स्मरणांत होत्या. ताराबाईनें देखील हें मोंगलांचें मर्म ओळखिलें होतें व बादशहाच्या हातांतील बाहुलें बनण्याइतकी ती कोत्या मनाची खास नव्हती. तिनें किल्लोकिल्लीं हिंडावें व किल्ले भांडविण्याविषयीं लोकांस खूप उत्तेजन द्यावें. मोंगलांच्या मुलखांत खंडणी वसूल करणाऱ्या लोकांसही राजारामाच्या वेळेप्रमाणेंच तिनें उत्तेजन दिलें. जाधव, आटोळे, निंबाळकर, भोंसले इत्यादि मराठे सरदारांनीं मोंगलांच्या मुलखांत धुमाकूळ करून सोडला. शके १६२४ ( इ. स. १७०२ ) त त्यांनीं सुरत व बऱ्हाणपूर या दोन श्रीमंत शहरांपासून भली मोठी खंडणी वसूल केली. शके १६२७ त तर नर्मदा उतरून मराठे घोडेस्वारांनीं माळवा प्रांतांत वसूल घेतला. याच्या बातम्या औरंगजेबास कळतांच त्यानें झुल्फिकारखानास माळव्यांत पाठविलें. वऱ्हाड व गुजराथ या दोन प्रांतांत सरदार पाठवून व्यवस्था केली पण याचा काय उपयोग ? मोंगल आले असें कळलें कीं, मराठ्यांची फौज चटकन् पांगून, ठिकाणावर कोणीच नाहीं असें होई; व फिरून मोंगल जरा दूर गेले कीं मराठ्यांची फौज एक होऊन फिरून त्यांचें खंडणी वसूल करण्याचें काम सुरू होई.

मराठ्यांच्या फौजेचा साधेपणा कांहीं विलक्षण होता. त्यांच्याजवळचें सामानसुमान म्हटलें म्हणजे एक घोंगडी, थोडीशी कांदाभाकरी; आटपलें. रात्रीचे एकाद्या ठिकाणीं उतरलें, कीं तरवारी जवळ ठेवून घोड्याचे लगाम हातांत धरून तशीच रात्र काढीत. दुपारच्या वेळेस दोघे चौघे एकाद्या झाडाची सावली पाहून घोंगडी टाकून निजत. त्यांचे भाले जवळच जमिनीवर खोंचून ठेविलेले असत. अंगावर ऊन पडलेलें आहे अशा स्थितींत ते खुशाल घोरत पडत. त्यांच्याजवळची आणखी एक महत्त्वाची जिन्नस म्हटली म्हणजे मुलखांतून माल भरून नेण्याची पिशवी. ती पिशवी एकदां भरली, कीं ते इतक्या झपाट्यानें तो माल लांबवीत कीं कांहीं विचारूं नये. अशी ही फौज सुटसुटीत, काटक व चपळ असे. मोंगलांची फौज म्हणजे चैनीचें आगर. त्यांच्या घोड्यावर किती अलंकार ! मोंगल फौजेंतील लोक तर किती चैनी व मिजासी ! ! त्यांना एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामीं जावयाचें म्हणजेच किती त्रास वाटावयाचा. मुक्कामाहून निघतांना सर्व जामानिमा आटोपून सर्व लोक एक होऊन निघण्यासच अतिशय वेळ लागे. अशा स्थितींत एखादे वेळीं मोंगल फौजेचा मराठ्यांनीं पराभव केल्यास मराठ्यांची अतिशय चंगळ उडून जात असे. तेंच उलट मराठ्यांचा पराभव केल्यास मोंगलांना त्यांच्यापासून कांहींएक मिळत नसे. उत्तरेकडून मोंगल फौजेस येणारें धान्य व खजिने मराठ्यांनीं पुष्कळदां लुटले. मोंगलांच्या फौजेस स्वारीचा त्रास सहन होईना. त्यांना चैनीची संवय झालेली. त्यांच्यानें उन्हांतून हिंडवेना. अशांत आणखी मराठ्यांचा त्रास ! मैदानावर मराठ्यांशीं लढण्यास पाठविलेल्या फौजेची अशा रीतीनें अगदीं हैराणगत होऊं लागली. त्या फौजेच्या तक्रारी सारख्या बादशहाच्या कानावर जाऊं लागल्या. परंतु किल्ले घेतल्यावर तिकडे पाहूं, असा विचार करून औरंगजेबानें किल्ले घेण्याचें काम जोरांत चालविलें. शेवटीं मराठ्यांचे सर्व किल्ले घेतल्यावर औरंगजेबानें आपली छावणी विजापुरास केली. या

वेळेस औरंगजेब फारच त्रासला होता. त्याला किल्ले घेण्याच्या कामांत अतिशय दगदग झाली होती. शिवाय मैदानावर मराठ्यांचा त्रास जास्त जास्तच वाढूं लागला होता. त्यामुळें तर तो फारच खिन्न झाला. अशा चिंतेंत बादशहा झुरत असतां त्याचा मुलगा कामबक्ष यानें मराठ्यांशीं तह करून घ्यावा अशी त्यास सूचना केली. बादशहा युद्धास अत्यंत त्रासला होता. त्यानें नाइलाज म्हणून ती सूचना मान्य केली. मग धनाजी जाधवाशीं मोंगलांचें बोलणें सुरूं झालें. दक्षिणच्या साही सुभ्यांत मराठ्यांनीं सरदेशमुखीचा हक्क वसूल करावा, औरंगजेबानें शाहूस सोडून द्यावें, अशी कलमें ठरत होतीं. पण ही तहाची बातमी मराठे सरदारांत पसरली व ते सर्व धनाजीच्या जवळ जमूं लागले. ज्या त्या सरदारास वाटलें, कीं आपणास कांहीं तरी मिळालेंच पाहिजे म्हणून जो तो घाईनें धनाजीजवळ येऊं लागला. आपल्या लष्करा-जवळ मराठे लोक जमून गोंधळ करीत आहेत हें पाहून औरंगजेबास राग आला. पण करतो काय ? युद्ध केव्हां एकदांचें संपतें असें त्यास झालें होतें. म्हणून त्यानें मराठ्यांचा त्रास निमूटपणें सहन केला. मराठे सरदारांनीं औरंगजेब टेंकीस आला आहे हें ओळखलें होतें. शिवाय युद्ध चाललें असत्तें तरी त्यांची चंगळच होती. तेव्हां त्यांनीं औरंगजेबास अशी अट घातली कीं, तह करावयाचा असेल तर आमच्यापैकीं सत्तर जणांस अगोदर पोषाक मिळाले पाहिजेत. हा मराठ्यांचा हट्ट पाहून मात्र औरंगजेबास क्रोध आला व त्यानें तहाचें बोलणें बंद केलें. याच वेळीं विजापूर प्रांतांत वाकिनखेडें या गांवीं पेमनाईक नांवाच्या एका बेरडानें दंगा आरंभिला होता. मोंगल फौजेवर हल्ले करावे, प्रांत लुटावा, खजिना लांबवावा असे प्रकार त्यानें चालविले होतें. त्याचें पारिपत्य करण्याकरितां औरंगजेब निघाला. त्यानें वाकिनखेड्यास वेढा घातला, पण पेमनाईक त्याला दाद देईना. मराठ्यांशीं युद्ध करण्यांत बादशहा गुंतला होता. त्या अवसरांत पेमनाईकानें आपल्या गांवचा तट भक्कम

केला होता. त्या प्रांतांतील लोकहा त्यास सामील झाले होते, खुद्द मराठ्यांचा सेनापति धनाजी जाधव याचा त्याशीं उत्तम स्नेह होता; त्यामुळें औरंगजेबानें वाकिनखेड्यास वेढा घातला असें ऐकतांच धनाजी पेमनाईकास साह्य करण्याकरितां गेला. औरंगजेबानें झुल्फिकारखान व कर्नाटकचा सुभेदार दाऊदखान या बड्या सरदारांस वाकिनखेड्यास बोलाविलें. ते दोघे सरदार येऊन मोंगलांनीं जोराचा हल्ला केला तेव्हां वाकिनखेडें हस्तगत झालें.

औरंगजेब वाकिनखेड्याकडे गेला तेव्हां मराठे लोकांनीं बादशहानें मोठ्या श्रमानें काबीज केलेले किल्ले परत घेण्याचा सपाटा चालविला. रामचंद्रपंतानें पन्हाळा व पावनगड सर केले. परशुराम त्रिंबकानें वसंतगड व सातारा हे किल्ले परत मिळविले. संक्राजी नारायणानें मोंगल सैन्याची पाठ फिरतांच सिंहगड, राजगड, रोहिडा हे हल्ला करून घेतले. वाकिनखेडें घेतां घेतां औरंगजेब अगदी मेटाकुटीस आला होता. त्या दगदगीनें तो आजारी पडला. इतक्यांत आपण इतक्या श्रमानें व दगदगीनें सर केलेले किल्ले मराठ्यांनीं परत घेतले ही बातमी येऊन थडकली, तेव्हां औरंगजेबास फार दुःख झालें. पन्हाळा व सिंहगड गेल्याबद्दल तर त्याला अत्यंत वाईट वाटलें. त्याचा आजार जास्तच वाढला. त्यानें झुल्फिकारखानास सिंहगड घेण्यास पाठविलें. व स्वतः अहमदनगरास जाण्याचा बेत केला. झुल्फिकारखानानें सिंहगड घेतला, परंतु तो घेऊन परत फिरला त्याबरोबर संक्राजी नारायणानें तो किल्ला फिरून सर केला. औरंगजेब अहमदनगरास आला. त्याची मराठ्यांस जिंकण्याची अगदी निराशा झाली होती. अशा स्थितींत शके १६२८ च्या माघांत ( इ. स. १७०७ ) त्याचा अंत झाला.

शके १६०३ त औरंगजेब दक्षिण काबीज करण्याच्या इराद्यानें महाराष्ट्रांत आला. आल्यापासून पांच सहा वर्षांच्या अवकाशांत त्यानें आदिलशाही व कुतुबशाही ह्या दोन्ही शाह्या बुडविल्या व मराठ्यांवर

राज्य करणाऱ्या संभाजीस जिवें मारिलें, त्यावेळीं मराठेमंडळावर मोठा कठीण प्रसंग येऊन ठेपला होता. औरंगजेबासारखा पराक्रमी बादशहा उत्तर हिंदुस्थानांतील चार लक्ष लढवय्यें सैन्य घेऊन महाराष्ट्र देश काबीज करण्यास आलेला. हिंदुस्थानाच्या साम्राज्याचा तो अधिपति असल्या-मुळें फौज काय, पैसा काय, किंवा इतर कोणतेंही साधन काय, कशाची म्हणून त्याला कमतरता नव्हती. त्याची महत्वाकांक्षाही जबर. दक्षिण घेईन तेव्हां परत फिरेन, अशा निश्चयानें तो आला होता. अशा सर्व-तोपरी बलाढ्य शत्रूपासून आपलें संरक्षण मराठ्यांस करावयाचें होतें व त्या मानानें त्यांची तयारी काय म्हणाल तर संभाजीच्या वेळच्या बेबंदशाहीमुळें रिकामा झालेला खजिना, उधळून गेलेलीं लष्करें व सर्वस्वी निरुपयोगी स्थितींत पडून राहिलेले किल्ले ! त्यांची सर्व कर्तीं माणसें संभाजीनें ठार केलीं होतीं, त्यांच्या राज्याचा वारस औरंगजेबाच्या कैदेंत होता, व जे काय राजाराम, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे यांसारखे नवीन पुढारी होते त्यांस देशांतर करून जिंजीच्या किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला होता. अशा बिकट स्थितींत त्यावेळीं मराठी राज्य सांपडलें होतें. त्यावेळीं शत्रूशीं उघड मैदानांत सामना देऊन मराठ्यांचा मुळींच निभाव लागला नसता. शत्रूच्या ज्या मुलखांत नीट बंदोबस्त नसेल त्यांत जाऊन तो अगदीं उध्वस्त करून टाकावा, त्यांतून शत्रूस मुळींच धान्याचा पुरवठा होणार नाहीं अशी व्यवस्था करून टाकावी; शत्रूची एखादी लहानशी टोळी गांठून तिला चित करावें, व शत्रूकडील चैनी व ऐषआरामी लोक अव्यवस्थेनें भटकत असतांना सांपडल्यास त्यांचा खरपूस समाचार घ्यावा. हा गनिमी काव्याचा मार्ग एकदां अंगवळणीं पडल्यावर शत्रूस उत्तरे-कडून येणाऱ्या खवठ्यावरही धाड घालावा, व शत्रूचे प्रांतचे प्रांत बे-चिराख करून त्यास पेंचांत आणावें या गनिमी काव्याच्या पद्धतीनेंच त्यावेळीं शत्रूशीं टक्कर देणें शक्य झाल. या लढाईच्या पद्धतीचा असा

परिणाम झाला कीं, मराठ्यांस जय आला व औरंगजेबासारख्या बलाढ्य बादशहास वर सांगितल्याप्रमाणें निराश होऊन अहमदनगरीं आपला देह ठेवावा लागला.

---

## ३३ मराठी राज्यांत दुही.



औरंगजेब वारल्याबरोबर त्याच्या मुलांत गादीविषयीं तंटे उत्पन्न झाले. त्याचा वडील मुलगा मुअज्जम हा काबूलच्या सुभ्यावर होता; तो बापाच्या मरणाचें वर्तमान ऐकतांच दिल्लीकडे आला. बादशहाचे दोघे मुलगे अजीम व कामबक्ष दक्षिणेंत होते. त्यांपैकीं अजीमास आपल्यास गादी मिळावी अशी इच्छा झाली. औरंगजेबाचा शूर व पराक्रमी सेनापति झुल्फिकारखानही अजीमास मिळाला होता. मग अजीमानें मुअज्जमचा पाडाव करून गादी बळकविण्याकरितां दिल्लीकडे कूच केलें. तो उत्तरेकडे निघाला तेव्हां शाहू त्याच्याबरोबरच होता.

मोंगलांचें सैन्य उत्तरेकडे गेलें असें पाहून मोंगलांनीं जिंकलेला प्रांत सोडविण्यास मराठ्यांनीं जोरानें आरंभ केला. धनाजी जाधवानें पुण्याचा फौजदार लोदीखान याचा पराभव केला, व चाकण सर केलें. अजीमशहाची फौज नर्मदा उतरून पुढें चालली होती, तेव्हां त्यास ही बातमी समजली. शाहूस सोडावें म्हणजे मराठे लोकांत तंटे उत्पन्न होतील व आपल्या दक्षिणेंतील मुलखास उपसर्ग पोंचणार नाहीं, असा झुल्फिकारखानानें अजीमशहास सल्ला दिला. अजीमशहास तें म्हणणें पटलें. त्यानें शाहूस सांगितलें कीं, “ तुमच्या आजोबानें विजापूरकरांपासून जो मुलूख जिंकून घेतला तो व भीमा व गोदावरी या नद्यांमधील कांहा

मुलूख जहागीर म्हणून तुम्हांस देतों. तुम्ही दक्षिणेंत जाऊन आपल्या मुलखाचा बंदोबस्त करावा. " असें सांगून त्यानें शाहूस सोडून दिलें. शाहू मोंगलांच्या फौजेंतून निघाला तो नर्मदा उतरून पुढें येऊं लागला. नंदुरबारकडे डोंगराळ मुलखांत मोहनसिंग नांवाचा अधिकारी रहात होता. तो शाहूस पहिल्यानें मिळाला. मग सुरतेपासून बऱ्हाणपुरापर्यंतच्या मुलखांत अम्मल बसविणारा अमृतराव कदमबांडे त्याच्याकडे आला. वऱ्हाडांत परसोजी भोंसले व खानदेशांत चिमणाजी दामोदर, हे दोघे मराठे सरदार होते. शाहूनें त्यांजकडे माणूस पाठविला तेव्हां ते दोघेही शाहूस येऊन मिळाले. हे बडे बडे मराठे सरदार शाहूस मिळाल्याबरोबर इतर बारीकसारीक लोक पुष्कळ मिळाले व शाहूचें सैन्य वाढलें. हे सर्व लोक घेऊन शाहू गोदावरीअलीकडे आला तेव्हां त्यानें ' आम्ही बादशहापासून निघालों, लवकरच येतों ' अशा अर्थाचें पत्र ताराबाईस पाठविलें.

तें पुतण्याचें पत्र पाहून ताराबाईस समाधान झालें नाहीं. ती कर्तृत्ववान् व महत्वाकांक्षी बाई होती. संभाजीच्या मृत्यूपासून शाहू बादशहाच्या कैदेंत होता. इतक्या अवकाशांत औरंगजेबानें मराठी राज्याचा नाश करण्याचे अघोर उपाय केले, पण आपला नवरा होता म्हणूनच त्यानें राज्य वांचविलें. पुढें नवरा मेल्यावर तरी मी स्वतः राज्यरक्षणार्थ किती तरी झटलें, व आतां इतकी दगदग करून वांचविलेलें राज्य उपटून आयत्या पिठावर रेघा ओढण्याकरितां हा शाहू तयार झाला आहे, असे विचार तिच्या मनांत आले; व शाहूस राज्य न मिळूं देण्याचा तिनें घाट घातला. तिनें पहिल्यानें अशी कंडी पिकविली कीं, हा खरा शाहूच नव्हे. सर्व कारभारी मंडळीस एकत्र जमवून शाहूस मोडून काढण्याचा बेत तिनें जाहीर केला. किल्लेकऱ्यांस व सुभ्यांतील अम्मलदारांस तिनें ताबडतोब हुकूम पाठविलें कीं " किल्ले देऊं नयेत, कोणी जाऊन भेटूं नये, खर्चास मुलखांतील वसूल देऊं नये. " सेनापति

धनाजी जाधव व प्रतिनिधी परशुराम त्रिंबक या दोघांस सैन्य घेऊन, शाहूचा मोड करण्याकरितां पाठविलें. सैन्याबरोबर खंडो बल्लाळ चिट-णीसही होते.

शाहूस या सर्व हकिकती समजल्या. आपण वडील घराण्यांतले, तेव्हां राज्य आपल्यालाच मिळालें पाहिजे, असें त्यालाही वाटलें. मग सामोपचारानें मिळत नाहीं तर भांडून कां होईना आपलें राज्य आपण घेणार, असा त्यानें निश्चय केला. तो अहमदनगरावरून पारद या गांवीं आला. पारद येथील पाटलानें तें ठाणें शाहूच्या ताब्यांत देण्याचें नाकारिलें. त्यावरून शाहूनें हल्ला केला; तेव्हां पाटलाचें बरेच लोक मेले. गांव शाहूच्या हातीं आला. त्यासमयीं एक पाटलाची बाई एक मूळ घेऊन शाहूकडे आली, व तें मूल शाहूच्या पालखींत टाकून म्हणाली, " यास वांचवावें, अन्यायी होते ते मारले गेले. हें मूल आपणास वाहिलें आहे ?" त्यावरून शाहूनें तें मूल ठेवून घेतलें, व पहिल्यानें या गांवीं जय मिळाला म्हणून त्या मुलाचें नांव फत्तेसिंग भोंसले, असें ठेविलें. हाच फत्तेसिंग भोंसले अक्कलकोट संस्थानचा मूळ पुरुष. शाहू पारदाहून निघाला तो खेड-कडूसपर्यंत आला. ताराबाईकडून शाहूच्या पारिपत्या-करितां निघालेले धनाजी जाधव व परशुरामपंत त्याच सुमारास खेडा-जवळ आले. धनाजीच्या मनांत पहिल्यापासूनच शाहू खरा कीं खोटा हा निकाल लावून घ्यावा व खरा असल्यास त्याच्या बाजूस मिळावें असें होतें. त्यानें शाहूची छावणी जवळच आहे असें पाहून खंडो बल्लाळास गुप्तपणें शाहूच्या खरेखोटेपणाविषयीं चौकशी करण्यास पाठ-विलें. चौकशीअंतीं शाहू खरा अशी खंडो बल्लाळाची खात्री झाली. तें ऐकून शाहूस मिळण्याचा धनाजीचा बेत कायम झाला. सेनापतींचें मन वळविण्याकरितां शाहूकडून माणसें आलीं तेव्हां तर धनाजी शाहूस पूर्ण अनकूळ झाला. प्रतिनिधीचा युद्ध करण्याचा हेका सुटेना. धनाजीनें कपटयुद्ध करण्याचा बेत केला. दोन्ही सैन्यांत युद्ध सुरूं झालें तेव्हां

प्रतिनिधी मात्र जोरानें लढला. शाहूचा हत्ती आपल्या घोड्यापर्यंत आला तरी धनाजी जागचा हाललासुद्धां नाहीं. प्रतिनिधीचें एकट्याचें काय चालणार ? तो बिचारा पराभव पावून पळून गेला. नंतर धनाजी शाहूस भेटला. दुसरे दिवशीं शाहूनें धनाजीस बोलावून नेऊन त्याचा मोठा सन्मान केला, व त्यास सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. खंडो बल्लाळास चिटणिशी सांगितली. प्रतिनिधी पळ काढून साताऱ्याच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला. पुढें शाहू चंदनवंदनाखालीं आला. ते किल्ले घेऊन त्यानें तेथें पावसाळा काढला. पावसाळा गेल्यावर सातारा किल्ला घेण्याचा शाहूनें प्रयत्न चालविला. त्यानें प्रतिनिधीस आपणास येऊन मिळण्याविषयीं पत्रें लिहिलीं, पण प्रतिनिधी वश होईना. मग त्यानें एक युक्ति केली. साताऱ्याच्या किल्ल्यावर शेखमिरा नांवाचा एक मुसलमान रहात असे. त्याचें वतनाचें गांव वाईजवळ होतें तेथून त्याचीं बायकामाणसें धरून आणिलीं. शेखमिरा सातारा ताब्यांत देण्यास तयार झाला. शाहूनें असा भेद करून सातारा घेतला. तेथें प्रतिनिधी हातीं आला. त्यास शाहूनें कैदेंत ठेविलें. सातारा ही राजधानी हस्तगत झाल्यावर शाहूनें राज्याभिषेक करून घेण्याचा बेत केला. त्याप्रमाणें शके १६२९ ( सन १७०८ ) माघ शुद्धांत राज्याभिषेक समारंभ झाला.

राज्याभिषेक झाल्यावर शाहूनें ताराबाईच्या पक्षाचा मोड करण्याकरितां दोन वर्षें खर्च केलीं. शेवटीं मोड झाला नाहींच. शके १६३१ चा पावसाळा संपतांच शाहू मोठें सैन्य घेऊन कोल्हापूरकडे निघाला. तो आपल्यावर चाल करून येत असल्याची बातमी कळतांच ताराबाई पन्हाळ्यास होती ती रांगण्यास निघून गेली. शाहू पन्हाळा काबीज करून रांगण्यावर चाल करून गेला. ताराबाई कोंकणांत मालवण किल्ल्यांत जाऊन राहिली. शाहूनें रांगण्यास वेढा घातला व हल्ला करून किल्ला घ्यावा असा बेत करून हाताखालीं सैन्य घेऊन घोड्यावर स्वार होऊन त्यानें हल्ला केला. डोंगर चढत असतां घोड्याचा पाय घसरला.

खंडो बल्लाळ चिटणीस जवळ होता; त्यानें एका झाडाचा नेट घेऊन घोड्यास ओढून धरलें. शेखमिऱ्यानें शाहूस घोड्याखालीं उतरविलें. आपल्या जिवावर अरिष्ट आलें असतां हे दोघे उपयोगीं पडले म्हणून शाहूनें चिटणिसास व शेखमिऱ्यास इनामें दिलीं. हल्लयांत असा अपशकुन झाला, शिवाय पावसाळा जवळच आला, यावरून किल्ला हातीं येत नाहीं असें समजून शाहू माघारा फिरला. परत येत असतां शाहूचें एक मोठें नुकसान झालें, तें धनाजी जाधव मोहिमेवरून परत येतांना वारणातिरीं वडगांव येथें मरण पावला, हें होय.

---

## ३४ बाळाजी विश्वनाथाचा उदय.



**धनाजी** जाधव शाहूस मिळाल्यामुळें शाहूचा वचक चहूंकडे फार लवकर बसला; पण धनाजी फार दिवस वांचला नाहीं. मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें तो लवकरच वारला, व त्यामुळें शाहूचें अत्यंत नुकसान झालें. धनाजी वारल्यावर शाहू व ताराबाई यांजमधील अंतःकलहास फारच उग्र स्वरूप आलें. शाहूची बाजू अगदीं लंगडी पडली होती. एकदां त्याचा अगदीं नाश होतो कीं काय, असें वाटूं लागलें होतें. अशा स्थितींत शाहूस मोठ्या सुदैवानें एक पुरुष लाभला. तो बाळाजी विश्वनाथ भट हा होय. त्याच्या शहाणपणामुळें शाहूची पडती बाजू चांगलीच सांवरली, म्हणून बाळाजीचा पूर्ववृत्तांत कळणें अवश्य आहे.

बाळाजी विश्वनाथ हा मूळचा श्रीवर्धनचा देशमुख. श्रीवर्धन हें गांव कोंकणांत हब्शाच्या मुलखांत आहे. तेथें बाळाजीचा वडील भाऊ जानोजी हा देशमुखीचें काम पाहत असे. कोंकणांत सिद्दी व आंग्रे

यांचें नेहमीं युद्ध होत असे. एकदां जानोजी हा आंग्र्यास सामील आहे असा सिद्द्यास संशय आला. लागलींच जानोजीस पकडून आणण्याचा त्यानें हुकूम केला, व आणल्याबरोबर त्यास पोत्यांत घालून समुद्रांत बुडवून टाकिलें. भावाचा अशा भयंकर रीतीनें वध झाला तेव्हां बाळाजी चिपळुणास होता. त्यानें ती बातमी ऐकून कोंकण सोडून देशांत जाण्याचा निश्चय केला. पुढें बाजीराव पेशव्याच्या वेळेस धावडशीस येऊन राहिलेले ब्रह्मेंद्रस्वामी यावेळीं कोंकणांत परशुरामक्षेत्रीं होते. त्या स्वामीस बाळाजी भेटावयास गेला तेव्हां त्यानींही 'देशास जावें' अशी बाळाजीस आज्ञा केली. बाळाजी देशावर जाण्यास निघणार असें ऐकून वेळासचे तिघे भानू रामाजी महादेव, हरि महादेव व बाळाजी महादेव हे येऊन त्यास भेटले; व आम्हीही 'देशावर येणार' असें म्हणूं लागले. बाळाजीस आयतीच सोबत मिळाली. तो भानूंस म्हणाला, " बरें आहे चला; आम्हांस भाकर मिळेल त्यांत तुम्हांसही चतकोर मिळेल. "

बाळाजी राजारामाच्या कारकीर्दींत देशावर आला. तो पहिल्यानें संक्राजी नारायण गांडेकर याच्याजवळ भोरास चाकरीस राहिला. तेथें अंबाजीपंत पुरंदऱ्याची व त्याची ओळख झाली. मग ते दोघे मिळून धनाजी जाधवाजवळ नोकरीस राहिले. थोड्याच दिवसांत बाळाजीची हुशारी धनाजीच्या लक्षांत आली, व म्हणून त्याच्यावर त्याची मर्जी बसली. इतक्यांत औरंगजेब मृत्यु पावला व अजीमशहानें उत्तरेकडे जातांना शाहूस सोडून दिलें. शाहू दक्षिणेंत येऊं लागला तेव्हां ताराबाईनें धनाजी व प्रतिनिधी यांस त्यांचा मोड करण्याकरितां पाठविलें. पण त्याचा मोड करण्याऐवजीं धनाजी शाहूसच मिळाला ही हकीकत मागें सांगितलीच आहे. धनाजी शाहूस मिळाला ही जी गोष्ट घडली

१ बाळाजी हा राजारामाच्या कारकीर्दींत पुण्याचा सुभेदार असल्याबद्दलचें ऐतिहासिक पत्र नुकतेंच उपलब्ध झालें आहे.

तींत बाळाजीची बरीच खटपट होती. शाहूस अगोदरच मिळालेला चिमणाजी दामोदर याचा व बाळाजीचा चांगला स्नेह होता. चिमणाजी दामोदर शाहूस मिळाला आहे तेव्हां शाहू खरा अशी बाळाजीची खात्री होऊन त्यानें धनाजीस शाहूस मिळण्याचा आग्रह केला. तो त्याचा आग्रह सफल होऊन धनाजी शाहूस मिळाला. पुढें सातान्यास गादीवर बसल्यावर शाहूनें धनाजीस सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं व वसुलाचें काम पाहण्यास सांगितलें. धनाजीनें वसुलाचें काम सर्वस्वीं बाळाजीवर सोंपविलें. तें काम बाळाजीनें फारच उत्कृष्ट रीतीनें केलें. त्यामुळें धनाजी खूष झाला, इतकेंच नव्हे तर खुद्द शाहूची त्याच्यावर मर्जी बसली. ती इतकी कीं धनाजी वारल्यावर त्याचा मुलगा चंद्रसेन यास शाहूनें सेनापतीचीं वस्त्रें दिलीं, परंतु बापाप्रमाणें वसूलबाबीचा अधिकार त्याच्याकडे दिला नाहीं. जमाबंदीवर शाहूनें बाळाजीची स्वतंत्र नेमणूक केली.

---

## ३५ बंडखोर मराठे सरदार.

औरंगजेब संभाजीच्या कारकीर्दींत दक्षिणेंत आला तेव्हांपासून मराठे व मोंगल यांमध्यें जो घनघोर संग्राम सुरू झाला त्याची समाप्ति औरंगजेबाच्या मृत्यूनें झाली. इतक्या अवकाशांत मराठ्यांनीं औरंगजेबास अगदीं जेरीस आणिलें. एकएक मराठे सरदार आपले घोडेस्वार घेऊन खुशाल मोंगलांच्या मुलखांत शिरत व सर्व मुलूख उध्वस्त करीत, व उत्तरेकडून येणाऱ्या धान्याच्या तांड्यांवरही हल्ले करून त्यांतीलही धान्य मोंगलांस मिळूं देत नसत. यामुळें औरंगजेब अगदीं मेटाकुटीस आला व शेवटीं अहमदनगर येथें

मृत्यु पावला. मग लढाई थांबली, पण मराठे सरदारांना मुलखांत स्वतंत्र-पणें वावरण्याची झालेली संवय कशी जाणार ? मराठे सरदारांनीं शत्रूच्या मुलखांत जाऊन दंगा उडविला कीं राजारामाचीं व तो वारल्यावर ताराबाईचीं उत्तेजनपर पत्रें आलींच म्हणून समजावें. यामुळें पावसाळ्याचे चार महिने सोडून बाकी खुशाल शत्रूच्या मुलखांत ते दंगा उडवून देत. अशांत शाहूची सुटका झाली. यामुळें खुद्द राजघराण्यांत दोन पक्ष झाले. शाहू व ताराबाईचा मुलगा शिवाजी हे दोघे राज्यावर मालकी सांगूं लागले. परसोजी भोंसले, खंडेराव दाभाडे, चिमणाजी दामोदर व धनाजी जाधव हे शाहू आल्याबरोबर त्यास मिळाले खरे; पण धनाजी लवकरच मरण पावला. व बाकीचे तिघे आपआपल्या प्रांतांत निघून गेले ते फिरून आले नाहींत. धनाजीच्या मृत्यूपर्यंत शाहूनें ताराबाईचा पराभव करण्याची खटपट जोरानें चालविली पण तो वारल्यावर शाहूचे सरदार त्याला सोडून जाऊं लागले. मग ताराबाईशीं तो कसची लढाई देतो ? शाहूस सोडून स्वतंत्र झालेल्या या सरदारांमध्यें पहिला नंबर धनाजीचा मुलगा चंद्रसेन यासच दिला पाहिजे.

चंद्रसेन जाधव बापामागें सेनापति झाला; परंतु बाप शाहूस मिळाला याबद्दल त्याला पहिल्यापासून वाईट वाटत होतें. शिवाय शाहूनें त्याला फक्त सेनापतिपद देऊन बापाप्रमाणें वसुलावरचा अधिकार दिला नाहीं; त्यामुळें तर शाहूचा पक्ष सोडून देण्याचा त्यानें बेत केला. वसुलावरचा अधिकार बाळाजी विश्वनाथास मिळाला होता; तेव्हां चंद्रसेन बाळाजीचा उघड द्वेष करूं लागला. तो शाहूपासून फुटून जाण्याकरितां निमित्त हुडकीत होता. एकदां ताराबाईकडचे कांहीं सरदार शाहूच्या मुलखांत दंगा करूं लागले. त्यांचें पारिपत्य करण्यास चंद्रसेन व बाळाजी या दोघांस शाहूनें पाठविलें होतें. एके दिवशीं बाळाजीच्या पथकांतील पिराजी राऊत नांवाचा एक शिलेदार शिकार करीत असतां

एका हरणामागें लागला. तें हरिण चंद्रसेनाच्या पथकांतील व्यासराव नांवाच्या ब्राह्मणाच्या राहुटींत शिरलें. त्याला मारण्याकरितां पिराजी राहुटींत जाऊं लागला. व्यासरावानें त्यास अडविलें. पिराजीनें तेथूनच हरणास मारण्याकरितां भाला फेंकला पण तो चुकून व्यासरावास लागला. पिराजीनें तें पाहून धूम ठोकली व बाळाजीजवळ येऊन त्यानें आपली चूक झाल्याचें सांगितलें; व ' मीं मुद्दाम भाला फेंकला नाहीं. तेव्हां चंद्र-सेनाकडे फिर्याद झाल्यास माझें रक्षण व्हावें ' अशी विनंति केली. त्यानें मुद्दाम अपराध केला नाहीं असें पाहून बाळाजीनें त्याला अभय दिलें. थोड्याच वेळानें 'तुमच्या पथकांतील पिराजी राऊत यानें आमच्या सैन्या-तील व्यासराव या ब्राह्मणावर भाल्याचे वार केले आहेत तेव्हां त्यास इकडे पाठवून द्यावें ' असा चंद्रसेनाकडून बाळाजीस निरोप आला. बाळाजीनें चंद्रसेनास लिहिलें कीं, ' पिराजीनें जाणूनबुजून भाला टाकला नाहीं, म्हणून त्याला मीं अभय दिलें आहे, तर शिक्षाच करावयाची असेल तर काय करावयाची तें लिहून पाठवा म्हणजे त्याप्रमाणें करतों. ' यायोगें चंद्रसेनाचें समाधान झालें नाहीं, त्यानें ' पिराजीस माझ्या स्वाधीन करा, ' असा जास्तच आग्रह धरिला. शेवटीं बाळाजी पिराजीस पाठवीत नाहीं हें पाहून बाळाजीच्या पथकावर हल्ला करण्याचा आपल्या कांहीं स्वारांस चंद्रसेनानें हुकूम केला. चंद्रसेनाचे स्वार आपल्यावर येतात असें पाह-तांच बाळाजीनें निवडक शेंदोनशें स्वार बरोबर घेऊन पुरंदरचा रस्ता धरला. बाळाजी पुरंदरला गेला असें कळतांच चंद्रसेन तिकडे तीन हजार स्वार बरोबर घेऊन निघाला, व त्यानें सचिवास असा निरोप पाठविला कीं, ' बाळाजीस आश्रय द्याल तर तुमच्या मुलखाची नासाडी करून टाकीन. ' तो निरोप ऐकून सचिव घाबरला व त्यानें बाळाजीस ' येथें तुम्हांस आश्रय मिळणार नाहीं ' असें स्पष्ट सांगितलें. हें ऐकून बाळाजी मोठ्या संकटांत पडला. पण काय करतो ? स्वस्थ बसून सोय नव्हती. म्हणून तो पुरंदरहून निघून पांडवगडच्या आश्रयास

जाऊन राहिला. तेथून अंबाजीपंत पुरंदऱ्यास साताऱ्यास पाठविलें. शाहूनें बाळाजीची सर्व हकीकत ऐकून घेऊन त्याचें रक्षण करण्याबद्दल वचन दिलें. ही बातमी चंद्रसेनास कळतांच त्यानें शाहूस उद्धटपणाचा निरोप पाठविला कीं, " बाळाजीस माझ्या स्वाधीन करावें नाहीं तर महाराजांचे पाय आम्हांस सुटतील. " शाहूस या सेनापतीच्या उद्दामपणाचा राग आला व त्यानें हैबतराव निंबाळकर सरलष्कर गंगथडीकडे होता त्यास चंद्रसेनावर चालून जाण्यास सांगितलें. त्या दोघांची अंदरकीच्या घाटाखालीं जेऊर येथें लढाई झाली. तींत चंद्रसेनाचा पराभव झाला, तेव्हां तो पळून पन्हाळ्यास गेला व ताराबाईस जाऊन मिळाला. चंद्रसेन जाधव ताराबाईस मिळाला तेव्हां तिनें शाहूचा नाश करण्याचा जोरानें प्रयत्न सुरू केला. चंद्रसेन एकटाच ताराबाईस मिळून स्वस्थ बसला नाहीं. त्यानें शाहूच्या इतर सरदारांना फितविण्याचा क्रम चालविला. हैबतराव निंबाळकर, खंडेराव दाभाडे व आणखी बरेच सरदार त्यानें फितविले. शाहूकडे फारशी फौज राहिली नाहीं. त्याच्या मुलखांत ताराबाईच्या पक्षाचे सरदार खुशाल धुमाकूळ घालूं लागले. दमाजी थोरात रुस्तुमराव हा हिंगणगांवच्या गढींत राहून भोंवतालच्या मुलखांत खुशाल खंडणी गोळा करूं लागला. कृष्णराव खटावकर हा राजारामाच्या वेळेपासून मोंगलांस मिळाला होता. त्यानें तर शाहू निर्बल झाला आहे, आपणांस अडकाठी करणार कोणी नाहीं, असें पाहून खटावजवळच्या माण देशांत दंगा आरंभिला. उदाजी चव्हाण हा मिरजेकडे चौथाई वसूल करीत सुटला. वाडीच्या खेम सांवतानें दक्षिण कोंकणांत गडबड मांडिली व कान्होजी आंग्रा उत्तरकोंकण बळकावून बसला. असे हे मराठे सरदार चोंहोंकडून बंडें करूं लागले; व शाहूस आपलें राज्य तरी टिकतें कीं नाहीं, याविषयींच संशय वाटूं लागला.

# ३६ बाळाजी विश्वनाथास पेशवाई कशी मिळाली ?



बहुतेक मराठे सरदार ताराबाईच्या पक्षाचा आश्रय करून दंगा करूं लागले. तेव्हां शाहूकडे बाळाजी-शिवाय कोणीच राहिलें नाहीं. शाहूनें परशुराम-पंत प्रतिनिधीस कैदेंतून सोडून त्याला प्रतिनिधिपद दिलें. परशुरामपंतानें आपला मुलगा कृष्णाजी यास आपला विशाळगड किल्ला व त्याभोंवता-लचा मुलूख यांत बंदोबस्त करण्यास पाठविलें. कृष्णाजी गेला तो शाहूची निकृष्ट स्थिति पाहून ताराबाईस मिळाला. हें प्रतिनिधीच्या मुलाचें वर्तन पाहून शाहूस फार संताप आला. त्यानें परशुरामपंतास फिरून कैद केलें, व त्याचे डोळे काढण्याचा हुकूम केला, पण खंडो बल्लाळाच्या आग्रहावरून डोळे काढण्याचा हुकूम नंतर रद्द केला.

शाहूस अशीं चोहोंकडून माणसें सोडून चाललीं. बाळाजी मात्र त्यास चिकटून राहिला. जाधवाकडून फुटून आलेले शिलेदार व त्याची स्वतः-ची मिळून बाळाजीजवळ दोन हजार फौज होती. आणखीही बाहेर-चें कांहीं सैन्य बाळाजीनें मिळविलें. अशी फौज जमा करून त्यानें शाहूच्या पडत्या काळांत नव्यानें सैन्य निर्माण केलें. या कामगिरीबद्दल शाहूनें बाळाजीस ‘ सेनाकर्ते ’ ही पदवी दिली.

ताराबाईस शाहूकडचे सरदार मिळाल्यामुळें तिचा पक्ष जोरावला. आणि ती शाहूस पकडण्याची खटपट करूं लागली. अशा संकटांत असतां बाळाजी व शाहू या दोघांनीं शत्रूचा उच्छेद करण्याची एक युक्ति काढली. राजारामाच्या दोन बायका ताराबाई व राजसबाई. ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांनींच राज्य आटोपलें होतें अर्थात् राजसबाई व तिचा मुलगा संभाजी हीं दोघें असंतुष्ट होतीं. शाहूनें राजस-

बाईस सुचविलें कीं " ताराबाईस कैदेंत टाका, तिचा मुलगा शिवाजी यासही वेडा ठरवून बंदींत ठेवा व तुमचा मुलगा संभाजी यास गादीवर बसवून राज्य चालवा. तुम्ही जर हें कारस्थान करीत असाल तर मी तुम्हांस मदत करितों. " राजसबाईला आपल्या मुलास गादी मिळणार हें पाहून आनंद झाला; व ती शाहूच्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास खुषीनें तयार झाली. थोड्याच दिवसांत गिरजोजी यादव व अंताजी त्रिमळ व आणखी कांहीं गडकरी यांच्या साहाय्यानें ताराबाई व शिवाजी या दोघांस पन्हाळ्यावर कैदेंत टाकून संभाजीनें राज्यसूत्रें धारण केलीं. अशा रीतीनें शाहूवर जें मोठें ताराबाईचें अरिष्ट कोसळणार होतें त्याचा निकाल लागला; व ताराबाईचा पक्ष पूर्णपणें नाहींसा झाल्यामुळें अंतः-कलह संपला. शिवाजी बंदींत असतांच दोन वर्षांनीं देवी येऊन वारला. त्याचा एक मुलगा गुप्तपणें पळवून नेऊन ताराबाईनें वांचविला. हाच पुढें रामराजा म्हणून जो शाहूच्या मागून साताऱ्च्या गादीवर बसला तो होय. शिवाजीचा दुसरा मुलगा संभाजीच्या हातीं सांपडला, त्यास संभाजीनें ठार केलें.

शाहूची प्रतिस्पर्धी ताराबाई हिचा मोड झाला खरा, पण मराठे सर-दार स्वतंत्र झाले होते, ते शाहूची सत्ता कबूल करीनात. त्यामुळें देशां-तला दंगा मोडून आपला अंमल बसविण्याची शाहूस खटपट करावी लागली. पहिल्यानें हिंगणगांवास राहून दमाजी थोरात दंगा करीत होता त्यावर शाहूनें बाळाजीस पाठविलें. त्याप्रमाणें बाळाजी फौज घेऊन निघाला. तो जवळ आला असें पाहून थोरात गरीबीनें सामोरा आला व आपण शरण आलों असें दाखवून व दगा करणार नाहीं म्हणून बेल-भंडार उचलून तह ठरविण्याकरितां बाळाजीस गढींत घेऊन गेला. गढींत गेल्याबरोबर थोरातानें विश्वासघात करून बाळाजी, त्याचे दोघे मुलगे बाजीराव व चिमाजी आप्पा व अंबाजीपंत पुरंदरे या सर्वांस कैद केलें. त्याला बेलभंडाऱ्याच्या शपथेची जेव्हां आठवण दिली तेव्हां तो

म्हणाला ' बेल म्हणजे झाडपाला व भंडारा तर आम्ही दररोज खातों ! ' त्यानें जबर खंडणी मागितली व ती न दिल्यास ' राखेचे तोबरे देईन ' अशी धमकी दिली. मग अंबाजी पुरंदरे रक्कम आणण्याकरितां शाहूकडे गेला. शाहूस बातमी कळली तेव्हां त्यास अत्यंत वाईट वाटलें. त्यानें लागलीच रुपये भरून बाळाजीची सुटका केली. शाहूनें थोरातांचें पारिपत्य करण्याचें काम सचिवास सांगितलें. थोरातानें त्यालाही कैद केलें. तें वृत्त ऐकून बाळाजीनें थोरातास जमीनदोस्त करण्याचा निश्चय केला. पण इतक्यांत दुसरें महत्त्वाचें काम निघाल्यामुळें तो बेत लांबणीवर पडला. कृष्णराव खटावकर माण देशांत व कान्होजी आंग्रे कोंकणांत फार गडबड करीत होते. शाहूनें त्या दोघांचा मोड करण्याचा बेत केला. त्यानें खटावकरावर बाळाजीस पाठविलें व आंग्र्यांवर बहिरोपंत पिंगळे पेशवे यांची रवानगी केली. बाळाजीबरोबर परशुरामपंत प्रतिनिधीचा दुसरा मुलगा श्रीपतराव हा गेला. परशुरामपंतानें मुलास सांगितलें कीं, ' खटावकराबरोबरच्या युद्धांत तूं चांगला पराक्रम कर म्हणजे माझी सुटका होईल. ' कृष्णराव खटावकर बराच प्रबळ होता. बाळाजी आपल्यावर चालून येत आहे असें कळतांच तो स्वतः पुढें चाल करून औंधावर आला. तेथें दोघांमध्यें निकराची लढाइ झाली. श्रीपतराव कसून लढला. कृष्णरावाचा पराभव झाला. तो बाळाजीस शरण आला. त्यावरून शाहूनें खटाव हा गांव त्यास इनाम करून दिला. खटावकराशीं चाललेल्या युद्धांत शाहूचा जय झाला, पण कोंकणांत बहिरोपंत पिंगळे गेला होता तिकडे निराळाच प्रकार झाला. बहिरोपंताचा पराभव करून कान्होजी आंग्र्यानें त्याला कैदेंत टाकलें. आंग्र्यानें लोहगड व राजमाची हे दोन्ही किल्ले बळकाविले व तो सातार्‍यावर चाल करून येणार अशी भुमका उठली.

बाळाजी, खटावकराचें बंड मोडून नुकता आला होता, त्यासच शाहूनें आंग्र्याचा मोड करण्याच्या कामगिरीवर नेमिलें. बरीच फौज

हाताखालीं घेऊन बाळाजी निघाला. कान्होजी आंग्रे हा बलाढ्य सरदार होता, त्याच्या ताब्यांत किल्लेकोटही पुष्कळ होते. तेव्हां त्यास सामोपचारानें वश करून घेणेंच फायदेशीर होतें. या गोष्टी बाळाजीच्या ध्यानांत आल्या व त्यानें आंग्र्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यानें आंग्र्यास निरोप पाठविला कीं, " तुम्ही महाराजांचे पदरचे मातबर सुभेदार—तुमचे वडील तुकोजी आंग्रे यांनीं थोरले शिवाजी महाराज यांजपाशीं सेवा निष्ठेनें केली ऐसें असून शाहू महाराज वडील; सिंहासनाचे खावंद राज्य करतात त्यांशीं वैर करतां हा सेवकाचा धर्म कीं काय ? स्वंस भेटून कृपा संपादन करावी हे उत्तम गोष्ट आहे. " आंग्र्याचें मन या निरोपानें शाहूकडे झुकलें व त्यानें बाळाजीची भेट घेतली. आंग्र्यास दहा अवघड व सोळा सवघड किल्ले मिळाले. आरमाराचा अधिकार त्याच्याकडे राहून शिवाय सरखेल हें पदही मिळालें. आंग्र्यानें शाहूचें स्वामित्व कबूल केलें, बहिरोपंतास सोडून दिलें; व राजमाचीशिवाय सर्व किल्ले परत केले. असा विजय संपादन करून बाळाजी सातार्‍यास आला; तेव्हां स्वतः शाहू त्याचें स्वागत करण्यास गांवाबाहेर आला होता. बहिरोपंताच्या अंगांत कर्तबगारी नाहीं असें पाहून शाहूनें त्याच्याकडून **पेशवेपद** काढून घेतलें. बाळाजी, शाहूच्या सारखा उपयोगीं पडला व त्यानें नुकताच मोठा विजय संपादन केला होता. त्याबद्दल त्यास शके १६३५ ( सन १७१४ ) त 'पेशवे' हें पद दिलें. खटावकरांशीं झालेल्या युद्धांत श्रीपतरावानें पराक्रम केला त्यावरून शाहूनें परशुरामपंतास बंधमुक्त करून शके १६३५ च्या आरंभीं त्यास प्रतिनिधिपद दिलें.

---

१ चिटणीसकृत शाहूचें चरित्र पृष्ठ २८-२९.

## ३७ राज्यव्यवस्था.

शिवाजीनें केलेल्या राज्यव्यवस्थेसंबंधीं लिहितांना त्याच्या अष्टप्रधानांचेंही वर्णन मागें केलें आहे. शिवाजीनें आपल्या राज्यकारभाराचीं खातीं पाडून एकएका खात्यावर एकएक प्रधान नेमिला; व त्याच्या मरणापर्यंत या व्यवस्थेनें मराठ्यांचें राज्य अष्टप्रधानांच्या हुकुमाखालीं चाललें होतें. पुढें संभाजीनें सर्व प्रधान बाजूला ठेवून कलुशा सांगेल तें प्रमाण मानून तो राज्य करूं लागला. त्याच्या मृत्यूनंतर मराठ्यांचें राज्य बुडतें कीं काय असें वाटूं लागलें होतें, पण राजाराम जिंजीस गेला व त्या किल्ल्याच्या आश्रयानें त्यानें मराठी राज्याचें रक्षण करण्याचा खटाटोप केला. यावेळेस, ही शिवाजीची अष्टप्रधान नेमून राज्य करण्याची रीति अंमलांत आली नाहीं. जिंजीस राजारामाचा मुख्य सल्लागार प्रल्हाद निराजी हा होता व त्याच्याच धोरणानें त्यावेळचा सर्व राज्यकारभार चालला होता. तो वारल्यावर थोड्याच दिवसांनीं जिंजींतून राजाराम निसटून गेला व महाराष्ट्रांत आल्यावरही त्याला मुळींच स्वस्थता मिळाली नाहीं. राजारामानंतर ताराबाई राज्यकारभार पाहूं लागली. तेव्हां तर औरंगजेबास बराच जोर आला होता व मोंगलांशीं चाललेलें युद्ध तसेंच पुढें चालविण्यांत ताराबाईचे बरेच दिवस गेले. औरंगजेब वारल्यावर स्वस्थता होईल असें वाटूं लागलें होतें; व अष्टप्रधानघटित राज्यपद्धति मग कदाचित् अंमलांत आली असती. पण ही स्वस्थता कशी मिळावयाची ? औरंगजेबाच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं शाहूची सुटका झाली. शाहू व ताराबाई या दोघांत झगडे सुरू झाले व राज्यांत गोंधळ कायम राहिला. शेवटीं बाळाजी विश्वनाथाच्या खटपटीनें शाहू गादीवर स्थिर

झाला. ताराबाईचा मोड झाला खरा, पण निरनिराळे मराठे सरदार स्वतंत्रतेनेंच वागत होते. ते शाहूच्या ताब्यांत येऊन मराठी राज्यांत एकी उत्पन्न होणें अवश्य होतें. मराठे सरदार स्वतंत्रतेनें वागत होते, त्यास मराठी राज्यावर औरंगजेबानें केलेली स्वारी हेंच पुष्कळ अंशीं कारण होतें. राजारामाच्या वेळेस मराठी राज्य बुडतें कीं काय असें जेव्हां राजाराम, प्रल्हाद निराजी इत्यादि मंडळींस वाटूं लागलें तेव्हां ती मंडळी जिंजीस गेली. तेथून मोंगलांच्या मुलखांत धुमाकूळ मांडून मोंगलांस जो जो त्रास देईल त्याला इनामें, पदव्या देण्यास त्यांनीं सुरु-वात केली. त्या इनामांच्या व पदव्यांच्या आशेनें शेंकडों मराठे सरदार मुलखांत दंगा करून मोंगलांस त्रास देऊं लागले. त्यामुळें अखेर मोंगल जेरीस येऊन मराठी राज्य वांचलें. मोंगल गेले खरे; परंतु मराठे सरदार मुलखांत पहिल्याप्रमाणेंच दंगा करीत राहिले.

अशा स्थितींत मराठ्यांच्या राज्यांत एकी उत्पन्न करण्याकरितां बाळाजीनें एकएका सरदारास मुलूख जहागीर देऊन टाकिला. सर-दारानें आपआपल्या मुलखांत वसूल गोळा करावा, न्यायनिवाडा करावा व त्याचा बंदोबस्त ठेवावा. कान्होजी आंग्र्याशीं बाळाजीनें समेट केला तो याच धोरणावर केला. खंडेराव दाभाड्यास खानदेश देऊन गुजराथ काबीज केल्यास तीही जहागीर देऊन टाकूं, म्हणून आश्वासन दिलें. त्याला उत्तेजन यावें म्हणून सेनापतिपदही दिलें. परसोजी भोंसल्यास वऱ्हाड बहाल करण्यांत आला व सेनासाहेबसुभा हें पदही त्याच्याकडे कायम झालें. उदाजी पवारास माळव्यांत मुलूख मिळविण्याविषयीं प्रो-त्साहन दिलें. फत्तेसिंग भोंसल्यास कर्नाटकाकडे जहागिरी दिली. परशु-रामपंत प्रतिनिधीकडे निरा व वारणा या नद्यांमधील मुलखाची व्यवस्था सांगितली. स्वतः बाळाजीनें आपणास कांहींच घेतलें नाहीं. तो राजाचा मुख्य सल्लागार झाला व खानदेशांत राज्याचा वसूल गोळा करण्याचें

काम त्यानें आपल्याकडे घेतलें. परंतु त्यापासून त्याचें सैन्यबल काय किंवा द्रव्यबल काय, दोन्हीही वाढलीं नाहींत.

सरदारांना जाहगिरी देतांना बाळाजीनें पुढीलप्रमाणें अटी घातल्या होत्या.

१ सरदारांनीं आपआपल्या मुलखांत मुलकी व लष्करी अम्मल चालवावा.

२ छत्रपति व त्याचे मुख्य प्रधान यांच्या हुकमाशिवाय कोणत्याही सरदारानें परराष्ट्रांशीं लढाई किंवा तह करूं नये.

३ ठरविलेली खंडणी सरकारांत भरावी.

४ जहागिरीच्या उत्पन्नाचे हिशेब सरकारचे दरकदार तपासतील त्यांस तपासूं द्यावे.

या अटी सरदारांनीं मोठ्या खुषीनें पत्करल्या. जहागिरी मिळाल्याबद्दल सर्वांस मोठा आनंद झाला व जवळचा मोंगलांचा प्रांत काबीज करून आपली जहागीर वाढविण्याची जो तो सरदार खटपट करूं लागला. यामुळें पुढील चाळीस वर्षांत मराठ्यांचें राज्य अत्यंत झपाट्यानें वाढलें. मराठे सरदारांत एकी रहाण्यास आणखी एक गोष्ट मोठी उपयोगीं पडली. प्रत्येक मराठा सरदाराचें महाराष्ट्रांत मुख्य सत्तेच्या हद्दींत कांहीं वतन किंवा इनाम असे. या वतनाचा प्रत्येक सरदारास मोठा अभिमान असे व तें वतन राखण्याकरितां मुख्य सत्तेशीं तो नम्रपणें वागे.

या सरंजामपद्धतीचा पुढें नीटपणें अम्मल झाला नाहीं. सरदार लोक स्वतंत्र होण्याच्या भरीस पडले व मराठ्यांच्या राज्यास त्यामुळें उतरती कळा लागली या गोष्टी खऱ्या आहेत. परंतु पुढें सरंजामपद्धति नीट चालली नाहीं म्हणून तिची स्थापना करणारास दोष देणें योग्य नव्हे. बाळाजीनें सरदार लोकांस जहागिरी देऊन राज्यांत ऐक्य केलें हें त्यानें फार मोठें काम केलें.

# ३८ स्वराज्याची सनद.



**सचिवास** थोरातानें कैदेंत टाकल्याचें मागें एका गोष्टींत सांगितलें आहे. सचिवाच्या आईनें आपल्या मुलास सोडविण्याविषयीं बाळाजीची विनवणी केली; त्यावरून बाळाजीनें सचिवाची सुटका करून दमाजी थोराताचा नाश करण्याचा बेत केला. एकदम थोरातावर हल्ला केल्यास तो सचिवाच्या जिवास अपाय करील असें बाळाजीस वाटलें म्हणून त्यानें दंड भरून साचिवास सोडविलें. मग हल्ला करून हिंगण्याची गढी पाडली. व दमाजी थोरातास कैद केलें. सचिवाची सुटका केल्याबद्दल पुरंदर किल्ला व पुणें प्रांत हे बाळाजीस मिळाले. पुणें प्रांतांत मोंगलांचा सरदार बाजी कदम हा होता. त्यास अनुकूळ करून घेऊन बाळाजीनें तो प्रांत आपल्याकडे घेतला. लोकांस सवलती देऊन शेतीस उत्तेजन दिलें. यामुळें थोड्याच काळांत सुबत्ता झाली.

दिल्लीच्या गादीवर यावेळीं फिरुकशिअर बादशहा होता. त्यास गादीवर बसविण्यांत सय्यद अबदुल्ला व सय्यद हुसेन या दोघां सय्यद बंधूंनीं फार खटपट केली होती. त्यामुळें त्यांच्या हुकुमाशिवाय राज्यांतील एक पानसुद्धां हलत नसे. फिरुकशिअर बादशहास या परावलंबनाचा थोड्याच दिवसांत कंटाळा आला व तो सय्यदांची सत्ता कमी करण्याचे प्रयत्न करूं लागला. शेवटीं त्यानें दोघां भावांची ताडातोड करण्याचा बेत केला व अबदुल्लास आपला वजीर करून धाकटा भाऊ हुसेनअल्ली यास दक्षिणच्या सुभ्यावर पाठविलें. हुसेनअल्ली दक्षिणेंत पोंचण्याच्या अगोदर बादशहानें दउदखान पन्नी म्हणून गुजराथचा

सुभेदार होता त्याला हुसेनअल्लीशीं लढाई देऊन त्यास ठार करण्याचा गुप्त हुकूम पाठविला. त्याप्रमाणें हुसेनअल्लीवर दाउदखान चालून गेला. दोघांचें युद्ध झालें परंतु दाऊदखान युद्धांत पडला व हुसेनअल्ली निर्विघ्नपणें दक्षिणच्या सुभ्यावर पोंचला. हुसेनअल्लीनें सुरतपासून बऱ्हाणपुरापर्यंत मोंगलांच्या मुलखाचा बंदोबस्त करण्याच्या इच्छेनें गुजराथेंत खंडेराव दाभाड्यावर फौज पाठविली. खंडेराव त्या मुलखांत खंडणी जमा करीत असे. झुलफिकरबेग या सरदाराच्या हाताखालीं आठ हजार लोक दाभाड्यावर चालून गेले. दाभाड्यानें त्यास बरेंच पुढें येऊं दिलें; व मग उलटून असा सपाट्याचा हल्ला केला कीं मोंगलांच्या फौजेची रेवडी उडाली. खुद्द झुलफिकरबेग रणावर पडला. शत्रूचें सर्व सामान मराठ्यांच्या हातीं आलें. या पराजयानें मोंगलांस फार वाईट वाटलें. मग चंद्रसेन जाधव आतां हुसेनअल्लीस मिळाला होता तो व मोकुबसिंग या दोघां हिंदु सरदारांच्या हाताखालीं फौज देऊन हुसेनअल्लीनें त्यांस दाभाड्यावर पाठविलें. दोन्ही फौजांची गांठ अहमदनगरजवळ पडली. खूप जोराची लढाई झाली. मोंगलांची फौज औरंगाबादेस निघून गेली; व जय संपादून दाभाडे साताऱ्यास शाहूच्या भेटीस गेले. शाहूनें खूष होऊन सेनापतिपदाचीं वस्त्रें खंडेरावास दिलीं. मराठ्यांनीं दक्षिणच्या साही सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखी हे दोन्ही हक्क वसूल करण्याचा सपाटा चालविला.

अशा रीतीनें मराठे त्रास देत होते व सय्यदांचा नाश करण्याच्या फिरुकशिअर बादशहाच्या खटपटी चालल्या होत्या. अशा स्थितींत पुढें मागें बादशहाशीं लढण्याचा प्रसंग आल्यास मराठ्यांच्या साहाय्याचा उपयोग होईल असें सय्यद हुसेनास वाटलें; व मराठ्यांशीं तह करण्याचा त्यानें निश्चय केला. राजारामानें जिंजीस ज्यास सचिव नेमलें होतें तो संक्राजी मल्हार काशीस निघून गेल्याचें मागें सांगितलें आहे. तो संक्राजी मल्हार काशीस रहाण्यास कंटाळून हुसेनअल्लीची नोकरी धरून

त्याजबरोबर दक्षिणेंत आला होता. त्यानें ' शाहूशीं मी तुमचा तह करून देतों म्हणून हुसेनअल्लीस सांगितलें व तो तहाचें बोलणें करण्याकरितां सातार्‍यास आला. उभयपक्षीं बोलणें होऊन तह ठरला. दक्षिणेंतील सहा सुभे ( वर्‍हाड, खानदेश, औरंगाबाद, बेदर, विजापूर व हैद्राबाद ) व त्रिचनापल्ली, तंजावर व म्हैसूरचीं मांडलिक संस्थानें यांतील चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याची मराठ्यांस परवानगी मिळावी. खानदेशाशिवाय शिवाजीनें जिंकलेला सर्व मुलूख ज्यास ' स्वराज्य ' म्हणतात तो सर्व मराठ्यांस परत मिळावा. शिवनेर व त्रिंबक हे दोन्ही किल्ले मराठ्यांस द्यावे. शिवाय कान्होजी भोंसले यानें वर्‍हाड व गोंडवण यांत जिंकलेला मुलूख मराठ्यांच्या ताब्यांत असावा व शाहूचीं बायकामाणसें दिल्लींत होतीं तीं सोडावीं. शाहूनें मोंगल बादशहास ' आपण वर्षास एक कोट रुपये खंडणी देऊं व चौथाईबद्दल १५००० सैन्य ठेवून देशांत शांतता राखूं ' असें कबूल केलें. हुसेनअल्लीस तह मान्य झाला व शाहूनें प्रांताचा बंदोबस्त करण्यासाठीं हुसेनअल्लीकडे संताजी व परसोजी भोंसले, उदाजी पवार इत्यादि सरदारांच्या हाताखालीं दहा हजार फौजेची रवानगी करून दिली.

फिरुकशिअर बादशहास हा तह मान्य झाला नाहीं, व तो सय्यदांचा नाश करण्याची उघड खटपट करूं लागला. तेव्हां हुसेनअल्लीनें दिल्लीवर स्वारी करण्याचा बेत केला; व शाहूस मदत करण्याविषयीं लिहिलें. शाहूनें बाळाजी विश्वनाथ पेशवे व खंडेराव दाभाडे यांस जाण्याची आज्ञा केली. पन्नास हजार फौज घेऊन बाळाजी व दाभाडे हुसेनअल्लीच्या मदतीस शके १६४० ( सन १७१८ ) च्या पावसाळ्यानंतर सातार्‍याहून निघाले. बाळाजीबरोबर त्याचा वडील मुलगा बाजीराव व बाळाजी महादेव भानू हे होते. स्वारीवर निघतांना शाहूनें बाळाजीस सांगितलें कीं सनदा आणाल त्यांत गुजराथ माळव्याची सनद आणावी, व दौलताबाद व चांदा हे किल्लेही मिळवावे. मग मराठे व सय्यद हुसेन यांच्या फौजा

एक होऊन कूच दरकूच करीत दिल्लीस पोहोंचल्या. सय्यदांनीं फिरुकशिअराची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण त्यांचे श्रम व्यर्थ गेले व फिरुकशिअर ताळ्यावर येईना. सय्यदांनीं त्याचे डोळे काढले व त्यास ठार मारिलें. त्याच्यामागून दोन बादशहा गादीवर बसविले परंतु ते लवकरच मेले. शेवटीं शहाअलम याचा नातू रोशन अकृत्यार याचें नांव महमदशहा असें ठेवून सय्यदांनीं त्याला गादीवर बसविलें. दिल्लीस या राज्यक्रांत्या होत असतांना मराठे तेथेंच होते. महमदशहा गादीवर आला तेव्हां हुसेअल्लीनें त्याच्याकडून बाळाजीस सनदा मिळवून देण्याची हमी दिली. बाळाजीस सनदा मिळणार हें दरबारांतील लोकांस आवडलें नाहीं व त्यांनीं पेशवे सनदा घेऊन बाहेर जातील तेव्हां त्यांस ठार मारून सनदा हिसकावून घेण्याचा बेत केला. बाळाजीस ही बातमी समजली होती. सनदा घेऊन नीटपणें येथून कसें पार पडतों, याची त्यास चिंता लागली. इतक्यांत बाळाजी महादेव भानू जवळ होता. त्यास विचारिलें असतां त्यानें उत्तर दिलें, "तुम्ही दरबारांतून सनदा घेऊन निराळ्याच वेषानें बाहेर पडा. मी तुमचे कपडे घालून पालखींत बसून थाटानें मागून येतों." बाळाजीस ही युक्ति पसंत पडली. मग दरबारांतून सनदा घेऊन ठरल्याप्रमाणें आडवाटेनें तो आपल्या लष्करांत येऊन दाखल झाला. बाळाजीपंत भानू पेशव्यांच्या पालखींत बसून निघाला. लोकांनीं त्यास पेशवा समजून ठार केलें. अशा रीतीनें बाळाजीपंत भानूनें स्वराष्ट्राकरितां प्रत्यक्ष देह अर्पण केला ! प्रसिद्ध नाना फडणीस हा या बाळाजीपंताचा नातू होय.

बाळाजी सनदा घेऊन व फौजेचा झालेला खर्च घेऊन दक्षिणेस येण्यास निघाला. त्यानें तीन सनदा मिळविल्या--एक साही सुभ्यांच्या चौथाईची, दुसरी साही सुभ्यांच्या सरदेशमुखीची व तिसरी शिवाजीनें जिंकलेल्या मुलखाची म्हणजे 'स्वराज्याची.' बाळाजीनें परत येतांना जयपूर, जोधपूर, उदेपूर इत्यादि ठिकाणच्या रजपूत राजांच्या भेटी

घेतल्या. दिल्लीस जाऊन बाळाजी शके १६४१ च्या पावसाळ्याच्या आरंभीं महाराष्ट्रांत येऊन पोंचला. हें वर्ष त्यानें वसुलाची व्यवस्था लावण्यांत घालविलें. राज्यांतील वसूल कोणास मिळावयाचा व तो कोणीं गोळा करावयाचा या दोन्ही बाबतींत बाळाजीनें नियम ठरवून टाकिले. ते नियम पुढीलप्रमाणें होतेः–

१ सरदेशमुखीचें उत्पन्न हें राजाचें वतन. यावर गादीच्या मालकाशिवाय इतर कोणाचा हक्क नाहीं.

२ बाकी सर्व हक्क मिळून जें उत्पन्न तें स्वराज्य.

(अ) यांतील शेंकडा २५ गादीच्या मालकाचा. याचें नांव राजबाबती.

(आ) बाकी शेंकडा ७५ उरेल तो मोकासा. यापैकीं साहोत्रा (सर्व स्वराज्यापैकीं शेंकडा ६ प्रमाणें) पंत सचिव यांचा.

(इ) बाकी उरले शेंकडा ६९ तो ऐन मोकासा. यापैकीं नाडगौडा (स्वराज्यावर शेंकडा ३ प्रमाणें) विभाग राजाचे इच्छेनुरूप वाटेल त्यास द्यावा.

(ई) बाकी शेंकडा ६६ उरले ते निरनिराळ्या सरदार-लोकांस जहागीर देण्यांत खर्च व्हावे.

३ राजबाबती वसूल करण्याचें काम पेशवे, प्रतिनिधी व सचिव यांनीं करावें.

मोकासा सचिव यांनीं वसूल करून घ्यावा; व लांब-लांबच्या गांवीं हा वसूल करण्यास राजानें आपले कामगार पाठवावे.

नाडगौडा ज्याला दिला असेल त्यानें वसूल करावा. जहा-गीर ज्याची त्यानें वसूल करावी.

४ सरदार लोकांस एकमेकांच्या मुलखांत त्या त्या मुलखाच्या उत्पन्नाच्या विभागावर किंवा तेथील गांवच्या उत्पन्नावर कांहीं हक्क मिळावे.

ही वसूलव्यवस्था झाल्यावर मराठे सरदारांत एकाचा जो फायदा तोच दुसऱ्याचा असें झालें व त्यांच्यांतील बंडाळी नाहींशी होऊन आपआपले हक्क जास्त वाढविण्याकरितां त्यांना मोठें उत्तेजन मिळालें.

याप्रमाणें सरदारांमध्यें एकी करण्याचें महत्वाचें कार्य बाळाजीनें घडवून आणलें, पण लवकरच शके १६४२ च्या चैत्र महिन्यांत (इ० स० १७२०) सासवड येथें दगदगीनें थकून बाळाजी मृत्यु पावला.

---

## ३९ 'मुळावरच घाव घालूं कीं फांद्या आपोआप खालीं येतील.'

बाळाजीस दोघे मुलगे होते. वडील बाजीराव आणि धाकटा चिमाजीआप्पा. दोघेही शूर होते, व चिमाजी नेहमीं बाजीरावाच्या अनुरोधानें वागत असे. त्यावरून राम-लक्ष्मणांची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. बाळाजीस चंद्रसेना-पुढें सरकत सरकत पांडवगडच्या आश्रयास यावें लागलें तेव्हां त्याच्या बरोबर बाजीराव व चिमाजी हे दोघे होते. बाळाजी दिल्लीस गेला तेव्हां बाजीराव त्याच्याबरोबर होताच. साताऱ्यास बाळाजी गेला कीं बाजीरावास नेहमीं बरोबर घेऊन जाई. तेथें शाहूच्या व बाजीरावाच्या नेहमीं गांठी पडत. शाहू बाजीरावास जवळ बोलावून निरनिराळे प्रश्न करी. त्यांचीं बाजीरावानें दिलेलीं उत्तरें ऐकून छत्रपति गार होऊन जाई. बाजीराव जवळच असल्यामुळें त्याच्या एकंदर वर्तनावरून लहान-

पणापासूनच त्याच्या अंगीं असणारा स्वाभिमान शाहूच्या लक्षांत आल्याशिवाय राहिला नाहीं. त्यामुळें शाहूची बाजीरावावर सहज मर्जी बसली. हा आपल्या बापाच्या सवाई होणार असें शाहू नेहमीं म्हणे. बाळाजी वारल्यावर कर्ता माणूस नाहींसा झाला म्हणून शाहूस दुःख झालें, पण बाजीरावामुळें तें दुःख फार वेळ टिकलें नाहीं. त्यानें बाजीरावास एकदम पेशवाईचीं वस्त्रें दिलीं; व बाळाजीप्रमाणेंच पराक्रम करून स्वामिसेवा करण्याविषयीं उत्तेजन दिलें. बाजीरावानें पेशवाई मिळाल्याबरोबरच खानदेशाकडे स्वारी केली. मोंगलांच्या मुलखांतील चौथाई न देणाऱ्या फौजदारांचें पारिपत्य केलें. दोन तीन वर्षांत माळव्यावर त्याच्या तीन मोहिमा झाल्या. त्याचें धाडस कांहीं विलक्षण होतें. त्याच्यामुळें मराठे शिलेदारांवर त्याचा तेव्हांच वचक बसला; व ते त्याच्या आज्ञेखालीं वागूं लागले.

बाजीरावानें मोंगलांच्या मुलुखांत उडविलेला दंगा पाहून श्रीपतरा प्रतिनिधीच्या छातींत धडधडूं लागलें. एके दिवशीं दरबार भरला होता त्या वेळेस संधि साधून श्रीपतराव म्हणाला, " पेशवे माळव्यांत व इतर ठिकाणीं जबरदस्तीनें मोंगलांपासून खंडणी घेत आहेत ही गोष्ट भयंकर नाहीं काय ? अशा उद्धटपणाच्या वर्तनानें मोंगलांस चीड येणार नाहीं काय ? मी युद्धास कचरतों असें मुळींच नाहीं. लढाईचा प्रसंग आल्यास पेशव्यांप्रमाणें मीही स्वारीवर जाण्यास तयार आहें. परंतु खोल विचारांअंतीं मला असें वाटतें कीं, उत्तरेकडचा मुलूख मिळविण्याचा तूर्त तरी पेशव्यांनीं नाद सोडावा. " प्रतिनिधीनें हें जें भाषण केलें त्याला भीति हें एक कारण होतेंच, पण दुसरें एक कारण होतें; तें हें कीं, बाजीरावाचा उत्कर्ष प्रतिनिधीस सहन होत नव्हता. दोन तीन वर्षांच्या बाजीरावाच्या शूरत्वाच्या कृत्यांमुळें चोहोंकडे त्याचें तेज फाकत चाललें होतें. हें पाहून प्रतिनिधीला वाटलें कीं, असाच पेशव्यांचा उत्कर्ष होत गेला तर आपण निर्माल्यवत् होणार. तेव्हां याची वेळींच तजवीज केली पाहिजे.

तें प्रतिनिधींचें भाषण ऐकून बाजीरावास आश्चर्य वाटलें; प्रतिनिधी-च्या भाषणानें दरबारांतील लोकांच्या मनांत उत्पन्न झालेला संशय दूर करण्याकरितां बाजीरावानें पुढीलप्रमाणें भाषण केलें. तो म्हणाला, "आजपर्यंत जीं कांहीं युद्धें मीं केलीं आहेत तीं मोंगलाशींच केलीं आहेत व त्यावरून मोंगलांचें सामर्थ्य किती हें मला कळून चुकलें आहे. मोंगल या नांवाची प्रतिनिधीस इतकी भीति कां वाटते हें मला समजत नाहीं. मोंगलांइतके चैनी या भूपृष्ठावर दुसरे नसतील. मोंगलांच्या राज्याचा वृक्ष वठला आहे. याच्या निरनिराळ्या फांद्या तोडण्याची गरज नाहीं. महाराजांनीं आज्ञा मात्र द्यावी, मी दिल्लीस जाऊन या जुनाट वृक्षाच्या मुळाशींच घाव घालतों. **मूळच उपटलें कीं फांद्या आपोआप खालीं येतील** " हें बाजीरावाचें वीरश्रीयुक्त भाषण ऐकून सर्व सरदारांस आवेश चढला. खुद्द शाहूच्या अंगांत शिवाजीचें वारें संचरलें व त्यांनें पेशव्यास झटलें, " तुमच्यासारखे वीर काय करणार नाहींत ? किन्नरखंडांत नेऊन मराठ्यांचा भगवाझेंडा लावण्यास आमची तुम्हांस परवानगी आहे. "

---

## ४० निजामाची खोड मोडली.



**मोंगलांच्या** ताब्यांत नर्मदेच्या दक्षिणेस जो मुलूख होता त्यास दाक्षिणचा सुभा असें नांव होतें. या वेळीं दाक्षिणच्या सुभ्यावर निजामुल्मुल्क हा होता. त्यास महमदशहा बादशहानें वजीर नेमिलें, म्हणून तो आपल्या सुभ्याची व्यवस्था लावून शके १६४३ ( सन १७२१ ) च्या शेवटीं दिल्लीस गेला. परंतु तेथें त्याचें व बादशहाचें पटेनासें झालें. निजामुल्मुल्क कर्तृत्ववान् होता. त्याला दर-

बारांतील चैन खपेना. त्यामुळें वजिराचें काम सोडून देऊन वकीलई-मुतालक ही पदवी घेऊन कांहीं दिवस दिल्लीसच होता. शेवटीं एके दिवशीं शिकारीच्या निमित्तानें दिल्लींतून आपल्या दक्षिणच्या सुभ्या-कडे जाण्यास निघाला. महमदशहास ही बातमी कळतांच त्यानें हैद्रा-बादचा कोतवाल मुबारिझखान यास ' निजामुल्मुल्काचा नाश कर म्हणजे तुला दक्षिणचा सुभेदार करूं. ' असा गुप्त निरोप पाठविला. हुकमाप्रमाणें मुबारिझखानानें निजामुल्मुल्काशीं युद्ध करण्याची जय्यत तयारी केली. निजामानें गोडीगुलाबीनें मुबारिझखानाचें मन वळ-विण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्याचे मन वळेना. तेव्हां निजामु-ल्मुल्कानें युद्धाची तयारी केली व मराठ्यांपाशीं मदत मागितली. बाजीराव सैन्य घेऊन आला. मग साखरखेडलें येथें शके १६४६च्या कार्तिकांत ( इ. स. १७२४ ) लढाई झाली. त्यांत मुबारिझखान व त्याचे दोघे मुलगे पडले. मुबारिझखानाचें शीर निजामानें बादशहाकडे पाठवून दिलें व स्वामीच्या कृपेनें आम्हीं हा बंडवाला मारला असें पत्र लिहिलें.

निजामुल्मुल्कानें अशा रीतीनें दक्षिणेंत येऊन आपली सुभेदारी मिळ-विली. त्याला बादशहाच्या जाचांतून आपण आतां अजीबात सुटलों असें वाटलें व आनंद झाला. पण त्याला आतां एक नवीनच शत्रु उत्पन्न झाला. मराठ्यांचा साही सुभ्यांवर खंडणी घेण्याचा हक्क निजामानें कबूल केला होता. त्या हक्काचा वसूल दरवर्षीं मराठे करीत, त्यामुळें निजामास आपल्या मुलखांत स्वस्थता ठेवणें फार अवघड पडूं लागलें. त्याला वाटलें कीं, हैद्राबादच्या जवळपासच्या प्रांतांतून खंडणी मरा-ठ्यांनीं घेऊं नये असा त्यांजबरोवर ठराव करावा. बाजीराव शके १६४८त कर्नाटकांत स्वारीवर गेला होता. तेव्हां शाहूजवळ श्रीपतराव प्रतिनिधीच सल्ला देण्यास असे. निजामानें प्रतिनिधीस वऱ्हाडांत जहागीर देऊन खूष केलें व मग प्रतिनिधीच्या मध्यस्थीनें शाहू व निजाम या दोघांत पुढीलप्रमाणें तह ठरला. शाहूनें हैद्राबादजवळच्या मुलखांतून चौथाई व

सरदेशमुखी हे हक्क वसूल करूं नयेत; चौथाईचा हक्क सोडल्याबद्दल निजामानें शाहूस खंडणी द्यावी व सरदेशमुखीच्या हक्काच्या बदली इंदापुराजवळ जहागीर द्यावी. बाजीरावास हा तह मुळींच आवडला नाहीं. त्याचें व प्रतिनिधीचें भांडण झालें. हें निजामास कळलें तेव्हां मराठ्यांत दुही पाडण्याचें धोरण तसेंच पुढें चालविण्याचा त्यानें विचार केला; व कोल्हापुरच्या संभाजीस हातीं धरलें. चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर व कोल्हापूरचा संभाजी इतकी मंडळी आपल्यास अनुकूल असल्यावर पेशव्यांची तेव्हांच खोड मोडतां येईल, अशी निजामास घमेंड होती. त्यानें शाहूकडील वसूल करणाऱ्या लोकांस हाकून दिलें व शाहूस असा निरोप पाठविला कीं " तुमचे लोक वसूल करण्यास येतात आणि कोल्हापूरच्या संभाजीराजाचेही येतात. या तुम्हां दोघांपैकीं खरा वारस कोण हें अगोदर ठरवा म्हणजे मग खऱ्या वारसास मी हक्क वसूल करूं देईन. " हा मग्रुरीचा निरोप ऐकून शाहूस अत्यंत क्रोध आला. बाजीराव तर पहिल्यापासूनच निजामाविषयीं जळत होता. बाजीरावानें शाहूस सांगितलें कीं, ' निजाम गर्वानें चढून गेला आहे. मला आज्ञा द्यावी म्हणजे मी त्याचें पारिपत्य करितों. ' शाहूनें निजामाची खोड मोडण्यास परवानगी दिली. बाजीराव फौज घेऊन निघाला आणि निजाम व त्याचे साह्यकर्ते संभाजी व चंद्रसेन यांच्या फौजा एकत्र होण्यापूर्वींच त्यानें जालना प्रांतांत शिरून तेथें खूप खंडणी वसूल केली. मग मराठ्यांवर इवझखानाच्या हाताखालीं कांहीं फौज चालून आली. बाजीरावानें त्याच्याशीं थोडेंसें युद्ध केलें व माहुरावर मोर्चा फिरविला. मग फिरून बाजीराव औरंगाबादेकडे झपाट्यानें गेला. व बऱ्हाणपुरावर आपण स्वारी करणार अशी अवई उठवून भरारी मारीत खानदेशांत गेला. मग थोडके लोक बऱ्हाणपुराकडे पाठवून बाजीराव गुजराथेंत शिरला, व निजामुल्मुल्काच्या हुकमानें आपण खंडणी वसूल करीत आहोंत असें त्यानें तेथें जाहीर केलें. इकडे निजामुल्मुल्कास वाटलें कीं, बाजीराव बऱ्हाणपूरास गेला. ह्मणून तो मोठ्या

घाईनें बऱ्हाणपुराकडे गेला. तेथें गेल्यावर बाजीरावानें आपणास पूर्णपणें चकविलें असें त्याला आढळून आलें. मग रागावून तेथून निघून पुणें जाळून टाकावें या उद्देशानें तो परत फिरला. तो अहमदनगरास येऊन पोंचला नाहीं तोंच बाजीराव आपल्या मुलखांत उतरून लुटालूट करीत आहे असें त्यास कळलें. मग फजीत पावून तसाच बाजीरावाचें पारिपत्य करण्याकरितां गोदावरी उतरून आपल्या मुलखांत निजाम गेला. कांहीं दिवस मराठे व मोंगल यांच्या चकमकी होत होत्या. शेवटीं बाजीरावानें निजामास पालखेड येथें अशा अडचणींत कोंडिलें कीं, त्यास पाणी मिळेना, धान्य मिळेना, त्याच्या घोड्यांच्या वैरणीस आगी लावल्या, तेव्हां निजाम अगदीं जेरीस आला. निजामानें चंद्रसेनास विचारलें कीं, " तुम्ही मराठे मजकडे असून गनिमी काव्यानें शत्रूशीं कां टक्कर देत नाहीं ? " चंद्रसेनानें उत्तर केलें " माझ्या सैन्यांत पुष्कळ मुसलमानच भरले आहेत. " संभाजीस तोच प्रश्न विचारला, तेव्हां त्यानें सांगितलें कीं " माझे कारकून विरुद्ध पक्षाला मिळाले असावेत असा जबर संशय येतो. " शिवाय संभाजी निजामास म्हणाला ' फौजेस खर्चास जे पैसे द्याल ते माझ्याजवळ द्या, कारकुनांजवळ दिल्यास ते आणखी फौज फितवितील. ' कारकुनांनीं निजामास साफ सांगितलें कीं ' संभाजीपाशीं तुम्हीं पैसे दिल्यास फौजेस मुळींच मिळावयाचे नाहींत; तो ते चैनींत उडवून टाकील. ' असा निजामाच्या साह्यकर्त्यांत गोंधळ होता. त्यामुळें निजामास फारच त्रास होऊं लागला, व बाजीरावाशीं समेट करण्याचा त्यानें बेत केला. इवझखानाच्या मध्यस्थीनें तहाचीं बोलणीं सुरू झालीं. संभाजीस आपल्या स्वाधीन करण्याविषयीं बाजीरावानें बराच आग्रह धरला. चौथाई व सरदेशमुखी हे हक्क पूर्वीप्रमाणें वसूल करूं देण्याचें निजामानें कबूल केलें. हक्कांच्या वसुलीस उपयोगी असे कांहीं किल्ले देण्याविषयीं मराठ्यांचें म्हणणें होतें, तेंही निजामानें कबूल केलें. मग बाजीरावानें संभाजीविषयींचा आग्रह सोडला. निजामानें संभाजीस पन्हाळ्यास पोंचवावें, मग

मराठ्यांनीं काय वाटेल तो त्याशीं ठराव करावा, निजामानें मध्यें पडण्याची जरूर नाहीं असें ठरलें. असा तह शके १६५० चैत्र शुद्ध ६ (६ मार्च १७२८) रोजीं ठरला.

## ४१ शिंदेहोळकरांचा उदय.



बाजीरावानें पेशवाई मिळाल्यावर थोड्याच दिवसांनीं माळव्यावर स्वाऱ्या केल्या म्हणून मागें सांगितलें आहे. या स्वाऱ्यांत ज्या सरदारांनीं कर्तबगारी दाखविली त्यांत शिंदेहोळकर हे मुख्य होत. कांहीं वर्षें बाजीरावास निजामुल्मुल्काशीं युद्ध करीत महाराष्ट्रांत रहावें लागलें. त्या वेळीं माळव्यांत शिंदे व होळकर हेच सरदार हक्क वसूल करीत असत. तेव्हां या सरदारांचा पूर्ववृत्तांत कळणें अवश्य आहे.

होळ म्हणून नीरेचे कांठीं जेजुरीजवळ एक खेडें आहे. तेथें खंडुजी नांवाचा एक चौगुला पाटलाच्या हाताखालीं काम करून असे. त्याला मल्हारजी नांवाचा एक मुलगा होता. मल्हारजी तीन वर्षांचा असतांच खंडुजी वारला. मल्हारजीची आई आपल्या माहेरीं गेली व मल्हारजी आपल्या मामाच्या घरीं राहूं लागला. मामानें त्याला गुरें राखण्याचें काम सांगितलें होतें. दररोज सकाळीं रानांत जाऊन मेंढ्या चारून संध्याकाळीं घरीं यावें असा मल्हारजीचा क्रम चालला होता. एके दिवशीं मेंढ्या चारीत असतां दोन प्रहरची वेळ झाली होती. मल्हारी दमून एका झाडाखालीं पडला होता. थकल्यामुळें त्याला झोंप लागली होती. इतक्यांत वारुळांतून एक नाग निघून त्यानें त्या मुलावर फणेची छाया केली. तितक्यांत मल्हारजीची आई मुलास भाकरी घेऊन आली. तिनें तें पाहिलें व भयभीत होऊन माघारी जाऊन भावास घेऊन आली तरी नाग होताच.

शेवटीं माणसांची गर्दी झाल्यावर नाग बिळांत निघून गेला. मल्हारजीच्या आईनें हा वृत्तांत ज्योतिष्यास सांगितला. तेव्हां ज्योतिषी म्हणाला, " या मुलाला राज्य मिळणार. "

मामानें मल्हारीस रानांत पाठविणें बंद केलें व त्यास घोड्यांची देखरेख सांगितली. कांहीं दिवसांनीं मल्हारजी पांढरे नांवाच्या सरदाराच्या पथकांत दहावीस घोडे ठेवून शिलेदारी करूं लागला. याच वेळीं बाजीराव पेशव्याच्या माळव्यांत स्वाऱ्या सुरू झाल्या. त्यांत मल्हारजीचा पराक्रम दिसून आला. त्यावरून चढत चढत पांच दहा घोड्यांपासून पांच हजारपर्यंत फौज मल्हारजीजवळ वाढली व मग अर्थातच मल्हारजीस मल्हारराव होळकर हें नांव मिळालें.

सातारा जिल्ह्यांत कोरेगांव तालुक्यांत कण्हेरखेड म्हणून एक गांव आहे.त्या गांवची पाटीलकी शिंदे घराण्याकडे होती. हें शिंदे घराणें मुसलमानांच्या राज्यापासून प्रसिद्ध होतें. नेमाजी शिंदे या सरदाराचें नांव मागें आलेंच आहे. पण या वेळीं त्या घराण्याची फारच हीन दशा झाली होती. राणोजी शिंदे हा पहिल्यानें बाळाजी विश्वनाथाच्या सैन्यांत बारगिरी करीत असे. बाजीरावाची हुजऱ्याची नोकरी त्यानें आतां पत्करिली होती. परंतु अशा हलक्या नोकरींतही त्याची स्वामिनिष्ठा दिसून आल्याशिवाय राहिली नाहीं. एके दिवशीं बाजीराव दरबारांत गेला होता. तेथें त्यास कामामुळें बराच उशीर झाला. काम आटोपल्यावर बाजीराव बाहेर आला. पाहतो तों राणोजीस झोंप लागली आहे, पण त्यानें आपले ( बाजीरावाचे ) जोडे घट्ट उशाशीं धरले आहेत. तें पाहून बाजीरावास राणोजीचें कौतुक वाटलें, व राणोजी कोणतेंही काम त्यावर सोंपविलें असतां मोठ्या नेकीनें करील अशी त्याची समजूत झाली.

एकदां मल्हारराव होळकर हिंदुस्थानांत स्वारी करण्यास निघणार होता तेव्हां त्याच्याबरोबर पेशव्यांची एक पागा द्यावयाचें ठरलें होतें.

त्या पागेवर मुख्य कोणास नेमावें यासंबंधीं घाटत होतें. राणोजी पेशव्यांकडून ताट घेऊन रोज मल्हाररावाकडे पाचवीत असे. मल्हाररावाचीही राणोजीवर मर्जी बसली. एके दिवशीं होळकर येऊन बसला होता. बाजीराव त्यास म्हणाला " तुम्ही सांगाल त्यास पागा देतों. " राणोजी पेशव्यावर चवरी वारीत होता. त्याच्याकडे होळकरानें बोट केलें. बाजीरावानें तें मान्य करून पागेचीं वस्त्रें राणोजीस देऊन सरकारी शिक्के, कट्यार, जरीपटका हीं त्याच्या स्वाधीन केलीं. अशा रीतीनें राणोजीचा उदय झाला. पुढें तो पराक्रम करून होळकरांच्या बरोबरीचा सरदार झाला.

तिसरा एक सरदार उदाजी पवार हा माळव्यांत मुलूखगिरी करीत असे. पेशव्यांनीं माळव्याची कायमची खंडणी वसूल करण्याचा रिवाज पाडला; व माळवा प्रांताच्या वांटण्या पाडल्या. त्यांत शकडा ४५ पेशव्यांनीं घ्यावयाचे, बाकीच्या ५५ त २२॥ शिंदे, २२॥ होळकर व १० पवार अशा वसुलाच्या वांटण्या झाल्या. शिंदे, होळकर व पवार कायमचेच माळव्यांत राहूं लागले. शिंदे उज्जनीस, होळकर इंदुरास व पवार धारेस असे रहात.

शिंदेहोळकरांच्या पेशव्यांवरील निष्ठेची त्या काळीं किती प्रसिद्धी होती यासंबंधानें एक गोष्ट आहे. एकदां बाजीराव निजामुल्मुल्कास भेटण्यास औरंगाबादेस गेला होता. गांवाजवळच निजामानें भेटाची तयारी केली होती. बाजीरावाबरोबर फौज नव्हती. कांहीं खिजमतगार मात्र बरोबर होते. उभयतांच्या भेटी होऊन बिछायतीवर बसले. बाजीराव व नबाब यांचीं बरींच बोलणीं झालीं. नतर नबाब बाजीरावास म्हणाला, " आतां कसें ? आतां तुम्ही आमच्या हातांत सांपडलां ! ! तुमचे शिंदे होळकर कोठें आहेत ? आतां तुम्हांस आम्ही एखादा दगा केल्यास कसें होईल ? " बाजीरावानें उत्तर केलें, " आपण निजाम आहांत. आपण असा विश्वासघात करणार नाहीं. केलाच तर माझे

शिंदे होळकर येथेंही प्रकट होऊन जेथें माझें शीर तेथें त्यांचीं शिरें पडतील. ” इतकें बोलणें होतांच खिजमतगारांत उभे असलेले शिंदे-होळकर एकदम सलामास पुढें आले. हें पाहून नबाब चपापला. तो बाजी-रावास म्हणाला, “ तुम्ही आमच्या भेटीस असे सडे फिरून येऊं नका; आम्ही घात करावयास चुकावयाचे नाहीं. ”

---

## ४२ गजेंद्रमोक्ष.

शके १६५१ ( सन १७२९ ).



बाजीरावास पेशवाई मिळाली तेव्हां माळवा प्रांताचा सुभेदार निजामुल्मुल्क हा होता. त्याला वजिरी मिळाली व तो पुढें दक्षिणेंत गेला. तेव्हां बादशहानें माळव्याच्या सुभ्यावरून त्यास काढलें व त्याच्या जागीं राजा गिरिधर याची नेमणूक केली. तरी त्या प्रांतांत व्यवस्था झाली नाहीं. बाजीरावानें स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली होतीच; त्यामुळें मराठ्यांचा बराच वचक बसत चालला होता. राजा गिरिधराची व उदाजी पवार आणि चिमणाजी दामोदर या दोघां मराठे सरदारांची गांठ पडली. युद्ध होऊन त्यांत राजा गिरिधर ठार झाला. त्यापुढें बादशहान दयाबहादुराची माळवा प्रांताच्या सुभेदारीवर रवानगी केली. त्याच्यावर चिमाजीआप्पा हा मल्हारराव होळकर व पिलाजी जाधवराव या दोन सरदारांसह चालून गेला. शके १६५० मध्यें ( आक्टो-बर १७२८ ) उज्जनीजवळ दोन्ही पक्षांचें युद्ध झालें, त्यांत गिरिधराप्रमाणें दयाबहादुराचा पराभव झाला व तो स्वतः युद्धांत पडला. या पराभवा-मुळें बादशहास दुःख झालें, पण मराठ्यांविषयीं त्वेष आला. त्यानें माळव्यावर चांगल्या खंबीर पुरुषाची योजना करण्याचें ठरविलें. अला-

हाबादेचा सुभेदार महमद्खान बंगष हा या कामास चांगला आहे असें बादशहास वाटून त्यानें त्याची माळव्यावर नेमणूक केली.

महमद्खान बंगषास मराठ्यांनीं पूर्वींच्या सरदारांची लाविलेली वाट ठाऊक होती; त्यामुळें त्यानें पहिल्यापासूनच सावधगिरी ठेवण्याचा निश्चय केला. मराठ्यांची स्वारी माळवा प्रांतांत उतरण्यापूर्वींच त्या प्रांतांतील राजे लोकांस आपल्या हाताखालीं आणण्याचा त्यानें उद्योग आरंभिला. पहिल्यानें बुंदेलखंडावर त्यानें स्वारी केली. बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल हा म्हातारा झाला होता. त्याचा मुलूख बंगष लुटूं लागला, तेव्हां छत्रसालास या शत्रूचा प्रतिकार कसा करावा याविषयीं मोठी चिंता पडली. छत्रसाल स्वतः म्हातारपणामुळें मोहिमेवर जाण्यास निरुपयोगी झाला होता. त्याला दोघे मुलगे होते; पण तेही फारसे कर्तृत्ववान् नव्हते. अशा स्थितींत आपलें राज्य हा बंगष गिळल्याशिवाय रहात नाहीं असा विचार छत्रसालाच्या मनांत येऊन तो अगदीं निराश झाला होता. इतक्यांत त्याला राज्यरक्षणाचा मार्ग सुचला व त्याची निराशा पार नाहींशी झाली. मराठ्यांना मदतीस बोलवावें म्हणजे या बंगषाचा सहज समाचार घेतील व संकट दूर होईल असा छत्रसालाच्या मनांत विचार आला. मग लागलींच एक शंभर दोहऱ्यांचें पत्र लिहून त्यांत बाजीरावास तांतडीनें माळव्यांत येण्याविषयीं त्यानें लिहिलें.

बाजीरावानें पुण्यास शनिवारचा वाडा बांधण्यास सुरुवात केली होती; व तो त्या वेळीं पुण्यास होता. याच वेळीं छत्रसालानें पाठविलेलें पत्र बाजीरावास पोहोंचलें. त्यांत शंभर दोहरे होते त्यांतला एक पुढील-प्रमाणें होता.

**जो गति ग्राह गजेंद्रकी सोगत भइ है आज ।**
**बाजी जात बुंदेलकी राख बाजी लाज ॥**

असें तें मोठ्या कळकळीनें लिहलेलें पत्र वाचून गजेंद्राचा धांवा ऐकून जसें विष्णूच्या पोटांत कालवलें तसेंच बाजीरावास झालें. बुंदेलखंडांत

जाऊन बंगषास केव्हां पिटाळून लावीन व छत्रसाल केव्हां संकटांतून मुक्त होईल असें त्यास झालें. तो एकदम पुण्याहून निघाला व नर्मदा उतरून गेला. चिमाजीआप्पा व पिलाजी जाधवराव यांच्याबरोबर असलेली फौज त्यानें आपल्याबरोबर घेतली. आप्पास परत जाण्यास सांगून त्यानें स्वत: बुंदेलखंडाकडे फार जलदीनें कूच केलें. मग धामोरा या ठिकाणीं छत्रसालाची त्यानें भेट घेतली व त्याची जी काय बुंदेली फौज होती ती बरोबर घेतली. व बंगषाचा पराभव करण्याकरितां तो मोठ्या ईर्षेनें पुढें चालून गेला. जैतपूर मुक्कामीं दोन्हीं सैन्यांची गांठ पडली. बंगष मोठ्या शर्थीनें लढला, पण त्याजवर मराठ्यांनीं असा कांहीं जोराचा मारा केला कीं बंगषाची फौज उधळली व दशदिशा पळूं लागली. खुद्द बंगषच जीव घेऊन पळून गेला. ही लढाई ( ३० मार्च १७२९ ) रोजीं झाली. या कामगिरीमुळें छत्रसाल अगदीं खूष झाला व त्यानें बाजीरावास झांशी व तिच्याजवळचा अडीच लक्षांचा मुलूख दिला. फिरून दोन महिन्यांनीं महमदखान बंगषाचा कोणी नातेवाईक कायमखान बंगष बुंदेलखंडांत शिरला. ही बातमी कळतांच बाजीराव वाघासारखा त्याच्या अंगावर चवताळून गेला. दोघांची लढाई झाली तींत मराठ्यांनीं कायमखानाचे हत्ती पळविले; व खुद्द कायमखानावर हल्ला करून ते त्यास पकडण्याच्या बेतांत होते, पण इतक्यांत तो शंभर स्वारांनिशीं पळून गेला. या कामगिरीमुळें तर छत्रसालाची बाजीरावावर फारच मर्जी बसली. शिवाय छत्रसाल अगदीं आजारी पडून मरावयास टेंकला होता. त्यानें बाजीरावास म्हटलें, "जसे हे माझे दोन पुत्र तसेच तुम्ही तिसरे," असें म्हणून त्यानें आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा बाजीरावास दिला व प्रसिद्ध मस्तानीही बाजीरावास येथेंच नजर मिळाली. बाजीरावाजवळ गोविंदा खेर नांवाचा एक शागीर्द होता. त्यानें या युद्धांत बराच पराक्रम केला होता. त्यास बाजीरावानें नवीन मिळालेल्या मुलखाचा सुभेदार नेमिलें. यावरून गोविंदा, गोविंदपंत बुंदेले अगर झांशीवाले या नांवानें प्रसिद्धीस आला.

## ४३ कोल्हापूरकर संभाजीशीं समेट.

शके १६५३ ( सन १७३० ).



शके १६५१ चा पावसाळा संपल्यानंतर चिमाजीआप्पांनीं गुजराथेंत उतरून पेटलाद शहरची खंडणी वसूल केली व ढवळकें परगणा उध्वस्त केला; गुजराथ हा प्रांत माळव्याबरोबर निजामुल्मुल्काकडे होता. निजाम दक्षिणेंत गेल्यावर गुजराथ प्रांतावर बादशहानें सरबुलंदखानाची नेमणूक केली. पण त्या प्रांतांत दोघे मराठे सरदार कंठाजी कदम बांडे व पिलाजी गायकवाड हे स्वतंत्रतेनें वावरत असल्यामुळें सरबुलंदखानाचा अम्मल बसेना. माझी हलक स्थिति झाली आहे, मला मदत करा असे त्यानें बादशहाकडे पुष्कळ निरोप पाठविले, बादशहाकडून कांहींच उत्तर येईना. इकडे मराठ्यांनीं तर वसूल करण्याचा सपाटा चालविला. बाजीरावानें सरबुलंदखानास असा निरोप पाठविला कीं, तुम्ही त्या प्रांताची चौथाई व सरदेशमुखी आम्हास द्याल तर माझा भाऊ तुमच्या प्रांताचें रक्षण करील. सरबुलंद अगदीं टेंकीस आला होता. त्यानें बाजीरावाचें म्हणणें तात्काळ मान्य केलें. बाजीरावानें २५०० घोडेस्वारांची फौज गुजराथच्या बंदोबस्तास ठेवण्याचें कबूल केलें.

बाजीराव गुजराथेकडे वर सांगितलेला तह घडवून आणण्यासाठीं गुंतला होता. निजामाशीं झालेल्या लढाईंत कोल्हापूरच्या संभाजीचा फारच अपमान झाला होता. त्याचें उट्टें काढण्यास बाजीराव लांब गेला आहे ही संधि उत्तम आहे असें संभाजीस वाटलें. उदाजी चव्हाण हा पुंड मिरजेकडे चौथाई वसूल करीत असे म्हणून मागें सांगितलेंच आहे. या उदाजी चव्हाणानें शाहू एकदां शिकारीस गेला असतां त्याच्यावर

मारेकरी घालण्यास कमी केलें नाहीं. तेव्हां संभाजीस उदाजी चव्हाणाचें आयतेंच साहाय्य मिळालें. उदाजी चव्हाण व संभाजी हे दोघे एक होऊन त्यांनीं शाहूच्या राज्यांत लुटालूट करण्याचा विचार केला. मग ते दोघेही फौज बरोबर घेऊन वारणा नदी उतरले. शाहूचा मुलूख लागतांच लुटालूट करण्यास त्यांनीं आरंभ केला. संभाजीनें स्वारीवर आपलीं बायकामाणसेंसुद्धां आणलीं होतीं.

त्यांच्या दंग्याची हकीकत शाहूस समजली तेव्हां बाजीराव उत्तरेकडे गुंतला आहे अशा वेळीं यांचें पारिपत्य करण्यास कोणास पाठवावें या विवंचनेंत शाहू होता इतक्यांत त्याची काळजी दूर झाली. श्रीपतराव प्रतिनिधीनें कृष्णराव खटावकरांचें बंड मोडलें तेव्हांपासून त्यानें कोणताही पराक्रम केला नव्हता. परंतु बाजीरावानें मात्र मोहिमेवर मोहिमा करण्याचा तडाखा लावला होता, त्यामुळें प्रतिनिधी अगदीं मागें पडला. खुद्द शाहूजवळ देखील त्याचें फारसें वजन राहिलें नाहीं. त्यांतून प्रतिनिधीच्या मसलतीनें निजामुल्मुल्काशीं आंतबट्याचा तह करावा लागला होता. तो बाजीरावास मुळींच मान्य न होऊन निजामुल्मुल्काशीं त्यानें एकदम युद्ध सुरू केलें, व निजामास चौथाई व सरदेशमुखीचे हक्क कबूल करावयास लाविलें. या गोष्टींनीं शाहूस बाजीराव अत्यंत प्रिय व तितक्याच मानानें प्रतिनिधीस अप्रिय झाला होता. शाहूनें प्रतिनिधीस कोणत्याही महत्वाच्या कामावर नेमिलें नाहीं. यामुळें प्रतिनिधीच्या मनांत बाजीरावाविषयीं मत्सर उत्पन्न झाला होता; पण प्रतिनिधी बाजीरावाचा मत्सर करतो हें समजल्यावर त्याच्यावर शाहूची जास्तच गैरमर्जी झाली. शाहूची गैरमर्जी कशी नाहींशी करतां येईल याची प्रतिनिधीस काळजी लागली होती, इतक्यांत सुदैवानें बाजीराव उत्तरेकडे जाण्यास व संभाजीचा दंगा उपस्थित होण्यास गांठ पडली. ही संधि उत्तम आहे असें पाहून प्रतिनिधीनें संभाजीचें पारिपत्य कर-

ण्याचें काम पत्करिलें. प्रतिनिधीनें एकदम संभाजीच्या लष्करावर छापा घातला. त्याची सर्व चीजवस्त लुटली. संभाजी पन्हाळ्याकडे पळून गेला. ताराबाई व तिची सून राजसबाई या प्रतिनिधीच्या हातांत सांपडल्या. संभाजीचा पराजय झाल्यावर त्या दोघींस घेऊन प्रतिनिधी साताऱ्यास आला. ताराबाईचा शाहूनें सन्मान केला, परत जाण्याविषयीं तिला विचारिलें असतां "कोठेंही कैदेंतच राहावयाचें. ते व तुम्ही मला दोघेही सारखेच आहां; तुम्हांपाशींच राहतें" असें ती म्हणाली, तेव्हां तिला सातारच्या किल्ल्यांत ठेविलें.

संभाजीची खात्री झाली कीं, शाहूपुढें आपलें कांहीं चालत नाहीं; तेव्हां त्यानें होऊनच सलोखा करण्याविषयीं बोलणें काढिलें. शाहूनें त्याला भेटीस बोलाविलें. संभाजीनें येण्याचें कबूल केलें. कऱ्हाडाजवळ जखिणवाडी येथें दोघांच्या भेटी झाल्या. शाहू संभाजीसह साताऱ्यास आला. तेथें शके १६५३ त चैत्र वद्य २ रोजीं उभयपक्षीं तह ठरला. वारणा व तुंगभद्रा या नद्यांमधील मुलूख संभाजीस दिला. कोपळ किल्ला संभाजीस देऊन शाहूनें रत्नागिरी आपल्याकडे घेतला. कोकणांत साळशीपासून दक्षिणेकडचा मुलूख संभाजीस देण्यांत आला. येणेंप्रमाणें शाहूची मोंगलाच्या हातून सुटका झाल्याबरोबर ताराबाईनें सुरू केलेला तंटा या तहानें पूर्णपणें मिटला.

## ४४ गृहकलह.

भईची लढाई, शके १६५३ ( सन १७३१ ).



मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें बाजीरावानें पंचवीसशें घोडेस्वार गुजराथेंत ठेवून त्या प्रांताचा बंदोबस्त केला. हें कृत्य त्या प्रांतांतील मराठे सरदारांस रुचलें नाहीं. खंडेराव दाभाडे कांहीं वर्षांपूर्वींच मृत्यु पावला होता व त्याचें सेनापतिपद त्याचा मुलगा त्रिंबकराव दाभाडे यास मिळालें होतें. बाळाजी विश्वनाथानें प्रांताची वांटणी केली तेव्हां गुजराथ दाभाड्याकडे सोंपविला होता. आपल्या प्रांतांत पेशवे ढवळाढवळ करूं लागले हें त्रिंबकरावास खपलें नाहीं. निजामुल्मुल्कासही बाजीरावानें गुजराथेंत सरबुलंदखानाचा अंमल बसविला ही गोष्ट पसंत नव्हती. दाभाडेही रागावला आहे ही संधि साधून निजामानें मागें कोल्हापूरच्या संभाजीस हातीं धरून जशी लढाई केली, तशीच आतां दाभाड्याशीं ऐक्य करून लढाई करण्याचा बेत केला. निजामाचें म्हणणें दाभाड्यास पसंत पडून त्यानें निजामास मिळून बाजीरावाशीं युद्ध करण्याचें कबूल केलें. त्रिंबकराव युद्धाची जारीनें तयारी करूं लागला व त्यानें लोकांत असें जाहीर केलें कीं, ‘ आमचे धनी शाहूमहाराज यांचें राज्य ब्राह्मणांनीं गडप करण्याचा बेत केला आहे; तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं आम्ही तयारी करीत आहों. ’ दाभाड्यास बरेच मराठे सरदार मिळाले. उदाजी व आनंदराव पवार, कंठाजी कदम बांडे, चिमणाजी दामोदर, यांसारखे मोठमोठे सरदार दाभाड्याच्या वतीनें लढण्यास तयार झाले. त्रिंबकरावाची एकंदर फौज पसतीस हजार जमली. अशी मोठी फौज घेऊन तो निजामास मिळण्यासाठीं दक्षिणेकडे येऊं लागला व तिकडून निजामानेंही मोठी फौज जमा करण्याचा सपाटा चालविला.

बाजीरावास लवकरच निजाम व दाभाडे या दोघांच्या कटाची बातमी लागली. इतक्यांतच त्यानें ऐकिलें कीं, निजामुल्मुल्क सैन्य जमवीत आहे. हे दोघे एक झाले तर प्रचंडच फौज होईल व मग त्यांस जिंकणें अवघड जाईल, असें बाजीरावास वाटलें. मग त्यानें निजामुल्मुल्क फौज घेऊन दाभाड्यास मिळण्यापूर्वी दाभाड्यास गांठून एकट्याशींच लढाई द्यावी असा बेत केला. असा बेत करून बाजीराव फौज घेऊन झपाट्यानें गुजराथेकडे कूच करीत चालला. त्याची फौज दाभाड्याच्या फौजेच्या निम्मीही नव्हती. त्यानें असें जाहीर केलें कीं, " त्रिंबकराव दाभाडे हे आपला शत्रु निजामुल्मुल्क यास मिळून आमच्यावर चालून येत आहेत तेव्हां त्यांचा समाचार घेणें आम्हांस भाग म्हणून आम्ही तो घेत आहोंत. ' पुण्याहून निघाल्यापासूनच दाभाड्याशीं निजामास मिळून गृहकलह वाढविण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें बोलणें त्यानें चालविलें, परंतु दाभाड्यास अनावर क्रोध आला होता व स्वजन कोण परका कोण हें ओळखण्याइतकेंही त्याचें डोकें शांत नव्हतें; त्यामुळें शांततेच्या मार्गानें तंटा मिटविण्याचे बाजीरावाचे सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. दाभाडे तसाच कूच करीत येत होता. बाजीरावही जोरानें कूच करीत चालला. बाजीरावाचा सरदार आवजी कवडे हा बिनीस होता. तो मुख्य सैन्यापासून जरा पुढेंच होता. आवजी कवड्यानें नर्मदा उतरली तेव्हां त्याची व शत्रूच्या सैन्यांतील पिलाजी गायकवाडाचा मुलगा दमाजी गायकवाड याच्या टोळीशीं गांठ पडली. दोन्ही टोळ्यांची चकमक उडून आवजी कवड्याचा पराभव झाला. याप्रमाणें आरंभींच बाजीरावाच्या बाजूस अपयश आलें; पण बाजीराव पडला धीराचा सरदार ! तो काय असल्या पराभवानें कचरतो ! त्यास उलट दुप्पट हिंमत चढली व त्यानें शत्रूशीं एकदम लगट करून लढाई करण्याचा निश्चय केला. बडोद्याजवळ डभई येथें दोन्ही सैन्यांची गांठ पडली. बाजीरावानें एकदम लगट करून हल्ला करतांच दाभाडे यांच्या सैन्यांत अव्य-

वस्था माजली. सैन्यांत नव्यानेंच भरती केलेले लोक पळून गेले. कंठाजी कदम बांड्यानें तोच मार्ग स्वीकारिला. मग रणांगणावर खंडेराव दाभाड्याच्या वेळची फौज तेवढी राहिली. त्रिंबकराव हत्तींवर बसला होता. तो शूरच होता. सैन्यांत उडालेल्या गडबडीमुळें मुळींच डगमगून न जातां उरलेल्या फौजेस युद्धाचें सारखें प्रोत्साहन देत होता; व स्वतः सारखे बाण सोडीत होता. हत्ती मागें सरूं नये म्हणून त्या हत्तीच्या पायांत अंदू घातला होता. लढाई जोरांत चालली होती इतक्यांत त्रिंबकराव दाभाड्याच्या कानफटींत एक गोळी शिरली. ती घातक होऊन त्रिंबकराव पडला. सेनापति पडल्यावर दाभाड्याचें सैन्य पळूं लागलें. या युद्धांत मोठ्या सरदारांपैकीं जिवाजी दाभाडे, मालोजी पवार व पिलाजी गायकवाडाचा एक मुलगा इतके कामास आले. उदाजी पवार व चिमणाजी दामोदर कैदेंत सांपडले व आनंदराव पवार आणि पिलाजी गायकवाड पळून गेले. या युद्धामुळें दाभाड्याच्या मनांत पेशव्यांविषयीं वांकडें आलें, पण शाहूनें हें राज्यास अपायकारक असें समजून त्रिंबकरावाची आई उमाबाई दाभाडे हीस साताऱ्यास नेलें. बरोबर बाजीरावासही नेलें. उभयपक्षीं समाधान करून त्रिंबकराव दाभाडे याचा धाकटा भाऊ यशवंतराव दाभाडे हा होता, त्यास सेनापतिपदाचीं वस्त्रें दिलीं. गुजराथचें अर्धें उत्पन्न सेनापतीनें घ्यावें व अर्धें पेशव्यातर्फे सरकारांत द्यावें असा ठराव झाला. डभईच्या लढाईनंतर आणखी एक फरक झाला. श्रावण महिन्यांत ब्राह्मणास दक्षिणा दाभाडे सेनापति तळेगांवास वांटीत असत. पण त्यांनीं ती बंद केली. तेव्हां ती पुण्यास पेशवे वांटूं लागले. हा दक्षिणासमारंभ मोठा होत असे.

# ४५ धन्य बाबूराव ! धन्य उमाबाई !



डभईची लढाई झाल्यावर कांहीं दिवसांनीं आपल्या स्वतःच्या नांवचे परवाने तयार करून देऊन शाहूनें मोत्यें व बनात खरेदी करण्याकरितां कांहीं माणसें सुरतेस पाठविलीं. त्यांनीं सुरतेस जाऊन माल खरेदी केला. मग ते सातान्यास परत येण्यास निघाले. जकातनाक्याचे अधिकारी जकात मागूं लागले तेव्हां त्यानीं शाहूचा परवाना दाखविला. मग तें सर्व प्रकरण सुरतेच्या नबाबाकडे गेलें. नबाबानें परवान्यास मुळींच न जुमानतां त्या लोकांस दरडावून सांगितलें कीं " आम्हांस मालाची जकात घेतल्याखेरीज जाऊं द्यावयाचें नाहीं. तुम्ही आपल्या धन्यापाशीं परवाने घेऊन जावें. "

एके दिवशीं दरबार होता. अशा वेळीं शाहूस सुरतेच्या नबाबाच्या उद्धटपणाची हकीकत परत आलेल्या मंडळीपैकीं एकानें सांगितली. ती ऐकून शाहूस क्रोध आला. त्याचे डोळे लाल झाले व तो भोंवतीं बसलेल्या सरदाराकडे पाहूं लागला. तेव्हां यशवंतराव दाभाड्याचा धाकटा भाऊ बाबूराव दाभाडे हा तेथें होता. त्यानें चटकन् उठून शाहूस विनंति केली कीं, " मजला आज्ञा द्यावी. मी सुरतेच्या नबाबाचें पारिपत्य करितों. " त्यावर शाहू त्यास म्हणाला, " तुझें वय लहान व फौज फितुरीमुळें बेदिल आहे. तुला सामील होऊन कार्य होणार नाहीं. दुसरी फौज तुजबरोबर देऊन रवाना करितों. " त्याजवर बाबूरावानें फिरून विनंति केली कीं, 'फौज मागून रवाना करावी. मी पुढें निघून जातों.' असें बोलून आपल्या पागेंतील तीनशेंसाठ निवडक स्वार बरोबर घेऊन बाबूराव निघाला, तो तडख सुरतेपाशीं आला. सुरतेजवळ दोन तीन

१ दाभाडे यांची बखर, पृष्ठ १२.

मैलांवर आल्यावर बाबूरावानें एक सुरेख मसलत योजिली. नबाबाच्या निशाणासारखीं निशाणें तयार करून त्यानें तीं आपल्या लोकांच्या हातीं दिलीं. सुरतेच्या किल्ल्याचे दरवाजे कार्तिकस्नानासाठीं तीन घटका रात्रीसच उघडले. दरवाजे उघडतांच बाबूराव सैन्यानिशीं किल्ल्यांत शिरला. पहारेकऱ्यांनीं पहिल्या चौकीवर हटकलें. तेव्हां आम्ही नबाबाचेच लोक असें सांगून बाबूराव पुढें निसटून गेला.

शेवटल्या चौकीवरील लोक आंत जाऊं देईनात. त्या वेळेस मात्र हातघाईवर प्रसंग आला. हत्यारें चालवून बाबूराव जबरदस्तीनें किल्ल्यांत शिरला. किल्ल्यांत गेल्याबरोबर बाबूरावानें नबाबाचें निशाण खालीं काढून प्रथम शाहूछत्रपतीचें निशाण चढविलें. ज्या हुजऱ्यांचें दस्तक पूर्वीं नबाबानें नाकारिलें होतें ते हुजरे बाबूरावाबरोबर होतेच व पूर्वीं वारंवार सुरतेस खरेदीस आल्यामुळें त्यांस किल्ल्याची चांगली माहिती होती. ती पहाटेची वेळ होती. म्हणून नबाब निमाज पढण्यासाठीं मशिदींत गेला होता. हुजऱ्यांच्या मदतीनें बाबूरावानें मशीद गांठली व मशिदीभोंवतीं आपल्या स्वारांचा वेढा घातला. बाबूराव थेट मशिदींत घुसला व नबाबाचा हात धरून त्यास भेडसावूं लागला. बिचाऱ्या नबाबाची अगदीं गाळण उडाली. ‘तुम्ही कोण ? कोठचे ?’ म्हणून त्यानें विचारिलें असतां बाबूरावानें उत्तर दिलें “तुम्ही ज्या शाहूराजांचे परवाने मागें टाकिले त्यांचे सेवक आम्ही आहों. तुम्हास कैद करून नेण्यास आलों आहों” इतक्या अवकाशांत नबाबाचे दोघे मुलगे शत्रूचें पारिपत्य करण्यासाठीं सैन्य जमवीत आहेत अशी बातमी आली. तेव्हां बाबूरावानें समशेर खेचून नबाबाच्या उरावर रोखली व म्हटलें “तुम्ही आपल्या पुत्रांस एकीकडे रहाण्यास सांगा. नाहींतर तुम्हास येथेंच मारून टाकितों.” यावरून नबाबानें मुलांस कळविलें कीं “मी जिवंत रहावें असें जर तुम्हास वाटत असेल तर स्वस्थ बसा, नाहीं तर मी खास मरणार” तेव्हां त्या दोघां मुलांचा नाइलाज झाला.

आतां या संकटांतून कसेंतरी पार पडलें पाहिजे हें मनांत आणून नबाबानें आपला एक हलकारा आपल्या पदरच्या चार मुत्सद्द्यांकडे पाठविला व त्यांस बिनहत्यारी मशिदींत येण्यास सांगितलें. मग सरदार पोंचल्यावर नबाबानें बाबूरावास मोठ्या नम्रपणानें विचारिलें कीं, तुमचा हेतु काय आहे? बाबूरावानें उत्तर केलें " सुरतअठ्ठाविशीपैकीं[1] चौदा महाल व सुरत शहरांतील चौथ्या हिश्शाचा अंमल हीं आम्हास द्यावीं, नाहींतर तुम्हांस साताऱ्यास हुजूर घेऊन जाऊं " तेव्हां तक्रार न करितां सनदा लिहून दिल्या. यावर बाबूराव दाभाड्याचें बोलणें पडलें कीं, 'तुम्ही दगेखोर, आम्ही आपल्या फौजेंत जाईपर्यंत आमच्यापाशीं तुमची ओल असावी.' नबाबानें आपला वडील मुलगा ओलीस दिला. नबाबाचा मुलगा आपल्या स्वाधीन झाल्यावर बाबूरावानें त्याचा हात आपल्या बारगिराच्या हातीं दिला व नंतर त्यानें नबाबाची चिकाटी सोडिली. इतक्या अवकाशांत ही बातमी सुरत शहरांत पसरली; व किल्ल्याबाहेर पडल्यापासून आपल्या गोटांत येऊन पोहोंचेपर्यंत बाबूरावाचें दर्शन घेण्यासाठीं अतिशय गर्दी जमली होती; व हजारों लोकांनीं बाबूरावावर सोन्यारुप्याच्या फुलांची वृष्टिही केली.

इतक्यांत यशवंतराव दाभाडे आपल्या भावास साहाय्य करण्याकरितां साताऱ्याहून निघाला होता तो येऊन दाखल झाला. नंतर चौदा महालांत ठाणीं बसवून सुरतेस अम्मलदार ठेवून बनाती व मोत्यें खरेदी केलीं होतीं तीं घेऊन बाबूराव परत साताऱ्यास आला. शाहूनें बाबूरावाचा पराक्रम पाहून पायांत घालण्यासाठीं सोन्याचा तोडा त्यास बक्षिस दिला. शाहू पांच लक्ष रुपयांची जहागीर करून देणार होता, पण बाबूरावानें विनंति केली " आम्हांस कांहीं महाराजांनीं कमी केलें नाहीं. जहागीर देणें असल्यास वडील बंधूंच्या नांवची करून द्यावी, व कसबे नवलाखउंबरें येथील जकात व मोकासा करून द्यावा. " यावरून शाहूनें

१ सुरत प्रांतांत अठ्ठावीस परगणे होते. त्यामुळें त्यास सुरतअठ्ठाविशी म्हणत.

नवलाखउंबऱ्याची जकात व मोकासा इनाम करून दिला. शिवाय खानदेश, बागलाण, कर्नाटक वगैरे प्रांतांतील मोकासे फौजेच्या खर्चाकरितां करून दिले.

हें काम दाभाड्यांनीं बजाविलें न बजाविलें तोंच दुसऱ्या सालीं अहमदाबादेस एक कारस्थान निघालें. जोरावरखां बाबी या नांवाचा दिल्लीच्या बादशहाचा नोकर अहमदाबादेस होता. बडोद्यानजीकच्या महालांत दंगा करून तो तिकडील ठाणीं उठवूं लागला. तेव्हां शाहूनें उमाबाई दाभाडे ही तळेगांवीं होती तीस पत्र लिहिलें कीं ' दोन्ही मुलांचें अल्पवय, हूड, त्यांचे संरक्षणाकरितां तुम्ही बरोबर जाऊन त्यांस आघाडीस जाऊं न देतां बाबीचें पारिपत्य करून अहमदाबादेचें ठाणें घ्यावें. ' शाहूची आज्ञा प्रमाण मानून उमाबाई आपल्या मुलांसह मोहिमेस निघाली. उमाबाईच्या हाताखालीं मराठे आपल्यावर चालून येत आहेत असें कळतांच बाबीनें उमाबाईच्या नांवें एक पत्र लिहून कळविलें कीं, 'तूं रंडकी बायको आहेस, तुझीं मुलें लहान आहेत. त्यापेक्षां तूं फौज घेऊन माघारीं जा ' हा कुत्सित निरोप ऐकून उमाबाईस क्रोध आला. तिनें सर्व सरदारांस एकत्र जमविलें व समोर बांगड्या व कुंकूं ठेवून ती म्हणाली, " मी बायको माणूस असतां पठाणांनीं दुर्भाषणाचीं पत्रें लिहिलीं आहेत त्यापेक्षां मी अहमदाबादेच्या राजवाड्यांत जाऊन अन्न घेईन, मध्यें घेणार नाहीं. तुम्हांस तुमच्या अन्नाची शरम असल्यास आमचे समागमें यावें. मरणास भिऊं नये. मरणास भीत असल्यास बांगड्या हातांत घालून कुंकूं लावून आपल्या कुटुंबांत जावें. " हें वीरश्रीचें भाषण ऐकून सर्व सरदारांस आवेश चढला व मुजरे करून ते बोलले; " आम्हीं आपलें निमक खाल्लें आहे त्यापेक्षां मरून जाऊं. पण माघारे फिरणार नाहीं. मौज आपण पहावी. " मग मरूं किंवा मारूं या आवेशानें मराठी सैन्य अहमदाबादेवर चाल करून जाऊं लागलें. उमाबाई हत्तीवर स्वार

१ दाभाडे यांची बखर, पृष्ठ. १५.

झाली होती व तिनें हातांत पिस्तुल, पेषकबज व तलवार घेतली होती. तिच्या दोहों बाजूंस दोघां मुलांचे हत्ती चालले होते. दहा हजार स्वारांनिशीं बाबी मोकाबल्यास आला. मग मराठे व मोंगल यांची मोठ्या निकराची लढाई झाली. निरुपाय होऊन बाबी अहमदाबाद शहरांत जाऊन दरवाजे लावून बसला. त्या वेळीं मराठ्यांस मोठा आवेश चढला होता. त्यांनीं समरांगणावरचीं प्रेतें उचलून तटाबाहेर दरवाज्याजवळ त्यांचा ढीग केला; व वर चढून किल्ल्याच्या दरवाज्यास वरून खालून आग लावून दिली. मग मराठे आंत उतरले. तेव्हां मुसलमानांची अतिशयच तारांबळ उडाली. बाबीस तर पळतां भुई थोडी झाली. मराठ्यांचीं निशाणें किल्ल्यावर फडकूं लागलीं. याप्रमाणें ठाणें सर झाल्यावर उमाबाईनें अन्न ग्रहण केलें. मग शहराचा बंदोबस्त करून उमाबाई आपल्य मुलांसह साताऱ्यास गेली. शाहूस तिचा पराक्रम पाहून अत्यंत आनंद झाला व त्यानें सोन्याचे तोडे उमाबाईस बक्षीस दिले व हत्ती, घोडे, वस्त्रें, भूषणें देऊन पावसाळ्याची तळेगांवास छावणी करण्यासाठीं निरोप दिला.

पावसाळा संपतांच शाहूनें बाबूराव दाभाड्याची खानदेशच्या बंदोबस्ताकरितां तिकडे रवानगी केली. पण तो खानदेशांत जातो न जातो इतक्यांत कोणीं दुष्टानें त्यास विष घातलें. त्यामुळें शूर बाबूरावाचा अकालींच अंत झाला. त्याचा वडील भाऊ यशवंतराव याच्या अंगांत कर्तृत्व मुळींच नव्हतें. शिवाय तो व्यसनाधीन झाला, त्यामुळें तो कांहींच कारभार पहात नसे. त्यामुळें यापुढें दाभाड्यांनीं नेमलेला कारभारी दमाजी गायकवाड हा धन्यास गुंडाळून ठेवून गुजराथ प्रांताचा कारभार स्वतंत्रपणें करूं लागला.

# ४६ जंजिऱ्याच्या सिद्दीचा बंदोबस्त.



बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें कान्होजी आंग्र्याशीं शके १६३५ ( सन १७१३ ) त तह केला. त्या तहांत जंजिऱ्याच्या सिद्दीचा कांहीं प्रांत आंग्र्याकडे आला. त्यामुळें सिद्दीनें आंग्र्याशीं युद्ध चालविलें. बाळाजी विश्वनाथ आंग्र्याच्या मदतीस गला. मराठ्यांचा जय होऊन आंग्र्याकडे आलेला प्रांत त्याच्याकडे राहूं देण्याचें सिद्दी यानें कबूल केलें. ही गोष्ट शके १६३६ च्या शेवटीं घडली. तेव्हांपासून कोंकण प्रांतांत मराठ्यांचा अम्मल कान्होजी आंग्रेच चालवीत असे. आंग्र्यांखेरीज पोर्तुगीज, इंग्रज व सिद्दी या तिघांचा कोंकणांत मुलूख होता. त्यांतल्यात्यांत सिद्दीचा मुलूख कुलाबा जिल्ह्यांत असल्यामुळें आंग्र्याशीं त्याचा प्रत्यक्ष संबंध येई. पोर्तुगीजांचा मुलूख वर ठाणें जिल्ह्यांत होता. इंग्रजांकडे मुंबईबाहेर कांहींही प्रांत नव्हता. परंतु सिद्दी व मराठे या दोघांमध्यें चुरस लावून देऊन दुर्बळांचा पक्ष घ्यावयाचा असा त्या वेळच्या इंग्रजपोर्तुगीजांचा नेहमींचा क्रम असे. शके १६४८ ( सन १७२६ ) च्या आरंभीं सिद्दी याकुबखान यानें निजामुलमुल्काच्या चिथावणीवरून मराठ्यांच्या मुलुखांत येऊन दंगा मांडला. कान्होजी आंग्रे यानें पाहिलें कीं, सिद्दीचा मोड आपल्या हातून व्हावयाचा नाहीं. याकरितां त्यानें शाहूस मदत पाठवून देण्याविषयीं पत्र पाठविलें. ‘ दसरा झाल्यावर मदत पाठवूं, तोंवर कोंकणांतील स्थळांचें रक्षण तुम्हीं करावें ’ असें शाहूनें उत्तर पाठविलें. उत्तर मिळतांच आंग्र्यानें कोंकण प्रांताचें रक्षण करण्याचें ठरविलें व दंगा करणाऱ्या सिद्दीशीं युद्ध करण्यास प्रारंभ केला. मराठ्यांची सत्ता कोंकणांत वाढूं नये असें इंग्रजांस वाटे. तेव्हां त्यांनीं अर्थातच सिद्दीचा पक्ष धरिला. सिद्दीच्या व आंग्र्याच्या जागोजाग

चौक्या बसल्या व दोघांनीं एकमेकांचीं गांवें लुटण्याचा धूमधडाका चालविला.

पुढें बाजीरावाचे गुरु म्हणून प्रसिद्धीस आलेले ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर या वेळीं कोंकणांत परशुरामक्षेत्रीं रहात असत. ते पावसाळा संपल्यावर भिक्षेस निघत. जंजिऱ्याच्या सिद्दीकडील गोवळकोट व अंजनवेल या ठिकाणीं सिद्दीसात हा अधिकारी होता. त्याचा सावनूरच्या नबाबाकडून एक हत्ती आणावयाचा होता. त्यानें ब्रह्मेंद्रस्वामीस हत्ती आणण्याची विनंति केली. स्वामींनीं ती तत्काळ मान्य केली. स्वामी भिक्षा करून तो हत्ती घेऊन परत फिरले. सिद्दी व आंग्रे यांजमध्यें युद्ध चालू असल्यामुळें ठिकठिकाणीं आंग्र्याच्या व हबशाच्या चौक्या बसल्या होत्या. सिद्दीसाताचा हत्ती जात आहे असें कळतांच आंग्र्याकडील एका चौकीदारानें हत्ती अडविला व आपल्या ताब्यांत घेऊन जयगडावर पाठवून दिला. सिद्दीसातास हें कळतांच त्याला अत्यंत क्रोध आला. स्वामीनें माझा हत्ती मुद्दाम आंग्र्याच्या स्वाधीन केला असें त्यास वाटलें व रागाच्या सपाट्यांत परशुराम येथें गेला व तेथील देऊळ खणून टाकून स्वामींची सर्व चीजवस्त त्यानें हस्तगत कला. स्वामींचे नोकर तेथें होते त्या सर्वांस त्यानें बेदम मारिलें. असा स्वामींच्या क्षेत्राचा विध्वंस शिवरात्रीच्या दिवशीं करून सिद्दीसात परत गेला. ही सर्व हकीकत ऐकून ब्रह्मेंद्रस्वामींस अत्यंत वाईट वाटलें व सिद्दीचा पूर्ण तिरस्कार आला. स्वामींनीं आंग्र्यापासून हत्ती सोडविला होता तो सिद्दीसातास देऊन टाकला, त्यावरून सिद्दीसात स्वामींस शरण आला. जंजिऱ्याच्या याकुतखानानेंही स्वामींचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. पण स्वामींनीं कोंकण सोडून देण्याचा पुरता निश्चय केला व ते देशावर निघून गेले. त्यांना शाहूपासून धावडशी गांव इनाम मिळाला होता; तेथें स्वामी आतां राहूं लागले. स्वामींस सिद्दीच्या कृत्यांची चीड आली होती व

शाहूस सिद्दीचा निःपात करून टाका म्हणून त्यांनीं वारंवार सांगितलें. शाहूनेंही फुरसत सांपडतांच सिद्दीचा मोड करण्याचा बेत केला.

कान्होजी आंग्र्यानें सिद्दीशीं युद्ध तसेंच चालविलें होतें. शेवटीं युद्ध करीत असतांच शके १६५१ ( सन १७२९ ) च्या आरंभीं कान्होजी मृत्यु पावला. त्याला सेखोजी, संभाजी, मानाजी, येसाजी व तुळाजी असें पांच मुलगे होते. त्यांपैकीं सेखोजीस सरखेलीचीं वस्त्रें व बापाकडे चालत आलेला मुलूख मिळाला. सेखोजी व संभाजी आपआपसांत भांडूं लागले; त्यामुळें सिद्दीस चांगलेंच फावलें. त्यानें मराठ्यांच्या मुलखास जास्तच उपद्रव देण्यास सुरुवात केली. आंग्र्यांच्या आपापसांतील भांडणामुळें कोंकण प्रांतांत नुकसान होत आहे असें पाहून शाहूने दोघां भावांचा तंटा मिटविण्याचा प्रयत्न केला व श्रीपतराव प्रतिनिधीनें नुकताच कोल्हापूरच्या संभाजीवर जय मिळविला होता त्यास कोंकणची कामगिरी सांगितली. प्रातिनिधीस कोंकणांत जाऊन दोन वर्षे झालीं तरी त्याच्या हातून कांहींच काम झालें नाहीं. शाहूस फार काळजी लागली होती. त्यानें सेखोजी व संभाजी या दोघांसही साताऱ्यास आपल्या भेटीस बोलाविलें. सेखोजी भेटला तेव्हां शाहूनें त्यास प्रतिनिधीला साहाय्य करण्याविषयीं आग्रहपूर्वक सांगितलें. त्यावरून बकाजी नाईक महाडीक यास प्रातिनिधीच्या सहाय्याकरितां सेखोजीनें कोंकणांत परत आल्याबरोबर पाठवून दिलें. बकाजी नाइकाची व सिद्दीसाताची चिपळूणाजवळ गांठ पडून युद्ध झालें. त्यांत सिद्दीसाताची बकाजीनें अगदीं तारांबळ उडवून दिली. सिद्दीसात फारच कावेबाज होता. बकाजी नाइकाकडून पराभव झाल्यावर तो प्रतिनिधीस भेटला व आपण तह करण्यास तयार आहों असें त्यानें प्रतिनिधीस सांगितलें. प्रतिनिधीस त्याचें मायावी भाषण खरें वाटलें व त्यानें बकाजी नाइकाची आपल्याला कांहीं आतां जरूर नाहीं असें पाहून त्याचें मन दुखविलें. बकाजी नाइकाचे मनांत गोवळकोट घेण्याचें फार होतें. प्रतिनिधीनें त्याशीं असें

बोलणें लाविलें कीं आपण दोघे मिळून गोवळकोट घेऊं. यावरून बकाजीस राग आला. आपण श्रम करावे व किल्ला सर केल्याचें यश प्रतिनिधीनें उपटावें असें होणार, असें बकाजीस वाटून तो परत निघून गेल्यावर सिद्दीसातानें तहाचें बोलणें थांबविलें व एकदम प्रतिनिधीशीं युद्ध करण्यास तो तयार झाला. प्रतिनिधीचीं चार पांच युद्धें झालीं; त्यांत प्रतिनिधीचा पूर्ण पराभव झाला. प्रतिनिधी मोठ्या अडचणींत पडला. पण इतक्यांत पावसाळा सुरू झाल्यामुळें गोवळकोट घेण्याचें काम पुँढील सालावर टाकून प्रतिनिधि स्वस्थ बसला.

शाहूस सिद्दीचें पारिपत्य करण्याची फारच उत्कंठा लागली होती. प्रतिनिधीची झालेली फजिती शाहूच्या कानावर गेली तेव्हां प्रतिनिधीच्या हातून हें काम पार पडणार नाहीं, हें शाहूनें ताडलें व बाजीराव व फत्तेसिंग भोसले यांस पावसाळा संपल्यावर कोंकणांत जाण्याची त्यानें आज्ञा केली. बाजीराव व फत्तेसिंग शके १६५५ च्या ( सन १७३३ ) वैशाखांत कोंकणांत उतरले. ते गेल्यावर सिद्दी याशीं चाललेल्या युद्धास निराळाच रंग आला. ते कोंकणांत गेले त्याच्या अगोदर थोडे दिवस मराठ्यांस अनुकूल अशी एक गोष्ट घडून आली, ती याकुतखान सिद्दी मरण पावला ही होय. त्याच्या मरणानंतर सिद्दी सरदारांत भांडणें होऊं लागलीं. याकुतखानास आठ मुलगे होते. शेखजी म्हणून गुहागरचा बाटलेला पाटील सरदार होता. याकुतखानाच्या मृत्यूनंतर तो मराठ्यांस मिळाला. शेखजीनें अबदुल रहमान नांवाचा एक याकुतखानाचा मुलगाही फोडून मराठ्यांकडे आणला. सिद्दीसात, अंबर, संबुल, याकुब वगैरे सिद्दी सरदार एक होऊन मराठ्यांशीं लढूं लागले. अशा तऱ्हेनें जंजिऱ्याच्या सिद्द्यांत दोन पक्ष झाले. जंजिऱ्याच्या सिद्द्यांत दोन पक्ष झाल्यामुळें व बाजीराव कोंकणांत आल्यामुळें मराठ्यांची बाजू बळकट होऊन मराठ्यांनीं युद्ध जोरांत चालविलें. बाजीरावानें सेखोजी आंग्र्यास उंदेरीवर पाठविलें, बाणकोट व मंडणगड यांवर बकाजीस

धाडिलें, प्रतिनिधि व सोमवंशी यांच्याकडे अंजनवेली घेण्याची कामगिरी सोंपविली, व स्वतः बाजीराव आणि फत्तेसिंग जंजिऱ्याला शह देऊन बसले. थोड्याच अवकाशांत मंडणगड सर झाला. प्रतिनिधीनें रायगड घेतला. बिरवाडी, तळें, घोसाळें इत्यादि ठिकाणें मराठ्यांच्या हातीं आलीं. येणेंप्रमाणें एकएक ठाणें बाजीरावाच्या हातीं येत येत श्रावण वद्य नवमीस जंजिरा व अंजनवेल यांखेरीज बहुतेक सर्व ठाणीं बाजीरावाच्या ताब्यांत आलीं. जंजिऱ्यास बाजीरावानें खुष्कीवरून मोर्चे लाविले व तोफांचा मारा चालविला; व मानाजीनें समुद्रांतून तो किल्ला वेढला. त्यामुळें किल्ल्यांतल्या लोकांची उपासमार होऊं लागली. शेवटीं सिद्दी अंबर, संबुल वगैरे सरदार पळून अंजनवेलीकडे गेले व अबदुल रहमानातर्फे जंजिरा बाजीरावाच्या हातीं आला. बाजीरावानें अबदुल रहमानास गादीवर बसविलें. रायगड, तळें, घोसाळें, अवचितगड व बिरवाडी हे किल्ले मराठ्यांस मिळावे असा ठराव झाला व मग बाजीराव परत आला.

सिद्दी संबूल, सिद्दी सात व सिद्दी अंबर या सरदारांचा मोड आतां मराठ्यांस करावयाचा होता. अंजनवेल, गोवळकोट इत्यादि ठिकाणें या सरदारांच्या ताब्यांत होतीं. त्यांच्याशीं लढून तीं ठाणीं काबीज करण्यास जर मराठ्यांनीं नेटानें युद्ध चालविलें असतें तर कांहींच वेळ लागला नसता, पण मराठे सरदार नेटानें लढले नाहींत. याचें कारण म्हणजे सेखोजी आंग्रे इंग्रजांशीं लढत असतां उंदेरीस भाद्रपद महिन्यांत मरण पावला, त्यामुळें संभाजी व मानाजी या दोघां भावांत फिरून तंटा सुरू झाला. मराठ्यांचे प्रयत्न शिथिल होऊन सिद्दी सरदारांस जोर चढला. अंजनवेल व गोवळकोट या दोन्ही किल्ल्यांस मराठ्यांनीं वेढा घातला होता; पण त्यांपैकीं एकही सर झाला नाहीं. शेवटीं शके १६५६ च्या अखेरीस बाजीराव फिरून कोंकणांत उतरला. तो मानाजीस सहाय्य करण्याकरितां आला. मानाजीनें अंजनवेली घेण्याची

जास्त जोरानें खटपट चालविली होती. त्यामुळें बाजीराव येण्यापूर्वीच अंजनवेली मराठ्यांच्या हातीं आली. बाजीरावानें मानाजीकडून खांदेरी कुलाबा व राजमाची इत्यादि स्थळें घेवविलीं. त्यामुळें संभाजीचा पाण उतारा झाला व तो बाजीरावास शरण आला. बाजीरावानें मानाजीला कुलाब्याचें ठाणें दिलें, संभाजीला विजयदुर्गास स्थापिलें व दोघां भावांत एकी घडवून आणिली. हा तह अलिबागेजवळ नवदरी येथें शके १६५७ ( इ. स. १७३५ ) च्या आरंभीं झाला. हा तह करून देऊन बाजीराव परत गेला. या वर्षीं सिद्दीसात यानें मराठ्यांस त्रास देण्याचा सपाटा चालविला त्यावरून सालअखेर चिमाजी आप्पा कोंकणांत गेला. त्याची व सिद्दीसाताची रेवासेंजवळ चरई येथें लढाई झाली तींत सिद्दीसात ठार झाला. उंदेरीचा किल्लेदार सिद्दी याकूबही पडला. आतां सर्व दंगेखोर सिद्दी सरदार नाश पावले; व मराठ्यांनीं गादीवर बसविलेल्या अबदुल रहमानाचा अम्मल सर्व सिद्यांवर चालूं झाला. येणेंप्रमाणें मराठ्यांनीं सिद्दीस आपला मांडलीक करून टाकिलें.

---

## ४७ दिल्लीची स्वारी.

शके १६५६ ( इ. स. १७३४ ).



बाजीरावानें माळव्यांत शिंदे, होळकर व पवार कायमचे ठेवन दिले होते म्हणून मागें सांगितलें आहे. त्यामुळें माळवा प्रांताची चौथाई व सरदेशमुखी दरवर्षीं वसूल होतच असे. तथापि बादशहाकडून सनद मिळून तो प्रांत कायदेशीर रीतीनें मरठ्यांस मिळाला नव्हता. शके १६५६ च्या आरंभीं कोंकणांतून आल्याबरोबर बाजीरावानें माळवा प्रांताची सनद मिळविण्याकरितां हिंदुस्थानांत कूच केलें. माळव्याच्या

सुभ्यावर बंगषाच्या मागून जयपूरचा राजा सवाई जयसिंग याची नेमणूक केली होती. त्याचें व बाजीरावाचें सख्य होतें. त्याच्यातर्फे बाजीरावानें माळव्याची सनद करून देण्याचें बादशहाशीं बोलणें लाविलें. बादशहानें ‘ माळव्याच्या उत्पन्नांपैकीं तेरा लाख रुपये घेण्याबद्दल आपण सनद करून देण्यास तयार आहों, व रजपूत राजांपासून मराठ्यांनीं खंडणी वसूल करण्याच्या आडही आम्ही येत नाहीं ’ असें बाजीरावास यादगरखान नांवाचा एक वकील पाठवून कळविलें. या वकिलाबरोबर गुप्तपणें माळव्याच्या सनदाही दिल्या होत्या; व वरच्या देणग्यांनीं मराठे तह करण्यास तयार नसतील तरच त्या द्यावयाच्या असें दिल्लीस ठरलें होतें. पण ही गुप्त बातमी बादशहापाशीं बाजीरावाचा वकील धोंडोपंत पुरंदरे होता त्यास कळली; व त्यानें ती बाजीरावास कळविली. त्यामुळें बाजीरावानें आपल्या मागण्या अतोनात वाढविल्या; “ सबंध माळवा जहागीर मिळावा. धार, मांडू, व रेसीन, हे किल्ले आणि चंबळच्या दक्षिणचा सर्व मुलूख मिळावा व बंगालची खंडणी घेण्याचा हक्क किंवा त्याबदली पन्नास लाख रुपये मिळावे; अलाहाबाद, गया, मथुरा हीं गांवें व दक्षिणच्या साही सुभ्यांची सरदेशपांडेगिरी इतक्या गोष्टी मिळाव्या. ” बादशहानें यांपैकीं शेवटची मागणी म्हणजे दक्षिणची सरदेशपांडेगिरी देण्याचें तेवढें कबूल केलें व इतर सर्व मागण्या फेंटाळून लाविल्या. दिल्लीभोंवतालीं सैन्य देखील जमा होऊं लागलें. खानडौरान व कुमरुद्दीनखान हे बादशाही सरदार सैन्य घेऊन मथुरेकडे येऊं लागले ही बातमी बाजीरावास कळतांच आपल्याजवळचें जड सामान बुंदेलखंडांत जगतराजापाशीं ठेवून तो जलदीनें उत्तरेकडे गेला व त्यानें आग्र्याखालीं चाळीस मैलांवर यमुनेच्या तीरीं तळ दिला. इतक्यांत मल्हारराव होळकर दुआबामध्यें खंडणी घेत होता त्याच्यावर अयोध्येचा नबाब सादतखान यानें अचानक येऊन छापा घातला, त्यामुळें मल्हारराव दुआबांतून परत आला. सादतखानानें आपल्या विजयाचें वर्णन

दिल्लीस लिहून पाठविलें. " मराठ्यांची फौज यमुना उतरून आली ती बुडविली. दोन हजार स्वार मारिले व दोन हजार नदींत बुडाले. मल्हारजी होळकर व विठोबा बुळे कामास आले. बाजीराव याची धाड आली होती तिची गत झाली. त्याचे फौजेंत बाकी राहिली नाहीं. आपण यमुना उतरून मराठे बुडवून चमेलीपार करितों. " अशा यथेष्ट गप्पा त्यांत भरलेल्या होत्या. बादशहास सर्व खरें वाटलें व त्यानें सादतखानाचा मोठा गौरव केला. सादतखानानें आग्र्याच्या किल्ल्यांत तळ दिला होता. खान डौरान व बंगष हे आग्र्यास आले. त्यांच्या व सादतखानाच्या भेटी झाल्या. सादतखानाच्या सांगण्यावरून बाजीरावाचा वकील धोंडोपत पुरंदरे यास खान डौरानें निरोप दिला. हे सर्व सरदार आग्र्यास होते. या सर्वांस झुकांडी देऊन दिल्लीवर चालून जाण्याचा बाजीरावानें बेत केला. वीस वीस कोसांच्या मजला करीत बाजीराव दिल्लीनजीक कुशबंदी येथें उतरला. बाजीरावाच्या मनांत शांततेनें मतलब साधून घ्यावयाचा होता, त्याकरितां दिल्ली शहराच्या वाटेस मुळींच न जातां बादशहास त्यानें एक पत्र पाठविलें. बादशहाचें उत्तर आलें कीं, धोंडोपंतास पाठवा म्हणजे 'सलूख' करूं. आपण फौजेसकट जवळ असल्यामुळें धोंडोपंतास एकटें पाठविलें असतां दगा होईल, असें बाजीरावास वाटलें व त्यानें त्याच्या संरक्षणाची तजवीज करा म्हणजे धोंडोपंतास पाठवून देतों असें बादशहास लिहिलें; व आपल्या सैन्यापासून शहरास त्रास पोहोंचूं नये म्हणून झीलच्या तलावावर मुक्काम केला. इतक्यांत मुजफरखान, मीर हसनखाकोका, शिवसिंग इत्यादि बादशाही सरदार सात आठ हजार फौजेनिशीं शहरा बाहेर आले, त्यांची व सटवाजी जाधवाची गांठ पडली. सटवाजीनें मोंगलांचा हल्ला आल्याची बातमी बाजीरावास कळविली. त्याबरोबर बाजीरावानें मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, तुकोजी जिवाजी व

---

१ श्रीब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक २७.

यशवंतराव पवार, मानाजी पायगुडे व गोविंद हरि पटवर्धन यांस ताबडतोब पाठविलें. तुंबळ युद्ध झालें. त्यांत मोंगलांचा अगदीं मोड झाला. शिवसिंग पडला, कोका जखमी झाला. मोंगलांकडचें तीनशें माणूस ठार झालें व चारशें जखमी झालें. मोंगल फौजेनें शहरांत पळ काढिला. दोन हजार घोडे मराठ्यांस मिळाले. मराठ्यांकडील इंद्राजी कदम याच्या बोटास गोळी लागून दोन बोटें उडून गेलीं व इतर थोडीं माणसें जखमी झालीं. संध्याकाळीं चार घटका दिवस राहिला होता तो कमर्दीखान म्हणून एक सरदार बाजीरावावर चालून आला. त्याचें व मराठ्यांचें युद्ध सुरू झालें. सूर्य अस्तंगत झाल्यामुळें युद्ध थांबलें, इतक्यांत सादतखान, बंगष व खानदौरान यांस बाजीराव दिल्लीस गेल्याचें वर्तमान समजून तेही मजल दर मजल दिल्लीजवळ येऊन पोंचले. बाजीरावानें पाहिलें कीं, सर्व मोंगल एक झाल्यावर त्यांशीं दिल्लीजवळ युद्ध करणें फायदेशीर होणार नाहीं, याकरितां मोंगल पाठीवर घेऊन दुआबांत आणून मग बुडवावे, असा बेत करून बाजीराव रेवाद–कोटपुतळी, वरून जयपुराजवळ आला. तेथून दुआबांत उतरून पावसाळ्यापूर्वी खंडणी वसूल करण्याचा बाजीरावाचा बेत होता. त्यानें चिमाजीआप्पास लिहिलें कीं, निजामुल्मुल्क नर्मदा उतरून आम्हांस त्रास देण्याकरितां वर येऊं लागेल, तर तुम्हीं त्यास शह देणें. दाणावैरण लुटून अगदीं हैराण करणें. पण हे बेत सिद्धीस गेले नाहींत, कारण बाजारावास दक्षिणेंत परत जाणें जरूर झालें. माळव्याची सनद तशीच राहिली, फक्त तेरा लाख रुपये मिळण्याची बादशहापासून कबुली घेऊन बाजीराव दक्षिणेंत परत आला.

पेशवाई मिळाल्यापासून बाजीरावाच्या सारख्या मोहिमावर मोहिमा चालल्या होत्या. त्या करण्यास त्याला फौज ठेवावी लागे व फौज ठेवण्यास अतोनात पैसा खर्च करावा लागे. इतका पैसा कांहीं सरकारी शिलकेंत नसे. तेव्हां त्याला कर्ज काढावें लागे. नवीन कर्ज देण्यास

सावकार कुरकुरूं लागले व त्यान ज्यांच्यापासून अगोदरच कर्ज काढिलें होतें ते आपला पैसा परत करा असा सारखा तगादा करीत. या सावकारांच्या जाचानें बाजीराव अत्यंत त्रासला. त्यानें कर्जासंबंधीं ब्रह्मेंद्रस्वामीस दोन पत्रें लिहिलीं आहेत, त्यांत पुढील मजकूर आहे. " या प्रपंचामुळें आम्हीं जोड इतकीच केली कीं वीस लाख रुपयांचे कर्जदार झालों. आतां नित्य उठून कर्जदारांचे पायां पडावें. शिलेदारांचे पायां पडतां पडतां कपाळ छिनत चालिलें. " " आज दाभाडे, गायकवाड, बांडे कोटी कोटी रुपये खजिने बाळगून आहेत आणि आम्ही तुझे पायाशीं व धन्याचे पायांशीं निष्ठेनें वर्ततों ते अन्नास महाग झालों. हें कर्ज फिटत नाहीं आतां वांचलीयाचें सार्थक काय ? जीवाचा त्याग करितों. " या शेवटच्या शब्दावरून तर बाजीराव कर्जामुळें जिवास सुद्धां कंटाळला हें सहज समजण्यासारखें आहे. सैन्यांतील शिलेदारही त्याची आज्ञा ऐकतनासे झाले. असा बाजीराव चोहोंकडून पेंचांत आला होता.

---

## ४८ भोपाळचा वेढा.

---:०:---



शके १६५६ त ( इ. स. १७३४ ) दिल्लीपर्यंत स्वारी करून शेवटीं माळव्याच्या सनदा न घेतांच बाजीराव गेला खरा; पण मराठे माळवा प्रांत घेतल्याशिवाय राहणार नाहींत अशी दिल्लीच्या बादशहास भीति वाटूं लागली. मराठे एकदां परत गेले म्हणून फिरून येणार नाहींत असें थोडेंच होतें ! बाजीराव फिरून आला तर आपल्या जवळच्या सरदारांच्या हातून त्याचा मोड व्हावयाचा नाहीं, असा बाजीरावानें दिल्लीस येऊन

उडवून दिलेल्या गडबडीवरून त्यानें अंदाज केला व माळव्याच्या बचावाची निराळी युक्ति काढिली. दक्षिणचा सुभेदार निजामुल्मुल्क हा शूर व कारस्थानी होता. त्यावरून तो जरी स्वतंत्रपणानें वागे तरी माळवा त्याच्या स्वाधीन केला असतां त्याचा बचाव होईल असें बादशहास वाटलें. बादशहानें निजामुल्मुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन याच्या नांवानें माळवा व गुजराथप्रांत निजामाच्या स्वाधीन केले. या दोनही प्रांतांतून मराठ्यांस मी स्वतः हांकून देईन, असें ते प्रांत ताब्यांत देतांना निजामापासून बादशहानें वचन घेतलें.

पहिल्यानें निजामुल्मुल्कानें रजपूत राजे व बुंदेलखंडांतील राजे आपल्या ताब्यांत आणिले, व मग आपली व मांडलिक राजांची मिळून चौतीस हजार फौज घेऊन निजाम मराठ्यांचें पारिपत्य करण्याकरितां निघाला. त्यावेळीं सर्व हिंदुस्थानांत उत्तम असा तोफखाना त्याच्याबरोबर होता. निजामुल्मुल्क आपलें अवाढव्य सैन्य व उमदा तोफखाना घेऊन सिरोंजेस आला. तों दक्षिणेंतून बाजीरावही नर्मदा उतरून निजामाच्या फौजेपासून आठ नऊ कोसांच्या अंतरावर येऊन दाखल झाला. मराठे जवळ आले असें पाहून निजामानें एखाद्या बळकट जागेचा आश्रय करण्याचा बेत केला; व थोडें मागें हटून तो भोपाळ किल्ल्याच्या आश्रयास जाऊन राहिला, निजामाच्या फौजेच्या पाठीमागें एक तळें होतें व पुढें एक ओढा होता.

नबाबानें या नव्या ठिकाणीं तळ दिला त्याच दिवशीं म्हणजे शके १६५९ पौष शुद्ध ५ (इ. स. १७३८) ला मराठी फौज त्याच्या फौजेवर चालून गेली. निजामानें तोफखाना चालू केला; आणि रजपूत लोकांस लढावयास पुढें धाडिलें व आपण खासा मागें राहिला. मराठ्यांतर्फे राणोजी शिंदे, पिलाजी जाधवराव व सयाजी गुजर हे रजपुतांवर चालून गेले. निजामाच्या तोफखान्यापासून मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें. पण मराठ्यांनीं न डगमगतां मोठ्या शर्तीनें झुंज केलें. दीडशें रजपूत ठार झाले.

मराठ्यांकडील पन्नास साठ माणसें पडलीं. मराठ्यांचीं शंभर घोडीं मेलीं व पांचशें जखमीं झालीं. तोफखान्यामुळें हल्ला चांगला लागू झाला नाहीं. तरीपण यापुढें निजामानें आपलें सैन्य भोपाळ शहराच्या आंत नेलें. त्यामुळें मराठ्यांनीं शत्रूस चोहोंकडून घेरिलें. दाणावैरण बंद केली. चार दिवसांत निजामाच्या लष्करांत पीठ रुपयास चार शेर झालें. निजामाच्या लष्करांत अशी महागाई वाढूं लागली. हत्तीघोड्यांस वैरण पुरेनाशी झाली. एके दिवशीं झाडाच्या सालीं व तळ्यांतील लव्हाळें चारिलें. रात्रीं मराठे निजामाच्या सैन्यावर बाण, बंदुका चालवीत, त्यामुळें नबाबाच्या फौजेस रात्रीं ताटकळत बसावें लागे व बराच नाशही होई. रजपूत लोक निजामास सोडून जाण्याच्या विचारास लागले. निजामाजवळ मोठें सैन्य होतें. उत्तम तोफखाना होता. तरी त्याला किल्ल्याच्या आश्रयास बसण्याची बुद्धि झाली. त्यामुळें तो अगदीं पेंचांत सांपडला.

इतक्या अडचणी होत्या तरी निजाम भोपळ सोडून बाहेर पडेना, कारण त्याला अशी आशा होती कीं दिल्लीहून व दक्षिणेंतून आपल्या मदतीस फौज येईल. दिल्लीस व दक्षिणेंत आपल्या मुलांस फौज पाठवून देण्याविषयीं तो सारखे निरोप धाडीत होता. पण कोणीकडून फौज येईना. दिल्लीस वजीर खानडौरान यास निजामुल्मुल्काचा उत्कर्ष मुळींच सहन झाला नाहीं; व आतां निजाम अडचणींत पडलेला पाहून त्यास समाधानच झालें. तेव्हां त्यानें फौज पाठवून निजामास कुमक केली नाहींच. दक्षिणेंतून फौज येईल अशी निजामास मोठी आशा होती. त्याप्रमाणें त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा औरंगाबाद व हैद्राबाद या दोन्ही ठिकाणीं फौज जमवीत होता; पण बाजीरावानें आपला भाऊ चिमाजी आप्पा यास दक्षिणेंतून निजामाच्या कुमकेस येणाऱ्या फौजेस अडविण्याची सक्त ताकीद केली. " ती फौज येऊन सामील झाली तर नबाब भारी होतील. याकरितां तिकडून येणाऱ्या फौजेस अटकाव होईल तें करणें. या वेळेस तुम्हांस जी फौज मिळेल

ती मिळवून भारी राहणें. दाभाडे बांडे आम्हांकडे आले नसले तरी तुम्हीं आपणाजवळ बोलावून सामील करणें. श्री स्वामीस लिहून फत्तेसिंग भोसले, शंभुसिंग जाधवराव व सरलष्कर आणविणें. अवघ्यांनीं या समयीं चित्त घालावें. नबाब ठिकाणीं लागल्यावर अवघी दाक्षिण निर्वेध होईल. " असें बाजीरावानें आप्पास लिहिलें. त्यावरून दक्षिणेंतून निजामास सोडविण्यास फौज येण्याची आशा राहिली नाहीं. इतक्यांत शहाजहानपूरचा मोंगल फौजदार निजामाच्या मदतीस येत होता. त्यावर शिंदे होळकर चालून गेले. दराईसराई येथें लढाई होऊन तींत फौजदार ठार झाला. व त्याच्या दोन हजार फौजेचा मोड झाला. शेवटीं निजामाच्या लष्करांत धान्य रुपयास एक शेर झालें; व बाहेरून मदत येणें शक्य नाहीं असें पाहून निजामानें आपलें जडजड सामान भोपाळ व इसलामगड या किल्ल्यांत टाकून तोफांच्या आश्रयानें तो परत जाऊं लागला. पण मराठे चोहोंकडून हल्ले करीत असल्यामुळें रोज तीन चार मैलांवर जमीन चालून होईना. शेवटीं पौष वद्य १३ च्या दिवशीं ( १७३८ जानेवारी ) म्हणजे मराठ्यांनीं पहिला हल्ला केला तेव्हांपासून बरोबर चोविसाव्या दिवशीं दराईसराई येथें निजामानें बाजीरावाशीं तह केला. या तहांत निजामानें स्वत: आपल्या हातानें बाजीरावास लिहून दिलें कीं, तुम्हांस माळवा प्रांताची सनद व नर्मदा आणि चंबळा या नद्यांमधील सर्व मुलूख बादशहापासून मिळवून देईन; व फौजेच्या खर्चाबद्दल पन्नास लाख रुपये तुम्हांस बादशहापासून देवविण्याची मी हमी घेतों.

१ श्रीब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक ३३.

# ४९ माझें मस्तक तरी किल्ल्यांत पडूं दे.

## वसईची मोहीम.

शके १६६० सन १७३९.

हिंदुस्थानांत युरोपियन लोक व्यापाराकरितां येऊन ठाणीं करून राहूं लागले. त्यास मूळ आरंभ पोर्तुगीज लोकांपासून झाला. त्यांचा मुख्य सरदार व्हास्को डिगामा हा पहिल्यानें कालिकोट बंदरावर आला. तेथून या लोकांनीं पाय पसरण्यास सुरुवात केली. गोवें प्रांत व हल्लींच्या ठाणें जिल्ह्याचा सर्व पश्चिम भाग हीं हळुहळू त्यांच्या ताब्यांत आलीं. त्यांच्या राजानें मुंबई बेट इंग्रज राजास आंदण दिलें होतें. पण इंग्रजलोक व्यापाराशिवाय इतर उद्योग करूं लागले नव्हते. पोर्तुगीजांची मात्र फारच चलती होती. या लोकांस धर्मवेड फार होतें त्यामुळें त्यांच्या राज्यांतील हिंदु प्रजेस फार त्रास होऊं लागला. 'जमीनदारांचीं वतनें बुडविलीं; गांवचे गांव घेऊन बाटविले, किरिस्ताव केले. घरांत कोणी नसलें तर पोरें नेऊन बाटवावीं. देवधर्म बुडाला प्रांतांतील तीर्थें क्षेत्रें सर्व लोपलीं. देवालयें फोडून साफ केलीं. ब्राह्मणांस मुलखांत फिरण्याची बंदी झाली. कोणीं कांहीं व्रतें, उद्यापनें, होम वगैरे आरंभिलीं कीं त्यांचें घर वेढलें. शेजारीपाजारी त्यांत सांपडले कीं त्यांसही धरून न्यावें.' पोर्तुगीजांनीं आरंभिलेला हा धर्मच्छल संभाजीच्या कारकीर्दीपासून चालला होता. लोक पोर्तुगीजांच्या जुलमास अगदीं कंटाळून गेले व वसईचे देसाई व देशपांडे, अंताजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ कावळे व गंगाजी नाईक इत्यादि पाठारे गृहस्थ यांनीं प्रांतास होत असलेला हा छळ पेशव्यांच्या कानावर घातला व पोर्तुगीजांच्या जुलमापासून सुटका करण्याची आग्रहपूर्वक विनंति केली. बाजीराव व चिमाजीआप्पा यांनीं 'सवड सांपडतांच पोर्तुगीजांचें कार्य

---

१ साष्टीची बखर, पृष्ठ १.

हातीं घेतों ’ अशीं त्यांस उत्तरें पाठविलीं. हीं उत्तरें शके १६५१ ( सन १७३० ) च्या शेवटीं पाठविलीं परंतु पेशवे पुढें हब्शीप्रकरणांत गुंतल्यामुळें त्यांस वेळ सांपडला नाहीं.

मध्यें पोर्तुगीजांचा जुलूम फारच वाढला. गोव्याचा नवा गव्हर्नर आला तो फाजील धर्मवेडा असल्यामुळें पोर्तुगीजांच्या मुलखांत अन्यधर्मीय लोकांची सर्रास विटंबना होऊं लागली. दामलुई बोतेलो हा वसई प्रांताचा अधिकारी होता, त्यानें आंग्र्यापासून आपल्या बंदराचें रक्षण करण्याकरितां नवीन जहाजें बांधण्यास सुरुवात केली व या नवीन खर्चाकरितां कोळी वगैरे लोकांवर त्यानें नवीन कर बसविले. यावेळीं मराठ्यांचें सिद्दीशीं युद्ध चाललें होतें. तें लवकरच संपलें असतें; परंतु संभाजी आंग्रे व मानाजी आंग्रे या दोघां भावांमध्यें दुही असल्यामुळें मराठ्यांची बाजू लंगडी पडली. या दुहीचा पोर्तुगीज लोकही फायदा घेतल्यावांचून राहिले नाहींत. त्यांनीं आज एका भावास तर उद्यां दुसऱ्या भावास मदत करून मराठ्यांच्या हितास अत्यंत घातक अशी दुही कायम ठेवण्याचा सारखा प्रयत्न चालविला होता. बाजीराव दोघां भावांत एकी करण्यास सारखा झटत होता व त्यानें शके १६५७ च्या आरंभीं नवदरे येथें मागें सांगितल्याप्रमाणें तह घडवून आणला, त्यामुळें सिद्दीचा लवकरच मोड झाला व मग चिमाजीआप्पानें पोर्तुगीजांचा समाचार घेण्याचा निश्चय केला.

शके १६५९ ( सन १७३७ ) च्या चैत्र महिन्यांत कोंकणांत जाऊन चिमाजीनें पोर्तुगीजांचीं साष्टी बेटांतील ठाणीं घेण्याचा सपाटा चालविला. ठाणें, बेलापूर, वेसावें, आणि साष्टी इतक्या जागा सर केल्या, व साष्टी प्रांत घेतल्यावर पावसाळ्यांत शंकराजी केशव व खंडोजी माणकर या दोघांस त्या प्रांताच्या रक्षणाकरितां ठेवून चिमाजी पुण्यास गेला. मराठ्यांच्या झालेल्या या जयानें पोर्तुगीज लोक अगदीं चिरडीस आले, व त्यांनीं पावसाळा संपल्यावर मराठ्यांकडून, आपला गेलेला मुलूख परत मिळवि-

ण्याकरितां मोठी जोरांत तयारी चालविली. पोर्तुगीजांनीं आपलें आरमार आणिलें व केळवें–माहीम येथील मराठे लोकांस शह दिला. त्याबरोबर मराठ्यांचा सरदार संक्राजी केशव यानें कच खाल्ली. बाजीराव पेशवे यांनीं रामचंद्र हरी पटवर्धन या सरदाराच्या हाताखालीं तीन हजार फौज देऊन केळवें–माहीम सर करण्यास त्यास पाठविलें. आपल्या लोकांनीं कच खाल्ली हें कळतांच बाजीरावास संताप आला व त्यानें रामचंद्र हरीस लिहिलें "लाखोलाख रुपये खर्च करून लोकांस द्यावे व प्रसंगीं पळ काढतील त्या पाजींचा मुलाहिजा काय? जे शरम धरून साहेबकाम करतील त्यांचें उर्जित करीतच आहोंत. ज्या ज्या वाटा पळून जावयाच्या असतील तेथें चौक्या ठेवून पळतील त्यांस धरून परिच्छिन्न डोचकीं मारणें. रात्रंदिवस कस्त करून केळवें–माहीम हीं दोन्ही स्थळें हस्तगत करणें" रामचंद्र हरीनें निकराचा हल्ला केला पण कांहीं चालेना. बाजीरावास हें कळतांच त्यानें शिंदेहोळकरांची कोंकणांत रवानगी केली. पोर्तुगीज सेनापति पेड्रो डिमेलो यानें ठाणें किल्ला परत घेण्याचा निश्चय केला. त्याच्या मदतीस लिस्बनहून[2] दोन जहाजें व गोव्याहून दारूगोळा आला. मार्गशीर्ष शुद्ध ५ मीच्या दिवशीं आठ गलबतें व तीस फत्तेमाऱ्या घेऊन तो ठाण्यावर चाल करून निघाला. ठाण्यास जाऊन पोहोंचतांच त्यानें गोळ्यांचा नुसता वर्षाव सुरू केला, पण मल्हारराव इत्यादि सरदारांनीं तो सहन करून त्याच्याशीं लगट केली व डिमेलोस यमलोकीं पाठविलें. त्यामुळें पोर्तुगीजांचें बरेंच नुकसान झालें.

थोडक्याच दिवसांनीं खुद्द चिमाजीआप्पा कोंकणांत उतरला व त्यानें पोर्तुगीजांचा वसई प्रांतांतील अम्मल पुरा उठविण्याचा निश्चय केला. त्यानें मराठे सरदारांस निरनिराळीं ठाणीं हस्तगत करण्यास पाठविलें. थोड्याच दिवसांत जयाचीं वर्तमानें येऊं लागलीं. राणोजी शिंद्यानें डहाणू घेतलें. तारापुरास तर मोठी निकराची लढाई होऊन तींत बाजी

१ श्रीब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक ७७. २ पोर्तुगालची राजधानी.

भिवराव रेटरेकर पडला, पण शेवटीं तें स्थळ मराठ्यांच्या हस्तगत झालेंच. अशरी फत्ते झाली. वेसवें घेतल्याचें खंडेरावाकडून पत्र आलें. अशीं भराभर स्थळें कायम झालीं. शेवटीं एका वसईखेरीज पोर्तुगीजांकडे कांहीं राहिलें नाहीं. तेव्हां चिमाजीआप्पानें शके १६६० माघ शुद्ध १० मीस ( १७३९ इ. स. ) वसईस वेढा घातला.

वसई मोठी बळकट जागा; पश्चिमेस व दक्षिणेस खाडी, पूर्वेकडून चिखल. त्यामुळें दोहोंकडूनही हल्ला करणें अशक्य होतें. एकट्या उत्तरेकडून हल्ला करावयाचा तर तिकडेही वाळू होती. त्यामुळें त्रास फार होई. मराठ्यांनीं मोर्चे लाविले, वर तोफा ठेवण्याकरितां धमधमे रचिले व सुरुंगही चालविले. पण पोर्तुगीजांच्या बंदुकीपुढें कांहीं चालेना. दोन महिने झाले तरी जयाचें कांहींच चिन्ह दिसेना. आप्पानें तर निश्चय केला होता कीं, ' वसई घेतल्याशिवाय परत फिरणार नाहीं. ' त्यानें सरदार लोकांस बोलावून म्हटलें " माझें डोकें उडवून तरी वसईच्या किल्ल्यांत टाका." या आप्पाच्या निर्वाणीच्या शब्दांनीं मराठे लोकांस स्फुरण चढले, व लागलीच वसईचें काम ताबडतोब शेवटास नेण्याच्या खटपटीस ते लागले. दहा सुरुंग तयार केले होते. वैशाख शुद्ध ५.मीच्या दिवशीं सर्व बेत ठरून षष्ठीस हल्ल्याचे लोक तयार झाले. व डावे बाजूकडील सुरुंगांस बत्त्या दिल्या. अर्धवट सुरुंग उडाले पण कांहीं लोक घाईनें तसेच वर चढून गेले. इतक्यांत उरलेले सुरुंग उडाले व सर्व लोक जायां झाले. उजवे बाजूकडील सुरुंग उडाले व बुरुजास वाट झाली. हें पाहतांच कांहीं लोक वर चढले पण ह्याही बाजूस फिरून सुरुंग उडाले व चढलेले लोक वर उडून नाश पावले. दोन्ही ठिकाणीं नाश झाल्यामुळें लोक कच खाऊं लागले. परंतु मल्हारराव होळकरानें केलेला सुरुंग अजून उडावयाचा होता. तो सुरुंग उडतांच किल्ल्यावर निशाणें लावण्याचा बेत करून सप्तमीचे दिवशीं तो उडविला; तो उडतांच अर्धा बुरूज कोसळला. त्याबरोबर मराठे वर चढले व हल्ल्यास सुरवात केली. पोर्तुगीज लोकांनीं

आंतून फिरून तोफांचा मारा केला, पण मराठे त्या बुरुजावरून हटेनात. तेव्हां नाइलाज होऊन अष्टमीस प्रहर दिवसास पोर्तुगीज किल्ला सोडण्यास तयार झाले. आठ दिवसांच्या आंत पोर्तुगीजांनीं सर्व चीजवस्त घेऊन चालतें व्हावें, असा करार झाला. येणेंप्रमाणें शके १६६१ वैशाख शुद्ध ८ मीस मराठ्यांचें निशाण किल्ल्यावर फडकूं लागलें.

वसईचा वेढा चालू असतांच एक गोष्ट घडून आली त्यावरून चिमाजीआप्पाच्या मनाचा थोरपणा दिसून येतो. एके दिवशीं एका पोर्तुगीज सरदाराची बायको जहाजांत बसून बाहेर निघाली होती. तिला कांहीं मराठ्यांनीं जाऊन धरून आणलें, आप्पाच्या पुढें आणून उभी केला. तेव्हा आप्पा म्हणाला, " हिला कशास धरून आणली ? " असें बोलून त्या निग्रही पुरुषानें तिला वस्त्रपात्र देऊन तिचा सन्मान केला; आणि तिला परत जाऊं दिलें.

---

## ५० आतां हिंदुमुसलमानांनीं एक झालें पाहिजे !

बाजीरावानें निजामुल्मुल्कास भोपाळांत कोंडलें होतें त्यावेळीं नागपूरकर रघोजी भोंसल्यानें अलहाबादपर्यंत स्वारी केली व तेथील सुभेदारास ठार मारून व बरीच खंडणी उकळून तो नागपुरास परत आला. मराठ्यांची पोर्तुगीजांबरोबर चाललेली लढाई ऐन रंगांत आली असतां रघूजीनें पूर्वेकडे स्वारी करून सर्व कटक प्रांत लुटून फस्त केला; त्यानें या दोन्हा स्वाऱ्या पेशवे दुसरीकडे गुंतले आहेत असें पाहून केल्या. यास त्यांची परवानगी घेतली नव्हती. त्यास या स्वाऱ्यांपासून बरेंच द्रव्यही मिळालें. रघूजीचें हें वर्तन पाहून बाजीरावास भोंसल्याचा राग आला व त्याच्या पारिपत्याकरितां

आवजी कवडे नांवाच्या सरदाराची त्यानें एकदम रवानगी केली. रघूजींची व आवजी कवड्याची लढाई जुंपली, पण दुर्दैवानें दाभाड्यावर पाठविला असतां जसा त्याचा पराभव झाला तसाच आतांही झाला. कवडे पराभव पावून परत आला तेव्हां स्वतः जाऊन रघूजीची खोड मोडण्याची बाजीरावानें तयारी केली. इतक्यांत दिल्लीहून पुढील वर्तमान आलें. "इराणचा बादशहा नादिरशहा दिल्लीवर चालून आला. युद्ध झालें. त्यांत खानदौरान ठार झाला. व सादतखान नादिरशहाच्या जिवंत हातीं सांपडला आहे. नादिरशहानें महमंदखानास कैदेंत टाकलें आहे. दिल्लींत कत्तल केली तींत सुमारें दोन लक्ष लोक ठार झाले व यापुढें त्याचा दक्षिणेकडे चालून येण्याचा बेत आहे." आवजी कवड्याचा नुकताच पराभव झाला होता. बाजीरावास यावेळीं अतिशय कर्ज झालें होतें, त्यामुळें पैसा मिळून फौज तयार होणें अवघडच होतें. चिमाजीआप्पा वसईकडे गुंतला होता. अशा वेळीं नादिरशहाची वरील बातमी बाजीरावास लागली. आणि इतक्या अडचणी भोंवतीं असून हें संकट मध्यें कोसळलें. तरी बाजीरावाचें धैर्य किमपिही ढळलें नाहीं. उलट जितकें भयंकर संकट त्यावर कोसळलें त्या मानानें त्यास विलक्षण अवसान आलें. त्यानें ब्रह्मेंद्रस्वामींस या सुमारास एक पत्र लिहिलें आहे; त्यांत तो म्हणतो, "नादिरशहा दिल्लीस दाखल झाले आहेत याउपरी दाक्षिणेवर स्वारी होणार आहेत. याजउपरी त्यास कोणी गनीम (शत्रु) आहे असें नाहीं. आम्ही त्यास व ते आम्हास गनीम आहों अशास जों ते तेथून (दिल्लीहून) निघाले नाहींत तों तमाम मराठे फौजा एकत्र होऊन चमेली (चंबळा) पार होऊन त्यास अलीकडे येऊं न द्यावें असा विचार आहे." दुसरे एके ठिकाणीं बाजीराव म्हणतो "आपलीं घरगुती भांडणें— रघूजीचें पारिपत्य, पोर्तुगीजांचा पराभव, हीं बाजुला ठेवलीं पाहिजेत. आतां सर्व हिंदुस्थानास एक शत्रु उत्पन्न झाला आहे.

१ श्रीब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र व पत्रव्यवहार, लेखांक ४२.

दक्षिणेंतील हिंदु व मुसलमान या दोघांनींही एक झालें पाहिजे. मी तर नर्मदा उतरून सर्व मराठी सैन्य चंबळेपर्यंत पसरून देणार. मग पाहूं या नादिरशहा कसा खालीं येतो तो." लागलीच बाजीरावानें चिमाजीआप्पास वसईचा वेढा सोडून येण्यास पत्र पाठविलें व निरनिराळ्या मराठे सरदारांस हिंदुस्थानचा शत्रु नादिरशहा याचा समाचार घेण्यासाठीं सैन्य घेऊन बोलाविलें. चिमाजीआप्पानें वसई घेऊन बाजीरावाकडे जाण्याचा विचार केला व वेढ्याचें काम जोरांत चालविलें. वसई सर झाल्याबरोबर त्यानें शिंदेहोळकरास बाजीरावाकडे पाठविलें. पण यापूर्वींच नादिरशहा परत गेल्याची बातमी आली होती. परत जातांना त्यानें चौदा कोटी रुपयांची लूट व बादशहाचें रत्नजडित मयूर-सिंहासनही बरोबर नेलें.

निजामुल्मुल्कानें भोपाळच्या वेढ्यानंतर बाजीरावास शरण जाऊन माळव्याची सनद देवविण्याचा करार केला खरा; पण एकदां बाजीरावाच्या हातून सुटून दिल्लीस गेल्यानंतर तो सनदेचें नांव काढीना. शिवाय दिल्लीवर नादिरशहानें स्वारी केली तेव्हां निजामुल्मुल्कास कांहींच त्रास झाला नाहीं. कारण तो नादिरशहास सामील होता. नादिरशहा गेला तरी निजाम सनदेसंबंधीं कांहींच बोलेना; तेव्हां बाजीरावास निजामाच्या कपटाचा राग आला व त्यानें त्याचें बरेंच नुकसान करण्याचा विचार केला. रघूजी भोंसल्याचें व पेशव्याचें वांकडें पडलें होतें, त्याचें कारण मागें आलेंच आहे. पण निजामाचें पारिपत्य करण्यासाठीं रघूजीशीं समेट करण्याचा त्यानें बेत केला. त्यानें रघूजीस निजामाच्या सर्व कपटाची हकीकत सांगितली व यावेळीं निजाम दिल्लीस आहे त्यामुळें त्याच्या मुलखावर स्वारी करण्यास किती उत्तम संधि आहे हें कळविलें. रघूजीस, फत्तेसिंग भोंसल्यास बरोबर घेऊन कर्नाटकावर स्वारी करण्यास त्यानें भर दिली; शिवाय महाराष्ट्रांत आणखी कांहीं गांवें इनाम दिलीं व बंगाल आणि हिंदुस्थान

यांतही पुढें वांटा देण्याचें आश्वासन दिलें. पेशव्यांच्या या उदारपणाच्या देणग्यांनीं रघूजी खूष झाला; व कर्नाटकावर स्वारी करण्याची त्यानें तयारी चालविली. या स्वारींत पायदळ पुरविण्याचें पेशव्यांनीं कबूल केलें. निजाम दिल्लीस होता. त्यामुळें त्याच्या मुलखाची व्यवस्था त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा पहात असे. त्याच्यावर बाजीरावानें चिमाजीआप्पास पाठविलें व बाजीरावानें स्वतः खुद्द निजामाचा समाचार घेण्यासाठीं हिंदुस्थानांत जावें असें ठरलें.

ठरल्याप्रमाणें रघूजीनें कर्नाटकावर स्वारी केली. संताजी घोरपड्यांचा वंशज मुराररराव घोरपडेही त्यास मिळाला. इकडे नासीर दहा हजार फौजेसह औरंगाबादेस होता. तो एकदम हातांत सांपडेल असें वाटल्यामुळें बाजीरावानें त्यास गराडा दिला. पण इतक्यांत बरीच मोठी फौज त्याचे कुमकेस आली. त्यावरून नासिरजंग शेफारून गेला व तो गोदावरी उतरून अहमदनगरच्या वाटेनें मुलूख लुटीत चालला. इतक्यांत चिमाजीआप्पा लष्करासह आला व मग दोघा भावांनीं मिळून नासिरजंगास माघारीं फिरविलें. चिमाजीआप्पाबरोबर नासिरजंग तह करण्यास कबूल झाला. मग मुंगी पैठण येथें शके १६६१ फाल्गुन शुद्ध ११ ( इ. स. १७४० ) उभयपक्षीं तह झाला. शान्तता राखावयाचें व परस्परांच्या प्रजेस त्रास न देण्याचें दोघांनीं कबूल केलें. नासिरजंगानें नर्मदाकांठीं हांडीया व किरकोण हे दोन जिल्हे पेशव्यांस जहागीर दिले. तह होतांच बाजीरावानें हिंदुस्थानकडे कूच केलें. नासिरजंगानें चिमाजीस औरंगाबादेस मोठा आग्रह करून नेलें. त्यानें केलेल्या सन्मानाचा स्वीकार करून चिमाजीआप्पा परतला.

संभाजी आंग्र्यानें मानाजी आंग्र्यावर स्वारी केली व जवळपासचीं सर्व ठाणीं घेऊन कुलाब्यास वेढा घातला. किल्ल्यांत गोड पाणी जाऊं देण्याचें बंद केलें. मानाजीनें लागलीच मदत करण्याविषयीं पेशव्यांस पत्र पाठविलें. चिमाजीआप्पानें बाजीरावाचा वडील मुलगा बाळाजी यास बरो-

वरचें सैन्य देऊन पुढें पाठविलें व आपण स्वतः पाठीमागून गेला. बाळाजीनें पुढें जाऊन संभाजीपासून ठाणीं परत घेण्याचा सपाटा चालविला होता. शिवाय इंग्रज, चिमाजीआप्पाच्या बोलावण्यावरून मानाजीस पाण्यांतून मदत करीत होते. यामुळें लवकरच संभाजी वठणीस येऊन सुवर्णदुर्गास पळून गेला. एके दिवशीं चिमाजीआप्पा व बाळाजी नाना हे दोघे रेवदंडा घेण्याचा विचार करीत बसले होते. इतक्यांत बाजीरावाच्या मृत्यूची दुःखकारक बातमी त्यांस समजली. बाजीराव शके १६६२ वैशाख शुद्ध १३ या दिवशीं ( इ. स. १७४० ) नर्मदातीरीं परगणा रावेर मौजे कलमडे येथें मृत्यु पावला.

---

## ५१ बाळाजी बाजीरावास पेशवाई कशी मिळाली.



बाजीरावास तिघे मुलगे होते. पहिला बाळाजी; हा सर्वांत वडील, हा मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें बाजीराव मृत्यु पावला तेव्हां कोंकणांत मोहिमेवर होता. दुसरा जनार्दन व तिसरा रघुनाथ हे दोघेही लहानच होते. थोरला बाळाजी एकवीस वर्षांचा असून मोहिमांवर जाऊं लागला होता. बाजीरावाच्या मृत्यूनंतर चिमाजी आप्पा बाळाजीस घेऊन सातार्‍यास गेला, व तेथें आषाढ शुद्ध १२ शके १६६२ बुधवारीं म्हणजे बाजीरावाच्या मृत्यूनंतर सुमारें दोन महिन्यांनीं पेशवाईचीं वस्त्रें शाहूमहाराजांकडून बाळाजीस मिळालीं. परंतु तीं मिळण्याच्या अगोदर बरेंच मोठें विघ्न उत्पन्न झालें व कांहीं दिवस बाळाजीस पेशवाइ मिळते कीं नाहीं याचा संशय वाटूं लागला होता. हें विघ्न कोणीं आणलें व तें कशा स्वरूपाचें होतें याविषयीं या गोष्टींत माहिती करून घेऊं.

रघूजी भोंसले या मराठे सरदाराचें नांव पूर्वी एकदा आलें आहे. परसोजी भोंसले हा राजारामाच्या कारकीर्दींत वऱ्हाडांत चौथाई वसूल करीत असे. शाहू गादीवर आल्यावर दोन तीन वर्षांनीं तो वारला. त्याच्या मागून त्याचा मुलगा कान्होजी भोंसले ह्यास शाहूनें सेनासाहेब-सुभा हें पद दिलें व वऱ्हाडचा अम्मल सांगितला. त्याला पुष्कळ दिवस पुत्र नव्हता म्हणून त्यानें आपल्या भावाचा मुलगा रघूजी यास आपल्याजवळ ठेविलें व त्यावर स्वतःच्या मुलाप्रमाणें तो प्रेम करूं लागला. पण पुढें कान्होजीस मुलगा झाला तेव्हां रघूजीवरचें त्याचें प्रेम उडालें व त्यानें त्यास दूर केलें. चुलत्यानें काढून लावल्यावर तो देवगड व एलिचपूर येथील मुसलमान नबाबांपाशीं कांहीं दिवस होता. तेथून तो साताऱ्यास गेला. तेथें तो शाहूकडे जात असे. एके दिवशीं शाहू शिकारी-करितां रानांत गेला होता. रघूजी बरोबर होताच. शाहू जंगलांत पालखींतून उतरून शिकारीचा तमाशा पहात होता इतक्यांत एक मातबर वाघ झाडींतून निघून समोरून शाहूच्या आंगावर चालून आला. नजीक येऊन झेंप टाकणार इतक्यांत रघूजी जवळ होता त्यानें जलदी करून तर-वारीनें वाघ मारला व शाहूचा प्राण वांचविला. यापुढें शाहूची रघूजीवर फारच मर्जी बसली. रघूजीचा उदय होण्यास यावेळीं आणखी एक मोठें कारण झालें. त्याचा चुलता कान्होजी हा वऱ्हाडांत जुलूम करूं लागला व शाहूशींही ताठ्यानें वागूं लागला. शाहूला त्याचा राग आला व बरोबर फौज देऊन रघूजीस त्यानें चुलत्याचें पारिपत्य करण्यास पाठविलें. रघूजी चुलत्यावर चाल करून गेला व त्यास पकडून घेऊन आला. शाहूनें त्यास बं-दींत ठेवलें व रघूजीस सेनासाहेबसुभा या पदाचीं वस्त्रें देऊन वऱ्हाडचा अ-म्मल सांगितला. हें वर्तमान शके १६५२ (सन १७३०) त घडलें. एव्हांपासून रघूजी वऱ्हाडचा अम्मल करूं लागला. तो जात्या शूर, कर्तृत्ववान् महत्वा-कांक्षी होता. बाजीराव दिल्लीपर्यंत स्वाऱ्या करात हाता हें पाहून तर रघू-जीची महत्वाकांक्षा विशेष जागृत झाली, व आपणही वऱ्हाडाबाहेर स्वाऱ्या

कराव्या असें त्यास वाटूं लागलें. ह्यावरून त्यानें उत्तरेस अलाहाबादेपर्यंत व पूर्वेस कटकपर्यंत अशा दोन स्वाऱ्या केल्या. हें कृत्य धाडसाचें होतें खरें, परंतु तें त्यानें आपण होऊन पेशव्यास किंवा शाहूस न विचारतां केलें असल्यामुळें हें त्याचें करणें मराठ्यांच्या एकीस बाधक होतें. त्यावर बाजीराव त्यास कसें शासन करणार होता व त्यानें त्यास कर्नाटकांत कसें पाठविलें, हें मागें आलेंच आहे. कर्नाटकांत रघूजीबरोबर पन्नास हजार फौज होती. त्यानें कर्नाटकचा नबाब दोस्तअल्ली याचवर एकदम छापा घातला व त्यास ठार केलें. मग मराठी सैन्यानें सर्व कर्नाटकभर खंडणी घेण्याचा झपाटा चालविला. शेवटीं दोस्तअल्लीचा मुलगा सफदरअल्ली यानें मराठ्यांस मोठी खंडणी देण्याचें कबूल केलें; व त्रिचनापल्लीस वेढा घालून तेथील अधिकारी चंदासाहेब यास पकडण्याविषयीं फूस दिली. मराठ्यांनीं त्रिचनापल्ली घेण्याचें ठरविलें. पण पावसाळा सुरूं झाल्यामुळें ती मोहीम पावसाळा संपल्यावर करण्याचें रघूजीनें ठरविलें व महाराष्ट्राकडे दोनशें पन्नास मैल परत येऊन शिवगंगेच्या कांठीं त्यानें छावणी दिली. या अवकाशांत त्याला बाजीरावाच्या मृत्यूची हकीकत समजली. रघूजीचे मनांत पेशव्यांविषयीं मत्सर उत्पन्न झाला होता. बाजीरावानें त्याच्याशीं समेट करून त्यास कर्नाटकांत पाठविलें खरें. पण तेवढ्यानें त्याचें मन पेशव्यांविषयीं निर्मळ झालें होतें असें मात्र नाहीं. त्याला बाळाजीचाही पराक्रम माहित होता. त्यानें पाहिलें कीं, यास पेशवाई मिळाली कीं मग आपल्याला निरनिराळ्या प्रांतांवर स्वाऱ्या करावयास कसच्या मिळतात? दर वेळेस पेशवे आपल्या आड आल्याशिवाय राहणार नाहींत. यासाठीं बाळाजीस पेशवाईच मिळूं देऊं नये व एखादा आपल्या मुठींतला क्षुल्लक माणूस पेशवा करावा, असा त्यानें बेत केला. त्याच्याबरोबर स्वारींत बाबूजी नाईक बारामतीकर हा होताच. तो मोठा श्रीमान् सावकार होता; खुद्द पेशव्यांनींही नाइकापासून पुष्कळ कर्ज काढलें होतें. रघूजीनें नाइकासच हातीं धरण्याचा निश्चय

केला; व बाबूजी नाइकास बरोबर घेऊन त्याला पेशवाई मिळवून देण्या-करितां रघूजी मोठ्या तांतडीनें साताऱ्यास आला. एकदां बाबूजी नाईक पेशवा झाला कीं, आपणास सर्व मुलखांत वाटेल तसा धिंगाणा घालण्यास सांपडेल व साताऱ्याचा छत्रपति आपण आपले हातांतील बाहुलें करून टाकं, अशी रघूजीच्या विचाराची मजल होती. त्यानें साताऱ्यास आल्याबरोबर प्रतिनिधीस आपल्या बाजूस ओढण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रतिनिधीस जरी बाळाजीबद्दल प्रेम नव्हतें तरी तो रघूजीस अनुकूल होईना. रघूजीनें शाहूपाशीं आपल्या वजनाचा उपयोग केलाच, शिवाय नाइकाकडून फार मोठा नजराणा देवावितों म्हणून बोलणें लाविलें. पण शाहू त्याच्या म्हणण्यास कबूल होईना. बाजीरावाचा पराक्रम, स्वामिनिष्ठा व आपण त्यास दिलेलीं वचनें शाहू विसरला नव्हता. त्यानें बरेच आढेवेढे घेतले तरी रघूजीचा प्रयत्न चाललाच होता. इतक्यांत बाळाजी व चिमाजी साताऱ्यास येऊन पोंचले. मग चिमाजीआप्पाच्या वजनानें शाहूनें बाळाजीस पेशवाईचीं वस्त्रें दिलीं व रघूजीस हात हालवीत तसेंच कर्नाटकांत जावें लागलें. बाबूजी नाइकाची तर अगदीं निराशा झाली. सूड घेण्याच्या बुद्धीनें त्यानें बाळाजीस 'आमचे पैसे परत द्या' असें निकडीचें बोलणें लावून गांजण्यास सुरवात केली. बाळाजीस पेशवाई मिळते न मिळते तोंच बाबूजी कर्जासाठीं धरणें घेऊन बसला. बाळाजी अगदीं पेंचांत आला, पण त्याचा कारभारी महादोजीपंत पुरंदरे यानें 'पेशव्यांचें कर्ज मजकडे लागलें, मी तें देतों' अशी हमी घेतली. येणें-प्रमाणें अगदीं पहिल्या संकटांतून महादोजीपंतानें बाळाजीस सोडविलें, हे त्याचे उपकार बाळाजी जन्मभर विसरला नाहीं.

# ५२ माळव्याची सनद.

शके १६६५ सन १७४३.

निजामुल्मुल्कानें भोपाळच्या लढाईनंतर बाजीरावाशीं तह केला होता. त्यांत माळव्याची सनद बादशहापासून मराठ्यांस देववितों, असें कबूल केलें होतें; पण पुढील गडबडींत पेशव्यांस माळव्याची सनद मिळाली नाहीं. बाळाजी बाजीरावानें दिल्लीच्या बादशहास जयसिंग व निजामुल्मुल्क यांच्यातर्फे पुष्कळ पत्रें पाठविलीं. त्यावरून बादशहानें पंधरा लाख रुपये पेशव्यास दिले. पण माळव्याची कायमची सनद करून देण्यासंबंधानें कांहींच उत्तर पाठविलें नाहीं. बाळाजी व चिमाजीआप्पा या दोघांनीं आपलीं नांवें घालून एक पत्र तयार केलें. त्यांत त्यांनीं ' बादशहास आम्हांस माळव्याची सनद द्या ' असें लिहिलें " सनद मिळाल्यास आम्ही दोघेही तुम्हांस योग्य मान देऊं, मराठे सरदारांपासून प्रांतास त्रास होऊं देणार नाहीं व बादशहाच्या सेवेस पांचशें घोडा लावून देऊं. बंडखोर जमीनदारांचें पारिपत्य करण्यास चार हजार सैन्य माळव्यांत सतत ठेवूं व अगोदरपासून चालत आलेल्या देणग्या परत घेणार नाहीं. " या सर्व अटी पाळूं, असेंही त्यांनीं पत्रांत लिहिलें. या पत्राचें बादशहाकडून कांहींच उत्तर आलें नाहीं. म्हणून बाळाजीनें निजामुल्मुल्क हा आपल्या मुलाचें बंड मोडण्याकरितां दक्षिणेंत येत होता त्याची भेट घेण्याचें ठरविलें. युद्ध न करतां माळवा प्रांत मिळावा अशी बाळाजीची इच्छा होती. दोघांची भेट नर्मदेजवळ एदलाबाद परगण्यांत माघ शुद्ध १ शके १६६२ रोजीं झाली. त्यांत बाळाजीनें निजामुल्मुल्कास खूष केलें व त्याच्या मुलाचें बंड मोडण्यास एक मराठे स्वारांचें पथकही दिलें. त्याचवेळीं चिमाजीआप्पा वारला. त्याला सदाशिवराव भाऊ म्हणून अकरा वर्षांचा एक

मुलगा होता. चिमाजीच्या मृत्यूनें बाळाजीचें फार नुकसान झालें व तो तसाच माघारा आला.

बाळाजी साताऱ्यास गेला तेव्हां शाहूनें,पोर्तुगीजांपासून जिंकिलेली सर्व कोंकणपट्टी पेशव्यांस देऊन टाकिली, व नर्मदेच्या उत्तरेकडील मुलखाची खंडणी वसूल करण्याचीही एक सनद दिली. मग पावसाळा संपल्यावर शके १६६३ च्या शेवटीं शेवटीं बाळाजी उत्तरहिंदुस्थानांत चाल करून गेला व त्यानें गढें व मंडळ हीं दोन ठिकाणें काबीज केलीं. शके १६६४ च्या पावसाळ्यांत नर्मदेच्या कांठीं राहण्याचा बाळाजीचा विचार होता व तेथून साधल्यास तो अलाहाबादेवर स्वारी करणार होता. इतक्यांत रघूजीच्या चिथावणीवरून दमाजी गायकवाड व बाबूजी बारामतीकर या दोघांनीं मिळून माळव्यावर स्वारी केली. त्यामुळें बाळाजीस माळव्यास परत यावें लागलें. बाळाजी आल्याबरोबर दमाजीचें सैन्य गुजराथेंत पळून गेलें. डभईच्या लढाईपासून अनंतराव पवाराशीं बाजीरावाचें बरें नव्हतें. पण बाळाजीनें अनंतरावाशीं यावेळीं सख्य केलें व त्यास धारेस कायम करून गुजराथेंतून माळव्यावर स्वाऱ्या करतां येऊं नयेत अशी उत्तम तोड काढिली.

माळव्याच्या सनदेचें प्रकरण बराच वेळ भिजत पडलें होतें. तें निकालास लागण्याचा लवकरच योग आला. यावेळीं बंगालचा सुभेदार अलिवर्दीखान या नांवाचा होता. हा पहिल्यानें अगदीं क्षुल्लक माणूस होता पण यानें आपल्या धन्याविरुद्ध बंड करून बंगालचा सुभा मिळविला. त्यानें, बंगालचा सुभेदार होतांच ओरिसा प्रांतावर स्वारी केली. व तेथील अधिकारी मुर्शिदकुलीखान यास हांकून दिलें. त्याचवेळीं मुर्शिदकुलीचा दिवाण मीर हबीब अलिवर्दीखानास शरण गेला. तेव्हां त्यानें त्यास नोकरीस ठेविलें.आलिवर्दीखानानें मागील सुभेदारांचे सर्व दागिने जप्त करून त्याचा एक मौल्यवान् नजराणा दिल्लीच्या बादशहास पाठविला. त्यावरून बादशहानें अलिवर्दीखानास बंगालचा सुभेदार म्हणून मान्य

केलें. मीर हबीब जरी अलिवर्दीखानाच्या नोकरीस राहिला तरी अलिवर्दीचा नाश करण्यासाठीं त्याचा एकसारखा प्रयत्न चालला होता. रघूजी भोंसले अजून कर्नाटकची स्वारी संपवून आला नव्हता. त्यानें पाठीमागें नागपुरास भास्करपंत म्हणून आपला दिवाण ठेविला होता. तो सर्व राज्यकारभार पहात असे. अलिवर्दीखानाची जेव्हां पहिली स्वारी ओरिसा प्रांतावर झाली त्याचवेळीं मीर हबीबनें भास्करपंतास मदतीस बोलाविलें होतें. पण भास्करपंतास आपल्या मुखत्यारीवर मदत करतां येईना.त्यानें रघूजीस परवानगी देण्याविषयीं लिहिलें. इतक्यांत अलिवर्दीखानानें ओरिसा जिंकून देखील टाकिला. शके १६६३ (सन १७४२) च्या शेवटीं कटक (ओरिसा) प्रांतांत बंड झालें तेव्हां आलिवर्दीखान तें मोडण्याकारितां सैन्यासह चालून गेला. मग भास्करपंतानें दहा हजार घोडेस्वार बरोबर घेऊन एकदम बहार प्रांतावर हल्ला केला. मराठे चहूंकडून खंडणी वसूल करूं लागले. आलिवर्दीखान बंड मोडून शके १६६४ च्या आरंभीं परत फिरला. तों वाटेंतच त्यानें, मराठे बहार प्रांतावर खंडणी घेत आहेत असें ऐकिलें. त्याचें सैन्य तीन चार हजार घोडेस्वार व चार हजार पायदळ होतें तरी त्यानें मराठ्यांवर हल्ला करण्याचा निश्चय केला. तो मराठ्यांवर चालून गेला. मराठ्यांनीं त्याला तसेंच अंगावर येऊ दिलें व मग चहूं बाजूंनीं त्यास घेरलें व त्याची दाणावैरण बंद केली. त्यामुळें अलिवर्दीच्या सैन्याचे फार हाल होऊं लागले. पुष्कळ लोक त्यास सोडून गेले. बरेच ठार झाले. राहिलेल्या तीन हजार लोकांनिशीं आलिवर्दीखान मराठ्यांचा मार खात खात तसाच मागें सरत कटक्यास आला. पहिल्याच हल्ल्यांत मीर हबीब मराठ्यांच्या हातीं सांपडला. त्यानें बगांल्यांतील सर्व बारीक माहिती देऊन मराठ्यांचा अतोनात फायदा करून देण्याचें काम अंगावर घेतलें, त्यामुळें भास्करपंताचा तो अगदीं दोस्त झाला. त्यानें पावसाळ्यांत बंगाल्यांतच राहण्याचा भास्करपंतास फार आग्रह केला. पण भास्करपंतास तें पटेना; तेव्हां सैन्याचें एक पथक आपले हातीं

घेऊन मीरहबीबनें मुर्शिदाबादेवर चाल केली तेथें आपल्या भावास सोडविलें व जगतराज अमरचंद या गबर सावकाराचें घर लुटून पंचवीस लक्ष रुपये मराठ्यांस मिळवून दिले, व मग भास्करपंतास तो येऊन मिळाला. मीर हबीबाचा हा पराक्रम पाहून भास्करपंतानें पावसाळा बंगाल्यांत काढण्याचें कबूल केलें. भास्करपंत परतून हुगळी शहरावर चाल करून गेला. मराठे मुर्शिदाबाद जिल्ह्यांत शिरले असते; पण हुगळीस फार पूर आल्यामुळें, त्यांस ती ओलांडतां येईना यामुळें मुर्शिदाबादेवर मराठ्यांची स्वारी झाली नाहीं.

याचवेळीं दिल्लीच्या बादशहाकडून अलिवर्दीखानाकडे प्रांताची खंडणी मागण्यास एक माणूस आला. अलिवर्दीखानानें बादशहास सांगून पाठविलें कीं, " यावेळीं खंडणी कसची मागतां ? या भास्करपंताच्या धाडीपासून माझें रक्षण करण्यास अगोदर सैन्य पाठवा. माझें रक्षण करा. मी खंडणी देईन. " त्यानें बाळाजीस नागपूरकराचे मुलखावर स्वारी करण्यास विनंति केली व त्याकरितां बरींच मोठी रक्कम पाठविली पण त्याचा निरोप पेशव्यास पोहोंचलाच नाहीं. अलिवर्दीखान स्वतः स्वस्थ बसला नाहीं. त्यानें मराठ्यांच्या मुलखावर स्वारी करण्याचा बेत केला व हुगळी व अजी या दोन नद्यांस पूर आले होते म्हणून पलीकडे जाण्यास त्यानें नावांचे पूल बांधिले. मग सन्य घेऊन तो पलीकडे जाऊं लागला. तेव्हां अजी नदीवर बांधलेला पूल तुटला व हजार बाराशें माणसें मेलीं. पण अलिवर्दीखानानें धीर न सोडतां मराठ्यांच्या लष्करावर हल्ला केला. अलिवर्दीखान अशा वेळेस हल्ला करून येईल अशी भास्करपंताची कल्पना नव्हती, म्हणून तो बेसावध होता. अशा स्थितींत अचानक हल्ला आल्यामुळें मराठे घाबरून पळून गेले. भास्करपंत निभावून कसा तरी नागपुरास आला. यावेळीं रघूजीही कर्नाटकांतून आला होता व हा झालेला पराभव पाहून रघूजीस अलिवर्दीखानाची चीड आली व त्यानें बहारवर हल्ला करण्याच्या उद्देशानें कूच केलें.

इतक्यांत दिल्लीच्या बादशहानें आलिवर्दीखानास साहाय्य करण्याचें ठरविलें. त्यानें अयोध्येचा नबाब सफदरजंग यास भास्करपंतास बंगालमधून हांकून देण्याचा हुकूम केला. बाळाजीसही अलिवर्दीखानास मदत करण्यास लिहिलें. हें काम केल्यास बंगालच्या ( आजिमाबाद ) खंडाबद्दलचा पैसा अलिवर्दीखानाकडून यावयाचा होता तो वसूल करण्याची परवानगी दिली व माळव्याची सनदही देण्याचें कबूल केलें. माळव्याची सनद मिळणार असें पाहतांच बाळाजीनें घाई करून आलिवर्दीखानास मदत करण्यास मुर्शिदाबादेकडे कूच केलें. बाळाजी आलिवर्दीखानाच्या मदतीस आला असें पाहतांच रघूजी डोंगरांत पळूं लागला. त्याचे मागें आलिवर्दीखान लागला. परंतु या लोकांचे हातीं रघूजी सांपडणार नाहीं अशी अटकळ करून बाळाजीनें स्वतः आडवाटेनें शिरून मोंगल येण्यापूर्वीं रघूजीस गांठलें व एक दोन लढायांत त्याचा अगदीं मोड करून टाकला. असा मोड झाल्यावर रघूजी नागपुरास पळून गेला व माळव्याची सनद मिळविण्याकरितां बाळाजी माळव्यांत आला. बाळाजीनें बादशहाचें काम यथास्थित बजाविलें होतें; तेव्हां माळव्याची सनद देणें महंमदशहास भाग पडलें. बादशाहीचा डौल राखण्याकरितां एक पोकळ युक्ति जयसिंग व निजामुल्मुल्क यांनीं काढिली व महंमदशहास सुचविली. बादशहाचा मुलगा अहमद याचे कारभारी म्हणून पेशव्यास माळव्याची सनद शके १६६५ च्या आषाढांत देण्यांत आली.. तींत मागें चिमाजीआप्पा व बाळाजी यांनीं मिळून जें पत्र पाठविलें होतें त्यांतील सर्व गोष्टी करण्याचें बाळाजीनें कबूल केलें. बाळाजी सनदेंतील कलमें मोडणार नाहीं अशी हमी जयपूरचा राजा सवाई जयसिंग यानें घेतली. शिवाय मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व पिलाजी जाधव यांनीं बादशहास असें लिहून दिलें कीं बाळाजी बाजीराव हे तहाच्या कलमाप्रमाणें चालतील, चालले नाहींत तर आम्ही त्यांची नोकरी सोडून देऊं.

घेऊन मीरहबीबनें मुर्शिदाबादेवर चाल केली तेथें आपल्या भावास सोडविलें व जगतराज अमरचंद या गब्बर सावकाराचें घर लुटून पंचवीस लक्ष रुपये मराठ्यांस मिळवून दिले, व मग भास्करपंतास तो येऊन मिळाला. मीर हबीबाचा हा पराक्रम पाहून भास्करपंतानें पावसाळा बंगाल्यांत काढण्याचें कबूल केलें. भास्करपंत परतून हुगळी शहरावर चाल करून गेला. मराठे मुर्शिदाबाद जिल्ह्यांत शिरले असते; पण हुगळीस फार पूर आल्यामुळें, त्यांस ती ओलांडतां येईना यामुळें मुर्शिदाबादेवर मराठ्यांची स्वारी झाली नाहीं.

याचवेळीं दिल्लीच्या बादशहाकडून अलिवर्दीखानाकडे प्रांताची खंडणी मागण्यास एक माणूस आला. अलिवर्दीखानानें बादशहास सांगून पाठविलें कीं, " यावेळीं खंडणी कसची मागतां ? या भास्करपंताच्या धाडीपासून माझें रक्षण करण्यास अगोदर सैन्य पाठवा. माझें रक्षण करा. [illegible] खंडणी देईन. " त्यानें बाळाजीस नागपूरकराचे मुलखावर स्वारी [illegible]ण्यास विनंति केली व त्याकरितां बरीच मोठी रक्कम पाठविली पण त्या[illegible] निरोप पेशव्यास पोहोंचलाच नाहीं. अलिवर्दीखान स्वतः स्वस्थ बसला नाहीं. त्यानें मराठ्यांच्या मुलखावर स्वारी करण्याचा बेत केला व हुगळी व अजी या दोन नद्यांस पूर आले होते म्हणून पलीकडे जाण्यास त्यानें नावांचे पूल बांधिले. मग सन्य घेऊन तो पलीकडे जाऊं लागला. तेव्हां अजी नदीवर बांधलेला पूल तुटला व हजार बाराशें माणसें मेलीं. पण अलिवर्दीखानानें धीर न सोडतां मराठ्यांच्या लष्करावर हल्ला केला. अलिवर्दीखान अशा वेळेस हल्ला करून येईल अशी भास्करपंताची कल्पना नव्हती, म्हणून तो बेसावध होता. अशा स्थितींत अचानक हल्ला आल्यामुळें मराठे घाबरून पळून गेले. भास्करपंत निभावून कसा तरी नागपुरास आला. यावेळीं रघूजीही कर्नाटकांतून आला होता व हा झालेला पराभव पाहून रघूजीस अलिवर्दीखानाची चीड आली व त्यानें बहारवर हल्ला करण्याच्या उद्देशानें कूच केलें.

इतक्यांत दिल्लीच्या बादशहानें अलिवर्दीखानास साहाय्य करण्याचें ठरविलें. त्यानें अयोध्येचा नबाब सफदरजंग यास भास्करपंतास बंगालमधून हांकून देण्याचा हुकूम केला. बाळाजीसही अलिवर्दीखानास मदत करण्यास लिहिलें. हें काम केल्यास बंगालच्या ( अजिमाबाद ) खंडाबद्दलचा पैसा अलिवर्दीखानाकडून यावयाचा होता तो वसूल करण्याची परवानगी दिली व माळव्याची सनदही देण्याचें कबूल केलें. माळव्याची सनद मिळणार असें पाहतांच बाळाजीनें घाई करून अलिवर्दीखानास मदत करण्यास मुर्शिदाबादेकडे कूच केलें. बाळाजी अलिवर्दीखानाच्या मदतीस आला असें पाहतांच रघूजी डोंगरांत पळूं लागला. त्याचे मागें अलिवर्दीखान लागला. परंतु या लोकांचे हातीं रघूजी सांपडणार नाहीं अशी अटकळ करून बाळाजीनें स्वतः आड्वाटेनें शिरून मोंगल येण्यापूर्वीं रघूजीस गांठलें व एक दोन लढायांत त्याचा अगदीं मोड करून टाकला. असा मोड झाल्यावर रघूजी नागपुरास पळून गेला व माळव्याची सनद मिळविण्याकरितां बाळाजी माळव्यांत आला. बाळाजीनें बादशहाचें काम यथास्थित बजाविलें होतें; तेव्हां माळव्याची सनद देणें महंमदशहास भाग पडलें. बादशाहीचा डौल राखण्याकरितां एक पोकळ युक्ति जयसिंग व निजामुल्मुल्क यांनीं काढिली व महंमदशहास सुचविली. बादशहाचा मुलगा अहमद याचे कारभारी म्हणून पेशव्यास माळव्याची सनद शके १६६५ च्या आषाढांत देण्यांत आली. तींत मागें चिमाजीआप्पा व बाळाजी यांनीं मिळून जें पत्र पाठविलें होतें त्यांतील सर्व गोष्टी करण्याचें बाळाजीनें कबूल केलें. बाळाजी सनदेंतील कलमें मोडणार नाहीं अशी हमी जयपूरचा राजा सवाई जयसिंग यानें घेतली. शिवाय मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे व पिलाजी जाधव यांनीं बादशहास असें लिहून दिलें कीं बाळाजी बाजीराव हे तहाच्या कलमाप्रमाणें चालतील, चालले नाहींत तर आम्ही त्यांची नोकरी सोडून देऊं.

## ५३ आधीं एकी मग मुलूखगिरी.

बाळाजी सनद मिळविल्यावर आपल्या मुलखाचा हिशेब दाखविण्याकरितां साताऱ्यास शाहूकडे गेला. रघूजी मोठा धोरणी होता. आपला पराभव झाल्यावर त्यानें पेशव्यांकडे एक वकील पाठविला व 'तुम्हीं जी वागणूक केली ती मराठ्यांच्या राज्य-प्रसारास अत्यंत उपयोगी आहे व म्हणून माझ्या मनांत तुम्हांविषयीं कांहीं किंतु राहिला नाहीं' असा निरोप त्याजबरोबर पाठविला. निरोप ऐकून बाळाजीस समाधान झालें. पण इतक्यांत रघूजी मोठी फौज घेऊन साताऱ्याकडे चाल करून येत आहे असें बाळाजीस कळलें. दमाजी गायकवाडही सैन्यासकट साताऱ्यास येत आहे असेंही कळलें. श्रीपतराव प्रतिनिधी आजारीच असे. पण त्याचा मुलगा मोठा कर्तबगार व हुषार असून दमाजी गायकवाडाच्या पक्षाचा होता. हे सर्व साताऱ्यास जुळलें ह्मणजे आपणाविरुद्ध एक मोठा तट होईल असें बाळाजीस वाटलें, व हे एक झाल्यावर दगा करून मराठी राज्यांत घोंटाळा उडेल कीं काय, अशी बाळाजीस भीति पडली. हा कट फोड-ण्यास बाळाजीनें एक युक्ति काढली. रघूजीस त्यानें कटाबाहेर काढलें. शाहूनें उत्तरेकडील सर्व मुलखांत खंडणी वसूल करण्याचा हक्क बाळाजी-स देऊन टाकला होता. बाळाजीनें त्यापैकीं लखनौ, पाटणा, दक्षिण बंगाल व बहार या प्रांतांची खंडणी वसूल करण्याचा हक्क शाहूकडून स्वसंतोषानें रघूजीस देवविला. शिवाय कटक प्रांतापर्यंत खंडणीचा हक्क रघूजीस मिळाला. याचवेळेस शाहूनें बाळाजीस एक सनद करून दिली. तींत आजपर्यंत चालत आलेला मोकासा व जहागीर, कोंकण व माळवा प्रांतांचा अम्मल, अलाहाबाद, आग्रा व अजमीर येथील खंडणीची

वांटणी, पाटणा जिल्ह्यांतील तीन तालुके, अर्काट प्रांताच्या वसुलांतील वीस हजार रुपये व रघूजीच्या मुलखांतील कांहीं गांवें इतकें बाळाजीस मिळालें. दाभाड्याकडे मुख्य सरकारची बरीच बाकी राहिली होती. तीसंबंधानें दमाजी गायकवाडाशीं कांहीं बोलणें झालें नाहीं. पण त्यानें माळवा प्रांतावर जी स्वारी केली होती त्यावेळीं नेलेली खंडणी मात्र त्यानें पेशव्यास परत करावी असें ठरलें. येणेंप्रमाणें मुलूख देऊन बाळाजीनें रघूजीस खूष केलें. रघूजीसही समाधान वाटलें, व आपला पराक्रम दाखविण्याचा त्यास हुरूप आला. बाळाजीसही स्वस्थता मिळाली. मराठ्यांचा परस्परांतील कलह थांबल्यामुळें बाहेरच्या मुलखांत मराठ्यांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या.

रघूजी शके १६६६च्या पावसाळ्यांत नागपुरास परत गेला व पावसाळा संपतांच २०००० घोडस्वार भास्करपंताबरोबर देऊन त्यानें त्यास बंगालवर पाठविलें. भास्करपंत पहिल्यानें ओरिसा प्रांतांत शिरला. अलिवर्दीखानानें सैन्य तयार केलें पण मराठे पुष्कळ आहेत असें पाहून तहाचें बोलणें लावलें. एके दिवशीं त्यानें भास्करपंत व त्याचे वीस सरदार यांस मेजवानीस बोलाविलें व तेथें त्यांस विश्वासघात करून ठार मारलें. मग मराठी सैन्यावर अलिवर्दीखानानें हल्ला केला, तेव्हां एक सरदार उरला होता तो त्या सैन्यास घेऊन परत नागपुरास आला. वाटेनें मराठ्यांचें बरेंच नुकसान झालें. या अलिवर्दीखानाच्या विश्वासघाताचा व दुष्टपणाचा सूड उगवण्याची संधि रघूजीस लवकरच सांपडली. अलिवर्दीखानाच्या सैन्यांतील अफगाण लोकांनीं दंगा केल्यामुळें तो ओरिसा प्रांतांतून निघून गेला. अशा वेळीं रघूजी ओरिसा प्रांतावर एकदम चालून गेला. कांहीं भाग काबीज केले व अलिवर्दीखानापाशीं तीन कोट रुपये खंडणी मागितली. अलिवर्दीखान अफगाणांचा दंगा मोडेपर्यंत देइन देईन म्हणत होता पण दंगा मोडतांच मोठें सैन्य घेऊन रघूजीवर चालून आला.

पण इतक्यांत नागपुरास कांहीं बखेडे उत्पन्न झाल्यामुळें रघूजी नागपुरास परतही गेला होता.

रघूजीनें बंगालवर स्वारी केली; त्यावेळीं बाळाजीनें माळव्यांत जाऊन खंडणी वसूल केली व लवकरच तो दक्षिणेंत परत आला. बाबूजी नाइकानें कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील दुआब शाहूपासून सात लक्षाच्या मक्त्यानें घेतला होता. नाइकास प्रांतांतून वसूल करतां येईना. नाइकानें पेशवाई मिळविण्याचा प्रयत्न केल्यापासून बाळाजीच्या मनांत त्याच्याविषयीं वांकडें आलें होतें. नाइकाच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊन बाळाजीनें कर्नाटकाचा वसूल आणण्याकरितां चिमाजीआप्पाचा मुलगा सदाशिवराव भाऊ यास पाठविलें. या स्वारींत सदाशिव चिमणाजीबरोबर सखाराम बापू बोकील या धोरणी मुत्सद्यास पाठविलें होतें. सदाशिवराव भाऊनें या स्वारींत तुंगभद्रेपर्यंत खंडणी वसूल केली व बहादूरभेंडा हा किल्ला हस्तगत केला. मग सावनूरच्या नबाबाची भेट घेऊन व त्याचेपासून पंचविस लक्षांचा मुलूख मिळवून १६६९ (सन १७४७) च्या ज्येष्ठांत भाऊ परत आला. बहादूर–भेंड्याच्या स्वारीहून परत आल्यावर शाहूनें भाऊस बाळाजीचा मुख्य मदतगार नेमिलें. सदाशिवराव भाऊ मोठा हुषार होता. वासुदेव जोशी व रघुनाथ हरी असे दोन कारकून नेमून तो दप्तरचं काम पाहूं लागला. कांहीं दिवस शांतता होती; तितक्या अवकांशात बाळाजीनें देशांतील शेतीची सुधारणा केली, व जिकडे तिकडे सुबत्ता दिसूं लागली, पण थोड्याच दिवसांत अशा कांहीं गोष्टी घडून आल्या कीं, त्यामुळें सुधारणेचें काम मागें पडून पुन्हां युद्धाची दंगल सुरू झाली. कसें तें पुढील गोष्टींत पाहूं.

## ५४ शाहूचा मृत्यु.

शके १६७१ इ. स. १७४९.

शाहू आपल्या वयाच्या दहाव्या वर्षापासून पंचविसाव्या वर्षापर्यंत औरंगजेबाच्या नजरकैदेंत होता. त्यामुळें मोंगलासारखी ऐषआरामांत दिवस काढण्याची त्यास संवय लागली. मोंगलांच्या कैदेंतून सुटल्यावर फक्त चार पांच वर्षे तो लढाईवर गेला. यापुढें पंतप्रधानावर युद्धांचीं व दगदगीचीं कामें सोंपवून शाहू राजधानींत सुखानें राहूं लागला. शाहू प्रत्यक्ष राजव्यवहारांत पडत नव्हता तरी सर्व मराठे सरदारांत एकी होण्यास त्याचा वारंवार उपयोग होई. कारण सातारच्या गादीबद्दल सर्व मराठ्यांस सारखाच आदर व अभिमान वाटे. शाहूच्या वेळेस मराठी राज्याचा अम्मल करण्याचें जोखमीचें काम पेशव्यावर पडलें. बाळाजी विश्वनाथ, बाजीराव बल्लाळ व आतां बाळाजी बाजीराव हे पुरुष सारखे कर्ते निघाले. दाभाडे, रघूजी भोंसले, दमाजी गायकवाड, बाबूजी नाईक प्रतिनिधी इत्यादि मराठे सरदारांस पेशव्यांचा अम्मल सहन होत नसे व म्हणून ते दंगे करीत. परंतु मराठी राज्याचा विस्तार करण्यास पेशवे लायक आहेत असा शाहूचा भरंवसा होता. त्यानें दंगेखोर सरदारांची समजूत करून पेशव्यांस राज्यविस्ताराच्या कामांत मदत केली. पेशव्यांसारखे मराठी राज्यांतील सर्वांत प्रबळ सरदार आपल्याशीं कसे वागतात हें पाहण्याचा शाहूनें विचार केला.

एकदां दहा हजार फौज घेऊन भेटीस यावें अशी शाहूनें बाळाजीस आज्ञा केली. बाळाजी दहा हजार फौज घेऊन येऊं लागला. यावर शाहूनें इतकी फौज घेऊन येण्याचें कारण काय म्हणून विचारलें. तेव्हां सर्व फौज मागें ठेवून पांच खिजमतगारांनिशीं बाळाजी भेटीस आला. शाहूस परीक्षाच पहावयाची होती म्हणून तो शिकारीस निघून गेला. बाळाजीस

ती बातमी कळतांच तोही त्याचे मागोमाग गेला. चोपदारांनीं बाळाजी आल्याची वर्दी दिली तरीही त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. एक प्रहरानंतर बाळाजीस गोटांत जाऊन उतरण्यास सांगितलें.

एके दिवशीं दरबार बरखास्त झाल्यावर शाहू वाड्यांत जावयास निघाला, तेव्हां त्यानें आपले जोडे मधल्या दालनांत टाकून तो तसाच पुढें निघाला. खिजमतगार जवळ नव्हते, तेव्हां बाळाजीनें ते उचलून घेऊन शाहू मागील चौकांत पोहोंचला नाहीं तोंच त्याच्यापुढें ठेविले. ही त्याची नम्रता पाहून शाहू खूष झाला.

पुन्हां एके प्रसंगीं बाळजी सात आठ हजार फौज घेऊन शाहूच्या भेटीस आला होता. त्यावेळीं शाहूनें चिटणिसाकडून 'तुमचें प्रधानपद दूर केलें आहे याजकरितां हुजरे पाठविले आहेत त्यांच्याबरोबर शिक्के-कट्यार व जरीपटका पाठवून द्यावीं' असा हुकूम लिहविला व बाळाजी वेण्यानदीवर लष्करांत होता तिकडे पाठविला. बाळाजीनें हुकूम वाचतांच शिक्के, कट्यार व जरीपटका हीं हुकूम घेऊन येणाऱ्या हुजऱ्याच्या स्वाधीन केलीं. व लहानशी राहुटी ठोकून तेथें तो आपला खाजगी शागीर्दपेशा घेऊन राहिला. मग बाळाजीनें विनयपूर्वक शाहूस एक पत्र पाठविलें:-"आज्ञा झाली तेव्हांच स्वामीच्या चरणांपाशीं आलों असतों. परंतु या ठिकाणीं फौज आहे ती कोणाच्या स्वाधीन करावी याची आज्ञा झाली नाहीं. सबब येतां आलें नाहीं. त्याची आज्ञा व्हावी म्हणजे सत्वर निघून येता" यावर शाहूनें "फौजफाटा कारकुनाचे स्वाधीन करावा" असें लिहून पाठविलें. सर्व मंडळीस पेशव्यांबद्दल वाईट वाटलें. जवळच्या मंडळींनीं शाहूस विनंति केली, "प्रधानांकडून काय अपराध झाला?" शाहूनें उत्तर केलें, "प्रधानपद यांजकडे ठेवावयाचें नाहीं. पुन्हां पिंगळ्यांकडे द्यावयाचें आहे" तेव्हां सर्व मुत्सद्यांनीं विनंति केली, "हिंदुस्थानप्रांतीं ही बातमी गेली व जाईल. चहूंकडे पंतप्रधानांचे मित्र आहेत त्यामुळें बखेडा माजेल." आठ दिवस झाले तरी शाहूकडून बाळा-

जीस कांहीं बातमी कळेना, तेव्हां चिटणीसातर्फे त्यांनीं विनंति केली, “ आम्ही एक राहुटीनिशीं बाहेर राहिलों. चरणांपाशीं येण्याची आज्ञा व्हावी किंवा दुसरी कांहीं सेवा सांगावी किंवा कृपा होणें ती व्हावी” तेव्हां शाहूकडून उत्तर आलें कीं, “ तुम्हांस तुमचें पद परत दिल्यास नजर काय द्याल ? ” त्यावर बाळाजीनें सांगून पाठविलें, “ आम्ही एकटे येथें आहोंत. फौजफाटा सरकारांत दिलाच आहे, आम्ही येथेंच पायापाशीं आहोंत. घर व सर्व जें आहे तें सरकारांत नजर आहे.” यानंतर अकस्मात् हुजरे बोलावण्यास पाठविले. बाळाजी एकाच खिजमतगारांशीं येऊन मुजरे करून बोलला. “ पायांशीं कोणती सेवा सांगणें ती आज्ञा होऊन पायांचा वियोग मात्र न व्हावा ” या एकंदर वर्तनावरून पेशवे खरे एक निष्ठ सेवक आहेत अशी शाहूची खात्री झाली. लागलीच जरीपटका शिक्के व वस्त्रें, सर्व पदाचे बहुमान आणवून वस्त्रें व प्रधानपद पुन्हां दिलें. बाळाजीनें पायांवर मस्तक ठेविलें तेव्हां शाहू म्हणाला, “ तुमची निष्ठा पाहण्याकरितां हें सर्व केलें, तुम्ही बाजीरावाचे पुत्र व बाळाजी विश्वनाथाचे नातु खरे ! तुमची सेवा व निष्ठा पाहून बहुत संतोषित झालों. ”

शाहूस दोन बायका होत्या. वडील सकवारबाई व धाकटी सगुणाबाई. सकवारबाइ हेकेखोर होती व सर्व राज्याचीं सूत्रें आपल्या हातांत असावींत असें तिला वाटत होतें. सगुणाबाई नेहमीं शाहूच्या मर्जीप्रमाणें वागत असे, त्यामुळें शाहूचें तिजवर अत्यंत प्रेम जडलें. परंतु दोन्ही बायकांपासून शाहूस मुळींच संतान झालें नाहीं; त्यामुळें शाहू अगदीं उदासीनपणानें राहूं लागला व रोजचे साधे व्यवहारही त्याचे हातून नीट होईनात. एकदां मोंगलाकडील सरदार जानराव निंबाळकर शाहूच्या भेटीस आले, म्हणून हुजऱ्यांनीं जलदी करून पागोटें आणून दिलें व म्हणाले, “ जवाहीर पोषाक घालून सरदार आले आहेत त्यांची भेट ध्यावी. ” तेव्हां महाराज बोलले “ आमचे भेटीस येणार किंवा पागोट्याच्या, ” असें म्हणून खंड्या म्हणून जवळच अत्यंत जिवलग कुत्रा होता, त्याला अलंकार

१ याची छत्री माहुलीस आहे.

घालण्याची आज्ञा करून शाहू दरबारांत तसाच बोडक्यानें भेट घेण्यास गेला. इतक्यांत हुजऱ्यानें कुत्रें आणलें त्यालाच शाहूनें आपलें पागोटें घातलें. या शाहूच्या वर्तनानें सरदारांस मोठें आश्चर्य वाटलें. खंड्या कुत्र्यानें शाहूस शिकार करीत असतांना वाघाच्या तडाक्यांतून सोडविलें होतें. तेव्हांपासून शाहूची मर्जी त्याचेवर बसली. एकदां लहरींत शाहूनें त्याला जहागिरीची सनद करून दिली व पालखीचा सरंजाम त्याचेकडे चालविला होता. शाहूनें सरदारांच्या भेटीपासून पागोटें अजीबात सोडलें. बराच वेळ त्यानें शिकारींत घालवावा असें चाललें होतें या प्रमाणें पांच सहा वर्षें लोटलीं.

इतक्यांत शाहूची लाडकी बायको सगुणाबाई क्षयानें आजारी पडली. शाहूची तिच्यावर अत्यंत प्रीति होती. ती बरी होण्यासाठीं त्यानें नाना उपाय केले. शेवटीं तिला बरोबर घेऊन शाहू देवदर्शनाकरितां जेजुरीस गेला. तेथें त्यानें बराच दानधर्म व औषधोपचार केले, पण गुण आला नाहीं. शेवटीं तें दुखणें विकोपास जाऊन शके १६७० च्या शेवटीं सगुणाबाईचा अंत झाला. तिच्या वियोगामुळें शाहूचें मन प्रपंचांतून अगदीं उडून गेलें व कांहीं दिवस तर त्याला भ्रम झाला होता. सकवारबाईच्या तापट स्वभावामुळें तर शाहूचें दुःख अतिशय झालें. याचवेळीं शाहूच्या मर्जींतील मदारी नांवाचा हत्ती मेला. तेव्हांपासून त्यानें साताऱ्यांत राहणें सोडून दिलें. माहुली व सातारा यांच्यामध्यें एक वाडी आहे तेथें तो राहूं लागला. यावरून त्या वाडीस ‘ वनवासवाडी ’ असें नांव पडलें.

शके १६७०च्या आषाढांत निजामुल्मुल्क बऱ्हाणपूर येथें वारला त्याच्या गादीवर त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा बसला. निजामुल्मुल्काचा नातू मुजफरजंग, चंदासाहेब व फ्रेंच यांनीं ऐक्य करून अर्काटचा नबाब अन्वरुद्दीन यास ठार केलें व ते हैद्राबादेवर चालून येणार असें नासिरजंगानें ऐकलें. त्यानें रघूजीची मदत मागितली व कर्नाटकांतील सर्व

मुसलमान सरदार हाताखालीं घेऊन मुजफरजंगाचें बंड मोडण्याकरितां तो कर्नाटकांत गेला. त्यामुळें निजामाच्या राज्यांत स्वारी करण्यास मराठ्यांस ही उत्तम संधि होती; पण याचवेळीं सगुणाबाईच्या मृत्यूमुळें शाहू उदासीन झाला होता, व त्याची प्रकृति हळूहळू क्षीण होत चालली. आतां आपल्यास संतान होईल ही शाहूची आशा नाहींशी झाली व त्यानें दत्तक घेण्याचा विचार केला. त्यानें मुख्य मुख्य सरदारांस साताऱ्यास बोलाविलें; त्यावरून बाळाजी पसतीस हजार फौज घेऊन साताऱ्यास गेला.

खानवटें, मुंगी, हिंगणी इत्यादि ठिकाणीं मालोजीचा भाऊ विठोजी याचे वंशज भोंसले रहात होते. त्यांपैकीं एखाद्या शाहण्या मुलास दत्तक घेण्याचें शाहूच्या मनांत होतें. इतक्यांत ताराबाई सातारच्या किल्ल्यांत बंदींत होती तिनें सांगून पाठविलें कीं, “ दुसरा मुलगा कां पाहतां ? माझा मुलगा शिवाजी याचा मुलगा रामराजा मीं गुप्तरूपें ठेविला आहे तो असतांना दत्तक कशाला ? ” यावरून शाहूनें पानगांवास रामराजाबद्दल चौकशी करण्यास गोविंदराव चिटणिसास पाठविलें. चौकशीअंतीं रामराजा खरा ठरला. मग शाहूनें त्याच्या रखवालीसाठीं पांचशें घोडेस्वार पाठवून दिले व त्यासच आपल्या मागून गादीवर बसविण्याचा विचार ठरविला. हें पाहून शाहूची थोरली बायको सकवारबाई हीस फार राग आला. रामराजा गादीवर बसल्यावर ताराबाईचें प्रस्थ माजेल; मग आपणास कोण विचारतो, असें तिला वाटलें. तिनें निराळाच एक मुलगा दत्तक घेण्याचें ठरविलें. तिनें जगजीवनराव प्रतिनिधी व त्याचा मुतालीक यमाजी शिवदेव या दोघांस आपणाकडे अनुकूल करून घेतलें. कोल्हापूरच्या संभाजीसही वश करून घेतलें व सातारच्या किल्ल्यावरील शिदीचा बंदोबस्त करून ताराबाईस विशेष प्रतिबंधांत ठेविलें. आतां शाहूची प्रकृति दिवसेंदिवस जास्त जास्त बिघडूं लागली. सकवारबाईनें शाहूभोंवतींही नीट बंदोबस्त ठेवून त्याची व बाळाजी वगैरे रामराजा-

तर्फेच्या सरदारांची गांठच पडूं न देण्याची व्यवस्था केली. एकदां तर बाळाजी शाहूच्या भेटीस आला असतां तिनें त्याजवर मारेकरी घातले होते; पण बाळाजी अत्यंत सावधगिरीनें वागत असल्यामुळें तिचा बेत फसला. शाहूचें दुखणें जास्त वाढलें, तेव्हां राज्याची आपल्या पाठीमागें व्यवस्था लावण्यास बाळाजीशिवाय दुसरा कोणी समर्थ नाहीं, असें पाहून त्यानें बाळाजीस एक स्वदस्तुरची यादी करून दिली. "कोल्हापूरचें राज्य एक करूं नये. माझे पाठीमागें रामराजास दत्तक घेऊन राज्य चालवावें, तसेंच पूर्वीप्रमाणें सर्वांचें आहे तसेंच चालवून राज्याचें संरक्षण करावें" असें तींत लिहिलें होतें. शाहूचें दुखणें अनावर झालें तेव्हां सकवाईनें त्यास राजवाड्यांत आणलें व त्याचेभोंवतीं जास्तच कडेकोट बंदोबस्त ठेविला. प्रतिनिधी व यमाजी शिवदेव यांजकडून ती सैन्य जमा करूं लागली व कोल्हापूरच्या संभाजीस फौज घेऊन तिनें लवकर बोलाविलें. तो सैन्य घेऊन निघाला; पण त्याच्या कारभाऱ्यानें 'यांत यश येणार नाहीं' असें सांगितल्यावरून त्यानें तो नाद सोडला. बाळाजी फौजबंद होताच. त्यानें सातारच्या किल्ल्यावर आपले लोक पाठवून सकवारबाईच्या लोकांस हाणून पाडून किल्ला आपल्या हातांत आणण्याची सिद्धता करून ठेविली. त्यानें रामराजाला आणण्यास पानगांवास गोविंदराव चिटणीस यास पाठवून दिलें. पुढें थोड्याच दिवसांत मार्गशीर्ष वद्य १३ स शाहू मृत्यू पावला. सर्व सरदारांस दुःख झालें. बाळाजीस तर अत्यंत वाईट वाटलें, पण सकवारबाईच्या पक्षांतील मंडळी दगा करतील अशी भीति असल्यामुळें त्याचा ताबडतोब बंदोबस्त करण्याचा पेशव्यानें निश्चय केला; शहरांत फौज पाठवून तेथें नाकेबंदी केली. यमाजी शिवदेव व जगजीवनराव प्रतिनिधी यांस कैद केलें. सकवारबाईनें पाहिलें कीं, आपला बेत ढांसळून प्रधानपंतांची सरशी झाली. आतां जीव ठेवण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून तिनें सहगमन करावयाचें ठरविलें. नंतर सर्व राजोपचार, वस्त्रें, अलंकार, जवाहीर वगर घालन दोन पालख्या तयार

झाल्या. त्यांत शाहूचें शव व सकवारबाई यांस घालून संपूर्ण मंडळी कृष्णा-वेण्यासंगमीं माहुलीस आली तेथें यथाशास्त्र सर्व विधि होऊन सकवारबाईनें सहगमन केलें. ज्या ठिकाणीं सकवारबाई सती गेली तेथें शाहूचें पाषाणाचें लिंग व सकवराबाईची मूर्ति हीं स्थापन करण्यांत आलीं. तीं अजून तेथें आहेत.

---

## ५५ सांगोल्याची स्वारी.

शके १६७२ इ. स. १७५०.



शाहूच्या मृत्यूनंतर थोड्या दिवसांनीं रामराजाला सातान्यास आणलें. इतक्यांत रघूजी भोंसले सातान्यास येऊन पोहोंचला. त्याचें म्हणणें असें पडलें कीं, ताराबाईनें रामराजाबरोबर एका ताटांत जेवण करावें म्हणजे रामराजा तिचा खरा नातु, असें मी मानण्यास तयार आहें. रामराजाबरोबर ती एका ताटांत जेवली व रघूजी भोंसलें आदिकरून मराठे सरदारांची रामराजाच्या खरेपणाविषयीं खात्री झाली. शके १६७१च्या पौष महिन्याच्या आरंभीं रामराजास राज्याभिषेक झाला. मग रघूजीस रामराजाबरोबर शाहूच्या मृत्युपत्राप्रमाणें व्यवस्था करण्याकरितां येण्यास सांगून स्वतः बाळाजी पुण्यास आला.

ताराबाई सत्तर वर्षांची झाली होती तरी तिचे अधिकार गाजविण्याची हौस मुळींच कमी झाली नव्हती. शाहूनें पेशव्यांस दिलेल्या चिठ्ठीप्रमाणें सर्व अधिकार पेशव्यांच्या हातीं गेल्यावर आपल्यास माशा मारीत बसावें लागेल, असें तिला वाटलें व पेशव्यांचा अधिकार स्थिर होण्याच्या अगोदर जुन्या मराठे सरदारांस अनुकूल करून घेऊन पेशव्यांचा नक्षा उतरविण्याचा तिनें बेत केला. सचिवाचें मन वळविण्याकरितां ती सिंहगडास गेली. माझ्या नवऱ्याच्या समाधीची पूजा करण्यास मी जाते आहें, अशी

लाकांत तिनें प्रसिद्धी केली. पण सचीव व ताराबाई यांच्या कारस्थानाची बातमी लवकरच बाळाजीस लागली. त्यानें चिमणाजी नारायण सचीव यास कैद केलें; व ताराबाईची समजूत करून तीस पुण्यास आणलें. रामराजाही पुण्यास आला. ह्या दोघांच्या संमतीनें बाळाजीनें पुढील-प्रमाणें राज्याची व्यवस्था लाविली. वऱ्हाड, गोंडवण व बंगालच्या नव्या सनदा रघूजीस करून दिल्या. अर्ध्या गुजराथेच्या सनदा यशवंतराव दाभाड्यास पाठविल्या. या सुमारास राणोजी शिंदे वारला. त्याच्या जहागिरीवर त्याचा मुलगा जयाप्पा याची नेमणूक झाली. अष्ट प्रधानांचीं, कामें पूर्वीप्रमाणें राहिलीं नव्हतीं तरी त्यांचीं इनामें कायम झालीं. रघूजी भोंसले वगैरे सरदारांच्या विनंतीवरून जगजीवन परशुराम प्रति-निधी व त्याचा मुतालिक यमाजी शिवदेव या दोघांस पेशव्यांनीं बंध-मुक्त केलें. फत्तेसिंग भोंसल्यास त्याच्या जहागिरीवर कायम केलें. अशी राज्यव्यस्था लावली इतक्यांत एक नवीनच भानगड उत्पन्न झाली.

प्रतिनिधीचा मुतालिक यमाजी याची सुटका होतांच तो पंढरपुरा-जवळ सांगोल्यास गेला; व तेथील किल्ल्याचा बंदोबस्त करून त्यान तेथें पेशव्यांविरुद्ध बंड केलें. तें मोडण्याकरितां सदाशिवराव भाऊ यास बरोबर फौज देऊन पाठविलें. यमाजी शिवदेवास इतर कोणताही सर-दार मिळूं नये याकरितां भाऊबरोबर रामराजाचीही रवानगी झाली. सांगोल्याचें ठाणें भाऊनें तेव्हांच काबीज केलें. सांगोल्याच्या मुक्कामीं असतांनाच रामराजानें 'पेशव्यांनींच सर्व राज्यांचा कारभार पहावा, आपण मुळींच राजकारणांत पडणार नाहीं, साडे पासष्ट लक्षांचा मुलूख आपल्या खाजगी खर्चाकरितां पेशव्यांनीं द्यावा म्हणजे झालें' अशी एक याद लिहून दिली, त्यावरून यापुढें सर्व कारभार पुण्यासच चालूं लागला. सांगोल्याचा बंदोबस्त झाल्यावर सदाशिवराव भाऊ रामराजासह पुण्यास आला. मग ताराबाई व रामराजे यांचा आदर करून बंदोस्तास बरो-बर त्र्यंबक सदाशिव ऊर्फ नाना पुरंदरे यांस फौजेनिशीं देऊन साता-

ऱ्यास त्यांची रवानगी केली. ताराबाईच्या प्रसन्नतेसाठीं पेशव्यांनीं सातारच्या गडावर आपले लोक ठेवले होते ते काढून फिरून पूर्वीचे गडकरी नेमले, व त्यांस ताराबाईच्या आज्ञेंत राहण्याविषयीं पेशव्यांनीं हुकूम दिला.

सांगोल्याची स्वारी चालली असतां एक नवीनच विघ्न उत्पन्न झालें व त्यामुळें पेशव्यांच्या घराण्यांत गृहकलह माजला, पण एका उदार पुरुषाच्या स्वार्थत्यागामुळें तें विघ्न नाहींसें झालें. रामचंद्र मल्हार शेणवी हा सावंतवाडी संस्थानांतील अरवळी गांवचा कुळकर्णी होता. तेथें वसुलाचें काम नीट न झाल्यामुळें तो सातान्यास पळून आला. तेथें कचेश्वर बाबा उतीतकर याच्या नोकरीस तो राहिला. त्यानें बाजीराव पेशव्याजवळ त्याची शिफारस केली. त्यावरून बाजीरावानें त्याची लष्करी व मुलकी कामांतील हुंषारी पाहून त्यास राणोजी शिंद्याचा दिवाण नेमलें. राणोजी मेला तेव्हां जयाप्पाचें व रामचंद्रबाबाचे पटेना. म्हणून जयाप्पानें त्यास दिवाणगिरी देण्याचें नाकारलें. रामचंद्रबाबानें सदाशिवरावभाऊकडून आपणास दिवाणी मिळण्याबद्दल बाळाजीस गळ घातली. पण या गोष्टीस खुद्द होळकर व जयाप्पा विरुद्ध, त्यामुळें बाळाजीनें रामचंद्रबाबास दिवाणगिरी दिली नाहीं. यापुढें रामचंद्रबाबा भाऊसाहेबाचा दिवाण झाला. सांगोल्याच्या स्वारीवर असतां त्यानें भाऊच्या मनांत बाळाजीविरुध्द बरेंच भरविलें. चिमाजीआप्पा जसे बाजीरावाचा सर्व कारभार करीत तसा मला तुमचा करूं द्या, असें बाळाजीपाशीं मागणें करण्यास सदाशिवरावभाऊस त्यानें भर दिली. महादोबा पुरंदरे हा बाळाजीचा कारभारी होता, व त्याचे बाळाजीवर फार उपकार झाले होते, तेव्हां सदाशिरावभाऊस कारभारी नेमून महादोबाचें मन दुखविणें बाळाजीस पसंत पडलें नाहीं. म्हणून त्यानें सदाशिवरावभाऊचें मागणें नाकबूल केलें. इतक्यांत सदाशिवरावभाऊस आपली पेशवाई देण्याविषयीं कोल्हापूरकर सरकारानें बोलणें काढलें व ' पांच हजारांचा सरंजाम व

तीन किल्ले देतों,' असें कोल्हापूरच्या राजाकडून पत्र आलें. सदाशिवराव-भाऊ कोल्हापुरास जाण्यास तयार झाला व पेशव्यांच्या घरांत दुफळी होण्याचा प्रसंग जवळ येऊन ठेपला. पण यावेळीं महादोबा पुरंदऱ्यानें स्वार्थत्याग करून 'मी कारभारीपद सोडण्यास तयार आहें तुम्हीं तें भाऊसाहेबास द्यावें,' असें बाळाजीस सांगितलें. कारभाऱ्याचें काम भाऊ-साहेबास मिळालें व पेशव्यांच्या घराण्यांतील दुही महादोबा पुरंदऱ्याच्या स्वार्थत्यागामुळें नाहींशी झाली.

## ५६ ताराबाईचें कारस्थान.



सांगोल्याच्या स्वारीनंतर रामराजा व ताराबाई या दोघांची समजूत करून बाळाजीनें त्यांस साताऱ्यास पाठविलें. सर्व कारभार, गोविंदराव चिटणीस, यशवंतराव खासनीस व देवराव लपाटे करूं लागले. ताराबाईस आपल्या हातांत अधिकार असावा असें फिरून वाटूं लागलें व ती रागावून साताराच्या किल्ल्यांत जाऊन किल्ला बळकावून बसली. तिची समजूत करण्याकरितां कांहीं लोक बरोबर घेऊन रामराजा गेला, तेव्हां पेशव्यांचे हातांत बाहुलें होऊन राहण्याचें सोडून स्वतंत्र रीतीनें राज्य चालविण्याचा ताराबाईनें त्याला फार उपदेश केला. पण तो मान्य न करतां रामराजा तसाच शहरांत परत आला. ताराबाईनें दमाजी गायकवाडास निरोप पाठविला "यावेळीं पेशवे निजामच्या राज्यांत गेले आहेत; तेव्हां ब्राह्मणांच्या जाचापासून राज्याचें रक्षण करण्यास ही संधि उत्तम आहे. जलदी करून साताऱ्यास यावें." दमाजीनें हें म्हणणें कबल

केलें व फौज घेऊन तो निघाला. ताराबाईनें दमाजीच्या आगमनाची खात्रीची बातमी ऐकतांच रामराजास भोजनासाठीं किल्यावर बोलाविलें. रामराजा आला तेव्हां तिनें त्याची बरीच निंदा केली व म्हणाली ' मी तुला राज्यावर बसवून फसलें. तूं माझा नातू नव्हेस. तूं भोंसल्याच्या किंवा मोहित्यांच्या कुळांतील खाचित नाहींस. तूं खास गोंधळी आहेस, तुला नातू म्हणून कबूल केल्याबद्दल मी कृष्णेंत जाऊन प्रायश्चित घेईन, तेव्हां मला कांहीं तरी बरें वाटेल. ' असें बोलून तिनें रामराजाला तेथेंच कैद करून किल्ल्यावर ठेविलें. ही बातमी कळल्यावर नाना पुरंदरे, गोविंद-राव चिटणीस वगैरे पेशव्यांकडून साताराच्या व्यवस्थेस राहिलेल्या मंडळीस या म्हातारीस वेड खचित लागलें, असें वाटलें. इतक्यांत दमाजी गायक-वाड भलें मोठ सैन्य घेऊन साताऱ्यावर चाल करून येत आहे असें त्यांस कळलें. तेव्हां त्यांना ताराबाईचें खरें स्वरूप कळून चुकलें. लागलींच नाना पुरंदऱ्यानें सैन्य जमा करून कृष्णाकांठीं अरळे गांवीं तळ दिला. दमाजी गायकवाड साल्पें घाटांतून चालून आला. नाना पुरंदऱ्यानें हल्ला केला पण तो नीट लागू झाला नाहीं. त्यामुळें दमाजीचा जय झाला व त्यास लिंबपर्यंत हटावें लागलें. दमाजीनें ताराबाईची भेट घेतली, व सातारजवळचे किल्ले तिच्या स्वाधीन केले. त्यावेळीं बाळाजी रायचूर-पाशीं कृष्णातीरीं होता; त्याला दमाजीच्या स्वारीची हकीकत कळली, तेव्हां निजामापासून दोन लाख खंडणी घेऊन तो साताऱ्यावर कूच करून आला. पण पेशवा येण्यापूर्वींच नाना पुरंदऱ्यानें दमाजीवर हल्ला करून त्यास जोरखोऱ्यास हांकून लाविलें. दमाजीस कऱ्हाडाहून प्रतिनिधी मिळणार होता व गुजराथेंतून त्याची आणखी फौज यावयाची होती परंतु कोंकणचा सुभेदार संक्राजीपंत हा आपल्या मागच्या बाजूस फौज जमवीत आहे व पुढून चारशें मैल, पेशवे तेरा दिवसांत येऊन पोहोंचले, असें पाहून दमाजी घाबरला व त्यानें बाळाजीकडे तह करण्यास एक माणूस पाठविला, बाळाजीनें तह करण्याचें कबूल केलें. दमाजी गायक-

वाडानें आजपर्यंत गुजराथच्या वसुलांतील सरकारी देण्याचा भरणा केला नव्हता. बाळाजीनें मागील सर्व बाकी चुकती करण्यास दमाजीस सांगितलें. तेव्हां त्यानें उत्तर केलें "मी काय चाकर, दाभाडे आमचे मालक, त्यांस बाकी मागा." या उद्धटपणाच्या उत्तरावरून बाळाजीनें दमाजीस कैद करून पुण्यास आवजी कवडे यांच्या वाड्यांत ठेविलें. दाभाडेही बाकीविषयीं कांहीं बोलेना, तेव्हां तळेगांवास सैन्य पाठवून यशवंतराव दाभाडे व त्याची आई उमाबाई यांस पकडून आणून होळकरांच्या वाड्यांत ठेवलें.

येणेंप्रमाणें पेशव्यांविरुद्ध बंड केल्याचें प्रायश्चित्त दमाजी गायकवाडास भोगावें लागलें. बाळाजीनें ताराबाईच्या वाटेस न जातां तिचे बेत सिद्धीस जाऊं न देण्याच्या खटपटी केल्या व त्यांत त्यास यश आलें. दमाजी गायकवाडाचा पराभव झाल्यावर ताराबाईनें निजामाचा दिवाण रामदासपंत याच्या पुतण्यास पेशवाई देण्याचें कबूल करून त्याच्याशी कारस्थान चालविलें. पण तो शके १६७४ च्या वैशाखांत ठार मारला गेला व तेंही कारस्थान फसलें. मग जगजीवनराव प्रतिनिधी आपल्यास अनुकूल होत नाहीं असें पाहून त्याला प्रतिनिधीपदावरून दूर करण्याचा तिनें बेत ठरविला व तें पद पेशव्याचा हाडवैरी बाबूजी नाईक यास देण्याचें ठरविलें. नाईक फौजेसुद्धां साताऱ्यास आले व प्रतिनिधीचे तालुके घ्यावयास गेले. तांदुळवाडीनजीक लढाई होऊन नाइकास जखम झाली व तो बारामतीस पळून गेला. ताराबाईचा त्रास अगदीं बंद व्हावा म्हणून बाळाजीनें दादोपंत वाघ यास दहा हजार फौज देऊन चंदनवंदनानजीक कायमचें ठेवून दिलें. तेव्हांपासून ताराबाईस स्वस्थ बसणें भाग पडलें.

## ५७ शाबास ! शिंदे होळकर, शाबास ! !



ताराबाई व निजामचा दिवाण रामदासपंत या दोघांचीं कारस्थानें हाणून पाडण्यांत बाळाजी गुंतला होता; त्याच वेळीं मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे या दोघा मराठे सरदारांनीं, दिल्लीच्या बादशहाच्या वजिरास सहाय्य करून मराठ्यांचें नांव सर्व हिंदुस्थानभर दुमदुमावयास लाविलें, त्याविषयींची माहिती या प्रकरणांत द्यावयाची आहे.

शके १६६९ (इ. स. १७४८)चे शेवटीं दिल्लीचा बादशहा महंमदशहा वारला. त्याच्यामागून त्याचा मुलगा अहंमदशहा शके १६७० च्या आरंभीं गादीवर बसला. त्यानें अयोध्या प्रांताचा नबाब सफदरजंग ह्यास आपला वजीर नेमिलें. यामुळें सफदरजंगाचें वजन दिल्लीदरबारीं अतोनात वाढलें. अयोध्या प्रांताच्या पश्चिमेकडे गंगेच्या उत्तरेस रोहिले लोकांचा मुलूख होता. रोहिलखंडावर या वेळीं हफीज रहमतखान रोहिला हा अंमल करीत असे, व त्याचा सेनापति दुंडीखान हा होता. त्याचप्रमाणें गंगा व यमुना या नद्यांच्या मधील प्रदेशांत—ज्यास अंतर्वेद किंवा दुआब म्हणतात—पठाण लोकांचा अम्मल असे. या पठाणांचा मुख्य कायमखान बंगष पठाण हा होता. सफदरजंगास वजिरी मिळतांच त्यानें अयोध्या प्रांतालगत राज्य करणाऱ्या पठाण व रोहिले या दोघांचाही हळू हळू नाश करण्याचा निश्चय केला. त्यानें पहिल्यानें बादशहातर्फे रोहिलखंडावर अम्मल बसविण्याकरितां नवीन फौजदार पाठविले. परंतु रोहिले लोकांचा सेनापति दुंडीखान यानें कोणत्याही फौजदाराची डाळ शिजूं दिली नाहीं. तेव्हां सफदरजंगानें पठाण व रोहिले या दोघांत फूट

पाडून त्या दोघांचा परस्पर नाश करण्याची युक्ति केली. सफदरजंग वजिराच्या फुशीवरून पठाणांचा मुख्य सरदार कायमखान बंगष रोहिल्यांवर चालून गेला. बदाऊनजवळ त्यांचें युद्ध झालें. त्यांत कायमखान ठार झाला. आपला एक शत्रु आपोआप नाहींसा झाला हें पाहून सफदरजंग वजिरास समाधानच झालें. त्यानें दुआबामधील पठाणांचा सर्व प्रांत खालसा करून आपल्या राज्यास जोडला; व त्या सर्व मुलुखाचा अम्मल आपला दिवाण नवलराय यास सांगून तो दिल्लीस निघून गेला.

परंतु या व्यवस्थेनें त्या प्रांतांत स्वस्थता झाली नाहीं. कायमखान पठाणाचा मुलगा अहमदखान बंगष यास रोहिले युद्ध करण्याविषयीं सारखे चिथावीत होते. एके दिवशीं नवलरायाच्या लोकांनीं एका पठाण स्त्रीचा अपमान केला, तेव्हां ती अहमदखानाकडे जाऊन म्हणाली, " तुझ्या समक्ष एका पठाण स्त्रीचा काफिरांनीं अपमान केला तरी तुला राग येत नाहीं ना! यापेक्षां तुझ्या बापास अल्लानें मुलगी दिली असती तर फार बरें झाले असतें ! ! " हें भाषण ऐकून अहमदखानाचा स्वाभिमान जागृत झाला. त्यानें दुआबांतील राजधानीचें शहर फरुकाबाद फिरून घेण्याचा निश्चय केला. वजिरानें त्या शहरीं एक कोतवाल ठेविला होता त्यास अहमदखानानें ठार केलें व फरुकाबादेस पुनः पठाणांचा झेंडा उभारला. सफदरजंग वजिराचा दिवाण राजा नवलराय याशीं युद्ध करून कालीनदी येथें त्याला ठार केलें. मग रोहिले व अहमदखान पठाण यांनीं एक होऊन अयोध्या प्रांतावर स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. या सर्व प्रकाराची बातमी कळतांच वजीर अगदीं घाबरून गेला. आपल्या हातचा अयोध्या प्रांतच जातो कीं काय असें त्याला वाटूं लागलें. त्यानें वेळ न दवडतां सुरजमल जाट याचें सैन्य आपल्या मदतीस घेऊन अहमदखान पठाणावर स्वारी केली. परंतु युद्धांत वजिराची फजिती होऊन त्याचा हत्तीच नाहींसा झाला. त्याबरोबर सर्व सैन्यांत गोंधळ होऊन तें सैरावैरा पळूं लागलें. खुद्द वजिरास जखमा लागल्या व त्याला

पळून जाणें भाग पडलें. पठाण व रोहिले जय मिळाल्यामुळें फुगून गेले. आतां काय आपण अयोध्या प्रांताचे धनी झालों, असें वाटून ते आनंदांत पोहूं लागले. दिल्लीस सफदरजंगाचा मत्सर करणारे लोक होतेच. त्यांसही आतां फावलें. त्यांनीं बादशहाचें मन कलुषित करून सफदरजंगास वजिरीवरून दूर करण्याचा प्रयत्न चालविला. अशा रीतीनें वजिराचा चोहोंकडे दुर्लौकिक झाला व चहूं बाजूंनीं त्याच्यावर संकटें कोसळलीं. अयोध्या प्रांत हातचा जातो, शिवाय वजिरीही हातांत रहात नाहीं अशा पेंचांत सफदरजंग सांपडला होता. अशा संकटसमयीं मराठे सरदारांची मदत मागण्याची सद्बुध्दि त्यास सुचली, त्यामुळें त्याचा बचाव झाला. इतकेंच नाहीं, तर तो पहिल्यापेक्षां जास्त वैभवास चढला.

या वेळीं मराठे सरदार मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे हे जयपूरजवळ होते. त्यांची वजिरानें भेट घेतली. मग यमुना उतरून मराठे कादरगंजाजवळ आले. तेथें दहा हजार फौजेसह एक पठाण सरदार होता. त्याचा मराठ्यांनीं तेव्हांच नाश केला. इतक्यांत अहमदखान पठाण प्रयाग प्रांतीं आश्रय करून होता. तो फरुकाबादेस आला. तेव्हां मराठ्यांनीं चाल करून लागलीच त्या शहरास मोर्चेबंदी केली, एकसारखें पंचवीस दिवस युद्ध चाललें होतें, परंतु पठाणास गंगेच्या पलीकडून रोहिले मदत करीत होते, त्यामुळें पठाणांचा पाडाव होईना. सफदरजंग वजीर मराठ्यांपासून पांच कोसांवर कनोजनजीक होता. त्यास मराठ्यांनीं गंगेस नावांचा पूल बांधण्यास सांगितलें. मग मराठ्यांची फौज गंगापार झाली व तिकडे रोहिले व पठाण मिळून तीस हजार फौज होती तिला गांठून मराठ्यांनीं तिचा फन्ना उडविला. त्याच दिवशीं रात्रीं अहमदखान पठाण फरुकाबादेंतून निसटून पळून जाऊं लागला, पण मराठ्यांनीं त्याचा पाठलाग करून त्यास अगदीं हैराण केलें. त्याचे हत्ती, घोडे, उंट, निशाणें सर्व लुटून आणलीं. अशा रीतीनें सफदरजंगाच्या शत्रूंचा नाश करून मराठ्यांनीं सफदरजंगावर उपकार केले. त्याबद्दल

शिंदेहोळकरांस पुष्कळ द्रव्य मिळालें. पण महत्वाचा लाभ म्हटला म्हणजे पेशव्यांच्या नांवानें बादशहाकडून शिंदे-होळकरांनीं एक फर्मान करून घेतलें. त्यांत मुलतान, पंजाब, राजपुताना व रोहिलखंड या सर्व मुलखांत चौथाई वसूल करण्याचा हक्क बादशहानें मराठ्यांना दिला.

या युध्दांत शिंदे-होळकरांनीं जो पराक्रम केला त्याची बातमी जेव्हां बाळाजी बाजीरावास समजली तेव्हां त्यानें एक पत्र पाठवून त्यांचें अभिनंदन केलें. त्या पत्रांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे. " शाबास तुमच्या हिमतीची ! व दिलेरी रुस्तुमीची! व शाबस लोकांची ! आमच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुनागंगापार होऊन राहिले-पठाणांशीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न झालें. तुम्ही एकनिष्ठ कृतकर्मे सेवक. या दौलतीचे स्तम्भ आहां !! पहिलीं यशावह कर्मे संपादिलींत त्याहून अधिक हें यश संपादिलेंत. या यशास जोडच नाहीं. इराणतुराणपावेतों लौकीक झाला कीं वजीर मोडला, पळाला असतां फिरून फत्तेच्या मसनदीवर बसाविला. याहून यश कोणतें अधिक आहे ! "[1]

## ५८ निजामची हड्डी जिरविली.



हैद्राबादचा निजाम प्रसिद्ध निजामुल्मुल्क वारल्यावर (सन १७४८) त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग हा हैद्राबादच्या गादीवर बसला. निजामुल्मुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन हा दिल्लीस होता. युरोपांतून व्यापाराकरितां हिंदुस्थानांत इंग्रज, पोर्तुगीज, डच वगैरे लोकांप्रमाणें फ्रेंच लोकही आले होते, व

१ काव्येतिहाससंग्रह पत्रें, यादी वगैरे, १६६

त्यांनीं कर्नाटकांत पांडिचरी येथें आपली वखार काढली होती. त्यांनीं नासिरजंग गादीवर बसल्यावर थोड्याच दिवसांनीं कर्नाटकांत गडबड करण्यास सुरुवात केली. निजामुल्मुल्क कर्नाटकाचा बंदोबस्त करण्यास गेला होता, तेव्हां त्यानें अन्वरुद्दीनाची अर्काटच्या नबाबाच्या जागीं नेमणूक केली होती. चंदासाहेब म्हणून एक इसम 'जुन्या अर्काटच्या घराण्याशीं माझा संबंध आहे व म्हणून अर्काटच्या गादीवर माझा हक्क आहे,' असें म्हणत असे. फ्रेंच लोकांचा पांडिचरी येथील गव्हर्नर डुप्ले यानें त्याला हाताशीं धरिलें. याशिवाय हैद्राबादच्या निजामीवर हक्क सांगणारा निजामुल्मुल्काच्या मुलीचा मुलगा मुझफरजंग हाही फ्रेंचांस मिळाला तेव्हां डुप्लेस अत्यंत आनंद झाला. अर्काटचा नबाब अन्वरुद्दीन ह्याशीं फ्रेंचांचें युद्ध होऊन तो मारला गेला. डुप्लेनें लागलींच चंदासाहेबास अर्काटच्या गादीवर बसविलें व मुझफरजंगास हैद्राबादची गादी मिळवून देण्याच्या प्रयत्नास डुप्ले लागला. इतक्यांत नासिरजंगास फ्रेंचांनीं उभारलेल्या बंडाची हकीकत समजली. तो ताबडतोब मोठें सैन्य जमा करून कर्नाटकांत जाण्यास निघाला, पण दुर्दैवानें त्याच्य सैन्यांत फूट पाडण्याच्या डुप्लेच्या प्रयत्नास यश आलें, व नासिरजंग मारला गेला. फ्रेंचांनीं मुझफरजंगास हैद्राबादचा निजाम केलें; परंतु तोही सैन्यांतील लोकांकडून ठार झाला. शेवटीं डुप्लेनें निजामुल्मुल्काचा तिसरा मुलगा सलाबतजंग यास निजाम केलें व मुसाबुसी यास सैन्यासह निजामच्या दरबारीं व्यवस्था ठेवण्याकरितां त्याच्याबरोबर दिलें; मग सलाबतजंग हैद्राबादेस येण्यास निघाला.

निजामाच्या राज्यांत चाललेल्या या घालमेलीकडे बाळाजी बाजीरावाचें सारखें लक्ष होतें. फ्रेंचांचें वर्चस्व झालेलें बाळाजीस मुळींच आवडलें नाहीं. निजामाचें राज्य निःसत्व झालें तर त्यांत मराठ्यांचा तोटा होता असें नाहीं. उलट तें निःसत्व करण्यासाठींच बाळाजीची सर्व खटपट होती. परंतु मधल्यामध्यें फ्रेंचांचें वाढणारें सामर्थ्य मात्र मराठ्यांस इष्ट

नव्हतें, तेव्हां हैद्राबादच्या निजामास मराठ्यांचा अंकित करून टाकण्यास बाळाजीनें निराळीच एक युक्ति काढिली. दिल्लीहून निजामुल्मुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन यास आणून हैद्राबादच्या गादीवर बसविण्याचा बाळाजीनें बेत केला. त्यानें शिंदे-होळकरांस कसेंही करून गाजीउद्दीनास दक्षिणेंत आणण्याविषयीं पत्रें लिहिलीं, व स्वतः बाळाजी सलाबतजंग हैद्राबादेस पोंचण्यापूर्वींच त्याला गांठण्यासाठीं कृष्णातीरीं रायचूरजवळ मोठ्या सैन्यानिशीं दाखल झाला. तेथें सलाबतजंगास चांगलाच दपटणार, इतक्यांत मागें एका गोष्टींत सांगितल्याप्रमाणें दमाजीच्या बंडाची बातमी त्याला समजली. त्यामुळें दोन लाखांची चिरीमिरी घेऊन त्याला साताऱ्याकडे यावें लागलें. या वेळीं बाळाजी मोठ्या संकटांत सांपडला होता, ताराबाईचीं त्याच्याविरुद्ध सारखीं कारस्थानें चाललींच होतीं. बाळाजीस आणखी एक मोठा कारस्थानी शत्रु उत्पन्न झाला. तो सलाबतजंगाचा दिवाण रामदासपंत हा होय. याचें फ्रेंचांशीं सख्य होतें व तो फार कारस्थानी होता. त्यानें ताराबाईशीं संगनमत करून पेशवेपदावरूनच बाळाजीचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न चालविला. आपल्या पुतण्यास पेशवाई मिळावी असा त्यानें ताराबाईशीं ठराव केला; व निरनिराळे मराठे सरदार बाळाजीविरुद्ध फोडून आपल्या कटांत सामील करून घेण्याचा जारीनें प्रयत्न चालविला. बाबूजी नाईक व रघूजी भोंसले तेव्हांच फुटले. खुद्द मल्हारराव होळकरास फितविण्याची त्यानें शक्कल लढविली. बाळाजीनें न डगमगतां आपल्या सरदारांत एकी राहण्याविषयीं खटपट चालविली व शिंदे–होळकरांस गाजीउद्दीनास घेऊन येण्याविषयीं निकड लाविली. शके १६७३ ( सन १७५१ ) चा पावसाळा संपतांच बाळाजी औरंगाबादेकडे गाजीउद्दीनाच्या मसलतीचें खलबत करण्याकरितां गेला. पण याच वेळीं भुसा सी व रामदासपंत यांनीं पेशव्यांच्या मुलखावरच [illegible]री करण्याचा बेत केला व निजामाचें सैन्य अहमदनगरास आलें.

ही निजामाची स्वारी एकाएकीं झाल्यामुळें मराठे सावध नव्हते. मग चाळीस हजार घोडेस्वार जमवून गनिमी काव्यानें शत्रूच्या सैन्यास जेरीस आणण्याची बाळाजीनें तयारी केली. फ्रेंचांच्या तोफखान्यामुळें मराठ्यांचा बेत सिध्दीस जाईना. एके दिवशीं रात्रीं मराठी फौजेचा तळ घोडनदीजवळ होता. त्या रात्रीं चंद्रग्रहण असल्यामुळें लष्करांतील लोक धार्मिक विधींत गुंतले होते. त्यावेळीं बुसीनें मराठ्यांवर हल्ला केला. मराठ्यांची तयारी नव्हतीच; त्यामुळें फ्रेंचांचा हल्ला चांगला लागू झाला. मराठ्यांची गडबड उडाली, व खुद्द पेशव्यांची सोन्याचीं भांडीं मोंगलांस सांपडलीं. या जयामुळें शेफारून निजामाचें लष्कर पुढेंपुढें पुण्याकडे सरकूं लागलें. परंतु मराठ्यानींही निकरानें लढण्यास सुरुवात केली. निजाम तळेगांवढमढेरे याच्यापुढें आला. मग एके दिवशीं महादजीपंत पुरंदरे आणि दत्ताजी व महादजी शिंदे यांनीं मिळून मोंगलांच्या सैन्यावर असा निकराचा हल्ला केला कीं, त्या दिवशीं निजामाचा चुराडाच झाला असता; परंतु फ्रेंचांच्या तोफखान्यामुळें निजाम बचावला. या युद्धांत कोन्हेर त्रिंबक एकबोटे नांवाच्या मराठे सरदारानें अद्भुत पराक्रम केला. त्यावरून त्याला फाकडे[1] हा किताब मिळाला व घोड्याच्या पायांत रुप्याचा तोडा घालण्याचा मान मिळाला. मराठ्यांनीं पराभव केला तरी निजाम भीमेच्या कांठच्या कोरेगांवीं आला. तेथें तहाचीं बोलणीं होऊं लागलीं; इतक्यांत कोणा एका मराठे सरदारानें त्रिंबक किल्ला घेतल्याची बातमी आली. त्यावरून सलाबतजंगानें अगोदर त्रिंबक परत मिळविण्याकरितां तिकडे चालून जाण्याचें ठरविलें. परंतु निजाम जेव्हां तिकडे जाऊं लागला तेव्हां वाटेंतील अडचणी व मराठ्यांकडून होणारा त्रास या दोन्ही गोष्टींस कंटाळला व शेवटीं तह करण्यास कबूल झाला. तात्पुरता तह करून सलाबतजंग हैद्राबादेस जाण्यास परत निघाला. तो

१ एकंदर फाकडे तीन. १ कोन्हेर त्रिंबक एकबोटे; २ मानाजी शिंदे; ३ इष्टुर फाकडे (क्याप्टन स्टुअर्ट).

तह निरुपाय म्हणून केलेला होता. त्यानें कोणाचेंच समाधान झालें नाहीं. रामदासपंत हा ताराबाई, कोल्हापूरकर वगैरेंशीं आपलीं कारस्थानें फिरून चालवूं लागला. बाळाजी बाजीरावानें केवळ निरुपाय म्हणून तह केला होता. त्यानें शिंदे व होळकर यांस एक पत्र लिहिलें आहे. त्यांत रामदासपंताच्या एकंदर कारस्थानांचें वर्णन करून तो पुढें लिहितो. "तेव्हां सलूख केला. त्रिंबक एका महिन्यानें परत देऊं असें कबूल केलें. कांहीं तुम्हांस पत्रें गेलीं आहेत तुम्हीं यालच, तुम्हीं आल्यावर तुमच्या विचारें जें होईल तें करावें. गाजुद्दीखानास आणावें, मोंगल व मराठे सर्व बऱ्हाणपुरावर येऊन भेटतील. सर्व गाजुद्दीखानास अनुकूळ पडतील. दुसरें तुम्ही तिकडून, गाजुद्दीखान दहा पंधरा हजार, आम्ही इकडून येणें-प्रमाणें मनसुबा उभा रहतांच सर्व कामें होऊन जातील. सारांश रामदास-पंतानें अब्रू घे ली ही एकदां हर तजवीज करून त्यास पुरती जरब देणें घडल्यावांचून तुम्हांस कैलासवासी यांनीं वाढविलें व तुम्ही इराणतुराण-पावेतों लौकिक केला तो सर्व व्यर्थ ! आम्हीही रायाचें वंशीं व्यर्थ जन्म घेतला. याउपरी तुम्हीं खामखा त्यास आणावें. शपथपूर्वक हा मनसब करावा, तरच उत्तम आहे."

शके १६७४ (सन १७५२) च्या आरंभीं रामदासपंत भालकी येथें मारला गेला. पेशव्यांचें पत्रही शिंदे-होळकरांस पोंचून त्यांनींही गाजीउद्दीनास घेऊन दक्षिणेकडे जाण्याचा बेत केला. शेवटीं शिंदे-होळकर गाजीउद्दीनास घेऊन निघाले. बाळाजी बाजीरावही त्यांस मिळण्याकरितां बऱ्हाणपुरा-कडे चालला. मग बाळाजी बाजीराव, शिंदे-होळकर व गाजीउद्दीनाच्या बाजूचे मुसलमान सरदार, असें दीड लाख लष्कर बऱ्हाणपुराहून गाजी-उद्दीनास घेऊन औरंगाबादेकडे चाललें. गाजीउद्दीन सलाबतजंगाचा वडील भाऊ, शिवाय दिल्लीच्या बादशहानें दक्षिणचा निजाम व्हावा म्हणून पाठविलेला, तेव्हां त्याला सहज गादी मिळणार असा रंग दिसूं लागला. तापी व गोदावरी या दोन नद्यांमधील वऱ्हाडच्या पश्चिमेचा सर्व भाग

गादीवर बसविल्याबद्दल मराठ्यांस देण्याचा बाळाजीनें गाजीउद्दीनापासून करार लिहून घेतला. सर्व जमून आलें होतें. पण एके दिवशीं रात्रीं गाजीउद्दीनानें मेजवानीचें आमंत्रण पत्करिलें. त्या वेळीं जेवणांत विष घातल्यामुळें गाजीउद्दीन मेला. त्यामुळें सलाबतजंगाची हैद्राबादच्या गादीवरून उचलबांगडी झाली नाहीं. पण गाजीउद्दीनास गादीवर बसविण्याबद्दल त्याच्याकडून मराठ्यांस जी मिळकत व्हावयाची होती ती मात्र त्यांना देणें सलाबतजंगास भाग पडलें. कारण त्या वेळीं सर्व मराठी फौजा एके ठिकाणीं जमल्या होत्या व त्यांनीं प्रसंग पडल्यास युद्ध करूनही ती मिळकत मिळविण्यास सोडलें नसतें. मुसाबुशीनें मराठ्यांशीं शांततेनेंच वागण्याचा सल्ला दिला. भालकी मुक्कामीं तह ठरला. त्यांत गाजीउद्दीनानें देऊं केलेला तापी व गोदावरी यांमधील प्रांत पेशव्यांस देण्याचें सलाबतजंगानें कबूल केलें. रघूजी भोंसल्यानें पैनगंगेच्या पलीकडे बसविलेलीं ठाणीं उठवावींत अशी अट होती ती रघूजीनें तात्काळ कबूल केली.

## ५९ राघोबाची हिंदुस्थानांत पहिली भरारी.

शके १६७५–७७ ( सन १७५३–५५ ).

भालकीचा तह झाल्यावर बाळाजीचा धाकटा भाऊ राघोबादादा गुजराथेंत अहमदाबाद घेण्याकरितां निघाला. अहमदाबादेस जवानमर्दखान बाबे म्हणून एक मोंगलांचा सुभेदार होता. तो दमाजी गायकवाडास दाद देईना. गुजराथेचा बंदोबस्त करण्यासाठीं राघोबा तीन वर्षें सारखा जात होता. पण अजून त्या प्रांतांचा बंदोबस्त झाला नव्हता. तेव्हां खुद्द अहमदाबाद आपल्या ताब्यांत घेण्याचा राघोबानें बेत केला.

त्यांच्याबरोबर सखाराम भगवंत बोकील–सवाई माधवरावाच्या वेळेचे प्रसिद्ध सखाराम बापू--हजर होता. अहमदाबादेस वेढा घातल्यावर थोड्याच दिवसांत तें शहर मराठ्यांच्या हातीं आलें. या वेढ्यांत विठ्ठल शिवदेव विंचूरकर व नारो शंकर राजेबहादर या दोघां मराठे सरदारांनीं खूपच पराक्रम गाजविला. अहमदाबादच्या वसुलासंबंधीं दमाजी गायकवाडाशीं ठराव करून व त्या शहरच्या बंदोबस्तास श्रीपतराव नांवाचा एक सुभेदार पेशव्यांच्या वतीनें नेमून राघोबा हिंदुस्थानास जाण्यासाठीं थालनेरास आला. मग माळव्यांतून राजपुतान्यांत शिरून रजपूत राजांपासून खंडणी घेत घेत राघोबा चंबळा नदी ओलांडून जाटांच्या मुलूखाजवळ आला.

शिंदे–होळकर निजामुलमुल्काचा वडील मुलगा गाजीउद्दीन यास हैद्राबादच्या गादीवर बसविण्याकरितां दक्षिणेंत घेऊन आले होते त्याला विषप्रयोग होऊन तो कसा मृत्यु पावला, हें मागें सांगितलेंच आहे. त्याचा मुलगा मीर शहाबुद्दीन या नांवाचा होता. त्यानें बाप मेल्याबरोबर आपल्यास गाजीउद्दीन असा किताब घेतला; व सफदरजंग वजिराविरुद्ध तो कारस्थानें करूं लागला. पुढें पुढें तर त्यानें उघड वैर मांडलें. तेव्हां सफदरजंगानें सुराजमल जाट यास आपल्या मदतीस बोलावून दिल्लीस वेढा घातला. सहा महिनेपर्यंत भांडून सफदरजंग कंटाळला व लखनौस गाजीउद्दीनानें वजिराविरुद्ध आपल्या साहाय्यास मल्हारराव होळकर व जयाजी शिंदे यांस बोलविलें होतें. इतक्यांत राघोबाही येऊन पोंचला. तेव्हां राघोबा, मल्हारावर होळकर व जयाप्पा शिंदे या सर्वांनीं मिळून सुराजमल जाटाच्या कुंभेरी किल्ल्यास वेढा घातला. वेढा चालूं असतां मल्हारराव होळकराचा एकुलता एक मुलगा खंडेराव–प्रसिद्ध अहिल्याबाई होळकरणीचा नवरा–मोर्चांत निशाणापाशीं सहज गेला होता. त्याची आयुष्याची मर्यादा सरली होती म्हणून बंदुकीची गोळी अकस्मात् लागून ठार झाला. मल्हाररावास मुलाच्या मरणामुळें अत्यंत दुःख झालें.

त्यानें प्रतिज्ञा केली कीं "सुराजमल जाटाचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेंत टाकीन तरच जन्मास आल्याचें सार्थक." हा होळकराचा पण ऐकून सुराजमल जाट घाबरला व आतां कसा तरी जीव वांचविला पाहिजे, असा विचार करून त्यानें जयाजी शिंद्यास शरण जाण्याचा निश्चय केला. त्यानें आपल्या दिवाणाचा मुलगा तेजराम याजबरोबर 'आजचे समयीं तुम्ही वडील बंधु व मी धाकटा बंधु आहें. कळेल त्या रीतीनें बचाव करावा' असा निरोप पाठविला व आपली पगडी त्याच्याजवळ दिली. तेजरामानें जयाप्पाकडे येऊन आपल्या धन्याचा निरोप सांगितला; व बरोबर आणलेली पगडी जयाप्पाच्या डोक्यास घालून त्याची पगडी आपण घेतली. शिंदे मोठ्या विचारांत पडला. पण शेवटीं शरणागताचें रक्षण करणें हेंच आपलें कर्तव्य (!) असें ठरवून त्यानें जाटास अभयपत्र दिलें. हें वर्तमान सुराजमल जाटास कळतांच त्याला पुनर्जन्म झाला असें वाटलें. शिंदे आंग चोरून काम करूं लागल्याबरोबर वेढ्याचें काम नीट होईना. शिवाय बाहेरून जाटास दाणा, दारूगोळा इत्यादि सामानाचा पुरवठा होऊं लागला. शेवटीं जयाप्पानें राघोबास सांगितलें कीं, 'जाट जेरीस आला आहे. सध्यां तह करून मोकळें व्हावें. एका ठिकाणीं एवढी मोठी फौज फार दिवस गुंतवून निभावयाचें नाहीं.' थोड्याच दिवसांनीं जयाप्पास मारवाडांतील एका राजाकडून साहाय्य करण्याविषयीं बोलावणें आलें तेव्हां जयाप्पानें कुंभेरीचा वेढा लवकरच संपविण्याविषयीं जास्तच नेट लाविला. या शिंद्याच्या वर्तनावरून मल्हाररावास मोठा राग आला व एव्हांपासून शिंदेहोळकरांमध्यें वितुष्ट आलें. त्यांच्यामध्यें यापुढें खरें सख्य असें केव्हांच झालें नाहीं. शिंदे आपलें सैन्य घेऊन गेल्यावर आपल्या एकट्यास जाटाचें पारिपत्य करणें जड जाईल हें मल्हारराव ओळखूनच होता. तेव्हां जाटाशीं तह करून टाकण्याची राघोबास त्यानें संमति दिली. मग जयाजी शिंद्याच्या मध्यस्थीनें साठ लक्ष खंडणी ठरून तह झाला. होळ-

कर व राघोबा उत्तरेकडे गेले व शिंदे मारवाडांत गेले. राघोबादादा पुढें आठ नऊ महिनेपर्यंत दिल्लीकडेच होता. त्यानें इतका वेळ, मराठ्यांचीं रोहिलखंडांत व अंतर्वेदींत जीं ठाणीं होतीं त्यांत अम्मल बसविण्यांत, घालविला. रोहिलखंडांत कुमाऊच्या पहाडापर्यंत एक स्वारी केली. गाजीउद्दीन वजिरास साहाय्य करून दिल्लीदरबारीं त्याचें वजन स्थिर केलें. इतकीं कामें करून राघोबा शके १६७७ च्या ( सन १७५५ ) पावसाळ्याच्या आरंभीं पुण्यास परत आला.

---

## ६० शिंद्यांचे मारवाडांतील पराक्रम.

शके १६७६--७७. ( इ. स. १७५४--५५ ).



राजपुतान्यांत जोधपुरचें एक संस्थान आहे. तेथील राजा अभयसिंह हा शके १६७६ त वारला. त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा रामसिंग हा राज्याचा वारस; पण तो जात्याच कमकुवत असल्यामुळें जोधपूरची गादी त्याचा कर्तृत्ववान् चुलतभाऊ बिजेसिंग यानें उपटली. रामसिंग आपल्या आयुष्याचे कंटाळवाणे दिवस अजमिरास घालवीत होता. शेवटीं त्याला युक्ति सुचली कीं, शिंद्यासारख्या बलिष्ठ सरदाराची मदत घेऊन आपली गादी मिळवावी. मग मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें त्यानें शिंद्याशीं बोलणें लाविलें व शिंद्यानेंही मारवाडावर स्वारी करण्याचा निश्चय केला.

जयाजी शिंदे प्रथम अजमिरास गेला. तेथें रामसिंग होता. त्याचीं व शिंद्याचीं तेथें करारपत्रें ठरलीं, जयाजीनेंही रजपुतांची मसलत आपल्या एकट्याच्या अंगावर घेतल्यामुळें तो ती पार पाडण्याविषयीं फार उत्सुक झाला होता. त्यानें आपल्या सैन्यांतील मुख्य मुख्य लोकांचा दरबार

भरवून मोठ्या वीरश्रीचें भाषण केलें. जीव गेला तरी बेहत्तर पण यश हें मिळविलेंच पाहिजे, असें त्यानें सर्व मंडळीस निक्षून सांगितलें. त्यानें सैन्याच्या दोन टोळ्या केल्या. एक त्यानें आपल्या स्वतःच्या हाताखालीं घेतली व दुसरीवर त्यानें आपला धाकटा भाऊ दत्ताजी यास मुख्य नेमिलें. अशी व्यवस्था झाल्यावर मराठी फौज अजमिराहून कूच करून निघाली. तिकडे बिजेसिंगानेंही पन्नास हजार फौज जमविली व मेडतें या गांवीं तळ दिला. मराठे मेडत्यापासून दहा कोसांवर आले तों बिजेसिंगही आपल्या सैन्याभोंवतीं तोफा लावून शिंद्यांची वाट पहात मेडत्याबाहेर येऊन बसला. इकडून जयाप्पाही चालून गेला. दोन्हीं सैन्यें कांहीं अंतरावर होतीं तोंच तोफांच्या सरबत्तीस सुरुवात झाली. बाणांचा वर्षाव पावसासारखा होऊं लागला. धुराची व धुळीची धुंदी झाली. कोणाचें तोंड कोणास दिसेना. घोडीं बिचकून स्वारांच्या हुकमांत राहीनाशीं झालीं. असा आगीचा कडाका झाला. इतक्यांत दोन्हीं सैन्यें जवळ जवळ आलीं. दोहोंकडून घोडेस्वार एकमेकांवर चवताळून चालून गेले. तोंच तरवारींचा खगखणाट होऊं लागला. रजपूत मोठ्या आवेशानें लढले. पण शेवटीं विजयश्रीनें मराठ्यांस माळ घातली. खुद्द बिजेसिंग एका खटाऱ्यांत बसून कसा तरी निसटून नागोरास गेला. मराठ्यांचे पांचसातशें लोक पडले व दीड हजार जखमी झाले. रजपुतांचे दोन हजार लोक ठार झाले.

जयाप्पानें मेडत्याची लढाई झाल्यावर नागोरास वेढा घालून बिजेसिंगास वठणीस आणण्याचा निश्चय केला; व वेळ न दवडतां नागोरास जाऊन मोर्चेबंदी केली. सर्व जमीन रेताळ असल्यामुळें सुरुंग लावून तटाला खिंडारें पाडणें शक्य नव्हतें. मोर्चेबंदी चांगली करून रसद बंद करावी म्हणजे शहर हस्तगत होईल, असें शिंद्यास वाटलें. सात आठ महिने झाले, पण शहर हस्तगत होईना. तेव्हां एके ठिकाणींच सर्व फौज

गुंतवून ठेवणें बरें नव्हे असा विचार करून आपला मुलगा जनकोजी यास बरोबर देऊन रामसिंग यास मेडतें सर करण्याकरितां पाठविलें.

ईर्षेस पडून फार नुकसानकारक अशा लढाईंत पडण्यांत अर्थ नाहीं, अशा अर्थाचीं बाळाजी बाजीरावाचीं शिंद्यास सारखीं पत्रें येत होतीं. शिवाय सफदरजंग वजिरास साहाय्य केल्यापासूनच त्याच्याकडून काशी व प्रयाग हीं दोन्ही क्षेत्रें सोडवून घेण्याविषयीं बाळाजीचा शिंद्यास आग्रह होता. परंतु तें शिंद्याच्या हातून झालें नाहीं. आतां तरी सफदर-जंगाचा मुलगा सुजाउद्दावला यास वजिरी देऊन क्षेत्रें सोडविण्याचें काम करून घ्यावें, असें बाळाजीनें शिंद्यास लिहिलें. पण तिकडे दुर्लक्ष करून नागोराचा वेढा जयाप्पानें चालविला. रजपुतांची रग जिरवून मग क्षेत्रें सोडविण्याचें जयाप्पाच्या मनांत होतें; पण तें साधलें नाहीं.

वेढ्यास सात आठ महिने झाले तरी शिंद्याची हिम्मत कायम होती; व त्यानें आपलें काम नेटानें चालविलें होतें. त्यामुळें बिजेसिंग बराच जेरीस आला. त्यानें संरक्षणाकरितां इतर रजपूत संस्थानांची मदत मागितली. शेवटीं त्यानें जयाप्पाचे नुकतेच प्रतिस्पर्धी बनलेल्या मल्हारराव होळकराचीही मदत मागितली. पण कोणीच सहाय्य करीना. तेव्हां त्यान आपला बचाव करण्यासाठीं जयाप्पाचा नीचपणानें घात करण्या-करितां तीन मारेकरी पाठविले. शके १६७७ च्या ज्येष्ठ महिन्यांत एके दिवशीं जयाप्पा स्नान करून चौरंगावर तोंडावर फडकें टाकून डोळे चोळीत होता. इतक्यांत बिजेसिंगाकडून गुप्तपणें आलेले तिघे मारेकरी घोड्यापुढें दाणे वेंचीत होते ते धांवले व एकदम दोघांनीं दोन सुरे जयाप्पाच्या कुशींत खुपसले. जयाप्पा धाडकन् जमिनीवर पडला. जवळ अबदागिऱ्या होता. तो शरीरानें धष्टपुष्ट होता. त्यानें एक मारेकरी आपल्या कवेंत धरला. दोघे पळाले. इतक्यांत लष्करांत बातमी समजून गडबड उडाली. एकजण सांपडला. दुसरा मात्र जीव घेऊन पळाला. तों त्यानें नागोर शहर गांठलें. थोड्याच अवकाशांत जयाप्पाच्या खुनाची

भयंकर बातमी दत्ताजीस कळली, तेव्हां त्यास अत्यंत दुःख झालें जयाप्पाचा अजून प्राण गेला नव्हता. त्याला डेऱ्यास नेऊन दत्ताजी शोक करीत बसला. इतक्यांत ती बातमी नागोर गांवांत गेली तेव्हां बिजेसिंगास नवीन दम चढला व तो फौजेसह मराठ्यांशीं युद्ध करण्यास निघाला. शत्रूची फौज चालून आली हें ऐकून मराठी फौजेंत जास्तच गोंधळ माजला. जयाजी शिंदे मोठ्या हिमतीचे सरदार अजून सावध होते, डोळे उघडून पाहिलें तों धाकटा बंधु दमाजी शोक करीत असलेला दिसला. तेव्हां त्यास धीर देऊन बोलले " वैरी युद्धास आला आणि तूं रांडेसारखा रडतोस ! हें क्षात्रधर्मास उचित नाहीं. आतां मजला कांहीं होत नाहीं, तुम्हीं शत्रूचा पराभव करावा. " या भाषणानें दत्ताजीस शत्रूची फार चीड येऊन तो फौजेची व्यवस्था करून रजपुतांशीं सामना देण्यासाठीं गेला. निकराचें युद्ध होऊन बिजेसिंग हटून गांवांत जाऊन बसला. मग दत्ताजी परत आला तों जयाप्पाचें प्राणोत्क्रमण झालें होतें. दत्ताजीनें फारच शोक केला. शेवटीं प्रेताचें दहन झालें. थोड्याच दिवसांत जनकोजी मेडतें सर करून आला. बापाच्या मरणाच्या बातमीनें त्याचें अंतःकरण करपून गेलें. मग दत्ताजी व जनकोजी या दोघांनीं नागोरच्या वेढ्याचें काम जोरांत चालविलें. जयाजीच्या मृत्यूची बातमी पुण्यास समजतांच बाळाजीस फार वाईट वाटलें. त्यानें दत्ताजीस सांत्वनपर पत्र लिहून अंताजी माणकेश्वरास शिंद्यांची कुमक करण्यास पाठविलें. अंताजी माणकेश्वर दहा हजार सैन्यानिशीं राजपुतान्यांत चालून गेला, व बिजेसिंगास मदत करणाऱ्या रजपूत संस्थानांत लूट करण्यास त्यानें सुरुवात केली. हा शह पोंचतांच बिजेसिंग कमजोर झाला. नागोरास अठरा महिने वेढा पडला होता. अखेरीस निरुपाय होऊन बिजेसिंगानें मराठ्यांशीं तह केला. त्यांत रामसिंगास नागोर, मेडतें वगैरे प्रांत मिळाले, व मराठ्यांस लढाईचा खर्च, अजमीर शहर व जवळचा कांहीं मुलूख मिळाला.

१ भाऊसाहेबाची बखर, पृष्ठ १५.

याच सुमारास बुंदीचा राजा वारला होता. त्याचा मुलगा लहान होता, तेव्हां इतर वारस उभे राहून राज्यांत घोंटाळा होऊं लागला; त्या लहान मुलाच्या आईनें राज्याचा बंदोबस्त करण्याविषयीं दत्ताजीचें सहाय्य मागितलें. दत्ताजीस पैसा पाहिजे असल्यामुळें त्यानें सहाय्य करण्याचें तात्काळ कबूल केलें. तेथें जाऊन बंडखोरांस कैद करून पाऊणकोट रुपये कामाबद्दल घेऊन तो उज्जनीस आला. फौजेचा पगार चुकता करून दोघे चुलतेपुतणे मर्दुमकी गाजवून विजयध्वज फडकावीत चांभारगोंद्यास आले.

## ६१ मराठी राज्याचा कर्नाटकांत विस्तार.



मराठ्यांची कर्नाटकावरील पहिली स्वारी बाजीराव पेशव्याच्या हस्तें शके १६४२ (इ. स. १७२०) त झाली. पुढें उत्तर प्रांतांतील मोहिमा करण्यांतच त्याचा काळ गेला. शके १६६२ त रघूजी भोंसल्यानें पूर्व कर्नाटकची स्वारी केली, त्यावर सदाशिवरावभाऊनें बहादुरभेंडा घेतला ती एक स्वारी झाली. शिवाजीच्या ताब्यांत जे प्रांत होते त्यांस स्वराज्य म्हणत. या स्वराज्यांत तुंगभद्रेपर्यंतचा मुलूख येऊन तिच्या दक्षिणचे शिरे, बेंगरूळ, होस्कोटे, कोल्हार व बाळापूर हे पांच परगणे व पाइनघाटांतील बारा महाल, जिंजी, वेलोर इत्यादि प्रांत व स्थळें व तंजावरपैकीं शिवाजीचा हिस्सा, इतका मोठा कर्नाटकाचा भाग अन्तर्भूत होत होता. चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य यांच्या सनदा महमदशहापासून बाळाजी विश्वनाथानें आणल्याचें मागें सांगितलच आहे. पण 'स्वराज्याची' सनद मिळाली

म्हणजे औरंगजेबानें जिंकून घेतलेलें सर्व ' स्वराज्य ' मराठ्यांच्या हातांत आलें असें नाहीं. औरंगजेबापासून मुख्य महाराष्ट्राचें मराठे रक्षण करितात तोंच शाहूची सुटका होऊन मराठ्यांची आपसांत दुही माजली. पुढें निजामुल्मुल्क हैदराबादच्या गादीवर येऊन मराठ्यांची सत्ता संपुष्टांत आणण्यास त्यानें आरंभ केला. त्यावरून बाजीराव पेशव्याचें लक्ष निजामाचा मोड करण्यांत गुंतलें. त्यानें निजामाचा पुरा मोड करून माळवा हाताखालीं घातला, व दिल्लीपर्यंत स्वाऱ्या केल्या. बाळाजी बाजीरावाचीही निम्मी कारकीर्द उत्तरेकडचा बंदोबस्त व शाहूच्या मृत्यूमुळें उत्पन्न झालेला घोंटाळा मोडण्यांत गेली. तें झाल्यावर हैद्राबादची सत्ता खिळखिळीत करून टाकण्याची बाळाजीनें खटपट केली. भालकीचा तह झाल्यावर बाळाजीस जरा स्वस्थता मिळाल्यामुळें त्यानें आपला मोर्चा कर्नाटकाकडे वळविला. शके १६७५ ( इ. स. १७५३ ) पासून दरवर्षीं मराठ्यांची स्वारी कर्नाटकावर होऊं लागली.

पेशव्यांनीं शके १६७५ पासून श्रीरंगपट्टण, होळीहुन्नूर व बेदनूर या ठिकाणांवर तीन वर्षेपर्यंत अनुक्रमानें स्वाऱ्या केल्या. शके १६७७ च्या शेवटीं बाळाजीनें सावनूरवर स्वारी केली. ही मोहीम मोठी जंगी होती. तिचें कारण असें कीं, मुझफरखान नांवाचा एक गारद्यांचा सरदार पेशव्यांच्या नोकरीस होता. तो महादजी अंबाजी पुरंदरे याजबरोबर एकदां कर्नाटकांत गेला असतां त्याशीं भांडून सावनूरच्या नबाबापाशीं जाऊन राहिला. पेशव्यानें सावनूरच्या नबाबास मुझफरखानास आपल्या स्वाधीन करण्याविषयीं मागणें घातलें. तें नबाबानें ऐकलें नाहीं तेव्हां उभयपक्षीं युद्धाची तयारी झाली. गुत्तीकर मुरारराव घोरपडे व कडपेकर्नूळचे नबाब हे सावनूरकरास मिळाले. सदाशिवरावभाऊ व बाळाजी मोठी फौज घेऊन सावनुरास आले व ताबडतोब त्यांनीं सावनुरास वेढा घातला. सलाबतजंगही सैन्यासह पेशव्यास येऊन मिळाला. सावनुरावर कित्येक महिनेपर्यंत मोठ्या जारीनें लढाई सुरू होती. शेवटीं मुराररावाच्या मध्य-

स्थीनें सावनूरकर पेशव्यास शरण आला. पूर्वी भाऊनें बहादूरभेंड्याची स्वारी केली होती त्या वेळीं सावनूरच्या नबाबापासून छत्तीस परगणे घेतले होते. या वेळीं नबाबानें मराठ्यांस आणखी कांहीं मुलूख दिला, व अकारा लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें. सोंधे व बिदनूर या दोन संस्थानांपासून खंडणी घेण्याचा आपला हक्कही त्यानें मराठ्यांस देऊन टाकिला. मग पेशव्यानें गोपाळराव गोविंद पटवर्धन यास सोंध्याची खंडणी वसूल करण्याकरितां पाठविलें; व आपण स्वतः तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं बेदनुरास जाऊन तेथील खंडणी घेऊन परत पुण्यास गेला. दहा वर्षांपूर्वी मराठ्यांच्या स्वराज्याची सरहद्द कृष्णेवर होती ती आतां तुंगभद्रेपर्यंत येऊन पोंचली.

कर्नाटकाकडे मराठ्यांचें दुर्लक्ष झाल्यामुळें त्या प्रांतीचे नबाब व पाळेगार आडदांड बनले होते. कृष्णा व तुंगभद्रा यांचेमधील दुअबांत सावनूरच्या नबाबाचा अंमल फैलावला होता. तुंगभद्रेखालीं कर्नूळ व कडप्याचे नबाब व म्हैसूरचें राज्य हीं बळावलीं होतीं. तुंगभद्रेच्या खालचे मराठ्यांच्या स्वराज्यांतील बरेच परगणे कडप्याच्या नबाबानें घेतले होते. गुत्तीस संताजी घोरपड्याच्या वंशांतील मुरारराव घोरपडे याचा अंमल होता, परंतु तो मुख्य सत्तेशीं मिळून वागत नसे. शिवाय बिदनूर, सोंधे वगैरे तद्देशीय लोकांचीं संस्थानें होतीं. पेशव्यांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या त्या वेळीं कर्नाटक प्रांताची अशी स्थिति होती.

शके १६७८ (इ. स. १७५७) च्या शेवटीं बाळाजी व सदाशिवराव, साठ हजार फौजेसह कर्नाटकच्या स्वारीस निघाले. वाटेनें त्यांस मुरारराव घोरपडे सहा हजार फौजेनिशीं मिळाला. त्यांनीं म्हैसूरचें राजधानीचें शहर श्रीरंगपट्टण यास वेढा दिला. वेढा बसण्यापूर्वी तेथील राजाचा दिवाण नंदराज यानें थोडी रक्कम घेऊन शहरास वेढा न घालण्याबद्दल पेशव्यांची फार विनवणी केली. परंतु पेशव्यांनीं त्याचें म्हणणें न ऐकतां शहरास वेढा दिला व तीस तोफांचा मारा त्या शहरावर सुरू

केला. नंदराजानेंही पुष्कळ दिवस मोठ्या नेटानें त्या स्थळाचें संरक्षण केलें. परंतु त्याचा कांहीं उपाय न चालून तें शहर काबीज होण्याच्या बेतास आलें. इतक्यांत एके दिवशीं असें झालें कीं, त्या शहरांत श्रीरंगाचें देवालय प्रसिद्ध आहे, त्याच्या शिखरास बाहेरील तोफेचा गोळा लागून शिखर मोडलें व त्याच वेळीं बाहेरच्या तोफखान्यांतील एक तोफ फुटून कित्येक गोलंदाज ठार झाले. तेव्हां उभयपक्षीं हा अपशकुन झाला असें ठरविण्यांत येऊन तहाचें बोलणें सुरू झालें त्यांत बत्तीस लक्ष रुपये खंडणी घेऊन मराठ्यांनीं वेढा उठविण्याचें कबूल केलें. नंदराजानें रोख पांच लक्ष रुपये दिले व बाकीच्या रकमेच्या फेडीबद्दल उत्तम सुपीक असे चौदा महाल मराठ्यांकडे लावून दिले. पेशव्यांनीं या चौदा महालांचा वसूल करण्याकरितां कमाविसदार नेमिले, व त्यांच्या बंदोबस्तास सहा हजार फौज ठेवून स्वराज्याचे पांच परगणे सोडविण्याचें काम हातीं घेतलें. बाळाजीनें शिरें काबीज केलें, इतक्यांत पावसाळा जवळ आल्यामुळें बाकीचे प्रांत जिंकण्याचें काम बळवंतराव गणपत मेहेंदळे या सरदारावर सोंपवून बाळाजी पुण्यास परत आला.

कडप्याचा नबाब प्रबळ होता. मराठ्यांचें त्या प्रांतांतील बहुतेक ‘ स्वराज्य ’ त्यानेंच लाटलें होतें. बळवंतरावानें आपली मोहीम भर पावसाळ्यांतच सुरू केली. कडप्याच्या नबाबानें, सावनूर व कर्नूळचे नबाब, मुरारराव घोरपडे व त्या देशींचे पाळेगार, या सर्वांस मराठ्यांविरुद्ध चेतवून आपल्या पक्षास मिळवून घेतलें. त्यानें मद्रासकर इंग्रजांसही मदतीस बोलाविलें. मराठ्यांचें जूं झुगारून देण्याची सर्वांची इच्छा होती. परंतु हे सर्व एक होण्याच्या पूर्वींच बळवंतरावानें आश्विन महिन्यांत कडप्याच्या नबाबास एकटेंच गांठलें. बळवंतरावाचा जय होऊन कडप्याचा नबाब मारला गेला व हजारों पठाणांची कत्तल उडाली. त्या नबाबाचा मुलगा हिमतीनें लढूं लागला. तरी मराठ्यांनीं

अर्धें राज्य काबीज केलें. बळवंतरावानें अर्काटच्या नबाबास खंडणी देण्याचा तगादा लाविला. मद्रासचे इंग्रज त्या नबाबाचे साहाय्यकारी असल्यामुळें त्यानें बरेच आढेवेढे घेतले. पण शेवटीं त्याला साडेचार लक्ष खंडणी मराठ्यांस द्यावी लागली.

स्वराज्याचे प्रांत सोडविल्यावर बिदनूरच्या संस्थानांत घोंटाळा माजला होता. तें संस्थान पादाक्रांत करण्याची बळवंतरावास पेशव्यांची आज्ञा होती. म्हैसूरचा नंदराज यानें, हैदर नांवाच्या एका आपल्या राज्यांतील सरदाराच्या सूचनेवरून मराठ्यास दिलेले परगणे परत घेऊन तेथें आपला अम्मल बसविला होता. तेव्हां म्हैसूरवर स्वारी करणें अवश्य होतें. पावसाळा संपल्यावर म्हैसूरवर बळवंतरावानें स्वारी करावी असा बाळाजीचा बेत होता. व गोपाळ गोविंद पटवर्धन याच्या हाताखालीं दहा हजार फौज देऊन त्यास बळवंतरावाच्या मदतीस बाळाजी पाठविणार होता; परंतु इतक्यांत महाराष्ट्रांत काम निघाल्यामुळें गोपाळरावास तर पाठवितां आलें नाहींच, पण उलट बळवंतरावास सर्व फौज घेऊन ताबडतोब निघून येण्याविषयीं हुकूम पाठवावा लागला व अशा रीतीनें कर्नाटकांतील काम अर्धवटच राहिलें.

---

## ६२ निजामच्या दरबाराशीं तंटा.



हैद्राबादचा निजाम सलाबतजंग फ्रेंचांच्या मदतीनें गादीवर बसला होता शके १६७० ( इ. स. १७४८ ). त्याच्या अंगांत विशेष कर्तृत्व नव्हतेंच. त्यामुळें डुप्लेनें त्याच्याबरोबर दिलेल्या बुसी या फ्रेंच सरदाराचें वजन अतोनात वाढलें. शिवाय बुसीजवळ कवाईत शिकलेलें सैन्य व उत्तम तोफा अस-

त्यामुळें तो म्हणेल ती पूर्वदिशा, अशी निजामच्या दरबारची स्थिति झाली होती. हा फ्रेंचांचा वाढता अधिकार सलाबतजंगाचा दिवाण शहा-नवाजखान यास नकोसा झाला होता. बाळाजी बाजीराव सावनूरच्या मोहिमेवर असतां निजाम त्याच्या मदतीस गेला होता. तेथें बुसीही बरोबर होता. बाळाजीसही निजामच्या दरबारीं फ्रेंचांची सत्ता वाढणें इष्ट नव्हतें. तुझ्या चाकरीची निजामास गरज नाहीं, असें सावनूर हातीं आल्यावर थोड्याच दिवसांनीं बुसीस कळविण्यांत आलें. तेथें बुसी शत्रूंच्या तावडींत सांपडल्यामुळें त्याला मुकाट्यानें आपला रस्ता सुधारणें भाग पडलें. बुसीनें सावनुराहून निघतांच आपली स्थिति पांडिचरीस कळविली व आणखी सैन्य मदतीस बोलाविलें, व हैद्राबादेस जाण्याचा त्यानें निश्चय केला. बुसी निघाला तेव्हां त्याच्या पाठलागास जानोजी निंबाळकर व रामचंद्र जाधव यांना नेमिलें. त्यानीं सुरतेहून बुसीच्या मदतीस येणाऱ्या सहाशें सिद्दी लोकांची त्रेधा उडविली. शेवटीं बुसी हैद्राबादेस पोंचला. तेथें त्याच्याभोंवतीं जमलेल्या मोंगल सैन्यापासून त्याला आपलें संरक्षण करावयाचें होतें. त्यानें निजामाकडील रामचंद्र जाधव व जानोजी निंबाळकर या दोघां मराठे सरदारांस युक्तीनें आपल्या बाजूकडे वळविलें. इतक्यांत मच्छलीपट्टणाहून निघालेलें सैन्य त्याच्या मदतीस येऊन पोंचलें. त्याबरोबर सलाबतजंगानें त्याशीं समेट केला. व यापुढें निजामच्या दरबारांत फ्रेंचांच्या सल्ल्याशिवाय एक पानसुद्धां हलेनासें झालें.

शके १६७८ ( इ. स. १७५६ ) च्या शेवटीं फ्रेंचांस निजामच्या राज्याच्या पूर्वेस उत्तरसरकार हा प्रांत मिळाला होता. त्याची व्यवस्था लावण्यास बुसी गेला. तो गेल्यावर शहानवाजखानानें रामचंद्र जाधवापासून मागें फ्रेंचांस मदत केल्याबद्दल बरीच जहागीर हिसकून घेतली. यापुढें शहानवाजखान व बाळाजी बाजीराव या दोघांनीं एक गुप्त मसलत योजिली. सलाबतजंगास दोघे भाऊ होते. एक बऱ्हाणपूरचा सुभे-

दार निजामअल्ली व दुसरा अदोनीचा सुभेदार बसालतजंग. त्यांपैकीं बसालतजंग शके १६७९ च्या पावसाळ्यांत सलाबतजंगाजवळ राहिला होता. व त्या दोघां भावांनीं पावसाळ्यांत औरंगाबादेस ठाणें दिलें होतें. पेशवे व शहानवाजखान या दोघांसही सलाबतजंगाच्या कमकुवतपणामुळें तो गादीवर आहे तेथवर फ्रेंचांस घालवून देणें अशक्य आहे, असें वाटूं लागलें होतें. व म्हणून त्यांनीं अशी मसलत काढली कीं, सलाबतास दौलताबादच्या किल्ल्यांत कैदेंत टाकावयाचें, बसालतजंग किंवा निजामअल्ली यांपैकीं एकास गादीवर बसवावयाचें व मग फ्रेंचांची हकालपट्टी करावयाची.

या मसलतीप्रमाणें निजामच्या लष्करांतील शिपायांनीं, आमच्या पगाराची बाकी द्या व शहानवाजखानास दिवाणगिरीवरून काढून बसालतजंगास दिवाण नेमा, अशी मागणी करून एक खोटेंच बंड उभारलें. सलाबतजंगानें त्यांच्या म्हणण्याप्रमाणें करण्याचें ठरविलें. तरी सैन्यांतील दंगा मोडेना. शहानवाजखानास दौलताबादेच्या किल्ल्याचा आश्रय करावा लागला. तेथें सैन्यानें वेढा घातला. व शहानवाजखान स्वतःचा बचाव करूं लागला. दौलताबादेस सलाबतजंग शहानवाजखानाचें सांत्वन करण्याकरितां जाईल व मग तेथें त्याला पकडून ठेवणें सोईचें होईल अशी ही मसलत होती. परंतु कांहीं हितचिंतकांनीं वेळींच इशारा दिल्यामुळें सलाबतजंग दौलताबादेस गेला नाहीं. शहानवाजखान किल्ल्याचें रक्षण करण्याकरितां दारू गोळा साठूं लागला. सलाबतजंगानें शहानवाजखानाचं रक्षण करण्याचें कबूल केलें. परतु त्यानें किल्ला न भांडवितां शरण यावें असा आग्रह धरला. शहानवाजखान शरण न येतां किल्ला भांडविण्याची जास्तच तयारी करूं लागला. अशी ही मसलत बदलली. शहानवाजखानानें आपलें रक्षण करण्याविषयीं बाळाजीस लिहिलें. निजामानें किल्ला घेण्यासाठीं आपला भाऊ निजामअल्ली यास ब-हाणपुराहून बोलाविलें. इतक्यांत बाळाजीनें निजामच्या दरबारीं

कारस्थानें चालवून दौलताबादचा वेढा उठविला व निजामअल्लीस परत जाण्याविषयीं निजामाकडून लिहविलें. यावेळीं त्यानें, मराठ्यांची फौज आपला मुलगा विश्वासराव व जनकोजी व दत्ताजी शिंदे यांच्या हाताखालीं गोदावरीच्या दक्षिणतीरीं ठेवून दिली होती. निजामानें परत जावें असें लिहिलें तरी निजामअल्ली परत न जातां तसाच औरंगाबादेस आला. खालून रामचंद्र जाधवही निजामच्या सैन्यास मिळण्याकरितां वर जाऊं लागला. निजामचें सैन्य एकत्र जमूं लागलें असें पाहतांच विश्वासरावानें रामचंद्र जाधवाच्या सैन्यावर एकदम हल्ला करून त्याला शिंदखेडांत कोंडलें. याची बातमी औरंगाबादेस पोंचल्यावर सलाबतानें स्वतः न हालतां निजामअल्लीस रामचंद्राच्या मदतीस पाठविलें. शिंदखेडाजवळ निजामअल्ली येतांच त्याची व मराठ्यांची निकराची लढाई झाली. तींत दत्ताजी शिंद्यानें अतिशयच पराक्रम केला. निजामअल्लीचा मोड होऊन त्यानें तहाचें बोलणें लाविलें. या तहानें मराठ्यांस पंचवीस लक्ष रुपयांचा मुलूख मिळाला. निजामाच्या राज्यांत राज्यक्रांति घडवून आणण्याचा बेत जरी सिद्धीस गेला नाहीं तरी मराठ्यांस मुलूख मिळून फायदा झालाच. शिवाय राज्यक्रांतीचा मुख्य उद्देश जें फ्रेंचांचें उच्चाटन तें थोड्याच दिवसांनीं आपोआप घडून आलें. मद्रासकडे फ्रेंचसत्तेच्या जीवावरच बेतल्यामुळें बुसीस निजामच्या दरबारांतून परत बोलावण्यांत आलें; व तिकडे पुढें थोड्याच दिवसांनीं इंग्रज व फ्रेंच यांची वांदिवाश येथें लढाई होऊन त्यांत फ्रेंचांचा सपशेल पराभव झाला.

## ६३ भगवा झेंडा अटकेवर फडकतो !

शके १७८० ( सन १७५८ ).

दिल्लीचा वजीर गाजीउद्दीन याचें मराठ्यांच्या साहाय्यामुळें मोठें प्रस्थ माजलें. तो अहमदशहास आपल्या मनाप्रमाणें वागण्यास लावी. तें त्या बादशहास मुळींच आवडेना व बादशहा गाजीउद्दीनाचा मोड करण्याच्या मसलती करूं लागला. हें गाजीउद्दीनास कळतांच त्यानें त्या दुर्दैवी बादशहास ठार केलें, व अलमगीर हें नांव देऊन एक नवीनच बादशहा गादीवर बसविला. या नव्या बादशहाशींही गाजीउद्दीन मोठ्या अरेरावीनें वागत असे. गाजीउद्दीनाच्या अरेरावीमुळें त्याच्या हाताखालचे लोकही कंटाळले. त्यानेंच प्रसिद्धीस आणलेला नजीबखान रोहिला त्याच्याविरुद्ध कारस्थानें करूं लागला. त्यानें अफगाणचा बादशहा अहमदशहा अबदाली यास गाजीउद्दीनाचें पारिपत्य करण्याकरितां बोलाविलें. अबदालीनें पूर्वीच्या स्वारींत लाहोर व मुलतान हे दोन प्रांत घेतले होते; ते वजीर गाजीउद्दिनानें परत घेतले होते. तेव्हांपासून अबदाली स्वारी करून येणारच होता. तो शके १६७८ (सन १७५६) चा पावसाळा संपतांच हिंदुस्थानांत उतरला. त्यानें आल्याबरोबर अगोदर लाहोर व मुलतान हे प्रांत हस्तगत केले, व सतलज नदी उतरून सरहिंदास आला. वजीर अगदीं घाबरून गेला. अबदालीनें दिल्लीवर चाल करून बादशहा व गाजीउद्दीन या दोघांसही कैद केलें, व शहर लुटलें.

अहमदशहा अबदाली हिंदुस्थानांत आला ही बातमी ऐकतांच बाळाजी बाजीरावानें राघोबा गुजराथेंत होता त्यास उत्तर हिंदुस्थानांत

चालून जाऊन अबदालीचें पारिपत्य करण्याविषयीं लिहिलें. त्याप्रमाणें राघोबा सखारामबापूसह उत्तरेकडे जाण्यास निघाला. वाटेंत इंदुरास मल्हारराव होळकर त्याला मिळाला. अबदालीचें पारिपत्य चांगल्या रीतीनें करतां यावें म्हणून दत्ताजी शिंद्याची रवानगी लवकर करून देण्याबद्दल राघोबानें बाळाजीस लिहिलें. राघोबा उत्तरेकडे जात असतां अबदाली दिल्लीहून खालीं आला. त्यानें मथुरा लुटली व आग्र्यास वेढा घालून तो किल्ला हस्तगत केला. यापुढें, बंगाल प्रांत घेऊन दक्षिणेवर स्वारी करण्याचा त्याचा बेत आहे, अशा बातम्या उठल्या होत्या. त्यामुळें चहूंकडे गडबड उडून गेली होती. पण अबदालीच्या लोकांस इकडला उन्हाळा सहन न झाल्यामुळें अबदाली उन्हाळ्याच्या आरंभींच परतला. त्यानें आग्र्यापुढें न येतां दिल्लीस जाऊन अलमगिरास गादीवर बसविलें. गाजीउद्दीनास वजीरी सांगून व नजीबखानास बक्षीगिरी देऊन तो परत स्वदेशास जाण्यास निघाला. नवीन जिंकलेल्या लाहोर व मुलतान या प्रांतांवर आपला मुलगा तैमूरशहा यास नेमून तो अफगाणिस्थानांत परत गेला.

अबदाली अगोदर परत गेल्यामुळें राघोबादादास त्याच्या स्वारीमुळें दिल्लीदरबारांतून मराठ्यांचें वजन उठलें होतें तें फिरून स्थापित करण्याचें तेवढें काम राहिलें. दिल्लीस गेल्याबरोबर नजीबखानाची खोड मोडण्याचा राघोबाचा बेत होता. पण नजीबाचें होळकराशीं सूत होतें. नजीबानें राघोबा दिल्लींत यावयाच्या अगोदरच तेथून पोबारा केला. तरी तो मराठ्यांच्या हातांत सांपडला असता. पण मल्हाराव होळकराची त्यास अंतस्थ मदत असल्यामुळें तो बचला. राघोबादादा पावसाळा लागण्याच्या सुमारास दिल्लीस येऊन पोंचला. त्यानें तो सबंध पावसाळा दिल्ली दरबारीं गाजीउद्दीनाच्या मदतीनें बंदोबस्त करण्यांत घालविला. पुढें त्याचा काशी, प्रयाग घेऊन बंगालवर चालून जाण्याचा विचार होता. परंतु लाहोर व मुलतान हे परगणे अबदालीच्या हातांतून

अगोदर सोडविण्याचें ठरल्यामुळें तो बेत राहिला. मग राघोबा लाहोरकडे चाल करून गेला. तो पोंचण्याच्या पूर्वींच तैमुरशहानें भिऊन अफगणिस्थानांत पळ काढला. म्हणून तो प्रांत घेण्यास मराठ्यांस कांहींच श्रम पडले नाहींत. तो प्रांत घेऊन अबदालीनें नेमलेल्या आदिनाबेगासच आपल्यातर्फे कारभारी नेमिलें; व त्यांच्या मदतीस कांहीं मराठी फौज ठेविली. ही स्वारी म्हणजे मराठ्यांच्या राज्यवैभवाच्या मंदिराचा कळसच होय ! या वेळीं कृष्णाकांठचे घोडे हिंदुस्थानच्या उत्तर सीमेवरील अटक नदीचें पाणी प्याले व मराठ्यांचा भगवा झडा हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर फडकला ! या स्वारींत मराठी लष्कराची फारच चंगळ झाली. पेंढारी व लष्कर केवळ कुबेर बनलें. राघोबाच्या भोळेपणामुळें या स्वारींत पेशव्यास मात्र काडीचेंही उत्पन्न न होतां उलट एक कोट रुपये राघोबादादांस कर्जच झालें. लाहोरची स्वारी होते तोंच पावसाळा जवळ येऊन ठेपला; त्यामुळें राघोबा पुण्यास परत येण्यास निघाला. निघतांना अंताजी माणकेश्वरानें राघोबास सांगितलें कीं, अबदाली पुढल्या वर्षी खात्रीनें येईल. तुम्ही सरहद्दीचा नीट बंदोबस्त करून जा. परंतु पावसाळा फारच निकट आल्यामुळें राघोबास तसेंच पुण्यास परतणें भाग पडलें. राघोबा परत जात असतां त्याला वाटेंत पहिल्यानें जनकोजी शिंदा भेटला. त्यास राघोबानें एकांतीं मोठ्या कळकळीनें सांगितलें " नजिबखान रोहिला याचें पारिपत्य करा व त्यास जिवंत सोडूं नका. " शिंद्यानें दादांचें म्हणणें कबूल केलें. पुढें दत्ताजी शिंदे याचीही गांठ पडली. त्यासही मोठ्या आग्रहानें नजीबाचें पारिपत्य करण्याविषयीं दादानें सांगितलें.

पुढें जनकोजी व दत्ताजी या दोघांसही मल्हारराव होळकर भेटला. त्यानें त्या दोघांसही राघोबाच्या उलट उपदेश केला. " बाबा तुमचा मूळ स्वभाव. अटकेपासून रामेश्वरापर्यंत एकछत्री राज्य झालें. हिंदुस्थानांत एक नजीबखान मात्र खळी राहिला आहे. त्याचें पारिपत्य केल्यास

पेशवे जासुदाच्या हातून अटकेपासून पैसे आणवितील. मग तुम्ही आम्ही सहजच निर्माल्यवत् झालों. मग कोणी पुसणार नाहीं यास्तव येवढा खळी रक्षून काय करणें तें करावें. स्वारीस आतां आम्हांस मुलूख कोणता असें विचाराल तर नजीबखानाच्या साहाय्यानें भागिरथीस पूल बांधून खुशाल बंगालवर स्वाऱ्या करा. पण हें न करतां जर तुम्ही नजीबखानाचें पारिपत्य कराल तर पेशवे तुम्हास धोतरें बडवायास लावितील हें पक्कें लक्षांत ठेवा. " पूर्वी शिवाजीच्या वेळीं 'मराठा तेतुका मेळवावा' असा दिव्य उपदेश श्री समर्थ रामदासस्वामी यांनीं शिवाजीस केला. व त्याप्रमाणें वागून शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली. पण आतां मल्हाररावनें 'मराठी राज्याच्या विरुद्ध कां होईना पण आपला स्वार्थ साधून घ्या व मराठी राज्याचा शत्रु नजीबखान याचें केवळ स्वार्थ साधण्यासाठीं रक्षण करा,' असा कानमंत्र शिंद्याच्या कानांत सांगितला. जनकोजी शिंद्यास हा कानमंत्र मुळींच रुचला नाहीं. दत्ताजी शिंद्यास मात्र मल्हाररावाचें बोलणें खरें वाटलें; व त्यानें नजीबखानाचें रक्षण केलें, त्यामुळें दत्ताजी तर प्राणास मुकलाच. शिवाय पानिपताचा भयंकर प्रसंग मराठी राज्यावर कोसळून हिंदुपदपादशाही स्थापन करण्यासाठीं अटोकाट मेहनत करणाऱ्या बाळाजीस वेड लागून " भाऊ भाऊ " करीत पर्वतीवर प्राण सोडावा लागला ! ! आणि हिंदुपदपादशाहीचा बेत अशक्य कोटींतील होऊन बसला. या कानमंत्राप्रमाणें दत्ताजी शिंदे वागला, व त्यानें आपल्या स्वतःचा नाश कसा करून घेतला याचा वृत्तांत पुढें येईलच. पण हा कानमंत्र म्हणजे मराठेमंडळांत पडलेल्या दुहीचें उत्तम उदाहरण आहे. ही दुही व मत्सर पानिपतास मराठ्यांस कशी भोंवली त्याचेंही वर्णन पुढें येणारच आहे.

---

१ भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ ३९.

## ६४ अर्धी दक्षिण सर झाली !

उद्गीरची लढाई, शके १७८२ ( सन १७६० ).



रघुनाथराव अटकेवर मराठी अंमल बसवून आला. स्वतः बाळाजीनें श्रीरंगपट्टणावर चाल करून बराच कर्नाटक घेतला. महाराष्ट्रांत विश्वासराव व शिंदे मंडळींनीं निजाम जेरीस आणला. अशी या वेळीं मराठ्यांची चोहोंकडे फत्ते होत होती. याच सुमारास बाळाजी व सदाशिवरावभाऊ यांच्या मनांत प्रचंड कल्पना घोळूं लागल्या. सर्व हिंदुस्थानभर एक दोन वर्षांत मराठी साम्राज्य पसरविण्याचा त्यांनीं बेत केला. या मसलतीस अनुसरून त्यांनीं दत्ताजीस लाहोरचा बंदोबस्त करून काशी, प्रयाग, बंगाल या प्रांतांकडे वळण्याविषयीं सांगितलें. दत्ताजी प्रयागास येतो न येतो तोंच राघोबानें त्यास जाऊन मिळावें व दोघांनीं मिळून बंगाल आसमुद्र जिंकून टाकावा असें त्यांनीं ठरविलें. सुजाउद्दवल्यानें साहाय्य केल्यास अर्धा प्रांत त्यास द्यावा असाही त्यांचा संकेत होता. हिंदुस्थान सोडविण्याचें काम दत्ताजी, जनकोजी व राघोबा या तिघांवर सोंपवून दक्षिणचा बंदोबस्त करण्याचें काम, बाळाजी, सदाशिवराव व विश्वासराव या तिघांनीं आपल्या अंगावर घेतलें. शके १६८२ ( इ. स. १७६० ) त सगळी दक्षिण मोकळी करण्याचा पेशव्याचा बेत होता. अगोदर निजामास चांगलाच चेंपून त्याला होता कीं नव्हतासा करून टाकावयाचा व मग श्रीरंगपट्टणाकडे वळून तें राज्य काबीज करावयाचें असा हा संकल्प होता.

हैद्राबादेस निजामअल्ली दिवाण झाला होता. व राज्याचा सर्व कारभार तोच पहात असे. त्यानें शिंदखेडची लढाई झाल्यावर मराठ्यांस

दहा लाखांचा मुलूख व नगर आणि परिंडा हे दोन किल्ले देण्याचा करार केला होता, पण तो आतां मुलूख व किल्ले देईना. तेव्हां मराठ्यांस लढाई करणें भाग पडलें. बाळाजीनें या वेळीं निजामास चांगलाच चोप देण्याचा निश्चय केला. सदाशिवरावभाऊ शके १६८१ च्या दसऱ्यास डेरेदाखल होऊन फौज जमा होईपर्यंत गारपिरावर डेरे देऊन होता. इतक्यांत अहमदनगरचा किल्लेदार कविजंग याशीं भेद करून विसाजी कृष्ण बिनीवाल्यानें तो किल्ला घेतल्याची बातमी आली. यामुळें मराठ्यांच्या बाजूस जास्त उत्तेजन आलें. बाळाजी नगरकडे गेला व सदाशिवराव राक्षसभुवनकडे गेला. निजामअल्ली आतां ती जहागीर व किल्ले देण्यास तयार झाला. पण आतां पेशवे त्याचें म्हणणें बरें ऐकतील ? तेव्हां लढाईस उभें रहाणें निजामास भाग झालें. यावेळीं निजामाची मोठी हलाकीची स्थिति होती. मुसाबुसी त्याला सोडून पांडिचरीस गेला, व इब्राइमखान गारदी भांडून त्याच्याकडून निघून आला, त्यास सदाशिवरावानें आपल्या चाकरीस ठेविलें.

निजामाचें बरेंच सैन्य धारुरास जाऊन बसलें व स्वतः सलाबतजंग व निजामअल्ली हे तोफखाना व सात आठ हजार सैन्यासह उदगिरावर राहिले. तेथें त्यांच्या व मराठी सैन्याच्या चकमकी चालल्या होत्या. मग ते दोघे भाऊ आपल्या धारूर येथील सैन्यास मिळण्याकरितां चालले. इब्राइमखान गारदीच्या तोफखान्याचा त्यांच्या सैन्यावर फार मारा होऊं लागला. निजामाचें सैन्य अगदीं त्रासून गेलें. मग मरूं कीं मारूं अशा निराशेमुळें उत्पन्न झालेल्या धैर्यानें त्यांनीं इब्राइमखानाच्या पलटणांवर मोठ्या जोराचा हल्ला केला. त्यामुळें इब्राइमखानाच्या लोकांत बरीच चलबिचल झाली. इतक्यांत मराठे घोडेस्वारांनीं निजामाच्या उजव्या बाजूवर शोकतजंग म्हणून एक सरदार होता त्याच्या पथकावर चाल करून तीन हजार माणूस लोळविलें. या लढाईंत निजामाचे अकरा हत्ती, पंधरा तोफा इतकें सामान मराठ्यांस सांपडलें. निजा-

मअल्ली अतिशयच घाबरून गेला. त्यानें भाऊकडे आपले सही शिक्के पाठवून देऊन 'तुमच्या मर्जीस येतील त्या शर्तींवर तह करा,' असें बोलणें लाविलें. मग उभयपक्षीं तह ठरला. त्यांत आशिरगड, बऱ्हाणपूर, दौलताबाद, सोल्हेर व मुल्हेर व नगर असे सहा किल्ले मराठ्यांस मिळाले व साठ लक्षांचा मुलूख मराठ्यांच्या हस्तगत झाला. येणेंप्रमाणें फत्ते होऊन निजामाचा बहुतेक प्रांत पेशव्यांस मिळाला. निजामाचा पुरताच नक्षा उतरला व पेशव्यांचें कीर्तितेज वृद्धिंगत होऊं लागलें. सदाशिवराव-भाऊनें दक्षिण सोडविण्यापैकीं अर्धें काम करून टाकलें व आतां श्रीरंग-पट्टणच्या तजविजीस तो लागणार होता. परंतु उत्तरेकडे अबदालीनें येऊन शिंद्याचा पराभव केल्यामुळें शिंद्यास मदत करणें पेशव्यांस भाग पडलें व दक्षिण सोडविण्याचा बेत तूर्त बाजूस ठेवावा लागला. तो गोविंद-पंत बुंदेल्यास लिहितांना म्हणतो, "या झुंझानें मोंगलांत बाकी न राहतां साठ लक्षांची जहागीर व सदर्हूप्रमाणें स्थळें घेतलीं. याउपरी इकडील गुंता उरकला. चिरंजीव राजश्री दादा दरमजल त्या प्रांतीं येतील. इकडे मुलूख स्थळें चांगलीं मिळालीं. पण खर्च झाला. कर्नाटकचीं स्वारी न झाली. तिकडेही अबदालीचा पेंच. पैका मिळायाचें झालें नाहीं. तिकडील पेंचामुळें इकडे आटोपावें लागलें. नाहीं तर सारी दक्षिण मोकळी होती."[1]

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १ लेखांक १६६.

## ६५ विश्वासघातकी नजीबानें पुरता दगा दिला !!

दत्ताजी शिंदे जेव्हां हिंदुस्थानांत जाण्यास निघाला तेव्हां बाळाजीनें त्याला पुढीलप्रमाणें कामगिऱ्या सांगितल्या होत्या. लाहोर प्रांताचा योग्य बंदोबस्त करावा, नजीबखान रोहिल्याचें पारिपत्य करावें; व सुजाउद्दवल्याच्या मदतीनें बंगालवर स्वारी करावी. यांतील पहिली कामगिरी करण्यास दत्ताजीनें शके १६८१ च्या आरंभीं सुरुवात केली. तो सतलज नदीपर्यंत गेला, व तेथून साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी या दोघां मराठे सरदारांस लाहोरकडे पाठवून तो स्वतः बंगालच्या कामगिरीकरितां परत आला. सुजाउद्दवल्यानें, ‘ मला दिल्लीची वजिरी द्या, मी तुम्हांस पन्नास लक्ष रुपये देतों, ’ असें दत्ताजीशीं बोलणें लाविलें. तसेंच नजीबखान रोहिलाही बक्षीगिरी मिळाल्यास तीस लक्ष रुपये देण्यास तयार झाला. दत्ताजीनें त्या दोघांचेंही म्हणणें बाळाजी-पुढें मांडलें. त्या दोन्ही मसलती बाळाजीस पसंत पडल्या नाहींत. नजी-बखानासंबंधीं तर बाळाजीनें शिंद्यांस मोठें खरमरीत पत्र लिहिलें. “ नजीबखानास बक्षीगिरी दिल्यास तीस लाख रुपये देतों म्हणून लिहिलें. ऐशियास नजीबखान पुरा हरामखोर आहे. गुदस्तां चिरंजीव दादांशीं त्याची कांहीं मजा राहिली नाहीं. तो दिल्लींत प्रविष्ट झाल्यास अबदालीचेंच दिल्लींत पक्कें ठाणें बसलें असें जाणावें. बेमान हरामखोर आहे. त्यास वाढविणें सर्पास दूध पाजल्याप्रमाणें आहे. फावेलमानी त्यांचें पारिपत्यच करावें. नजीबखान बाट अर्धा अबदाली त्यांचें राज-कारण न करावें. ” असा पेशव्याकडून टोमणा आला. तरी मल्हार-रावानें केलेला दुष्ट उपदेश शिंद्याच्या डोक्यांत असल्यामुळें त्यानें नजीब-

खानाशीं सलोखा करण्याचा निश्चय केला, व त्याचीच मदत घेऊन सुजाउद्दवल्यावर स्वारी करावी व तसेंच पुढें बंगाल्यावर चालून जावें, असा शिंद्यानें घाट बांधला. नजीबखान अगदीं हलाखींत होता. त्याला शिंदे आपल्याशीं समेट करण्यास तयार आहेत असें कळतांच तो दत्ताजीच्या भेटीस आला. त्यानें गोड बोलून दत्ताजीस खूष केलें, व अयोध्येवर स्वारी करण्यासाठीं एक महिन्याच्या आंत शुक्रतालजवळ गंगेस पूल बांधून देण्याचें त्यानें कबूल केलें, व तो निघून गेला. दत्ताजी नजिबावर अगदीं खूष झाला. पण त्याला नजिबाचे खोल बेत कोठें माहित होते? नजीबखानानें दत्ताजीस वरकरणी नम्रपणा दाखवून खुशाल सुजाउद्दवल्याशीं आंतून सूत्र चालूं ठेविलें, व मराठ्यांस हांकून देण्यासाठीं त्याला अत्यंत लवकर येण्यासाठीं आग्रह केला. इतकेंच करून तो विश्वासघातकी नजीब थांबला नाहीं. त्यानें खुद्द दिल्लीच्या बादशहाकडून अबदालीस हिंदुस्थानावर स्वारी करण्यासाठीं बोलाविलें. एक महिना झाला तरी पूल पुरा झाल्यासंबंधीं नजिबाकडून कांहींच बातमी येईना, तेव्हां दत्ताजीनें त्याला लवकर काम संपविण्याविषयीं लिहिलें. त्यावेळीं सुजाउद्दवल्याशीं चाललेलें राजकारण पक्कें असल्यामुळें पावसाळ्यानंतर पाहून घेऊं, असा नजिबानें दत्ताजीस निरोप पाठविला.

हा निरोप ऐकतांच दत्ताजीच्या तळव्याची आग मस्तकास गेली. नाजिबाच्या नीचपणाचा आतां त्याला प्रत्यक्ष अनुभव आला. त्यानें त्याचें पुरतें पारिपत्य करण्याचा बेत केला. कुंजपुऱ्यास जाऊन त्यानें यमुना ओलांडली व तो अन्तर्वेदींत आला. नजीबास इटाव्याकडून शह देण्यास त्यानें गोविंदपंत बुंदेल्यास लिहिलें. मग अन्तर्वेदींतला नजीबाचा प्रांत घेऊन तो शुक्रतालास गंगा नदी उतरून खुद्द रोहिलखंडांत आला. इतक्या अवधींत गोविंदपंतानेंही गंगा उतरून जलालाबादेस ठाणें दिलें. मग ते दोघे नजीबास मध्यें चेपणार तोंच सुजाउद्दवल्याची फौज नजीबाच्या सहाय्यास येत आहे अशी बातमी आली. सुजाउद्दव-

त्याच्या फौजेस नजीबखानास मिळूं न देण्याचा बंदोबस्त करण्याविषयीं दत्ताजीनें गोविंदपंतास लिहिलें; पण गोविंदपंताच्या हातून तें काम झालें नाहीं. सुजाउद्दवला व उमरावगीर गोसावी हे दोघे दहा हजार फौज घेऊन जलालाबादेस आले. तेव्हां अर्थांतच मराठी फौज कमी असल्यामुळें ती गंगेअलीकड आली. तेव्हां कार्तिक महिना चालू होता. इतक्यांत अबदाली लाहोरास आला अशी बातमी येऊन पोहोंचली.

दत्ताजीस नजीबाच्या तंबीचें काम तसेंच ठेवून अबदालीशीं टक्कर देण्याची तयारी करणें प्राप्त झालें. तो कुंजपुऱ्यावर यमुना उतरून त्या कामास लागला. लाहोरकडे ठेविलेले साबाजी शिंदे व त्रिंबक बापूजी यांचीं पथकें अबदालीपुढें सरकत सरकत मागें आलीं. त्यांचे वाटेनें फार हाल झाले. शेवटीं त्या पथकांतील माणसें उघडींबोडकीं अशीं दत्ताजीच्या लष्करांत दाखल झालीं. ह्याच सुमारास कांहीं तरी निमित्त काढून गोविंदपंत दत्ताजीपाशीं निरोप मागूं लागला. ह्याचा राग येऊन दत्ताजी अबदालीला रेटण्यास एकटाच निघाला, व त्यानें गोविंदपंतास परत जाण्यास परवानगी दिली. ह्याच सुमारास गाजीउद्दीन वजिरानें, अबदालीचें अरिष्ट हिंदुस्थानावर आणल्याबद्दल दिल्लीस अलमगीर बादशहास ठार केलें व तो गोविंदपंताच्या पथकाबरोबर पाठीमागें राहिला. अबदाली आल्याची बातमी ऐकतांच दत्ताजीनें मल्हारराव होळकरास जलद येण्याविषयीं पत्रें पाठविलीं, पण तोही आला नाहीं. तेव्हां एकट्या शिंद्यावरच मोहिमेचा सर्व भार पडला. शिंद्याच्या अबदालीशीं दोन चार झटापटी झाल्या. पौषं शु॥ ५ स मोठें जंगीच युद्ध झालें, त्यांत मराठ्यांचा जय झाला. अबदालीस आपल्या एकट्याच्या हातून शिंद्याचें पारिपत्य होत नाहीं असें दिसतांच तो अन्तर्वेदींत शिरला; व तेथें नजीबखान रोहिल्यास मिळून त्यानें दिल्लीचा रोंख धरला. इकडे दत्ताजी शिंदेही दिल्लीस यमुनेच्या दक्षिणतीरीं येऊन पोंचला. दोघांमध्यें केवळ यमुनेचें पात्र तेवढें होतें. पौष व॥ ८ स दिल्लीजवळ बदाऊंच्या

घाटावर अबदाली व मराठे या दोघांत तुंबळ युद्ध होऊन दत्ताजी पडला; जनकोजी जखमी झाला. तेव्हां त्याला कोटपुतळीस आणिलं. तेथें मल्हारराव होळकर शिंद्यास मदत करण्याकरितां येत होता तो भेटला. मल्हाररावास शिंद्यावर आलेला घोर प्रसंग पाहून अतिशय दुःख झालें. तो शोक करूं लागला. तेव्हां त्याची स्त्री गौतमाबाई निषेध करून म्हणाली, " सुभेदार, तुमचें वृद्धपण झालें. शिंदे यांचीं मुलें म्हणजे काय ? त्यांचे तोंडाचा अजून जार वाळला नाहीं. त्यांनीं एवढा पराक्रम करून मारतां मारतां मेले. एरवीं हा मृत्युलोकच आहे. परंतु इहलोकीं कीर्ति करून परलोक साधन करणें हेंच दुर्लभ. तुमचे दिवस समीप आले. तरी हिम्मत धरून मारतां मारतां मरावें. " असें बोलतांच मल्हारराव तीस म्हणाला, " तर तुझ्या चित्तांत आम्हीं मरावें असें आहे. " यावर गौतमाबाईनें उत्तर केलें, " सदैव असतां वैधव्याची आस्था धरील अशी कोण चांडाळीण आहे ? अहेवपणें हळदकुंकूमंडित मरावें. परंतु जसें पूर्व आचरण असेल तसें घडेल. आपले पदरीं लौकिक भारी. तुम्ही आपलें घोंगडी विणायाचें काम करीत असतां, तरी सहजच वांचावयाची आस्था धरावी. वाण सतीचें घेतलें तसें संभाळावें, असेंच धर्मशास्त्र आहे. " होळकरानें जनकोजीचें समाधान केलें, व त्या दोघांनीं मिळून अबदालीशीं झुंजण्याचा प्रयत्न केला. पण होळकराच्या फौजेचाही मोड झाला.

शिंद्याचा पराभव झाल्याची बातमी पुण्यास गेली. त्यामुळें सरदारांची अब्रू रक्षण करण्याकरितां व अबदालीचा चांगलाच समाचार घेण्याकरितां पुण्याहून फौज पाठविणें पेशव्यास भाग झालें व मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें सदाशिवरावास सर्व दक्षिण मोकळी करण्याचें काम तहकूब करावें लागलें.

१ भाऊसाहेबांची बखर, पृष्ठ ७८.

## ६६ स्वारीची जंगी तयारी.

### पानिपतची लढाई, पूर्वार्ध.

शके १६८२ ( सन १७६१ ).

शिंद्याच्या पराजयाची बातमी पेशव्यास येऊन समजली तेव्हां तो उदगीरच्या मोहिमेवर गुंतला होता. उदगीरची मोहीम संपतांच रंगपंचमीच्या दिवशीं बाळाजी बाजीराव व सदाशिवरावभाऊ हें अबदालीचें पारिपत्य करण्याचा उपाय योजण्याकरितां पडदुरास भेटले. तेथें आठ दिवसपर्यंत त्यांचें खलबत चाललें होतें. राघोबादादा मागील खेपेस जेव्हां स्वारीवर गेला होता तेव्हां अबदाली निघून गेल्यामुळें त्याशीं झुंजण्याचें कारण पडलें नाहीं. तेव्हां रजपूत राजांचा बंदोबस्त, मामलेदार लोक पैशांची अफरातफर करीत त्यांस शासन, नजीबखानाचें पारिपत्य इत्यादि कामें करण्यास राघोबास फुरसत होती. पण यांपैकीं एकही काम त्याच्या हातून झालें नाहीं, उलट एक कोट रुपये कर्ज करून मात्र तो आला. राघोबा म्हणजे भोळा सांब, त्याला मल्हारराव होळकरांसारखे हुशार लोक सहज फसवीत. तेव्हां बाळाजी बाजीरावानें यावेळीं राघोबादादास न पाठवितां सदाशिवरावभाऊसच हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविलें. भाऊ शके १६७२ पासून सर्व कारभार पाहत असे. त्यांत त्याचे शहाणपण दिसून आलें होतें. तो मोठा हुशार होता. त्याला फसविण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. शिवाय लढाईचाही त्याला राघोबापेक्षां कमी अनुभव होता असें मुळींच नव्हतें. त्याच्या युद्धचमत्कारांस बहादूरबेंद्याच्या स्वारीपासून सुरुवात होऊन बाळाजीच्या कर्नाटकावरील

स्वाऱ्यांत तोच अग्रेसर असे. नुकताच त्यानें उदगीरच्या लढाईत जय मिळविला होता. तेव्हां बाळाजीनें अबदालीच्या पारिपत्यासाठीं भाऊ-सारख्याची निवड करणें स्वाभाविक होतें !

नाना पुरंदरे, बळवंतराव मेहेंदळे, महिपतराव चिटणीस ह्या मंडळीसह भाऊ व बाळाजीचा वडील मुलगा विश्वासराव ५० हजार फौज घेऊन निघाले ते शके १६८२ चैत्र व॥ ४ च्या दिवशीं बऱ्हाणपुरास पोंचले. भाऊबरोबर समशेरबहाद्दर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, मानाजी धायगुडे, अंताजी माणकेश्वर, माने, निंबाळकर, ही मंडळी पहिल्यापासून होती. दमाजी गायकवाड, इब्राइमखान गारदी व संताजी वाघ हें पुढें गेले होते. ते वाटेंत येऊन मिळाले, मग या सर्व सरदारमंडळीस बरोबर घेऊन भाऊ पुढें चाल करून जाऊं लागला. तो निघाल्यापासून गोविंदपंत बुंदेल्यास पत्रें पाठवीत होता. त्यांत गोविंदपंतास सुजाउद्दवल्याशीं राजकारण लावून त्याला आपल्या बाजूला ओढण्याविषयीं त्यानें अत्यंत आग्रह केला. रजपूत राजांसही चाकरीस सिद्ध करावें हेंही काम भाऊनें गोविंदपंतास सांगितलें. शिवाय २५ लाख रुपये गोविंदपंतांकडे बाकी होती तीही लवकर देऊन टाकण्याविषयीं भाऊनें तगादा लाविला. भाऊ वैशाख शुद्ध ११ स सिहोरास आला. तेथून त्यानें रजपूत संस्थानिकांना येऊन मिळण्याविषयीं पत्रें व वकील पाठविले. रजपूत संस्थानिकांनीं दोही डगरींवर हात ठेविले होते. भाऊचे वकील गेले तेव्हां त्यांनीं मराठ्यांस मिळण्याविषयीं रुकार दिला, पण तें केवळ सोंग होतें. सिहोरच्या आसपासच्या दंगेखोरांचें पारिपत्य करून भाऊ खेचीवाड्यांतून ग्वाल्हेरीस गेला. सुजाउद्दवल्यास आपल्या बाजूस मिळवून घेण्यासाठीं जसा मराठ्यांचा जोराचा प्रयत्न चालला होता तशीच अबदालीचीही जोराची खटपट होती. अबदाली स्वतः अनुपशहरीं राहिला होता. त्यानें सुजाशीं स्नेह जोडण्यासाठीं नजीबखानास पाठविलें. पण गोविंदपंत बुंदेल्याचा प्रांत

दरम्यान असल्यामुळें नजीबास गोविंदपंतांचीं ठाणीं घेतल्याशिवाय सुजाची भेट घेणें शक्य नव्हतें. सुजाउद्दवल्यास जोंवर नजीब भेटला नव्हता तोंवर 'मी मराठ्यांकडचा' असें तो म्हणत असे. सुजाउद्दवल्यास स्नेही करण्याचें जबाबदारीचें काम भाऊनें गोविंदपंतावर सोंपविलें होतें. तेव्हां नजीबाची सुजाशीं भेट न होऊं देण्याकरितां आपलीं ठाणीं बसविण्याची पराकाष्ठा गोविंदपंतानें करावयास पाहिजे होती. पण दुर्दैवानें त्यानें ती केली नाहीं. नजीबखानानें इटाव्याला वेढा घातला तोंच तो पुढें स्वारी करणार या अवईनेंच गोविंदपंताचे ठाणेदार पळून गेले. मग नजीबखान खुशाल जाऊन सुजास बिठुरास भेटला; व त्यानें सुजाचें मन अबदालीकडे वळविलें.

इतक्यांत भाऊ चंबळा उतरून आषाढ व॥ ८ स शिंदेहोळकरांस भेटला. 'तुम्ही लवकर जवळ आलां म्हणजे सुजास धीर येऊन तो आपल्या बाजूस मिळेल' असें गोविंदपंतानें लिहिलें; त्यावरून भाऊनें लवकर आग्र्यास पोंचण्याची जलदी केली; परंतु गंभीर नदीस पाणी आल्यामुळें त्याचे दहा पंधरा दिवस फुकट गेले. इतक्यांत सुजाउद्दवला अबदालीच्या बाजूस मिळाल्याची त्याला बातमी समजली. तेव्हां भाऊनें असा बेत केला कीं, सुरजमल जाट याच्यासह आग्र्याजवळ यमुना ओलांडून नजीबखान व अबदाली यांचेमध्यें उतरून दोघांचें निरनिराळ्या दिशेनें पारिपत्य करावें. अबदाली या वेळीं अनुपशहरीं होता, नजीबखान व सुजाउद्दवला बिठुरास होते व गोविंदपंत त्या दोघांच्यामध्यें इटाव्यास होता. अबदालीजवळ तीस हजार फौज, नजीब व सुजाजवळ वीस हजार फौज, व गोविंदपंताजवळ सरासरी आठ दहा हजार फौज होती. आग्र्याजवळ यमुना उतरून पश्चिमेकडून गोविंदपंताला मिळता घेऊन प्रथम नजीब व सुजा यांचें पारिपत्य करावें व नंतर अबदालीची खोड मोडावी, असा भाऊचा बेत होता. याकरितां गोविंदपंताला आपल्या प्रांतांतील सर्व नावा यमुनेच्या दक्षिणतीरीं

आणून ठेवण्यास भाऊनें सांगितलें. शिवाय, मानाजी धायगुडे व तीन हजार जाट यमुनेपलीकडे पाठवून सकुराबादेस मराठ्यांचें ठाणें भाऊनें बसविलें. इतक्यांत सुजा व नजीब अबदालीकडे जात आहेत असें कळलें. तेव्हां सरदार व जाट यांसह भाऊ लवकर आग्र्यास आला. पण तेथें गोविंदपंतानें नावा मुळींच जमविल्या नव्हत्या ! नदीस पाणीही फारच आलें होतें त्यामुळें भाऊस अबदालीच्या सैन्याच्या दोन तुकड्या एक होण्यापूर्वी त्यांचें निरनिराळें पारिपत्य करण्याचा बेत रहित करावा लागला. नजीब व सुजाउद्दवला हे दोघेही शिकंदऱ्यास अबदालीला मिळाले. सदाशिवरावभाऊनें अबदालीच्या पारिपत्याची नवीन योजना केली. मथुरा, दिल्ली, कुंजपुरा, हीं यमुनेच्या दक्षिणतीरचीं ठाणीं घेऊन उत्तरेकडून यमुना उतरून अबदालीस रेटायाचें ठरलें. या योजने-प्रमाणें भाऊ उत्तरेकडे चालता झाला. गोविंदपंतानें अलीगडपर्यंत मराठ्यांचीं ठाणीं बसवावीं, अबदालीच्या भोंवतालचा मुलूख जाळून लुटून फस्त करावा, रोहिल्यांच्या मुलखांत उतरण्याची अवई घालावी, व सुजाउद्दवल्याच्या मुलखांत दंगे माजवावे अशी कामगिरी गोविंदपंतास सांगितली. भाऊ श्रावण शु॥ ४ स मथुरेस आला व तेथून त्यानें बळवंतराव मेहेंदळे व शिंदे–होळकर यांस दिल्ली घेण्याकरितां पुढें पाठविलें. दिल्ली शहर बळवंतरावानें घेतलें व सदाशिवरावभाऊ येऊन दाखल झाल्यावर श्रावण व॥ ५ स किल्लाही मराठ्यांच्या हातीं आला. दिल्ली शहर म्हणजे हिंदुस्थानच्या बादशाहीचें मुख्य ठिकाण तें अबदालीच्या लोकांपासून हिसकावून घेतल्यावर मराठ्यांचा चहूंकडे दरारा बसला. अबदालीच्या सैन्यांतील लोकांस त्याच्या बळाबद्दल संशय येऊं लागला व ते त्याला सोडून जाण्याचा प्रयत्न करूं लागले. हफीज रहमतखान, अहमदखान बंगष, सादुल्लाखान, फैजुल्लाखान या रोहिल्यांचीं भाऊस मिळण्याबद्दल बोलणीं सुरू झालीं. कित्येक गिलचे व आफ्रिदी लोकही अबदालीस सोडून निघाले. सुजाउद्दवल्यासही आपण अबदा-

लीस येऊन मिळालों याचा खेद वाटूं लागला. अबदालीनें सुजावर मारेकरी घातले व त्याच्यापाशीं पैसें मागूं लागला. तेव्हां तर सुजास त्याच्या संगतीचा फारच खेद वाटूं लागला; व त्यानें भाऊशीं सख्यत्वाचें बोलणें सुरू केलें. अबदालीला त्याच्या सर्व साथीदारांनीं सोडून ज़ाण्याचा विचार सुरू केला. तेव्हां नजीबाच्या नादीं लागून व्यर्थ संकटांत सांपडलों असें त्याला वाटूं लागलें. दिल्ली घेतल्यापासून मराठ्यांची चढती व अबदालीची उतरती कमान होती. त्या वेळीं पावसाळा असल्यामुळें मराठ्यांनीं सुमारें दोन महिने दिल्लीस तळ दिला होता. अबदालीनें आपली विपन्न स्थिति पाहून सुरक्षित स्वदेशीं पोंचण्याचा निश्चय केला, व तो भाऊशीं तह करण्यास उत्सुक झाला. त्याप्रमाणें भाऊशीं बोलण्याकरतां त्यानें वकील पाठविले. उत्तम सैन्य, जंगी तोफखाना व शिंद्याबद्दलचा सूड उगविण्याची अनिवार इच्छा या तीन कारणांमुळें अबदालीस आतां सोडावयचें नाहीं असा भाऊचा निश्चय झाला होता. शिवाय अबदालीचें सैन्यही कमी कमी होत चाललें होतें. तेव्हां अशा स्थितींत अबदालीनें मनासारखा तह केला तरच त्यास देशीं सुखरूप जाऊं द्यावयाचें; नाहींतर अंतर्वेदींत कोंडून किंवा आंत तडफडून यमुना उतरून अलीकडे आल्यावर बाहेरून गांठून तंबी द्यावयाची, असा भाऊनें व्यूह रचिला.

भाऊनें पावसाळ्याचे सुमारें तीन महिने दिल्लीस काढले. मागील वर्षीं गाजीउद्दीन वजीरानें अलमगीर बादशहास ठार मारल्यापासून दिल्लीची गादी रिकामी होती. भाऊनें अल्लीगोहरास दिल्लीस गादीवर बसविण्याकरतां दिल्लीस बोलाविलें पण तो स्वतः आला नाहीं. त्यानें आपला मुलगा जवानबक्त यास पाठवून दिलें. भाऊनें नाना पुरंदरे व अप्पाजी जाधवराव यांच्या हस्तें जवानबक्तास युवराजपद दिलें व अल्लीगोहरास शहाअलमपद देऊन त्याच्या नांवाचे राजशिक्के चालविले. शहाअलमास बादशहा करून वज़िरी आपण स्वतः करावयाची

असा भाऊचा बेत होता. या भाऊच्या कृत्यानें सुजाउद्दवल्याची वाजिरी मिळवण्याची आशा नष्ट झाली, व तो फिरून अबदालीशीं संगनमतानें वागूं लागला. आश्विन व॥ ५ नंतर अबदाली, नजीब व सुजा हे मराठ्यांच्या विरुद्ध एकसूत्रानें वागूं लागले. भाऊनें दिल्लीच्या राजवाड्यांतील छत काढलें. त्याची किंमत तीन लाख रुपये भरली. भाऊनें ते पैसे सैन्यास पगार देण्यास खर्चिले. छत काढलें त्यावरून सुरजमलजाट फारच रागावला व आपले लोक घेऊन परत निघून गेला. पावसाळा संपतांच अश्विन शु॥ ६ स भाऊ कुंजपुऱ्यास गेला. व आपल्या योजनेप्रमाणें अबदालाच्या पारिपत्याच्या तयारीस लागला. भाऊनें गोविंदपंतास पूर्वीं सांगितलेल्या कामगिऱ्या करण्याविषयीं ताकीद केली; व आपण स्वतः कुंजपुरा घेण्याच्या तयारीस लागला. कुंजपुरा हें स्थळ फार मजबूत असून नाकेबंदीचें होतें. आंत समतखान म्हणून अबदालीचा सरदार पांच सहा हजार फौजेसुद्धां होता. मराठ्यांच्या सैन्याला अंगावर घेऊन आपण पळत सुटावें व मागून अबदालीनें येऊन मराठ्यांवर अचानक हल्ला करावा असा समतखानचा बेत होता. परंतु बळवंतराव मेहेंदळे व जनकोजी शिंदे या दोघांनीं एकदम कुंजपुऱ्यास वेढा घातला व समतखानाची दोन हजार फौज पळून जात होती ती लुटली, त्यामुळें समतखानाचा बेत फसला. आश्विन शु॥ ८ स भाऊ कुंजपुऱ्यास पोंचला व कुंजपुरा मराठ्यांच्या हातीं आला. पूर्वीं ठरल्याप्रमाणें अबदालीवर चाल करून जाण्याकरितां यमुना उतरणें भाऊस जरूर होतें; त्याकरितां तो सारंगपुऱ्याच्या घाटाकडे कूच करूं लागला. इतक्यांत भाऊस अशी बातमी लागली कीं, अबदाली बागपतावर यमुना उतरून पानिपताकडे येत आहे. तेव्हां भाऊही एकदम उलटून पानिपताकडे आला. भाऊनें कुंजपुरा घेतला, ही बातमी समजल्यावर अंतर्वेदींत राहणें अबदालीस धोक्याचें वाटलें. म्हणून बागपताजवळ मोठ्या कष्टानें ता यमुना उतरला व मोठ्या कष्टानें पण सावधगिरीनें

त्यानें पानिपतचा रोंख धरला. या वेळीं अबदाली भाऊच्या चांगला कचाटींत सांपडला होता. समोर भाऊची फौज तयारीनें उभी होती. पाठीमागें दिल्लीस नारो शंकर त्याला पायबंद देण्यास तयार होता. त्यामुळें यमुनेच्या पलीकडे अबदालीचा मुळींच लाग नव्हता. त्याला अंतर्वेदींत व रोहिलखंडांत जे नजीबखानाचे प्रांत होते त्यांतून मदत होण्याचा संभव होता; पण तोही नाहींसा करण्याची तजवीज भाऊनें केली होती. भाऊनें अबदालीस त्या प्रांतांतून मिळणारी रसद बंद करण्याविषयीं गोविंदपंतास फिरून सक्त हुकूम केला "तुम्ही जलदीनें यमुनें-पलीकडून येऊन बागपतेपर्यंत धुमामा चालवून अबदालीस रसद न पोहोंचे, फौजेस शह पडे, असें करावें. गिलच्यांचा पेंच तिकडे नाहीं. यास्तव लांब लांब मजलीनें येणें. या कामास दिरंग न लावणें. नजीबखानाचे प्रांत जाळावे. अबदालीस मागें रसद बंद होऊन बोभाट होय असें करणें. ईरे धरून तडकून येऊन काम करणें." या वेळीं अबदाली अगदीं भिऊन गेला होता. मराठी सैन्यामध्यें व अबदालीच्या सैन्यामध्यें अंतर दोन चार कोसांचें होतें. अबदालीच्या लष्करांत महागाई झाली होती. अश्विन व॥ १० चे दिवशीं अबदाली व मराठे या दोघांचें एक लहानसें युद्ध झालें. त्यांत मराठ्यांचा जय झाला. अबदालीचा मोड करण्याचा हुरूप सर्व मराठी सैन्यांत भरला होता. अबदालीला आपण खास गिळणार असें भाऊस वाटत होतें. कृष्ण जोशी संगमेश्वरकर यानें अश्विन व॥ १३ च्या पत्रांत त्या वेळच्या स्थितीचें वर्णन केलें आहे. तो लिहितो, "श्रीमंतांनीं चोहोंकडे तोफखाना पसरला आहे. यवनास थोर भय झालें आहे. पुढें येववत नाहीं. आमचे सैनिक नित्य शें पन्नास यवन मारून उंट घोडीं आणतात. दोन हत्ती पेंढारी यांनीं काल आणले. आमच्या सैन्यांत सवंगाई आहे. आणखी

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १, लेखांक २६१.

दोन चार दिवसांत यवन चालून तोफावारी येईल तरी क्षणमात्र बुडेल. न ये तर आमचे लोक जाऊन युद्ध करणार. सर्व सैन्यांत उत्साह आहे कीं, अबदाली व नजीबखान व सुजाउद्दवला आठचौ दिवसांत क्षयास जातील. अबदाली शहान शहा म्हणवीत होता. त्यानें युद्धें बहुत केलीं आहेत, परंतु तो दो कोसांवरी येऊन आठ दिवस बसून कांहीं पराक्रम होत नाहीं. यामुळें आमची फौज बहुत शेर आहे. अबदालीनें स्वदेशास जावें तरी मार्ग नाहीं. युद्ध करावें तरी परिणाम नाहीं. याप्रमाणें विचारांत पडला आहे. ”

## ६७ घनघोर संग्राम ! ! भाऊ ! भाऊ !

### पानिपतची लढाई, उत्तरार्ध.

शके १६८२ ( सन १७६१ ).



**गोविंदपंताकडून** अबदालीची रसद बंद करून त्याला हैराण करण्याचा व आपण स्वतः त्यावर चालून जाऊन समोरून लढाई देण्याचा व चीत करण्याचा सदाशीवरावभाऊनें बेत केला. या योजनेंत गोंविंदपंतावर फारच जबाबदारीची कामागरा सोंपविली होती. गोविंदपंतानें जबाबदारी न ओळखतां कुचराई चालविली. या कुचराईनें भाऊचा सर्व बेत फिसकटण्याचा रंग दिसूं लागला. तेव्हां भाऊनें गोविंदपंतास एक निर्वाणीचें पत्र कार्तिक शु॥ ७स पाठविलें. त्यांत भाऊ लिहितो “ लिहिलेप्रमाणें एकही काम होऊन न आलें.

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खंड १, लेखांक २६५.

फार दिवस खावंदानें लहानाचें थोर केलें, वाढविलें. त्याचें सार्थक हे अजूनतरी सावध होऊन लिहिलेप्रमाणें येऊन पोंचणें. " परंतु याही पत्रावरून गोविंदपंतानें आळंटाळं करण्याचें सोडलें नाहीं. यामुळें लढाइ-चा रंग पालटतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. अबदालीची रसद बंद न झाल्यामुळें त्याची उपासमार होण्याची दूरच राहिली, कारण अबदालीची फौज दिल्लीच्या व मराठी फौजेच्यामध्यें होती. तिला दाणागल्ला यथास्थित मिळत होता. शिवाय कोणी त्रास देण्यासही नव्हता. तेव्हां तिनें स्वस्थपणें मराठ्यांस दिल्लीहून जाणारी रसद मार-ण्याचा क्रम चालविला. भाऊ अबदालीची रसद बंद करून त्यास जेरीस आणणार होता तोच प्रसंग स्वतः त्याच्यावर आला. अबदालीनें ही मराठ्यांची स्थिति ओळखली. व उपासमारीनें मराठ्यांना पूर्ण जेरीस आणून मग त्यांचे यथेच्छ पारिपत्य करण्याचा त्यानें बेत केला.

मराठ्यांस उपासमार काढीत तसेंच बसविण्यांत अबदालीचा फायदा होता; व लवकर युद्ध करून अबदालीचा शह उठविण्यांत मराठ्यांचा नफा होता. हा फायदा ओळखून मराठे अबदालीच्या सैन्यावर कार्तिक वद्य १ स चालून गेले. अबदालीच्या सैन्याशीं मोठी लढाई झाली. जन-कोजी शिंद्यानें अतुल पराक्रम करून जय मिळविला. त्या युद्धांत सहाशें गिलचे ठार झाले, व मराठ्यांकडील सारे अडीचशें पडले. मराठ्यांनीं अबदालीच्या सैन्यास रेटीत रेटीत त्यांच्या गोटापर्यंत नेलें. मराठ्यांचे अबदालीशीं दुसरें युद्ध कार्तिक आमावास्येस झालें. त्यांतही अबदा-लीचाच पराजय झाला. अबदालीकडील दीड हजार माणूस त्याच्या तळा-पुढें मरून पडलें. मराठ्यांकडील दीडशें ठार व सहाशें जखमी झाले. पण या युद्धांत बळवंतराव मेहेंदळे पडला. त्यामुळें मराठ्यांचें मोठेंच नुकसान झालें. या दोन्ही युद्धांत मराठ्यांस जय मिळाला खरा; पण यापासून त्यांचा विशेष फायदा झाला नाहीं. स्वतः अबदाली दोन्ही वेळां युद्धांत सामील झाला नाहीं व म्हणून त्याचे कोणत्याही प्रकारें धैर्य खचलें.

नाहीं. मराठे उपासमारीनें अगदीं जर्जर होऊन जाण्याच्या अगोदर त्यांशीं युद्ध न करण्याचा अबदालीनें निश्चय केला होता.

इतक्यांत भाऊ अबदालीकडून कोंडला गेल्याची बातमी पुण्यास बाळाजी बाजीरावास समजली. तेव्हां तो पंचवीस तीस हजार फौज घेऊन भाऊच्या साहाय्यास निघाला. तो मार्गशीर्षांत बऱ्हाणपुरापर्यंत आला. स्वतः पेशवेच हिंदुस्थानांत येत आहेत ही बातमी गोविंदपंतास लागतांच धन्यापाशीं आपली अब्रू कायम रहावी या ईर्षेनें गोविंदपंत चार लाख रुपये घेउन दिल्लीस आला. खजिना नारो शंकराच्या स्वाधीन करून गोविंदपंत स्वतः पानिपतच्या रोखें गाजुद्दीनगराकडे निघाला; परंतु त्या शहराजवळ अबदालीचा सरदार अतईखान त्याच्यावर चालून आला. मग दोघांचें युद्ध होऊन त्यांत गोविंदपंत मार्गशीर्ष पौर्णिमेला मारला गेला. इतक्या उशीरानें कां होईना पण गोविंदपंताच्या हातून जर अबदालीची रसद तोडली गेली असती तर त्यापासून मराठ्यांस पुष्कळ फायदा झाला असता. पण गोविंदपंत मारला जाऊन मराठ्यांचा शेवटचा आशातंतुही नष्ट झाला. मार्गशीर्ष वद्य १५ स पाराशर दादाजी, पांचशें स्वार व दीड लाख खजिना घेऊन दिल्लीहून पानिपतास जाण्यास निघाला; पण चुकीनें तो अबदालीच्या सैन्यांत शिरला! तेथें त्यांचे कांहीं स्वार मारले गेले. कांहीं दिल्लीकडे परत गेले. हा पानिपतास कोंडलेल्या मराठी लष्करास साहाय्य करण्याचा दुसरा व शेवटला प्रयत्न निष्फळ झाला. येणेंप्रमाणें मराठी सैन्यास साहाय्य मिळालें नाहीं. मराठी लष्करांत तीन रुपयास शेर इतकेंही अन्न मिळेनासें झालें. लोकांस उपोषणें होऊं लागलीं; व हत्ती उंट, घोडे वगैरे जनावरांस वैरण न मिळाल्यामुळें तीं मरूं लागलीं. असा प्रकार झाल्यावर सर्व मराठे सरदार भाऊकडे आले, व त्यांनीं भाऊस विनंति केली कीं, भाऊसाहेब आम्हांस रणांत मारावें, पण अन्ना-

शिवाय मारूं नये. तेव्हां भाऊनें कोंडी फोडून दिल्लीकडे जाण्याचा निश्चय केला.

पौष शुद्ध ८ बुधवारीं पहाट झाली होती. अजून सूर्योदयास एक प्रहर अवकाश होता. अशा समयीं भाऊ व विश्वासराव उठले, व सर्व सरदारांस लवकर निशाणापाशीं येऊन दाखल होण्याचा भाऊनें हुकूम केला. आज्ञा होतांच सर्व सरदार भगव्या झेंड्यापाशीं जमा झाले व त्यांनीं भाऊस मुजरे केले. शिंदे, होळकर आदिकरून सर्व सरदारांस सन्निध बोलावून भाऊनें वीरश्री उद्दीपित करणारें भाषण केलें. " आजचा निदान समय, सतीचें वाण घेतलें. त्यापरती दुसरी गोष्ट अणुमात्र चित्तांत आणूं नये. तुम्ही पुरातन कैलासवासी रावसाहेब व आप्पासाहेब यांच्यावेळचे यख्त्यारी आहां. आजपर्यंत अन्न भक्षिलें त्याचें आज सार्थक करून दाखवावें. स्वर्गीं रावसाहेब व आप्पासाहेब भले म्हणतील तें कर्म करावें ! रायांनीं दौलत सुद्धां आम्हांस तुमच्या हवालीं करून कैलासभुवनास गेले. त्या गोष्टीची शरम तुम्हांस असावी. यश किंवा अपयश हें तुमचें तुम्हीं संभाळावें. " यावर सरदारांनीं भाऊस उत्तर केलें, " आम्हीं जीविताची तमा धरीत नाहीं ? महाराजांचें पुण्य आमच्या मस्तकीं असतां इराणीची बिशाद काय ? मारून गर्दीस मिळवून देऊं, आपण कांहीं चिंता न करावी. " इतकें झाल्यावर मराठी फौज शत्रूवर चालून जाण्यासाठीं व्यवस्थेनें उभी राहिली. मध्यावर खासे भाऊ व विश्वासराव हुजरातीसह होते. उजवीकडे जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर आपल्या सेनेसह सज्ज होते. डावीकडे दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर व समशेरबहादूर हे सरदार होते. सर्व सैन्यापुढें तोफखाना असून त्यावर इब्राहिमखान गारदी होता. पाठीमागें बुणगें असून त्यामागें कांहीं किरकोळ पथकें होतीं. अशा तयारीनें मराठी फौज तळावरून निघाली. तेव्हां शिंगें, ताफे, नगारे इत्यादि वाद्यांच्या नादानें आकाश दुमदुमून भरून

गेल. मराठी फौज तळापासून दीड कोस पुढें आली. अबदाली वाट देऊन एकीकडे झाला तर लढाई न करितां तसेंच दिल्लीस जाण्याचा भाऊचा बेत होता.

परंतु मराठ्यांस उपासमारीनें जर्जर केल्यावर अबदालीनें त्यांस शांतपणें जाऊं देणें केवळ अशक्य होतें. मराठे निघाले ही बातमी कळतांच त्यानेंही आपलें सैन्य युद्धास तयार केलें. मध्यभागीं त्याचा वजीर शहावल्लीखान म्हणून होता. उजव्या बाजूस रोहिले सरदार व डाव्या बाजूस नजीबखान व सुजाउद्दवला असे होते. सर्व सैन्यापुढें त्याचा तोफखाना होता. खासा अबदाली मागेंच राहिला होता.

मराठी फौज तळावरून निघाल्यावर थोड्याच वेळानें तोफांच्या माऱ्यास दोहोंकडून सुरुवात झाली. त्याबरोबर धुरानें दशदिशा भरून गेल्या. इतक्यांत सूर्य क्षितिजावर आला; पण धुरानें दशदिशा व्याप्त झाल्यामुळें बराच वेळ सूर्यदर्शन झालें नाहीं. मग दोन्ही फौजा जवळ येतांच मराठ्यांच्या डावीकडील यशवंतराव पवार व विठ्ठल शिवदेव पुढें जाऊन लढाई करूं लागले; परंतु ते हटत हटत फिरून आपल्या जाग्यावर आले; तेव्हां इब्राहिमखान गारदी यानें तोफांचा मारा सुरूं केला व आपलीं पलटणें पुढें काढलीं. त्याचें व रोहिल्यांचें युद्ध होऊं लागलें. प्रहर दिवसाचे सुमारास सर्व बाजूंकडे लढाई सुरूं झाली. इब्राहिमखानानें एक निकराचा हल्ला करून आठ हजार रोहिले ठार केले. इकडे भाऊ व विश्वासराव हे वजीर वल्लीशहा मध्यावर होता त्याच्यावर चालून गेले. त्यांनीं पहिल्या तडाक्यासच पंधरा हजारांची फळी फोडून तीन हजार लोक मारिले व खुद्द वजीराचा मुलगा ठार केला. मुलगा पडतांच वजीर घाबरला व त्याचे लोक पळूं लागले. वजीराकडील बाजू पराभव पावून पळूं लागली असें पाहतांच नजीबखान भाऊशीं लढण्यास आला. नजीबानें आपला मोर्चा भाऊकडे वळविला, असें पाहतांच जनकोजी शिंदे भाऊच्या मदतीस आला. तेथें मोठें तुंबळ युद्ध सुरूं झालें. रोहिल्यांच्या

तोफांच्या मारामुळें शिंद्याकडील बरेच लोक पडूं लागले, पण एकंदरीनें मराठ्यांचें पाऊल पुढें पडत होतें. डाव्या बाजूस पवार, गायकवाड व इभ्राहिमखान या सरदारांनीं गिलच्यास मुळींच पुढें येऊं दिलें नाहीं. लढाईंत मराठ्यांस जय येत चालला व गिलच्यांच्या फौजेंत पळ सुरू झाला. हें पाहून अबदालीनें आपल्याजवळ शिल्लक ठेवलेली चार हजार फौज पळणाऱ्या लोकांवर पाठवून त्या सर्वांस परत लढाईस नेलें. यामुळें भाऊवर आणखी दहा हजार फौज एकदम चाल करून आली. अगोदर नजीबखान भाऊशीं झुंजत होताच, त्यांत आणखी ही नवी भर पडली. सुमारें दोन वाजले होते. मराठे अगदीं निकरानें लढत होते. इतक्यांत दुर्दैवानें विश्वासरावास एक बंदुकीची गोळी अचानक येऊन लागली; व तो मरणोन्मुख होऊन पडला. यांच वेळीं डाव्या बाजूस विठ्ठल शिवदेवाच्या लष्करांतील हजार पठाणांनीं आपल्या डोक्यांवरील भगवीं फडकीं काढून टाकिलीं; व मराठ्यांच्या बुणग्यांत पराभव झाल्याचा पुकारा केला. त्याबरोबर मराठ्यांच्या फौजेंतील बुणगें पळूं लागलें. इतक्यांत विश्वासरावास गोळी लागल्याची बातमी भाऊस कळल्यामुळें त्यानें आपला हत्ती विश्वासरावाजवळ नेला. त्याची स्थिति पाहून भाऊच्या मनास धक्का बसला. पण भयंकर जखम झाली होती तरी विश्वासरावानें "तुम्ही चला, लढाई बिघडेल" असें भाऊस सांगितलें. विश्वासराव कांहीं आतां वांचत नाहीं, हें पाहून भाऊ जिवावर उदार झाला. हत्ती टाकून घोड्यावर स्वार झाला व गर्दींत घुसून मोठ्या निकरानें लढूं लागला. इतक्या वेळांत मराठ्यांची पिछाडी पळूं लागली व तीन जरीपटक्यांशेजारीं थोडे कुलीन लोक तेवढे लढत होते. मराठे पळतात हें पाहून अबदालीचे लोक दोहों बाजूंनीं बुणग्यांवर घुसले व कत्तल सुरू झाली. भाऊ, शिंदे, समशेरबहाद्दर व इभ्राहिमखान येवढ्यांचे लोक मात्र शेवटपर्यंत लढत होते. बाकी सारे सरदार पळून गेले अगर ठार झाले. भाऊनें पळ थांबविण्यासाठीं जयवाद्यें वाजविलीं; पण कोणीही परत आलें नाहीं!

गेल. मराठी फौज तळापासून दीड कोस पुढें आली. अबदाली वाट देऊन एकीकडे झाला तर लढाई न करितां तसेंच दिल्लीस जाण्याचा भाऊचा बेत होता.

परंतु मराठ्यांस उपासमारीनें जर्जर केल्यावर अबदालीनें त्यांस शांतपणें जाऊं देणें केवळ अशक्य होतें. मराठे निघाले ही बातमी कळतांच त्यानेंही आपलें सैन्य युद्धास तयार केलें. मध्यभागीं त्याचा वजीर शहावल्लीखान म्हणून होता. उजव्या बाजूस रोहिले सरदार व डाव्या बाजूस नजीबखान व सुजाउद्दवला असे होते. सर्व सैन्यापुढें त्याचा तोफखाना होता. खासा अबदाली मागेंच राहिला होता.

मराठी फौज तळावरून निघाल्यावर थोड्याच वेळानें तोफांच्या माऱ्यास दोहोंकडून सुरुवात झाली. त्याबरोबर धुरानें दशदिशा भरून गेल्या. इतक्यांत सूर्य क्षितिजावर आला; पण धुरानें दशदिशा व्याप्त झाल्यामुळें बराच वेळ सूर्यदर्शन झालें नाहीं. मग दोन्ही फौजा जवळ येतांच मराठ्यांच्या डावीकडील यशवंतराव पवार व विठ्ठल शिवदेव पुढें जाऊन लढाई करूं लागले; परंतु ते हटत हटत फिरून आपल्या जाग्यावर आले; तेव्हां इब्राहिमखान गारदी यानें तोफांचा मारा सुरूं केला व आपलीं पलटणें पुढें काढलीं. त्याचें व रोहिल्यांचें युद्ध होऊं लागलें. प्रहर दिवसाचे सुमारास सर्व बाजूंकडे लढाई सुरूं झाली. इब्राहिमखानानें एक निकराचा हल्ला करून आठ हजार रोहिले ठार केले. इकडे भाऊ व विश्वासराव हे वजीर वल्लीशहा मध्यावर होता त्याच्यावर चालून गेले. त्यांनीं पहिल्या तडाक्यासच पंधरा हजारांची फळी फोडून तीन हजार लोक मारिले व खुद्द वजीराचा मुलगा ठार केला. मुलगा पडतांच वजीर घाबरला व त्याचे लोक पळूं लागले. वजीराकडील बाजू पराभव पावून पळूं लागली असें पाहतांच नजीबखान भाऊशीं लढण्यास आला. नजीबानें आपला मोर्चा भाऊकडे वळविला, असें पाहतांच जनकोजी शिंदे भाऊच्या मदतीस आला. तेथें मोठें तुंबळ युद्ध सुरूं झालें. रोहिल्यांच्या

तोफांच्या मारामुळें शिंद्याकडील बरेच लोक पडूं लागले, पण एकंदरीनें मराठ्यांचें पाऊल पुढें पडत होतें. डाव्या बाजूस पवार, गायकवाड व इब्राहिमखान या सरदारांनीं गिलच्यास मुळींच पुढें येऊं दिलें नाहीं. लढाईंत मराठ्यांस जय येत चालला व गिलच्यांच्या फौजेंत पळ सुरू झाला. हें पाहून अबदालीनें आपल्याजवळ शिल्लक ठेवलेली चार हजार फौज पळणाऱ्या लोकांवर पाठवून त्या सर्वांस परत लढाईस नेलें. यामुळें भाऊवर आणखी दहा हजार फौज एकदम चाल करून आली. अगोदर नजीबखान भाऊशीं झुंजत होताच, त्यांत आणखी ही नवी भर पडली. सुमारें दोन वाजले होते. मराठे अगदीं निकरानें लढत होते. इतक्यांत दुर्दैवानें विश्वासरावास एक बंदुकीची गोळी अचानक येऊन लागली; व तो मरणोन्मुख होऊन पडला. याच वेळीं डाव्या बाजूस विठ्ठल शिवदेवाच्या लष्करांतील हजार पठाणांनीं आपल्या डोक्यांवरील भगवीं फडकीं काढून टाकिलीं; व मराठ्यांच्या बुणग्यांत पराभव झाल्याचा पुकारा केला. त्याबरोबर मराठ्यांच्या फौजेंतील बुणगें पळूं लागलें. इतक्यांत विश्वासरावास गोळी लागल्याची बातमी भाऊस कळल्यामुळें त्यानें आपला हत्ती विश्वासरावाजवळ नेला. त्याची स्थिति पाहून भाऊच्या मनास धक्का बसला. पण भयंकर जखम झाली होती तरी विश्वासरावानें "तुम्ही चला, लढाई बिघडेल" असें भाऊस सांगितलें. विश्वासराव कांहीं आतां वांचत नाहीं, हें पाहून भाऊ जिवावर उदार झाला. हत्ती टाकून घोड्यावर स्वार झाला व गर्दींत घुसून मोठ्या निकरानें लढूं लागला. इतक्या वेळांत मराठ्यांची पिछाडी पळूं लागली व तीन जरीपटक्यांशेजारीं थोडे कुलीन लोक तेवढे लढत होते. मराठे पळतात हें पाहून अबदालीचे लोक दोहों बाजूंनीं बुणग्यांवर घुसले व कत्तल सुरू झाली. भाऊ, शिंदे, समशेरबहाद्दर व इब्राहिमखान येवढ्यांचे लोक मात्र शेवटपर्यंत लढत होते. बाकी सारे सरदार पळून गेले अगर ठार झाले. भाऊनें पळ थांबविण्यासाठीं जयवाद्यें वाजविलीं; पण कोणीही परत आलें नाहीं!

जरीपटक्याभोंवतीं लढाई जोरांत चालली होती. “ हाणा हाणा ” म्हणतां म्हणतां भाऊच्या तोंडास कोरड पडली. शेवटीं आपल्या फौजेपैकीं बहुतेक सर्व नाहींशी झाली असें पाहून त्वेषानें शत्रूवर चाल करून जाऊन भाऊ गर्दींत मिसळला. जनकोजी शिंदे पाठोपाठ होता; पण त्यास मध्येंच शत्रूनें कैद केलें व ठार मारलें. याप्रमाणें सायंकाळीं लढाई आटपून मराठ्यांचा पूर्ण पराभव झाला. मराठ्यांचें सर्व सामानसुमान शत्रूच्या हातीं लागलें. सर्व रणांगणावर प्रेतांचे ढीगच्या ढीग पडले होते; जे लोक दडून बसले होते त्या सर्वांस गिलच्यांनीं कैद केलें व दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांपैकीं बायकामुलांस गुलाम म्हणून ठेवून घेऊन पुरुषांस एका दावणींत उभें करून, एकानें चार भाजलेले दाणे त्यांच्या हातावर टाकावयाचे, व भिस्त्यानें त्यांमागून प्रत्येकाच्या ओंजळींत चुळकाभर पाणी टाकावयाचें, व तिसऱ्यानें येऊन त्यांचा वध करावयाचा, अशा क्रूरपणानें गिलच्यांनीं त्यांची कत्तल केली.

पळापैकीं सुमारें पांच सात हजार लोक दिल्लीकडे आले. त्यांत समशेरबहाद्दर, मल्हारराव होळकर व भाऊची बायको पार्वतीबाई वगैरे माणसें होतीं. शिवाय विठ्ठल शिवदेव, दमाजी गायकवाड, महादजी शिंदे, नाना फडणीस वगैरे मंडळी जशी ज्यास वाट मिळेल तशी निघून आली. सुरजमल जाटानें पळाच्या लोकांस विशेषच साहाय्य केलें व त्यांची माळव्यांत रवानगी केली. इतक्यांत बाळाजी बाजीराव भाऊच्या मदतीस निघाला होता, तो नर्मदापार होऊन सिरोंजेस येऊन पोहोंचला होता, तेथें त्याला पानपतचें भयंकर वर्तमान समजलें. “ दोन मोत्यें गळालीं, सत्तावीस मोहरा हरवल्या व रुपये व खुर्दा यांचा पत्ताच नाहीं. ” अशी व्यापारी खबर लागली. इतक्यांत पळाचे लोकही येऊन मिळाले. पानिपतचें वर्तमान ऐकून बाळाजीस जबर धक्का बसला. त्याचें मस्तक फिरून त्याला भ्रम झाला. त्याच्या मनांतून पुढें चाल करून जावयाचें होतें; पण सरदारांनीं त्यास मागें फिरविलें. तो पुण्यास आला

तों सारखा " भाऊ भाऊ " म्हणून ओरडत होता. शेवटीं या मानसिक दुःखाचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम होऊन तो शके १६८३ च्या ज्येष्ठ वद्य ६ स पर्वतीवर मृत्यु पावला.

## ६८ पेशव्यांच्या घरांत कलीनें प्रवेश केला !



बाळाजी बाजीरावास एकंदर तीन मुलगे होते. त्यांपैकीं सर्वांत वडील विश्वासराव पानिपतांत पडला. त्याच्या मागें दोघे होते. थोरला माधवराव सतरा वर्षांचा, व धाकटा नारायणराव सहा वर्षांचा; बाळाजी बाजीराव वारल्यावर एक महिन्यानें माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं; व तो अजून लहान असल्यामुळें राघोबादादाच कारभार पाहूं लागला.

पानिपतच्या लढाईमुळें मराठ्यांचा दरारा अगदीं नाहींसा झाल्यासारखा होता. दिल्लीदरबारीं रोहिल्यांचें वजन वाढलें व अंतर्वेदींतील मराठ्यांची सत्ता पार उठली. चंबळेजवळचे जाट व राजपूत संस्थानिकही मराठ्यांस मुळींच मोजीतनासे झाले. पण ते लांब उत्तरेकडे तरी होते. दक्षिणेंतसुद्धां मराठ्यांच्या शत्रूंस जोर आला. हैद्राबादच्या गादीवर सलाबतजंग होता; पण सर्व अधिकार त्याचा धाकटा भाऊ निजामअल्लीच गाजवीत असे. पानिपतास पराभव झाल्यामुळें मराठे हतवीर्य झाले आहेत व बाळाजीसारख्या कर्त्या पेशव्याच्या जागीं त्याचा लहानसा मुलगा गादीवर बसला आहे; तेव्हां आपला उदगीरच्या लढाईंत मराठ्यांनीं घेतलेला प्रांत परत मिळविण्यास ही उत्तम संधि आहे, असें पाहून निजामअल्लीनें मराठी मुलखावर खुद्द पुण्यापर्यंत स्वारी करण्याचा बेत केला. त्यानें औरंगाबादेजवळ मोठी फौज जमा केली; व

तो चाल करून पुढें येऊं लागला. उत्साहाच्या भरांत त्यानें गोदावरीच्या कांठच्या टोंकें येथील देवस्थानचा विध्वंस केला. राघोबाची मुळींच तयारी नव्हती. मात्र निजामाची फौज चाल करून येत आहे असें कळतांच मराठी फौज हळू हळू जमूं लागली. शेवटीं फौज ८०।९० हजार जमली. शिवाय टोक्याचा नाश निजामानें केल्यामुळें रामचंद्र जाधव हा निजामाकडील सरदार फुटून मराठ्यांकडे आला व त्यानें निजामअल्लीचा धाकटा भाऊ मीरमोंगल यांसही फितवून आपल्याबरोबर आणिलें. पण इतक्या गोष्टी जरी अनुकूल होत्या तरी मराठे सरदारांत उत्पन्न झालेलीं भांडणें मिटवून एकीनें शत्रूवर हल्ला चढविण्याचें काम राघोबाकडून झालें नाहीं. त्यामुळें निजाम पुण्यापासून १४ मैलांवर उरळी या गांवीं आला. तेथें मात्र त्याच्यावर हल्ला चढवून मराठ्यांनीं त्यास कोंडून टाकिलें. तेव्हां त्यानें निरुपाय झाल्यामुळें तहाचें बोलणें सुरू केलें. तरी निजाम कसा एकदां परत जातो याची राघोबास इतकी चिंता लागली होती कीं सत्तावीस लाखांचा मुलूख निजामास परत देण्याचें त्यानें ठरविलें; व अनायासें मिळालेला मुलूख घेऊन निजाम परत गेला. राघोबानें निजामाशीं जो नुकसानीचा तह केला त्याला एक दुसरें अंतस्थ कारण होतें. राघोबा हा सखारामबापूच्या तंत्रानें चाले. त्रिंबकरावमामा पेठे, बाबूराव फडणीस, गोपाळराव पटवर्धन, बाबूजी नाईक व रास्ते या मंडळींशीं सखारामबापूचें वांकडें होतें. या सर्व मंडळींस राघोबाच्या हातीं कारभार राहणें आवडत नव्हतें. तेव्हां ही मंडळी आपल्या विरुद्ध उलटली तर निजामाची मदत घेऊन त्यास चिरडतां यावें म्हणून राघोबानें निजामास आपला दोस्त करून ठेविलें. मग बाबूजी नाइकानें 'सखारामबापूस दिवाणगिरीवरून काढून टाका' असा हट्ट धरला; व गोपाळराव पटवर्धनानें, 'मला कर्ज फार झालें आहे तेव्हां मला देऊं केलेली मिरज माझ्या लवकर हवालीं करा,' असा तगादा लाविला. तेव्हां राघोबा रागावून घरीं बसला व सखारामबापूनें

दिवाणगिरी सोडून दिली. माधवरावाची आई गोपिकाबाई हिनें बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा पेठे या दोघांस कारभारी नेमिलें. मग माधवराव व त्रिंबकरावमामा दक्षिणेकडे फौज घेऊन गेले. मिरज गोपाळराव पटवर्धनाच्या हवालीं करून व तुंगभद्रेपर्यंत स्वारी करून शके १६८४ ( इ. स. १७६२ ) च्या पावसाळ्याच्या आरंभीं ते पुण्यास परत आले.

गोपिकाबाईनें त्रिंबकरावमामा व बाबूराव फडणीस यांच्या साहाय्यानें कारभार चालविला, हें राघोबास व विशेषतः सखारामबापूस मुळींच सहन झालें नाहीं. त्यानें पुण्यांत बसून गुप्तपणें विठ्ठल शिवदेव विंचूरकर, नारो शंकर, आबा पुरंदरे इत्यादि सरदारांशीं कारस्थानें चालविलीं; व थोड्याच दिवसांत राघोबास फिरून अधिकार मिळवून देण्याची व्यवस्था केली. भाद्रपद महिन्यांत राघोबा रुसून पुण्याजवळील वडगांवास गेला. त्याची समजूत करण्यासाठीं गोपिकाबाई स्वतः गेली होती, पण तो परत आला नाहीं. सखारामबापूनें आपल्या पक्षाच्या सरदारांस राघोबाच्या वतीनें सैन्य जमविण्याची इशारत केली; व निजामाची मदत मागण्याकरितां राघोबा औरंगाबादेकडे गेला. ही मराठ्यांत झालेली दुफळी निजामाच्या पथ्यावरच होती. तेव्हां त्यानें आपला दिवाण विठ्ठल सुंदर व मुरादखान यांच्याबरोबर राघोबाच्या मदतीस सैन्य दिलें; व आपण स्वतः मागून साहाय्यास येण्याचें आश्वासन दिलें. राघोबानें वाटेनें येतांना पैठण लुटलें व तो पुण्यावर चाल करून येऊं लागला.

राघोबा चाल करून येऊं लागला तेव्हां त्याच्याशीं टक्कर देण्याची तयारी त्रिंबकरावमामा व बाबूराव फडणीस करूं लागले. अनंतराव रास्ते, नरसिंगराव धायगुडे व पटवर्धन सरदार यांजवर माधवरावाच्या पक्षाची सर्व मदार होती. राघोबाशीं युद्ध करण्याकरितां माधवरावाची

फौज पुण्याहून पुढें चालून गेली. दोन्ही सैन्यांची गांठ घोडनदीवर पडून तेथें लढाई झाली. राघोबानें केलेला हल्ला माधवरावाच्या फौजेनें मोठ्या शर्तीनें परत फिरविला. नंतर समेटाचें बोलणें होत होतें इतक्यांत माधवरावाची फौज हटत हटत आळेगांवीं आली. पेशव्यांनीं आपल्या हस्तगत व्हावें अशी राघोबानें अट घातली. राघोबाशीं युद्धांत आपला टिकाव लागणार नाहीं हें माधवराव जाणून होता. म्हणून चुलत्याच्या स्वाधीन व्हावें असा त्याचा बेत होता. परंतु सरदारांनीं राघोबाशीं फिरून लढाई करण्याचा निश्चय केला. तह न ठरल्यामुळें राघोबा माधवरावाच्या फौजेचा पाठलाग करीत तसाच आळेगांवास आला. तेथें संध्याकाळच्या वेळीं मोठ्या निकराचें युद्ध झालें. सखारामबापूनें माधवरावाच्या फौजेंत फितूर केला होता. त्यामुळें ते लोक पळून गेले. माधवरावानें व पटवर्धन मंडळीनें मोठा पराक्रम केला; पण शेवटीं त्यांस पराजय आला. तेव्हां माधवरावाचें सैन्य भीमा उतरून अलीकडें आलें. तरी राघोबा पाठलाग करण्याचें सोडीना. साऱ्या फौजेस दोन दिवसांचा उपास; तोफांचे बैल थकले; बहुतेक सरदार आपली फौज घेऊन पळून गेले; स्वतः माधवरावाची प्रकृतिही ज्वरामुळें हैराण, अशा स्थितींत राघोबा जवळ आला. तेव्हां निरुपाय म्हणून माधवरावानें राघोबाशीं समेट करण्याचें कबूल केलें. समेट करण्याचें ठरतांच गोपाळराव पटवर्धन मिरजेस निघून गेला. बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा बारामतीस गेले. बाकी फौजेसह माधवराव राघोबाच्या स्वाधीन झाला. राज्याचा अधिकार फिरून राघोबा व सखारामबापू यांच्या हातीं आला. इतकें होतें तों निजामअल्ली आपल्या फौजेसह हजर झाला. त्याला राघोबानें एकावन लक्षांचा मुलूख देण्याचा करार केला होता. आतां त्याचें कांहीं काम नव्हतें; तेव्हां करारापैकीं कांहीं मुलूख त्यास देऊन राघोबानें निजामाची समजूत केली.

राघोबा व सखारामबापू यांच्या हातीं कारभार येतांच माधवरावाच्या पक्षाच्या मंडळींचें पारिपत्य करण्याचा तडाखा सुरू झाला. गोपिकाबाई सिंहगडावर रहात असे. तिला पुण्यांत शनवारवाड्यांत ठेविलें. शनवारवाड्यांत गारद्यांचा पाहरा बसला व माधवरावाच्या डेऱ्याभोंवतींही पहारा बसला. भानूंच्या घराण्यांतून फडाणिशी काढून चिंतो विठ्ठल रायरीकर यास ती दिली. भवानराव प्रतिनिधी याजकडून प्रतिनिधिपद काढून राघोबानें तें आपला अल्पवयी मुलगा भास्करराव यास दिलें व नारो शंकरास त्याचा मुतालीक नेमिलें. पुरंदर व सिंहगड हे किल्ले पुरंदऱ्यांच्या हवालीं केलें. विठ्ठलराव विंचूरकरांस न्यायाधिशी व मोठी जहागीर मिळाली. बाबूराव फडणीस व त्रिंबकरावमामा हेही राघोबाच्या हातीं आले. इतकें झाल्यावर राघोबानें पटवर्धनांचें पारिपत्य करण्याचें ठरविलें. यासाठीं मिरज त्यांच्यापासून घेण्याचें ठरवून राघोबा पुण्याहून निघाला. गोविंद हरी पटवर्धन मिरजेंत राहिला; व त्याचा मुलगा गोपाळराव गोविंद निजामाकडे कुमक मागण्याकरितां गेला. राघोबानें मिरजेस वेढा घालून मिरज काबीज केली व तेथून पुढें त्याचा कर्नाटकांत जाण्याचा बेत होता; इतक्यांत निजामाचा उद्दामपणाचा निरोप कळल्यामुळें त्यास परत फिरावें लागलें.

## ६९ निजामाशीं युद्ध.

### राक्षसभुवनची लढाई.

शके १६८५ ( इ. स. १७६३ ).

रघोबा कारभार पाहूं लागला तेव्हां भवानराव प्रतिनिधी, त्याचा मुतालीक गमाजी यमाजी व गोपाळराव पटवर्धन हे सरदार निजामाकडे गेले. तेव्हां निजामास मराठ्यांचा मुलूख जिंकण्यास ही उत्तम संधि आहे असें वाटलें. या वेळीं निजामअल्लीचा दिवाण विठ्ठल सुंदर हा मागील रामदासपंताप्रमाणेंच कारस्थानी होता. त्यानें निजामास आपला होईल तितका फायदा करून घेण्याची सल्ला दिली. इतक्यांत मराठ्यांचा पाडाव करण्यास एक उत्तम साधन निजामास मिळालें. नागपूरचा रघूजी भोंसले वारून बरेच दिवस झाले होते. त्याच्या गादीवर त्याचा मुलगा जानोजी भोंसले हा होता. त्याच्याकडे प्रतिनिधीचा उलाढाल्या मुतालीक गमाजीबावा गेला, व 'मी तुला सातारची गादी मिळवून देतों' असें त्यानें जानोजीस सांगितलें. तें ऐकतांच जानोजी अगदीं हुरळून गेला ! निजामअल्ली व विठ्ठल सुंदर यांस येऊन तो भेटला; तेव्हां त्यांनीं त्याला सातारचा छत्रपति करण्याचें कबूल केलें. नंतर जानोजी भोंसले व निजाम या दोघांत "साठ-चाळिशींचा" तह झाला. म्हणजे जो नवा मुलूख जिंकायाचा त्याचे साठ हिस्से निजामानें घ्यावे व चाळीस जानोजीस मिळावे. पेशव्यांशीं युद्ध करण्याचा निश्चय कायम झाला, व निजामानें आपल्याकडे आलेल्या सर्व मराठे सरदारांस मोठमोठ्या जाहागिरी देण्याचें कबूल केलें. यामुळें ज्या ज्या मराठे सरदारांत भांडणें होतीं त्यांतील एक पेशव्याकडे तर त्याचा प्रतिस्पर्धी निजामाकडे, अशी स्थिति झाली ! निजामाच

मोठें प्रचंड सैन्य जमलें. मग तो राजधानीकडे जात होता तो मोर्चा फिरवून भीमानदीच्या कांठाकांठानें सोलापूर जिल्ह्याकडे येऊं लागला. याच वेळीं म्हणजे शके १६८४ च्या शेवटीं शेवटीं त्यानें पेशव्यांस पुढीलप्रमाणें उद्दामपणाचा निरोप पाठविलाः—“प्रतिनिधी, पटवर्धन वगैरे सरदारांच्या जहागिरी ज्या तुम्हीं जप्त केल्या त्या त्यांच्या त्यांस परत द्याव्या. जानोजी भोंसल्यास आणखी नवीन जाहगीर द्यावी, भिमेअलीकडचें तुमचें सर्व राज्य आम्हांस देऊन टाकावें. व आम्ही सांगूं तो कारभारी नेमून राज्यकारभार चालवावा. इतकें करीत असाल तर आमचें तुमचें सख्य राहील. नाहीं तर आम्ही तुमच्यावर चालून येऊन आमच्या म्हणण्याप्रमाणें तुम्हांस वागावयास लावूं.”

हा असा उद्दामपणाचा निरोप येतांच राघोबा परत फिरला. निजामाची या वेळीं लाख फौज जमली होती. एवढ्या मोठ्या फौजेशीं आपल्या ४५ हजार फौजेच्या साहाय्यानें टक्कर द्यावयाचें अवघड काम मराठ्यांस करावयाचें होतें. सखारामबापूनें राघोबास स्पष्ट सांगितलें कीं, ‘समोरासमोरच्या लढाईत आमचें कांहीं चालावयाचें नाहीं; तर या वेळीं गनिमी काव्याचाच उपयोग करावा. तो आपल्या मुलुखांत यावयाच्या अगोदर आपण त्याच्या व भोंसल्याच्या राज्यांत धुमाकूळ मांडावा. म्हणजे त्याला आपल्या पाठीवर येणें भाग पडेल. या युक्तीनें आपल्या राज्याचें रक्षण होईल.’ सखारामबापूची ही मसलत सर्वांस पसंत पडली; व राघोबानें पहिल्यानें वऱ्हाडांत जाण्याचा बेत केला. पांच सात हजार फौज मिरजेकडे ठेवून पंचेचाळीस हजार फौजेनिशीं राघोबानें कूच केलें. मराठ्यांचें सैन्य मिरजेहून निघालें तें चौदाव्या मुक्कामीं त्यानें औरंगाबाद गांठलें. तेथें शहरच्या सुभेदाराकडून दोन लाख रुपयांची चिरीमिरी घेऊन तें नेमकें वऱ्हाडांत उतरलें. मराठी सैन्यानें जानोजीचा मुलूख उध्वस्त करण्याचा तडाका चालविला. इतक्यांत मराठी लष्करांत

दहा लक्ष रुपयांची नवी जहागीर देण्याचें पेशव्यांनीं कबूल केल्यावर मल्हारराव होळकर येऊन सामील झाला.

आपल्या प्रांतांत जाऊन मराठी लष्करानें लुटालूट चालविली आहे, हें पाहून जानोजी भोंसल्यानें निजामास मराठी सैन्याचा पाठलाग करण्याविषयीं तगादा लाविला. तेव्हां निजाम व जानोजी हे दोघेही फौजा घेऊन सपाट्यानें वऱ्हाडकडे निघाले. त्यांच्या तोफा, डेरे, बुणगें व पायदळ उंदेरीचा घांट चढून गेलें मात्र, तों पेशव्यांच्या फौजेनें त्याशीं लढाई करण्याची हूल दाखवून त्याच दिशेनें कांहीं मजल चाल केली. पेशवे लढाई करण्यासाठीं येत आहेत असें कळतांच सैन्याची व्यवस्था करून निजाम त्यांची वाट पाहत बसला. पण पेशव्यांची फौज त्याच्या जवळ येऊन जी झुकली ती औरंगाबादेकडे गेली. पेशव्यांनीं आपणांस फसविलें असें कळतांच निजाम खालीं आला. तों औरंगाबादेहून निघून करमाळें उजवें टाकून पेशव्यांचें सैन्य पार सोलापूर–तुळजापूरकडे गेलें. तुळजापुराहून मराठी सैन्य बेदरास गेलें. तेथें त्याच्या तीन टोळ्या करण्यांत आल्या. एकीवर मुख्य राघोबा व माधवराव, दुसरीवर मल्हारराव व नारो शंकर आणि तिसरीवर बाबूजी नाईक व रामचंद्र गणेश. या तिन्ही टोळ्यांनीं वीस पंचवीस मैल अंतरावर राहून बेदरपासून हैद्राबादेपर्यंत मुलूख लुटून जाळून बेचिराख केला.

निजामास मराठ्यांचा पाठलाग करणें अशक्य आहे हें कळून चुकलें. जानोजी भोंसले वगैरे मराठे सरदारांनीं, पेशवे जसें तुमच्या राज्याचा विध्वंस करावयास गेले आहेत तसेंच तुम्ही त्यांच्या राज्यांत धुमाकूळ घाला, अशी निजामास मसलत दिली. मग निजाम औरंगाबादेहून निघाला व अहमदनगरकडे येऊं लागला. निजामानें आपल्या सैन्याचे तीन भाग केले; एका भागावर विठ्ठल सुंदरास मुख्य नेमून त्याला नाशीक–जुन्नराकडे पाठविलें. दुसऱ्यावर गमाजीबावास अधिकारी नेमून साताऱ्याकडे रवाना केलें व भोंसले, धायगुडे, पटवर्धन यांसह आपण स्वतः

पुण्याचा रोंख धरिला. निजाम चाल करून येत आहे अशी बातमी पुणेंकरांस कळतांच त्यांची जी कांहीं त्रेधा झाली ती विचारूं नये ! पुष्कळ लोक जेवढी संपत्ति घेववेल तितकी घेऊन लोहगड, सिंहगड वगैरे किल्ल्यांच्या आश्रयास किंवा तळघाटांत निघून गेले. तरी इकडले लोक निजामाकडे असल्यानें निजामास सर्व ठिकाणचा पत्ता लागला. पेशवे-सरकारचे कारखाने सिंहगडच्या पायथ्याशीं होते, ते भोंसल्याचा सरदार रघोजी करांडे यानें लुटले. लोहगडच्या पायथ्याशीं पुण्याचे लोक जाऊन राहिले होते. त्यांवर निजामानें छापा घालून वीस लक्ष रुपयांची जिनगी लुटली. पुण्यांतील वाडे खणून जाळून टाकण्याचा निजामाचा बेत होता. तेव्हां पुण्यांतील अधिकारी नारो आप्पाजी तुळशीबागवाले यानें गोपाळराव पटवर्धनाच्या मध्यस्थीनें साडे तीन लक्ष रुपये घेऊन निजामानें प्रांतांतून निघून जावें, असा तह केला. तिकडे विठ्ठल सुंदर व गमाजीबावा यांनींही यथेच्छ लुटालूट चालविली होती. इतक्यांत पावसाळा समीप आल्यामुळें निजामानें आपल्या मुलुखांत जाऊन बेदरास छावणी करण्याचा निश्चय केला; व तो परत जाऊं लागला.

या वेळपर्यंत मराठ्यांनींही निजामाच्या मुलुखांत चांगलीच चंगळ मारिली. निजामानें मराठ्यांच्या मुलुखांत जाऊन दंगा केला यास कारण त्याच्याकडे गेलेले मराठे सरदार होत, हें आतां सर्व मराठी मुत्सद्यांच्या मनावर पक्कें बिंबलें होतें. तेव्हां त्यांची समजूत केल्यावर निजामास सहज चेपतां येईल हेंही कळण्यास त्यांस वेळ लागला नाहीं. त्यांच्याशीं एकी करण्याचें ठरलें. त्यांतील प्रमुख म्हणजे जानोजी भोंसले होता. मल्हारराव होळकरांच्या मध्यस्थीनें त्याच्याशीं समेट झाला. बत्तीस लक्षांचा मुलूख त्याला देण्याचें पेशव्यांनीं कबूल केलें. भवानराव प्रतिनिधीस त्याची जहागीर परत देण्यांत आली. नारो शंकराकडची मुतालिकी काढून ती गमाजीबावास देण्यांत आली. फडणिशी बाबूरावास देण्याचें राघोबानें कबूल केलें. पटवर्धनासही मिरज परत देण्याचें ठरलें.

असे ठराव झाल्यावर पावसाळा जवळ आला म्हणून निजामाचा निरोप घेऊन फिरून दसरा झाल्यावर येऊं, अशी त्याला थाप देऊन त्याच्याकडे गेलेले मराठे सरदार त्याच्या लष्करापासून वीस पंचवीस कोसांवर आले. इतक्यांत निजामानें बेदरचा रस्ता सोडून औरंगाबादचा रस्ता धरिला. ही बातमी जानोजीनें पेशव्यांस कळवून निजामानें गोदावरी ओलांडिली नाहीं तोंच त्यास गांठावें असा इशारा दिला. पेशव्यांनीं जलद कूच केलें व आषाढ व॥ अमावास्येस ते राक्षसभुवनापासून आठ कोसांवर आले. तेथें त्यांस अशी बातमी लागली कीं, निजामानें गोदावरी ओलांडली आहे पण दहा पंधरा हजार निवडक स्वार, पांच सात हजार गारदी व आठ दहा तोफा येवढ्यांसह विठ्ठल सुंदर मात्र अजून अलीकडल्या तीरीं आहे. हें ऐकतांच मध्यरात्रीच्या सुमारास मराठी सैन्यानें कूच केलें व शके १६८५ श्रावण शु० १ स ( इ. स. १७६३ ) सूर्योदयानंतर विठ्ठल सुंदरास गांठलें. आबा पुरंदरे व हुजूरपागेचे सरदार अघाडीस होते. त्यांच्यावर निजामाच्या फौजेनें तोफा सुरू केल्या, परंतु थोडक्याच वेळांत निजामाच्या तोफखान्यांतच घोंटाळा झाला. त्याबरोबर संधि साधून आबा पुरंदरे व विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं शत्रूच्या मोर्चावर हल्ला केला व तो उधळून लावून ते शत्रूच्या सैन्यांत शिरले. तों मागून खुद्द राघोबा सैन्याची टोळी घेऊन कापाकापी करीत आंत गेला. इतक्यांत विठ्ठल सुंदरानें आपल्या लोकांनिशीं मोठ्या आवेशानें हल्ला करून पुरंदरे व विंचूरकर यांस पार हुसकून दिलें. नंतर सारें निजामाचें सैन्य, मध्यभागीं सांपडलेल्या एकट्या राघोबावर तुटून पडलें. त्या वेळीं राघोबानें पराक्रम करून बराच वेळ आपला बचाव केला; परंतु शेवटीं तो शत्रूच्या हातीं लागतो कीं काय असें वाटूं लागलें. अशा कठीण प्रसंगीं कुमक पाठवून राघोबास माधवरावानें सोडविलें. या युद्धांत सैन्यांत स्वतः हिंडून माधवराव व्यवस्था पाहत होता व लोकांस उत्तेजन देत होता. एकदां राघोबा सुटल्यावर

मराठ्यांनीं असा निकराचा हल्ला केला कीं त्यामुळें शत्रूची अगदीं गाळण उडाली. खुद्द विठ्ठल सुंदर मारला गेला. आणखी निजामाचे बावीस सरदार जखमी होऊन कैद झाले. निजामाचें बहुतेक सैन्य कापलें गेलें ! निजामअल्ली उत्तरतीरावर होता व तिकडून प्रथम त्यानें मराठ्यांवर तोफा सुरू केल्या होत्या, पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. रात्र पडतांच सर्व जड सामान तेथल्या तेथें टाकून तो औरंगाबादेस पळून गेला. या युद्धांत मराठ्यांस जें यश आलें तें माधवरावाच्या शौर्यामुळें व मेहनतीमुळें होय. ही गोष्ट राघोबानें गोपिकाबाईस लिहिलेल्या एका पत्रांत कबूल केली. " चिरंजीव रायांनीं यंदां शिपायीगिरींत व मेहनतींत कांहीं कमी केली नाहीं. आम्हांपेक्षां अधिक झाले. इतके दिवस त्यांनीं लढाई देखिली नव्हती. पहिली लढाई पाहिली. यांत सर्व प्रकारें तरतूद अधिक केली. ह्यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करीत आहेत. "[१]

आठ दिवसांनीं गोदावरीचें पाणीं उतरतांच मराठी लष्कर उत्तरतीराला जाऊन औरंगाबादेकडे चाललें. तेथें जाऊन पेशव्यांनीं त्या शहरास वेढा दिला. पण आतां दोन्ही बाजू युद्धास कंटाळल्या होत्या. पावसाळा असल्यामुळें लष्करांतील लोकही घरीं जाऊं लागले. तेव्हां उभयपक्षीं तह ठरला. निजामानें उदगीरच्या लढाईंत मराठ्यांनीं घेतलेला बासष्ट लक्षांचा प्रांत बहुतेक परत घेतला होता. या तहांत निजामानें एकंदर ब्यायशीं लक्षांचा मुलूख मराठ्यांस दिला. अशा रीतीनें पेशव्यांपासून भिमेअलीकडचा सर्व प्रांत मागणारा निजाम बाळाजी बाजीरावाच्या वेळेप्रमाणें नरम आला. याप्रमाणें यशस्वी होऊन व सर्व सरदारांस कबूल केल्याप्रमाणें जहागिरी व अधिकार देऊन राघोबा व माधवराव दोघेही आश्विन महिन्यांत पुण्यास आले.

---

१ ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग दुसरा, लेखांक ३४७.

## ७० हैदरचा पुंडावा.

निजामाशीं चाललेलें युद्ध संपून पुण्यास परत आल्यावर राघोबानें सर्व राज्यकारभार माधवरावावर सोंपविला, व आपण स्वतः स्नानसंध्या करण्याकरितां नाशिकास निघून गेला. माधवरावाच्या हातीं कारभार येतांच त्याला पहिली गोष्ट करावी लागली ती हैदरअल्लीचें पारिपत्य ही होय. त्याची हकीकत समजण्यापूर्वीं 'हैदर कोण ? त्याचें पारिपत्य करण्याची कां जरूर पडली ?' या गोष्टी कळणें अवश्य आहे.

महाराष्ट्राच्या दक्षिणेस असलेल्या कर्नाटक प्रांताचे, तुगभंद्रेच्या उत्तरेकडचा उत्तर कर्नाटक व दक्षिणेकडचा दक्षिण कर्नाटक, असे दोन भाग आहेत. त्यापैकीं दक्षिण कर्नाटकांत म्हैसूरचें संस्थान असून त्याची राजधानी श्रीरंगपट्टण असल्याची माहिती मागें आलीच आहे. म्हैसूरच्या राज्यांत हैदर नांवाचा, एका गरीब नाइकाचा मुलगा, होता. म्हैसूरच्या राजाचा प्रधान नंदराज यानें एकदां एका किल्ल्यास वेढा घातला होता. त्या वेळीं हैदराचा पराक्रम व हुशारी नंदराजास दिसून आली. त्यानें लागलीच हैदरास पन्नास स्वार व दोनशें पायदळाचा नाईक नेमिलें. नासिरजंग जेव्हां मुझफरजंगाचें बंड मोडण्यास गेला त्या वेळीं व पुढें इंग्रजास फ्रेंचाविरुद्ध मदत करण्याकरितां नंदराजानें सैन्य पाठविलें होतें, या दोन्ही मोहिमांत हैदर नाईक हजर होता. व त्यानें त्या स्वाऱ्यांत असतां लुटालूट व लुच्चेगिरी करून आपलें बळ बरेंच वाढविलें. १५०० स्वार, ३००० गारदी, २००० प्यादे व चार तोफा इतका मोठा सरंजाम तो बाळगूं लागला. नंदराजाची हैदरवर बहाल मर्जी झाली.; व त्यानें त्यास दिन्दीगल या डोंगराळ मुलुखाचा सुभेदार नेमिलें. त्या प्रांतांत

व्यवस्था राखण्यास आपल्यास किती त्रास पडतो याची खोटीं रसभरित वर्णनें तो सरकारांत लिहून धाडीत असे. नंदराजास भुरळ पडून हैदरचें म्हणणें खरें वाटूं लागलें. हैदरानें फौजेची गणती करतांना खोटे आंकडे देऊन खुशाल पैसे उपटावेत. जर कोणी वरून अंमलदार तपासणीस आले तर त्यांची मूठ दाबून धडधाकट लोकांच्या पायास हळदीचीं फडकीं गुंडाळावीं; व या ढोंगी जखमी लोकांची परेड करून जखमपट्टीची जादा रक्कम उपटावी ! अशा युक्त्या करून हैदरानें खूप पैसा मिळविला. त्यानें पांदेचरीहून फ्रेंच कारागीर आणून तोफा ओतण्याचा व दारू तयार करण्याचा कारखाना घातला ! अशा रीतीनें हैदरचें सामर्थ्य इतकें वाढलें कीं थोड्याच दिवसांत म्हैसूरच्या राज्यांत हैदर करील ती पूर्वदिशा असें झालें.

म्हैसूरचा राजा चिक कृष्णराज सर्वस्वी नालायक होता, व राज्याचा सर्व कारभार त्याचा दिवाण नंदराज हाच पाहत असे. हैदरानें नंदराजास कारभारांतून काढून टाकण्यासाठीं एक खाशी युक्ति केली. दिंदिगल, कोइमतूर, बंगलूर व मराठ्यांकडून परत मिळालेले चौदा सुपीक परगणे, म्हणजे म्हैसूरच्या राज्यापैकीं सुमारें अर्धा भाग, हैदरानें जहागीर म्हणून लाटला होता. त्यामुळें म्हैसूरच्या खाजिन्यांत त्यावेळीं पैशाची टंचाईच होती. अशा स्थितींत सैन्याची बऱ्याच दिवसांची बाकी तुंबली होती. म्हैसूरच्या सैन्यांतील सर्व लोकांस हैदर प्रिय झाला होता. त्यानें सैन्यांतील लोकांस आपल्या घरीं बोलावून ‘ तुम्ही बाकीबद्दल धरणें धरून बसा ’ असें सांगितलें व पुढें काय काय करावयाचें हें सर्व पढवून ठेविलें. प्रथम ते लोक हैदरच्या घरीं धरणें देऊन बसले. हैदरनें त्यास सांगितलें “ मजकडे काय ? राज्याचा कारभार नंदराज पाहतात त्यांजकडे तुम्ही जा व त्यांस आपला पगार मागा. ” मग त्या लोकांनीं असा हट्ट धरिला कीं, “ तुम्ही आम्हांबरोबर येऊन नंदराजाकडून आम्हांस पगार मिळवून द्यावा. ” या लोकांच्या हट्टापुढें आपलें

कांहीं चालत नाहीं असें ढोंग करून हैदरनें त्या लोकांसह नंदराजाच्या घरीं येऊन धरणें दिलें. सैन्याचें धरणें आपल्या घरीं आलेलें पाहून नंद-राज अगदीं घाबरून गेला. तो सैन्यास म्हणाला, " बाबांनो, माझ्यानें आतां कारभार होत नाहीं. मी कारभार सोडून कोठें तरी जाऊन स्वस्थ हरिहरि म्हणत बसणार, मग मला आतां पगाराबद्दल कशाला बरें त्रास देतां ? " मग ते लोक म्हणाले, " बरें, तर आम्ही राजाकडे जाऊं. आमची उपासमार होत आहे. आजच्या आज पगार मिळाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीं. " इतकें बोलून हैदरास पुढें घालून ते राजद्वारीं गेले. नंतर राजानें हैदरकडून सर्व लोकांसमक्ष " मी राजाशीं इमानानें वागेन, नंदराजाप्रमाणें बेइमान होणार नाहीं " अशी शपथ घेवविली. ही शपथ हैदरनें घेतल्याबरोबर राजानें जाहीर केलें कीं, ' आजपासून नंदराजास काढून टाकून हैदरअल्लीस आम्हीं दिवाण नेमिलें आहे. फौजेच्या देण्याची तजवीज ते करतील.' हें राजाचें बोलणें ऐकतांच धरणें उठलें, व लोक घरोघर निघून गेले. हें वर्तमान शके १६८२ त घडलें. पुढें एक दोन वर्षांत हैदरनें राजास आपल्या पूर्ण कह्यांत आणिलें. शेवटीं हैदरनें राजास तीन लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून देऊन तें उत्पन्न खात बसावयास लाविलें. व तेव्हांपासून हैदर स्वतःच म्हैसूरचा राजा झाला ! मराठ्यांचा पानिपतास पराभव झाल्याची खबर ऐकतांच या स्वारीनें खुशाल उत्तरेकडे पाय पसरण्यास सुरुवात केली. त्यानें तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील सर्व मुलूख जिंकला. चित्रदुर्ग, रायदुर्ग, हरपनहळ्ळी येथील संस्थानिकांपासून खंडण्या घेतल्या व बिदनुरावर चाल करून तो सर्व प्रांत हाताखालीं घातला. बिदनूरच्या वायव्येस कारवार जिल्ह्यांत सोंधें संस्थान होतें. तेंही त्यानें काबीज केलें, व आतां तुंगभद्रेच्या उत्तरेस त्याची गडबड सुरू झाली. सावनूरच्या नबाबास तंबी देऊन त्याच्यापासून हैदरनें दोन लक्ष खंडणी काढली. नंतर मीर फैजुल्ला नांवाच्या आपल्या सरदारास उत्तर कर्ना-

टक म्हणजे हल्लींचे बेळगांव, धारवाड व विजापूर हे जिल्हे जिंकण्याच्या कामगिरीवर ठेवून तो स्वतः बिदनुरास परत गेला. मीर फैजुल्ल्यानें धारवाड वगैरे पुष्कळ ठाणीं घेतलीं; व त्याच्या स्वाऱ्या वर्धा, घटप्रभा, मलप्रभा या नद्या ओलांडून जवळ जवळ कृष्णातीरापर्यंत होऊं लागल्या; मराठी राज्याच्या दक्षिणेस हैदरचा असा दंगा चालला होता. या वेळीं माधवराव निजामाशीं लढण्यांत गुंतला होता. औरंगाबादेचा वेढा आटोपून लवकर तह उरकून घेण्याची माधवरावानें घाई केली, त्याचें कारण हैदरअल्लीनें चालविलेला दंगाच होय.

---

# ७१ हैदरअल्लीवरील पहिली स्वारी.

शके १६८५–८६ ( इ. स. १७६४ ).

माधवराव शके १६८५ च्या पौषाच्या आरंभीं हैदरवर स्वारी करण्यास निघाला. अजून सैन्य जमलें नव्हतें. सैन्य जमेपर्यंत दक्षिण महाराष्ट्रांतील किरकोळ कामें करून घेण्याचा माधवरावानें विचार केला. माधवरावास पुण्याहून निघून सुमारें तीन महिने झाल्यावर मराठ्यांची फौज जमा झाली. या स्वारींत पंधरा हजार हुजरात व इतर जहागीरदारांची फौज मिळून एकंदर चाळीस हजार फौज जमली होती. पेशवे हैदरचा समाचार घेण्यास येत आहेत असें कळतांच सावनूरच्या नबाबास आनंद झाला. सावनूरकर नबाब व मुरारराव घोरपडे हे दोघे येऊन मिळाल्यावर पेशव्यांची फौज सत्तर हजारपर्यंत झाली, पण इतकी फौज लढाईस कधींच तयार नसे. पुष्कळ लोक ठाणीं काबीज करण्यास व काबीज केलेल्या ठाण्यांचें संरक्षण करण्यास

लागत. सामान्यतः पेशव्यांबरोबर लढती फौज तीस हजार स्वार, पांच चार हजार गारदी व वीसपर्यंत तोफा इतकीच असे.

मराठे आपल्यावर चाल करून येत आहेत असें पहातांच हैदरनेंही लढाईची तयारी केली. मराठ्यांशीं मैदानांत टिकाव लागावयाचा नाहीं हें हैदर जाणून होता. याकरितां डोंगराचा व जंगलाचा आश्रय करून आपण रहावें व मराठ्यांच्या सैन्यावर गुप्त छापे घालून त्यास जेर करावें असा त्यानें बेत केला. त्यानें मीर फैजुल्यास दहा पंधरा हजार फौजेसह धारवाड प्रांतीं ठेविलें व स्वतः तीस हजार गारदी, बारा हजार स्वार, पन्नास तोफा व सुमारें वीस हजार कानडी प्यादे यांसह तुंगभद्रेच्या आसपास अनवडी येथें छावणी केली.

माधवरावानें पहिल्यानें तुंगभद्रेच्या अलीकडचीं हैदरनें घेतलेलीं कांहीं ठाणीं सोडविलीं. पण ठाणीं घेण्यांत व्यर्थ वेळ न घालवितां तुंगभद्रेपार जाऊन चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी इत्यादि ठिकाणच्या संस्थानिकांपासून खंडणी काढावी व तिकडील मुलूख उध्वस्त करावा असा माधवरावानें बेत केला. आपण दूर गेलों ही बातमी ऐकून हैदर जर मैदानांत येऊन आपल्या ठाण्यांस त्रास देऊं लागेल तर आपण उलटावें व झटदिशीं त्याच्या सैन्यास गांठून त्याचा संहार करावा असा माधवरावानें बेत केला; व सावनूरकराचें रक्षण करण्याचें काम गोपाळराव पटवर्धनास सांगून माधवराव तुंगभद्रा उतरून चित्रदुर्गाकडे गेला. पेशवे लांब गेले असें पाहतांच हैदरानें अनवडीहून छावणी हलवून सावनूरच्या राज्यांतील रट्टेहळ्ळीस आणिली व तो आसपास घिरट्या घालूं लागला. तो बंकापुरापासून पांच कोसांवर आल्याची बातमी माधवरावास सात आठ दिवसांत कळली. त्याबरोबर त्यानें लष्कर परत फिरविलें व चैत्र व॥ अमावास्येच्या सुमारास माधवराव सावनूरच्या आसपास आला. हैदर बेसावध होता. त्याच्यावर रट्टेहळ्ळीजवळ सर्व मराठी फौजेनें असा जोरानें हल्ला चालविला कीं आपण यांतून कसे वांचतों असें हैदरास

झालें. पण लवकरच रात्र पडली; त्यामुळें हैदराचा बचाव झाला, व सकाळीं तो आपल्या छावणींत जाऊन दाखल झाला. आतां पावसाळा समीप आला होता. तेव्हां माधवरावास त्या प्रांतींच छावणी करावयाची कीं काय हा विचार करणें प्राप्त झालें. त्यानें शेवटीं हैदरचा पक्का बंदोबस्त केल्याशिवाय परत जावयाचें नाहीं असें ठरवून त्याच प्रांतीं छावणी करण्याचा बेत केला. पेशव्यांचा छावणी करण्याचा निश्चय ठरला हें पाहून हैदरास वाईट वाटलें. पण करतो काय ? आलेल्या प्रसंगास तोंड देणें त्याला भाग होतें. त्याची धारवाड प्रांतीं धारवाड, बंकापूर व शिरहट्टी हीं तीन मुख्य ठाणीं होतीं. त्यांपैकीं बंकापूर हें ठाणें सावनूरपासून तीन कोसांवर होतें. तेव्हां तेथील फौज वाढवून सावनूरास त्रास देण्याचा हैदरानें क्रम आरंभिला. पण गोपाळराव पटवर्धनाची माधवरावानें तिकडे रवानगी केल्याबरोबर हैदरचें कांहीं चालेनासें झालें. भाद्रपद महिन्यांत माधवरावानें धारवाडास वेढा घातला; व आंतील शिबंदीस हैदराकडून मदत पोहोंचूं नये म्हणून गोपाळराव पटवर्धनास जवळच टेहेळणी करण्यास ठेविलें. इकडे हैदरानें सावनुरास त्रास देण्याचा सारखा क्रम चालविला होता. पण त्यापासून मराठ्यांचें विशेषसें नुकसान झालें नाहीं. धारवाड कार्तिक शुद्ध १२ स पेशव्यांच्या हातीं आलें. मग माधवरावानें हैदरास गांठून लढाई करण्याचा निश्चय केला. हैदर या वेळीं अनवडीस होता. तिकडेच मराठ्यांच्या फौजा चालल्या. मग एक टेंकडी हैदराच्या लष्कराजवळ उत्तम मान्याची जागा म्हणून सखारामबापूप्रभृतींनीं पसंत केली. तीवर तोफा चढवून माधवराव तिच्या पायथ्याशीं राहिले. टेंकडीपासून हैदराच्या छावणीपर्यंत जंगल होतें; त्या जंगलाच्या तोंडीं पटवर्धन व मुरारराव घोरपडे यांस ठेविलें. मग टेंकडीवरून तोफांचा मारा सुरू झाला. त्याबरोबर हैदरच्या लष्करांतील लोक पटापट मरूं लागले. हैदर अगदीं कावून गेला. त्यानें टेंकडीवरील तोफा हल्ला करून घेण्याचा धाडसी बेत केला.

झाडीच्या तोंडाशीं तो अकस्मात् प्रगट झाला. तेथें मुरारराव व पटवर्धन यांनीं लढण्याची शिकस्त केली. पण त्याच्या तोफांपुढें त्यांचें कांहीं चालेना. त्यांचे लोक पळून जाऊं लागले; तरी मुरारराव न डगमगतां तसाच झुंजत होता. इतक्यांत माधवरावास हें वर्तमान कळलें; व तो घोड्यावर स्वार होऊन हुजरातेंसह धांवून आला. तेथील स्थिति पहातांच माधवराव मारामार करीत शत्रूंच्या व्यूहांत शिरला व त्यानें गारद्यांच्या कत्तलीस सुरवात केली. तितक्यांत घोरपडे, विंचूरकर व पटवर्धन यांनींही एकदम हल्ला केला. त्यामुळें हैदर हतवीर्य होऊन फौजेसह पळूं लागला. मराठ्यांनीं झाडींत शिरून शत्रूचा पाठलाग केला; व त्याच्या पांचही तोफा, तीन हजार बंदुका व सातशें घोडे इतकी लूट मिळवून आणली. यापासून माधवरावाचा हैदरास असा कांहीं वचक बसला कीं, तो स्वतः ज्या फौजेंत असेल तिच्याशीं झुंजण्याचें धाडस हैदरानें केलें नाहीं; व त्याच्या लष्करापासून वीस पंचवीस कोसांच्या टापूंत तो कधीं फिरकला नाहीं !

या लढाईच्या दुसऱ्या दिवशीं माधवरावानें सर्व लष्कर अनवडीस आणलें; हैदरास बिदनूरकडून धान्याचा पुरवठा होत असे; तो मराठ्यांनीं बंद केला व त्याला चोहों बाजूनें घेरिलें. तेव्हां तेथें राहिल्यास खास आपल्यास उपाशीं मरावयास लागेल, असें मनांत येऊन हैदर आपलें सर्व लष्कर घेऊन झाडींतून बिदनूरास जाऊं लागला; पण माधवरावानें बिदनूरच्या वाटेंत आपल्या सैन्याचा एक भाग नेऊन ठेवला असल्यामुळें हैदरास लढाईस उभें राहाणें भाग पडलें. मराठ्यांनीं चोहोंकडून एकदम हल्ला केला. हैदराचे कित्येक हजार गारदी ठार झाले. पंचवीसशें स्वार व दहा हजार पायदळ इतक्यांनिशीं हैदर बिदनूरास पळून गेला. हजारों घोडे, उंटें, बाजारबुणगें, तोफा, व बंदुका मराठ्यांस मिळाल्या ! यानंतर हैदरकडून तहाचें बोलणें करण्याकरितां वकील आला. पण अटी न जुळल्यामुळें पुनः लढाई सुरू झाली. माधव-

रावानें राघोबास कर्नाटकांत बोलाविलें होतें. त्याचें कारण असें कीं जरी राघोबानें स्नानसंध्या करून राहण्याचा पेशा उचलला होता तरी हलक्या लोकांच्या नादीं लागून पुतण्याविरुद्ध कारस्थानें करण्यास सुरुवात केली होती. ही बातमी ऐकून माधवरावास चिंता पडली व त्यानें राघोबास कर्नाटकांत बोलाविलें. त्याप्रमाणें राघोबा दसऱ्यास नाशिकाहून निघाला. माधवराव चित्रदुर्ग, हर्पनहळ्ळी वगैरे संस्थानांची खंडणी घेण्यास जात होता. त्यास माघ शु. ६ स राघोबा मिळाला. खंडण्या घेतल्यावर राघोबाचा हैदरास मैदानांत काढण्याकरितां श्रीरंगपट्टणावर हल्ला करण्याचा विचार होता. पण अशा रीतीनें हैदरास वठणीस आणण्यास बरेच दिवस लागतील असें वाटल्यामुळें बिदनूरवरच चालून जाण्याचें ठरलें. या मसलतीप्रमाणें मराठे बिदनूरपासून दहा कोसांवर येऊन दाखल झाले. हें पाहतांच आपले सर्व उपाय थकले असें वाटून हैदर मराठ्यांस शरण आला. मग उभयपक्षीं तह ठरला. उत्तर कर्नाटकपैकीं हैदरनें घेतलेला मराठ्यांचा सर्व मुलूख परत द्यावा, म्हैसूरच्या खंडणीबद्दल मराठ्यांस बत्तीस लक्ष रुपये द्यावे व सावनूरकर नबाब व मुरारराव घोरपडे या दोघांस त्यानें यापुढें मुळींच त्रास देऊं नये. हा तह हैदरास फायदेशीर झाला असें माधवरावाचें मत होतें, व म्हणून त्यास तो मुळींच आवडला नाहीं; पण मोहिमेचा सर्व अधिकार आतां राघोबास दिला असल्यामुळें त्यास कांहीं बोलतां आलें नाहीं.

## ७२ राघोबाची उत्तरहिंदुस्थानावरील तिसरी स्वारी.

शके १६८८ ( इ. स. १७६६ ).

हैदरवरील स्वारी संपवून राघोबा परत आला नाहीं तोंच त्यानें राज्याची अर्धी वांटणी देण्याबद्दल माधवराशीं भांडण लाविलें. तेव्हां माधवराव बोलला, " राज्य कोणाचें ! आम्ही वांटणार कोण ? आमच्यानें वांटवत नाहीं, सर्व राज्य तुमचेंच आहे. आम्ही चार बारगीर तसें तुम्हाजवळ असों. सर्व तुम्ही करणें. " शेवटीं माधवराव आपलें ऐकत नाहींसें पाहून राघोबानें वांटणीचा आग्रह सोडला.

राघोबा केव्हां उलटेल याचा नेम नव्हता. अशा स्थितींत भोंसले व निजाम हे जर दोघे त्यास मिळाले तर त्याचें बंड यशस्वी होण्याचाही संभव होता. म्हणून याच वेळीं माधवरावानें निजामाशीं कायमचें सख्य करून टाकलें. परस्परांनीं एकमेकांस मदत करावी; जो एकाचा शत्रु तो दुसऱ्याचा शत्रु अशी परस्पर वागणूक असावी; कर्नाटकच्या मोहिमा दोघांनीं मिळून कराव्या असें ठरलें. यानंतर पहिल्यानें जानोजी भासल्याचें पारिपत्य करण्याचें पेशवे व निजाम या दोघांनीं मिळून ठरविलें. मागें निजामाकडे फितूर होऊन बत्तीस लक्षांचा मुलूख जानोजीनें लाटला होता; म्हणून माधवरावाचा त्याच्यावर राग होता; व आयत्या वेळीं आपल्या पक्षास सोडून पेशव्यास जाऊन मिळाला म्हणून निजामअलीही त्याच्यावर रागावला होता. शके १६८७ च्या कार्तिकाच्या आरंभीं माधवराव पुण्याहून वऱ्हाडच्या रोखें निघाला. कायगांवटोक्या-

---

१ ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग तिसरा, लेखांक ५७४.

जवळ निजामचा दिवाण रुकुनउद्दवला सातआठ हजार फौजेसह त्यास मिळाला. रघुनाथरावही फौजेसह नाशकाहून निघून कसबे भंडारी (परगणे बाळापूर) येथें माधवरावास मिळाला. येवढ्या फौजेबरोबर लढण्याची जानोजी भोंसल्याची तयारी नव्हती, त्यामुळें रघुनाथरावामार्फत त्यानें तहाचें बोलणें लाविलें. शेवटीं तह ठरून दोन वर्षांपूर्वी मिळालेल्या बत्तीस लक्षांच्या मुलुखापैकीं चोवीस लक्षांचा मुलूख परत देण्यास जानोजी तयार झाला. या चोवीस लक्षाच्या मुलुखापैकीं नऊ लक्षांचा आपल्याकडे ठेवून बाकी पंधरा लक्षांचा मुलूख माधवरावानें कायमची दोस्ती राखण्यासाठीं निज़ामास देऊन टाकला.

पानिपताच्या लढाईनंतर उत्तर प्रांतीं रोहिले, पठाण, अयोध्येचा नबाब व इंग्रज या सर्वांनीं मराठ्याचें वर्चस्व कमी करण्याचा व त्यांचा मुलूख बळकाविण्याचा उपक्रम केला होता. त्याचप्रमाणें माळव्याच्या उत्तर, वायव्य व पश्चिम सीमांवर राजपूत संस्थानिक, जाट व बुंदेलखंडांतील संस्थानिक यांनींही बंडाळी माजविली होती; तिकडे नांव घेण्यासारखा मराठा सरदार मल्हारराव होळकर येवढाच होता. पण तो एकदां सुजाउद्दवला व बंगालचा नबाब मीरकासीम या दोघांस इंग्रजांविरुद्ध मदत करण्याकरितां गेला असतां एके रात्रीं इंग्रजांनीं अचानक येऊन त्याच्या फौजेवर छापा घातला, व तीस उधळून लाविलें. तेव्हांपासून मल्हाररावही हलाखींतच होता. हें पाहून माधवरावानें राघोबास हिंदुस्थानांत पाठविण्याचें ठरविलें व राघोबानेंही स्वारीवर जाण्याचें कबूल केलें. भोंसल्याशीं तह ठरतांच राघोबा हिंदुस्थानच्या स्वारीस निघाला. त्याच्याबरोबर जानोजी भोंसल्यानें आपला भाऊ मुधोजी यास पांच सात हजार फौजेसह दिलें. नारो शंकर व विठ्ठल शिवदेव विंचूरकर हे सरदार हजर होते. माळव्यांत गेल्यावर राणोजी शिंद्याचा मुलगा महादजी शिंदे, पवार व मल्हारराव होळकर हे सरदार येऊन मिळाले. एकंदर फौज चाळीस हजार झाली.

राघोबानें हिंदुस्थानांत दोन कामें करण्याचें ठरविलें होतें. एक रोहिले व अयोध्येचा नबाब यांशीं राजकारण करून दिल्लीच्या पादशाहीचा बंदोबस्त करण्याचें व दुसरें जाट संस्थानिक व रजपूत राजे यांस ताब्यावर आणावयाचें. यांपैकीं प्रथम कोणचें करावें याविषयीं वाटाघाट चालली असतां शके १६८८ ज्येष्ठ शु० ११ स मल्हारराव होळकर मृत्यु पावला. त्यामुळें राघोबाचे बेत विस्कळित होऊन तो काल्पी येथें पावसाळ्यांत छावणी देऊन राहिला. पावसाळा संपतांच पहिल्यानें जाटांचा समाचार घेण्याचें राघोबानें ठरविलें. या जाटांपैकीं ग्वाल्हेरीजवळील गोहदचा राणा फार प्रबळ झाला होता. बाजीराव पेशव्याच्या वेळीं मराठ्यांची कामगिरी बजावल्यामुळें त्यास बाजीरावाकडून गोहदचा परगणा व किल्ला जहागीर मिळाला होता. परंतु पानिपताच्या स्वारीनंतर तो राणा स्वतंत्र झाला व त्यानें मराठ्यांचा बराच मुलूख बळकाविला. तेव्हां राघोबानें त्याचें शासन करण्याचा निश्चय करून गोहदेस वेढा घातला. गोहदकर शूर संस्थानिक असून आपल्या राजधानीचें संरक्षण करण्याकरितां मोठ्या निकरानें झुंजत होता, व राघोबाही हट्टास पेटून मोर्चे लावून बसला. मराठ्यांचे लोक धान्य गोळा करण्याकरितां आसपास हिंडत असतां जाट छापा घालून हत्ती व घोडीं धरून नेऊं लागले; त्यामुळें मराठी लष्करांत महागाई झाली. शेंकडा वीस रुपये व्याज कबूल करूनही कोठें पैसा मिळेना. त्यामुळें लष्करचे रोजमुरे तुटले व फौजेंत दंगे होऊं लागले. गायकवाड व मल्हाररावाचा नातू मालीराव लष्कर सोडून गेले ! व आणखीही बरेच लोक जाऊं लागले. राघोबाजवळ अवघी वीस हजार फौज राहिली. तींत महादजी शिंद्याची दहा हजार होती. अशा स्थितींत गोहदकरास मदत करण्याकरितां भरतपूरचा जाट चंबळेपर्यंत आला. आतां विलंब न करितां हल्ला करून किल्ला घ्यावा असा राघोबानें बेत केला. महादजीनें हल्ला करूं नये म्हणून सल्ला दिला पण राघोबानें न ऐकतां हल्ला चढ-

विला. तीनदां हल्ला केला पण तीनही वेळां परत फिरावें लागलें. वेढ्याचें काम तसेंच रेंगाळत चाललें होतें. शेवटीं शिंद्याच्या मध्यस्थीनें पंधरा लक्ष खंडणी घेऊन राघोबानें वेढा उठविला.

चंबळेपार तळ देऊन भरतपूरकर जाट अजून होताच. रोहिलेही यमुनेचे घाट रोंखून बसले होते. इंग्रज व सुजाउद्दवला यांनींही मराठ्यांच्या प्रतिकाराची तयारी केली होती. या सर्व शत्रूंस गप्प बसावयास लावण्याइतकी राघोबाची तयारी नव्हती. यामुळें बुंदेलखंडांत बहिरो अनंत व विठ्ठल शिवदेव या दोघांस बंदोबस्तास ठेवून राघोबा उज्जनीस गेला.

तेथें एक नवीनच मसलत उपस्थित झाली. मल्हाररावाच्या मागें त्याचा नातू मालीराव यास सरदारीचीं वस्त्रें दिलीं होतीं. पण तो लवकरच वारला. तेव्हां होळकराचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड यानें राघोबाशीं ठरविलें कीं,मालीरावाची आई अहिल्याबाई हिच्या मांडीवर एकादा अज्ञान मुलगा दत्तक देऊन गंगाधरपंतानें सर्व कारभार चालवावयाचा व अहिल्याबाईच्या हातीं काडीइतकी सत्ता ठेवावयाची नाहीं. ही मसलत अहिल्याबाईसारख्या बाणेदार बायकोस मुळींच पसंत पडली नाहीं. तिनें राघोबास निरोप पाठविला कीं, “ माझ्या राज्यांत मी आपल्या मालकीनें व्यवस्था करणार. गंगोबास हात घालण्याचें कांहीं कारण नाहीं. याउप्पर जर तुम्ही मध्यें पडाल तर मी लढाईस तयार आहें. माझा पराभव झाल्यास मी बायकोमाणूसच आहें. पण तुमचा पराभव झाल्यास बेअब्रूस पारावार नाहीं. ” माधवरावासही अहिल्याबाईचें म्हणणें मान्य होतें. तेव्हां राघोबानें आपला हेका सोडिला. मल्हाररावाच्या भाऊबंदांपैकीं तुकोजी नांवाचा एक शूर सरदार होता. त्यास अहिल्याबाईनें आपल्या फौजेवर मुख्य नेमिलें व गंगोबास दिवाणगिरीवरून काढून सर्व जहागिरीचा बंदोबस्त तिनें आपल्या हातीं घेतला. आपला बेत फसल्याबद्दल विषाद मानून राघोबा परत आनंदवल्लीस आला.

# ७३ राज्यकारभार.



पानिपतासारखें भयंकर अरिष्ट मराठ्यांवर कोसळलें, राघोबानें घरगुती तंटे करण्यास सुरुवात केली, निजामअल्ली व हैदर या महात्त्वाकांक्षी लोकांनीं मराठी राज्याचे लचके तोडण्याचा उपक्रम केला. अशा बिकट स्थितींत तरुण माधवरावानें मराठी राज्याचा जम बसवून निजाम व हैदर या दोघांसही थप्पड देऊन कसें गप्प बसावयास लाविलें, याची हकीकत मागें आलीच आहे. शके १६८७ व ८८ या दोन सालांतील पावसाळ्यांत माधवरावास कांहींशी फुरसत सांपडली. तिचा उपयोग त्यानें आपण नेमलेले अधिकारी करवसुलीच्या बाबतींत कसे काय वागतात, हें पाहण्याकडे केला. त्याच्या दरबारांत बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नानाफडणीस, मोरोबादादा फडणीस, महादजीपंत गुरुजी, नारो अप्पाजी तुळशीबागवाले, हरिपंत फडके, रामाजीपंत चिटणीस, माधवराव जाधवराव, गोविंद शिवराम खासगीवाले, कृष्णराव बल्लाळ काळे वगैरे हुशार माणसें होतीं. त्यांच्या सहाय्यानें राज्यांतील अंत:स्थिति सुधारून प्रजेस सुख लागावें यासाठीं माधवरावानें फार खटपट केली. दोनही वर्षें महालोमहालींचे हिशेब तपासण्याचें काम त्यानें जोरानें चालविलें. माधवरावास लबाडी बिलकुल खपत नसे व तो जात्याच हुशार असल्यामुळें त्यास फसविणेंही शक्य नव्हतें. एखाद्यानें गुन्हा केला कीं तो आप्त असो कीं मर्जींतील असो, त्यास शिक्षा केल्याशिवाय तो राहत नसे.बातमी राखण्याच्या कामांत तर त्याची कमाल असे. लक्ष्मण कोन्हेर म्हणून गंगथडीचा मामलेदार होता. त्यानें दरबारांतील लोकांस लांच भरून खोटे हिशेब सरकारांत गुदरले होते. माधवरावास ही बातमी समजली. एकदम त्या मामले-

दाराच्या घरावर जप्ती नेऊन कच्चे कागद जप्त करून आणले, व त्यानें पावणेचार लक्ष रुपये मामलेदारींत खाल्ल्याचें शाबीत केलें ! आरमाराच्या हिशेबाची तपासणी केली त्यांत अधिकाऱ्यांनीं पन्नास हजार रुपये खाल्ल्याचें नजरेस आलें. तोफखान्याच्या हिशेबांतही लबाडी असल्याची कुणकुण कानावर आल्यामुळें तेथील रुमाल एकदम जप्त करण्यांत आले. अशी ही कडक तपासणी झाल्यामुळें सर्व लोकांस जरब बसून ते आपलें काम जास्त सचोटीनें करूं लागले.

त्या वेळीं सरकारी किंवा अधिकाऱ्यांच्या मालाची नेआण करावयाची असल्यास शेतकरी लोकांकडून ती फुकट करून घेण्यांत येई. या पद्धतीस वेठ म्हणत. माधवरावास या पद्धतींतील अन्याय दिसून आला व त्यानें हुकूम पाठवून आपल्या राज्यांतील वेठ बंद करून टाकली. तरी ती पद्धति अधिकाऱ्यांच्या हाडींमासीं खिळली असल्यामुळें ते उघड नाहीं तर लपून वेठीचा व्यवहार करीतच होते. याच रीतीनें वसईचा सुभेदार विसाजीपंत यानें कांहीं मौल्यवान् माल वेठीनें नेला. परंतु ही बातमी पेशव्यास समजली व त्यानें लागलीच तो सर्व माल सरकारांत जप्त केला. वेठीसाठीं धरलेल्या लोकांस त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला दिला; व विसाजीपंतास जबर दंड ठोठावला. यानंतर वेठीबद्दल जास्त कडक हुकूम काढले; तेव्हांपासून मात्र वेठ पार बंद झाली.

याच ठिकाणीं माधवरावाच्या कडकपणाबद्दल एक व शहाणपणाबद्दल एक अशा दोन आख्यायिका देणें जरूर आहे. राक्षसभुवनची लढाई झाल्यानंतर राघोबानें सर्व राज्यकारभार माधवरावाच्या स्वाधीन केला; तेव्हांपासून माधवराव कारभार पाहूं लागला. राघोबासारख्या भोळसटाच्या जागीं माधवरावासारखा तरबेज यजमान आलेला पाहतांच कांहीं कामचुकार व फाजील शिष्टाई मिरवणाऱ्या वृद्ध लोकांची बडेजावी कमी झाली. यामुळें राघोबा कामावरून गेला, हें अशा लोकांस आवडलें नाहीं. गंगाधर यशवंत चंद्रचूड अशाच लोकांपैकीं एक होता. एके दिवशीं दरबार

भरला होता. तेव्हां दरबारांत गंगोबा म्हणाला, " हल्लीं राज्यकार-भाराचा बोज कांहींच नाहीं; एका लहान मुलाच्या हातांत कारभार गेल्यानें जिकडे तिकडे पोरखेळ माजला आहे. " ही त्या म्हाताऱ्याची वटवट ऐकून माधवरावास त्वेष आला. त्यानें एकदम सिंहासनावरून उडी टाकली; व गंगाधर यशवंताच्याजवळ जाऊन त्यानें सर्व मंडळीच्या देखत जोरानें एक त्याच्या थोबाडींत लगावली !

एकदां पुण्यांतील शास्त्रीलोकांचीं भाषणें ऐकून जपजाप्य, स्नानसंध्या वगैरे धार्मिक कृत्यांत बराच वेळ घालवावा, असें माधवरावास वाटूं लागलें. त्याप्रमाणें रोज स्नानसंध्या, जपजाप्य यांत त्याचा बराच वेळ जाऊं लागला. रामशास्त्री प्रभुणे हा बाणेदार गृहस्थ त्या वेळीं न्यायाधीश होता. तो माधवरावास कांहीं राजकीय कामानिमित्त भेटण्याकरितां आला असतां त्याला कळलें कीं पेशवे जपांत गुंतले आहेत, तेव्हां तो परत गेला. असें एक दोन दिवस झालें. तेव्हां रामशास्त्री तिसऱ्या दिवशीं निराळ्याच वेळीं माधवरावाकडे गेला व म्हणाला, " मी आपल्या जागेचा राजीनामा देतों, मला काशीस जाऊन रहावें असें वाटूं लागलें आहे. " माधवरावानें रामशास्त्र्याच्या बोलण्यांतील हेतु तेव्हांच ताडला व म्हणाला, " मी काल जपांत गुंतल्यामुळें तुमची भेट घेण्यास अवकाश मिळाला नाहीं, याबद्दल आपण मला क्षमा करा. " रामशास्त्र्यानें यावर उत्तर केलें, " तुम्ही आपणास राजे म्हणवितां व प्रजेचें काम पाहण्यास तुम्हांस वेळ सांपडत नाहीं ! मला तर असें वाटतें कीं राजास जर मोक्ष पाहिजे असेल तर त्यानें प्रजेच्या हिताविषयीं तत्पर रहावें म्हणजे झालें. याउपर तुम्हांस जर जपच करावयाचा असेल तर राज्य सोडून मजबरोबर काशीस चला व मग खुशाल आपला वेळ स्नानसंध्येंत घालवा. " माधवरावास रामशास्त्र्याचा हा सुंदर उपदेश पटला व जपजाप्यांत गुंतून राहण्याचें त्यानें सोडून दिलें.

# ७४ गृहशत्रूचा मोड.



हैदरावर पहिली स्वारी केली त्या वेळीं दरसाल बत्तीस लक्ष रुपये खंडणी देण्याचें ठरलें होतें; पण हैदर खंडणी देईना, त्यामुळें माधवरावास त्याच्यावर दुसऱ्यानें चालून जाणें भाग झालें. त्याच्यावर दुसरी स्वारी करण्यास दुसरें एक कारण होतें. अलीकडे निजाम व इंग्रज या दोघांत सख्य झालें होतें. पहिल्यानें दोघांनीं मिळून हैदरवर स्वारी करावयाची व मग मराठ्यांवर चालून जावयाचें असें त्या दोघांनीं मेतकूट केलें होतें. तेव्हां त्या दोघांचेही बेत हाणून पाडण्यासाठीं शके १६८८ च्या आश्विनांत माधवराव हैदरवर चालून गेला. त्यानें हैदरच्या राज्याचा पूर्वभाग उध्वस्त केला, शिरें घेतलें. तेव्हां हैदर जेरीस येऊन शरण आला. ज्येष्ठ महिन्यांत तह ठरला. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत जितका मुलुख मराठ्यांच्या ताब्यांत होता तितका हैदरनें परत देण्याचें कबूल केलें. शिवाय त्याचेकडून मराठ्यांना तेहेतीस लक्ष खंडणी मिळाली. हैदरनें संस्थानिकांच्या वाटेस न जाण्याचें व मुराररावास उपद्रव न देण्याचेंही कबूल केलें. इतकें ठरल्यावर माधवराव लवकर पुण्यास परत आला. लवकर परत येण्याचें कारण असें कीं राघोबा नुकताच हिंदुस्थानांतून परत आला होता व राज्याचा अर्धा वांटा घेण्याचा हेतु त्यानें फिरून जाहीर केला होता.

अलीकडे राघोबास पेशव्याचा बराच राग आला होता. मानाजी फाकड्यास शिंद्याच्या गादीचीं वस्त्रें द्यावीं असें राघोबाचें म्हणणें होतें, पण माधवरावाच्या भिडेखातर तीं माहादजी शिंद्याचा पुतण्या केदारजी शिंदे यास द्यावीं लागलीं, व त्यामुळें राघोबास अप्रिय अशा माहादजी शिंद्याच्या हातींच सर्व अधिकार गेला. नुकतेंच अहिल्याबाईप्रकरणांतही

माधवरावाच्या मध्यस्थीमुळें राघोबास पड खावी लागली होती. या कारणांनीं कांहीं दिवस शांत असलेला राघोबाचा मत्सराग्नि भडकला व राघोबानें पुतण्याशीं फिरून भांडण सुरू केलें. राघोबाशीं सलोख्याचें बोलणें करण्याकरितां आनंदवल्लीस जाण्याविषयीं माधवरावानें सखारामबापूस सांगितलें, पण बापूस माहीत होतें कीं, या चुलत्यापुतण्यांचें भांडण कायमचें मिटणें अशक्य आहे. तेव्हां त्यानें कानावर हात ठेविले. मग गोविंद शिवराम खासगीवाले यास पाठविलें. राघोबा पुतण्याची भेट घेण्यास अगदीं नाखूष होता. पण शेवटीं त्यानें भेट घेण्याचें कबूल केलें. भेटीसाठीं जाण्याचें ठरल्यामुळें माधवरावानें गोपाळराव पटवर्धनास तीन हजार फौज जमविण्यास सांगितलें. तसेंच रास्ते व बिनीवाले यांस आणखी तीन हजार फौजेचा हुकूम केला. पुण्यास फौज जमा होत आहे असें कळतांच भेटीसाठीं नगरकडे येणारा राघोबा घाबरला व त्यानें एकदम उलट खाऊन अशीरगडास जाऊन त्या किल्ल्याचा आश्रय घेण्याचें ठरविलें. राघोबा घाबरलेला पाहून फौज मागें ठेवून सडेच भेटण्याविषयीं सखारामबापूनें माधवरावास सुचविलें. पण दोन्ही पक्ष लढाईपर्यंत जाण्यास सिद्ध असतां फौजेशिवाय भेटणें गैरमुत्सद्देगिरीचें आहे असें इतर मुत्सद्यांचें मत पडलें. त्यावरून माधवराव फौजेसह तसाच नाशीककडे चालला. राघोबा दारणासांगवीवर होता. त्यानें पुतण्या जवळ आला आतां भेटण्याशिवाय इलाज नाहीं, असें पाहून भेटण्याचें ठरविलें. दोघांच्या गांठी विंचुरापासून सहा कोसांवर कुरुडगांवीं पडल्या. या भेटींत माधवरावानें चलत्यास स्पष्ट सांगितलें कीं, एक कारभार तरी करा किंवा मिळालेल्या जहागिरीवर संतुष्ट तरी रहा. राघोबानें स्नानसंध्या करून राहण्याची आपली इच्छा सांगितली. मात्र मला पंचवीस लक्ष रुपये कर्ज झालें आहे तें दिवाळीच्या अगोदर फेडावें, असें त्यानें पुतण्यास सांगितलें. कर्ज फेडण्याचें माधवरावानें कबूल केलें. सातारा, शिवनेरी, नगर व अशीरगड हे चार किल्ले रघुनाथरावा-

च्या ताब्यांत होते ते माधवरावानें आपल्या ताब्यांत घेतले. माधवरावास जरी पुष्कळ त्रास सोसावा लागला तरी राघोबा एकदांचा स्वस्थ बसावा म्हणून त्यानें पंचवीस लक्ष रुपये कर्ज दिवाळीच्या आंत फेडून टाकिलें. आतां राघोबा स्वस्थ बसेल व मराठी राज्यवृक्षावर अंतःकलहानें जळून जाण्याची पाळी येणार नाहीं अशी आशा करण्यास पुष्कळ जागा होती, पण भवितव्यतेपुढें कोणाचें काय चालणार ?

शके १६९० ( इ. स. १७६८ ) चा चैत्र महिना संपला न संपला तोंच राघोबानें फिरून उचल खाल्ली. आनंदवल्लीहून फौज जमा करीत राघोबा दारणासांगवीवर गेला. चिंतो विठ्ठल रायरीकर त्याचा कारभारी, होता, तो व शागीर्दमंडळी पूर्वीप्रमाणें भोंवतीं जमा झाली. गंगाधर यशवंत चंद्रचूडास माधवरावानें आपल्या ममतेंत घेण्याचा बराच प्रयत्न केला होता, पण आयत्या वेळेस तो राघोबाकडे गेला. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर कांहीं फौज राघोबाच्या मदतीस पाठविली. जानोजी भोंसलेही याच उद्देशानें नागपूर येथें फौज जमवीत होता. राघोबाजवळ पंधरा हजारांवर फौज जमली होती. पुढेंमागें इंग्रजांची कुमक मिळण्याची त्याला आशा होती. निजामही कर्नाटकची मोहीम करून परत आला होता. राघोबानें त्याच्याकडेही राजकारण लाविलें होतें. " तुम्हांस मुलगा नाहीं तेव्हां तुम्हांस राज्य काय करावयाचें " असें म्हणण्यास कोणास जागा राहूं नये, म्हणून त्यानें कोंकणांतील भुस्कुटे उपनांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव " अमृतराव " ठेविलें. हें दत्तविधान नाशिकास झालें. मुलगा घेतल्याबद्दल संतोषाची साखर व वस्त्रें त्यानें माधवरावाकडे पाठविलीं ! त्यानें तीं घेतलीं नाहींत हें सांगावयास नकोच.

भोंसले राघोबाच्या मदतीसाठीं फौज जमवीत आहे व निजामाकडे राघोबाचीं राजकारणें लागलीं आहेत हें पाहून हे दोघे येऊन मिळण्यापूर्वींच राघोबाचें बंड मोडून टाकलें पाहिजे, असा माधवरावानें बेत केला.

माधवरावाच्या मध्यस्थीमुळें राघोबास पड खावी लागली होती. या कारणांनीं कांहीं दिवस शांत असलेला राघोबाचा मत्सराग्नि भडकला व राघोबानें पुतण्याशीं फिरून भांडण सुरू केलें. राघोबाशीं सलोख्याचें बोलणें करण्याकरितां आनंदवल्लीस जाण्याविषयीं माधवरावानें सखारामबापूस सांगितलें, पण बापूस माहीत होतें कीं, या चुलत्यापुतण्यांचें भांडण कायमचें मिटणें अशक्य आहे. तेव्हां त्यानें कानावर हात ठेविले. मग गोविंद शिवराम खासगीवाले यास पाठविलें. राघोबा पुतण्याची भेट घेण्यास अगदीं नाखूष होता. पण शेवटीं त्यानें भेट घेण्याचें कबूल केलें. भेटीसाठीं जाण्याचें ठरल्यामुळें माधवरावानें गोपाळराव पटवर्धनास तीन हजार फौज जमविण्यास सांगितलें. तसेंच रास्ते व बिनीवाले यांस आणखी तीन हजार फौजेचा हुकूम केला. पुण्यास फौज जमा होत आहे असें कळतांच भेटीसाठीं नगरकडे येणारा राघोबा घाबरला व त्यानें एकदम उलट खाऊन अशीरगडास जाऊन त्या किल्ल्याचा आश्रय घेण्याचें ठरविलें. रावोबा घाबरलेला पाहून फौज मागें ठेवून सडेच भेटण्याविषयीं सखारामबापूनें माधवरावास सुचविलें. पण दोन्ही पक्ष लढाईपर्यंत जाण्यास सिद्ध असतां फौजेशिवाय भेटणें गैरमुत्सद्देगिरीचें आहे असें इतर मुत्सद्यांचें मत पडलें. त्यावरून माधवराव फौजेसह तसाच नाशीककडे चालला. राघोबा दारणासांगवीवर होता. त्यानें पुतण्या जवळ आला आतां भेटण्याशिवाय इलाज नाहीं, असें पाहून भेटण्याचें ठरविलें. दोघांच्या गांठी विंचुरापासून सहा कोसांवर कुरुडगांवीं पडल्या. या भेटींत माधवरावानें चलत्यास स्पष्ट सांगितलें कीं, एक कारभार तरी करा किंवा मिळालेल्या जहागिरीवर संतुष्ट तरी रहा. राघोबानें स्नानसंध्या करून राहण्याची आपली इच्छा सांगितली. मात्र मला पंचवीस लक्ष रुपये कर्ज झालें आहे तें दिवाळीच्या अगोदर फेडावें, असें त्यानें पुतण्यास सांगितलें. कर्ज फेडण्याचें माधवरावानें कबूल केलें. सातारा, शिवनेरी, नगर व अशीरगड हे चार किल्ले रघुनाथरावा-

च्या ताब्यांत होते ते माधवरावानें आपल्या ताब्यांत घेतले. माधवरावास जरी पुष्कळ त्रास सोसावा लागला तरी राघोबा एकदांचा स्वस्थ बसावा म्हणून त्यानें पंचवीस लक्ष रुपये कर्ज दिवाळीच्या आंत फेडून टाकिलें. आतां राघोबा स्वस्थ बसेल व मराठी राज्यवृक्षावर अंतःकलहानें जळून जाण्याची पाळी येणार नाहीं अशी आशा करण्यास पुष्कळ जागा होती, पण भवितव्यतेपुढें कोणाचें काय चालणार ?

शके १६९० ( इ. स. १७६८ ) चा चैत्र महिना संपला न संपला तोंच राघोबानें फिरून उचल खाल्ली. आनंदवल्लीहून फौज जमा करीत राघोबा दारणासांगवीवर गेला. चिंतो विठ्ठल रायरीकर त्याचा कारभारी, होता, तो व शागीर्दमंडळी पूर्वीप्रमाणें भोंवतीं जमा झाली. गंगाधर यशवंत चंद्रचूडास माधवरावानें आपल्या ममतेंत घेण्याचा बराच प्रयत्न केला होता, पण आयत्या वेळेस तो राघोबाकडे गेला. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर कांहीं फौज राघोबाच्या मदतीस पाठविली. जानोजी भोंसलेही याच उद्देशानें नागपूर येथें फौज जमवीत होता. राघोबाजवळ पंधरा हजारांवर फौज जमली होती. पुढेंमागें इंग्रजांची कुमक मिळण्याची त्याला आशा होती. निजामही कर्नाटकची मोहीम करून परत आला होता. राघोबानें त्याच्याकडेही राजकारण लाविलें होतें. “ तुम्हांस मुलगा नाहीं तेव्हां तुम्हांस राज्य काय करावयाचें ” असें म्हणण्यास कोणास जागा राहूं नये, म्हणून त्यानें कोंकणांतील भुस्कुटे उपनांवाच्या ब्राह्मणाचा मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव “ अमृतराव ” ठेविलें. हें दत्तविधान नाशिकास झालें. मुलगा घेतल्याबद्दल संतोषाची साखर व वस्त्रें त्यानें माधवरावाकडे पाठविलीं ! त्यानें तीं घेतलीं नाहींत हें सांगावयास नकोच.

भोंसले राघोबाच्या मदतीसाठीं फौज जमवीत आहे व निजामाकडे राघोबाचीं राजकारणें लागलीं आहेत हें पाहून हे दोघे येऊन मिळण्यापूर्वींच राघोबाचें बंड मोडून टाकलें पाहिजे, असा माधवरावानें बेत केला.

लागलीच गोपाळराव पटवर्धनाची फौज गुलबुर्ग्याकडे होती ती माधवरावानें बोलाविली. तुकोजी होळकर व महादजी शिंदे हे दोघे दक्षिणेंतच होते त्यांसही बोलाविलें. शिवाय बिनीवाले, रामचंद्र गणेश कानडे, रास्ते, धायगुडे व हुजरातीकडील, मिळून एकंदर माधवरावाची चाळीस हजार फौज जमा झाली. पुण्यास फौज जमत असल्याचें ऐकतांच राघोबा दारणासांगवीहून निघून धोडप किल्ल्याचा आश्रय घेण्यास चालला. तेव्हां माधवरावही लांब लांब मजली करीत धोडपेकडे गेला. फौज जवळ आली असें पाहतांच राघोबानें पंचवीस हजार फौजेनिशीं पुतण्यावर चाल केली. फार लढाई झाली नाहीं. एका चकमकींत राघोबाच्या दिवाणाचा भाऊ विठ्ठल रायरीकर पडला. हें पाहून राघोबाच्या फौजेनें पलायन केलें. नंतर राघोबा धोडपच्या किल्ल्यांत शिरला. त्याबरोबर त्या किल्ल्यास गराडा घालून मोर्चे-बंदी करण्यास माधवरावानें उपक्रम केला. शेवटीं त्याचा निरुपाय होऊन राघोबा सहकुटुंब खालीं येऊन माधवरावाच्या स्वाधीन झाला. नंतर राघोबाचा जहागिरीचा मुलूख ताब्यांत घेण्याकरितां रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिनीवाले या दोघांस तीन हजार फौजेसह नाशीक प्रांतीं ठेवून माधवराव पुण्यास परत आला. त्यानें राघोबास शनवारवाड्यांत बंदोबस्तानें कैदेंत ठेविलें.

## ७५ भोंसल्यावर दुसरी स्वारी.

शके १६९०–९१ ( इ० स० १७६९ ).

रघुनाथरावास घोडपेहून कैद करून आणल्यावर त्याच्या साथीदारांचें शासन करण्याच्या उद्योगास सुरवात झाली. गंगाधर यशवंत चंद्रचूडावर माधवरावाचा फारच रोष झाला होता. तो वेषांतर करून घोडपेहून पळून जात असतां वाटेंत होळकराच्या लोकांनीं त्यास पकडलें व माधवरावाच्या हवालीं केलें. माधवरावानें त्याच्या पायांत बिड्या घालून त्यास कैदेंत ठेविलें, व सुटका करण्यासाठीं अतोनात दंड मागितला. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर राघोबास मदत करण्यासाठीं सैन्य पाठविलें होतें. माधवरावानें गोविंदरावास पकडून कैदेंत ठेविलें. इतक्यांत दमाजी मेला. तेव्हां त्याच्या चौघां मुलांत तंटे सुरू झाले. सर्व भावांत गोविंदरावच वयानें वडील होता. बरेच दिवस वाटाघाट झाल्यावर माधवरावानें गोविंदरावासच सरदारी देण्याचें ठरविलें. त्या वेळीं गोविंदरावानें राघोबास मदत केल्याबद्दल दंड तेवीस लक्ष, सरदारीच्या वस्त्रांबद्दल नजराणा एकवीस लक्ष, मागील वर्षांच्या खंडणीच्या बाकीपैकीं पांच लक्ष व इतर कांहीं किरकोळ मिळून एकंदर साडे पन्नास लक्ष रुपयांची रक्कम पेशव्यास देण्याचा करार केला. शिवाय पेशवे सरकारच्या नोकरीस, मुलुखगिरी नसेल तेव्हां तीन हजार व मुलूखगिरी असेल तेव्हां चार हजार फौज हजर ठेवण्याचेंही त्यानें कबूल केलें. राघोबाकडे जाऊं पहाणारा तिसरा बडा सरदार जानोजी भोंसले होता. त्याचें पारिपत्य कराण्यासाठीं घोडपची स्वारी होऊन परत

येतांच निघण्याचा माधवरावाचा विचार होता. पण पावसाळा सुरू झाल्यामुळें तो बेत तहकूब केला.

पावसाळ्यांत माधवरावानें निजाम व हैदर या दोघांशीं बोलणें सुरू केलें कीं, आपण तिघे एकत्र होऊन इंग्रजांचा मोड करूं या ! हें राजकारण केवळ बाह्यात्कारी होतें तरी त्यांत माधवरावाचे किती तरी पेंच होते ! माधवराव केव्हां तरी आपल्यावर स्वारी करणार हें जानोजीस माहीत होतें. पण नुकत्याच चाललेल्या राजकारणावरून त्याला वाटलें कीं, माधवराव इंग्रजांचा मोड करण्याच्या भरीस पडले, आतां यंदां कांहीं त्यांची स्वारी आपल्यावर होणार नाहीं. याच सुमारास पेशव्यांचें आरमार येऊन मुंबईजवळ उतरलें. हें पाहून मुंबईचे इंग्रज घाबरले व त्यांनीं पेशव्यांचा वसईचा सुभेदार रामाजीपंत यास कारण विचारलें. त्यानें पोर्तुगीजांचीं दोन गलबतें इकडे येणार आहेत त्यांचें पारिपत्य करण्याकरितां आरमार आलें आहे असें उत्तर दिलें. त्यावरून इंग्रजांचें समाधान न होतां उलट त्यांस भीति मात्र वाटूं लागली. त्यांना वाटलें कीं, निजाम व हैदर यास मिळवून घेऊन पेशवे आपल्यावर खचित स्वारी करणार. यामुळें आम्ही तुमच्या वाटेस जात नाहीं, तुम्ही ही आमच्या जाऊं नका, असें सलोख्याचें बोलणें त्यांचा वकील बोलूं लागला. इंग्रजांशीं लढण्याकरितां कुमक करू, असें भासवून हैदरकडून कर्नाटकांत फौज न धाडतां खंडणी काढण्याचा माधवरावाचा विचार होता. पण हैदर कसला लबाड ! त्यानें एकदम पुकारा केला कीं, आपण इंग्रजाशीं समेट करणार व मराठ्यांच्या मुलुखावर स्वारी करणार !

शके १६९० ( सन १७६९ ) च्या पौषांत माधवराव फौज घेऊन जानोजीवर स्वारी करण्यासाठीं पुण्याहून निघून औरंगाबादेकडे चालला. निजामानें आपला दिवाण रुकनुद्दवला व रामचंद्रराव जाधव या दोघांच्या हाताखालीं सात आठ हजार फौज मदतीस पाठविली. एकंदर फौज

साठ हजार जमली. मग वाशिमच्या घाटानें वऱ्हाडांत जाऊन त्याच्या मुलखाच्या जप्तीस सुरुवात झाली. वऱ्हाडांत पेशवे व निजाम यांचा जेथें जेथें प्रांत होता तेथें तेथें भोंसल्याचे देशमुखी व घांसदाणा हे हक्क होते ते आतां सर्व जप्त करण्यांत आले. शिवाय जहागीर व इनामें म्हणून जो मुलख त्याच्या ताब्यांत होता तोही हस्तगत करण्यांत आला. मग वर्धानदी उतरून माधवराव खुद्द नागपुरावरच चालून गेला. तेथें जानोजी नव्हता त्यामुळें तें शहर पेशव्यांच्या लष्करानें स्वस्थपणें लुटलें. तेथून १६ कोसांवर असलेला भंडाऱ्याचा भुइकोट किल्ला घेऊन नंतर सर्व लष्कर चांद्यास आलें. तो किल्ला बराच बळकट असून आंत भोंसल्याचा किल्लेदार महिपतराव परभू म्हणून होता, त्यानें तें स्थळ निकरानें झुंजविण्याचा निश्चय केला.

माधवराव वऱ्हाडांत आलें असें कळतांच जानोजी गाविलगाडास गेला व तेथें आपलीं मुलें माणसें ठेवून तो रामटेकास आला. पेशव्यांचा वेढा चांद्यास बसतो असें कळतांच किल्लेकऱ्यांची कुमक करण्याकरितां तो चांद्याकडे आला. माधवरावास जानोजीच्या आगमनाची बातमी समजतांच त्यानें गोपाळराव पटवर्धनास जानोजीवर टेंहेळणी करण्याकरितां लष्करपासून नऊ कोसांवर ठेविलें, व किल्ल्याच्या मोर्चेबंदीचें काम जारीनें चालविलें. पंचगव्हाण येथें भोंसल्याचे सरदार नरहरपंत रिसबुड व बापू करांडा हे दोघे उतरले होते. त्यांवर गोपाळरावानें आनंदराव गोपाळ, नरसिंगराव धायगुडे व बाळाजीपंत सप्रे यांस पाठविलें. उभयपक्षीं सुमार पांच सहा तास लढाई होऊन भोंसल्यांच्या सरदारांचा सपशेल पराभव झाला. नरहरपंत रिसबुड तर पडला; व करांडा पंचवीस स्वारांनिशीं पळून गेला. चांद्याहून पेशव्यांच्या सैन्यांतील टोळ्यांनीं भोंसल्यांच्या राज्यांतील बराच मुलूख काबीज केला व कित्येक किल्ले व ठाणीं सुद्धां घेतलीं. इतक्या बड्या फौजेशीं झुंजण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें जानोजी भटकत होता.

इतक्यांत जानोजीस स्वसंरक्षण करण्याची एक युक्ति सुचली. पेशव्यांच्या मुलुखांत जाऊन लुटालूट करण्याचा त्यानें बेत केला. असें केलें कीं, पेशवे व निजाम आपल्या पाठीवर धांवून येतील व मग लढाई धामधूम त्यांच्या मुलुखांत माजेल, असा त्याचा तर्क होता व तो बरोबर ठरला. असा बेत करून आपण येथेंच आहों असें शत्रूस भासविण्याकरितां डेरे, राहुट्या व कांहीं फौज त्यानें तळावरच ठेविली; व निवडक पंधरा हजार घोडेस्वार घेऊन लांब लांब मजली करीत तो माहूरकडे चालला. ही बातमी पेशव्यास कळतांच त्यानें रामचंद्र गणेश व गोपाळराव पटवर्धन या दोघां सरदारांस पंचवीस हजार फौजेसह टांकोटांक भोंसल्याच्या पाठलागास पाठविलें; तों चहूंकडून भोंसले पुण्यावर येणार अशी वर्तमानें उठलीं व पुणें ओस पडूं लागलें.

इतक्यांत निजामाकडून मदतीस आलेला रामचंद्रराव जाधव भोंसल्यास फितुर असल्याचें माधवरावास कळलें. भोंसले व प्रतिनिधी पूर्वींपासून ऋणानुबंधी, ते एक झाल्यावर सातारचें राजमंडळ आपल्याविरुद्ध होईल कीं काय, याचीही चिंता माधवरावास पडली. शिवाय राघोबा सुटले म्हणजे मग आणखीही बरेच सरदार भोंसल्यास मिळाल्याशिवाय राहावयाचे नाहींत; मग ही आग कोठवर पेटेल याचा नेम नाहीं, असें नानाप्रकारचे विकल्प माधवरावाच्या मनांत आले. शिवाय ही मोहीम एका बड्या मराठे सरदारावरच असल्यामुळें इतर मराठे सरदारांस प्रिय नव्हती. पेशवे प्रत्यक्ष हजर असल्याशिवाय कोणीही सरदार खुषीनें काम करण्यास तयार नव्हता. म्हणून रामचंद्र गणेश व गोपाळराव या दोन सरदारांची रवानगी झाल्यावर थोड्याच दिवसांनीं चांद्याचा वेढा उठवून व थोडीशी फौज वऱ्हाडच्या बंदोबस्ताकरितां ठेवून माधवराव झपाट्यानें औरंगाबादेकडे आला. पेशव्याबरोबर फौज मात्र झटपट आली नाहीं. ती दर मुक्कामास दोन दोन चारचार कोस मागें रहातां रहातां आतां फारच मागें राहिली. यापुढें या मोहिमेंत तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

पुण्यावर चाल करण्याच्या उद्देशानें जानोजी माहुराहून उमरखेड-पर्यंत आला. इतक्यांत रामचंद्र गणेश व खुद्द पेशवे आपल्या पाठीवर येत आहेत ही बातमी कळतांच पुण्याचा रोंख सोडून तो पूर्वेस निर्मळाकडे चालला. पेशव्यांचे सरदार त्याचा सारखा पाठलाग करीत होते तेव्हां तो फिरून पश्चिमेस बेदराकडे आला. हरप्रयत्न करून जानोजीस वऱ्हाडाकडे हुसकून लावण्याचा माधवरावानें आतां निश्चय केला होता. त्यानें पाथ्री येथें आपलें बुणगें व जड सामान ठेविलें व तो सड्या सामानानिशीं आपल्या सरदारांना मिळण्यास चालला. जानोजीच्या सैन्यांतून बापू करांडा पेशव्यांच्या बुणग्यावर अकस्मात् येऊन पडला व थोडेसें बुणगें त्यानें लुटून नेल. इतक्यांत पेशव्यांच्या फौजेनें चोहोंकडून येऊन जानोजीस घेरलें; तेव्हां निरुपाय होऊन तो पेशव्यास शरण आला. मग उभय पक्षीं भीमातीरीं कनकापूर येथें समेट झाला. जानोजीस राक्षसभुवनच्या युद्धानंतर मिळालेल्या जहागिरीपैकीं चोवीस लाखांची जहागीर पहिल्या स्वारींत परत घेतली होती; आतां बाकीचीं आठ लाखांचीही परत घेण्यांत आली. दिल्लीचा बादशहा, अयोध्येचा नबाब, रोहिले, इंग्रज व निजाम यांपैकीं कोणाशींही पेशव्यांच्या परवानगीशिवाय भोंसल्यानें सख्य करूं नये. भोंसल्यानें दरसाल पांच लक्ष खंडणी पांच हप्त्यांनीं द्यावी, हीं समेटाचीं मुख्य कलमें होतीं. मग फौजेस निरोप देत देत माधवराव १६९१ च्या ज्येष्ठांत पुण्यास परत आला.

ही मोहीम चालूं असतां राघोबानें कैदेंतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. माघ वद्य एकादशीस बारा घटका रात्रीं राघोबा पळून जाणार होता, पण वेळींच ही गोष्ट नाना फडणिसास समजली व त्यानें ताबडतोब बंदोबस्त केल्यामुळें राघोबाचा बेत फसला. नानानें फितुरांत सामील असलेल्या पन्नास साठ लोकांस बिड्या ठोकल्या व राघोबावर रात्रंदिवस खडे पहारे ठेवून बंदोबस्त राखिला. आपला बेत फसला

पाहून राघोबानें प्राण देण्यासाठीं उपोषणें सुरू केलीं. माधवरावानें राघोबाची समजूत घालण्याकरितां बाबूजी नाईकास आणविलें. नाइकांनीं पुष्कळ प्रकारें सांगितलें पण राघोबानें त्याचें ऐकलें नाहीं. तो फार तर एखादे दिवशीं साखरपाणी व खारीक खाई. त्याचें म्हणणें होतें कीं, " दत्तक मुलास पुण्यास आणवावा. त्याला दोन लक्षांची जहागीर व एक किल्ला द्यावा. आपणास पांच लक्ष रुपये द्यावे. त्यापैकीं गाडदी व राऊत वगैरे नेमणुकी खर्च तीन लक्ष रुपये कमकसर होईल तो होईल राहील तो द्यावा. त्याचा दानधर्म करूं. " माधवरावाचें यावर उत्तर असें होतें, " आपणास किल्ले व जहागिरी नेमून दिली होती त्यावेळीं दानधर्म करीत होतां ते कागदपत्र आहेतच, त्याअन्वयें ऐवज नेमून देऊं. आम्ही कर्जदार आहों. इतका ऐवज कोठून द्यावा ! " त्यास राघोबा बोलला " तें समयीं आम्ही धर्म कसाही करीत होतों. त्याचा दाखला आतां कशास पाहिजे ? तेव्हां आम्ही कैदेंत कोठें होतों ? आतां कैदेंत आहों ! तुमच्या कर्जवामाशीं व दौलतीच्या ओढीतोडीशीं आम्हांस गरज काय ? नाहीं तरी आम्ही उपास करतां करतांच मरों. " शेवटीं दोन लक्ष रुपये धर्मदायासाठीं देण्याचें माधवरावानें मान्य केलें व मग राघोबा जेवला.

## ७६ हैदरअल्लीवरील तिसरी स्वारी.

शके १६९१-९४ ( इ. स. १७६९-७२ ).

भोंसल्याच पारिपत्य करण्यांत माधवराव गुंतला होता त्याच वेळीं हैदरचें इंग्रजाशीं चाललेलें युद्ध संपून तो रिकामा झाला. त्यानें पेशवे दुसरीकडे गुंतले आहेत असें पाहून शिरें, मद्‌गिरी, बाळापूर वगैरे मराठ्यांनीं जिंकलेला प्रांत परत घेण्याचा बेत केला, व पहिल्यानें चित्रदुर्ग व हरपनहल्ली हीं जीं दोन संस्थानें मराठ्यांच्या अंकित होतीं व ज्यांना त्रास न देण्याचें हैदरनें कबूल केलें होतें त्यांच्यापासून त्यानें जबर खंडणी उपटली. नंतर तो मोठी फौज जमा करून मराठ्यांच्या हरिहर तालुक्यांत आला. नंतर हैदर तुंगभद्रा उतरून सावनूरच्या नबाबाच्या मुलुखांत आला. असा जेव्हां हैदरचा दंगा सुरू झाला तेव्हां माधवरावानें त्याच्यावर तिसरी स्वारी करण्याचें ठरविलें.

शके १६९१ आश्विन वद्यांत माधवराव पुण्याहून डेरेदाखल झाला तो तुंगभद्रेवर गेला. तेथें गोपाळराव पटवर्धन व माधवराव यांनीं अशी मसलत ठरविली कीं, हैदर जोंवर तुंगभद्रेच्या आसपासच्या अनेवडीच्या रानांत आहे तेथवर गोपाळरावानें पंधरा हजार फौज घेऊन त्याच्यावर टेहळणी करण्याकरितां त्याच्यापासून वीस पंचवीस कोसांवर राहावें व माधवरावानें बाकीची फौज घेऊन तुंगभद्रापार होऊन हैदरच्या राज्यांतील प्रदेश पूर्वेकडून जिंकीत श्रीरंगपट्टणावर जावें. मग ठरल्याप्रमाणें गोपाळराव सावनुराजवळ येऊन राहिला व माधवराव तुंगभद्रा उतरून ठाणीं घेत घेत चालला. तो ठाणीं घेत घेत कोल्हार चिकबाळापूरपर्यंत गेला. तों हैदर रानांतून निघून तरीकिऱ्यास गेला. हैदर तरीकिऱ्यास

गेला त्याबरोबर गोपाळराव हरिहरास पुढें सरकला. तरीकिऱ्यापासून चिकबाळापूर खालीं पन्नास कोस आहे व हरिहर वरतीं तीस कोस आहे. हैदरनें विचार केला कीं, मराठी लष्करें आपल्यापासून बरीच लांब आहेत, आतां आपण पेशव्यांनीं जिंकलेलीं ठाणीं परत घ्यावीं व मग शिरें मदगिरी या मराठी मुलुखावर स्वारी करावी. या बेतांप्रमाणें त्यानें कित्येक ठाणीं घेतलीं. इतक्यांत माधवरावाकडून हैदरास तंबी देण्याकरितां तीन हजार फौज आली व गोपाळरावही जवळ येऊन मतोड येथें राहिला, त्यामुळें मात्र हैदरचे बेत तसेच राहिले. हैदरअल्ली अनेवडीच्याझाडींत होता तेव्हां त्याचा सावनूरवर छापा घालण्याचा बेत गोपाळरावानें हाणून पाडला. आतां तो तरीकिऱ्यास येऊन मराठी मुलुखावर स्वारी करणार तों गोपाळराव त्याच्या वाटेंत मतोडास येऊन बसला. तेव्हां हैदराची अगदीं निराशा झाली. एके दिवशीं रात्रीं गोपाळरावावर छापा घालून त्याच्या फौजेचा विध्वंस केल्याखेरीज हें झेंगट आपल्या पाठीमागून सुटावयाचें नाहीं अशी हैदरची खात्री झाली. पण गोपाळराव फारच सावधगिरी ठेवीत असल्यामुळें ही मसलत साधणेंही कठीण होतें. त्यानें आपण श्रीरंगपट्टणकडे गेलों असल्याची खोटी बातमी उठविली. व माघ व॥ अमावास्येच्या रात्रीं बारा तेरा हजार गारदीं, चार हज़ार स्वार, व पंचवीस तोफा व बाणांचे पन्नास उंट घेऊन तो ज्या आडवाटेनें निघाला तो पहांटे पांच घटका रात्र असतां पहारे चुकवीत चुकवीत मराठ्यांच्या लष्कराजवळ येऊन ठेपला! ती वेळ इतकी भयंकर होती कीं सर्व लष्करचे लष्कर शत्रूच्या स्वाधीन झालें असतें पण गोपाळरावानें तोफेचा पहिला बार ऐकल्याबरोबर तो घोड्यावर स्वार होऊन नौबत व निशाण घेऊन गोटाच्या अघाडीस हैदरच्या फौजेसमोर येऊन उभा राहिला. नौबत वाजूं लागतांच फौज व सरदार पटापट जमूं लागले. नौबतीचा आवाज ऐकतांच हैदरास मराठ्यांची फौज सिद्ध झाली, आतां आपल्याला गोटावर हल्ला करितां येणार नाहीं असें वाटलें.

व त्यानें फौज हुसकून लावण्याकरितां त्याच ठिकाणावर तोफांचा भयंकर मारा केला व बाणांचाही केवळ वर्षाव केला तथापि मराठ्यांच्या नौबती वाजतच होत्या व फौजही खंबीरपणानें उभी होती. गोळे लागून माणसें मरतच होतीं व घोडीं पडतच होतीं ! गोपाळरावाजवळ त्याचा हुजऱ्या उभा होता त्याच्या डोक्याला गोळा लागून ठिकऱ्यासारखे तुकडे झाले व त्याचें रक्त गोपाळरावावर उसळून त्यांस रक्तस्नान झालें. परशुरामभाऊ पटवर्धनाची एक घोडी पडली म्हणून तो दुसरीवर बसला. तों दुसरीही पडली तेव्हां तिसरीवर बसला. तों तिसरीही पडली ! त्या पांच घटकांत पांचशें गोळा सुटला असेल; परंतु तसलाही मार सोसून मराठी फौज तशीच ठांसून उभी राहिल्यामुळें सारें लष्करचे लष्कर बचावलें.

इकडे माधवरावाचें किल्ले व मुलूख काबीज करण्याचें काम खळ न पडतां सारखें चाललें होतें. किल्ले घेतां घेतां तो बेंगरुळास आला. बेंगरूळ व श्रीरंगपट्टण हीं दोन ठिकाणें फारच बळकट. पावसाळा सुरू होण्यास फक्त महिन्या दीड महिन्याचा अवकाश राहिला होता. तेव्हां बेंगरुळास वेढा देऊन तें इतक्या अवधींत हातीं येणें अशक्य वाटल्यामुळें माधवराव वायव्येकडे चाल करून जाऊं लागला. या वेळीं हैदर बाणावरास होता. त्यानें तर्क केला कीं, मराठे आपल्यावर दौड करून येत आहेत. त्यामुळें तो घाईघाईनें निघून श्रीरंगपट्टणास गेला. आपण किल्ले घेण्याच्या नादांत गढून गेलो, असें दाखवून हैदर बाणावरास आहे तोंच त्यावर लांब मजलीनें चालून जाऊन त्यांशीं मैदानांत गाठ घालावी, असा खरोखरच माधवरावाचा बेत होता पण हैदर पडला धूर्त ! त्यानें ती मसलत ओळखून तत्काळ पोबारा केला.

हैदर श्रीरंगपट्टणास गेल्यामुळें त्याच्यावर टेहळणी करण्याचें काम उरलें नाहीं. तेव्हां माधवरावानें गोपाळरावास आपल्याकडे बोलावून घेतलें व मग निजगलच्या किल्ल्यास वेढा दिला. वेढा चौदा दिवस

चालू होता. वेढ्याचें काम चालू असतां माधवरावाचा धाकटा भाऊ नारायणराव हल्ल्याचें काम पहात उभा असतां त्यास गोळीची हलकीशी जखम लागली. शेवटीं वैशाख शु० ५ स मराठ्यांनीं हल्ला करून किल्ला घेतला. आतांपर्यंत मराठ्यांनीं एक कोट रुपये उत्पन्नाचा मुलूख लुटून फस्त केला; किल्ले घेतले व पाडिले. पण हैदर अजूनही मराठे मागत होते तितकी खंडणी देण्यास तयार होईना. पावसाळा तर जवळ आला तेव्हां छावणीस रहावयाचें कीं काय याची चर्चा होऊं लागली. शेवटीं त्रिंबकरावमामा पेठे याच्या हाताखालीं कर्नाटकांत फौज ठेवून माधवराव स्वतः पुण्यास परत आले.

पावसाळ्यांत त्रिंबकरावानें स्वस्थ न बसतां गुरमकोंडा प्रांत काबीज केला. श्रीरंगपट्टणहून गुरमकोंड्याची मदत करण्यास फौज येईल म्हणून गोपाळराव वाटेवर टेहळणी करण्याकरितां राहिला होता. अदमासाप्रमाणें हैदरअल्लीची चार पांच हजार फौज गुरमकोंड्याकडे आली तिचा गोपाळरावानें पार फन्ना उडवून दिला. विजयादशमीच्या मुहूर्तानें माधवराव फिरून स्वारीस निघाला. परंतु त्याची प्रकृति बिघडली होती ती अजून चांगली बरी झाली नव्हती. मध्येंच चार दिवस बरें वाटावें, फिरून तब्बेत बिघडावी, असें होऊं लागलें. माधवराव फिरून स्वारीस निघतात असें कळतांच हैदरनें आपला वकील अप्पाजीराम यास पुण्यास तहाचें बोलणें करण्यास पाठविलें होतें. परंतु तो कांहीं तरी गुळमुळीत व धरसोडीचीं उत्तरें देई; त्यामुळें तह ठरेना व माधवराव तसाच पुढें जाऊं लागला. रहिमतपुरावरून मिरजेजवळ येऊन पोंचला. तेथें आठ मुक्काम होते. माधवरावाची प्रकृति अधिकच बिघडली व क्षीणता भासूं लागली. तेव्हां पुढ जाणें योग्य नाहीं असें पाहून माधवरावानें अप्पा बळवंत व मल्हारराव पानशे यांजबरोबर फौज देऊन त्यांस कर्नाटकांत पाठविलें व आपण स्वतः दोन दोन कोसांच्या मजली करीत हळूहळू पुण्यास परत आला.

अदोनी प्रांताची खंडणी पेशव्यांनीं गोपाळराव पटवर्धनास लावून दिली होती. पावसाळा संपतांच दोन वर्षांची बाकी वसूल करण्यासाठीं गोपाळराव तिकडे गेला व बसालतजंगाजवळून त्यानें ती वसूल केली व तो कनकागिरीस मुक्काम करून राहिला. त्याची प्रकृति आतां अगदीं क्षीण झाली होती. त्यांतच त्याला जलोदराची भावना झाली व त्याला वाटलें कीं आपण आतां खात्रीनें वांचत नाहीं. त्यानें आपला बाप गोविंद हरी यास मिरजेस हें वर्तमान लिहिलें. तेव्हां तिकडून त्याचा भाऊ वामनराव लष्कर ताब्यांत घेण्याकरितां आला, तों गोपाळरावाचा वाखा फारच झाला होता. तथापि त्यास तशाच स्थितींत मिरजेस पाठविण्यांत आलें. तेथें पोंचल्यावर तिसरें दिवशीं शके १६९२ माघ शुद्ध २ स गोपाळराव मरण पावला. याच्या मागें पटवर्धनांची सरदारी वामनरावानें पांच वर्षे चालविली. त्यापुढें पटवर्धनांतील मुख्य सरदार म्हटला म्हणजे त्याचा चुलत भाऊ परशुराम रामचंद्र पटवर्धन हाच होय.

पावसाळा संपल्यावर त्रिंबकरावमामानें बिदनूर प्रांतावर स्वारी करण्याचा बेत केला व तो तिकड जाऊं लागला. बिदनूरचा प्रांतच काय तो हा वेळपर्यंत मराठ्यांच्या तावडींतून वांचला होता. शिवाय तो हैदरास विशेष प्रिय असे. म्हणून त्यानें मराठे बिदनूर प्रांतांत जाण्यासाठीं झाडींत शिरले कीं, त्यांच्यावर छापे घाल घालून स हैराण करावें असा क्रम चालविला. मग तो पंचवीस हजार गारदी आठ हजार घोडेस्वार, पंचेचाळीस तोफा इतक्या सैन्यासह श्रीरंगपट्टणापासून पांच कोसावर मेलकोट्यास आला. ही बातमी त्रिंबकरावास लागली, त्यानें सखाराम हरी नांवाच्या हुशार परभू सरदारास हैदरची बारीक बातमी काढण्यासाठीं पाठविलें. त्यानें सर्व तपास काढून मामास पत्र लिहिलें. पत्र पावतांच त्रिंबकरावानें कूच केलें व तो मेलकोट्यास आला. तेथें एक दोन दिवस झटापटी होऊन मराठ्यांनीं हैदरासच हुडकून कोंडलें. त्याला श्रीरंगपट्टण किंवा बिदनूर यांपैकीं कोणत्याही स्थळीं पळून जाण्यास वाट ठेविली नाहीं.

हैदरची रसद बंद झाली. त्याच्या लष्करांत नाचणींचें पीठ रुपयाला तीन शेर विकूं लागलें. शेवटीं हैदरनें कसें तरी करून श्रीरंगपट्टणास जाण्याचा निर्धार केला. तेथून तें शहर पांच कोस होतें. फाल्गुन व. ७ स रात्रीं सहा घटकाच्या सुमारास हैदर मेलकेटच्याहून निघून झाडींत शिरून श्रीरंगपट्टणकडे चालला. मराठ्यांनीं वाटेंत ठेवलेल्या टोळीस तें कळलें. त्याबरोबर तिनें त्रिंबकराव वगैरे सरदारांकडे सांडणीस्वार पाठविले, व स्वतः हैदरवर चालून घेतलें. हैदरास वाटलें कीं, मराठी फौजेच्या एका मोठ्या टोळीनें आपल्यावर हल्ला केला आहे. म्हणून त्यानें तोफा सोडण्यास सुरुवात केली. सर्व मराठ्यांस आयतीच बातमी लागली व भराभर मराठी फौजा चहूंकडून हुल्लड करूं लागल्या. यामुळें हैदरची चाल फारच थोडी होऊं लागली. मेलकोटच्याच्या झाडींतून बाहेर पडायास उजाडलें. म्हणजे त्यास दोन कोस येण्यास नऊ तास लागले. मग सकाळच्या वेळीं मोठेंच युद्ध जुंपलें. मराठ्यांनीं एकदम चहूंकडून हल्ला केला. त्यामुळें हैदरचे लोक घाबरून पळूं लागले. त्यावेळीं भयंकर कत्तल झाली. स्वतः हैदर उजवीकडे डोंगर आहे तिकडे पळून गेला. त्याचा मुलगा टिपू सुलतान फकिराचा वेष घेऊन निसटला. हैदरचें सर्व सामान मराठ्यांस सांपडलें. या लढाईस 'मोतीतलावाची लढाई' म्हणतात.

यापुढें चैत्र शु. १ शके १६९३ च्या मुहूर्तानें त्रिंबकरावानें श्रीरंगपट्टणास वेढा घातला. पण तें ठिकाण बळकट, शिवाय भोंवतालचा मुलूख हैदरनें अगदीं रुक्ष करून टाकला होता. तेव्हां मामास वेढ्याचा बेत तहकूब करावा लागला. त्यानें पावसाळा लागेपर्यंत कावेरीच्या लगत्याच्या प्रांतांत दंगा मांडला व पुढें बेलूर येथें छावणी दिली. आश्विनाचा महिना लागतांच मुलुखांत दंगा मांडण्याचें काम सुरू झालें. याच सुमारास त्रिंबकरावास तंजावरच्या राजाचें पत्र आलें. त्यांत, 'आमच्या राजधानीस अर्काटचा नबाब अहमदअल्ली यांनीं वेढा घातला आहे, तेव्हां कुमकेस यावें,' असा मजकूर होता. त्यावरून वामनरावास वर घाटीं ठेवून मामा

तंजावरकडे गेला. मराठे आले असें कळतांच महमदअल्ली वेढा उठवून गेला. त्रिंबकरावानें तंजावरकरापासून चार लक्ष खंडणी व अर्काटच्या नबाबापासूनही आणखी कांहीं खंडणी घेतली. त्रिंबकरावानें घाटाखालीं हैदरच्या बारामहाल प्रांतांत शिरून गांवोगांव जबर खंडण्या घेतल्या. आप्पा बळवंत मेहेंदळे फौज घेऊन कोईमतूरकडे गेला होता. तोही मुलूख त्यानें लुटून बेचिराख केला. फाल्गुन अखेरपर्यंत घाटाखालचे हैदरचे प्रांत उध्वस्त केल्यावर त्रिंबकराव वर घाटीं आला. आतां सर्व सरदारांस मिळून बिदनूरवर स्वारी करून त्या मुलुखांतील गढ्या व किल्ले पाडून टाकून तो मुलूख अगदीं बेचिराख करण्याचा त्यानें संकल्प केला. पण इतक्यांत मामास पेशव्यांचीं पत्रें आलीं कीं, आपण आतां दुखण्यांतून वाचूं असें वाटत नाहीं तर हैदरशीं बनेल तसा तह करून सर्व फौजां-सह तुम्हीं देशीं परत यावें. शेवटीं तह ठरला. शिवाजीच्या ताब्यांत कर्नाटकांत " स्वराज्य " म्हणून जेवढा मुलूख होता तेवढा सर्व मरा-ठ्यांच्या हातीं आला. त्यांतील एक बेंगरूळ मिळालें नाहीं, पण त्या-ऐवजीं मदागिरी मिळाली. शिवाय गुरमकोंडचाचा मुलूख मराठ्यांनीं घेतला होता तो त्याजकडेच राहिला. बाकी जिंकलेला सर्व मुलूख हैद-रास परत देण्याचें ठरलें. हैदरनें पेशव्यास खंडणीबद्दल पन्नास लक्ष रुपये व त्रिंबकराव वगैरे सरदारांस 'दरबारखर्चाबद्दल' दहा लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें. ज्येष्ठ शु॥ पौर्णिमेस फौजा परत निघाल्या त्या आषाढ संपतां संपतां तुंगभद्रेवर येऊन महाराष्ट्रांत आपआपल्या ठिकाणास गेल्या.

## ७७ पानिपतचा सूड.

शके १६८८ सालीं राघोबादादानें उत्तर हिंदुस्थानावर जी स्वारी केली तिचें काम अर्धवट कसें झालें, याची हकीकत मागें आलीच आहे. मराठ्यांचे पानिपतचे शत्रु रोहिले, सुजाउद्दवला व पठाण यांस तंबी पोंचविण्याची तयारी नसल्यामुळें राघोबा परत आला. गोहदच्या राण्याचें सुद्धां पुरतें शासन त्यांस करतां आलें नाहीं. भरतपूरकर जाटही अलीकडे उन्मत्त झाला होता त्याचाही समाचार न घेतां रघुनाथराव तसाच देशीं गेला, हें पाहून तर वर सांगितलेले मराठ्यांचे शत्रु अगदीं शेफारून गेले तेव्हां त्यांचें पारिपत्य करणें अवश्य होतें. माधवरावाची भोंसल्यावरील दुसरी स्वारी संपतांच हिंदुस्थानांत फौज पाठविण्याचें ठरलें. या फौजेवर रामचंद्र गणेश कानडे हा मुख्य नेमून, विसाजी कृष्ण बिनीवाले यास त्याचा कारभारी नेमिले. त्यांच्या हाताखालीं पंधरा हजार फौज होती. शिवाय तुकोजी होळकर व माहादजी शिंदे हे दोघेही पंधरा पंधरा हजार फौजेसह स्वारींत हजर होते. म्हणजे एकंदर सैन्य पन्नास हजार होतें.

पावसाळा लागण्याच्या अगोदर सर्व फौज नर्मदा उतरून पलीकडे जावी या हेतूनें माधवरावानें सर्व सरदारांस ताबडतोब कूच करण्याविषयीं हुकूम केला होता. तथापि महादजी शिंद्यानें कांहींच सामानसुमानाची तयारी न करितां तसेंच कांहीं दिवस लोटलें. थेऊरास जातांना शिंद्याची फौज अझून बिनतयारीनें तशीच असल्याचें माधवरावाच्या नजरेस आलें, त्याबरोबर महादजीस त्यानें ताबडतोब बोलावून आणून सांगितलें कीं, ' पाटील, मी परत येतांना तुमच्या तळावर जर एक तंबू

दिसला तर सर्व गोट लुटून तुमची जहागीर जप्त करीन. यासाठीं आतांच्या आतां कूच करून चला.' माधवरावाचा सर्व सरदारांवर कांहीं विलक्षण दाब होता. महादजीनें मुकाट्यानें आपला गोट आवळून माधवराव परत येण्याच्या आंत कूच केलें.

नर्मदा उतरून गेल्यावर शके १६९१ चा पावसाळा या सैन्यानें बुंदेलखंडांतील बंडखोरांचा बंदोबस्त करण्यांत घालविला. पावसाळा संपतांच सर्व फौजा सागरापाशीं एक होऊन जाटांच्या मुलुखावर चालून गेल्या. त्या वेळीं भरतपूरच्या गादीवर केसरी नांवाचा अल्पवयाचा मुलगा असून राज्याचा कारभार त्याचा चुलता नवलसिंग हा पहात असे. मराठे आपल्यावर चालून येतात, असें कळतांच त्यानें लढाईची खूप तयारी केली, व तो भरतपुराहून पुढें आठ कोस चालून आला. तेथें त्याची व मराठ्यांची गांठ पडली. जाट मोठ्या शौर्यानें लढले; पण मराठी फौजे-पुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. नवल दीडशें फौजेनिशीं पळून गेला. हजारों जाट मारले गेले. हत्ती, घोडे, दारूगोळा व हत्यारें वगैरे सर्व सामान मराठ्यांच्या हातीं आलें. मग मराठी लष्कर जाटांचा सर्व मुलूख उध्वस्त करूं लागलें, तेव्हां नवलसिंग शरण आला. त्याचा चुलता सुरज-मल जाट यानें मराठ्यांचा आग्रा प्रांत व किल्ला बळकावला होता, तो आतां नवलसिंगानें त्यांचा त्यांस परत दिला. व पासष्ट लक्ष रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें.

आतां मराठे आपल्या पानिपतच्या स्वारींतील शत्रूंचा समाचार घेण्या-करितां निघाले. मराठ्यांवर पानिपतचा घोर प्रसंग आणण्यास कारणी-भूत झालेला मराठ्यांचा हाडवैरी नजीबखान रोहिला हा होता. पण वैर विसरून त्याच्याशीं राजकारण करणें या वेळीं मराठ्यांस जरूर झालें. दिल्लीचा शहाअलम बादशहा अजून अलाहाबादेकडेसच भटकत होता त्याला गादीवर बसवून मग रोहिले, पठाण, सुजाउद्दवला वगैरे मंडळींचें पारिपत्य करण्याचा त्यांचा बेत होता. मराठे आले असें कळतांच नजीब-

खान अगदीं घाबरून गेला, व आपलें रक्षण करण्याविषयीं अगदीं गयावया करूं लागला. त्यानें शिंदे घराण्यांतील दत्ताजी, जनकोजी अशा वीरांस दुष्टपणानें तोंडघशीं पाडलें होतें. तेव्हां महादजी शिंद्याच्या मनांत त्याचा सूड उगविण्याचें फार होतें. पण शेवटीं मराठ्यांनीं त्याच्याशीं सख्यच केलें. पानिपतच्या लढाईपूर्वी दुआबांतील मुलूख मराठ्यांकडे होता.तो आतां नजीबानें बळकाविला होता. त्याच्या सनदा फिरून शहाजादा नवाजबख्त यांजकडून नजीबानें मराठ्यांस करून दिल्या; व तो आतां मराठी लष्करांतच राहूं लागला. मराठे बरेच दिवस दिल्लीस होते. तेथें पठाणांवर स्वारी करण्याचें ठरवून ते अन्तर्वेदींत शिरून गंगेच्या काठीं रामघाट येथें शके १६९२ च्या पावसाळ्यांत राहिले. मागें नजीबानें दत्ताजी शिंद्यास असेंच अन्तर्वेदींत आणून त्याचा विश्वासघात केला होता. त्याप्रमाणेंच आतांही पठाणांशीं त्याचें आंतून सूत्र असल्याचें मराठ्यांस कळलें. पण इतक्यांत नजीब एकाएकीं मृत्यु पावल्यामुळें पुढील प्रसंग टळला.

कार्तिकाचा महिना सुरूं होतांच मराठे दुआबांत पसरून सर्व मुलूख उध्वस्त करूं लागले. पठाणांचा अहमदखान बंगष् हा मुख्य सरदार होता व त्याची राजधानी फरूकाबाद येथें होती. रोहिले आपला सरदार हाफीज रहमत याच्या हाताखालीं पठाणांना मदत करण्यास अंतर्वेदींत आले. रोहिले व पठाण यांची मिळून आतां सत्तर हजार फौज झाली. तरी पण मराठ्यांपुढें त्यांचें कांहींच चाललें नाहीं. दर युद्धांत त्यांचा पराजय झाला. एका फरूकाबादेखेरीज सारा दुआब प्रांत मराठ्यांनीं लुटून फस्त केला. इटावा व त्या प्रांतांतील इतर मोठमोठे किल्ले मराठ्यांनीं घेतले. शेवटीं शके १६९३ च्या उन्हाळ्यांत हाफीज रहमत रोहिलखंडांत पळून गेला. आतां मराठ्यांचा मारा एकट्या पठाणांवरच पडला. तव्हां त्यांची हड्डी चांगलीच नरम होऊन अहमदखान बंगष्

शरण आला. त्यानें पानिपतच्या लढाईनंतर बळकाविलेला सर्व मुलूख मराठ्यांस परत दिला व आपला बचाव करून घेतला.

शहाअलम बादशहास दिल्लीस आणून गादीवर बसविण्याच्या खटपटींत मराठे होतेच. त्यांच्या प्रयत्नांस यश येऊन शके १६९२ ( इ. स. १७७१ ) च्या मार्गशीर्षांत शहाअलमास त्यांनीं गादीवर बसविलें. गादीवर बसवितांना बादशहा व मराठे या दोघांमध्यें पुढीलप्रमाणें ठराव झाला होता. मराठ्यांकडे पानिपतच्या लढाईपूर्वीं ज्या ज्या जहागिरी होत्या त्या पुन्हां त्यांजकडे सुरू कराव्या. महमदशहाच्या कारकीर्दीपासून चौथाईची बाकी तुंबली होती ती द्यावी. याबद्दल मराठ्यांनीं बादशहाच्या शत्रूचें पारिपत्य करावें. यापुढें शत्रूवर दोघांनीं मिळून मोहिमा कराव्या व होणारी मिळकत सारखी वांटून घ्यावी.

आतां मराठ्यांचा रोहिल्यांची खोडकी मोडण्याचा बेत कायम झाला. याच सुमारास रामचंद्र गणेशास पेशव्यांनीं परत बोलाविलें व स्वारीचा मुख्य अधिकार विसाजीपंत बिनीवाले यास दिला. नजीबखानाचा मुलगा झबेताखान हा शुक्रतालास जाऊन राहिला. मराठ्यांनीं शुक्रतालास वेढा दिला, व मोठमोठ्या तोफांचा मारा सारखा सुरू केला. त्यामुळ झबेताच्या फौजेंत कहर उडाला. शेवटीं एके रात्रीं झबेता पळून जाऊन गंगा उतरून बिजनार जिल्ह्यांत गेला. मराठेही ताबडतोब गंगा उतरण्यासाठीं चंडिघाटावर आले. झबेतानें पलीकडे बातेऱ्या लाविल्या होत्या व दोन फौजा ठेविल्या होत्या, पण मराठ्यांनीं नदी उतरून तोफा हस्तगत केल्या व दोन्ही फौजा धुळीस मिळविल्या. नंतर सर्व बिजनार जिल्हा त्यांनीं लुटून फस्त केला. मराठे आपल्या पाठीवर आले हें पाहून झबेता नजीबगडांतून पळाला. मराठ्यांनीं जाऊन नजीबगड काबीज केला. नंतर फत्तरगड मराठ्यांनीं घेतला तेथें नजीब उद्दवल्यानें पानिपतच्या वेळीं लुटून घेतलेली अपार संपत्ति भरलेली

होती ती सर्व आतां मराठ्यांच्या हातीं आली. झबेताचीं बायकामुलेंही सांपडलीं. नंतर सर्व रोहिलखंडभर मराठी फौज पसरली व मुलूख उध्वस्त करूं लागली. रोहिले लोक शूर खरे, पण मराठ्यांपुढें त्यांची अगदीं गाळण उडाली. ते सैरावैरां पळत सुटले. त्यांना मराठ्यांचा असा वचक बसला कीं, कितीही बळकट किल्ला असो, त्यांच्या फौजेचा तळ कितीही बळकट व अडचणीच्या जागेंत असो, एखादा मराठा स्वार दिसला कीं, रोहिले छावण्या सोडून पळ काढीत. त्यांचे सर्व मोठमोठे सरदार उत्तरेकडे तिरईच्या रानांत पळून गेले.

इतक्यांत पावसाळा लागल्यामुळें कांहीं मराठी फौज दुआबांत राहिली व कांहीं दिल्लीस परत गेली. पावसाळा संपल्यावर मराठे फिरून रोहिलखंडावर स्वारी करणार अशी बातमी ऐकल्यामुळें रोहिले सरदारांची अगदीं पांचावर धारण बसली. ते अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास शरण गेले व ' चाळीस लक्ष रुपये तुला देऊं. तूं आमचें रक्षण कर ' असें म्हणाले. सुजानें ती गोष्ट कबूल केली. पण विसाजी कृष्ण बिनीवाल्यास पावसाळा संपतांच पेशव्यांच्या हुकुमावरून दक्षिणेकडे जावें लागलें व मराठ्यांना रोहिलखंडाकडे जाण्याचा प्रसंगच आला नाहीं.

## ७८ दक्षिणचा दिवा मालवला ! हिरा हारपला ! !

( पोवाडा. )

एकछत्र करूनि गेले माधवराव।
थरथरा कांपत होते अष्ट उमराव।
बसविलें हस्तिनापूर राज्य पाच्छाव।
दादासि मोकळें केलें राज्य करावें।
तुटली आयुष्याची दोरी नाहीं उपाव॥



माधवराव हुशार, उद्योगी व न्यायी होता, पण या गुणांचा आपल्या राष्ट्रास पूर्ण उपयोग होण्यास एक अडचण होती, ती ही कीं त्याची प्रकृति वरचेवर बिघडत असे. व्यायाम करण्याची त्याला लहानपणापासूनच संवय होती पण व्यायामामुळें त्याचें शरीर निरोगी व स्वाऱ्याशिकाऱ्यांचें श्रम करण्यास समर्थ झालें नाहीं. एकदां त्याची आई गोपिकाबाई हिनें त्यास एका पत्रांत लिहिलें, " तालीम तुमच्या प्रकृतीस मानवत नाहीं तर ती करण्याचें तुम्हीं सोडून यावें. " त्यावर माधवरावानें उत्तर लिहिलें, " मला वडिलांच्या आज्ञेपेक्षां तालीम अधिक आहे कीं काय ? तालीम सोडिली, हल्लीं नमस्कार मात्र घालीत असतों. " शके १६९२ चा पावसाळा संपल्यावर तो हैदरवरील स्वारीस निघाला असतां केवळ प्रकृति नीट नसल्यामुळें त्यास परत यावें लागलें, हें मागें आलेंच आहे. शके १६९४ चा उन्हाळा सुरूं होतांच त्याची प्रकृति पुन्हां बिघडली व दिवसेंदिवस शक्तिपात होऊं लागला. शके १६९३ च्या फाल्गुनांत तो थेऊरास येऊन राहिला होता. आपल्या राज्याचें पुढें काय होईल याची त्यास सारखी काळजी लागून राहिली होती. आपल्या मागें नारायणरावाच्या हातून राघोबाचा बंदोबस्त होणार नाहीं, याकारितां राघोबास सोडण्याचा त्यानें बेत केला. नाना व

१ पृ. ११९ अ. शा. पोवाडे.

मोरोबा फडणीस यांच्याही मनांत राघोबास सोडावें असेंच होतें. शेवटीं सोडण्याचा बेत कायम करून राघोबास पुण्याहून थेउरास नेलें. तेथें माधवरावानें सात लक्षांची जहागार व त्रिंबक किल्ला देऊन त्याचें समाधान केलें. आपण स्नानसंध्या करून स्वस्थ राहूं, राज्यकारभारांत मन घालणार नाहीं व बंड फितुर करणार नाहीं, असें राघोबानें कबूल केलें. याचवेळीं मोरोबा फडणिसाकडून कारभार काढून माधवरावानें सखारामबापूला दिला. आपल्या मागें आपल्या भावाचें राज्य निर्विघ्नपणें चालावें याकरितांच माधवरावानें इतक्या गोष्टी केल्या. त्यावेळचे प्रसिद्ध वैद्य गंगा विष्णु रणछोड व रूपेश्वर बाबा यांनीं रोग असाध्य म्हणून ठरविलें; तरी औषधें, अनुष्ठानें वगैरे सर्व उपाय सारखे चालूं होते. परंतु सर्व व्यर्थ! शके १६९४ च्या श्रावणापासून प्रकृति अगदीं बेताल झाली. दररोज अंगात ताप भरे व तो भरला म्हणजे अंगाची इतकी भयंकर काहिली होई कीं आरोळ्या व शंखवाद्य करण्यापर्यंत मजल येई! त्या यातना दुःसह झाल्यामुळें माधवराव हा राघोबा व सखारामबापू यांस विनंति करी कीं, मला या यातना सहन होत नाहींत. एक खंजीर आणून द्या; ता खुपसून घेऊन मी मरून जातों!

माधवरावाची इतकी भयंकर स्थिति होती तरी राघोबानें दसऱ्याच्या मुहूर्तानें माधवरावाच्या मरणानंतर गादी आपणांस मिळावी म्हणून सैन्य जमविण्यास सुरुवात केली. दोन हजार स्वार व कांहीं गारदी त्यानें नोकरीस ठेविलें. निजाम, हैदर व भोंसले यांस मदत करण्याविषयीं पत्रें लिहिलीं. ही सर्व बातमी माधवरावास समजतांच त्यानें राघोबा तुळापुरास गेला होता त्यास धरून आणिलें व सर्व फितुरास कडक शासन केलें. या वेळीं राघोबास फिरून कैदच झाली असती पण माधवरावानें गुन्हा माफ केल्यामुळें तो प्रसंग टळला. येणेंप्रमाणें राघोबानें माधवराव अगदीं मरणास टेंकले असतांही त्यास त्रास दिला! या वेळीं वरावाजवळ नाना फडणीस, त्रिंबकराव मामा पेठे, सखारामबापू,

रास्ते व पटवर्धन वगैरे सरदार इत्यादि मंडळी हजर होती. ज्वर येऊन गेला म्हणजे माधवराव कांहीं वेळ ग्लानि येऊन निपचित पडे. मग सखारामबापू, राघोबा व नारायणराव यांस पुढें राज्यकारभार कसा चालवावा, याविषयीं तो सांगत असे. राघोबास कुटुंबांत कलह व राज्यांत फंदफितुर न करण्याविषयीं त्यानें पुनः पुनः सांगितलें व नारायणरावाचा हात त्याच्या हातीं देऊन त्याचा संभाळ करण्याविषयीं फिरून फिरून त्याची निरवणूक केली. नारायणरावाचा स्वभाव तामसी व उतावळा होता. लहान वयामुळें पेंचपांच व भारदस्तपणा त्याच्या अंगीं मुळीं नव्हता. यामुळें त्यालाही पुढें कोणाशीं कसें वागावयाचें याचा उपदेश केला. 'माझ्या जिवांत जीव आहे तेथवर मी नारायण-रावास अंतर देणार नाहीं,' असें सखारामबापूपासून त्यानें वचन घेतलें.

हरिपंत फडक्यावर माधवरावाचें फार प्रेम होतें. प्रत्येक स्वारींत तो त्याच्याबरोबर असल्यामुळें तो पहिल्यानें कारकुनी पेशाचा असतांही त्याला कारस्थानाचीं धोरणें व लष्करी अनुभव मिळाला होता. माधव-रावानें त्याच्यावर खूष होऊन त्यास आपलें श्रीवर्धनचें खाजगी वतन करून दिलें. कोंकणचे सुभेदार नुकतेंच वारल्यामुळें तो सुभाही हरिपंता-सच सांगितला.

शके १६९४ ( सन १७७२ ) च्या कार्तिक शुद्ध १२ स माधव-रावानें सर्व प्रायश्चित्त घेतलें. त्या प्रसंगीं त्यानें लाखों रुपये दानधर्म केला. नाना फडणीस व हरिपंत फडके नेहमीं जवळ असत. त्यांना माधव-रावानें सांगितलें कीं मला माझे रयत लोक पहावेसे वाटतात. तेव्हां मजकडे येण्यास कोणासही बंदी करूं नका. हा हुकूम सुटतांच हजारों लोक दर्शनास येऊं लागले. आपला अन्तकाळ समीप आलासें पाहून माधवरावानें वैद्याची प्रार्थना केली कीं, मला मरणसमयीं कफ न होतां अतिसार व्हावा, अशी योजना करा; कारण कीं कफ झाल्यास वाचा

बंद होऊन परमेश्वराच्या स्मरणास मी अंतरेन ! कार्तिक वद्य ८ स सकाळीं मोठे वैदिक व तपस्वी ब्राह्मण बोलावून त्यांस माधवरावानें नमस्कार केला; व 'आम्ही महायात्रेस जातों व आमची तयारी करा' असें सांगून स्मृतींत (शुद्धीवर असतां) 'गजानन गजानन' असा नामघोष करीत असतां मोठ्या योग्याप्रमाणें नेत्रद्वारें त्याचा प्राण गेला. पूर्वसंकल्पाप्रमाणें रमाबाई सती गेली. सती जाण्यापूर्वीं तिनें आपलें जडजवाहीर व अलंकार गरीबांस वांटले व धर्मशिळेवर उभी राहून नारायणरावाचा हात राघोबाच्या हातीं देऊन त्यास 'वडिलाप्रमाणें सर्वांचें यथास्थित चालवावें' असा तिनें बोध केला. व सर्वांचा निरोप घेऊन शान्तवृत्तीनें चितारूढ होऊन अग्नीच्या ज्वालांत ती महासती अदृश्य झाली.

पूर्वीं बाळाजी बाजीराव व सदाशिवरावभाऊ यांनीं हिंदुपदपादशाही स्थापण्याचा संकल्प करून तो अंमलांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला; इतक्यांत दुर्दैवानें पानिपतचें अरिष्ट मराठी राष्ट्रावर कोसळून मराठी राज्याच्या चिंध्या चिंध्या होतात कीं काय अशी भीति वाटूं लागली ! परंतु अशा संकटसमयीं माधवरावासारखा तरुण असून वजनदार, शरीर रोगग्रस्त असतांही तडफदार, व दंग्याधोप्याच्या काळांतहीं न्यायानें व समतेनें वागणारा, असा कर्तबगार नायक मराठी राष्ट्रास मिळाला, व अवघ्या पांच दहा वर्षांतच निजाम शमला, हैदर नमला, उत्तरेकडील रोहिले आदिकरून शत्रूही हरले ! मराठी राष्ट्राचें कीर्तितेज एकसारखे वृद्धिंगत होत होत बाळाजी बाजीरावाच्या काळाप्रमाणें किंबहुना जास्तच तळपूं लागलें ! लवकरच हिंदुपदपादशाही स्थापण्याचा संकल्प पूर्णपणें फळास येण्याचा रंग दिसूं लागला ! पण निर्घृण कालानें अचानक घाला घातला ! माधवरावास मराठे अंतरले ! दिवा मालवला ! हिरा हारपला ! !

## ७९ नारायणराव पेशवे.

नारायणराव व रघुनाथराव पेशवाईचीं वस्त्रें घेण्याकरितां सातान्यास गेले व शके १६९४ च्या मार्गशीर्ष वद्य ४ स नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. त्याचे वय सतरा वर्षांचें होतें व अजून त्याचा लहानपणाचा उतावळेपणा गेला नव्हता. अशा स्थितींत हाताखालच्या लोकांस शिस्तीनें वागविणें त्याच्या हातून झालें नाहीं. एकदां सखारामबापूची रदबदली न ऐकतां नारायणरावानें त्याचें मन दुखविलें. तेव्हांपासून तो वृद्ध, अनुभवी पण कुटिल स्वभावाचा मुत्सद्दी अगदीं उदासीन झाला व त्यानें आपलें अंग कारभाराबाहेर टाकलें. नारायणरावाची वाटेल त्या माणसाच्या बोलण्यावर विश्वास टाकण्याची लहान मुलासारखी वृत्तीही अजून गेली नव्हती. त्यामुळें हलक्या लोकांचा दरबारांत मान होऊं लागला, व अब्रूदार मुत्सद्दी दरबारकामांत फारसा पुढाकार घेईनासे झाले.

राघोबा, आनंदीबाई व त्यांची शागिर्दमंडळी यांची फंदफितुरी सुरू झाल्याचें नारायणरावास कळलें. त्यावरून त्यानें पूर्ण चौकशी न करतां राघोबास फिरून कैदेंत टाकिलें. मग फाल्गुन महिन्यांत नारायणराव आईस भेटण्याकरितां गंगापुरास गेला. ती संधि साधून राघोबानें बंडावा करण्याचा प्रयत्न केला. त्यानें गुप्तपणें ठिकठिकाणीं फौज जमविली. हैदरचा वकील अप्पाजीराम याच्या मार्फत आपलें साहाय्य करण्याविषयीं हैदरास पत्रें पाठविलीं. आतां वाड्याबाहेर निघून जाणार तोंच फितुराची बातमी फुटून शहरचा मुख्य अधिकारी नारो अप्पाजी तुळशीबागवाले यानें शहरची नाकेबंदी केली व वाड्याभोंवतीं खडे पहारे ठेविले. या बातम्या गंगापुरास जाऊन नारायणराव ताबडतोब पुण्यास

निघून आला. फितुरीचे कागदपत्र पकडून व अप्पाजीराम याची निर्भर्त्सना करून बेडी घालून त्यानें त्याला सिंहगडास पाठविलें. इतर फितुरही कैदेंत घातले.

नागपूरचा जानोजी भोंसलें माधवरावापूर्वीं थोडेच दिवस वारला होता. त्याला मुलगा नव्हता. तेव्हां त्यानें आपला भाऊ मुधोजी याचा मुलगा रघूजी यास सेनासाहेब सुभ्याचें पद मिळावें अशी व्यवस्था केली होती. पण, मुधोजी हा राघोबाच्या पक्षाचा होता, तेव्हां नारायणरावानें रघूजीकडून जहागीर व सेनासाहेब सुभा हें पद, हीं दोन्ही काढून तीं मुधोजीचा भाऊ साबाजी यांस दिलीं. त्यावरून त्या दोघां भावांत तंटा सुरू झाला. जानोजीची बायको दर्याबाई मुधोजीस मिळाली. तेव्हां त्याचा पक्ष बळावला; हें पाहून नारायणरावानें खंडेराव दरेकर व निजामानें आपला सरदार रूकनउद्दवला ह्यांस साबाजीच्या मदतीस पाठविलें. मुधोजीस इलिचपूरच्या नबाबाचा आश्रय होता. तेव्हां या फौजांसह साबाजीनें इलिचपुरास वेढा घातला; इतक्यांत बाहेरून येऊन मुधोजीनें वेढा घालणाऱ्या सैन्याची अन्नसामुग्री तोडली. त्यामुळें साबाजीनें वेढा उठविला. तो सहा कोसांवर जाऊन राहिला. साबाजीची बाजू अशा तऱ्हेनें लंगडी झालेली पाहून राघोबाच्या पक्षाच्या मंडळीस आनंद झाला.

दुसरें एक प्रकरण या वेळीं पुण्यात उद्भवलें होतें. तें म्हणजे ब्राह्मणांनीं परभूंवर फिर्याद आणली. तिचा निकाल आजपर्यंतच्या वहिवाटीस अनुसरून "पूर्वी चालत आलें आहे तसें चालवावें. नवें करूं नये. जुनें मोडूं नये," असा न देतां नारायणरावानें "परभू क्षत्रिय नाहींत, वेदोक्तकर्मांचा त्यांना अधिकार नाहीं, त्यांनीं शूद्राप्रमाणें वागावें" असा दिला, व त्या अर्थाचा नऊ कलमांचा करार त्या जातींतील लोकांकडून लिहून घेतला. यावरून परभू जात खवळून गेली व तिनें राघोबाचा पक्ष धरिला.

माधवराव पेशवे मरण पावल्याबरोबर हैदरच्या मनावर बसलेला मराठ्यांचा वचक बराच कमी झाला. आपला मराठ्यांनी घेतलेला मुलूख जिंकण्यास ही उत्तम संधि आहे असें त्यास वाटलें; व त्याकरितां फौज जमविण्याच्या कामास तो मोठ्या नेटानें लागला. हा हैदरचा बेत जेव्हां नारायणरावास कळला तेव्हां त्यानेंही दसरा झाल्यावर हैदरवर स्वारी करण्यास जाण्याचा निश्चय केला; व त्यासाठीं विसाजी कृष्ण बिनीवाले व तुकोजी होळकर या दोघांसही दक्षिणेंत निघून येण्याविषयीं सक्तीचे हुकूम पाठविले. दिल्ली, दुआब, रोहिलखंड वगैरे प्रांतांत ते सरदार जम बसवीत होते व पानिपतच्या खडकावर आपटून मागें परतलेल्या मराठी साम्राज्यसमुद्राच्या लाटा फिरून दिल्ली, दुआब, रोहिलखंड येथवर जाऊन थडकल्या होत्या! पण माधवराव पेशव्याच्या मृत्यूचा धक्का बसून मराठी साम्राज्य फिरून आंत आंत येऊं लागलें.

## ८० 'ध' चा 'मा'!!

मुधोजी भोंसले व राघोबा यांचें आंतून सूत्र होतें, हें मागें सांगितलें आहेच. इलिचपुरास साबाजीनें वेढा घातला होता. पण त्या शहराच्या मदतीस मुधोजी आल्यामुळें साबाजीच्या सैन्यांत धान्याची टंचाई पडली व त्यास वेढा उठवावा लागला. साबाजीचा असा पराजय झाला तेव्हां नारायणरावानें स्वतः त्याचे मदतीस जाण्याचें ठरविलें; तों मुधोजीवर पेशव्यांची स्वारी होऊं नये म्हणून पुण्यांत राघोबाच्या वतीनें कट होऊं लागले. या कट-वाल्यांचा बेत फक्त राघोबाची सुटका करण्याचा होता. त्यांत मुधोजीचे कारकून व्यंकटराव काशी, लक्ष्मणराव काशी व राघोबाच्या मर्जीतील

सरदार सखाराम हरि गुप्ते, असे तिघे परभू प्रथम होते. पण या कटांत जसजशीं बडीं बडीं धेंडें शिरूं लागलीं, तसतशी राघोबाची सुटका हा त्या कटाचा मूळचा साधा हेतु जाऊन, त्याच्याजागीं नारायणरावास धरून कैदेंत टाकावयाचें व राघोबास पेशवे करावयाचें हा भयंकर हेतु आला. या धेंडांत सर्वांत प्रबळ म्हटला म्हणजे सखारामबापू होय. नारायणरावानें आपल्या उतावळ्या स्वभावानें बापूचें मन दुखविलें होतें हें मागें आलेंच आहे. बापू मोठा कारस्थानी व माधवरावाच्या वेळे-पासून राघोबाचा पक्षपाती असे. कटांत सामील झालेले बापूच्या खालचे लोक म्हटले म्हणजे भवानराव प्रतिनिधी, रामचंद्र बावा शेणव्याचा मुलगा सदाशिव रामचंद्र, चिंतो विठ्ठल रायरीकर इत्यादि होत. या कटांतील मंडळींनीं नारायणरावास धरण्याचें काम पेशव्यांच्या पदरच्या गारदी लोकांकडून पार पाडण्याचें ठरविलें. गारद्यांपैकीं सुमेरसिंग, खरक-सिंग व महंमद इसफ या तीन जमादारांस पांच लक्ष रुपये देण्याचा करार झाल्यावर गारदी खुषीनें पेशव्यास धरावयास तयार झाले; व नारायणराव यास धरावें, असा हुकूमही राघोबानें गारद्यांस दिला.

पण या धरण्याच्या कटाच्या आंत कांहीं निवडक मंडळींनीं, राघो-बाची कारस्थानी व दुष्ट बायको आनंदीबाई हिच्या सम्मतीनें, आणखी एक कट उभा केला. नारायणरावास धरण्याच्या ऐवजी ठार मारून टाकावें, हा या मंडळींचा हेतु होता. राज्यासाठीं हपापलेली आनंदीबाई व तिचा खिजमतगार तुळ्या पवार, हीं या आंतल्या कटाचीं चालक होतीं. आनंदीनें ‘ नारायणरावास धरावें ’ या हुकमाच्या वाक्यांतील ‘ ध ’ च्या ठिकाणीं ‘ मा ’ केला ! व गारद्यांस बोलावून आणून पेश-व्यांस धरण्यापेक्षां मारणें कसें जास्त फायदेशीर व अवश्य आहे तें सांगितलें. ही कामगिरी बजावल्यास त्यांना आपल्या नवऱ्यानें देऊं केलले पांच लक्ष रुपये देऊन शिवाय साष्टी, नगर व पुरंदर हे तीन किल्लेही देण्याचें तिनें अभिवचन दिलें; आणि नारायणरावास ठार मारूं,

अशाबद्दलचा सुमेरसिंग वगैरे तीन गारद्यांकडून बेलभंडारा उचलून घेतला. अशा रीतीनें पुढें होणाऱ्या घोर अनर्थाची पूर्वतयारी अगदीं कडेकोट झाली.

ही मसलत सिद्धीस जाण्यास राघोबास इतर गोष्टीही अनुकूल होत्या. पावसाळ्यामुळें फौजेस घरीं जाण्यास निरोप मिळाला होता व पुण्यांत सारी मिळून तीन चार हजार फौज होती. आपल्यास धरण्याची मसलत घाटत आहे हें नारायणरावाच्या स्वप्नींही नव्हतें. भाद्रपद शुद्ध १३ शके १६९५ ( सन १७७३ ) च्या दिवशीं प्रातःकाळीं नारायणरावानें कुलाब्याहून नुकत्याच आलेल्या रघूजी आंग्र्याची भेट घेतली. मग पर्वतीचें दर्शन घेऊन सासुरवाडीस नारायणराव सहकुटुंब भोजनास गेला. भोजन करून विडा घेतला तोंच नारायणरावास कोणी सूचना केली कीं, गारद्यांचा दंगा चालू आहे. कृपा करून आपण वाड्यांत जाऊं नये. नारायणरावास गारदी दंगा करणार आहेत ही बातमी पर्वतीवरच समजली होती. तेव्हां त्यानें हरिपंत फडक्यास त्यांचा बंदोबस्त करण्यास सांगितलेंच होतें. पण हरिपंतास कोठें जेवावयास जावयाचें होतें. जेवण झाल्यावर बंदोबस्त करण्याचें त्यानें ठरविलें.

इकडे नारायणराव जेवण झाल्यावर थोड्याच वेळानें निघून शनवारवाड्यांत आला. तिसऱ्या मजल्यावर कबूतरखाना आहे तेथें अम्मळ उभा होता. इतक्यांत सुमेरसिंग, खरकसिंग व महंमद इसफ असे तिघे गारदी आले व म्हणाले, " महाराज आमची तलब चढली याची वाट काय ? आमचा रोजमुरा फडशा करून द्यावा. " पेशव्यांनीं आज्ञा केली ' तिसरे प्रहरीं कचेरीस विनंति करावी. ' गारद्यांनीं उत्तर केलें, " आम्हांस कचेरीची काय गरज ! आपण धनी आपण फडशा करावा." तों नारायणराव जिना उतरूं लागला. गारद्यांनीं लगट केली, " आम्हांस ऐवज द्या नाहींतर खालीं उतरूं देत नाहीं. इच्छारामपंत ढेरे म्हणून

कारकून जवळ होता तो रागें भरून बोलला, “ असा दंगा केल्यानें ऐवज मिळतो कीं काय ? ” हें ऐकतांच गारद्यांनीं तरवारी उपसून इच्छारामपंताचा तेथल्या तेथें प्राण घेतला. खालीं चौकांत पूजेच्या दोन गाई बांधल्या होत्या त्या गारद्यांच्या नागव्या तरवारी पाहून बुजल्या व दावीं तोडून गारद्यांच्या अंगावर आल्या. त्यामुळें नारायण-रावास पुढें जाण्यास वेळ मिळाला. गाई आडव्या येतांच गारद्यांनीं तर-वारीनें ठार केल्या! तों नारायणराव घाबरून सदाशिवरावभाऊची बायको पार्वतीबाई हिच्या खोलींत जाऊन म्हणाला, “ काकू, मला गारदी मार-तात. ” पार्वतीबाई म्हणाली. “ मी तुला लपवितें, तूं भिऊं नकोस. ” इतक्यांत नारायणरावास काय वाटलें कोणास ठाऊक ? तो एकदम म्हणाला, “ मी राघोबादादांकडे जातों. ” गारदी नारायणरावाच्या माग लागलेच होते. एक कुणबीण आडवी आली तिला त्यांनीं ठार मारलें. नारायणरावानें जाऊन राघोबादादाच्या कमरेस मिठी घातली व मोठ्या दीनपणानें म्हणाला “ काका मला मारूं नका ! किल्ल्यावर पांठमीठ लावून ठेवा ! मारूं नका. ” हें ऐकून राघोबास दया आली व तो गारद्यांस म्हणाला, “ यास मारूं नका. ” गारदी म्हणाले, “ आतां यास आम्ही जिवंत सोडणार नाहीं. सर्पास दुखवून कोणी सोडील काय ? मुकाट्यानें तुम्ही यास सोडा; नाहींतर दोघेही मराल. ” इतकें बोलून गारद्यांनीं वार केला; त्याबरोबर राघोबाच्या कपाळास व हातास जखम झाली. लागलींच त्यानें नारायणरावास सोडून दिलें. आनंदीचा खिजमतगार तुळ्या पवार यानें नारायणरावाचा पाय ओढून त्यास खालीं पाडलें. तोंच चापाजी टिळेकर म्हणून पेशव्यांचा विश्वासु खिज-मतगार होता तो पेशव्यांच्या अंगावर पडला. व जीव न घेण्याविषयीं गारद्यांची विनवणी करूं लागला. त्या क्रूर गारद्यांस कसची दया येणार ! त्यांनीं तरवारी चालवून दोघांसही ठार केलें. नारायणराव साखरभात जेवला होता तो पोटांतून तसाच बाहेर पडला !

नंतर गारद्यांनीं राघोबाच्या नांवानें सर्व वाड्यांत द्वाही फिरविली. सर्व वाडा गारद्यांनीं आपल्या ताब्यांत घेतला होताच. आतां त्यांनीं दिल्लीदरवाजा लाविला; शहरांत बातमी पसरली. सर्व लोकांस दुःख झालें व गारद्यांचा अनावर क्रोध आला. तोफखान्याचे पानसे म्हणाले, " तोफा आणून उडवून देतों. " त्रिंबकरावमामा घोड्यावर बसून हातांत भाला घेऊन आंत चालला. गारदी म्हणाले, " मामासाहेब, आपण पुढें येऊं नये. आलां असतां गोळी घालूं. आपण सडे आंत यावें. " त्यावर मामा पायउतारा होऊन दिंडींतून आंत गेला व राघोबाकडे जाऊन त्यास म्हणाला, " श्रीमंत बाजीरावसाहेब यांचे पोटीं पोरगी जन्मास आला असतास तर एक्या ब्राह्मणाचें घर उभें राहतें ? हें काय केलेंस ! ! ! " ते शब्द ऐकून राघोबा कपाळास हात लावून तसाच बसला. मग कांहीं वेळानें मामास म्हणाला, " आतां पुढें याच्या दहनाचा विचार करावा. " मामा बोलला, " अरे दहन कसलें करतोस ? मलाही मारून टाक म्हणजे झालें ! तुझ्या घरीं ब्राह्मण कोण येतो ? दहन कोण करतो ? "

दुसऱ्या दिवशीं गांवांतील शिष्ट ब्राह्मण बोलावून प्रायश्चित्त काय घ्यावें, याचा राघोबानें विचार आरंभिला. त्या सभेस रामशास्त्री प्रभुण्यासही बोलाविलें. रामशास्त्र्यानें आपलीं मुलेंमाणसें माहुलीस लावून दिलीं, व मग तो सभेस आला. वरकड पंडित म्हणाले, " गारदी यांनीं नारायणरावास ठार मारिलें. शब्ददोष राघोबावर आला आहे. तर यावर कांहीं प्रायश्चित्त करावें ह्मणून आपणास बोलाविलें. " तेव्हां रामशास्त्री बोलला, " प्रायश्चित्त कसचें करितां व कोणास देतां ? ब्राह्महत्या, गोहत्या, स्त्रीहत्या, बालहत्या जेथें झाल्या तेथें कोणचें प्रायश्चित्त पुस्तकांत लिहिलें आहे ? एक प्रायश्चित्त, यास देहान्तप्रायश्चित्त करावें ! शिसें तापवून प्राशन करावें, किंवा दर्भाचें गृह करून आंत बसावें आणि अग्निसंस्कार करावा. यांतून वांचल्यास पुढें प्रायश्चित्त करावें. " असें ऐकतांच सर्व

हरिवंशाची बखर, पृष्ठ ४२–४३.

पंडित म्हणाले, " शास्त्रीबोवा, आपण असें काय म्हणून बोलतां ? " त्यावर त्या निःस्पृह रामशास्त्र्यानें उत्तर केलें, " मला याचे राज्यांत रहावयाचें नाहीं. तुम्हांस राहावयाचें असेल म्हणून तुम्ही ग्रंथास विरुद्ध भाषण करतां. मी मुलेंमाणसें रवाना करून सोंवळ्यानेंच आलों. मी असाच निघणार. कालपासून जलस्पर्श देखील केला नाहीं. मी जीवित्वास उदार झालों ! मर्जी असल्यास आणखी एक ब्रह्महत्या करावी. " याप्रमाणें शास्त्रीबोवा बोलतांच कोणीएक बोलेनासें झाले. शास्त्रीबोवा तसाच निघून माहुलीस गेला. नंतर त्यानें अन्नव्यवहार केला. म्हटलें आहे ' निःस्पृहस्य तृणं जगत् ' !

---

## ८१ औट घटकेचें राज्य.



नारायणरावाचा खून करून गारद्यांनीं राघोबाच्या नांवाची द्वाही फिरविली व ते शनवारवाड्यांत बंदोबस्तानें राहिले. लागलेंच दंग्याचें वतमान गांवांत कळलें. तेव्हां सखारामबापू, नाना फडणीस, त्रिंबकराव मामा, मोरोबादादा वगैरे मुत्सद्दी कोतवालचावडींत जमा झाले व त्यांनीं स्वार जमा करून शहराची नाकेबंदी केली. इतक्यांत वाड्यांतून राघोबाची सखारामबापूस चिठ्ठी आली कीं, " आतां व्यर्थ खटपट कशास करितां ? चिरंजीव राव गारद्यांच्या कचाटींत मारले गेले; मीही गारद्यांच्या कैदेंतच आहें. तुम्हीं आंत येऊन भेटून जावें. " ही चिठ्ठी मिळाल्यावर बापू आंत गेला. आंतला भयंकर

हरिवंशाची बखर, पृष्ठ ४४

देखावा पाहून त्यास कसेसेंच झालें. तो राघोबास म्हणाला, “ आमचे शरीरीं समाधान नाहीं. आम्हीं घरास जातों. लेखणीचे धनी फडणीस. त्यांशिवाय आपलें चालावयाचें नाहीं. त्यास बोलावून आणा. ” इतकें बोलून तो घरीं निघून गेला. नंतर नाना व मोरोबा या दोघांस राघोबानें बोलवून नेऊन “ तुम्ही पूर्वींप्रमाणें आपलीं कामें करीत जा ” असें सांगून मोरोबाकडून सर्व सरदारांस राघोबानें पत्रें लिहविलीं. त्यांत ‘ नारायणराव दुर्दैवानें मारले गेले. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. तुम्हीं आपआपल्या जागीं सावध असावें व मागून हुकूम येतील त्याप्रमाणें वर्तत जावें. ” असा मजकूर होता. सर्व सरदारांनीं व मुत्सद्दी मंडळींनीं राघोबाच्या म्हणण्यास तात्पुरती संमति दिली व राज्यकारभार सुरू झाला. पहिलें काम गारद्यांस वाड्यांतून बाहेर काढावयाचें. आतां कराराप्रमाणें त्यांस पांच लक्ष रुपये व तीन किल्ले द्यावयाचे. पण किल्ले देणें म्हणजे राज्याचें नाकच त्यांचे हातीं देण्यासारखें होतें. त्यामुळें बरीच वाटाघाट होऊन शेवटीं आठ लक्ष रुपये घेऊन व आपल्या जिवास अपाय होणार नाहीं, याबद्दल राघोबापासून जामीन घेऊन गारद्यांनीं वाडा सोडला. राघोबाच्या मनांत आपल्या स्वतःस पेशवाईचीं वस्त्रें घेण्याचें नव्हतें. याचें कारण काय, तर सातारचा ‘हल्लींचा राजा अपेशी,’ अशी त्याची समजूत झाली होती! माधवराव व नारायणराव या दोघांस याच राजानें पेशवाईचीं वस्त्रं दिलीं व तीं त्यांस फार दिवस लाभलीं नाहींत. याकरितां आपला दत्तक मुलगा अमृतराव यास पेशवा करावा, असें राघोबाच्या मनांत होतें. पण राघोबाची प्रियपत्नी आनंदी हीस अजून आपणास पुत्र होईल अशी आशा होती. याकरितां तिनें राघोबास स्वतः वस्त्रें घ्यावीं असें हट्टानें सांगितलें. तेव्हां अमृतराव व बजाबा पुरंदरे यांस साताऱ्यास पाठवून अपेशी राजाकडूनच शेवटीं राघोबानें आपणाकरितां पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं! राघोबास पेशवाई मिळाल्यावर त्याचे साहाय्यकारी भोंवतीं जमूं लागले. मुधोजी भोंसले व हैदरअल्ली

पंडित म्हणाले, " शास्त्रीबोवा, आपण असें काय म्हणून बोलतां ? " त्यावर त्या निःस्पृह रामशास्त्र्यानें उत्तर केलें, " मला याचे राज्यांत रहावयाचें नाहीं. तुम्हांस राहावयाचें असेल म्हणून तुम्ही ग्रंथास विरुद्ध भाषण करतां. मी मुलेंमाणसें रवाना करून सोंवळ्यानेंच आलों. मी असाच निघणार. कालपासून जलस्पर्श देखील केला नाहीं. मी जीवित्वास उदार झालों ! मर्जी असल्यास आणखी एक ब्रह्महत्या करावी. " याप्रमाणें शास्त्रीबोवा बोलतांच कोणीएक बोलेनासें झाले. शास्त्रीबोवा तसाच निघून माहुलीस गेला. नंतर त्यानें अन्नव्यवहार केला. म्हटलें आहे ' निःस्पृहस्य तृणं जगत् ' !

---

## ८१ औट घटकेचें राज्य.



नारायणरावाचा खून करून गारद्यांनीं राघोबाच्या नांवाची द्वाही फिरविली व ते शनवारवाड्यांत बंदाबस्तानें राहिले. लागलेंच दंग्याचें वतमान गांवांत कळलें. तेव्हां सखारामबापू, नाना फडणीस, त्रिंबकराव मामा, मोरोबादादा वगैरे मुत्सद्दी कोतवालचावडींत जमा झाले व त्यांनीं स्वार जमा करून शहराची नाकेबंदी केली. इतक्यांत वाड्यांतून राघोबाची सखारामबापूस चिठ्ठी आली कीं, " आतां व्यर्थ खटपट कशास करितां ? चिरंजीव राव गारद्यांच्या कढकटींत मारले गेले; मीही गारद्यांच्या कैदेंतच आहें. तुम्हीं आंत येऊन भेटून जावें. " ही चिठ्ठी मिळाल्यावर बापू आंत गेला. आंतला भयंकर

---

हरिवंशाची बखर, पृष्ठ ४४

देखावा पाहून त्यास कसेसेंच झालें. तो राघोबास म्हणाला, " आमचे शरीरीं समाधान नाहीं. आम्हीं घरास जातों. लेखणीचे धनी फड-णीस. त्यांशिवाय आपलें चालावयाचें नाहीं. त्यास बोलावून आणा. " इतकें बोलून तो घरीं निघून गेला. नंतर नाना व मोरोबा या दोघांस राघोबानें बोलवून नेऊन " तुम्ही पूर्वींप्रमाणें आपलीं कामें करीत जा " असें सांगून मोरोबाकडून सर्व सरदारांस राघोबानें पत्रें लिहविलीं. त्यांत ' नारायणराव दुर्दैवानें मारले गेले. ईश्वरी इच्छेस उपाय नाहीं. तुम्हीं आपआपल्या जागीं सावध असावें व मागून हुकूम येतील त्याप्रमाणें वर्तत जावें. " असा मजकूर होता. सर्व सरदारांनीं व मुत्सद्दी मंडळींनीं राघोबाच्या म्हणण्यास तात्पुरती संमति दिली व राज्यकारभार सुरू झाला. पहिलें काम गारद्यांस वाड्यांतून बाहेर काढावयाचें. आतां करा-राप्रमाणें त्यांस पांच लक्ष रुपये व तीन किल्ले द्यावयाचे. पण किल्ले देणें म्हणजे राज्याचें नाकच त्यांचे हातीं देण्यासारखें होतें. त्यामुळें बरीच वाटाघाट होऊन शेवटीं आठ लक्ष रुपये घेऊन व आपल्या जिवास अपाय होणार नाहीं, याबद्दल राघोबापासून जामीन घेऊन गारद्यांनीं वाडा सोडला. राघोबाच्या मनांत आपल्या स्वतःस पेशवाईचीं वस्त्रें घेण्याचें नव्हतें. याचें कारण काय, तर सातारचा 'हल्लींचा राजा अपेशी,' अशी त्याची समजूत झाली होती! माधवराव व नारायणराव या दोघांस याच राजानें पेशवाईचीं वस्त्रें दिलीं व तीं त्यांस फार दिवस लाभलीं नाहींत. याकरितां आपला दत्तक मुलगा अमृतराव यास पेशवा करावा, असें राघोबाच्या मनांत होतें. पण राघोबाची प्रियपत्नी आनंदी हीस अजून आपणास पुत्र होईल अशी आशा होती. याकरितां तिनें राघो-बास स्वतः वस्त्रें घ्यावीं असें हट्टानें सांगितलें. तेव्हां अमृतराव व बजाबा पुरंदरे यांस सातार्‍यास पाठवून अपेशी राजाकडूनच शेवटीं राघोबानें आपणाकरितां पेशवाईचीं वस्त्रें आणविलीं! राघोबास पेशवाई मिळाल्यावर त्याचे साहाय्यकारी भोंवतीं जमूं लागले. मुधोजी भोंसले व हैदरअल्ली

यांचे वकील त्याच्या दरबारांत मोठ्या मिजासीनें वावरूं लागले. जुन्या सरदारांच्या जहागिरी कमी करून त्या सदाशिव रामचंद्र, बाजीराव बरवे व विठ्ठल विश्राम या तिघांस द्याव्या व पंधरा हजार सैन्याचे हे नवे तीन सरदार बनवावे, असा राघोबाचा बेत होता. भवानराव प्रतिनिधीस प्रतिनिधिपद देण्याचें त्यानें आश्वासन दिलें. गंगाधर यशवंत चंद्रचूडास 'तूं माझी उत्तम कामगिरी केलीस ' तुला होळकराची दिवाणगिरी फिरून द्यावयाची ' असें सांगितलें. चिंतो विठ्ठल रायरीकरास तर आपली दिवाणगिरी पेशवाई मिळतांच राघोबानें दिली. अशा रीतीनें आपल्या कच्छपीं असलेल्या लोकांस भरारा खैरात केली व या लोकांच्या जिवावर राज्य हांकण्याची त्यानें उमेद धरली. सखारामबापू, नाना फडणीस, हरिपंत फडके, त्रिंबकराव मामा पेठे, मोरोबा दादा फडणास, कृष्णराव काळे व नारो अप्पाजी वगैरे जुने मुत्सद्दी व पटवर्धन, रास्ते, धायगुडे आणि खुद्द शिंदेहोळकर, हे सरदार नाखुषीनें राघोबाच्या राज्यांत आपलीं पूर्वीचीं कामें करीत होते. यांपैकीं कोणाचेंही अन्तःकरण राघोबाविषयीं शुद्ध नव्हतें. राघोबा राज्य करूं लागला, तेव्हां राज्याची अंतःस्थिति अशी होती.

आतां राज्याबाहेर कशी स्थिति होती ती पाहूं. मुंबईचे इंग्रज नारायणरावाचा खून झाल्यापासून सज्ज होऊन साष्टीवर घाला घालण्यासाठीं टपल होते. पोर्तुगीज व हब्शाहा गडबड करीत होते. पण हे झाले क्षुद्र शत्रु. बडे शत्रु म्हटले म्हणजे, साबाजी भोंसले, निजामअल्ली व हैदरअल्ली हे होत. निजामअल्लीनें साबाजीस मदत केली. हैदरानें तुंगभद्रेच्या खालचा माधवरावानें जिंकलेला सर्व मुलूख ण्याचा सपाटा लाविला. यामुळें राघाबान पुढाल अनुक्रमानें शत्रूंवर स्वारी करण्याचें ठरविलें. पहिल्यानें निजामअल्ली व साबाजी यांजवर चालून जावयाचें; त्यांचें पारिपत्य करून हैदरावर मोर्चा फिरवावयाचा व त्याला तंबी पोंचवून अर्काटच्या नबाबावर स्वारी करावयाची, याप्रमाणें बेत ठरला.

चाळीस हजार फौज, पांच हजार गारदी व दोनशें तोफा, इतक्या फौजेनिशीं राघोबा निजामावर चालून गेला. निजाम बेदरकडे होता. तिकडे मराठी सैन्य चाललें. इतक्यांत साबाजीनें दहा हजार फौजेसह येऊन आंबेड व पैठण हे दोन परगणे लुटले. दहा हजार फौज बरोबर देऊन, त्रिंबकराव मामा पेठे व रास्ते या दोघांस साबाजीचें पारिपत्य करण्यास राघोबानें पाठविलें. इकडे बेदरास निजामाला कोंडल्यामुळें त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तह मराठ्यांस बराच फायदेशीर असा झाला. पण इतक्यांत निजाम राघोबाच्या भेटीस आला व त्यानें अशा कांहीं गोड थापा दिल्या कीं, राघोबानें अगदीं भुलून जाऊन या तहानें मिळालेली सर्व जहागीर निजामास परत दिली! त्यांत शर्त एवढीच ठेवली कीं, मोठेंसें काम पडेल तेव्हां निजामानें आपली कुमक करावी. त्यानें ही शर्त मोठ्या आनंदानें कबूल केली.

मग राघोबा हैदरअल्लीवर चाल करून निघाला. निवृत्तिसंगमावर कृष्णा उतरून रायदुर्गच्या रोखें चालला. यापूर्वींच हैदरकडून अप्पाजी-राम नांवाचा वकील येऊन तहाचीं कलमें ठरवून गेला होता. राघोबास अर्काटवर स्वारी करण्याची फार इच्छा होती व हैदरची फौज या स्वारींत कुमकेस नेण्याचा त्याचा बेत होता. शिवाय त्यास पैशाची फार जरूर होती. सबब माधवरावानें मोठ्या प्रयासानें जिंकलेल्या तिक-डील राज्यापैकीं तीन परगणे राघोबानें थोड्याशा रकमेसाठीं हैदरास विकून टाकले. आतां राघोबा अर्काटवर स्वारी करण्यास निघणार होता. इतक्यांत पुण्याहून कांहीं विलक्षण बातम्या आल्या. त्या ऐकून पुढें न जातां मागें फिरणें राघोबास भाग झालें. त्या कोणत्या त्या पुढील प्रकरणांत पाहूं.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राघोबास पेशवाई प्राप्त होतांच त्याचे मित्र भराभर वर चढूं लागले व जुने मुत्सद्दी मागें पडले. खुद्द सखारामबापूसही राघोबा फारसा विचारीत नसे. मग इतरांची कथा काय? या गोष्टींचा परिणाम सखारामबापूवर अतिशयच झाला. शिवाय नारायणरावाचा ख़ून झाला, हीही गोष्ट त्याचे मनास फार लागून राहिली होती. खुनाच्या दुसरे दिवशींच पोरेंबाळें सारीं घरीं टाकून तो जो दुपारीं बाहेर पडला तो पर्वतीच्या आसपास एकटाच निराशमुद्रेनें भटकत भटकत चांगला चार पांच कोस दूर गेला होता. त्याची चित्तवृत्ति इतकी क्षुब्ध झाली होती कीं, राघोबास पेशवाई पचूं न देतां लवकरच कांहींतरी चांगली व्यवस्था लावावी असें त्याच्या मनानें घेतलें. इतक्यांत नारायणरावाची बायको गरोदर आहे असें त्यास समजलें, तेव्हां या आधारावर नवीन व्यूह रचण्याचा त्यानें निश्चय केला.

पुणें दरबारांत सखाराम बापूची व नाना फडणीसाची अशा दोन फळ्या होत्या. फडणिसाच्या फळींत त्रिंबकराव मामा, मोरोबा फडणीस, कृष्णराव काळे हे मुत्सद्दी होते व या फळीच्या लगामीं, पटवर्धन, रास्ते, धायगुडे हे सरदार असत. शिंदेहोळकरांकडेही बापूपेक्षां नानाचेंच वजन जास्त पडण्यासारखें होतें. सखारामबापूस जुने देशस्थ सरदार अनुकूल होते, व कोल्हापूरकर, नागपूरकर भोंसले व निजामअली आणि हैदरअली यांजकडेही त्याचीं सूत्रें होतीं. गंगाबाईचा जीव बचावावा, राघोबास पदच्युत करून तिच्या नांवाची द्वाही फिरवावी, तिला पुत्र झाला तर बरेंच; नाहींतर तिच्या मांडीवर दत्तक देऊन त्याच्या नांवें राज्यकारभार चालवावा अशी बापूची मसलत होती. नाना फडणीस व तत्पक्षीय मंडळी आपल्या पक्षास सहज अनुकूल होतील असा त्यास

सुमार दिसला. मग दोन्ही पक्ष एक होऊन बापूची मसलत अंमलांत आणण्याचें ठाम ठरलें. यांत बारा मंडळी मुख्य होती म्हणून ही मसलत ' बारभाईचें कारस्थान ' या नांवानें प्रसिद्ध आहे.

राघोबा स्वारीस निघाला तो पहिल्यानें निजामावर गेला. पेडगांवच्या मुक्कामीं असतांच बापू आजारीपणाचें सोंग करून परत आला. नाना, मोरोबा व हरिपंत फडके कांहींना कांहीं निमित्त काढून पुण्यास परत आले. आतां पूर्वी ठरलेली मसलत अमलांत आणण्यास सुरुवात झाली. नारो अप्पाजी तुळसीबागवाले यानें पुण्याच्या कोतवालाच्या मुसक्या बांधून शहर ताब्यांत घेतलें आणि गंगाबाई व पार्वतीबाई यांस शनवारवाड्यांतून काढून पुरंदर किल्ल्यावर नेऊन ठेवलें. राघोबाच्या पक्षाच्या लोकांची मालमत्ता जप्त करून बायकामुलें कैदेंत घातलीं. सखारामबापू व नाना फडणीस यांनीं राघोबास सातारच्या महाराजांकडून पदच्युत करून पेशवाईचीं वस्त्रें गंगाबाईच्या नांवें व कारभाराचीं वस्त्रें आपल्या उभयतांच्या नांवें आणविलीं. शिंदे, होळकर, फत्तेसिंग गायकवाड यांस आपण काय केलें हें कळविण्यासाठीं पत्रें पाठविलीं. रुकनुद्दवल्याच्या मार्फतीनें निजामाशीं स्नेह केला. राघोबानें सेनासाहेब सुभ्याचें पद मुधोजीस दिलें होतें. तें फिरून साबाजी यास देण्यांत आलें. साबाजी, त्रिंबकराव मामा, व रास्ते हे आतां एक झाले. वीस हजारपर्यंत त्यांच्याजवळ फौज होती. शिवाय पुण्यास हरिपंत फडके आणखी फौज चाकरीस ठेवीत होता.

या बातम्या राघोबास समजतांच त्यानें कर्नाटकची मोहीम तहकूब केली, व परत कूच केलें. परत येण्यास निघण्यापूर्वी कारभाऱ्यांविरुद्ध आपला साहाय्यकर्ता कोणी तरी असावा म्हणून त्यानें हैदरअल्लीशीं कल्याणदुर्ग येथें तह केला. माधवरावानें मोठ्या मेहनतीनें मिळवलेला तुंगभद्रेच्या दक्षिणेचा मुलूख तर त्यानें हैदरास देऊन टाकलाच. पण एवढेंही करून राघोबा थांबला नाहीं. त्यानें कृष्णा व तुंगभद्रा या

नद्यांमधीलही सर्व मुलूख देऊन टाकला. या मुलखांत पटवर्धन व रास्ते या दोघांच्याही जहागिरी होत्या. हे दोघे सरदारही कारस्थानांत होते, तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्यास राघोबानें ही युक्ति योजिली ! राघोबा परत फिरून शके १६९५ (सन १७७४) च्या फाल्गुनांत कृष्णा उतरला. मग पटवर्धन व रास्ते या दोघांच्या जहागिरींत लुटालूट करण्याचा त्यानें सपाटा चालविला. इतक्यांत त्रिंबकराव मामा, साबाजी भोंसले व रुकनुद्दवला हे पन्नास हजार फौज घेऊन चाल करून आल्यामुळें राघोबा उत्तरेस पळूं लागला. येवढ्या वेळांत त्रिंबकराव, पटवर्धन व हरिपंत फडके हे एक झाले. व त्यांचा वीस हजारांवर फौजेचा जमाव झाला असल्यामुळें भोंसले व मोंगल यांस मागें टाकून ते राघोबाचा निकरानें पाठलाग करूं लागले. राघोबा सांगोल्यावरून पंढरपुराकडे आला; व तो पुढें जाणार अशी बातमी होती. मागून मामाची फौज पाठलाग करीत होती; तिचा मुक्काम कासेगांवीं होता. इतक्यांत राघोबानें पुढें पळण्याचा बेत रहित करून मामाच्या फौजेशीं कासेगांवीं गांठ घातली. या लढाईंत त्रिंबकरावाचा पराभव झाला व तो खुद्द जखमी होऊन दुसरे दिवशीं मरण पावला. हा कारभाऱ्यांच्या फौजेवर मोठाच कठीण प्रसंग होता. पण हरिपंत फडक्यानें मुळींच कच न खातां फौजेस भरंवसा देऊन फिरून एकत्र केलें. आणि साबाजी भोंसले व निजामअल्ली यांशीं राजकारण करून त्यांस आपणाकडे मिळवून घेऊन राघोबाचा पाठलाग सुरूं केला. तेव्हां फडक्याचें पारिपत्य करून पुण्यास येऊन कारभाऱ्यांचें पारिपत्य करावें ही मसलत करण्याचें राघोबास धैर्य होईना. सबब तो उत्तरेस बऱ्हाणपुराकडे पळत सुटला. हरिपंतही, भोंसले व निजाम यांसह त्याचा पाठलाग करीत चालला.

इतकें होतें तों शके १६९६ (सन १७७४) चा वैशाख महिना लागला. वैशाख शुद्ध ७ मी च्या दिवशीं गंगाबाई प्रसूत होऊन मुलगा झाला. जन्मोत्सवाचा दिवस कारभाऱ्यांनीं फारच थाटामाटाचा केला. पूर्वसंकेता-

प्रमाणें या मुलाचें नांव माधवराव असे ठेवलें. यास पुढें कौतुकानें सवाइ माधवराव म्हणूं लागले. ही बातमी राघोबास कळतांच पेशवाई मिळ-ण्याची त्याची आशा नष्ट झाली. त्यानें बाबूजी नाइकातर्फे बोलणें लावलें कीं, " आपण कारभारांत बोलणार नाहीं, स्वस्थ पुण्यांत राहूं. तसें नसल्यास पूर्वीची जहागीर द्यावी. स्वस्थ स्नानसंध्या करून राहूं. " तें बोलणें कारभाऱ्यांनीं मान्य केलें नाहीं. पुन्हां राघोबाकडून चिंतो विठल व विसाजी केशव समेट करण्याकरितां आले. कारभाऱ्यांना आतां धीर आला होता. त्यांनीं साफ सांगितलें कीं, फक्त दानधर्माकरितां दोन लक्ष रुपये घेऊन राघोबानें आनंदवल्लीस रहावें. तें होत नसेल तर अंगांत दम असेपर्यंत भटकत रहावें; पुढें व्हावयाचें तें होतच आहे.

## ८३ राघोबाचा पळ.



कारभाऱ्यांच्या अटी राघोबास मान्य झाल्या नाहींत व तो तसाच पुढें पळत चालला. मागें हरिपंत होताच. हरिपंतानें, राघोबा नर्मदा उतरून माळ-व्यांत शिरणार असें ताडलें. तेव्हां लागलींच महा-दजी शिंद्यास लिहिलें कीं, राघोबाचे तिकडे येण्याचे मार्ग आडवावे, म्हणजे आम्ही येऊन गांठ घालतों. पण शिंदे सरळ-पणानें कसे वागणार ? राज्यांत उत्पन्न झालेलें राघोबाचें खूळ एकदम मोडून टाकलें तर आपला उदय होणार नाहीं, असें महादजी शिंद्यास वाटलें. त्यानें हरिपंतास लिहिल कीं, माळव्यांत येण्यास हांड्याचा घाट व बडव्याचा घाट असे दोन मार्ग आहेत. हांड्याच्या घाटाचा बंदोबस्त आमच्यानें होणार नाहीं, तो तुम्हीं करावा. बडव्याच्या वाटेनें मात्र आम्ही राघोबास येऊं देत नाहीं. त्याप्रमाणें हरिपंतानें केलें व

राघोबा बडव्याच्याच वाटेनें कांहींएक अडथळा न होतां अचूक इंदुरास गेला ! राघोबाच्या पाठोपाठ नर्मदा उतरून हरिपंत येतो तों त्यास शिंद्याचीं पत्रें आलीं कीं, ‘तुम्हीं पुढें येऊं नये. राघोबाची समजूत काढून लवकरच त्यास देशीं घेऊन येतों.’ यंदांच राघोबाच्या मसलतीचा फडशा पाडावा असा हरिपंताचा हेतु होता. पण शिंद्याच्या मध्यस्थीमुळें त्यास नर्मदेच्या अलीकडे रहावें लागलें. एक महिना झाला तरी शिंदे समजूत घालीना. तेव्हां जरब दाखविण्याकरितां हरिपंत नर्मदा उतरून एक मजल पलीकडे गेला. त्याबरोबर शिंद्याचें पत्र आलें कीं, ‘मला फौजेचें पांच सात लक्ष रुपये देणें झालें आहे तें हरिपंतानें दिलें म्हणजे तुमच्याबरोबर देशीं येतों.’ असें राघोबानें आम्हांजवळ कबूल केलें आहे. याकरितां त्याचें फौजेचें देणें फेडावें म्हणजे काम होईल. याबर हरिपंतानें राघोबाकडे रुपये पाठविले. रुपये हातीं पडतांच राघोबा इंदूर सोडून सुजाउद्दवल्याकडे जाण्याकरितां एक मजल पुढें गेला. तेव्हां पाठोपाठ येऊन महादजीच्या फौजेनें राघोबाच्या फौजेस गराडा दिला, व कबूल केल्याप्रमाणें देशीं चलावें नाहींतर कटकट होईल, असें सांगून पाठविलें. हा शिंद्याचा निग्रह पाहून राघोबा दक्षिणेकडे येऊं लागला. परंतु त्यानें शिंद्यास सांगितलें कीं, वाटेंतून हरिपंत दूर झाला पाहिजे. त्यावरून निजाम व भोंसले यांस रजा देऊन हरिपंत वऱ्हाडच्या सरहद्दीवर तळ देऊळ घाटाखालीं छावणीस राहिला.

शिंदेहोळकरांबरोबर राघोबा शके १६९६ च्या आषाढ महिन्यांत खानदेशांत आला. पण त्याचें वर्तन सलोख्याच्या विरुद्धच चालू होतें. वाटेनें त्यानें अशीरगड घेण्याचा प्रयत्न केला. ठिकठिकाणीं रुसून कारभाऱ्यांपासून पैसा काढावा, मामलेदारांस धरून त्यांजपासून दंड घ्यावे, रयतेस चोप देऊन पैसा उकळावा, असले खेळ त्यानें एकसारखे चालविले होते. पुरंदरास शिंद्याचे वकील, हे बापू व नाना यांस असें बोलूं लागले, “राघोबास दहा लक्षांची जहागीर व मध्यम प्रतीचे तीन किल्ले

स्वदेशीं द्यावे. त्यांची मध्यस्थी आम्हांकडे आहे तशीच असावी. तुम्हांवर श्रीमंतांचा विश्वास नाहीं, याकरितां त्यांच्या बंदोबस्तासंबंधें हरएक काम पडेल तें तुम्हीं न करितां आम्हांस सांगावें. आम्ही करीत जाऊं. ” हें बोलणें नाना व बापू यांनीं मान्य केलें. शिंद्यानें या वेळीं लाख पन्नास हजार रुपये व शिंदखेड वगैरे गांव स्वत:करितां मागितले, तेही कारभाऱ्यांनीं दिले. कारभाऱ्यांच्या डोक्यावर आपले उपकार जास्त लादण्याकरितां शिंद्यानें भाद्रपदांत असें लिहून पाठविलें कीं, तुम्ही समीप आल्याशिवाय काम भागत नाहीं. कारभाऱ्यांच्या मनांत बालपेशव्यास सोडून लांब जावयाचें नव्हतें. पण कसा तरी एकदां राघोबाचा बंदोबस्त करावा अशी त्यांची फार इच्छा होती. तेव्हां पुरुषोत्तमराव दाजी पटवर्धन नांवाच्या विश्वासु गृहस्थावर पुरंदरचा बंदोबस्त सोंपवून निघाले. जातांना त्यांनीं बरोबर पंधरा हजार फौज मात्र घेतली होती. आतां पावसाळा संपल्यामुळें औरंगाबादेहून निजामही निघाला व नागपुराहून साबाजी भोंसलेही येऊं लागला. तेव्हां आतां आपल्यास कारभाऱ्यांपासून कांहीं मिळावयाचें नाहीं, हें महादजीस कळून चुकलें. व तो आतां नवीनच बोलणीं बोलूं लागला. कारभाऱ्यांनीं रागावून शिंद्यांस लिहिलें, “ तुम्हीं मध्यस्थींत पडून दादासाहेबांकरितां आम्हांकडून पंधरा लक्ष रुपये देवविलेत. श्रीमंतांकरितां किल्ले व जहागीर तुम्हीं जी मागितली ती अगदीं तुमच्या म्हणण्याप्रमाणें करार करून दिली. शिवाय तुम्ही स्वत:करितां जें जें मागत आलांत तें तें आजपर्यंत आम्ही देत आलों आहोंत; इतकें असून कराराप्रमाणें श्रीमंतांस वागवणें तुमच्यानें निभत नसल्यास त्यांस खुशाल वाटेल तें करूं द्यावें; ते व आम्ही बघून घेतों. ” शिंद्यांनें या निरोपाप्रमाणें अक्षरश: वर्तन केलें ! चोहोंकडून फौजा चालून येतात असें पाहून, राघोबानें एके दिवशीं अकस्मात् उत्तरेकडे पलायन केलें ! या वेळीं १६९८ चा मार्गशीर्ष महिना चालला होता. शिंदेहोळकर पाठलाग करूं लागले, व आपणास लवकर येऊन मिळण्या-

करितां त्यांनीं हरिपंतास निरोप पाठविला. त्याप्रमाणें हरिपंत त्यांस मिळाला व पाठलाग सुरू झाला. कारभाऱ्यांनीं आपल्याजवळील फौज हरिपंताकडे पाठविली व निजाम व भोंसले यांस निरोप देऊन ते पुण्यास माघारे आले.

इकडे राघोबा जो पळत सुटला तो धारेस गेला. नंतर आनंदीबाई गरोदर होती म्हणून तीस तेथेंच ठेवून तो पुढें उज्जनीस गेला. तेथें गेला तोंच पाठलाग करणाऱ्या फौजा जवळ आल्या अशी त्यास बातमी समजली. तेव्हां त्यानें गुजराथेंत धूम ठोकून एकदम बडोदें गांठलें. तेथें शिंदे, होळकर, हरिपंत येऊन पोंचतात तों राघोबा अमदाबादेकडे चाल करूं लागला. त्याचा मुक्काम मही नदीच्या पलीकडे असतां, शिंदे, होळकर, हरिपंत अलीकडील तीरीं येऊन पोंचले. तेथें राघोबावर चालून जाण्याचा हरिपंताचा बेत होता. परंतु शिंदेहोळकरांनीं तहाचें बोलणें लावलें. त्यामुळें त्यास आपला बेत रहित करावा लागला. तेथें सतरा दिवस बोलणें चाललें होतें. परतु राघोबाच्या मनांत आतां सल्ला करावयाचा नव्हता. त्याचें मुंबईकर इंग्रजांशीं सूत्र लागलें होतें. तें सिद्ध होण्यास थोडा वेळ पाहिजे होता; तो सल्ल्याचें ढोंग करून त्यानें काढला. या वाटाघाटीपासून कांहींच निष्पन्न होत नाहीं, असें पाहून हरिपंत बडोद्यास आला. तेथें शिंदेहोळकरही आले व हरिपंतास म्हणूं लागले, "आमच्याविषयीं तुम्हांस संशय येऊं लागला आहे तर आतां आम्हीच राघोबाशीं युद्ध करितों. तुम्ही उगीच आमचे मागें रहा म्हणजे झालें." तें म्हणणें मान्य करून बाजारबुणगें बडोद्यास ठेवून सड्या स्वारीनें हरिपंत, शिंदेहोळकरांबरोबर परत आला. पण पुढें महीनदीच्या पैलतीरीं १६९६ च्या माघ महिन्यांत युद्ध झालें; त्यामध्यें शिंदेहोळकरांनीं फारशी कामगिरी बजावली नाहींच. या लढाईंत राघोबाचा पूर्ण पराजय होऊन त्याच्या फौजेची दाणादाण झाली व तो मोठ्या शिकस्तीनें जीव बचावून सुरतेस पळून गेला.

## ८४ इंग्रजांशीं लढाई.



हिंदुस्थान देश श्रीमंत म्हणून येथें व्यापारासाठीं पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज वगैरे युरोपियन लोक आले होते. पण हे लोक केवळ व्यापार करण्याच्या उद्योगांतच फार दिवस राहिले नाहींत. त्यांनीं समुद्रकिनाऱ्याला मुलूख मिळविला. पोर्तुगीजांनीं गोवें व उत्तर कोंकण हीं व्यापलीं होतीं. पण त्यांपैकीं कोंकण चिमाजीअप्पानें महत्प्रयासानें सोडविलें. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीपासून फ्रेंच व पोर्तुगीज या लोकांचें प्रस्थ अगदीं नाहींसें झालें. इंग्रजांचा मात्र मद्रास, बंगाल इकडे उत्कर्ष होऊन माधवरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं त्यांनीं मद्रास व बंगालकडे बराच मुलूख मिळविला होता. तेव्हांपासून मुंबईकडेही प्रांत मिळविण्याची त्यांस फार इच्छा झाली. पण इकडे मराठी राज्य खंबीर असल्यामुळें त्यांचा एकदम शिरकाव होईना. माधवरावाच्या दरबारांत गृहकलह होण्यासारखा आहे कीं, नाहीं, या संबंधीं सूक्ष्म तपास ठेवण्यासाठीं मोस्टीन नांवाचा वकील त्यांनीं पुणें दरबारी ठेवून दिला[1]. नारायणरावाचा खून झाला तेव्हां राघोबा पेशवा झाला. फिरून कारभाऱ्यांनीं गंगाबाईचा पक्ष घेऊन राघोबाविरुद्ध कारस्थान रचलें. या गोष्टी पाहून इंग्रजांस साष्टी व वसई घेण्यास ही वेळ उत्तम आहे असें वाटलें. व त्यांनीं बाळाजी बाजीरावाशीं झालेल्या सख्य राखण्याच्या तहाची मुळींच फिकीर न करतां साष्टी घेतली. इतक्यांत राघोबा उत्तरेकडे पळूं लागला; हरिपंत त्याचा पाठलाग करीत होता. हा मराठी राज्यांत दुही उत्पन्न करणारा राघोबा शेवटीं निरुपाय होऊन मागील गोष्टींत सांगितल्याप्रमाणें इंग्रजांचा आश्रय मिळ-

१ ग्रँट डफकृत मराठ्यांचा इतिहास, पृष्ठ ३४०.

विण्याकरितां सुरतेस गेला. पळपुट्या राघोबास आश्रय देण्याचें मुंबईच्या गव्हर्नरानें मोठ्या खुषीनें कबूल केलें. इंग्रजांनीं राघोबास पेशवाईच्या गादीवर बसविण्याकरितां तीन हजार फौजेची कुमक करावी. राघोबानें ह्या फौजेच्या खर्चाबद्दल दरमहा दीड लाख रुपये द्यावे व ही रक्कम नियमितपणें इंग्रजास पोंचावी म्हणून गुजराथेंतील चार महाल त्यानें इंग्रजांच्या हवालीं करावे. शिवाय या संकटसमयीं मदत केल्याबद्दल इंग्रजांनीं घेतलेलीं साष्टी त्यांजकडे ठेवून शिवाय वसई वगैरे प्रांत असा सव्वा एकोणीस लक्षांचा मुलूख राघोबानें इंग्रजांस द्यावा, असा तह राघोबा व इंग्रज या दोघांमध्यें शके १६९६ ( सन १७७५ ) च्या फाल्गुनांत ठरला मग कर्नल किटिंग याचेबरोबर अडीच हजार फौज राघोबाचें मदतीस निघाली. इंग्रज व राघोबा या दोघांच्या फौजा शके १६९७ च्या चैत्रांत खंबायतेजवळ एक होऊन पुण्यावर चाल करून येऊं लागल्या. राघोबाचा पाठलाग करीत गुजराथेंत शिंदे, होळकर व हरिपंत हे तिघ सरदार आले होते. राघोबा इग्रजांकडे गेला असें कळतांच त्याच्या पारिपत्याची सर्व जबाबदारी हरिपंतावर टाकून शिंदे, होळकर ह दोघेही बडे सरदार खुशाल उज्जनी व इंदूर येथें जाऊन स्वस्थ बसले ! त्यामुळें राघोबास अडविण्याचें काम एकट्या हरिपंतावर पडलें. हरिपंताजवळ फौज कमी नव्हती; पण रोजमुरा न मिळाल्यामुळें तिला अगदीं उपवास पडत असत. त्यांतून ती फौज फितविण्याचा राघोबा सारखा प्रयत्न करीत होता. तथापि असल्याही बेदिल फौजेनिशीं त्यानें कर्नल किटिंगच्या लष्करास बराच त्रास दिला. इंग्रजांशीं त्याच्या चारपांच झटापटी झाल्या. त्यांपैकीं एकीस नापारची लढाई असें म्हणतात. या लढाईंत इंग्रजाचे चारपांचशें लोक ठार झाले व तीनचारशें जाया झाले. इंग्रजांकडील दोन तोफा सोडविल्या होत्या. पण ओढण्यास बैल नसल्यामुळें त्या नेण्यास फावलें नाहीं. तेव्हां तोफांच्या कान्यांत खिळे घालून त्या जाया करून टाकल्या. तोफांचे गाडे जाळून टाकले. मराठ्यांचेंही

नुकसान झालें. बरेच लोक जखमी झालें. शेवटीं पावसाळा जवळ आला. म्हणून इंग्रजांनीं भडोच येथें छावणी केली. हरिपंतानें थोडीशी फौज गुजराथेच्या बंदोबस्तास ठेवून बाकी फौजेसह खानदेशांत येऊन छावणी दिली.

शके १६९७ च्या पावसाळ्यानंतर फिरून लढाई सुरू व्हावयाची. परंतु मध्यंतरीं नवीनच प्रकरण उद्भवल्यामुळें लढाई तूर्त तहकूब झाली. त्या-वेळीं हेस्टिंग्ज म्हणून कलकत्त्याचा गव्हनर होता. हिंदुस्थानांतील इंग्र-जाच्या सर्व मुलखावर त्याचाच अधिकार चालावा असा नुकताच इंग्लंड-च्या पार्लमेंटाचा ठराव झाला होता. पुतण्याचा खुन करून राज्य मिळवूं पाहणाऱ्या राघोबास, मुंबईचा गव्हर्नर सहाय्य करण्यास कबूल झाला, हें त्यास मुळींच आवडलें नाहीं. त्यानें मुंबईकरास तात्काळ हुकूम केला कीं, " आपल्या अधिकाराबाहेर वर्तन केलें; हुकूम पाहतांच लढाई बंद ठेवावी. आम्ही पेशवे सरकाराच्या कारभाऱ्यांकडे वकील पाठ-वितों, तो तुमचा व त्याचा तह ठरवून देइल. " त्यानें सखारामबापूस कळविलें कीं, ' मुंबई सरकारनें सुरू केलेलें युद्ध आम्हांस मुळींच मान्य नाहीं. आम्ही तुम्हांकडे बोलणें करण्याकरितां वकील पाठवितों. यासाठीं ' तुम्हीं तूत लढाई बंद ठेवावी. ' कारभाऱ्यांनीं हें बोलणें मान्य केलें; व तुम्ही आहां तेथेंच लढाईच्या तयारीनें रहा; पण याउपरी लढाइची आग-ळीक आपणांकडून होऊं नये असा हरिपंतास त्यांनीं निरोप पाठविला.

मग कर्नल अप्टन तह करण्यासाठीं पुरंदरास आला. तहाचें बोलणें सुरू झालें. बरीच वाटाघाट झाली; पण निकाल लागेना. याचें कारण असें कीं, अप्टन हा मुंबईकरानें लढाई अन्यायानें सुरू केली हें कबूल करी; पण तीपासून इंग्रजांस मिळालेला फायदा सोडण्यास मात्र तो मुळींच कबूल नव्हता. कारभाऱ्यांनीं बरेच आढेवेढे घेतले. पण साष्टी वगैरे मुलूख कसाही मिळालेला असो, तो सोडण्यास आम्हीं तयार नाहीं, असें इंग्रज वकील साफ सांगूं लागला. बापू व नाना यांस मोठें कोडें पडलें.

इकडे मराठी राज्यांत हैदर व कोल्हापूरकर या दोघांनीं दंगा मांडला होता. पुणें दरबारास अतिशय कर्ज होऊन त्याची सावकारांजवळ मुळींच पत राहिली नव्हती. हरिपंताचें सैन्यहीं उपाशीं मरत होतें. अशा स्थितींत तह झाला नाहीं तर इंग्रज लढाईस उभे राहिल्यास आपल्यास फार जड जाईल असें कारभाऱ्यांस वाटलें; म्हणून साष्टी कां जाईना पण तूर्त मुलखांत स्वस्थता होईल व राघोबा हातीं लागल्यावर एक मोठा कांटा निघून जाईल, असें समजून कारभाऱ्यांनीं शके १६९७ ( सन १७७६ ) च्या फाल्गुन शुद्ध ११स तह कायम केला. या पुरंदरच्या तहांत पुढीलप्रमाणें महत्त्वाचीं कलमें होतीं. साष्टी, भडोच शहर व त्यांजवळील तीन लक्षांचा मुलूख इंग्रजांस द्यावा. इंग्रजांनीं आपल्या फौजा परत न्याव्या. राघोबानें आपल्या फौजेस फांटा देऊन कोपरगांवीं येऊन रहावें व त्यास खर्चाकरितां २५००० रुपये दरमहा मिळावेत. राघोबानें किंवा पेशव्याच्या फौजेंतील इतर कोणीं बंड केल्यास इंग्रजांनीं त्यास मदत करूं नये. '

## ८५ मराठी राज्यांतील दंग्यांचा मोड.



इंग्रजांशीं चाललेली लढाई थांबली व कारभाऱ्यांचा हा शत्रु नाहींसा झालेला पाहून आतां आपली टंगळमंगळ चालावयाची नाहीं, असें शिंदेहोळकरांस वाटलें, व ते शके १६९८ च्या उन्हाळ्यांत पुण्याकडे आले. नानांनीं आतां राज्यांतील दंगे मोडण्याचें ठरविलें. इंग्रजांशीं लढाई चालली होती त्याचा फायदा घेऊन मराठी राज्याच्या शत्रूंनीं राज्याचे चहूबाजूंनीं लचके तोडण्यास सुरुवात केली होती. निजामअल्लीनें दरडावणी दाखविली तेव्हां त्याला अठरा लक्षांचा मुलूख देऊन त्याचें तोंड कारभाऱ्यांनीं मिटविलें. हैदरानें कर्ना-

टक मिळविलें. कोल्हापूरकर हा पेशव्याचा मुलूख गिळूं लागला. कित्तूरकर देसायानें बंड केलें, प्रतिनिधीनें दंगा केला, घाटबंधारीस कोळ्यांचाही दंगा झाला, अशीं सर्व बाजूंनीं अरिष्टें कोसळलीं व तोतयाच्या बंडानें तर कळस केला ! माधवरावाच्या कारकीर्दींत मी (पानिपतच्या लढाईंत नाहींसा झालेला ) भाऊसाहेब असें सांगणारा एक तोतया निर्माण झाला होता. पुढें खोटा ठरला तेव्हां त्याला दौलताबादेच्या किल्ल्यांत बंदींत ठेवलें. नुकताच निजामअल्लीस तो किल्ला दिल्यामुळें त्या तोतयास रत्नागिरीस नेऊन ठेविलें. रामचंद्र नाईक परांजपे म्हणून रत्नागिरीस मामलेदार होता; त्यानें हा तोतया नसून खरा भाऊसाहेब आहे असें जाहीर केलें. मग काय विचारावें ? लागलीच कोंकणांत त्या तोतयास भराभर लोक मिळूं लागले. त्यानें सर्व कोंकण काबीज करून पुण्यावर स्वारी करण्याचा उद्योग आरंभिला. त्याच्या चौक्या बोरघाटांत राजमाचीपर्यंत बसल्या होत्या. याच वेळीं नानानें महादजी शिंद्याशीं गट्टी केली; व त्यांस तोतयाचा मोड करण्याची कामगिरी सांगितली. भिवराव पानसे यास अगोदर तोतयावर पाठविलें होतेंच. त्यानें दोन तीन लढाया करून तोतयास मागें सारलें होतें. इतक्यांत महादजी शिंदे तेथें आला. एक मोठी लढाई झाली. तींत तोतयाचा पूर्ण पराभव झाला. तेव्हां तो इंग्रजांकडे जाऊं लागला. इतक्यांत त्यास वाटत धरून रघूजी आंग्र्यानें पुण्यास आणलें. मग पंचांमार्फत त्याची चौकशी होऊन तो खोटा ठरला. शके १६९८ च्या मार्गशीर्ष महिन्यांत चार घटका दिवसास मेखसूनें डोकें फोडून ठार मारलें. मग या तोतयाच्या बंडांत सामील झालेल्या लोकांचें नानानें मोठ्या कडक रीतीनें शासन केलें.

हैदरअल्लीनें तुंगभद्रेच्या पलीकडचा सर्व मुलूख घेतला, पण येवढेंच करून तो स्वस्थ राहिला नाहीं. त्याचे सरदार भरारा तुंगभद्रेच्या अलीकडे स्वाऱ्या करूं लागले. एका सरदारानें धारवाडास वेढा घातला. तेव्हां परशुरामभाऊ पटवर्धन तिकडे गेला. मग त्यानें वेढा उठविला.

हरिपंततात्याही थोड्याच दिवसांनीं तिकडे जाऊन पोहोंचला. निजामअल्लीचा सरदार जाबितजंग धौशाही फौजेसह हरिपंतास मिळाला. पण आतां पावसाळ्यास सारा दीड महिना अवकाश होता म्हणून तो तेव्हांच निघून गेला. हरिपंताचे मनांत छावणी करून हैदराचें पारिपत्य केल्यावर देशीं यावयाचें होतें. पण फौजेस रोजमुरा नसल्यामुळें ती राहण्यास कबूल होईना. शेवटीं परशुरामभाऊनें कांहीं पैशाची व्यवस्था केली, व छावणीस राहण्याचें ठरलें. शके १६९९ ( सन १७७७ ) च्या पावसाळ्यांत त्यांनीं तुंगभद्रेच्या अलीकडच्या सर्व मुलखांवर अंमल बसविला. तुंगभद्रेच्या पलीकडचें चित्रदुर्ग येवढेंच एक संस्थान मराठ्यांच्या आश्रयाखालचें राहिलें होतें. त्यास हैदरानें वेढा घातला होता. पावसाळा संपतांच हरिपंत व परशुरामभाऊ यांनीं बेत केला कीं, तुंगभद्रा उतरून शत्रूच्या मुलखांत जाऊन पोट भरावें म्हणजे हैदरास जरब बसेल व चित्रदुर्गकरास धीर येईल. असा विचार करून धौशास येण्याविषयीं निकडीचीं पत्रें पाठवून ते अदवानीकडे खंडण्या वसूल करीत चालले. इतक्यांत हैदर चित्रदुर्गाचा वेढा उठवून पन्नास हजार सैन्यासह मराठ्यांपुढें अर्ध्या कोसावर अचानक येऊन उभा राहिला. हैदराच्या या धाष्टर्याचें कारण असें कीं, मराठी सैन्यांत त्यानें फितूर केला होता. व हैदर आला कीं ही फितूर मंडळी त्यास मिळणार होती. पण वेळींच बातमी लागल्यामुळें फितुरांचें शासन केलें. त्यामुळें वेळ निभावली व हरिपंत हटत हटत तुंगभद्रेपर्यंत आला. इतक्यांत धौशा येऊन मिळाला. मग हरिपंतानें आपलें बुणगें सुरक्षित स्थळीं ठेवून तो फिरून हैदरावर चाल करून निघाला. इतक्यांत पुण्याहून नानांचीं पत्रें आलीं कीं, " मोरोबादादा व होळकर एक होऊन राज्यांत मोठें खूळ माजलें आहे. तुम्हीं इकडल्या बातमींत असावें. " हीं पत्रें येतांच हरिपंत व परशुरामभाऊ चिंताक्रान्त होऊन परत फिरले.

तिसरा दंगा कोल्हापूरकरांचा. तो मोडण्याचें काम पहिल्यानें रामचंद्र गणेश कानडे यास सांगितलें होतें. त्यानें कोल्हापूरकराच्या सरदारांचा पराभवही केला ! पण इतक्यांत महादजी शिंद्याची समजूत घालून शके १६९९ च्या मार्गशीर्षांत त्याची रवानगी केली. 'दहा लक्ष रुपयांची जहागीर व अशीरगड किल्ला मला अगोदर द्या व मग मी मोहिमेस जातों,' असें महादजी म्हणत होता. नानानें भेलसे प्रांतीं दहा लक्षांची जहागीर देण्याचें कबूल केलें; व मोहिमेहून आल्यावर तुम्ही उज्जनीस जाऊं लागाल तेव्हां अशीरगडचे बोलूं, असें सांगितलें तेव्हां महादजी शिंदे एकदांचा कोल्हापुराकडे गेला. तो गेल्यावर पटापट एक एक ठाणें घेत घेत त्यानें शेवटीं कोल्हापुरास वेढा घातला. तेव्हां कोल्हापूरकर जेरीस येऊन तह ठरला. त्यांत कोल्हापूरकरानें पेशव्यांस वीस लक्ष रुपये द्यावे; चिकोडी, मनोळी वगैरे पेशव्यांचा मुलूख सोडावा, व राघोबा आणि हैदर यांशीं संबंध ठेवूं नये, अशीं मुख्य कलमें होतीं. इतकें होतें तोंच नानांचीं महादजीस पत्रें आलीं कीं, कोल्हापूरकरांच्या बंदोबस्तास पुरेशी पांच सहा हजार फौज ठेवून तुम्हीं तावडतोब पुण्यास निघून यावें.

---

## ८६ इंग्रजांचा पराभव.

### वडगांवचा तह.

शके १७०० ( सन १७७९ ).

कलकत्त्याचा गव्हर्नर जनरल हेस्टिंग्ज यानें मुंबईकरास टोमणा मारून पुणें दरबाराशीं तह केला. यामुळें मुंबईकरास राग आला व त्यानें तहाच्या प्रत्येक कलमास हरताळ फांसण्याचा निश्चय केला. दोन्ही पक्षांनीं आपल्या फौजा परत न्याव्या असें असतां इंग्रजांनीं आपली फौज सुरत व भडोच येथें लढाईच्या तयारीनें ठेविली.

राघोबास आश्रय देऊं नये असें कलम तहांत होतें तरी त्यास न जुमानतां त्यानें राघोबास दहा हजार रुपये पेन्शन करून देऊन मुंबईस ठेवून घेतलें ! पुरंदरच्या तहांत पेशव्यांच्या प्रजेपैकीं कोणीं बंड केल्यास इंग्रजांनीं त्यास कोण्या प्रकारेंही मदत करूं नये, असें कलम होतें. तें धाब्यावर बसवून तोतया भाऊसाहेबास मदत केल्याशिवाय इंग्रज राहिले नाहींत. अशा रीतीनें तहांतील कलमें आपण स्वतः मोडून इंग्रज भडोचजवळचा तीन लाखांचा मुलूख वर मागूं लागले. तेव्हां नानानें इंग्रजांस ताळ्यावर आणण्यासाठीं, सेंट ल्युबिन नांवाचा एक फ्रेंच वकील आला होता त्याचें मोठें प्रस्थ माजविलें. हा सेंट ल्युबिन ' चौल बंदर आम्हांस वखार घालण्यास द्या म्हणजे आम्ही इंग्रजांस हांकून देऊं ' असें म्हणत होता. नानास इंग्रज व फ्रेंच या दोघांचाही प्रवेश महाराष्ट्रांत होणें इष्ट नव्हतें. पण आपण फ्रेंच वकिलाचा मान केल्यास इंग्रजांस भीति पडून ते तहाप्रमाणें वागूं लागतील असें नानास वाटलें; पण फ्रेंच वकिलास मान दिल्यानें इंग्रज ताळ्यावर न येतां मराठ्यांनीं तह मोडला, असा त्यांनीं मोठमोठ्यानें पुकारा केला, व कलकत्तेकर व मुंबईकर हे एक झाले; कलकत्त्याहून खुष्कीच्या मार्गानें पुण्यावर चाल करण्यासाठीं एक फौज निघाली. मुंबईकरास पुणेंदरबाराशीं लढाई करण्यास एक उत्तम संधि मिळाली.

सखाराम बापू व नाना फडणीस या दोघांनीं बारभाईच्या कारस्थानांत पुढाकार घेतला होता. नानाचा चुलत भाऊ मोरोबा फडणीस यास त्यांनीं कारभारांतून अजीबात वगळलें. तें मोरोबास सहन झालें नाहीं. व तो राघोबातर्फे निरनिराळ्या कटांत सामील होई. पण त्याचेविरुद्ध दस्तऐवजी पुरावा न मिळाल्यामुळें नानास त्याचें शासन करतां येईना. शके १६९९ च्या शेवटीं शेवटीं हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, महादजी शिंदे हे कर्नाटक व कोल्हापूर इकडे गुंतले होते, व पुण्यास सर्व कारभार नाना फडणीसच पहात असे. नानाचें कारभारांत वजन

वाढत चाललेलें पाहून सखारामबापूच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला होता. अशा स्थितींत या दोघांत फूट पाडण्याचें मोरोबानें ठरविलें. तुकोजी होळकर त्या वेळीं फौजेसह पुण्यास होता. त्याला पहिल्यानें मोरोबानें आपल्याकडचें करून घेतलें; मग तो सखारामबापूस भेटला. त्या दोघांनीं अशी मसलत केली कीं, राघोबा वडील आहे त्यास पेशव्यांचा पालक म्हणून राज्यकारभारांत आणण्यास हरकत नाहीं. तेव्हां त्यांस घेऊन येण्याविषयीं इंग्रजांस निमंत्रण करावयाचें व कारभारांतून नानाची उचलबांगडी करावयाची, अशा दोन गोष्टी त्यांनीं भेटींत ठरविल्या. नानास या मोरोबाच्या कारस्थानाची माहिती होती. परंतु त्याचे तिघे मित्र कर्नाटकांत गुंतले असल्यामुळें त्यानें सर्व कारभार मोरोबाचे हातीं दिला, व आपण बालपेशव्याच्या संरक्षणाचें काम आपल्याकडे घेऊन तो पुरंदरास राहिला. त्यानें मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शिंदे, फडके व पटवर्धन यांस लवकर परत येण्याविषयीं पत्रें पाठविलीं, व तोंपर्यंत मोरोबाशीं सलोख्यानें वागून दिवस काढण्याचें ठरविलें. इंग्रजांस पुण्यास येण्याविषयीं मोरोबानें निकड लाविली. पण त्यांस सखारामबापूंकडून लेखी आमंत्रण पाहिजे होतें. पण बापू स्वतःस अडकावून घेणारा नव्हता. त्यानें साफ सांगितलें कीं, आपण नाहीं बोवा लिहूनबिहून देणार ! ! त्यामुळें इंग्रजांचें तूर्त पुण्यावर येणें राहिलें. इतक्यांत महादजी शिंदे व हरिपंत हे पुण्याजवळ येऊन पोंचले. मग तर काय ? मोरोबाच्या पक्षाच्या चिंध्या उडाल्या. महादजीनें पहिल्यानें आल्याबरोबर होळकरास कटांतून फोडलें. मग मोरोबास शके १७०० च्या आषाढात कैद केलें. सखारामबापूही कैदेंत पडावयाचा पण पुरंदरच्या तहावर त्याची सही झाली असल्यामुळें इंग्रजांस तह मोडण्यास निमित्त होईल, म्हणून बापूचें पारिपत्य केलें नाहीं. अशा रीतीनें मोरोबाच्या पक्षाचा चुराडा होऊन आतां इंग्रज किंवा राघोबा पुण्यास येणार नाहींत असें वाटूं लागलें.

पण इंग्रजांकडे चिंतो विठ्ठल रायरीकर होता. त्यानें व राघोबानें इंग्रजांस असें सांगितलें कीं, 'मोरोबा कैद झाला. होळकर नानास मिळाला या गोष्टी खऱ्या आहेत. पण तेवढ्यामुळें आपणास पुण्यावर चालून जाण्यास काय हरकत आहे ? आपण जवळ गेलों नाहीं तोंच मोरोबा सुटून आपल्यास येऊन मिळेल व होळकरसुद्धां मिळाल्याशिवाय राहावयाचा नाहीं.' मुंबईकर इंग्रजांस पुण्याच्या दरबारांत राघोबाचा कसा एकदां शिरकाव होतो व मग आपल्याला घाटापर्यंतचा मुलूख केव्हां एकदांचा मिळतो, असें झालें होतें. तेव्हां त्यांनीं शके १७०० चा पावसाळा संपतांच पुण्यावर चालून जाण्याकरितां इगर्टन याच्या हाताखालीं ४००० फौज पाठविली. या फौजेबरोबर राघोबा व त्याचा दत्तक पुत्र अमृतराव हे दोघे असून त्याजकडे तोफांसहित सुमारें पांचहजार मराठी फौज होती.

इंग्रज चालून येतो असें कळतांच नानानें भिवराव पानशे यास चारहजार पायदळ, पांचहजार स्वार व सात तोफा देऊन इंग्रजांचा रस्ता रोंखण्यासाठीं कोंकणांत पाठविलें. तिकडे भिवराव पानशे व इंग्रज यांच्या दोन चार चकमकी झाल्या. त्यांत इंग्रजांचा प्रसिद्ध सरदार कॅप्टन स्टुअर्ट ठार झाला. या वेळीं "गनिमी काव्यानें" लढाई करण्याचा मराठ्यांनीं निश्चय केला होता. मुलूख जाळून पोळून ओस करावा, अशा धोरणानें लढाई केली कीं इंग्रज स्वाधीन होतील असा मराठ्यांचा अंदाज होता. इंग्रज घाट चढून वर आले तोंच मराठ्यांकडून त्यांच्या अघाडी पिछाडीस त्रास होऊं लागला. चिंतो विठ्ठलानें सांगितलें होतें त्याप्रमाणें मराठे सरदारांपैकीं कोणीच इंग्रजांस येऊन मिळालें नाहीं. त्यांनीं स्वारीबरोबर शिधासामुग्री आणली होती ती आतां सरत आली होती. मुंबईहून पुरवठा व्हावा तों मराठ्यांची वीस हजार फौज कोंकणांत उतरून बोरघाटाच्या पायथ्यापासून पनवेलपर्यंत पसरली होती, तिनें मुंबईचें दळणवळण बंद केलें. अशा संकटांत इंग्रज

दाभाड्याचे तळेगांवानजीक आले, तेव्हां मराठ्यांची फौज त्यांच्या दृष्टीस पडली. तिजवर महादजी शिंदे व हरिपंत फडके हे मुख्य होते. दोहींकडून तोफांची सरबत्ती होऊं लागली. मराठ्यांनीं हल्ला करण्याचा डौल दाखविला तेव्हां इंग्रज लढाईच्या तयारीनें त्यांजवर चालून गेले. पण मराठ्यांस लढाई करावयाची नसल्यामुळें ते मागें सरून उभे राहिले. त्याचवेळीं मराठ्यांच्या कांहीं टोळ्या इंग्रजांच्या मध्यभागास व पिछाडीस त्रास देत होत्या. त्या सर्वांस मोठ्या कष्टानें हुसकून लावून इंग्रज तळेगावांत शिरले. लगेच मराठेही कोस दोन कोसांच्या अंतरानें गराडा देऊन राहिले. तळेगांवांत एक देखील माणूस किंवा गुरूं इंग्रजांच्या दृष्टीस पडलें नाहीं. आणि वैरणीची पेंढी किंवा मूठभर धान्यही त्यांना दिसलें नाहीं, सर्व गांव जळून भस्मसात् झाला होता. पुण्यापर्यंत वाटेंतील सर्व गांवें व खुद्द पुणें शहरही अशाच रीतीनें जाळून फस्त करण्याची नानानें तजवीज केली आहे, अशी पक्की बातमी इंग्रजांस लागली. अशा स्थितींत आपण हट्टानें पुढें गेलों, तर सर्व फौज उपासानें हैराण करून मराठे आपल्याला कैद करतील असें इंग्रजांच्या ध्यानांत आलें व त्यांनीं मुंबईस परत जाण्याचा निश्चय केला.

नंतर शके १७०० तील पौष वद्य ९ च्या रात्रीं आपल्या मतें शत्रूस चाहूल न लागूं देतां इंग्रज परत जाण्यास निघाले. परंतु मराठ्यांच्या चौक्या त्यांच्या भोंवतीं होत्या; त्यांस चाहूल लागून त्यांनीं वर्दी देतांच सर्व मराठी फौज धांवली. त्या फौजेशीं लढत लढत इंग्रज उजाडतां वडगांवास पोंचले. तेव्हां मराठ्यांनीं त्यांस फारच घाबरें केलें. चारपांचशें माणूस मारलें. पांच तोफा व दोन गरनाळा हस्तगत केल्या. अशी दुर्दशा झाल्यामुळें इंग्रज वडगांवांत शिरले. इतक्यांत मराठ्यांनीं येऊन त्या गांवास गराडा दिला. सबंध दिवस मराठ्यांनीं इंग्रजावर तोफांचा भडिमार व बाणांचा वर्षाव केला, व दुसरे दिवशीं प्रातःकाळीं स्वार व पायदळ मिळून हल्ला केला. तो हल्ला इंग्रज मोठ्या शर्तीनें मागें फिरवितात

तोंच दुसऱ्या हल्ल्याची तयारी झाली. तेव्हां इंग्रजांनीं आपला निभाव लागत नाहींसें पाहून नाना, बापू व शिंदे यांजकडे निरोप पाठविला कीं, " आमचा इलाज थकला, आम्ही शरण आलों. आम्हांस परत जाऊं द्यावें. " मग उभयपक्षीं पुढीलप्रमाणें ठराव झाला. " साष्टी, उरण व जंबूसर वगैरे गुजराथचे महाल इंग्रजांनीं घेतले आहेत ते झाडून परत द्यावे, व श्रीमंत नानासाहेब माधवरावसाहेबापासून तहनामा चालत आला आहे त्याप्रमाणें वागावें, राघोबास हवालीं करून द्यावें; व कलकत्त्याहून पुण्यावर जी फौज चालून येत आहे तिला परत जाण्यास सांगावें. " नंतर साष्टी वगैरे ठाण्यांसाठीं दोघे इंग्रज ओलीस राहिले. राघोबा ठरावाप्रमाणें इंग्रजांपासून निघून शिंद्याचे गोटांत येऊन राहिला. मग इंग्रजांची फौज मुंबईस परत गेली.

---

## ८७ इंग्रजांशीं चाललेल्या लढाईचा शेवट.

### सालबाईचा तह.

शके १७०४ ( सन १७८३ ).



इंग्रजी फौज गेल्यावर मराठी लष्कराचा मुक्काम एक महिनाभर तळेगांवासच होता. उभयतां कारभाऱ्यांनीं राघोबापासून " माझा पेशवाईच्या पदार्शीं कांहींएक संबंध नाहीं. " असें लिहून घेतलें. दरसाल पांचसात लक्ष रुपये घेऊन झांशी येथें राहावें. तेथें त्याचा बंदोबस्त ठेवून त्याच्याविषयीं फिरून सरकारांत बोभाटा येऊं न देण्याविषयीं शिंद्यानें हमी घेतली. मग शिंद्यानें दोन हजार स्वारांसह हरि बाबाजी हा सरदार बरोबर देऊन राघोबाची झांशीकडे रवानगी केली. आतां राघोबाची चांगली व्यवस्था लागली म्हणून

नानास बरें वाटलें. पण राघोबा अजूनही मराठेशाहीस भोंवणार होता. चोळी महेश्वरासमीप नर्मदा उतरत असतां राघोबानें शिंद्याच्या फौजेवर अकस्मात् तुटून पडून तिचा नाश केला व भडोचेस पळून जाऊन तेथें इंग्रजांचा आसरा धरिला.

कलकत्त्याहून येणाऱ्या फौजेवर गॉडर्ड हा मुख्य होता. तो हुशंगाबादेपर्यंत आला. त्याला वडगांव येथें झालेल्या विपत्तीची बातमी समजली. इंग्रजांच्या मनांत जर तह पाळावयाचा असता तर गॉडर्डनें परत जावयास पाहिजे होतें. पण तसें कांहीं झालें नाहीं. गॉडर्ड परत न जातां गुजराथेंत शिरला. त्यानें वडगांवचा तह कबूल न करतां पुरंदरच्या तहाच्या धोरणावर तह करण्यासाठीं नानाशीं बोलणें लाविलें. नानानें तें मुळींच ऐकिलें नाहीं. तेव्हां शके १७०१ चा पावसाळा संपतांच त्यानें गुजराथेंत लढाईस सुरुवात केली. त्यानें थोड्याच दिवसांत डभई व अमदाबाद हीं दोन शहरें काबीज केलीं व फत्तेसिंग गायकवाडाशीं तह करून त्याची मैत्री संपादिली. आपल्या ताब्यांतून राघोबा पळून गेला म्हणून आपण गुजराथेंत उतरून राघोबास धरून आणावें व गॉडर्डच्या फौजेचें पारिपत्य करावें म्हणजे आपल्यावर आलेला अपवाद जाईल, असा विचार करून महादजी शिंदे शके १७०१ च्या शेवटीं गुजराथेंत उतरला. इंग्रजांस तहाच्या नादीं लावून हंगाम घालवावा व मग शके १७०२ (सन १७८०) पावसाळ्यांत जलमार्ग बंद झाल्यावर चाहोंकडून ताण बसवावा, अशी महादजीची कल्पना होती. पण गॉडर्ड तहाचें बोलणें ऐकेना. त्याच्या मनांत शिंद्याशीं समोर सामना करावयाचा होता. शिंदे होतां होईल तों लढाई चुकवीत होता. गॉडर्डनें पुष्कळ प्रयत्न केला. पण व्यर्थ खेपा घालून त्यानें आपल्या फौजेस शिणविलें. एकदोनदां त्यानें शिंद्यावर छापा घातला; पण शिंदे सावध असल्यामुळें कांहीं नुकसान झालें नाहीं. इतक्यांत पावसाळा आला. गॉडर्डास मुंबईकरांनीं वसई घ्यावयासाठीं उत्तर कोंकणांत बोलाविलें; यामुळें गुजराथेचा कसाबसा

बंदोबस्त करून तो कोंकणांत आला व शिंद्याच्या मुलखावर गोहदच्या राण्याची मदत घेऊन इंग्रजांनीं स्वारी केल्यामुळें महादजीस तिकडे जावें लागलें. तिकडे इंग्रजी फौजेनें लाहोर व ग्वाल्हेर हे दोन किल्ले सर केले होते.

पावसाळा संपतांच कोंकणांत लढाईस सुरुवात झाली. गॉडर्डनें वसईस वेढा घातला. ही बातमी नानास कळतांच त्यानें रामचंद्र गणेश कानडे यास वेढा उठविण्यासाठीं पाठविलें. गॉडर्डनें रामचंद्र गणेश आपल्यावर चालून येतो असें कळतांच कर्नल हार्टली नामक सरदारास त्याच्याशीं मुकाबला देण्यास रवाना केलें. हार्टली व रामचंद्र गणेश यांची गांठ पडून तीन दिवस मोठें तुमुल युद्ध झालें. व दोहीं पक्षीं पुष्कळ नाश झाला. तिसरे दिवशीं रामचंद्र गणेश यानें आपली फौज अशा हिमतीनें व चतुराईनें नेली होती कीं त्या दिवशीं इंग्रजांचा पराभवच व्हावयाचा; पण आयत्या वेळीं शूर रामचंद्र गणेश अकस्मात् पतन पावला म्हणून मराठी फौज मागें हटली. मग गॉडर्डनें वसई घेतली.

दोनदां तह झाले तरी इंग्रज लढाई तशीच पुढें चालवीत आहेत हें पाहून नानास त्यांची फारच चीड आली. त्यानें इंग्रजी सत्ता पालथी घालण्याकरितां एक प्रचंड व्यूह रचिला. शिंदे, होळकर, भोंसले, निजामअल्ली, हैदर व फ्रेंच या सर्वांचा एकोपा करून अशी मसलत काढली कीं, शिंदे, होळकर व भोंसले या तिघांनीं मिळून बंगालवर स्वारी करावी; निजामअल्ली, हैदर व फ्रेंच यांनीं मद्रासवर चालून जावें; व स्वतः पेशव्यानें मुंबईकराची हड्डी नरम करावी. पण तो अमलांत आली नाहीं. शिंदे–होळकरांच्या मुलखावर इंग्रजी फौज आल्यामुळें त्यांना तिकडे गुंतून रहावें लागलें. भोंसल्यास सोळा लक्षांचा लांच भरून वॉरन् हेस्टिंग्जनें गप्प बसविलें. निजामअल्लीचा तर काय मोंगलाई कारखाना ! अजून त्याची फौज तयार व्हावयाची होती ! हैद-

रानें मात्र फ्रेंचांच्या मदतीनें मद्रासवर चालून जाऊन मद्रासकरास त्राहि त्राहि करून सोडलें, मद्रासकडील फौज मराठ्यांशीं लढण्यांत गुंतली होती त्यामुळें हैदरचें चांगलेंच फावलें. मद्रासकडून शह बसतांच इंग्रज मऊ आले. तिकडून कलकत्तेकर मुधोजी भोंसल्यातर्फे तह करण्यासाठीं झटूं लागला. इकडे गॉडर्डानेंही नानाशीं तहाचें बोलणें लाविलें. तेव्हां नानानें सांगितलें कीं, हैदरच्या सम्मतीशिवाय आम्ही तह करीत नाहीं.

यावर गॉडर्डनें विचार केला कीं, आपण पुण्यावर चालून जावें म्हणजे घाबरून जाऊन नाना तह करण्यास तयार होईल. या बेताप्रमाणें गॉडर्ड सुमारें सात हजार फौजेसह बोरघाट चढून आला. इंग्रज घाटावर चालून येणार ही बातमी कळतांच नानानें त्यास मागें हटविण्याकरितां मोठ्या उत्साहानें तयारी केली. कोंकणांतून गॉडर्डाची रसद तोडण्याकरितां परशुरामभाऊ बारा हजार फौजेसह मुंबई व बोरघाट यांच्यामध्यें तळ देऊन बसला. इकडून हरिपंत, तुकोजी होळकर व नाना पंचवीस तीस हजार फौजेसह गॉडर्डावर चालून गेले. तेव्हां गॉडर्डाची पुढें येण्याची छाती होईना. तो घाटमाथ्यावर बातेऱ्या बांधून (मोर्चे लावून) स्वस्थ बसला. परशुराम भाऊनें त्याची रसद बंद केली. एकदां कॅप्टन मॅके या नांवाचा इंग्रज सरदार दोन पलटणें व तोफखाना घेऊन पनवेलीहून गॉडर्डच्या छावणीकडे धान्य वगैरे सामुग्री नेत होता. त्याच्यावर परशुराम भाऊनें अकस्मात् हल्ला केला. तेव्हां लढाई होऊन इंग्रजांचे शंभर लोक पडले. मग भाऊनें कॅप्टन मॅकेस चहूं बाजूंनीं घेरलें. इतक्यांत गॉडर्डकडून त्याच्या सहाय्यास फौज आली व तिच्या मदतीनें तो गॉडर्डच्या छावणींत गेला.

आणखी एकदां कर्नल ब्राऊन नांवाचा इंग्रज सरदार धान्य आणण्याकरितां पनवेलीस जात असतां भाऊनें त्यास गांठलें. इंग्रजाकडचे पुष्कळ लोक पडले व हजारों बैल मराठ्यांच्या हातीं लागलें. ब्राऊन

पनवेलीस गेल्यावर मुंबईकरांनीं त्याच्या मदतीस फौज पाठविली. ही बातमी कळतांच नानानें तुकोजी होळकरास भाऊच्या मदतीसाठीं पाठविलें. मग कर्नल ब्राउन रसद घेऊन येऊं लागला तेव्हां भाऊ व तुकोजी यांनीं तीन दिवसपर्यंत त्याला मनस्वी त्रास दिला. त्यानें शर्थीनें लढून रसद पोंचविली.

शेवटीं गॉडर्डानें परत जाण्याचा बेत ठरविला. मग एके दिवशीं फ़ौज घेऊन गाडर्ड घाटाखालीं चालला. गॉडर्ड घाटाखालीं उतरल्याबरोबर हरिपंताच्या फौजेनें पाठलाग करून तोफा, राहुटच्या बंदुकीच्या दारूच्या पेटऱ्या व २००० तोफांचे गोळे इत्यादि सामान लुटून घेतलें. गॉडर्डला पनवेलीस पोंचण्यास चार दिवस लागले. तितक्या अवकाशांत हरिपंत, होळकर व भाऊ यांनीं पुढून व मागून हल्ले करून व तोफांचा जबर मार देऊन इंग्रजांस जर्जर केलें. इंग्रजांच पांचशें लोक मेले व जखमी झाले. व त्यांचें पुष्कळ सामान मराठ्यांच्या हातीं लागलें.

उत्तरेस कर्नल कॅमॅक यानें शिंद्याच्या मुलखावर स्वारी केली. तो आतां सिरोंजपर्यंत चालून आला. तेथें महादजीनें इंग्रजांभोंवतीं घिरट्या घालून त्यांस दाणावैरण मिळूं दिली नाहीं. इंग्रज बेजार झाले. कर्नल मूर कॅमॅकच्या मदतीस आला. मग त्या दोघांनीं शके १७०३ (सन १७८१)च्या पावसाळ्यांत शिंद्याच्या मुलुखांत छावणी दिली. तेव्हां शिंद्यानें स्वारांच्या लहान लहान टोळ्या इंग्रजी फोजेभोंवतीं पसरून त्यांस चैन पडूं दिलें नाहीं. पावसाळ्यांतच कर्नल मूर व महादजी शिंदे या दोघांचा तह झाला. त्यांत शिंद्यानें मध्यस्थ होऊन पेशव्यांशीं तह करून देण्याचें कबूल केलें; व इंग्रजांनीं दिल्लीप्रकरणीं वाटेल तसें वागण्यास शिंद्यास मुभा दिली. शके १७०३ च्या अखेरीस अंडरसन हा इंग्रजांचा वकील शिंद्याच्या लष्करांत आला व तहाचीं बोलणीं सुरू झालीं. नानाचें म्हणणें पडलें कीं, अगोदर राघोबास आमच्या स्वाधीन करा व मग तह करा.

शिवाय हैदरअल्लीस वगळून आह्मांस तह करावयाचा नाहीं,असें नाना ह्मणत होता. या दोन प्रकरणांसाठीं तह बरेच दिवस घोळत पडला. मग इंग्रजांनीं साष्टीशिवाय बाकीचा सर्व मुलूख परत करण्याचें ठरविलें. त्यांनीं साष्टीही परत दिली असती, पण इतक्यांत हैदर मरण पावला, त्यामुळें जास्त ओढून धरणें उपयोगीं नाहीं असें नानास वाटलें व त्यानें शके १७०४ (सन १७८३) च्या माघांत तहाच्या कागदावर सही केली. या तहास साल्बाईचा तह म्हणतात. यांत सतरा कलमें होतीं. त्यांतील मुख्य पुढीलप्रमाणें होतीं. इंग्रजांनीं लढाई सुरू झाल्यापासून घेतलेल्या मुलूखापैकीं साष्टीखेरीज सर्व मुलूख मराठ्यांस परत द्यावा, राघोबानें तह ठरल्यापासून चार महिन्यांच्या आंत पेशव्याकडे जावें, महादजी शिंदे हा तह दोहों बाजूंकडून पाळला जाईल याबद्दल हमीदार आहेत. इंग्रजांशीं स्पर्धा करणाऱ्या कोणाही टोपीवाल्याशीं पेशव्यांनीं दोस्ती करूं नये व मराठ्यांशीं द्वेष करणाऱ्या कोणाही पगडीवाल्याशीं इंग्रजांनीं दोस्ती करूं नये.

साल्बाईचा तह झाल्यावर निरुपाय होऊन राघोबा आपली बायको आनंदीबाई व पुत्र बाजीराव व अमृतराव यांसह कोपरगांव येथें येऊन राहिला. तेथें तहानंतर अकरा महिन्यांनीं म्हणजे शके १७०५ च्या मार्गशीर्ष महिन्यांत राघोबा मरण पावला. त्यावेळीं आनंदीबाई गरोदर होती, ती पुढें प्रसूत होऊन पुत्र झाला, त्याचें नांव चिमाजीआप्पा हें होय.

साल्बाईचा तह ठरल्यावर मराठे व इंग्रज यांमध्यें पुन्हां वितुष्ट माजण्यास एक कारण उपस्थित झालें. पुन्हां पेशव्यांचा आरमारावरील मुख्य सरदार आनंदराव धुळप हा समुद्रावरच फिरत असल्यामुळें त्याला तह ठरल्याचें माहित नव्हतें; त्यामुळें मलबारकडे जाणाऱ्या इंग्रजांच्या रिन्हेंज नांवाच्या जहाजावर जोराचा हल्ला करून त्यानें तें विजयदुर्ग येथें नेलें. ही बातमी ऐकून मुंबईकरास संताप आला पण नानानें त्यांची वेळींच समजूत घातल्यामुळें साल्बाईच्या तहांतील सर्व कलमें सुरळीतपणें अमलांत आलीं.

## ८८ भाग्यवान् सवाई माधवराव पेशवे.

सवाई माधवराव शके १६९६ (सन १७७४) वैशाख शु॥ ७ स जन्मल्याचें वृत्त मागें सांगितलेंच आहे. त्याच्या जन्माच्या पूर्वी गंगाबाईस पुत्र व्हावा ह्मणून सर्व प्रजा अगदीं आतुर झाली होती ! गंगाबाईस पुत्र होणें प्रजेस जितकें सुखावह होतें तितकेंच तें आनंदी व राघोबा या दुकलीस दुःखावह होतें. तेव्हां अर्थातच गंगाबाईचा गर्भपात करण्याविषयीं आनंदीबाईनें आतिशय खटपट केली. पण कारभाऱ्यांनीं आतिशय खबरदारी ठेवून गंगाबाईस पुरंदरास व्यवस्थेनें ठेविलें होतें. त्यांच्या प्रयत्नास यश येऊन गंगाबाई सुरक्षितपणें प्रसूत झालीं. माधवरावाचें बालपणही आनंदीनें त्याचा घात करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय जाऊं दिलें नाहीं. पण तेव्हांही ईश्वरानें खैर केल्यामुळें तिचें कांहीं चाललें नाहीं. इंग्रजांशीं वडगांवचा तह झाल्यावर शके १७०१ सालीं नानांनीं बालपेशव्यास पुण्यास आणून त्याची मुंज मोठ्या थाटानें केली. जन्मापासून या वेळपर्यंत पांच वर्षें बाल माधवराव पुरंदरासच होता. आतां राघोबा आपल्या हातीं आला आहे, व इंग्रजांचेंही योग्य पारिपत्य झालें आहे, तेव्हां राज्यांत कांहीं फारसें भय उरलें नाहीं, असें पाहून नानानें यापुढें पेशव्यास पुण्यासच ठेविलें. शके १७०४ मध्यें माधवरावाचें लग्न झालें त्यावेळीं सातारचा शाहू, हैद्राबादच्या निजामअल्लीचा मुलगा व इतर मराठे सरदार जमले होते. समारंभ मोठ्या थाटाचा झाला. सर्व मराठे लोक एकत्र जमून मराठे लोकांत अजूनही एकी आहे हें सर्व हिंदुस्थानभर जाहीर झालें.

माधवराव पुण्यांत शनवारवाड्यांत राहूं लागल्यापासून त्याच्या थोर पदास उचित असें शिक्षण त्याला देण्याविषयीं नानानें तजवीज केली.

तिरंदाजी व दांडपट्टा ह्यांचा अभ्यास माधवरावानें केला. सायंकाळीं तालीमखान्यांत जाऊन तेथें तो व्यायाम करीत असे. मुद्‌गल पेलणें शिकून तो लेजीमही खेळे. जोडी फिरविणें व बोथाट्या खेळणें हाही अभ्यास त्यानें केला. हत्तीवर हत्तीच्या किलाव्यांत बसून हत्ती चालविणेंही तो शिकला त्याचप्रमाणें त्याच्या बौद्धिक शिक्षणाचीही सोय झाली होती. त्याला बोधपर व मनोरंजक गोष्टी वाचावयास सांपडाव्या व मोडी वाचण्याचाही सराव व्हावा म्हणून नानानें बापूजी गोविंद गोखले नांवाच्या विद्वान् गृहस्थाकडून भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें मराठी बखरी लिहविल्या व सारिकाशतक नांवाचा चमत्कारिक गोष्टींचा ग्रंथ रचविला. पेशवा मोठा होऊं लागला तेव्हां सायंकाळीं चार घटका दरबारांत येऊन त्यानें बसावें असा नानानें प्रघात पाडला. हळूहळू दरबारांत परकीय राज्यांतील वकील आला असतां त्याला उत्तरें देणें वगैरे कामें नाना पेशव्याकडूनच करवून घेऊं लागला. कोणतेंही काम पेशव्यास नीट समजावें यासाठीं नानाची सारखी खटपट असे. अशा रीतीनें प्रयत्न चालल्यावर माधवराव मूळचाच चलाख बुद्धीचा असल्यामुळें थोड्याच काळांत राज्यकारभाराच्या निरनिराळ्या बाबी त्यास कळूं लागल्या.

एकदां माधवरावानें आपली आजी गोपिकाबाई हीस " मी अज्ञान बालक नित्यव्यवहार कसा करावा हें आपण मला लिहून धाडावें " म्हणून पत्र लिहिलें होतें. अलीकडे गोपिकाबाई गंगापुरास राहत असे. तिनें माधवरावास पत्र धाडिलें. त्यांत त्यास उत्तम बोध केला. त्या पत्रापैकीं महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे.

" प्रातःकाळचे घटका रात्रौ उठोन दिशेस जाऊन पादप्रक्षालन मुखप्रक्षालन करून दिवाणखान्यांतील मृत्तिकागणपतीचें दर्शन घेऊन प्रातःस्मरणाचे श्लोक म्हणावे. वैद्याकडून प्रकृतीअन्वयें औषध घेतल्यावर लिहायास बसावें. मग तालीमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्तीअन्वयें चढते दंड असावे. स्नान झाल्या-

वर संध्या थोडकी पण न बोलतां करावी. कचेरींत यावें ते समयीं सर्वांस दर्शन देऊन योग्यतेनुरूप नेत्रलाभ व भाषण होत असावें. कचेरींत लघु शब्द बोलूं नये. मनुष्यपरीक्षा असावी, गैरवाका एखाद्यानें समजाविल्यास पक्केपणीं विचार करून अपराधी ठरल्यास दुसऱ्याकडून त्यास निषिद्ध करवावें. आपण नेत्रकटाक्ष करून पहावें. अपराधानुरूप पारिपत्य व्हावें. परंतु संभावित गृहस्थ, बहुत दिवस पदरींचा अशानें रदबदली केल्यास क्षमा करावी. दुसऱ्याचें क्षुद्र काढूं नये. येणेंकरून त्याचा अपमान होतो व तो त्याच्या मनांत दंश राहतो. साधल्यानुरूप नाश करील आणि आपल्यास लघुपणा येईल. सन्निधानीं लोभांत लघु मनुष्य राखिल्यास जें केलें त्यास ते रुकार देतात; पण जनलोक वाईट म्हणतात, थोरपणास हानि होते. भोजनाचेपूर्वी सोवळें झाल्यावर थोरल्या देवघरांत जाऊन फुलें घालून नमस्कार करून ब्राह्मणास उदक सोडून भोजनास बसावें. ते समयीं भाषण करणें तें राजसूययज्ञांतील ब्राह्मणभोजनप्रकरणीं वगैरे योग्य सर्वांस दिसेल तें बोलावें. भोजन झाल्यावर राजविलास खेळ खेळावे. नंतर शास्त्री याजवळ विराटपर्वापासून भारताची चिंतनिका करावी. व वृद्ध मनुष्यें पदरचीं बहुत दिवशीं व अन्यत्र शहाणे असतील त्यांशीं दिल्लीप्रकरणीं व महाराजप्रकरणीं गोष्टी कशा झाल्या त्या ऐकण्यांत असाव्या. आपले वडिलांच्या गोष्टी कारभारी यांस एकान्तस्थळीं विचारीत असावें. तसबिरा व नकाशे अनेक पाहत असावें, ते समयीं शहाणे बुद्धिमान् असतील ते जवळ असावे. घोडीं फिरवायास चार रोजांनीं जावें; ते समयीं बरोबर पटवर्धन मंडळी व अन्यत्र सरदार असावे. त्यांशीं भाषण करणें तें संतोषवृत्तीनें करावें. परंतु अत्यंत लोभही नसावा व विरुद्धही न दाखवावें. कांहीं अंतर झाल्यास क्षमा होणार नाहीं, असें भय असावें. दिवाण यांनीं राजकारणाचें वर्तमान व पुढील योजना करावयाचा विचार करून विनंति करीत असावी. त्या समयीं अन्यत्र कोणीं असूं नये. व त्यांतील अभिप्राय दुसऱ्याशीं निघूं नये. म्हणजे मसलत असाध्य होत नाहीं. बातमी हरतऱ्हेची राखावी. म्हणजे मसलतीस बल बहुत आहे. पदरच्या मनुष्याचें चालवायाचें त्यास जिकीर करूं नये. तिरंदाजी करावयास जावें. तेथें बरोबर सरदार, पागे व मानकरी असल्यास तीर कोण कसे मारतात हें ध्यानांत असावें, व हरएक खेळ पहावयाचे ते समवेत पहावे. दीपदर्शन झाल्यानंतर संध्येस वस्त्रान्तर करून बसावें. रात्रीच्या भोजनानंतर कार्याकारण मंडळी जवळ असावी. ते समयीं बातमीदारांनीं गुप्त वर्तमान सांगत असावें

हरएक बातमीचीं पत्रें पहावयाजोगीं असतील तीं पहावीं. बाकीचीं पत्रें विश्वासूक माणूस कोण असेल त्याजकडे काम योजावें. त्यांनीं सांगावें व त्यावर हीं बातमी प्रमाण कीं अप्रमाण सांगतात याची चौकशी असावी, नंतर निद्रेस जावें. "

## ८९ टिपूशीं लढाई.



मराठ्यांची इंग्रजांशीं लढाई सुरू झाल्यापासून म्हैसूरकर हैदरअलीस दक्षिणेकडे दंगा करण्यास चांगलीच फुरसत सांपडली होती. त्यानें तुंगभद्रानदीपर्यंत आपल्या राज्याची सीमा फारच थोड्या दिवसांत वाढविली व स्वाऱ्या करीत करीत उत्तरेकडे येऊन त्यानें कृष्णेपर्यंत बहुतेक मुलूख व्यापिला. मराठ्यांस रिकामपण नसल्यामुळें त्याच्याकडे दुर्लक्ष करणें त्यांस भाग पडलें. साल्बाईचा तह होत असतांच हैदर वारल्याचें मागें आलेंच आहे. त्याच्या पश्चात् त्याच्या गादीवर त्याचा महत्त्वाकांक्षी व गर्विष्ठ मुलगा टिपू हा बसला.

राघोबानें मराठ्यांवर आणलेल्या घोर संकटांतून पुणेंदरबार एकदांचें सुटलें; पण त्याचा पहिला तकवा आतां राहिला नाहीं. टिपूवर स्वारी करण्याचें एकट्या मराठ्यांत सामर्थ्य राहिलें नाहीं. म्हणून नानानें निजामअलीची शके १७०६ च्या ज्येष्ठांत कृष्णा व भीमा यांच्या संगमावर येडूर गांव आहे तेथें भेट घेतली. तेथें दोघांनीं मिळून टिपूवर चालून जावयाचें असें ठरलें.

१ काव्येतिहाससंग्रह, पत्रें यादी वगैरे ४५२.

टिपू सुलतान फारच उन्मत्त झाला होता. तो पेशवे व निजाम या दोघांसही कस्पटाप्रमाणें मानीत असे. त्यानें निजामअल्लीस सांगून पाठविलें कीं, तुम्ही आमचे मांडलिक आहां, याकरितां माझ्या राज्यांत चालू असलेलीं वजनें मापें तुम्हीं आपल्या राज्यांत चालू केलीं पाहिजेत. या अपमानानें निजामअल्ली अगदीं चिडून गेला व त्यानें मराठ्यांपाशीं मदत मागितली. पण या वेळीं ती देतां आली नाहीं, व टिपूच्या पारिपत्याचें काम तसेंच राहिलें.

नरगुंदकर भावे यांचें संस्थान पूर्वी पेशव्यांच्या ताब्यांत होतें. पण तें कृष्णेपलीकडच्या मुलुखांत असल्यामुळें हैदरच्या ताब्यांत गेलें. पेशव्यास जी खंडणी देत तितकीच खंडणी देण्याचें नरगुंदकरांनीं हैदराशीं कबूल केलें. त्यावरून हैदरनें नरगुंद भाव्याकडेच ठेविलें. आतां टिपूच्या मनांत तें संस्थान बुडवावयाचें होतें म्हणून तो जबर खंडणी मागूं लागला. यावर नरगुंदकरानें नानास आपल्याविषयींची टिपूपाशीं रदबदली करण्याची विनंति केली. नानानें टिपूस निरोप पाठविला कीं एका सरकारच्या ताब्यांतून दुसऱ्या सरकारच्या ताब्यांत गेलें एवढ्याच सबबीवर एखाद्या संस्थानाची खंडणी वाढविणें बरोबर नाहीं. टिपूनें उत्तर पाठविलें कीं, मी आपल्या प्रजेस वाटेल तसें वागवीन या कामीं तुम्हांस मध्यस्थी करण्याचें कारण नाहीं. असें बोलून नरगुंदचा किल्ल बलात्कारानें घेण्याकरितां त्यानें फौज पाठविली. नानानें परशुरामभाऊ व गणेशपंत बेहरे यांस नरगुंदच्या रक्षणार्थ पाठवून दिलें. या फौजेस नानानें लढाईचा प्रारंभ शत्रूकडून झाल्याशिवाय तुम्हीं हत्यार उपसूं नये, अशी ताकीद केली होती. भाऊ व बेहरे नरगुंदजवळ जातात तों टिपूच्या फौजेंतील लोकांनीं त्यांस चीड येण्यासारखा निरोप पाठविला. त्या योगानें भाऊ व बेहरे यांनीं रागावून टिपूच्या फौजेवर हल्ला केला व तिची दाणादाण केली. इतक्यांत टिपूच्या फौजेच्या पाठीमागें गारद्यांचीं पलटणें होतीं तीं सरकून पुढें आलीं; तेव्हां भाऊ व बेहरे मागें

सरले कांहीं एक तयारी नसतां सरदारांनीं लढाईस प्रारंभ केल्याचें ऐकून नाना पंचाइतींत पडला. शेवटीं त्यानें लढाई चालू ठेवणेंच इष्ट असें जाणून तुकोजी होळकरास तिकडे पाठविलें. त्यावरून टिपूस जरब बसून त्यानें तहाचें बोलणें लाविलें. त्यांत सत्तावीस दिवसांत दोन वर्षांची खंडणी देतों व नरगुंदकरास मी पीडा देणार नाहीं, असें कबूल केलें. नानानेंही निजामअल्लीच्या आग्रहामुळें टिपूचें बोलणें मान्य करून तह केला.

टिपूच्या मनांत नुसती हूल दाखवावयाची होती. ठरविलेल्या मुदतींत त्यानें खंडणी दिली नाहींच; पण मराठी फौज परत गेल्यावर नरगुंदकरास विश्वास दाखवून त्याचा किल्ला काबीज केला; व त्यास सर्व कुटुंबासुद्धां कैदेंत ठेवून हालहाल करून ठार मारिलें. कृष्णेपलीकडील प्रांतांतील पुष्कळ हिंदु लोकांच्या सुंता केल्या. या अपमानापेक्षां मरण बरें असें वाटून दोन हजार ब्राह्मणांनीं आत्महत्त्या केली ! या बातम्या ऐकून नानास राग आला व त्यानें टिपूची पुरती खोड मोडण्याची तयारी चालविली.

शक १७०७ ( सन १७८५ ) चा पावसाळा फार लांबल्यामुळें पौष मासास प्रारभ झाल्यावर हरिपंत, तुकोजी होळकर, गणेशपंत बेहेरे हे सरदार जंगी फौज घेऊन पुण्याहून निघाले. नाना पंढरपुरास फौजेंत येऊन दाखल झाला. तेथून ही फौज येदगीर येथें गेल्यावर भोंसले व निजामअल्लीही येऊन मिळाले.

मग सर्वानुमतें असा निश्चय झाला कीं, टिपूचें राज्य जिंकून त्याचे सहा भाग करावयाचे. त्यापैकीं दोन भाग पेशव्यास, दोन निजामास व एक एक शिंदे व होळकर यांस मिळावे. प्रथम कृष्णा व तुंगभद्रा यांमधील मुलूख सोडविण्याचें ठरलें. इतके झाल्यावर २५००० फौज तहा-

बारजंगाच्या हाताखालीं देऊन निजामानें त्यास मोहिमेवर पाठविलें व आपण परत भागानगरास ( हैद्राबाद ) गेला.

कित्तुरकडे एक हैदरचा सरदार होता. त्याची रग जिरविण्याकरितां तुकोजी व गणेशपंत यांची रवानगी कित्तुरकडे झाली, व बाकीची सारी फौज बदामीवर चालून गेली. शके १७०८ च्या अक्षय्यतृतीयेच्या दिवशीं बदामीस वेढा दिला. किल्लेकऱ्यांनीं मोठ्या शौर्यानें तीन वारपर्यंत किल्ला लढविला. बदामी काबीज झाल्यावर हरिपंत शिरहट्टी काबीज करून गजेंद्रगडाकडे जात होता. इतक्यांत टिपू अदोनीस आल्याची बातमी त्यास लागली. अदोनीस निजामअल्लीचे पुतणे होते. अदोनी-कडे हरिपंतानें सर्व निजामाची फौज व आपल्या फौजेपैकीं वीस हजार लोक पाठविले. त्यांनीं वेढा उठविला. कित्तुरच्या आसपासच्या टिपूच्या लोकांस पिटाळून लाविलें, व सावनुराच्या नबाबाशीं मैत्री करून टिपूचा सरदार बुऱ्हाणउद्दीन याचा पराभव केला. हरिपंतानें गजेंद्रगड व बहादुरबेंडा हे काबीज केले, व कोपाळ हातीं येणार इतक्यांत टिपू आपल्या सर्व फौजेसह तुंगभद्रा उतरून अलीकडे आला. हरिपंत चालून गेला पण टिपू अडचणीच्या जागेंत असल्यामुळें हरिपंतास त्याजवर हल्ला करतां येईना. टिपूनें मराठे व निजाम यांवर दोन तीनदां छापा घालण्याचा प्रयत्न केला; पण तो साधला नाहीं. हरिपंताच्या लष्करांत दाणावैर-णीची अडचण पडूं लागली, म्हणून तो सावनूरजवळ जाऊन तळ देऊन राहिला. तेथेंही टिपूनें एक छापा घातला, पण हरिपंताच्या सावध-गिरीमुळें व हिमतीमुळें त्याचा लाग साधला नाहीं. हरिपंतानें तोफा लावून शिरहट्टी घेतली पण टिपू मराठ्यांपुढें मैदानांत येईना व डोंगरी मुलखाचा आसरा करून राहिला. इतक्यांत इंग्रजांची लढाईची तयारी चाललेली पाहून टिपू घाबरला व त्यानें एकदम तहाचें बोलणें लाविलें. तह ठरला त्यांत टिपूनें मागील खंडणीबद्दल ४५ लक्ष रुपये देण्याचें कबूल करून त्यांपैकीं तीस लाख रोख दिले व बाकीचे एक वर्षानें

देण्याचा करार केला. त्यानें अदोनी शहर निजामास परत दिलें व मराठ्यांस कित्तुर, बदामी व नरगुंद हे प्रांत दिले. हा तह शके १७०९ ( सन १७८७ ) च्या चैत्र महिन्यांत झाला.

---

## ९० महादजी शिंद्याचा उत्कर्ष.



महादजी शिंदे याची मागील प्रकरणांतून जी हकीकत आली आहे तीवरून तो पराक्रमी होता हें सहज कळून येण्यासारखें आहे. तोतयाचें बंड, कोल्हापूरकरांचा दंगा, मोरोबाचा फितूर, वडगांवची लढाई इत्यादि प्रकरणांत मराठ्यांस जय आला तो महादजीच्या कर्तृत्वामुळेंच होय. या पराक्रमाबरोबरच स्वतःचा बडेजाव करून घेण्याची त्याला अनावर इच्छा होती. इंग्रजांशीं चाललेलें युद्ध ज्या साल्बाईच्या तहामुळें संपलें तो तह तर महादजीनें आपल्या मध्यस्थीनें घडवून आणिला होता. त्यामुळें इंग्रजांपाशीं तर महादजीचें अतोनातच वजन वाढलें होतें. इतकें कीं इंग्रज व मराठे या दोघांत एखाद्या क्षुल्लक विषयावर बोलणें व्हावयाचें असलें तरी तें महादजीच्या द्वारेंच बोलावयाचें असें ठरलें.

साल्बाईचा तह होऊन इंग्रजांच्या मसलतींतून मोकळें झाल्याबरोबर महादजीनें दिल्लीचा रस्ता धरिला. तेथील कर्तबगार वजीर नजीबखान नुकताच वारला होता, व दिल्लींतील अमीरउमरावांत तंटे सुरू होते, अशावेळीं दिल्लींत व्यवस्था लावण्यास कोणीतरी प्रबळ सरदार पाहिजे होता. महादजी शिंदे त्या कामास योग्य होता, व आतां त्याला फुरसत मिळाली होती. त्यानें डी बायन नांवाचा एक फ्रेंच अंमलदार नोकरीस

ठेविला व त्याच्या देखरेखीखालीं कवाइती फौज बनविली होती. त्यामुळें त्यानें दिल्लीप्रकरणीं हात घालण्याची इच्छा दर्शवितांच बादशहा शहाअलम यानं ती गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली. दिल्लीस गेल्यावर शिंद्यानें दिल्लींतील बखेडा मोडला. त्याबरोबर बादशहानें खूष होऊन आपला मुलूख व फौज त्याच्या ताब्यांत दिलीं व बादशहाच्या खाजगी खर्चाकरितां त्यानें महिना पांसष्ट हजार रुपयांची नेमणूक करून द्यावी असें ठरलें. बादशहा शिंद्यास अमीर उल्मुलूख हें पद देत होता, पण शिंद्यानें तें नाकारिलें व आमचे धनी पेशवे यांस वकील ई-मुतालक हें पद द्यावें व वकील इमुतालकीची नायबगिरी आपल्याला वंशपरंपरा सांगावी अशी त्यानें विनंति केली. जेथें बादशाही सत्ता चालते तेथें तेथें गोवध होऊं नये अशाबद्दलही मागणी केली. बादशहानें शिंद्याच्या सर्व मागण्या कबूल केल्या. शिकलेली फौज व तोफखाना त्याच्या हातीं आला. ज्या अमीरांनीं शिंद्याचा अधिकार कबूल केला नाहीं त्यांस चांगली तंबी पोंचून शरण यावें लागलें. शिंद्याचें दिल्लीदरबारीं वजन बसून मराठ्यांची सत्ता फिरून दिल्लीस स्थापन झाली.

बादशाही हातीं आल्याबरोबर महादजीनें बंगालच्या चौथ सरदेशमुखीबद्दल इंग्रजांमागें टुमणें लाविलें. हें महादजीचें वर्तन पाहून आपणच वाढविलेला महादजी फिरून आपणास गुरकावितो, असें वाटून इंग्रजास राग आला. शिवाय महादजीचा दोस्त वॉरन हेस्तिंग्ज आतां विलायतेस गेला होता व त्याच्या जागीं कॉर्नवालिस नांवाचा गव्हर्नर जनरल आला होता. त्यानें महादजीचें प्रस्थ कमी करण्याकरितां मालेट नांवाचा वकील पुणें दरबारीं ठेवून दिला. इतक्यांत शिंद्यावर दोहों बाजूंनीं एक नवेंच संकट कोसळलें. दिल्लीच्या कामागिरींत शिंद्यास फार खर्च लागल्यामुळें त्यानें कांहीं अमीरांच्या जहागिरी जप्त केल्या. त्यामुळें सर्व मुसलमान अमीर बिथरले. इतक्यांत रजपूत राजांनीं शिंद्याशीं लढाई करण्याची तयारी चालविली. एक दोन लढाया झाल्या;

त्यांत शिंद्याचा पराजय झाला. अशा बिकट प्रसंगीं महादजीनें नानाजवळ मदत मागितली व तो मत्सरामुळें कदाचित् मदत करणार नाहीं असें वाटून पुढील अर्थाचीं पत्रें लिहिलीं: "मी म्हणजे अगदीं निराश झालों आहें असें नाहीं, पण रजपूत राजे व बादशहा यांशीं इंग्रजांनीं राजकारण केलें आहे, असें मला वाटतें. तेव्हां इंग्रजांच्या ताब्यांत हिंदुस्थानांतील प्रांत गेले असतां त्यांचें वर्चस्व किती वाढेल व त्यापासून मराठी राष्ट्रास किती धोका पोंचेल याचा तुम्ही आपल्याशीं विचार करून पाहवा. तुम्हाविषयीं माझ्या मनांत मत्सरबुद्धि खाचित वसत नाहीं. ती मजविषयीं तुमच्या मनांत वसत असेल तर ती काढून टाकावी. होळकर, हरिपंत व परशुरामभाऊ यांस तुम्ही असें विचारा कीं, मी त्यांच्या इच्छित हेतूस कधीं आड आलों आहें काय ? आणि माझे सर्व प्रयत्न मराठी राष्ट्राच्या उन्नतीकरितांच चालले आहेत कीं नाहींत ? आपला दोघांचा धनी एकच. त्याचें ज्यांत हित तेंच आपणांस कर्तव्य. तें करण्याविषयीं आपण दोघे झटूं या. फक्त मजविषयीं तुम्हांस मत्सर वाटत असेल तर तुम्हीं आपल्या मनास असें विचारा कीं, मोरोबादादानें तुम्हांविरुद्ध कारस्थान उभें केलें तेव्हां तुम्हांस पाठबळ कोणीं दिलें ? तुमचे प्रतिस्पर्धी सखारामबापू यास तुमच्या ताब्यांत कोणीं आणून दिलें ? तोतयाचें बंड कोणी मोडलें ? तळेगांवास इंग्रजांचा पराजय कोणीं केला ? लढाईचा बहुतेक भार आपल्या शिरावर घेऊन शेवटीं इंग्रजांशीं फायदेशीर तह कोणीं करून दिला ? निरनिराळ्या प्रसंगीं मी किती उपयोगी पडलों याचा विचार करा आणि जे दुष्ट लोक चुगल्या सांगत असतील त्यांचीं तोंडें बंद करा. ते आपणादोघांचेही हितशत्रु आहेत. कोणीकडून हिंदुस्थानांत मराठ्यांची सत्ता कायम रहावी, आपणांमध्यें कलह उत्पन्न होऊन सर्व राष्ट्राचा नाश न व्हावा, एवढी गोष्ट झाली म्हणजे झालें."

नानाच्या मनांत शिंद्याविषयीं कितीही स्पर्धा असली तरी तो आपणास मदत करणार नाहीं ही शिंद्याची समजूत चुकीची होती. शिं-

याचा बेत हळूहळू पेशव्यापासून स्वतंत्र होण्याचा होता. त्याच्यामात्र नाना अगदीं विरुद्ध होता. बाकी शिंद्यावर प्रसंग आला असतां नाना स्वस्थ बसणें अगदीं असंभाव्य होतें. शिंद्याचीं पत्रें येतांच त्यानें मस्तानीचा नातू अल्लीबहाद्दर याजबरोबर फौज देऊन त्यास हिंदुस्थानांत पाठविलें; व टिपूवरची मोहीम आटपल्यावर तुकोजी होळकराचीहि तिकडेच ताबडतोब रवानगी केली. ही मदत करतेवेळीं नानानें शिंद्याशीं पुढीलप्रमाणें ठराव केला. चंबळा नदीच्या उत्तेरस जितका मुलूख जिंकला जाईल त्याच्या तीन वांटण्या, पेशवे, शिंदे व होळकर यांनीं सारख्या करून घ्याव्या.

पुण्याहून कुमक येत होती तिजवरच अवलंबून न राहतां शिंद्यानें आपल्या पराक्रमानें शत्रूस अगोदरच जेर केलें. त्यावेळीं त्याची आश्चर्यकारक मर्दुमकी दिसून आली. होळकर व अल्लीबहाद्दर हिंदुस्थानांत पोंचल्यावर त्यांनीं शिंद्यास बरीच मदत केली. पण पुढें शिंद्याचीं व त्यांचीं भांडणें सुरू झालीं. थोड्याच वेळांत महादजीनें फिरून बादशहास आपल्या आश्रयाखालीं आणिलें, मुसलमानांचीं बंडें मोडलीं व राजपुतान्यांतील कछावह, राठोड व शिसोदे या तीनही प्रसिद्ध रजपूत घराण्यांस शरण यावयास लाविलें. मग उज्जनीस जाऊन तेथें फौजेची बाकी चुकवून आपल्या राज्याची त्यानें व्यवस्था केली.

## ९१ महादजीचा पेशव्यांचे कारभारी होण्याचा प्रयत्न.

महादजी शिंद्यानें आपल्या राज्याची व्यवस्था केली व मग तो मोठी फौज घेऊन दक्षिणेकडे निघाला. मोठी फौज घेऊन शिंदे येतो ही बातमी कळतांच इंग्रजांचीं दोन पलटणें नानानें मागितलीं. या मागणीप्रमाणें पलटणें आलीं नाहींत, पण शिंद्यास मात्र जरब बसून त्यानें आपली बरीच फौज परत पाठविली. बऱ्हाणपुरास येण्याच्या अगोदरच टिपूवर स्वारी करण्याच्या कामीं इंग्रजांस कुमक करण्यास गेलेला हरिपंत पुण्यास येऊन दाखल झाला. तेव्हां नानास थोडा धीर आला.

शिंदे पुण्यास कां येत आहे याविषयीं त्यावळीं निरनिराळे तर्क सुरू झाले. कोणी म्हणत कीं, निजामअल्लीचें राज्य घेण्याचें त्याच्या मनांत आहे. कोणास वाटलें कीं होळकर व अल्लीबहाद्दर यांस परत बोलवावें म्हणून पेशव्यांच्या दरबारीं खटपट करण्याकरितां तो आला आहे. इंग्रजांस वाटे कीं, आमचें पुण्यास पडलेलें वजन कमी करण्याकरितांच शिंद्याचा मोर्चा इकडे वळला आहे. नाना फडणिसास पेशव्यांच्या कारभारांतून काढून टाकण्यासाठीं निजामाचा दिवाण मशीरउल्मुल्क यानें मुद्दाम शिंद्यास आणविलें असेंही कांहीं लोक म्हणत. निजामाकडे कित्येक वर्षांची बाकी थकली होती ती वसूल करण्याकरितां नानानें अलीकडे तगादा लाविला होता. त्यास कंटाळून जाऊन मशीरउल्मुल्कानें ही खटपट केली असावी असा अंदाज होता! शेवटीं महादजी ज्येष्ठ व॥ ७ शके १७१४ ( सन १७९२ ) स पुण्यास येऊन संगमावर डेरे देऊन राहिला.

आल्याबरोबर बादशहानें पेशव्यांस दिलेलीं फर्मानें, पोषाक, व राजचिन्हें अर्पण करण्याबद्दल महादजीनें बोलणें काढलें. बादशहानें

दिलेलें महाराजाधिराज हें पद पेशव्यानें धारण केल्यास सातारच्या राजाचा अपमान होईल असें नानाचें म्हणणें होतें. म्हणून तें पद स्वीकारूं नये असा नानाचा हेतु होता. पण शिंद्यानें सातारच्या राजाकडून परवानगी आणिली. तेव्हां नानास आपलें म्हणणें परत घ्यावें लागलें. आषाढ शु॥ ३ स शिंद्यानें पेशव्यास मोठ्या समारंभानें वकील ई-मुतालकीचीं वस्त्रें अर्पण केलीं. समारंभ आटपल्यावर सवाई माधवराव मोठ्या थाटानें मिरवत मिरवत शनिवारवाड्यांत परत आला. नंतर त्याच बैठकींत पेशव्यानें महादजीस वकील ई-मुतालकच्या नायबीचीं वस्त्रें दिलीं. त्यावेळीं महादजीनें मोठ्या विनयानें भाषण केलें. " बादशहानें मला राजे महाराज, मदारउल महाम अलीजाहबहाद्दर असे लांब लांब किताब दिले, याचें भूषण वाटत नाहीं. मला श्रीमंतांचे जोडे उचलण्याच्या कामांतच धन्यता वाटते ! " या शिंद्याच्या नाटकी शब्दांनीं फारच थोडे लोक फसले असतील !

महादजीस पुणें दरबारांतील सर्व कारभार आपल्या हातांत घ्यावयाचा होता. त्यासाठीं त्याची खटपट सुरू झाली. त्यानें प्रथम पेशव्याचें मन आपल्याकडे ओढण्याच्या युक्त्या चालविल्या. महादजीच्या अंगीं वक्तृत्व चांगलेंच होतें ! गोड व अघळपघळ बोलून भुरळ पाडण्यांत त्याचा हात धरणारा फारच विरळा ! सवाइ माधवराव अजून लहान वयाचाच असल्यामुळें नाटकी आविर्भावास भुलण्यासारखीच त्याची मनोरचना होती. महादजी दरबारास नेहमीं जाऊं लागला. सवाईमाधवरावासही शिंद्याविषयीं प्रेम उत्पन्न झालें. व नानाच्या गंभीरवृत्तीचा व नियमितपणाचा कंटाळा आला. इकडे पेशव्याच्या मनांत अशा तऱ्हेचे विचार उत्पन्न करून दरबारच्या कामांतही महादजी ढवळाढवळ करूं लागला. एके दिवशीं महादजी भर दरबारांत बोलला, " इतके दिवस स्वाऱ्या व मुलूखगिऱ्या करून पुष्कळ देश जिंकले, व वजिरात वगैरे करून श्रीमंतांचा लौकिक अटकेपर्यंत केला. तर आतां शेवटची इच्छा

हुजूरच्या जवळ राहून दौलतीचा कारभार करण्याविषयीं आहे. यासाठीं माझे दौलतीचा हिशेब आपण घ्यावा व सरकारचे दौलतीचा हिशेब मला द्यावा." हें भाषण ऐकून शिंद्याचा हेतु सर्वांस कळला. नाना आणि हरिपंत यांस अत्यंत वाईट वाटलें. इतक्यांत उत्तर हिंदुस्थानांत शिंदे व होळकराच्या फौजेंत चुरस पडून शेवटीं लाखेरीस युद्ध झालें, त्यांत होळकराचा पूर्ण पराजय झाला. तेव्हां होळकरानें त्वेषानें जाऊन उज्जनी शहर जाळून लुटून फस्त केलें. या बातम्या पुण्यास येतांच येथेंही असाच हातघाईचा प्रसंग आल्यास आपल्याकडून तयारी असावी म्हणून नानानें परशुरामभाऊस दोन हजार स्वारांनिशीं बोलावून आणलें. त्यामुळें शिंद्यासही फौज वाढविण्यास सवड झाली. पण नाना व शिंदे दोघेही शहाणे. याकरितां दोघांनींही पेशवे सांगतील त्याप्रमाणें ऐकावें असें ठरलें. परंतु हा ठराव फार दिवस चालला नाहीं. महादजीनें पेशव्यास बरोबर घेऊन शिकारीस जाण्याचा परिपाठ पाडला होता. शिंद्याबरोबर जेव्हां पेशवा जाईल तेव्हां त्यांचेबरोबर परशुरामभाऊ पटवर्धन यानें जावें अशी नानानें तजवीज केली होती. शिवाय पेशव्याचे नोकर नानाच्या वळणाचे असत; त्यामुळें शिंद्यास पेशव्याशीं राज्यकारभारांतील मसलतीविषयीं बोलण्यास प्रसंग सांपडत नसे. परंतु एके दिवशीं पेशवे व महादजी पर्वतीहून परत येत असतां हिराबागेच्या मागें नावेंत बसून चालले. तेव्हां नावाड्याशिवाय दुसरा कोणी परका माणूस तेथें नव्हता. ही संधि उत्तम आहे असें पाहून महादजीनें कारभार आपल्या हातीं देण्याविषयीं पेशव्यास विनंति केली. तेव्हां माधवरावानें उत्तर केलें " नाना व तुम्ही माझे दोन हात; उजवा हात नाना व डावा हात तुम्ही. या दोन हातांपैकीं कोणताही हात कमी झाला तरी मी लंगडा होणार ! याकरितां आहे हीच व्यवस्था चालावी हें उत्तम !" या उत्तरानें महादजी खजील होऊन स्वस्थ बसला. पुढें ही हकीकत नानास समजली तेव्हां त्यानें पेशव्यांस एकांतीं गांठून भाषण केलें.

" पाटीलबावांनीं मराठी शिलेदारांस निरोप देऊन परक्या लोकांची कवायती फौज तयार केली व तीवर टोपीवाले आधिकारी नेमिले. यावरून ब्राह्मणांस निर्माल्यवत् करून सर्व सत्ता आपल्या हातीं घेण्याचा त्यांचा इरादा दिसतो. सरकारचीही मर्जी त्यांजवर विशेष. मीं आड यावें तर सरकारचें मला पाठबळ नाहीं. श्रीमंत गर्भस्थ होते तेव्हांपासून इमानानें सेवा करून मराठी राज्य मीं इतक्या नांवारूपास आणलें. आतां ब्राह्मणी सत्तेचा विनाश काल आलेला दिसतो. त्याकरतां ती वेळ येण्यापूर्वीच कोठें तरी एकांतांत बसून कालक्षेप करावा असें मनांत आलें आहे. श्रीमंतांनीं कृपाकरून मला काशीस जाण्यास निरोप द्यावा. " हें भाषण करतांना नानाच्या डोळ्यांतून पाणी आलें. नानाचें भाषण ऐकून पेशव्यास गहिंवर आला व नानाच्या गळां पडून तो म्हणाला " आजपर्यंत तुम्हीं मला मोठें केलेंत व प्रत्यक्ष पितासुद्धां करणार नाहीं असें प्रेम केलेंत आणि आज मला सोडून जाण्याची गोष्ट बोलतां ! काशीस जाण्याची गोष्ट सुद्धां बोलू नका. इतःपर शिंदे बोलतील तें मी ऐकूनसुद्धां घेणार नाहीं. " याप्रमाणें पेशवे व नाना यांचीं मनें निर्मळ झालीं. शेवटीं या वादाचा निकाल लावण्यासाठीं हरिपंतानें महादजीची भेट घेतली. त्यानें महादजीस सांगितलें कीं, मी व नाना दोघेही काशीस जातों; तुम्हांस दौलतीचा कारभार पहायाचा तो खुशाल पहावा. यावर " माझ्या मनांत कारभार करावयाचें होतें; पण खावंदांजी मर्जी दिसत नाहीं, तेव्हां मीं तो नाद सोडला आहे; तुम्ही खुशाल कारभार पहावा; मी मुळींच आड येणार नाहीं. " असें महादजीनें उत्तर दिलें. एव्हांपासून महादजी व नाना यांचा एकोपा झाला. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, थोड्याच दिवसांनीं नवज्वराची भावना होऊन वानवडी येथें महादजी शके १७१५ माघ शु. १३ स वारला; त्याच्या मरणानें मराठी राज्याचा एक आधारस्तंभच नाहींसा झाल्यासारखें झालें. त्याला संतति नव्हती. त्यानें आपला धाकटा भाऊ तुकोजी याचा नातु दौलतराव

यास दत्तक घेण्याविषयीं पुष्कळदां गोष्ट काढिली होती. पुढें तेरावे दिवशींच पेशव्यांच्या सम्मतीनें दौलतरावास सरदारीचीं वस्त्रें देण्यांत आलीं.

---

## ९२ खड्यांची लढाई.

शके १७१६ ( सन १७९५ )

निजाम अल्लीकडील बाकी वसूल करण्यासाठीं नानानें तगादा चालविला होता हें मागील गोष्टींत सांगितलेंच आहे. पण निजामचा दिवाण मशीरउल्मुल्क हा मुळींच दाद देईना. शिंदे वारला व पुढें थोड्याच महिन्यांनीं मराठ्यांचा दुसरा पराक्रमी सरदार हरिपंत फडके हाही शके १७१६ च्या ज्येष्ठांत वारला. या दोघांच्या मृत्यूमुळें मराठ्यांशीं लढाईचा प्रसंग आला तरी हरकत नाहीं, असा निजामास धीर वाटूं लागला. पेशव्यांचा निजामाच्या दरबारचा वकील गोविंदराव काळे यानें निजामअल्लीस नानानें तयार केलेली एक याद दाखविली व सांगितलें कीं, या यादीप्रमाणें दोन कोटी सात लक्ष रुपये पेशव्यांचें निजामाकडे येणें निघतें. त्यावरून मशीरउल्मुल्काचा व काळ्यांचा मोठा कडाक्याचा वाद झाला. शेवटीं मशीर म्हणाला, या यादींतील कलमांचा अर्थ आम्हांला समजत नाहीं. तो समजून देण्यासाठीं तुमच्या नानास येथें आणलें पाहिजे. गोविंदरावानें उत्तर केलें, नानास उद्योग आहेत ते सोडून ते येथें कसे येतील ? मशीर आवेशानें बोलला " ते येथें कसे येतील ! पहा त्यांस लवकरच येथें आणतों तें ! " एके दिवशीं मशीर दरबारांत म्हणाला ' पेशव्यांपासून आम्हीं पुष्कळ अपमान सोशिला. यापुढें पेशवे नीट वागले तर बरें, नाहींतर पेशव्यांस लंगोटी नेसवून हातीं भोपळा देऊन काशीच्या गंगेच्या

कांठावर जप करण्यासाठीं धाडल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाहीं !' याप्रमाणें लढाई करण्यासाठीं मराठ्यांचीं मनें चेतविण्याची कोणतीही गोष्ट करण्याचें निजामाच्या लोकांनीं ठेविलें नाहीं. एकदां दरबारच्या करमणुकीसाठीं त्यांनीं तमाशा करवून त्यांत नाना व सवाई माधवराव यांचीं सोंगें आणण्याचें सुद्धां धाडस केलें ! त्या वेळीं मात्र गोविंदराव काळे यानें उठून सांगितलें: " येथें आमच्या धन्याचीं सोंगें आणलीं जातात त्याअर्थीं आम्ही आतां पुण्यास परत जातों. मात्र इतकेंच सांगतों कीं, या अपमानाबद्दल तुमचे दिवाण मशीरउल्मुल्क यांस धरून नेऊन पुण्यास दारोदार हिंडवूं. " याप्रमाणें बोलणें झाल्यावर काळे पुण्यास आला. हैद्राबादच्या हकीकती कळतांच नानानें लढाई करण्याचा निश्चय केला.

नानानें दौलतराव शिंद्यास आपली हिंदुस्थानांतील फौज व प्रख्यात सरदार जिऊबादादा बक्षी यांस तुम्हीं आणवावें, असा हुकूम केला. त्याचप्रमाणें होळकर, भोंसले, गायकवाड, पटवर्धन, रास्ते, प्रतिनिधि इत्यादि सर्व जहागीरदारांस जलदीनें पुण्यास येण्याविषयीं लिहिलें. निजामअलीच्या पारिपत्यासाठीं दीड लाख फौज जमली. या सैन्याचें आधिपत्य नानानें परशुरामभाऊ पटवर्धनास दिलें. शके १७१६ च्या पौषांत पुण्याहून पेशवे व नाना कूच करून चालले. वाटेंत शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले, पटवर्धन वगैरे सरदारांच्या फौजा मिळाल्या. दोन महिन्यांनीं सैन्य सरहद्दीवर जाऊन पोहोंचलें.

अघाडीस ऐशीं नव्वद हजार उत्कृष्ट फौज दीडशें तोफांसह चालत होती. दहा पंधरा हजार पेंढारी शत्रूच्या मुलखांत शिरून लुटालूट करीत होते. बुणगें व तोफा वगैरे जड सामान बरोबर ठेवून पेशवे व नाना एक मुक्काम मागें असत. याप्रमाणें स्थिति असतां निजामअल्ली एक लक्ष दहा हजार फौज बरोबर घेऊन येत होता. त्याची व मराठ्यांची परांड्याच्या आसपास फाल्गुन वद्याच्या आरंभीं गांठ पडूं लागली. षष्ठीच्या दिवशीं

परशुरामभाऊनें शिंदे–होळकर यांच्या फौजा व हुजरातीच्या पागा वगैरे लढाईच्या तयारीनें उभ्या केल्या व शत्रु कसा चालून येत आहे, हें पाहण्यासाठीं आपण थोडके लोक बरोबर घेऊन पुढें गेला. तेथें बरीच लढाई होऊन पठाणांनीं भाऊस जखमी करून मागें हटविलें. द्वितीयेच्या दिवशीं हरिपंत फडक्याचा मुलगा नाना फडके यानें घाईघाईनें हल्ला केला असतां शत्रूनें त्यास मागें हटविलें. या दोन ठिकाणीं शत्रूची सरशी झाल्यामुळें मराठी फौजेंत गडबड उडाली. ही बातमी नानास कळतांच पेशव्यांसह मागें हटावें; असें नानास वाटूं लागलें. त्यानें भोंसले, शिंदे वगैरे सरदारांकडे सांडणीस्वार पिटाळून त्यांस विचारिलें कीं, निजामाची सरशी होत असतां तुम्ही स्वस्थ कां बसलां ? तेव्हां शिंद्याच्या फौजेवरील सरदार जिऊबादादा बक्षी यानें चिठ्ठी लिहिली कीं, " थोडेंसें लढाईचें तोंड लागलें इतक्यामुळें सरकार घाबरून सांडणीस्वार रवाना केला, त्यास हल्लीं विनंति लिहिली आहे. लढाईची सरशी करून नबाब निजाम अल्लीखानास धरून आणू किंवा डोळे कापून आणूं. " ही चिठ्ठी वाचून नानास धीर आला.

इकडे मराठ्यांच्या सज्ज फौजेशीं सामना देण्यास निजमाकडील सरदार असदअल्लीखान हा पन्नाससाठहजार स्वार व सतरा हजार गारदी यांसह मराठ्यांवर चालून आला. तेव्हां भोंसल्यानें निजामावर बाणांचा पाऊस पाडला. व शिंद्यानीं तोफांचा भडिमार फारच केला. या दोन्ही माऱ्यांपुढें निजामाचे स्वार पळून गेले; व खाशा निजामअल्लीच्या मनांत भीति उत्पन्न होऊन तो मागें हटला. इतक्यांत गारद्यांसही मागें फिरविण्याविषयीं निजामअल्लीकडून हुकूम आल्यामुळें गारदीही हटले. तेव्हां सूर्यास्त झाला होता. अंधार पडल्यावर तें मोंगलांचें घाबरलेलें सैन्य खर्ड्याच्या गढीच्या आसपास उतरलें होतें, त्यावर मराठे छापा घालावयास आल्याची खोटीच हूल उठून तें सारें लष्कर आपलाच खजिना लुटून घेऊन रानोमाळ पळत सुटलें. वाटेंत मराठ्यांचे पेंढारी

फिरत होते, त्यांनीं पळपुट्या निजामाकडील लोकांस गांठून सर्व चीजवस्त लुटून घेतली. आपल्या सैन्याची अशी दुर्दशा झालेली पाहून निजामअल्ली दहाहजार फौजेसह खड्यांच्या गढींत शिरला. दुसऱ्या दिवशीं मराठ्यांनीं त्यास चोहींकडून घेरून तोफांचा मारा सुरू केला. दोन दिवस पराकाष्ठेचे हाल सोसल्यावर तिसऱ्या दिवशीं नबाबानें तहाचें बोलणें लाविलें. 'अगोदर मशीरास आमच्या हवालीं करा. मग तह करूं' असें पेशव्यांचें बोलणें पडलें. निजाम मोठ्या पेंचांत पडला. त्या समयीं तो स्वामिभक्त मशीर निज़ामास बोलला कीं, 'माझ्या जाण्यानें दौलत वांचत असेल तर मी खुषीनें जातों' मग निजामअल्लीनें 'मशीर देतों. काय वाटेल तें देतों. पण मला या विपत्तींतून सोडवा' असा निरोप पाठविला. पेशव्यांनीं मशीरास आपल्या ताब्यांत घेतलें व मग तह ठरला. त्यांत पुढीलप्रमाणें कलमें ठरलीं. 'मोंगलांनीं मराठ्यांस परांड्यापासून उत्तरेस तापीपर्यंत दौलताबाद किल्ल्यासह मुलूख द्यावा. मराठ्यांस लढाईचा खर्च व मागील बाकी याबद्दल तीन कोट रुपये द्यावे. शिवाय रघूजी भोंसल्यास घासदाण्याच्या हक्काबद्दल एकूणतीस लक्ष रुपये द्यावे.' याप्रमाणें तह ठरल्यावर मराठ्यांनीं निजामास सोडून दिलें.

नंतर सारें लष्कर परत निघालें तें वैशाखाच्या प्रारंभीं पुण्यास आलें. नवीन जिंकलेला मुलूख सरदारांत वांटून देण्याचें काम झाल्यावर निरनिराळे सरदार आपआपल्या ठिकाणीं परत गेले.

## ९३ सवाई माधवरावाचा मृत्यु.



खर्ड्याच्या लढाईत सर्व मराठे सरदार एक होऊन पेशव्यांच्या आज्ञेत वागले व त्यावेळीं मराठ्यांच्या एकीमुळें निजामासच नव्हे तर हिंदुस्थानांतील इतर राजकर्त्यांसही दरारा बसला. दौलतराव शिंद्याच्या मनांत नानाविषयीं आदर होता. तुकोजी होळकर आतां म्हातारा व अशक्त झाला होता त्यामुळें तोही नानाच्या विरुद्ध जाण्याचा संभव नव्हता. रघूजी भोंसले तर पूर्णपणें नानाच्या कह्यांत आला होता व ब्राह्मण जहागीरदार तर पहिल्यापासूनच पेशवाईचे हितचिंतक होते. अशा रीतीनें सर्व मराठ्यांवर पेशवाईची छाप पडल्यामुळें मराठी राज्यांत एकी होऊन तें फिरून वैभवास चढेल, असें वाटूं लागलें होतें. सवाई माधवरावही हळूहळू कारभारांत लक्ष घालूं लागला होता. त्यानें खर्ड्याच्या स्वारीस निघतांना एक ब्राह्मणांची पंचाईत तोडली. पुण्यास घाशीराम कोतवाल नांवाचा पोलिस अमलदार होता. तो लोकांवर फार जुलूम करीत असे, त्याच्या जुलमाला ब्राह्मण लोक अगदीं कंटाळून गेले होते. एके दिवशीं ब्राह्मणांनीं घाशीरामाच्या जुलमाची हकीकत पेशव्याच्या कानावर घातली. तेव्हां पेशव्यानें चौकशी करून घाशीरामास देहान्तप्रायश्चित्त भोगावयास लाविलें. अशा प्रकारें राज्यकारभार स्वतः पेशवे हळूहळू करूं लागले. राज्य कळसास आलें. दौलतीचाही कळस झाला.

राघोबाचें कुटुंब कोंपरगांवीं रहात होतें. तेथें आनंदीबाईच्या जिवास समाधान नाहींसें झालें म्हणून नानानें तीस व तिच्या मुलांस आनंद-

---

१ चावडस हें खेडें नाशिकापासून मैल दीड मैलावर आहे. चावडस व आनंदवल्ली एकच. राघोबाची बायको आनंदीबाई हिच्या नांवावरून या खेडयास आनंदवल्ली हें नांव पडलें. आनंदीबाईची या स्थळावर फार प्रीति होती, व तिच्या मनांत येथील वस्ती वाढवीत वाढवीत नाशिकापर्यंत न्यावी असें होतें.

वल्लीस नेऊन ठेविलें. तेथें गेल्यावर थोड्याच दिवसांत आनंदी वारली. तिचा थोरला मुलगा बाजीराव याचें वय एकोणीस वर्षांचें होतें, व धाकटा चिमाजी आप्पा बारा वर्षांचा होता. याशिवाय राघोबाचा दत्तकपुत्र अमृतराव हाही आनंदवल्लीस होता. बाजीराव सुंदर असून त्याचें भाषण इतकें मोहक होतें कीं, जेणेंकरून माणूस कसा कां शहाणा असेना तो त्यास भुलून जाई. राघोबाच्या मुलांविषयीं व विशेषतः बाजीरावाविषयीं नानाच्या मनांत धास्ती असे. खर्ड्यांच्या लढाईस जाण्यापूर्वीं त्यानें त्या तिघांही मुलांस शिवनेरीस पक्क्या बंदोबस्तानें ठेविलें होतें. याचें कारण असें कीं, बाजीराव राज्यप्राप्तीसाठीं कांहीं कारस्थान केल्याशिवाय राहावयाचा नाहीं अशी नानास भीति होती. स्वारीहून परत आल्यावर नानानें त्या तिघांस तसेंच शिवनेरींत ठेविलें.

पराचा कावळा करण्याची लोकांस संवय असतेच. त्या बुद्धीस अनुसरून लोकांत बाजीरावाच्या गुणांची फारच प्रसिद्धि होऊं लागली. व नानानें ठेविलेला कडक बंदोबस्त लोकांस क्रूरपणाचा वाटला. अशा स्थितींत राघोबास चाहणाऱ्या लोकांनीं नानाच्या वर्तनाबद्दल गवगवा केला, व बाजीरावाचा सारखा स्तुतिपाठ चालविला. लागलींच घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, तिरंदाजी करणें या कामांत बाजीराव फार पटाईत आहेत व भाला व बोथाटी खेळण्याच्या कामांत त्याजसारखा साऱ्या गंगथडींत कोणी नाहीं अशा गप्पा चहूंकडे सुरू झाल्या. शिवाय संस्कृत विद्येंतही त्याची फारच गति आहे असा लोकप्रवाद होता. ही प्रशंसा पेशव्यांच्या कानावर गेली, व बाजीरावास आपण आपला कारभारी करावें असें पेशव्यांस वाटूं लागलें. नाना फडणिसांनीं या बाबतींत पेशव्यांचा चांगलाच निषेध केला, पण नानानें जों जों निषेध करावा तों तों पेशव्यांची बाजीरावाच्या ठायीं अधिकच प्रीति जडली. त्यामुळें नानाचें मन चिंताक्रांत झालें व त्यानें पेशवे कोठें जातात, काय करतात इत्यादि गोष्टींवर जास्त नजर ठेविली. त्यानें शिवनेरीवर बाजीराव होता तेथ-

लाही बंदोबस्त जास्त कडक केला. पण शिवनेरीच्या बंदोबस्तास ठेविलेला आनंदराव नागनाथ बाजीरावास वश झाला होता. बाजीरावानें पेशव्यास असा निरोप पाठविला कीं, तमच्या व आमच्या स्थितींत कांहीं फरक नाहीं. तुम्ही शनवारवाड्यांत कैदेंत आहां; मी शिवनेरीस आहें इतकेंच. असें जरी असलें तरी आपण मजवर प्रेम ठेवावें. पुढें मागें आपण आपल्या पूर्वजांसारखा पराक्रम करूं. यानंतर त्यांचा गुप्त पत्रव्यवहार सुरू झाला. ही गोष्ट नानास समजतांच त्यास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें आनंदराव नागनाथास कैदेंत टाकिलें व बाजीरावावर सक्त पहारा ठेविला. इतकेंच करून न थांबतां पेशव्याच्या हातचीं पत्रें बाजीरावाकडे गेलीं होतीं तीं पेशव्यास दाखवून त्यानें त्याचा फार निषेध केला.

नानानें हें जें केलें तें पेशव्यांच्या हिताकरितांच केलें खरें; पण त्याचा परिणाम मात्र वाईट झाला. सवाई माधवरावाचें अंतःकरण दुःखानें व निराशेनें भरून गेलें व त्याच्या बुद्धीस भ्रंश पडत चालला. वर सांगितल्याप्रमाणें गोष्टी घडल्या तेव्हां शके १७१७ चा आश्विन लागला होता. दसऱ्याच्या दिवशीं पेशव्यांची स्वारी शिलंगणास निघाली असतां बेहोष होऊन अंबारी खालीं उडी टाकण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. तेव्हां खवासखान्यांत आप्पा बळवंत होता त्यानें पेशव्यास एका हातानें आवरून दुसऱ्या हातानें कमरेचा शेला सोडून त्यानें पेशव्यास व आपणास गच्च बांधून घेतलें. ही बातमी पसरतांच सर्व समारंभाचा विरस होऊन सालाबादप्रमाणें स्वारी अवशीच्या दोन घटका रात्रीं परत यावयाची ती चार घटका दिवसासच वाड्यांत परत आली.

नानास पेशव्यांच्या या कृतीचें भय वाटलें व त्यानें त्यांच्या भोंवतीं रात्रंदिवस पहारा ठेविला. पण दैवगति विचित्र असल्यामुळें त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. द्वादशीस आश्विनी आदितवार म्हणून पेशवे खालीं स्नानास येऊन बसले. इतक्यांत खिजमतगारानें सांगितलें कीं, वैद्य प्रकृति पहावयास आले आहेत. म्हणून पेशवे उठून वर दिवाणखा-

न्यांत आले. वैद्य प्रकृति पाहून गेला; तों इतक्यांत पेशव्यांची आजी ताई साठीण ही येऊन बसली. तिच्याशीं थोडा वेळ बोलत बसले होते. तों दोन घटका दिवस आला. ताई उठून गेल्यानंतर नेहमीं जवळ वागणाऱ्या मंडळीपैकीं कोणीच नाहीं अशी गोष्ट झाली. माशी जाण्यास अवकाश नाहीं असा बंदोबस्त असतां तो समय येऊन ठेपला. तेव्हां कोणी जवळ नाहीं. प्रातःकाळच्या तीन घटका दिवसास गणपतीच्या दिवाणखान्यांतून उडी टाकली. खालीं कारंजें होतें त्यावर जाऊन उडी पडली. कारंज्याची तोटी मांडींत शिरली. त्यानें मांडी मोडली व तोंड वाकडें झालें. बेशुद्ध झाले. पेशवे पडले त्या ठिकाणाजवळ एक कामाठी झाडलोट करीत होता. त्यानें शंखध्वनि केल्यावरून वाड्यांतील माणसें धांवलीं, त्यांनीं पेशव्यास उचलून दिवाणखान्याच्या खालच्या मजल्यांत आणिलें. ही बातमी शहरांत पसरतांच हाहाःकार झाला. ही प्रातःकाळची वेळ असल्यामुळ मुत्सद्दी मंडळी स्नानास गुंतली होती. त्यांच्यापैकीं ज्यांच्या कानावर ही भयंकर वार्ता पडली ते तसेच आले. नाना तर इतक्या घाईनें यावयास निघाला कीं, तो आपल्या वाड्यांत दरवाज्यांतच पडला. नाना आला तों शुद्धीवर आणण्याचे उपाय चालले होते. मागून शस्त्रवैद्य आला व त्यानें मांडी बांधली व तोंड नीट केलें. पेशव्यांच्या जिवास आराम पडावा ह्मणून नानानें पुष्कळ उपचार केले, पण प्रकृतीस गुण आला नाहीं. पेशवे कांहीं शुद्धीवर व कांहीं बेशुद्धींत असे पौर्णिमेच्या सायंकाळपर्यंत होते. पौर्णिमेस दिवे लागण्यापूर्वीं त्यांचें देहावसान झालें. मरणकाळीं पेशवे चांगले शुद्धीवर होते. हरिपंत फडक्यांचे चिरंजीव बाबा फडके त्यांजवळ होते; त्यांच्याजवळ पेशवे बोलले " माझ्यामागें बाजीरावास गादीवर स्थापावें. "

## १४ पेशवे परतंत्र झाले ! !



सवाई माधवराव वारल्यावर जो हाहाःकार उडाला त्यास सीमा नव्हती. नानास तर अत्यंत दुःख झालें. त्यानें जिवापाड मेहनत करून पेशवाईचें रक्षण केलें, त्याचें शेवटीं चीज झालें नाहीं. अजूनही राघोबाच्या वंशास पेशवाईची गादी मिळूं न देण्याचा नानाचा निश्चय कायम होता. त्यानें दौलतराव शिंदे, रघुजी भोंसले वगैरे सरदारांस परत बोलाविलें व सर्वांच्या संमतीनें 'यशोदाबाई ही माधवरावाची स्त्री जरी लहान आहे तरी तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवावा' असा ठराव केला. पण वरील ठरावास बाह्यात्कारीं जरी सर्वांनीं सम्मति दिली तरी सर्वांस अंतर्यामापासून कांहीं नानाचें करणें आवडलें नाहीं. बाळाजी विश्वनाथाचा औरस वंश हयात असतां दत्तक घेण्याची कल्पना दौलतराव शिंद्याच्या कारभाऱ्यास पटली नाहीं. दौलतराव शिंद्याचा कारभारी बाळोबा तात्या हा बाजीरावास गादीवर बसवावें या मताचा होता. शिंद्याच्या दरबारांतील मंडळी आपणास अनुकूल आहेत असें पाहतांच बाजीरावानें पेशवेपद मिळण्याविषयीं त्या दरबारांत खटपट चालविली. दौलतराव शिंदे त्या वेळीं बलाढ्य सरदार होता. तो बाजीरावास मिळतांच पेशवाई त्याला मिळणार हें निःसंशय होतें. या गोष्टीची खबर नानास लागली. त्यानें लागलीच शिंदे करणार तें आपणच अगोदर केल्यास भांडणाचें मूळच राहणार नाहीं असें पाहून बाजीरावास परशुरामभाऊकडून सोडवून आणून एकदम पेशवाईचीं वस्त्रें देऊन टाकिलीं. पण नानाच्या युक्तीनें भांडण मिटलें नाहीं. शिंद्याचा कारभारी बाळोबा तात्या यास नानानें आपणास चकविलें हें कळतांच त्यानें नाना व बाजीराव या दोघांस पकडण्याचें कारस्थान चालविलें. पण नानास त्याची

न्यांत आले. वैद्य प्रकृति पाहून गेला; तों इतक्यांत पेशव्यांची आजी ताई साठीण ही येऊन बसली. तिच्याशीं थोडा वेळ बोलत बसले होते. तों दोन घटका दिवस आला. ताई उठून गेल्यानंतर नेहमीं जवळ वागणाऱ्या मंडळीपैकीं कोणीच नाहीं अशी गोष्ट झाली. माशी जाण्यास अवकाश नाहीं असा बंदोबस्त असतां तो समय येऊन ठेपला. तेव्हां कोणी जवळ नाहीं. प्रातःकाळच्या तीन घटका दिवसास गणपतीच्या दिवाणखान्यांतून उडी टाकली. खालीं कारंजें होतें त्यावर जाऊन उडी पडली. कारंज्याची तोटी मांडींत शिरली. त्यानें मांडी मोडली व तोंड वाकडें झालें. बेशुद्ध झाले. पेशवे पडले त्या ठिकाणाजवळ एक कामाठी झाडलोट करीत होता. त्यानें शंखध्वनि केल्यावरून वाड्यांतील माणसें धांवलीं, त्यांनीं पेशव्यास उचलून दिवाणखान्याच्या खालच्या मजल्यांत आणिलें. ही बातमी शहरांत पसरतांच हाहाःकार झाला. ही प्रातःकाळची वेळ असल्यामुळ मुत्सद्दी मंडळी स्नानास गुंतली होती. त्यांच्यापैकीं ज्यांच्या कानावर ही भयंकर वार्ता पडली ते तसेच आले. नाना तर इतक्या घाईनें यावयास निघाला कीं, तो आपल्या वाड्यांत दरवाज्यांतच पडला. नाना आला तों शुद्धीवर आणण्याचे उपाय चालले होते. मागून शस्त्रवैद्य आला व त्यानें मांडी बांधली व तोंड नीट केलें. पेशव्यांच्या जिवास आराम पडावा ह्मणून नानानें पुष्कळ उपचार केले, पण प्रकृतीस गुण आला नाहीं. पेशवे कांहीं शुद्धीवर व कांहीं बेशुद्धींत असे पौर्णिमेच्या सायंकाळपर्यंत होते. पौर्णिमेस दिवे लागण्यापूर्वीं त्यांचें देहावसान झालें. मरणकाळीं पेशवे चांगले शुद्धीवर होते. हरिपंत फडक्यांचे चिरंजीव बाबा फडके त्यांजवळ होते; त्यांच्याजवळ पेशवे बोलले “ माझ्यामागें बाजीरावास गादीवर स्थापावें. ”

## ९४ पेशवे परतंत्र झाले ! !



सवाई माधवराव वारल्यावर जो हाहा:कार उडाला त्यास सीमा नव्हती. नानास तर अत्यंत दुःख झालें. त्यानें जिवापाड मेहनत करून पेशवाईचें रक्षण केलें, त्याचें शेवटीं चीज झालें नाहीं. अजूनही राघोबाच्या वंशास पेशवाईची गादी मिळूं न देण्याचा नानाचा निश्चय कायम होता. त्यानें दौलतराव शिंदे, रघुजी भोंसले वगैरे सरदारांस परत बोलाविलें व सर्वांच्या संमतीनें ‘ यशोदाबाई ही माधवरावाची स्त्री जरी लहान आहे तरी तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नांवानें राज्यकारभार चालवावा ’ असा ठराव केला. पण वरील ठरावास बाह्यात्कारीं जरी सर्वांनीं सम्मति दिली तरी सर्वांस अंतर्यामापासून कांहीं नानाचें करणें आवडलें नाहीं. बाळाजी विश्वनाथाचा औरस वंश हयात असतां दत्तक घेण्याची कल्पना दौलतराव शिंद्याच्या कारभाऱ्यास पटली नाहीं. दौलतराव शिंद्याचा कारभारी बाळोबा तात्या हा बाजीरावास गादीवर बसवावें या मताचा होता. शिंद्याच्या दरबारांतील मंडळी आपणास अनुकूल आहेत असें पाहतांच बाजीरावानें पेशवेपद मिळण्याविषयीं त्या दरबारांत खटपट चालविली. दौलतराव शिंदे त्या वेळीं बलाढ्य सरदार होता. तो बाजीरावास मिळतांच पेशवाई त्याला मिळणार हें निःसंशय होतें. या गोष्टीची खबर नानास लागली. त्यानें लागलीच शिंदे करणार तें आपणच अगोदर केल्यास भांडणाचें मूळच राहणार नाहीं असें पाहून बाजीरावास परशुरामभाऊकडून सोडवून आणून एकदम पेशवाईचीं वस्त्रें देऊन टाकिलीं. पण नानाच्या युक्तीनें भांडण मिटलें नाहीं. शिंद्याचा कारभारी बाळोबा तात्या यास नानानें आपणास चकविलें हें कळतांच त्यानें नाना व बाजीराव या दोघांस पकडण्याचें कारस्थान चालविलें. पण नानास त्याची

वेळींच खबर लागून तो महाडास पळून गेला. व तेथून त्यानें बाळोबा तात्याच्याविरुद्ध होळकर, निजाम, फडके वगैरे मंडळींचें कूट जमविलें. सखाराम घाटगे यास एक सुंदर मुलगी होती. ती घाटगे यांजकडून शिंद्यास देण्याचें ठरवून नानानें खुद्द दौलतरावाचेंही मन बाळोबा-विरुद्ध वळविलें. सर्व सिद्धता झाल्यावर बाळोबास शिंद्यानें शके १७१८ ( सन १७९६ ) आश्विन महिन्यांत कैद केलें. त्यानें गादीवर बसविलेला चिमणाजीआप्पा पळून गेला व त्याचा साथीदार परशुरामभाऊ यास कैद केलें. मग मार्गशीर्ष महिन्यांत बाजीराव गादीवर बसला व त्याच्या-पासून अभयाचें वचन घेऊन नाना कारभार पाहूं लागला.

बाजीरावास पेशवाई मिळतांच सर्व अधिकार आपल्या हातांत असावा असें त्यास वाटूं लागलें. शके १७१९ च्या श्रावणांत तुकोजी होळकर वारला तेव्हां बाजीरावास आपल्या अधिकाराच्या आड येणारा एक कांटा नाहींसा झाल्यासारखें वाटलें. आतां शिंदे लवकरच हिंदुस्थानांत जाईल व मग नाना शिरजोर होईल, असा बाजीरावानें अंदाज केला. तेव्हां शिंद्याकडून अगोदरच नानास कैद करून टाकावें म्हणजे मग आपण निर्वेध झालों अशी बाजीरावाची समजूत झाली. व तीप्रमाणें त्यानें शिंद्याशीं मसलत केली. शिंद्यानें शके १७१९ पौष महिन्यांत नाना भेटीस आला असतां विश्वासघातानें पकडून त्यास अहमदनगरच्या कि-ल्ल्यांत कैदेंत ठेविलें. या वेळीं शिंद्याचा सर्व कारभार त्याचा सासरा सर्जे-राव घाटगे हा पहात असे. मग त्या घाटग्यानें पुण्यास नानाच्या लोकांचे भयंकर रीतीनें हाल करून त्यांजपासून पैका उकळिला. आतां शिंदे लवकरच उत्तर हिंदुस्थानांत जाईल अशी बाजीरावाची समजूत होती, पण ती खोटी ठरली. शिंदे पुण्याहून जाईना. बाजीरावानें आपला भाऊ अमृत-राव याच्या सल्ल्यानें शिंद्यास पकडावयाचें ठरविलें. मग एके दिवशीं अगदीं उत्तम संधि आली असतां बाजीराव कचरला. कारण बाजीराव जितका अधिकारलोलुप होता त्याहून जास्त भित्रा होता. शिंदे मात्र सावध झाला.

त्यानें बाजीरावाची खोडकी जिरविण्याकरितां नानास सोडिलें. बाजीराव बोलण्यांत मोठा मिठा होता. एवढा हुशार नाना फडणीस; पण त्यालासुद्धां बाजीरावानें गोड बोलून चकविलें. एके दिवशीं रात्रीं एकांतीं नानाची भेट घेऊन बाजीरावानें सांगितलें " तुम्हांस बंदींत टाकलें तें शिंद्यानें; मी त्यांत मुळींच नव्हतों. उलट मी तुमच्या कारभाऱ्यांस बंदींत टाकण्याचें सोंग करून शिंद्यापासून त्यांचें रक्षण केलें. तुमच्या पायांची शपथ, मी तुम्हास बापाप्रमाणें मानतों.' हें सर्व बोलणें मतलबाचें होतें. पण नानास तें खरें वाटून त्यानें कारभार पहाण्याचें कबूल केलें. पण थोड्याच दिवसांत बाजीराव फिरून दगा करणार अशी खात्रीलायक बातमी नानाच्या कानावर आली. तेव्हां मी वृद्ध झालों. आतां मला विश्वास दाखवून दगा देण्यास तुम्ही कसे प्रवृत्त झालां, असें नानानें बाजीरावास विचारिलें; त्यावर बाजीरावानें मी असें कसें करीन वगैरे थापा देऊन नानाचें समाधान केलें. तरी यापुढें नाना फार दिवस वांचला नाहीं. तो मूळचाच अशक्त, त्यांतून म्हातारपण व अलीकडील चारपांच वर्षांतील दगदग, यामुळें त्याच्या शक्तीचा लवकरच ऱ्हास होऊन तो शके १७२१ ( सन १८०० ) च्या फाल्गुन वद्य द्वितीयेस वारला.

शिंदे दक्षिणेंत राहिला असतां उत्तर हिंदुस्थानांत त्याच्या मुलखांत एक नवीनच भानगड उपस्थित झाल्यामुळें त्यास तिकडे जावें लागलें. तो प्रकार असाः—तुकोजी होळकर वारला तेव्हां त्याला चार मुलगे होते. त्यांपैकीं यशवंतराव होळकर म्हणून एक राखेपासून झालेला होता. तो मोठा शूर व पराक्रमी असे. त्याचा बाप मेल्यावर पुण्यांत झालेल्या धांदलींतून निसटून तो उत्तरेकडे गेला व तेथें जाऊन त्यानें सैन्य जमविलें व तो शिंद्याच्या प्रांतावरही स्वाऱ्या करूं लागला. तेव्हां शिंद्यानें सर्जेराव घाटग्याच्या हाताखालीं पांच पलटणें व दहा हजार स्वार देऊन त्यास पुण्यास ठेविलें व आपण हिंदुस्थानांत गेला. शिंदे पोंचण्याच्या अगोदर होळकरानें शिंद्याच्या उज्जनी येथील सैन्याचा पराभव करून तें

शहर जाळून लुटून फस्त केलें; यावरून शिंद्यास फारच चीड आली. त्यानें सर्जेरावास हिंदुस्थानांत बोलावून नेलें. व त्यास होळकराचा सूड उगविण्यासाठीं इंदूर जाळण्याकरितां पाठविलें. मग होळकर व सर्जेराव घाटगे यांच्या फौजेचें एक मोठें युद्ध झालें त्यांत यशवंतरावाचा पराभव झाला.

यापुढें उत्तरेकडे जाण्याची हूल दाखवून होळकर नर्मदा उतरून पुण्यावर चाल करून येऊं लागला. फत्तेसिंग माने म्हणून होळकराचा सरदार पुढें होता त्याच्यावर पेशव्याकडून गणपतराव पानशे व नाना पुरंदरे हे चालून गेले. मान्यानें त्यांचा तेव्हांच पराभव केला. शहा अहमदखान या नांवाचा होळकराचा सरदार पुण्याच्या आसपास लुटालूट करीत होता. त्याच्यावर नरसिंग खंडेराव विंचूरकर चालून गेला. पण शहा अहमदानें त्याचा पूर्ण पराभव केला. मग होळकर पुण्याजवळ आला. बाजीरावास फार भीति पडली होती. त्यानें होळकराशीं सलोखा करण्याकरितां वकील धाडिले. त्यानें सांगितलें कीं "मी शिंद्याचें पारिपत्य करण्याकारितां पुण्यावर येत आहें. बाकी मी तुमचा चाकरच आहें" शेवटीं आश्विन महिन्यांत होळकराची व शिंद्याच्या फौजेची पुण्याजवळ गांठ पडली. पेशव्याचें सैन्य शिंद्याकडून लढत होतें. या युद्धांत होळकरानें शिंद्याचा पुरता मोड केला. युद्ध चाललें असतां बाजीराव पर्वतीवरून पहात होता. तो निकाल ऐकतांच पळून सिंहगडास गेला. यशवंतराव होळकरानें बाजीरावास परत बोलाविलें व पुणें शहर न लुटण्याविषयीं आपल्या फौजेस ताकीद केली; पण बाजीरावास होळकराचा भरंवसा आला नाहीं. तो सिंहगडाहून निघून महाडास गेला व मागें रघुनाथरावानें सुरतेस जाऊन जसा इंग्रजांचा आश्रय मागितला तसाच बाजीरावानें वसईस जाऊन इंग्रजांचा आश्रय घेतला. तेथें शके १७२४ (सन १८०२) पौष शु॥ ७ स तह ठरला. त्यांत इंग्रजांनीं बाजीरावास नेऊन गादीवर बसविण्याचें कबूल केलें. यापुढें इंग्रजांनीं सहा हजार फौज व तोफखाना पेश-

ठ्याच्या राज्यांत ठेवावी. या फौजेच्या खर्चाकरितां सव्वीस लक्षांचा मुलूख बाजीरावानें तोडून द्यावा. युरोपांतील इंग्रजांचा द्वेष करणाऱ्या कोणत्याही राष्ट्रांतील माणसास पेशव्यानें आश्रय देऊं नये. निजाम व गायकवाड यांच्याशीं इंग्रजांनीं असाच तह केला असल्यामुळें त्यांच्याशीं जें कांहीं बोलणें बोलावयाचें तें इंग्रजांच्या मध्यस्तीनें बोलावें. या दोघांशिवाय इतर कोणत्याही राज्यकर्त्यांशीं तह करावयाचा किंवा लढाई करावयाची ती इंग्रजांस विचारल्याशिवाय करणार नाहीं, असेंही पेशव्यांनीं आपल्यास बांधून घेतलें. मग शके १७२५ च्या वैशाखांत दोन हजार कवायती फौज बरोबर देऊन इंग्रजांनीं पेशव्यास पुण्याच्या गादीवर नेऊन बसविलें. इंग्रजांचें बस्तान ठीक बसलें, पण एव्हांपासून पेशवाई बुडाली असें म्हणण्यास हरकत नाहीं !

---

## ९५ स्वातंत्र्याकरितां धडपड.

वसइचा तह करून बाजीराव परतंत्र बनला, ही गोष्ट शिंदे, भोंसले, होळकर इत्यादि मराठे सरदारांस मुळींच पसंत पडली नाहीं. वसईच्या तहानंतर कलकत्त्याच्या गव्हनर जनरलनें पेशवे आमचे मित्र बनले आहेत, तसेंच तुम्हींही बनावें, अशी माझी फार इच्छा आहे, असा भोंसले व शिंदे यांस निरोप पाठविला, पण हें सख्य कसल्या प्रकारचें असतें, हें शिंदे व भोंसले या दोघांसही पक्कें माहीत होतें. सबब त्यांनीं उत्तर केलें ' आम्हांस तूर्त हें ऐक्य करण्यास सवड नाहीं, तरी पण आमचा व तुम्हां इंग्रजांचा द्वेष नाहीं. ' असें उत्तर देऊन रघूजी भोंसले व दौलतराव शिंदे हे दोघेही आपल्या फौजा घेऊन निजामच्या हद्दीच्या जवळ राहिले. असें त्यांचें

वर्तन पाहून इंग्रजांचा दक्षिणेकडील सेनापति वेल्स्ली यानें त्या दोघांसही निरोप पाठविला कीं, " तुम्हांस जर शांततेनें रहावयाचें असेल तर आपल्या फौजा परत आपल्या मुलखांत न्या. नाहींतर युद्ध करण्यास तयार व्हा. " मग इंग्रज वकिलाचें व शिंद्या—भोंसल्याचें भांडण झालें. इंग्रज वकील परत आला व लढाईस सुरुवात झाली. इंग्रजांचा दक्षिणेंतील सेनापति वेल्स्ली हा शिंदे व भोंसले यांवर चालून गेला. अहमदनगर किल्ला इंग्रजी फौजेनें काबीज केला. वेल्स्लीची व शिंदे—भोंसल्यांची गांठ असई गांवाजवळ पडली. युद्ध होऊन त्यांत इंग्रजांचा जय झाला. मग इंग्रजांनीं शिंद्याचे अशीरगड व बऱ्हाणपूर हे किल्ले काबीज केले. भडोच व पावनगड हे गुजराथेंतील किल्ले त्यांनीं घेतले. उत्तरेकडे लेक या नांवाचा इंग्रजांच्या सैन्याचा मुख्य अंमलदार होता. त्यानें अल्लीगड, दिल्ली, आग्रा हे शिंद्याचे किल्ले सर केले. व शिंद्याच्या उत्तरेकडील फौजेशीं लासवारी येथें लढाई देऊन तिचा पूर्ण पराजय केला. इकडे वेल्स्ली हा शिंदे व भोंसले यांचा पाठलाग एकसारखा करीत होता. शेवटीं शिंद्यास जय मिळण्याची निराशा वाटून त्यानें वेल्स्लीशीं तहाचें बोलणें केलें. परंतु भोंसले अजून लढतच होता. त्याची व वेल्स्लीची आरगांव येथें गांठ पडून भोंसल्याचा पराभव झाला. तेव्हां भोंसल्यानेंही तहाचें बोलणें सुरू केलें. शके १७२५ ( इ. स. १८०३ ). मार्गशीर्ष महिन्यांत शिंदे व भोंसले यांनीं निरुपाय म्हणून इंग्रजांशीं तह केले. वर्धा नदीच्या पश्चिमेचा मुलूख व कटक आणि बालासोर हे प्रांत भोंसल्यानें इंग्रजांस देण्याचें कबूल केलें; निजामाच्या मुलखांतून घांसदाणा यापुढें भोंसल्यानें घेऊं नये. शिवाय पेशवे व निजाम, ह्यांच्याशीं बोलणेंचालणें इंग्रजांमार्फत करण्याची अट भोसल्यानें मान्य केली. इंग्रजांचा एलफिन्स्टन हा वकील त्याच्या दरबारीं जाऊन राहिला, शिंद्याशीं तह ठरला, त्यांत गंगा व यमुना यांमधील मुलूख, गोहदच्या राण्याचा उत्तरेचा मुलूख आणि अहमदनगर व भडोच हे किल्ले इंग्रजांनीं

घेतले. जे रजपूत राजे इंग्रजांचे मित्र असतील त्यांस माझा उपसर्ग लागणार नाहीं, असें शिंद्यानें कबूल केलें. मेजर मालकम नांवाचा वकील शिंद्याच्या दरबारीं राहिला.

यशवंतराव होळकर हा शिंदे व भोंसले यांशीं एक होऊन लढाईंत सामील झाला नाहीं. त्यामुळें मराठ्यांची बाजू तितकी लंगडी पडली. पण यापेक्षां विशेष तोटा असा झाला कीं, आतां एकट्या होळकरास सर्व इंग्रज सत्तेबरोबर लढणें भाग पडलं. इंग्रजांचें व शिंदे–भोंसल्याचें युद्ध चाललें असतां होळकरानें माळव्यांत भली मोठी खंडणी जमा केली; व आतां तो रजपूत, शीख वगैरे लोकांची मैत्री करण्याचा प्रयत्न करूं लागला. गव्हर्नर जनरलानें होळकरास आपलें लष्कर आपल्या मुलखांत नेण्यास सांगितलें; व मित्रत्वाचें बोलणें करण्याकरितां वकील पाठवावा, अशी सूचना केली. होळकरानें वकील पाठविला, व कांहीं मागण्या केल्या, त्या इंग्रजांस असह्य वाटून त्यांनीं लढाईस सुरुवात केली.

जनरल लेक होळकराचा पाठलाग करूं लागला. इतक्यांत शके १७२६ चा पावसाळा लागल्यामुळें होळकरावर दाब राखण्याकरितां कर्नल मॉन्सनच्या हाताखालीं पांच हजार पायदळ व तीन हजार मराठे स्वार इतकी फौज ठेवून जनरल लेक परत गेला. गुजराथेंतून कांहीं फौज मॉन्सनच्या मदतीस येणार होती, पण शके १७२६ च्या ज्येष्ठ महिन्याच्या शेवटीं त्यास अशी बातमी समजली कीं, मरेच्या हाताखालील फौज येत नाहीं; व होळकर आपले स्वार व पायदळ घेऊन आपल्यावर चालून येत आहे. त्या वेळीं मॉन्सन यास काय करावें, हें सुचेना. शेवटीं त्यानें परत जाण्याचा निश्चय केला, पण त्याला चंबळेला उतार सांपडेना. तेव्हां त्याला चंबळेच्या कांठाकांठानें तसेंच वर जाणें भाग पडलें. मग मात्र होळकरानें वारंवार त्याच्या सैन्यावर अचानक हल्ले केले. त्याच्या बऱ्याच तोफा हस्तगत केल्या, व बरेच लोक मारले. शेवटीं शेवटीं तर इंग्रज फौज अगदीं गोंधळून गेला; व जिकडे वाट फटेल

तिकडे ती पळून गेली. मग पळालेले इंग्रज आग्र्यास रहाण्यास गेले. इतक्यांत होळकर मोठी फौज घेऊन मथुरेपर्यंत गेला. पण लागलींच लेक मागून चालून आला, अशी बातमी लागली त्यावरून यशवंतराव होळकर भरतपूरच्या आश्रयास राहिला. तेथून इंग्रजांनीं त्यास हुसकून दिलें. मग शिंदे–होळकरांचें सख्य झालें व ते दोघे मिळून कोट्यास आले. पण तेथें आपण दोघे एक झालों तरी इंग्रज मोडणार नाहीं असें शिंद्यास वाटलें; आणि होळकर व शिंदे या दोघांत चुरस उत्पन्न झाली. शिंदे लष्कर सोडून तह करण्याकरितां गेला; व होळकरानें बारा हजार स्वार बरोबर घेऊन पंजाबकडे कूच केलें. पण तिकडे त्यास शिखांची मदत मिळाली नाहीं. त्यामुळें त्यानें इंग्रजांशीं तहाचें बोलणें लाविलें. तह ठरला त्यांत असें ठरलें कीं, बुंदीच्या डोंगराच्या उत्तरेस होळकराची सत्ता नसावी; इंग्रज व त्यांचे साहाय्यकारी यांच्याजवळ होळकरानें बाकी मागूं नये व आपले चाकरीस गोरे नोकर ठेवूं नये; लेकनें सांगितलेल्याच वाटेनें त्यानें माळव्यांत परत जावें. याच वेळीं शिंद्याशीं नवा तह होऊन मागील तहापेक्षां आणखी मुलूख इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतला.

याप्रमाणें मराठेमंडळाचे सर्व मुख्य सरदार इंग्रजांचे मांडलिक बनले ! पेशवे, गायकवाड, भोंसले, शिंदे व होळकर, या सर्वांच्या एकीवर तर मराठी सत्तेचें अस्तित्व अवलंबून होतें. इंग्रजांनीं मोठ्या युक्तीनें हे मणि निरनिराळे करून त्या सर्वांस आपल्या अंमलाखालीं आणिलें. यांपैकीं भोंसले, शिंदे, होळकर यांनीं इंग्रजांचा हा बेत कांहींसा ओळखून त्यांच्या ताब्यांत न जाण्यासाठीं बरीच खटपट केली. पण ती देखील व्यवस्थितपणें केली असें म्हणतां येत नाहीं.

## ९६ मराठी राज्याचा शेवट.



बाजीरावास इंग्रजांनीं पुण्यास आणून गादीवर बसविलें तेव्हांपासून पेशव्यास स्वातंत्र्य असें मुळींच उरलें नाहीं. भोंसले, शिंदे, होळकर वगैरे मराठे सरदारांशीं कसल्या कां विषयांचें बोलणें करावयाचें असेना, तें इंग्रजांच्या परवानगीशिवाय करतां येईनासें झालें. जर एखादा पेशव्यांचा वकील भोंसले, शिंदे वगैरेच्या दरबारीं गेला तर हे तिघे मिळून आमची सत्ता हाणून पाडण्याच्या मसलती करीत आहेत, असा इंग्रजांस संशय यावा व त्यांनीं लागलींच बाजीरावास जरब देऊन विचारावें, असें होऊं लागलें. सारा हुकूम इंग्रजांचा चालू झाला. पेशव्यांस कोठें स्वारीस जाणें झाल्यास इंग्रजांचा हुकूम होईल तेव्हां कोठें बाहेर कोपरगांव, नाशीक, गुहागर व पंढरपूर येथें जावें.

असें इंग्रजांचें सामर्थ्य वाढीस लागलें. यावेळीं पेशवाईच्या गादीवर बसलेला बाजीरावही, त्यांचें सामर्थ्य आणखी वाढविण्यास व मराठ्यांचें कमी करण्यास कारण झाला. इंग्रज पेशव्यास दटावीत तसेंच पेशवा आपल्या सर्व जहागीरदारांस दटावूं लागला. पण या धोरणामुळें सरदारांचीं मनें बाजीरावाविषयीं चिडून गेलीं व बाजीरावास मराठे सरदार, जहागीरदार वगैरे लोकांचा आधार नाहींसा झाल्यामुळें सर्वस्वी इंग्रजांवर अवलंबून रहावें लागलें. याचवेळीं परशुराम श्रीनिवास प्रतिनिधि व त्याची आई या दोघांमध्यें भांडण लागलें. पेशव्यानें बापू गोखले या सरदारास प्रतिनिधीवर पाठविलें. गोखल्यानें प्रतिनिधीस कैद करून वसंतगडावर ठेविलें. पण येवढ्यानें बंड मोडलें नाहीं. ताई तेलीण नांवाची एक प्रतिनिधीची राख होती. तिनें वसंतगडावरून

प्रतिनिधीस सोडविलें. मग फिरून प्रतिनिधीचा अम्मल त्याच्या मुलखांत सुरू झाला. पेशव्यानें फिरून गोखल्यास पाठविलें. प्रतिनिधी लवकरच हातीं आला. पण त्या तेलणीनें वासोटा किल्ला आठ महिने भांडविला. बाजीरावानें प्रतिनिधीची सर्व जहागीर बापू गोखल्यास देऊन टाकिली. हें शके १७३० त झालें. पेशव्यानें आपली सत्ता दृढ झाली असें पाहून जहागिरी जप्त करण्याचा सपाटा चालविला. त्यानें प्रतिनिधीकडील मुलूख गोखल्याकडून सरकारांत मागितला. लहान लहान जहागीरदार आपल्या मनाप्रमाणें वागले नाहींत या सबबीवर त्यांचीं संस्थानें जप्त केलीं. रास्ते इंग्रजांच्या प्रीतींतले होते. एकदां इंग्रजांचा कांहीं अपराध रास्त्यांच्या हातून झाला. तेव्हां त्यांचें पारिपत्य करण्याचें काम आपल्या हातांत घेऊन बाजीरावानें त्यांचा मुलूख जप्त केला. पटवर्धनांची जहागीर जप्त करण्याचेही त्याचे खूप प्रयत्न चालले होते. अशा रीतीनें आपल्या राज्यांताल सर्व मराठे जहागीरदारांचीं मनें बाजीरावानें दुखविलीं. त्यामुळें मराठे लोकांत एकी होणें अशक्य झालें.

बाजीरावानें राज्याचा कारभार पाहण्यासाठीं सदाशिव माणकेश्वर याची नेमणूक केली होती. हा माणकेश्वर टेंभुर्णी गांवचा देशपांड्या. त्यानें आपल्या आयुष्याचे बरेच दिवस पुण्यास कीर्तन करून घालविले होते; व तो चांगला कवि व वाद्यें वाजविण्यांत कुशल आहे अशी त्याची चहूंकडे प्रसिद्धि झाली होती. याप्रमाणें उत्तम कथा कशी करतां येईल हें ध्येय पुढें ठेवून त्याच्यासाठीं तयारी करण्यांत ज्यानें आपल्या आयुष्याचे उत्कृष्ट दिवस घालविले त्या माणसावर राज्यकार-भाराचा बोजा येऊन पडला. मग राज्यांत व्यवस्था काय विचाराव-याची आहे! मुलखांतील किल्लेकोट यांचे खर्च तोडिले. जमिनी मक्त्यानें देण्याचें काम झपाट्यानें सुरू होऊन शेतकरी लोकांस मक्ते-दार अगदीं पिळून काढूं लागले. रयतेची दाद कोणीच घेईना. अशी राज्याची व्यवस्था झाली. यावेळीं राज्यांत दुसरा वजनदार पुरुष

त्रिंबकजी डेंगळे हा होय. यास इंग्रजांशीं मध्यस्थी करण्याच्या कामावर बाजीरावानें नेमिलें होतें. पुढें पुढें तर तो मोठ्या योग्यतेस चढला. त्याच्याशिवाय राज्यकारभाराचें कोणतेंही महत्वाचें काम होईनासें झालें. या त्रिंबकजीचें क्रूरत्व कांहीं विलक्षण होतें. एकदां एक सराफ एका मक्तेदारास जामीन राहिला होता. त्या मक्तेदारानें सरकारकाम बरोबर बजाविलें नाहीं. त्यामुळें त्रिंबकजीनें जामीन राहिलेल्या सराफास बोलावून आणलें. तो येतांच त्याच्या डोक्यावर त्रिंबकजीनें जोरानें एक ठोसा लगाविला. तेव्हां त्याच्या हातांतील जोडवीं व आंगठ्या यांचा तडाका मर्मीं लागून तो ब्राह्मण तेथल्या तेथें मरण पावला !

राज्यांत अशी अंदाधुंदी असतां आपल्या बापानें नारायणरावास मारिलें, या पापाची निष्कृति करण्याच्या खटपटींत बाजीराव गुंतलेला असे. त्यानें पुण्याभोंवतीं एक लक्ष आंब्यांचीं झाडें लाविलीं. व पंढरपूरच्या देवासही पुष्कळ द्रव्य दिलें. त्याच्या गुरूनें त्याला सांगितलें कीं, "नारायणरावानें माझ्या स्वप्नांत येऊन म्हटलें कीं, बाजीरावानें लक्ष ब्राह्मणभोजन घालावें म्हणजे माझ्या खुनाचें पाप नाहींसें होईल." तें ऐकतांच बाजीरावानें लक्ष ब्राह्मणभोजन घातलें. शिवाय बाजीराव व्यसनी असल्यामुळें त्यांतही त्याचा बराच वेळ जात असे.

शके १७३२ त रेसिडेंटच्या जागीं एलफिन्स्टन याची नेमणूक झाली. हा हुशार असून इंग्रजांच्या हिताविषयीं अत्यंत दक्ष असे. त्यानें बाजीरावाच्या गबाळपणाचा व अन्यायाचा फायदा घेऊन इंग्रजांचें वर्चस्व पुष्कळच वाढविलें. हें त्रिंबकजी डेंगळे व बाजीराव यांस खपलें नाहा व इंग्रज आणि पेशवे यांमध्यें नेहमीं भांडणें होऊं लागलीं. गायकवाडाकडे पेशव्याची बरीच बाकी होती. तिचा हिशेब करण्याचें काम इंग्रजांतर्फे व्हावयाचें होतें. तें त्यांनीं लांबणीवर टाकिलें. शेवटीं बाजीरावानें फारच तगादा केल्यावरून इंग्रजांनीं बडोदेकराचा दिवाण गंगाधरशास्त्री पटवर्धन यास हिशेब करण्यासाठीं पुण्यास पाठविलें. तो एकदां

सहज पेशव्याबरोबर पंढरपुरास गेला असतां तेथें त्याचा खून झाला. इंग्रजांनीं चौकशी केल्यावरून तो खून त्रिंबकजी डेंगळ्याच्या सांगण्यावरून झाला असें इंग्रजांस कळलें. तेव्हां त्यांनीं त्रिंबकजीस आपल्या हवालीं करण्याबद्दल निकड लाविली. बाजीरावानें निरुपाय म्हणून त्रिंबकजीस इंग्रजांच्या स्वाधीन केलें. त्याला इंग्रजांनीं ठाण्यास कैदेंत ठेविलें. तेथून तो आठ महिन्यांनीं पळून गेला. फिरून बाजीराव व त्रिंबकजी या दोघांचा संबंध आहे, असा इंग्रजांस संशय आला व त्यांनीं त्रिंबकजीस एक महिन्याच्या आंत पकडून द्यावें, म्हणून बाजीरावास ताकीद दिली. लागलीच बाजीरावानें त्रिंबकजीस धरण्याबद्दल जाहीरनामे काढिले. तरी इंग्रजांचें समाधान न होऊन त्यांनीं पेशव्याशीं नवीन तह केला. त्यांत गायकवाडाकडून पेशव्यानें यापुढें बाकी मागूं नये; व राहिलेल्या बाकीबद्दल वर्षास साडेचार लक्ष रुपये गायकवाडाकडून घेऊन पेशव्यानें स्वस्थ बसावें. इंग्रजांस पलटणीच्या खर्चाकरितां मागें सव्वीस लाखांचा मुलूख दिला होता तो आतां चौतीस लक्षांचा द्यावा. हा तह पेशव्यास निरुपाय म्हणून कबूल करावा लागला. पण यापुढें इंग्रजांविषयीं त्याच्या मनांत पक्का द्वेष उत्पन्न झाला. संधि सांपडतांच हे इंग्रज आपलें सर्व राज्यच गट्ट करतील, असें त्यास वाटलें व एकदां सोक्षमोक्ष करून पहाण्याचा त्यानें निश्चय केला.

शके १७३९ च्या पावसाळ्यांत तो पंढरपुराहून माहुलीस गेला. तेथें तो इंग्रजांशीं युद्ध करण्याची तयारी करूं लागला. त्याचा मुख्य सेनापति बापू गोखले होता. त्यास लढाईची तयारी करण्यास त्यानें सांगितलें. त्यानें शिंदे व भोंसले यांजकडे वकील पाठविले. त्या वर्षीचा दसऱ्याचा समारंभ मोठ्या थाटाचा झाला. त्या दिवसापासून पेशव्याची पुष्कळ फौज जमा होऊं लागली. पण येवढ्याशा अल्प तयारीनें हुशार इंग्रजांशीं युद्ध करून त्यांत जय मिळणें अशक्य होतें. मराठे व इंग्रजांच्या खडकी, कोरेगांव व अष्टें या तीन ठिकाणीं लढाया झाल्या. या

तिन्हींतही मराठ्यांचा पराभव होऊन तिसरींत तर मुख्य सेनापति बापू गोखले पडला. नागपुरकर भोंसल्यानें थोडी हालचाल केली; पण त्याचाही पराभव झाला. होळकराच्या फौजेनेंही इंग्रजांशीं महिदपूर येथें गांठ घातली. पण तिचाही पराभव झाला. अष्टे येथें पराभव झाल्याबरोबर बाजीराव पळूं लागला. शेवटीं तो नर्मदा उतरून इंदुराजवळ मालकम नांवाच्या इंग्रज सरदारास शरण गेला. तेव्हां इंग्रजांनीं त्याला आठ लक्षांची वार्षिक नेमणूक ठरवून देऊन ब्रह्मावर्तास ठेविलें. अशा शोकप्रद रीतीनें पेशवाईचा अंत झाला ! ! शके १७४० (सन १८१८).

## ९७ सातारचे नामधारी छत्रपती.



शके १७४०त बाजीरावास ब्रह्मावर्तास ठेवून पेशव्याचा सर्व मुलूख इंग्रजांनीं आपल्या ताब्यांत घेतला. पण यावेळीं मराठे लोक अगदींच असंतुष्ट होंऊं नयेत म्हणून सातारच्या राजाकडे चौदा लक्षांचा मुलूख ठेवून त्यांनीं सातारचें संस्थान कायम ठेविलें. शाहूराजा वारला तेव्हां त्याच्या चिठ्ठीवरून बाळाजी बाजीरावानें त्याच्या मागून सातारच्या गादीवर बसलेल्या रामराजाकडून सांगोलें येथें असा ठराव करून घेतला कीं, " पेशव्यांनींच सर्व राज्यकारभार करावा आपण मुळींच राजकारणांत पडणार नाहीं. साडेपांसष्ट लक्षांचा मुलूख पेशव्यांनीं खाजगी खर्चाकरितां तोडून द्यावा म्हणजे झालें " त्या वेळेपासून सातारचे राजे केवळ नांवाचे राजे असा प्रकार झाला. नवीन पेशवे होण्याच्या वेळीं पेशवाईचीं वस्त्रें सातारच्या राजाकडून घेण्याचा परिपाठ शेवटपर्यंत चालला होता. पण सातारच्या राजाकडे खरी सत्ता अशी कोणत्याच गोष्टींत उरली नव्हती. राज्यकारभाराचें सर्व काम पुण्यास पेशवे आपल्या मुखत्यारीनें करीत. त्यांत सातारच्या राजाचा काडी-

इतकाही संबंध नव्हता. त्यामुळें समराजापासून जे साताराचे राजे झाले ते केवळ नामधारी होत.

रामराजा शके १६७१ पासून १६९९ पर्यंत साताराच्या गादीवर होता. त्याच्या अंगीं मुळींच कर्तृत्व नव्हतें. त्याच्यामागून शके १७०० मध्यें बावीकर भोंसल्याच्या वंशांतील एका मुलास शाहू असें नांव देऊन नानाफडणिसानें गादीवर बसविलें. या शाहूचा भाऊ चतुरसिंग म्हणून शूर होता. पेशव्यांची सत्ता नाहींशी करून साताराच्या राजास स्वतंत्र करण्यासाठीं त्यानें अतोनात खटपट केली. पण शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धनानें त्याचा पराभव केला, तेव्हां तो उत्तर हिंदुस्थानांत पळून गेला. या शाहूस आबासाहेब म्हणत. हा शके १७३० त वारला. त्याला तीन मुलगे होते. प्रतापसिंह, शहाजी, रामराजा. वडील प्रतापसिंह बापामागून गादीवर बसला. याची कारकीर्द चालू असतांच शके १७४० त पेशवाईचा अंत झाला. इंग्रजांनीं चौदा लक्षांचा मुलूख देऊन प्रतापसिंहासच गादीवर ठेविलें. हा प्रतापसिंह मोठा धोरणी व चतुर होता; व त्यानें साताराच्या संस्थानचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालविला होता. परंतु इंग्रजांस त्याच्याबद्दल संशय येऊन त्यांनीं शके १७६१ त त्यास गादीवरून काढून काशीस नेऊन ठेविलें. त्याच्या मागून त्याचा भाऊ शहाजी हा साताराच्या गादीवर आला. तो नऊ वर्षें राज्य करून शके १७७० त वारला. त्याला औरस पुत्र नव्हता. मरणापूर्वीं त्यानें दत्तक घेतला होता. परंतु यावेळीं डलहौसी नांवाचा इंग्रज कलकत्त्यास गव्हर्नर जनरल होता. संस्थानिकास औरस पुत्र नसला कीं तें संस्थान खालसा करावयाचें, म्हणजे इंग्रजी मुलखास जोडावयाचें, अशी युक्ति तो अमलांत आणीत असे. त्यानें नागपूर, झांशी, तासगांव, अयोध्या हीं खालसा केलीं होतीं त्याचप्रमाणें येथें शहाजीस औरस संतति नव्हती, या सबबीवर साताराचें राज्य खालसा केलें. असा मराठी राज्याचा शेवट झाला !! शके १७७० (सन १८४८).

# १८ मराठी राज्याची अंतर्व्यवस्था.



पहिल्यानें शिवाजीच्या अन्तर्व्यवस्थेसंबंधीं सांगून मग पेशवाईंतील व्यवस्थेचा विचार करूं. आपल्या राज्यांतील वसूल करण्याची शिवाजीनें उत्तम व्यवस्था लाविली होती. पूर्वी मुसलमानांच्या राज्यांत जमिनीवरचा वसूल करण्याचें काम देशमुख, देशपांडे या वतनदार लोकांकडे सोंपविलेलें असे. शिवाय वसुलाबद्दल धान्यच घेण्याची त्या वेळीं वहिवाट होती. किती वसूल घ्यावयाचा याविषयीं देशमुख, देशपांडे यांशीं ठराव झाला असल्यामुळें सरकारचा प्रजेशीं मुळींच संबंध येत नसे. त्यामुळें देशमुख, देशपांड्यांचें आपआपल्या प्रांतांत फारच वजन असे व प्रसंग पडल्यास सरकारावर उलटण्यासही ते कमी करीत नसत. शिवाजीनें ही स्थिति ओळखिली व देशमुख, देशपांड्यांचें प्रस्थ अजीबात मोडून टाकण्याकरितां त्यानें कमाविसदार, महालकरी, सुभेदार वगैरे पगारी अम्मलदार नेमिले. जुने गांवोगांवचे तट पाडून टाकिले व नवे कोणास करूं दिले नाहींत. धान्यांत वसूल घेण्याची चाल त्यानें बंद केली. जमिनीची मोजणी करून सरकारसाऱ्याबद्दल शेतकऱ्यापासून कबुलायत लिहून घ्यावयाची व मग जमीन त्याच्या हवालीं करावयाची असा प्रघात शिवाजीनें पाडिला. सरकारी सारा जमिनीच्या उत्पन्नाच्या दोनपंचमांशापेक्षां केव्हांही जास्त असूं नये असा ठराव केला. पाऊस नीट न पडल्यास लोकांस सरकारांतून मदत मिळे व साऱ्याचा वसूलहा हप्त्याहप्त्यानें घेत. रयतेवर जमिनीच्या साऱ्याशिवाय दुसरा कोणताही कर नव्हता.

वसुलाचें काम करण्याकरितां प्रत्येक खेड्यांत पाटील, कुळकर्णी नेमिले होते. बरींच खेडीं मिळून तालुका होइ; त्यावर तालकदार म्हणून ब्राह्मण

इतकाही संबंध नव्हता. त्यामुळें रामराजापासून जे सातारचे राजे झाले ते केवळ नामधारी होत.

रामराजा शके १६७१ पासून १६९९ पर्यंत सातारच्या गादीवर होता. त्याच्या अंगीं मुळींच कर्तृत्व नव्हतें. त्याच्यामागून शके १७०० मध्यें बावीकर भोंसल्याच्या वंशांतील एका मुलास शाहू असें नांव देऊन नानाफडणिसानें गादीवर बसविलें. या शाहूचा भाऊ चतुरसिंग म्हणून शूर होता. पेशव्यांची सत्ता नाहींशी करून सातारच्या राजास स्वतंत्र करण्यासाठीं त्यानें अतोनात खटपट केली. पण शेवटीं परशुरामभाऊ पटवर्धनानें त्याचा पराभव केला, तेव्हां तो उत्तर हिंदुस्थानांत पळून गेला. या शाहूस आबासाहेब म्हणत. हा शके १७३० त वारला. त्याला तीन मुलगे होते. प्रतापसिंह, शहाजी, रामराजा. वडील प्रतापसिंह बापामागून गादीवर बसला. याची कारकीर्द चालू असतांच शके १७४० त पेशवाईचा अंत झाला. इंग्रजांनीं चौदा लक्षांचा मुलूख देऊन प्रतापसिंहासच गादीवर ठेविलें. हा प्रतापसिंह मोठा धोरणी व चतुर होता; व त्यानें सातारच्या संस्थानचा राज्यकारभार योग्य रीतीनें चालविला होता. परंतु इंग्रजांस त्याच्याबद्दल संशय येऊन त्यांनीं शके १७६१ त त्यास गादीवरून काढून काशीस नेऊन ठेविलें. त्याच्या मागून त्याचा भाऊ शहाजी हा सातारच्या गादीवर आला. तो नऊ वर्षें राज्य करून शके १७७० त वारला. त्याला औरस पुत्र नव्हता. मरणापूर्वीं त्यानें दत्तक घेतला होता. परंतु यावेळीं डलहौसी नांवाचा इंग्रज कलकत्त्यास गव्हर्नर जनरल होता. संस्थानिकास औरस पुत्र नसला कीं तें संस्थान खालसा करावयाचें, म्हणजे इंग्रजी मुलखास जोडावयाचें, अशी युक्ति तो अमलांत आणीत असे. त्यानें नागपूर, झांशी, तासगांव, अयोध्या हीं खालसा केलीं होतीं त्याचप्रमाणें येथें शहाजीस औरस संतति नव्हती, या सबबीवर सातारचें राज्य खालसा केलें. असा मराठी राज्याचा शेवट झाला !! शके १७७० (सन१८४८).

## ९८ मराठी राज्याची अंतर्व्यवस्था.

पहिल्यानें शिवाजीच्या अन्तर्व्यवस्थेसंबंधीं सांगून मग पेशवाईतील व्यवस्थेचा विचार करूं. आपल्या राज्यांतील वसूल करण्याची शिवाजीनें उत्तम व्यवस्था लाविली होती. पूर्वी मुसलमानांच्या राज्यांत जमिनीवरचा वसूल करण्याचें काम देशमुख, देशपांडे या वतनदार लोकांकडे सोंपविलेलें असे. शिवाय वसुलाबद्दल धान्यच घेण्याची त्या वेळीं वहिवाट होती. किती वसूल घ्यावयाचा याविषयीं देशमुख, देशपांडे यांशीं ठराव झाला असल्यामुळें सरकारचा प्रजेशीं मुळींच संबंध येत नसे. त्यामुळें देशमुख, देशपांड्यांचें आपआपल्या प्रांतांत फारच वजन असे व प्रसंग पडल्यास सरकारावर उलटण्यासही ते कमी करीत नसत. शिवाजीनें ही स्थिति ओळखिली व देशमुख, देशपांड्यांचें प्रस्थ अजीबात मोडून टाकण्याकरितां त्यानें कमाविसदार, महालकरी, सुभेदार वगैरे पगारी अम्मलदार नेमिले. जुने गांवोगांवचे तट पाडून टाकिले व नवे कोणास करूं दिले नाहींत. धान्यांत वसूल घेण्याची चाल त्यानें बंद केली. जमिनीची मोजणी करून सरकारसाऱ्याबद्दल शेतकऱ्यापासून कबुलायत लिहून घ्यावयाची व मग जमीन त्याच्या हवालीं करावयाची असा प्रघात शिवाजीनें पाडिला. सरकारी सारा जमिनीच्या उत्पन्नाच्या दोनपंचमांशापेक्षां केव्हांही जास्त असूं नये असा ठराव केला. पाऊस नीट न पडल्यास लोकांस सरकारांतून मदत मिळे व साऱ्याचा वसूलहा हप्त्याहप्त्यानें घेत. रयतेवर जमिनीच्या साऱ्याशिवाय दुसरा कोणताही कर नव्हता.

वसुलाचें काम करण्याकरितां प्रत्येक खेड्यांत पाटील, कुळकर्णी नेमिले होते. बरींच खेडीं मिळून तालुका होइ; त्यावर तालकदार म्हणून ब्राह्मण

किंवा प्रभु अम्मलदार असे. त्याच्या जोडीस हवालदार म्हणून एक मराठा अम्मलदार असे. यांच्यावरचा अधिकारी म्हटला म्हणजे सुभेदार हा होय. हे सर्व अधिकारी पगारदार असून त्यांस महिनाअखेर किंवा सालअखेर उक्त पगार मिळे. सुभेदाराचा वार्षिक पगार चारशें होन म्हणजे दरमहा शंभर रुपये असे. शिवाजीच्या राज्याचे एकंदर बारा सुभे होते; व प्रत्येक सुभ्याचें उत्पन्न सुमारें चार लाख येई. म्हणजे एकंदर राज्याचें उत्पन्न सुमारें अर्ध कोटी होतें. शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकीं पंतसचिव व पंत अमात्य या दोघांची राज्यांतील सर्व वसूल-व्यवस्थेवर देखरेख असे.

आपल्या राज्यांतील न्यायव्यवस्थाही शिवाजीनें केली होती. त्यानें आपल्या अष्ट प्रधानांत न्यायाधीशाचें काम करणारा एक प्रधान नेमिला होता. गांवांतील तंट्यांचा निकाल पूर्वापार चालीप्रमाणें पंच नेमून करीत. फौजदारी खटल्याची चौकशी करण्याचा अधिकार जमीनमहसुलाकरितां नेमिलेल्या अम्मलदारांसच दिलेला होता. त्यांपुढें फौजदारी खटले चालून हिंदुधर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अपराध्यांस शिक्षा होई.

विद्वानांस दक्षिणा देऊन त्यांची योग्य संभावना करण्याचा शिवाजीनें प्रघात पाडिला. त्यामुळें लोकांत विद्वान् होण्याची ईर्षा उत्पन्न झाली, व महाराष्ट्रांतच केवळ नव्हे तर हिंदुस्थानांत चोहोंकडे विद्येचा उत्कर्ष होऊं लागला. मुसलमानांच्या राज्यांत हिंदुलोकांच्या प्राचीन वेद व शास्त्रें या विद्या मृत्युपंथास लागल्या होत्या. त्यांस शिवाजीच्या आश्रयामुळें पुनर्जन्म झाल्यासारखें होऊन फिरून सर्व हिंदुस्थानभर त्यांचा जयघोष होऊं लागला. विद्वानांप्रमाणें गवय्ये, बजवय्ये, कवि इत्यादि गुणी लोकांचाही शिवाजी परामर्ष घेत असे. त्याच्या दरबारीं भूषणकवि म्हणून एक नामांकित कवि होता. त्यानें शिवराजभूषणकाव्य म्हणून एक हिंदी भाषेंत काव्य लिहिलें आहे. शिवाजीनें आपल्या राज्यांतील देवालयांसही चांगलाच आश्रय दिला. जमिनी शिवाजीनें

कोणासही तोडून दिल्या नाहींत म्हणून मागें सांगितलें. तो कामाबद्दल कोणासही रोख पैसे देत असे. पण या नियमास देवालयें मात्र अपवाद होत. त्यांना शिवाजीनें जमिनींचीं उत्पन्नें तोडून दिलीं होतीं !

राज्याची अंतर्व्यवस्था करण्यास पेशव्यास कधींच फुरसत मिळाली नाहीं. बाजीराव व बाळाजी बाजीराव यांचा सर्व वेळ मुलूख काबीज करण्यांतच गेला, पुढें तर पानिपतची लढाई झाल्यावर खुद्द पेशव्यांच्या घराण्यांतच दुही उत्पन्न झाल्यामुळें तिजपासून राज्य वांचविण्यांतच पुढील मुत्सद्यांचा काळ गेला. असें जरी होतें तरी न्यायमनसुबा, गुन्हेगारीचा बंदोबस्त, वसुली वगैरे खात्यांतून उत्कृष्ट व्यवस्था असून प्रजा सुखानें नांदत होती.

पंचाइतीची पुरातन ग्रामसंस्था पेशव्यांच्या वेळीं न्यायाचीं कामें करीत असे. गांवात देवघेवीसंबंधीं एखादा तंटा उपास्थित झाला तर पहिल्यानें फिर्याद पाटलाकडे जाई. पाटील तंटा आपआपसांत मिटविण्याची खटपट करी; न जमल्यास गांवांतील पंच नेमून तंट्याचा निकाल होत असे. पंच नेमण्याचें काम पाटलाकडे असे तरी अमुक पंच आम्हांस नको असें वादी किंवा प्रतिवादी यांनीं म्हटल्यास तो पंच नेमण्यांत येत नसे. गांवपंचाईतीच्या निकालावर वरती मामलेदाराकडे दाद मागतां येत असे. मामलेदारही पंचाईत भरवूनच निकाल करी. तेथेंही समाधान न झाल्यास सरसुभेदाराकडे व त्यापुढें रामशास्त्री किंवा खुद्द नाना फडणीस यांजकडे फिर्याद जाई. कोठेंही झालें तरी निकाल पंचांमार्फत होई. पंचांची संख्या पांचपासून पन्नासपर्यंत असे. जातिसंबंधीं तंटे ज्या त्या जातीच्या मुख्याकडे निकालासाठीं पाठवीत. व जातीच्या पंचांमार्फत त्यांचा निकाल होई. पाटील व मामलेदार याशिवाय कित्येक शहरांतून सरकारनें नेमलेले न्यायाधीश असत. सर्व न्यायाधिशांवर मुख्य शके १६८१ पासून न्यायमूर्ति रामशास्त्री हे होते व ते पुण्यांत राहात.

गुन्हेगारास शिक्षा करण्याचें काम पाटील व मामलेदार यांजकडे असे. अमुक गुन्ह्यास अमुक शिक्षा असें ठरलेलें नव्हतें. त्यामुळें ठिकठिकाणच्या रिवाजाप्रमाणें शिक्षा देण्यांत येत असे. तरी पण देहान्तशिक्षा देण्यास खुद्द पेशव्यांची परवानगी लागे. देहान्तशिक्षा फारच थोड्या प्रसंगीं देण्यांत येई.

गांवांत बंदोबस्त ठेवण्याचें काम पाटलाकडे असे, व त्याला कुळकर्णी, चौगुला व गांवचा महार हे मदत करीत. मामलेदाराजवळ शिबंदी व स्वार बरेच असत. त्यांचाच आपआपल्या परगण्यांत शांतता व व्यवस्था राखण्याच्या कामीं हल्लींच्या पोलीससारखा उपयोग करीत. पुण्यासारख्या मोठ्या शहरांतून कोतवाल नेमिलेले असत.

जेव्हां मराठी फौजा बाहेर मुलखास जात तेव्हां त्यांच्याशीं पत्रव्यवहार करण्याकरितां जासूद किंवा कासीद असत. ह्या जासुदांना थालनेरापासून दिल्लीस जाण्यास अठरा दिवस लागत. व महेश्वरापासन तेरा दिवस लागत. सामान्यतः दररोज तीन रुपयेप्रमाणें यांना पगार मिळत असे. या व्यवस्थेशिवाय कायमची डांक नेण्याची व्यवस्था कांहीं झाली नव्हती. परंतु सावकार वगैरे लोकांनीं आपल्या हुंड्या लांब लांब नेण्यास माणसें ठेविलेलीं असत. तीं ठरीव वेळीं निघत. आपल्या लांब राहणाऱ्या आप्तेष्टांस ज्या कोणास पत्र पाठवावयाचें असें तो सावकाराच्या नोकराजवळ आपलें पत्र देई.

आजारी लोकांना फुकट औषधें देण्याकरितां सुप्रसिद्ध व कुशल वैद्य आणि हकीम नेमिलेले असत; व या कामगिरीबद्दल त्यांना गांवें इनाम दिलेलीं असत.

अरबस्थानांतील लोक घोड्यांचा व्यापार करीत असत. त्यांस कोंकण बंदरांत वसाहत करून राहण्यास उत्तेजन देण्यांत आलें होतें. त्यांना जकात वगैरे कर माफ केला होता. त्याचप्रमाणें माल घेऊन

येणाऱ्या युरोपिअन व्यापाऱ्यांसही सवलती ठेविल्या होत्या. शहरांची भरभराट व्हावी म्हणून नवे नवे धंदेवाले लोक आणून त्यांना वस्ती करण्यास हरएक तऱ्हेनें सरकार मदत करी. जमीन मोफत देत व कर माफ करीत. पुणें शहरांत जे रेशमाचे व कलाबतूचे कारखाने पुढें मोठ्या भरभराटीस आले ते, बऱ्हाणपूर, पैठण इत्यादि शहरांतील कारागीर लोकांस पुणें शहरांत घरें बांधण्यासाठीं मोफत जमीन देऊन त्यांना सरकारानें वसाहत करण्यास उत्तेजन दिलें म्हणूनच आले.

दरवर्षी श्रावणांत दक्षिणा वांटण्याचा समारंभ होई. त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानाच्या सर्व भागांतून संस्कृत पंडितांच्या झुंडीच्या झुंडी येत; व त्यांना विद्वत्तेनुरूप दक्षिणा मिळे. शिवाय शिफारसपत्रेंही दिलीं ज़ात. साधारण ब्राह्मणांस रमण्यांत दक्षिणा वांटीत. पण जे मोठे विद्वान् असत ते रमण्यांत जाणें कमीपणाचें मानीत. त्यास सरकारी वाड्यांत येण्यासाठीं आमंत्रण होई; व योग्यतेप्रमाणें कोणास शाली, कोणास द्रव्य, कोणास इतर देणग्या याप्रमाणें त्यांची संभावना होई. विद्वान् लोकांच्या संभावनेचा खर्च लाख सव्वा लाखपर्यंत होई. अशा प्रकारच्या औदार्यामुळें पुणें शहर म्हणजे विद्वत्तेचें माहेर घर अशी त्याची चोहोंकडे ख्याति झाली.

जमाबंदीच्या व्यवस्थेसाठीं पेशव्यांच्या प्रत्यक्ष अंमलाखालील प्रांताचे बारा सुभे केले होते. पुष्कळ गांवें मिळून एक तर्फ होई. त्यावर शेखदार म्हणून अम्मलदार असे. पुष्कळ तर्फ मिळून महाल. त्यावरील अधिकाऱ्यास मामलेदार म्हणत. पुष्कळ महाल मिळून सुभा होई व त्याच्यावर सुभेदार असे. वसुलाचें काम मामलेदारावरच फार पडे. तो महालांतील देशमुख, देशपांडे, पाटील, कुळकर्णी यांच्या मदतीनें तें काम करी. पूर्वी मलिकंबरानें जमिनीच्या प्रती लावून धाऱ्याचे नियम बसविले होते. त्याच्या प्रतबंदीस तनखा म्हणत. सदाशिवरावभाऊनें नवीन मोजणी करून जमिनीच्या प्रती लाविल्या व धाऱ्याचे नवीन

नियम केले. भाऊची प्रतबंदी फक्त पुण्याच्या सुभ्यास सुरू झाली होती. तिला " कमाल " म्हणत. जमिनीपासून येणाऱ्या वसुलास " ऐन-जमा " म्हणत व बाकीचा वसूल " शिवाय जमा " या सदराखालीं येई.

दरवर्षास मामलेदार बदलावयाचा असा सामान्य नियम असे. कुलीन घराण्यांतील चांगलीं सचोटीचीं माणसें पाहून त्यांस मामलती देण्यांत येत. नेमणूक व्हावयाच्या वेळीं एक सनद देत. तींत प्रजेशीं व सरकाराशीं इमानानें वागण्याबद्दल ताकीद असे. मागील वर्षाच्या हिशेबावरून महालाच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक मामलेदारास प्रथम देण्यांत येई, व वर्षाच्या शेवटीं जमाखर्चाची तपासणी होई त्यामुळें अन्याय होण्याची फारशी भीति नसे.

जमिनीचा सारा वसूल करण्यांतही रयतेस सोईस्कर असेच नियम होते. लोकांची फार अडचण दिसली तर सूट देण्यांत येई. शेतकीचीं साधनें जवळ नसल्यामुळें शेतकऱ्याचें काम नडतें असें दिसून आल्यास सरकारांतून थोड्या व्याजानें किंवा बिनव्याजानें पैसा देण्यांत येई. मग सवडीसवडीनें त्याची फेड करून घेण्यांत येई. कुळाकडे बाकी थकली तर ती वसूल करण्याकरितां त्याचें घरदार विकून सरकारानें त्यास भिकेस लाविलें असें कधीं झालें नाहीं.

मराठ्यांच्या एकंदर मुलखाचें उत्पन्न दहाकोटी होतें असें म्हणतात पण तें प्रत्यक्ष साडेसात कोटींचें होतें. खुद्द पेशव्यांच्या अंमलाखालील प्रांताचें उत्पन्न अडीच कोट होई. पेशव्यांना नेहमीं स्वाऱ्या कराव्या लागत असल्यामुळें दौलत सारखी कर्जाखालीं असे. माधवराव वारला तेव्हां पेशव्यांस चोवीस लक्ष रुपये कर्ज होतें. पुढें नाना फडणिसानें कर्ज बरेंच कमी केलें व शेवटीं रावबाजीच्या वेळीं तर खजिन्यांत शिल्लकच होती.

पेशव्यांची हुजरात व दक्षिणेकडील सरदारांची फौज मिळून ५०००० घोडेस्वार असत. मराठ्यांची पायदळ व तोफखाना हीं कधींच

चांगल्या स्थितींत नव्हतीं. किल्ल्यावरील शिबंदी खेरीज करून पेशव्यांचें १०००० पायदळ असे. त्यांत गारद्यांचा व आरबांचाच भरणा विशेष असे. याशिवाय गायकवाड, भोंसले यांचें दहा पंधरा हजार सैन्य, शिंदे-होळकर यांचें कमींतकमी तीस हजार सैन्य, हीं सैन्यें जमेस धरलीं तर पेशव्यांच्या हाताखालीं एकंदर एक लाख सैन्य होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत पेंढाऱ्यांची गणति केलेली नाहींच.

---

## उपसंहार.

शिवाजीनें मराठी राज्याची स्थापना केली, व जन्मभर श्रम करून राज्यकारभाराची घडीही नीट बसवून दिला. पण त्यास अकालीं मृत्यु आला इतक्यांत औरंगजेबास फुरसत सांपडून आपला मराठ्यांचा नाश करण्याचा हेतु साध्य करण्याकरितां तो दाक्षिणेवरच चालून आला. परंतु मराठी वीरांनीं हा हिंदुत्वावरील घाला परतवून लावण्यासाठीं पराकष्ठा केली, व त्यांच्या श्रमाचें चीज होऊन त्यांना या युद्धांत जय आला. पुढें पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत तर मराठी राज्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेरही झाला; व बाळाजी बाजीरावानें सर्व हिंदुस्थान मराठी राज्याच्या छत्राखालीं आणण्याचा संकल्प केला व त्याच्या कल्पना खऱ्या होण्याचा अगदीं रंग दिसूं लागला आणि हिंदु साम्राज्याचा पूर्ण सुखमय उपभोग हिंदुस्थानास घडणार अशीं शुभ चिन्हें दिसूं लागलीं. पण पानिपतच्या दुर्धर प्रसंगानें मराठ्यांचा अवमान झाला व ही कल्पना स्वप्नवत् होऊन बसली. पुढें माधवराव पेशवे यानें कारभाराचा बोज राखून मराठ्यांची

पडती बाजू चांगलीच सांवरून धरली. परंतु त्याला निर्घृण काळानें अल्पवयांतच ओढून नेलें ! ! तेव्हांपासून मराठ्यांची बाजू जी लंगडी पडली ती पुढें कधींही चांगली सांवरली नाहीं. राघोबानें गृहकलह केला; इंग्रजाशीं झगडा झाला. पुढें दुसरा बाजीराव गादीवर आल्यावर यशवंतराव होळकरानें मुळीं पुण्यावरच स्वारी केली ! बाजीराव पळाला, व इंग्रजांचा आश्रित बनला. या वेळीं मराठी राज्यास ग्रहण लागलें, त्यांतच मराठी राज्याचा शके १७४० ( सन १८१८ ) त पूर्ण ग्रास झाला ! !

मराठी राज्याच्या नाशाचीं कारणें पुष्कळच आहेत. पण त्यांतील ठोकळ पुढीलप्रमाणें. शिवाजीनें स्वराज्यस्थापना केली त्या वेळीं श्रीरामदासांनीं ‘ मराठा तेतुका मेळवावा ’ हा उपदेश केला. त्या वेळीं रामदासांचा हा उपदेश महाराष्ट्रांतील सर्व कर्त्या माणसांस पटला होता असें त्यांच्या आचरणावरून दिसून येतें. परंतु पुढें रामदासासारख्या उपदेशकांची ही परंपरा मुळींच जागृत राहिली नाहीं. बाळाजी बाजीरावाच्या वेळची हिंदुपदपादशाहीची कल्पना कांहीं थोड्या मुत्सद्यांसच पटली असून मराठमंडळापैकीं बरेच सरदार ही कल्पना यशस्वी करण्यासाठीं अंग चोरूनच काम करीत होते असें कबूल करणें भाग आहे. शिवाय पानिपतच्या लढाईनंतर मराठमंडळांतील निरनिराळे सरदार एकीनें असे काय ते खड्यांच्याच लढाईंत लढले. बाकी शिंदे, होळकर, गायकवाड, भोंसले यांपैकीं प्रत्येकजण, आपआपला स्वार्थ साधला म्हणजे झालें, एकंदर मराठमंडळ विजयशाली होत आहे कीं अवनत दशेस जात आहे याची फिकीरही नाहीं, अशा स्थितींत आढळून येतो. इकडे पुण्यास पहावें तों राघोबानें पेशवा होण्याची हांव धरली. त्यामुळें हें घरगुती विघ्न आवरतांनाच तेथील मुत्सद्यांची तारांबळ उडाली. मराठ्यांचें एकंदरीनें पाऊल पुढें का मागें, याचा विचार करण्यासही कोणास फुरसत उरली नाहीं. दुसरें असें कीं, शेवटीं मराठी राज्यास— यापेक्षां मराठे सरदारांस म्हटलें तर जास्त बरोबर होईल—इंग्रजांशीं तोंड

घ्यावें लागलें. सैन्याची शिस्त, लांब पल्ल्याच्या तोफा व सुधारलेल्या बंदुका यांचा इंग्रजांस पक्का आधार असल्यामुळें इंग्रज व इकडील लोक यांच्यामध्यें जीं युद्धें झालीं त्यांत थोडक्या इंग्रज सोजिरांना इकडील बऱ्याच मोठ्या सैन्याचाही पराभव करतां येई. बाळाजी बाजीरावाच्या वेळेपासूनच इंग्रज–फ्रेंचांच्या इकडील लोकांशीं लढाया होत असत, व मराठी मुत्सद्यांचें लक्ष या इंग्रजांच्या साधनांकडे वेधावयास पाहिजे होतें; परंतु तसें झाल्याचें फारसें आढळत नाहीं. महादजी शिंद्यानें फ्रेंच पलटणें चाकरीस ठेवून ही शिस्त इकडील लोकांत आणण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी; परंतु तसा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर व सर्व मराठमंडळानें केलेला दिसत नाहीं. आतां याचेंही कारण घरगुती भांडणांतच वेळ व श्रम खर्च होऊन राष्ट्रीय दृष्टीनें कांहींच काम नाना फडणिसासारख्या-सही करतां आलें नाहीं हेंच होय ! तिसरा मुद्दा असा कीं, पानिपता-नंतर मराठमंडळांत कर्ते पुरुष फारसे निघाले नाहींत. पहिले माधवराव, महादजी शिंदे व नाना फडणीस हीं तीन नांवें गाळलीं तर बाकीच्या मंडळींत सर्व मराठी साम्राज्यावर छाप बसवूं शकेल असा पुरुष आढळत नाहीं. यावरून एकी, ज्ञान व सामर्थ्य हीं अनुकूल झालीं तर राज्य-स्थापना होते; परंतु त्याच्या उलट यांचा अभाव झाला असतां राज्यें धुळीस मिळतात, हा मुख्य धडा शिकतां येण्यासारखा आहे.

# परिशिष्ट ( आख्यायिका. )

या आख्यायिकांपैकीं पहिल्या तीन इतिहाससंग्रह मासिकपुस्तकांतून घेतल्या आहेत. चौथी, पांचवी व साहावी या भारतवर्ष मासिक पुस्तकांत आलेल्या आहेत. सातपासून पुढल्या तीन लोकहितवादीकृत ऐतिहासिक गोष्टी या पुस्तकांतल्या आहेत. दहावी हरिवंशाच्या बखरीपैकीं आहे. बाकी राहिलेल्या रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांजकडून मिळाल्या.

---

## १. शिवाजीचा किताब.

औरंगजेब बादशहा महाप्रबळ होऊन त्यानें अनेक हिंदु व रजपूत राजे आपल्या सिंहासनाचे दास करून सोडिले. त्यावेळीं हिंदु व रजपूत यांच्या वतीनें राजे जयसिंग जयपूरवाले यांनीं औरंगजेब बादशहास ' दिल्लीश्वरो वा, जगदीश्वरो वा '[1] असा किताब दिला. हें वर्तमान शिवाजीमहाराजास कळलें, तेव्हां त्यांनीं रामदास स्वामीस पत्र लिहिलें; व सर्व हिंदु व रजपूत राजे यांनीं औरंगजेबास ' दिल्लीश्वर ' म्हणजे केवळ ' जगदीश्वर ' अशा बहुमानास पोंचविलें असें कळविलें. त्याचा आशय तेव्हांच लक्षांत घेऊन श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनीं शिवाजी महाराजांस उत्तर पाठविलें. त्यांत पुढील ओव्या लिहिल्या:—

**यश कीर्ति प्रताप महिमा । उत्तम गुणांसि नाहीं सीमा ।**
**नाहीं दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १ ॥**
**देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणांची चिंता वाहणें ।**
**बहूजनांसि पाळणें । देणें ईश्वराचें ॥ २ ॥**

---

१ औरंगजेब दिल्लीश्वर आहे, किंबहुना सर्व जगाचा स्वामी आहे.

याचा आशय असा कीं, औरंगजेबास मनुष्यांनीं किताब दिला, तुम्हांस देणें ईश्वराचें आहे. तुम्हांस देण्यासारखी दुसरी कोणतीच उपमा नाहीं. तुम्ही अनुपम आहां !

---

## २. त्र्यंबकराव रेटरेकर यांचा इमानी बाणा.

बाळाजी विश्वनाथ पेशवे हब्श्यांच्या त्रासामुळें प्रथम देशावर पळून आले, ते प्रथम रामचंद्रपंत अमात्य–त्यावेळचे मराठी राज्याचे कुलमुखत्यार–यांजकडे शागीर्द मंडळींत नौकरीस राहिले. तेथें न जमल्यामुळें पुढें ते दाभाडे सेनापति यांच्या नौकरींत शिरले. त्या वेळीं दाभाडे यांचे कारभारी भिवराव पानशे हे होते. त्यांची मर्जी बाळाजी विश्वनाथांवर दिवसेंदिवस जास्त बसत चालली, पुढें यजमान व नोकर हा भेद नाहींसा होऊन ते मित्र बनले. पुढें बाळाजीवर कांहीं संकट आलें त्यांतून भिवरावांनीं त्यांस वांचविलें. बाळाजी विश्वनाथ मोठे होत होत पुढें छत्रपतींचे मुख्य प्रधान झाले. त्यावेळीं भिवराव रेटरेकर वारले. त्यांस बाजीराव व चिमणाजी असे दोघे मुलगे होते. त्यांस त्यांनीं मरणसमयीं बाळाजी विश्वनाथांच्या स्वाधीन केलें. पेशव्यांच्या राज्याची अखेर होईपर्यंत या घराण्यांतील पुरुष पेशव्यांच्या हुजूरपागेंत सरदारी करीत. ज्याप्रमाणें पुरंदऱ्यांच्या घराण्याशीं पेशव्यांच्या घराण्याचा घरोबा होता त्याचप्रमाणें रेटरेकर मंडळी पेशव्यांच्या कुटुंबांतील समजली जात असे.

पेशवाईच्या अखेरीच्या सुमारास एल्फिन्स्टन्‌साहेबांनीं जाहिरनामा लाविला कीं, “ अमुक मुदतीच्या आंत बाजीराव यांस सोडून जे सरदार आपआपल्या जागीं परत येतील, त्यांच्या जहागिरी त्यांजकडे चालविल्या जातील. न येतील त्यांच्या जहागिरी खालसा होतील. ” हा जाहिरनामा लागतांच अष्टप्रधानांतील प्रतिनिधि आदिकरून पेशव्यांच्या बरोबरीचे म्हणविणारे सरदार व पटवर्धनआदिकरून पेशव्यांच्या आश्रयानें वैभवास चढलेले बहुतेक सरदार, आपल्या धन्यास सोडून आपल्या जागीं आले व आपली दौलत संभाळून राहिले, त्यावेळीं भिवराव रेटरकर यांच्या वंशजांपैकीं त्र्यंबकराव रेटरेकर बाजीरावाबरोबर भटकत फिरत होते. त्यांस एल्फिन्स्टनूसाहेबांचे गुप्त बातमीदार व साह्यकारी बाळाजीपंत नातू यांनीं समजावून सांगितलें कीं, ‘ तुमच्या धन्यांनीं आतां किती जरी खटपट केली तरी पेशवाई

टिकत नाहीं, मग साहेबांच्या मनाप्रमाणें वागून आपली जहागीर कां राखीत नाहीं ? उगीच कां दवडतां ?' त्यावर त्र्यंबकरावांनीं उत्तर केलें कीं, " ही नेकीची गोष्ट नव्हे. कांही झालें तरी आमची कुळकर्णाची खर्डेघाशी व ज्योतिषाची पडशी कोणी नेत नाहीं. ती कायमचीच आहे. आम्ही आपल्या धन्याबरोबर झाडाचा पाला खात हिंडूं व येईल तो हालाझोला सोसूं; परंतु धन्याशीं बेइमानी कधींही होणार नाहीं. " अखेर पेशवाई बुडाली. रेटरेकरांची जहागीर सर्व गेली. तथापि त्यांची नेकीची व बाणेदार वर्तणूक मनांत आणून, इंग्रजसरकारानें कांहीं गांवांची जहागीर त्यांजकडे चालविली आहे व तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत त्यांची गणना केली आहे.

---

## ३. अलौकिक धैर्याची स्वामिभक्त स्त्री.

कुलाब्याच्या आंग्रे घराण्याचा मूळ संस्थापक कान्होजी आंग्रे हा होय. यानें, हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर लढाऊ आरमार तयार करून, परशत्रूंपासून सर्व कोंकण किनाऱ्याचें चांगलें संरक्षण केलें होतें. हा इ. स. १७२९ मध्यें मृत्यु पावला. त्याच्या मागून त्याचा पुत्र सेखोजी यास सरखेलीचीं वस्त्रें मिळाली. तो इ. स. १७३३ सालीं मृत्यु पावला. त्याची आई लक्ष्मीबाई ही फार चतुर व राजकारणी बायको होती. हिच्या ठिकाणीं रणशूर मराठ्यांच्या स्त्रियांस साजतील असे धैर्य व स्वामिभक्ति हे गुण फार अपूर्व होते. कान्होजी आंग्र्याच्या पश्चात् आरमाराची व्यवस्था ही बाई स्वतः पहात असे. त्यामुळें पेशव्यांच्या दरबारीं हिचें वजन व प्रतिष्ठा विशेष असे. सेखोजी आंग्रे वारल्याचें वृत्त जेव्हां थोरले बाजीरावसाहेब यांस समजलें, तेव्हां त्यांनीं लक्ष्मीबाईचें समाधान करण्यासाठीं एक पत्र पाठविलें. त्या पत्रामध्यें त्यांनीं " पुत्रशोक न करितां विचारानें दुःखाचें परिमार्जन करावें, आणि लोकांचीं समाधानें करावीं. " इत्यादि मजकूर लिहिला. हें पत्र वाचून त्या धैर्यवती स्त्रीनें पेशव्यांस उत्तर लिहिलें:— " ईश्वराच्या इच्छेनें जो प्रसंग ज्या समयीं यावयाचा तो येतच आहे. भवितव्यता कधींही टळणार नाहीं. तेव्हां घडलेल्या गोष्टीबद्दल खेद करण्यांत काय अर्थ आहे ? दुःखाचें परिमार्जन करून, आमच्या घराण्यानें जो पूर्वापार लौकिक संपादिला आहे त्याचें सरक्षण करणें हाच माझा स्वधर्म आहे असें मी समजतें; आणि स्वामिकार्यावर

दृष्टि देऊन तें सिद्धीस नेण्यांतच सर्व कृतार्थता आहे असें मी मानितें. मजला माझ्या पुत्रापेक्षां स्वामिकार्याच्या यशःसिद्धीचें महत्त्व अधिक वाटतें. पुत्रशोकांत गुंतून मी सरदारीचा लौकिक कधींही गमविणार नाहीं. " केवढें हें धैर्य! केवढी ही स्वामिभक्ति!!

---

## ४. शिदनाक महार.

सातारा जिल्ह्यांत तासगांव तालुक्यांत कळंबी म्हणून एक गांव आहे, तेथचा हा वतनदार महार. शाहूराजा मोंगलांच्या हातून सुटून आला तेव्हां त्यास जे सरदार मिळाले त्यांत हा होता. शाहूस राज्यप्राप्ति झाल्यावर ज्यांनीं त्यास मदत केली होती त्यांस त्यानें त्यांच्या योग्यतेप्रमाणें देणग्या दिल्या. त्यावेळीं शिदनाक यास कळंबी गांव इनाम मिळाला. तो अद्यापि त्याच्या वंशाकडे चालत आहे.

या शिदनाकाचा नातू त्याच्याच नांवाचा होता, तो खडर्याच्या लढाईत ( शके १७१६,) होता. खडर्याच्या मैदानावर जेव्हां मराठ्यांच्या फौजेचा तळ पडला तेव्हां सरदार आपापल्या लोकांसह मिसलीप्रमाणें उतरले. शिदनाकाच्या गोटाच्या आसपास दुसऱ्या ब्राह्मण व मराठे सरदारांचे गोट होते. पेशवाईत सोंवळ्या ओवळ्याचा विचार फाजील वाढत चालला होता. त्यामुळें कित्येकांनीं सवाई माधवराव कचेरींत डेऱ्यांत बसले असतां विनंति केली कीं, महाराचा गोट मध्येंच आहे तो बाजूस काढावा. पेशव्यांनीं विनंति ऐकून आपल्या बाजूस बसलेल्या हिरोजी पाटणकर नांवाच्या वयोवृद्ध सरदाराकडे पाहिलें. तेव्हां तो मराठा सरदार बोलला कीं, ही कांहीं जेवणाची पंगत नव्हे; म्हणून मध्येंच महाराचा गोट असल्यास हरकत नाहीं. ही तरवार धरणाऱ्या शूरांची पंगत आहे. येथें जातीचा विचार नाहीं. '**ज्याची तरवार खंबीर तो हंबीर.**' पाटणकरांचें बोलणें ऐकून पेशव्यांनीं मान डोलविली.

पुढें लढाईच्या दिवशीं सरदार लोक पेशव्यांस मुजरे करून लढाईस चालले; तेव्हां शिदनाकही मुजऱ्यास आला. मुजरा करून हात जोडून पेशव्यांस म्हणाला, 'महाराज, मी शिदनाक महार आहें. मी महार म्हणून कांहीं लोक माझा तिरस्कार करितात. आज आपल्या पायाचा दास कामगिरी कशी करतो ती पहावी.' असें म्हणून निघून गेला. पुढें लढाई चालू झाली.

परशुरामभाऊवर पठाणांनीं मोठी गर्दी करून भाऊस घोड्यावरून खालीं आणलें; त्यावेळीं मराठे व पठाण यांची जी चकमक झाली तींत शिदनाकानें अप्रतिम शौर्य दाखविलें. त्याची पटवर्धन मंडळींनीं मोठी तारीफ केली.

---

## ५. आप्पासाहेब निपाणकर.

पेशवाईच्या अखेरीच्या सुमारास आप्पासाहेब निपाणकर म्हणून मोठा शूर पुरुष होऊन गेला. कोणे एके दिवशीं त्याच्या वाड्यांत कीर्तन झालें. आप्पासाहेब कीर्तन ऐकत बसला होता. त्याच्या समोरच एका खांबाशीं टेंकून त्याचा एक कारकून बसला होता. त्याच्या आंगरख्यांत एक ढेंकूण शिरला होता. त्यामुळें तो कारकून वारंवार चुळबूळ करी. त्याच दिवशीं अशी गोष्ट झाली कीं, आप्पासाहेबांच्या पागोट्यांत भला मोठा विंचू जाऊन बसला होता. दुसऱ्यानें तसेंच पागोटें आणून दिलें. तेंच डोईस घालून आप्पासाहेब कीर्तनास येऊन बसला. कीर्तनास आरंभ झाल्यापासून विंचवानें सारखे डोक्यावर तडाखे मारण्यास आरंभ केला. कथा संपेपर्यंत आप्पासाहेब ते सोशीतच होता. कथा संपल्यावर आप्पासाहेबानें समोर बसलेल्या कारकुनास हांक मारून विचारिलें कीं, कथस आरंभ झाल्यापासून तुझी चलबिचल कसली चालली होती? कारकुनानें सांगितलें कीं, कपड्यांत ढेंकूण शिरल्यामुळें अशी गोष्ट झाली. मग आप्पासाहेबानें डोईचें पागोटें काढून झाडलें, तों त्यांतून भला मुठीसारखा विंचू बाहेर पडला. आप्पासाहेब कारकुनास म्हणाला, 'बेट्या, ढेंकणानें इतकी तुझी तारांबळ उडविली. हा तर प्रहरभर माझें डोकें फोडीत आहे!'

---

## ६. परशुरामभाऊच्या पुत्रानें सूड उगविला.

परशुरामभाऊस कोल्हापूरकरांनीं मारल्यावर त्याचा पुत्र आप्पासाहेब यानें आपल्या पित्याच्या मरणाबद्दल सूड उगविण्याचा निश्चय केला. तो अप्रतिम शूर होता. पटवर्धनांचे पुत्र म्हणजे वाघाचे बच्चे! विश्वासराव गायकवाडानें आपल्या पित्यास मारिलें. त्याच्या नरडीचा केव्हां घोट घेईन असें आप्पासाहेबास झालें.

पित्याच्या मरणानंतर तो चांगली तयारी करून अचानक कोल्हापुरावर चालून गेला. कोल्हापूरकरांची तयारी चांगलीशी नव्हती. शहरांत बातमी पोंचली कीं, आप्पासाहेब आला. विश्वासराव गायकवाड व त्याचे भाऊ नुकतेच जेवावयास बसले होते. त्यांस बातमी कळतांच पुढचीं ताटें बाजूस सारून आईस नमस्कार करून निघाले. निघतांना बोलले कीं, 'आप्पासाहेब सूड घेण्याच्या इराद्यानें आला आहे. निर्वाणीचा प्रसंग आहे.' गायकवाड व कोल्हापूरचे इतर सरदार त्याशीं लढाई देण्याकरितां शहराबाहेर पडूं लागले; जसा वाघ आपल्या शिकारीवर नजर ठेवून छपून बसलेला असतो तसा आप्पासाहेब बसला होता. त्याची सगळी दृष्टि गायकवाडावर, तों गायकवाडही शहराबाहेर पडले. तों भलत्याच बाजूनें आप्पासाहेबानें आपला घोडा कोल्हापूरकराच्या सैन्यांत फेंकला. ते लोक आपली सांवरासावर करीत होते. इतक्यांत त्या पांगलेल्या लोकांतून आप्पासाहेब, गायकवाड जेथें होते तेथें जाऊन पोंचला. आणि त्यानें डोक्यावर उचलून धरलेल्या समशेरीचा हात असा झपाट्यानें व सफाईनें मारला कीं विश्वासराव व त्याचा एक भाऊ या दोघांचीं शिरें तात्काळ धडापासून वेगळीं झालीं. इतकें करून, लोक चकित होऊन इकडे तिकडे पाहतात व हां हां म्हणतात तोंच आप्पासाहेब गेलल्या वेगानें परत येऊन आपल्या सैन्यांत येऊन उभा राहिला! याला म्हणतात पाणी!

---

## ७. सखारामबापूची राष्ट्रभक्ति.

सन १७७८ सालीं सखारामबापूंस, 'तुम्हांस पेशवे कैद' करणार, अशी कोणी बातमी सांगितली आणि कळविलें कीं, 'निजामसरकाराकडे आपली वजनदारी फार आहे, तर त्यांस हें कळविलें असतां ते तुह्मांस कैद होऊं देणार नाहींत असें संधान आहे.' तें ऐकून बापू म्हणाले कीं, 'आपल्या राज्यांत आपण शत्रु घालणें हें ठीक नाहीं. याजकरितां माझें जें काय होणें असेल तें होवो, पण मी कोणत्याही शत्रूस उठविणार नाहीं!!'

---

## ८. ढमढेरे घराण्यांतील स्वार्थत्यागी स्त्री.

राघोबादादाची राक्षसभुवनचे ठिकाणीं लढाईस पुण्याहून स्वारी निघाली, तेव्हां ते ढमढेरे यांचे बाईस भेटण्याकरितां गेले. तेथें तिनें आग्रह केला कीं, माझा मुलगा पंधरा सोळा वर्षांचा आहे तो स्वारीबरोबर घ्यावा. तेव्हां दादासाहेबांनीं सांगितलें कीं, तुमचे घरांत मर्द माणूस कोणी राहिला नाहीं. एकटा मुलगा आहे, त्यास बरोबर नेण्याचें कारण नाहीं. तेव्हां बाई म्हणाली कीं, सरकाराबरोबर स्वारींत आमचा कोणी नाहीं असें दिसेल व तें ठीक नाहीं. याकरितां मुलगा न्यावा; त्या आग्रहावरून दादासाहेबांनीं मुलगा बरोबर घेतला. पुढें पैठण उतरून पलीकडे राक्षसभुवनावर निजामअल्लीच्या फौजेची गांठ पडून लढाई झाली. त्यांत हा मलगा पुढेंच होता, त्यास जखम लागून श्रीमंतांचे देखतच ठार झाला. पुढें श्रीमंत लढाई संपल्यावर पुण्यास परत आले. तेव्हां बाईच्या समाधानाकरितां गेले आणि बाईस म्हणाले, ‘ तुमचा एकच मुलगा आमचे देखत ठार झाला. आतां याचा मी उतराई कसा होईन तें दिसत नाहीं. याकरितां मी तुमचा मुलगा आहें. जर मला दत्तक घ्याल तर फार चांगलें. ’ तेव्हां बाईनें सांगितलें कीं, ‘ झाली गोष्ट ती झाली. सरकार-कृपेनें दत्तक घेऊन दौलत चालेल. सरकारांनीं फिकीर करूं नये.’

---

## ९. आज कीर्ति मिळवा ! अपेश घेऊं नका.

लढाईचे वेळीं मुख्य सरदार यांस बोलावून पूर्व दिवशीं सभा करीत, त्यामध्यें ताटांत विडे भरून ठेवीत आणि ते उचलावयास सांगत. ते जो उचलील तो मागें हटावयाचा नाहीं. दुसरे दिवशीं सर्व जमले म्हणजे बापू गोखले वगैरे मुख्य सरदार शेल्याचा पदर पसरून त्यांचे पुढें फिरत आणि त्यांची प्रार्थना करीत कीं, “ माझी सरदारी खरी, पण राखणें तुम्हांकडे आहे. मी शेरभर पिठाचा मालक, सर्व भूषण तुमचें आहे. याकरितां आपले वडील कसे करीत आले त्याचें स्मरण करून आज कीर्ति मिळवा ! अपेश घेऊं नका. आमची शोभा तुमच्या हातीं आहे. मरण आलें तर स्वर्गवास होईल. यश मिळालें तर कीर्ति होईल. सर्व दौलत तुमची आहे असें समजून आमचे पदरीं असल्याचें भूषण करावें हें आमचं मागणें सर्वांस आहे ” असें सांगून हल्ला चढवीत व जय मिळाला म्हणजे बक्षिसें वांटीत.

---

## १०. साडेतीन राव

भवानराव प्रतिनिधि यांनीं सांगितलें कीं, या पृथ्वींत साडेतीन राव. ते कोणते? एक मुराराव घोरपडे, एक भवानराव प्रतिनिधि; एक गोपाळराव पटवर्धन व अर्धा श्रीमंत माधवरावसाहेब, असें प्रतिनिधि बोलले.

कोणे एके दिवशीं प्रतिनिधि पुण्यांत आपले वाड्यांत बसले होते. तों गोपाळ नाईक तांबवेकर हे सावकार पालखींत बसून जात होते. समागमें कांहीं स्वार, पायदळ व इटेकरी व पट्टेकरी असे जात होते. ते यांचे माडीखालून गेले तों यांनीं शोधास पाठविलें कीं, स्वारी कोणाची? त्यांचे माणसांनीं सांगितल कीं, स्वारी गोपाळराव यांची. पंत यांनीं शोधास पाठविलें कीं गोपाळराव पटवर्धन कीं काय! त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, तांबवेकर. पटवर्धन नव्हेत. असें समजतांच पंतांनीं आज्ञा केली, 'काय पहातां? धरून ठोका. हा राव कोठून जाहला? अशी आज्ञा होतांच पंताकडील शेंपन्नास मनुष्य जाऊन तांबवेकर यांची पालखी मोडून त्यासही मारिलें. इटे व पट्टे हिरावून घेतले. नंतर श्रीमंतांकडे तांबवेकर जाऊन मजकूर सांगितला. श्रीमंत बोलले कीं, तुम्ही आपणास राव कां म्हणत होतां?

कर्नाटकांत निजगल म्हणून एक ठाणें आहे. तेथें श्रीमंतांचे मोर्चे बसले. एके दिवशीं लढाई होत असतां श्रीमंत मोर्च्यांत बुद्धिबळें खेळत बसले होते. मुरारराव घोरपडे यांचे बंधु दौलतराव आणि आपण असे उभयतां खेळत असतां अकस्मात् गोळी येऊन श्रीमंत नारायणरावसाहेब यांस निसरती लागली. लागतांच श्रीमंत नारायणराव पालखींत बसून गोटास गेले. ज्या जाग्यावर गोळ्या येऊन पडत त्या जाग्यावर श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले, व श्रीमंत नारायणरावसाहेबांस गोळी-लागली; तेव्हां सर्वांस काळजी पडली. परंतु श्रीमंतांस तेथून उठा म्हणण्याची कोणाची शक्ति नाहीं. तेव्हां सर्व सरदारांनीं जाऊन मुराररावास सांगितलें कीं, राव, श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले तेथें गोळ्या येऊन पडतात. श्रीमंत नारायणराव-साहेबांस गोळी लागली. आमची कांहीं श्रीमंतांस 'उठा' म्हणण्याची ताकद नाहीं! तेव्हां मुरारराव तसेच निघून श्रीमंतांपुढें आले, आणि बोलले, 'ऊठ, नाहीं तर आतां तोडेतों!' असें म्हणतांच श्रीमंतांनीं वरते पाहिलें. तों राव म्हणाले

---

१ हैदरअल्लीवरील तिसरी स्वारी, पृष्ठ २९९ शेवटची ओळ पहा. २ ठार मारतों.

## ८. ढमढेरे घराण्यांतील स्वार्थत्यागी स्त्री.

राघोबादादाची राक्षसभुवनचे ठिकाणीं लढाईस पुण्याहून स्वारी निघाली, तेव्हां ते ढमढेरे यांचे बाईस भेटण्याकरितां गेले. तेथें तिनें आग्रह केला कीं, माझा मुलगा पंधरा सोळा वर्षांचा आहे तो स्वारीबरोबर घ्यावा. तेव्हां दादासाहेबांनीं सांगितलें कीं, तुमचे घरांत मर्द माणूस कोणी राहिला नाहीं. एकटा मुलगा आहे, त्यास बरोबर नेण्याचें कारण नाहीं. तेव्हां बाई म्हणाली कीं, सरकाराबरोबर स्वारींत आमचा कोणी नाहीं असें दिसेल व तें ठीक नाहीं. याकरितां मुलगा न्यावा; त्या आग्रहावरून दादासाहेबांनीं मुलगा बरोबर घेतला. पुढें पैठण उतरून पलीकडे राक्षसभुवनावर निजामअल्लीच्या फौजेची गांठ पडून लढाई झाली. त्यांत हा मलगा पुढेंच होता, त्यास जखम लागून श्रीमंतांचे देखतच ठार झाला. पुढें श्रीमंत लढाई संपल्यावर पुण्यास परत आले. तेव्हां बाईच्या समाधानाकारितां गेले आणि बाईस म्हणाले, 'तुमचा एकच मुलगा आमचे देखत ठार झाला. आतां याचा मी उतराई कसा होईन तें दिसत नाहीं. याकरितां मी तुमचा मुलगा आहें. जर मला दत्तक घ्याल तर फार चांगलें.' तेव्हां बाईनें सांगितलें कीं, 'झाली गोष्ट ती झाली. सरकार-कृपेनें दत्तक घेऊन दौलत चालेल. सरकारांनीं फिकीर करूं नये.'

---

## ९. आज कीर्ति मिळवा ! अपेश घेऊं नका.

लढाईचे वेळीं मुख्य सरदार यांस बोलावून पूर्व दिवशीं सभा करीत, त्यामध्यें ताटांत विडे भरून ठेवीत आणि ते उचलावयास सांगत. ते जो उचलील तो मागें हटावयाचा नाहीं. दुसरे दिवशीं सर्व जमले म्हणजे बापू गोखले वगैरे मुख्य सरदार शेल्याचा पदर पसरून त्यांचे पुढें फिरत आणि त्यांची प्रार्थना करीत कीं, "माझी सरदारी खरी, पण राखणें तुम्हांकडे आहे. मी शेरभर पिठाचा मालक, सर्व भूषण तुमचें आहे. याकरितां आपले वडील कसे करीत आले त्याचें स्मरण करून आज कीर्ति मिळवा ! अपेश घेऊं नका. आमची शोभा तुमच्या हातीं आहे. मरण आलें तर स्वर्गवास होईल. यश मिळालें तर कीर्ति होईल. सर्व दौलत तुमची आहे असें समजून आमचे पदरीं असल्याचें भूषण करावें हें आमच मागणें सर्वांस आहे" असें सांगून हल्ला चढवीत व जय मिळाला म्हणजे बक्षिसें वांटीत.

---

## १०. साडेतीन राव

भवानराव प्रतिनिधि यांनीं सांगितलें कीं, या पृथ्वींत साडेतीन राव. ते कोणते ? एक मुराराव घोरपडे, एक भवानराव प्रतिनिधि; एक गोपाळराव पटवर्धन व अर्धा श्रीमंत माधवरावसाहेब, असें प्रतिनिधि बोलले.

कोणे एके दिवशीं प्रतिनिधि पुण्यांत आपले वाड्यांत बसले होते. तों गोपाळ नाईक तांबवेकर हे सावकार पालखींत बसून जात होते. समागमें कांहीं स्वार, पायदळ व इटेकरी व पट्टेकरी असे जात होते. ते यांचे माडीखालून गेले तों यांनीं शोधास पाठविलें कीं, स्वारी कोणाची ? त्यांचे माणसांनीं सांगितल कीं, स्वारी गोपाळराव यांची. पंत यांनीं शोधास पाठविलें कीं गोपाळराव पटवर्धन कीं काय ! त्यांचे माणसांनीं सांगितलें कीं, तांबवेकर. पटवर्धन नव्हेत. असें समजतांच पंतांनीं आज्ञा केली, 'काय पहातां? धरून ठोका. हा राव कोठून जाहला ? अशी आज्ञा होतांच पंताकडील शेंपन्नास मनुष्य जाऊन तांबवेकर यांची पालखी मोडून त्यासही मारिलें. इटे व पट्टे हिरावून घेतले. नंतर श्रीमंतांकडे तांबवेकर जाऊन मजकूर सांगितला. श्रीमंत बोलले कीं, तुम्ही आपणास राव कां म्हणत होतां ?

कर्नाटकांत निजगल म्हणून एक ठाणें आहे. तेथें श्रीमंतांचे मोर्चे बसले.[1] एके दिवशीं लढाई होत असतां श्रीमंत मोर्च्यांत बुद्धिबळें खेळत बसले होते. मुरारराव घोरपडे यांचे बंधु दौलतराव आणि आपण असे उभयतां खेळत असतां अकस्मात् गोळी येऊन श्रीमंत नारायणरावसाहेब यांस निसरती लागली. लागतांच श्रीमंत नारायणराव पालखींत बसून गोटास गेले. ज्या जाग्यावर गोळ्या येऊन पडत त्या जाग्यावर श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले, व श्रीमंत नारायणरावसाहेबांस गोळी-लागली; तेव्हां सर्वांस काळजी पडली. परंतु श्रीमंतांस तेथून उठा म्हणण्याची कोणाची शक्ति नाहीं. तेव्हां सर्व सरदारांनीं जाऊन मुरारराावास सांगितलें कीं, राव, श्रीमंत बुद्धिबळें खेळत बसले तेथें गोळ्या येऊन पडतात. श्रीमंत नारायणराव-साहेबांस गोळी लागली. आमची कांहीं श्रीमंतांस ' उठा ' म्हणण्याची ताकद नाहीं ! तेव्हां मुरारराव तसेच निघून श्रीमंतांपुढें आले, आणि बोलले, ' ऊठ, नाहीं तर आतां तोडेंतों ![2] ' असें म्हणतांच श्रीमंतांनीं वरते पाहिलें. तों राव म्हणाले

१ हैदरअल्लीवरील तिसरी स्वारी, पृष्ठ २९९ शेवटची ओळ पहा. २ ठार मारतों.

कीं, ' तूं मरणार कीं काय ? त्या पोरास गोळी लागली, दैववशात् वांचला म्हणून वांचला. आणि तुला गोळी लागल्यावर पुढें काय करावयाचें ? ' असें म्हणून आपले भावास रागें भरले. तों श्रीमंत बोलले ' हें ठाणें येत नाहीं त्यास काय करावें ? ' मुरारराव म्हणाले, ' माझा तमाशा पहा. ' असें म्हणून पायउतारा होऊन नीट चालून गेले तों हल्लाच केला. मुरारराव खासा जातीनिशीं निशाण घेऊन चढले. वर निशाण चढवून खालीं पाहतात तों शिडीच्या खालच्या पायरीजवळ श्रीमंत उभे ! तें पाहून मुरारराव यांनीं तोंडांत बोट घालून आश्चर्य केलें कीं, याचेपुढें शिपाई-गिरी मिरविण्याची आमची हद्द जाहली !

श्रीमंत माधवराव श्रीरंगपट्टणचे स्वारीस जावयास निघाले ते धारवाडास आले. धारवाडास मोर्चे बसविले तों हैदरखान फौजेसुद्धां धारवाडच्या कुमकेस निघाला. ही बातमी श्रीमंतांची आली. तेव्हां गोविंद शिवराम खासगीवाले यांसी बोलले कीं, ' हैदरखान पट्टणाहून निघाला. त्याचे तोंडावर कोणी पाठवावा लागेल. आम्हांस तर मोर्चे बसले त्यापेक्षां येथून जावयाचें नाहीं. त्यास कोण पाठवावा ? ' गोविंदराव बोलले कीं, ' हैदरखानाचे तोंडावर गोपाळराव पटवर्धन यास पाठवावें. त्याजवांचून त्याचे तोंडावर जाण्यास कोणी योग्य नाहींत. ' असें म्हणतांच श्रीमंत ' उत्तम ' म्हणाले. नंतर श्रीमंतांनीं दहा हजार फौज व दहा हजार गारदी याप्रमाणें फौज देऊन रवाना केलें. तों धारवाडहून दोन मुक्काम गेले. हैदरखानास बातमी समजली कीं गोपाळराव आले. असें समजतांच कूच करून माघारे पट्टणास गेला.

---

## ११. नागपूरकर भोंसले व सखारामबापू

बापू प्रतिबंधांत असतांही, गरजू लोक त्यावेळच्या प्रघाताप्रमाणें नाना युक्तींनीं त्यांच्या अकलेचा फायदा घेत असत. एक वेळ नागपूरकर भोंसले आणि श्रीमंत यांचे मध्यें कांहीं तेढ उत्पन्न होऊन, श्रीमंतांनीं भोंसल्यांस पुण्यास बोलाविलें. भोंसले यांस प्रसंग कठीण दिसला म्हणून त्यांनीं पुण्यांतील आपल्या वकिला-मार्फत बापूंची सल्ला मागविली. बापू प्रतिबंधांत असल्यामुळें त्यांच्याशीं बोलण्यास

---

१ सन १७६४ च्या सप्टेंबरांत.

वकिलास मार्ग नव्हता. तथापि त्यावेळच्या राजकीय वकिलांच्या चातुर्याप्रमाणें तो वकील बापूंचे भेटीस गेला. बापू बुद्धिबळें खेळत होते. तेथें जाऊन तो मुकाट्यानें उभा राहिला. बापूंनीं त्याचा हेतु जाणून बुद्धिबळाच्या डावांत असें म्हटलें कीं, ' राजा एक घर मागें घ्यावा आणि प्यादी एक घर पुढें द्यावी. ' हें ऐकतांच वकिलाचें काम होऊन तो निघून गेला आणि त्यानें आपल्या धन्यास कळविलें कीं, ' आपण स्वतः न येतां, फौज पुढें पाठवावी म्हणजे पेशव्यांस दहशत बसून कार्यभाग होईल. ' भोंसल्यांनीं तसें करतांच, त्याजवरील प्रसंग टळला, हें सांगणें नकोच.

---

## १२. हरिपंत फडक्यांची निष्ठा

हरिपंत फडके पूर्वी सावकार वानवळे यांचे घरीं नोकर होते. एके दिवशीं वानवळ्यांकडे श्रीमंतांस मेजवानी झाली. त्यावेळीं रीतीप्रमाणें जेवण्याच्या वेळीं समया मांडिल्या होत्या. त्या समयांपैकीं एक किंचित् उंच होती. श्रीमंतांचें लक्ष त्या समईकडे गेलें, तें लागलींच ओळखून हरिपंतांनीं ती समई थोडीशी खळग्यांत सारून बाकीच्या समयांबरोबर केली. हरिपंतांचें हें चातुर्य श्रीमंतांचें लक्षांत येऊन, त्यांनीं पानसुपारीचे वेळीं वानवळ्यांस विचारलें कीं, समई सारली तो कोण ? वानवळ्यांनीं तो आपल्या येथील नोकर असल्याचें सांगितलें. तेव्हां श्रीमंतांनीं तात्यांस मागून घेऊन आपल्या संग्रहीं ठेविलें. पुढें हरिपंततात्यांच्या पराक्रमाची प्रसिद्धि होऊन सर्व हिंदुस्थानभर जरीपटक्याचा धौशा वाजत राहिला; तथापि हरिपंतांनीं आपला पूर्वीचा क्रम सोडला नव्हता ! त्यांचे यजमान वानवळे गत झाल्यानंतर त्यांचे श्राद्धाचे दिवशीं हरिपंत त्यांचे येथें जेवावयास जावयाचेच ! ' बोलावणें घेण्याचा आमचा मान नाहीं. आम्ही वेळेवर येत जाऊं, ' असें त्यांनीं वानवळे यांस सांगून ठेविलें होतें. वानवळे यांचे घरीं असतां जी धाबळी व भांडें ते वापरीत, ती धाबळी आणि तें भांडें वानवळ्यांचे घरीं ज्या फडताळांत ठेवीत असत, त्यांतच ठेवून, फडताळास हरिपंतांनीं आपलें कुलूप ठेविलें होतें. यजमानाच्या श्राद्धास गेले म्हणजे पूर्वीची ती धाबळी नेसून आणि तें भांडें घेऊन जेवण करावयाचें, असा त्यांचा क्रम होता.

---

## १३. विठ्ठल सुंदर

'सखा, देवा, विठला,' हे पेशवाईंतील प्रसिद्ध साडेतीन शहाण्यांपैकीं तीन. त्यांपैकींच विठ्ठल सुंदर हे एक होत. हे माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण. अल्पवयांतही यांच्या अंगीं राजकारणाचें पाणी खेळत होतें. उपजत अंगस्वभाव म्हणतात त्याप्रमाणें हे अगदीं लहानपणीं राजकारणांत पडण्याची खटपट करीत होते. श्रीमंत नानासाहेब व श्री. भाऊसाहेब या बंधुद्वयाचें एकमेकांवरील प्रेम विलक्षण असल्याचें इतिहासप्रसिद्ध आहेच; तेव्हां श्री. भाऊसाहेबांच्या कच्छपीं लागून त्यांच्याद्वारें पेशवाईंत आपला प्रवेश करून घ्यावा आणि राजकारणांत पडून दौलत व कीर्ति संपादावी ह्या हेतूनें विठ्ठल सुंदर भाऊसाहेबांचेपाशीं आर्जवानें राहत. एके दिवशीं दोनप्रहरीं उभयतां बंधु निजले असतां, हे भाऊसाहेबांचे पाय चेपीत जवळच होते. ह्यांच्या अंगची तरतरी पाहून भाऊसाहेब यांस मोठें कौतुक वाटलें; आणि त्यांनीं श्रीमंतांपाशीं गोष्ट काढिली कीं, 'हा मुलगा नांवारूपास चढविण्याजोगा आहे.' तेव्हां श्रीमंत म्हणाले, "छे! त्यांत काय आहे! 'मांध्यंदिना बुद्धिहीना' त्यांच्यानें काय व्हावयाचें आहे"? हें ऐकतांच त्या पाणीदार मुलास फार वाईट वाटलें आणि ह्या गोष्टीबद्दल पेशव्यांस प्रायश्चित्त देईन तरच 'मी विठ्ठल' असें म्हणून पेशव्यांचा त्याग करून तो दुसरा मार्ग सुधारण्याच्या मागें लागला.

इतक्यांत त्यास असें कळलें कीं, औरंगाबादेस निजामअल्ली यांस त्यांचे भावानें अटकेंत ठेविलें आहे. तेव्हां निजामअल्ली याजपाशीं संधान बांधून त्यास राज्यावर बसविलें असतां आपणांस सहजच मोठें पद प्राप्त होईल. आणि पेशव्यांचा समाचार घेण्यास सांपडेल, असें मनांत आणून स्वारी त्या उद्योगास लागली. दैवाची अनुकूलता असली म्हणजे साधनें आपोआप पुढें येतात म्हणतात तें अक्षरशः खरें

---

पेशवाईंत साडेतीन शहाणे म्हणत ते—

१ सखारामबापू बोकील पुण्याचे दिवाण.

१ देवराव हिंगणे श्रीमंतांचे दिल्लीचे वकील.

१ विठ्ठल सुंदर संगमनेरकर हैद्राबादच्या निजामाचे दिवाण.

॥ नाना फडणीस भानू.

—

३॥

आहे. इकडे एक मुसलमानांचा काफिला औरंगाबादेस जाण्यास निघाल्याचें मशारनिल्हे यांस कळलें. दुसऱ्याचें मन कसें वेधावें ही हातोटी मशारनिल्हे राजश्रीस फार चांगली साधली हाती. तेव्हां त्यांणीं त्या काफिल्याच्या मुख्याधिकाऱ्याकडे जाऊन मला आपल्याबरोबर औरंगाबादेस न्यावें, अशी विनंति केली. ती त्यानें मान्य केली; आणि त्यांचेबरोबर स्वारी औरंगाबादेस जाऊन पोहोंचली. तेथें गेल्यावर तेथील ठळक ठळक बडी मंडळी पाहून त्यांचे घरीं जाण्याचा नित्य क्रम ठेविला; आणि ज्यास जसें आवडेल तसें वर्तन करून त्या सर्व मंडळीवर आपली छाप बसविली. मुख्य हेतु निजामाकडे जाण्याचा होता. परंतु किल्ल्यावर सात पाहरे होते. तितके ओलांडून वर जाणें अशक्य होतें खरें; परंतु यांच्या मोहनीपुढें कोणाचाही टिकाव लागण्याजोगा नव्हता. हिंदु असो, मुसलमान असो, कोणीही असो; त्यास आपल्या रसवंतीनें आपलेसें करण्यास त्यांस कांहींच उशीर लागत नसे. त्यांणीं त्या पाहऱ्यांवरील शिपायांकडे जाणें येणें सुरू करून त्यांस आपलेसें करून घेतलें, आणि 'मला किल्ला पहावयाचा आहे, वर जाण्यास परवानगी द्या' असें म्हटलें. 'यःकश्चित् ब्राह्मणाचें पोर तें काय ! आणि तें वर गेल्यानें आपणांस उपद्रव तो काय होणार ?' असें मनांत आणून त्यांनीं त्यास वर जाण्यास परवानगी दिली.

एक दोन वेळां वर गेल्यावर एके दिवशीं सकाळीं निजामसाहेबांची स्वारी ऊन्ह खात एकटीच बसली असतां सुंदर यांनीं त्यांस कुरनिसा केला आणि विनंति केली कीं, 'कांहीं करावयाचें आहे किंवा असेंच ऊन्ह खात बसावयाचें आहे ?' निजामअल्लीही कांहीं सामान्य मनुष्य नव्हता. त्यांनीं उत्तर केलें कीं, 'पुष्कळ करावयाचें आहे. पण अडकून पडल्यावर काय करावें ? साधन मिळेल तर करावयास तयार आहें ! साथीदार तर कोणी पाहिजे ?' तेव्हां सुंदर यांनीं उत्तर केलें कीं, 'तुम्हांस मी साथीदार आहें. तुम्हीं मला जन्मपर्यंत अंतर देऊं नये व मीही तुम्हांस अंतर देणार नाहीं, याबद्दल उभयतांनींही शपथा आणा करून त्याप्रमाणें वर्तावें.' असें म्हणून बरोबर तुळशी व सबजा नेला होता. तो उभयतांनीं एकमेकांच्या हातांत देऊन आणभाक केली आणि सुंदर आपल्या उद्योगास लागले. लवकरच त्यांनीं निजामच्या जनानखान्यांतील जवाहिराच्या जोरावर एक हजार आरबी फौज नोकरीस ठेवून औरंगाबादचा किल्ला ताब्यांत घेतला व आसपासच्या मुलखावर वर्चस्व स्थापिलें; नंतर कांहीं दिवसांनीं निजामाच्या भावास भेटीला बोलावून त्याचा खून करविला व निजामास गादीवर बसविलें व आपण त्याचा दिवाण झाले.

याप्रमाणें बस बसल्यावर राजश्री पेशव्यांस प्रायश्चित्त देण्याच्या उद्योगास लागले. पुढें निजामअल्लींनीं पेशव्यांवर एकामागून एक अशा तीन स्वाऱ्या केल्या. दर खेपेस विठ्ठल सुंदर यांनीं " माध्यंदिना बुद्धिहीना " असें म्हणून पेशव्यांस नमस्कार ठोकावा ! ! असो. विठ्ठल सुंदर पुढें राक्षसभुवनच्या लढाईंत पडला. तें कांहींही असलें तरी विठ्ठल सुंदर व निजामअल्ली यांचा जो संबंध जडला तो अद्याप कायम आहे.

---

## १४. गोविंदराव कृष्ण काळे

अखेर बाजीच्या अखेरीच्या वेळीं इंग्रजाकडून बाळाजीपंत नातू निर्वाणीचा खलिता ( Ultimatum ) घेऊन आले कीं, आमची सहा आण्याची बाकी राहिली आहे ती चुकती करून द्या. नाहींपेक्षां पुण्यावर स्वारी होईल. सगळे उपयोगी लोक काढून टाकून बदमाश, आचारी, पाणक भावतालीं गोळा करून वेडे चाळे केल्याचें प्रायश्चित्त घेण्याची वेळ आली ! ! या निर्वाणीच्या प्रसंगीं आपणांस कोण उपयोगी पडेल असा विचार करितां, भोंवतालच्या मंडळींत मसलतीयोग्य असा एकही मनुष्य दिसेना ! ! ! अर्थात्, पूर्वींच्या लोकांपैकीं कोणी आहे किंवा नाहीं याचा शोध करणें भाग पडलें. ह्यांपैकीं फक्त गोविंदराव काळे हे एकटेच उरले आहेत असें दिसून आलें. तेव्हां रावबाजींनीं त्यांस बोलावून आणून सांगितलें कीं, ' इंग्रज असें असें म्हणतो; प्रसंग तर मोठा कठीण आहे, यांतून सुटका कशी करावी ? ' एवढा आकाश कोसळल्यासारखा प्रसंग आला तरी गोविंदरावांच्या तो खिजगणतींत नव्हता ! ते म्हणाले, " अंः त्यांत काय आहे ? त्यास एवढें भ्यावयास कशाला पाहिजे ? श्रीमंतांनीं एवढें मात्र देगें द्यावें कीं, माझ्या मसलतीबाहेर वागूं नये; म्हणजे मी सर्व बंदोबस्त करितों. " बाजीरावांनीं तें कबूल केलें व रेसिडेंटाकडे लिहून कळविलें कीं, तुमचे खलित्याचा जावसाल करण्यास गोविंदराव काळे यांस नेमिलें आहे. तें वाचल्याबरोबर रेसिडेंट म्हणालाः—'आतां सर्व फसलें ! आतां कांहीं लागीं लागवयाचें नाहीं ! !' गोविंदराव यांणीं लागलींच रेसिडेंटांस भेटीस बोलाविलें. पुढें रेसिडेंट आल्यावर गोविंदराव व रेसिडेंट यांचें खालीलप्रमाणें भाषण झालें:—

**गोविंदराव**:—कुंपणी सरकारचें म्हणणें तरी काय आहे ?

**रेसिडेंट**:—वसईच्या तहाप्रमाणें सहा आण्याची बाकी थकली आहे ती चुकती व्हावी.

**गो०**:—सहा आणे कशाबद्दल द्यावयाचे ?

**रे०**:—शत्रूंपासून रक्षण करणेबद्दल.

**गो०**:—शत्रु तरी कोण ? कोणापासून रक्षण केलें ?

**रे०**:—होळकरांपासून रक्षण केलें.

**गो०**:—होळकर आमचा शत्रु, म्हणजे काय ? तो तर आमचा सरदार. त्याचे-पासून रक्षण तें काय करावयाचें ?

**रे०**:—तें कांहीं असो ! तुमच्या यजमानांनीं ठराव केला कीं नाहीं ?

**गो०**:—हो खरेंच ! तो आम्हांस शिरसावंद्य आहे. परंतु निजामाकडे आमची खंडणी फारा दिवसांची थकली आहे. कुंपणी सरकारचा ठराव परशत्रू-पासून रक्षण करण्याचा आहे, तरी निजामाकडील आमची बाकी वसूल करून तिजमधून आपले पैसे घेऊन बाकीचे आम्हांस द्यावे.

**रे०**:—( मनांतल्या मनांत ) ओ हो ! आतां कसें करावें ? या ब्राह्मणानें तर मोठ्या पेंचांत घातलें ! निजाम म्हणजे कांहीं लहान प्रकरण नव्हे. त्यांत कंपणी सरकारचा दोस्त. त्याच्याशीं बिघडतां येत नाहीं. शिवाय तो गोविंदराव याचे मुठींत वागणार. तेव्हां स्वारीचा बेत पेशवे आणि निजाम एक करून आपलें कांडात काढावें असा आहे ! कसें आपल्यास कुंठित केलें !

इतकें चाललें आहे तोंच पेशवाईचा नाश करण्याकरितां अवतार घेतलेल्या बाजीरावांनीं बापू गोखले यांची मसलत ऐकून बेटावर स्वारी केली ! तोफांचा गडगडाट सुरू होऊन तो रेसिडेंट व गोविंदराव यांचे कानीं पडला.

**रे०**:—( तोफांचा गडगडाट ऐकून ) क्यौं गोविंदराव, लढाई तो सुरू हुवा.

**गो०**:—सलाम साहेब. आतां आपण आपापल्या जागीं जाऊं. नशीब त्या यजमानाचें ! पेशवाईचीं बारा वर्षें भरलीं इतकेंच खरें.

असें म्हणून उभयतां निघून गेले. एका बैठकींत रंगास आणलेली गोष्ट बिघडली व पेशवाई ठार बुडाली.

---

## १५. वतनवृत्तीचा अभिमान

पुरंदऱ्यांकडे कोडीत गांवचें ज्योतिष आहे. पाटलाचे येथें उपाध्यांनीं जाऊन ब्राह्मणभोजन असेल तेव्हां स्वयंपाक करून ब्राह्मणांस वाढावें, असा पूर्वापार सांप्रदाय चालत आला आहे. एके वेळीं तेथील पाटलाचे घरीं कांहीं ब्राह्मणभोजन होतें, म्हणून त्यानें ग्रामजोशांस ( पुरंदऱ्यांस ) बोलावूं पाठविलें. त्यावेळीं पुरंदऱ्यांकडे गजान्त लक्ष्मी आली होती. सबब त्यांनीं आपल्या गुमास्त्यास पाटलाकडे रवाना केलें. परंतु तो पाटीलही अभिमानी होता. त्यानें त्या गुमास्त्याच्या तोंडांत मारून त्यास म्हटलें, ' तूं रे कोण येणार ? तूं का आमचा उपाध्या ? त्या पुरंदऱ्याचें ढुंगण जड झालें वाटतें ? त्यानें स्वतः आलें पाहिजे व त्याचे बायकोनें येऊन स्वयंपाक केला पाहिजे. असें त्याच्यानें होत नसेल तर वृत्ति सोडून दे म्हणावें ! ' असें होऊन गुमास्ता परत आला तेव्हां श्रीमंत पुरंदरे म्हणाले, ' गोष्ट खरी आहे, आपणच चुकलों. हत्ती व पालख्या ह्या दोन दिवसांच्या आहेत. वृत्ति मात्र निरंतरची आहे, तेव्हां आपणांस जाणें भाग ' म्हणून त्यांनीं बाईसाहेबांस सांगितलें, ' चला, आतां यजमानाचें गृहकृत्य केलें पाहिजे. ' असें म्हणून उभयतांनीं येऊन पाणी आणण्यासुद्धां सर्व व्यवस्था करून ब्राह्मणभोजन पार पाडलें. यजमानांनीं पत्रावळी उचलल्या हें पाहिलें तेव्हां पाटीलबुवा शांत झाले आणि उपाध्यांस म्हणाले " अरे, तुझे हात धुवावयाचे आहेत ना ? ही जमीन तुला हात धुण्याकरितां इनाम करून दिली आहे. ही घे सनद; आणि दक्षणेकरितां हें आठ खंडी गव्हांचें पेंव घे. " ती हात धुण्याची जमीन अद्याप पुरंदऱ्यांकडे असून, त्याच नांवानें प्रसिद्ध आहे. त्यावेळचे लोक ह्याप्रमाणें आपल्या हक्कास जपत व जपल्याचें सार्थकही करून घेत.

समाप्त.

# कठिण शब्दांचा कोश.

**अंदू**—साखळदंड.

**अपेशी**—कमनशिबी.

**आणभाक**—शपथ.

**आंतबट्याचा**—नुकसानीचा.

**इटा**—हें एक भाल्याच्या जातीचें पायदळाचें हत्यार आहे. याचा मारा बारा हातपर्यंत चालतो. 'एक इटेकरी व दहा पट्टेकरी बरोबर' अशी म्हण आहे.

**मिसल**—सैन्याचा तळ पडला असतां अमुक सरदारानें अमुक ठिकाणीं उतरावें अशी पद्धति लावून दिलेली असते. तिला मिसल म्हणतात.

**इरें**—जोर.

**उपपद**—किताब.

**ऐवज**—द्रव्य.

**कच खाणें**—भीति धरणें, माघार घेणें.

**कच्छपीं असणें**—मिळून असणें.

**कडेकोट**—पूर्ण.

**कब्जा**—ताबा.

**कमची**—हातांत धरावयाची छडी.

**कर्णधार**—नावाडी.

**कस्त**—श्रम.

**कारखाने**—हे आठरा होते. १ तोफखाना. २ पीलखाना (हत्ती). ३ उष्टरखाना (उंट). ४ शिलेखाना (चिलखतें, ढाल, तरवारी इत्यादि युद्धोपयोगी सामान ठेविण्याचें स्थान). ५ फरासखाना. ६ कोठी. ७ लकडखाना. ८ इमारत. ९ बागा. १० कुरणें. ११ वहीतकोठी (?). १२ रथखाना. १३ पुणें पेटा. १४ थट्टी. १५ पोतें व जामदारखाना. १६ जिन्नसखाना. व वैद्यशाळा. १७ पुस्तकशाळा. १८ खासगी.

**किन्नरखंड**—हें हिमालयाच्या पलीकडे आहे अशी समजूत आहे.

**कासीद**—जासूद.

**किलावा**—हत्तीच्या गळ्यांत सुताच्या दोरीचें पेंडें महाताचे पाय अडकविण्यास घालतात तें.

**कुमक**—मदत.

**कुलमुखत्यार**—मुख्य अधिकारी.

**खवासखाना**—हत्तीचे अंबारींतील पाठीमागची जागा. ही जागा मोठी मानाची असे.

**खळी**—शत्रु.

**खामाखा**—निश्चय.

**खिजमतगार**—सेवक.

**खूळ माजणें**—बंडाळी होणें.

**खैरात करणें**—बक्षीस देणें.

**गनीम**—शत्रु.

**गरनाळ**—रुंद तोंडाची तोफ.

**गोट**—तळ.

**ग्रंथ**—धर्मशास्त्रावरील ग्रंथ.

**घांसदाणा**— चौथाई व सरदेशमुखी-खेरीज कांहीं मराठे सरदारांनीं आपल्याच अधिकारानें वसूल केलेला कर.

**चित्तवृत्ति**—मन.

**चिन्तनिका**—मनन, अभ्यास.

**चिरिमिरी**—लहानसें बक्षीस.

**चौकडा**—कानांत घालावयाचा मोत्यांचा दागिना. प्रत्येक कानांत दोन दोन मोती असे चार.

**जरब**—वचक.

**जंगम**—लिंगाईत.

**झिझिया**—औरंगजेबानें हिंदु लोकांवर बसविलेल्या करांचें नांव.

**ठाणे अमीन**—ठाण्याचे अंमलदार.

**डेरा**—तंबू.

**तलब**—पगाराची बाकी.

**तमा**—काळजी.

**तांडा**—समुदाय.

**दरफदार**—हिशेब तपासणारे अधिकारी.

**दस्त**—कबुलीचा कागद.

**दळ**—सैन्य.

**दिलेरी रुस्तुमी**—पराक्रम. दिलेर व रुस्तुम हीं दोन महायोद्ध्यांचीं नांवें आहेत.

**धमधमे**—मातीचे मोठमोठाले धक्के अथवा बुरूज.

**धुमामा**—दंगा.

**नक्षा**—ताठा.

**नाडगौडा**—मुख्य पाटील. गांवच्या उत्पन्नापैकीं ३॥ टक्यांचा मालक. गौडा = पाटील.

**निकरानें**—जोरानें.

**निमक**—मीठ.

**निरवणूख करणें**—बजावून सांगणें.

**निघृण**—निर्दय.

**निर्वेध**—सुरक्षित.

**नौबत**—नगारा.

**पंचहजारी**—पांच हजार स्वारांची.

**पथक**—सैन्याची तुकडी.

**पद**—किताब.

**पाळेगार**—कर्नाटकांत पाळेगार लोकांचें प्राबल्य विशेष असे. हे पाळेगार म्हणजे प्राचीन काळच्या हिंदु राजांनीं महालोंमहालीं कामावर नेमिलेले अधिकारी होत. तीं राज्यें नष्ट झालीं तेव्हां हे अधिकारी आपणास पाळेगार म्हणजे संस्थानिक म्हणवूं लागले.

**पेशकबजू**—कठ्यार.

**पोत**—मशालीप्रमाणें जाळून उजेड पाडण्याकरितां तेलांत बुडवून गुंडाळलेलीं फडकीं.

**पोस्त**—सणांतील देणगी.

**फत्तेमारी**—मचवा.

**फंदफितुरी**—बंडाळी.

**फर्मान्**—सनद.

**फावले मानीं**—सवड सांपडतांच.

**बक्षीगिरी**—सेनापतीची जागा.

**बरकंदाज**—बंदुकवाला.

**बाजी**—अब्रू.

**बिचवा**—एकप्रकारचें हत्यार.

**बिनी**—अघाडी.

**बेचिराख**—उजाड.

**बेदिल**—नाखूष, बेफाम.

**भुमका**—अफवा.

**मनसबा**—इच्छा.

**मसनद**—गादी.

**माची**—डोंगराचा पुढें आलेला भाग.

**मुजरा**—सलाम.

**मुलाहिजा**—भीड.

**मेखसूं**—मेख, खुंटी ( तंबूची ).

**मोकाबला**—युद्ध.

**मोकासा**—स्वराज्यांतील एकंदर उत्पन्नाचा शेंकडा ६६ टक्के उत्पन्नाचा मुलूख जहागीरदारांस इनाम करून दिलेला असे. त्यास मोकासा म्हणत. मोकासा करून देणें म्हणजे गांवच्या उत्पन्नाचा तो भाग इनाम करून देणें.

**मोर्चा**—तोफा ठेविण्यासाठीं तयार केलेली बैठक. प्रथम उंच उंच फळ्या उभ्या करतात, त्यांच्यामागें वाळूचीं पोतीं ठेवितात, व त्यांवर तोफा लावितात. फळ्यांच्या योगानें व अशा तजविजीनें शत्रूपासून तोफांचें संरक्षण होतें.

**यख्त्यारी**—अधिकारी.

**यादी**—काळजी.

**रसद**—अन्नसामुग्री.

**राऊत**—शिपायी.

**लघु**—हलकट, क्षुद्र.

**वचक**—धाक.

**विवंचना**—चिंता.

**व्यूह**—कारस्थान, मसलत.

**शर्त**—अट.

**शहराची नाकेबंदी करणें**—शहराच्या सर्व नाक्यांवर सक्त पाहरा ठेवणें.

**शहान्शहा**—शहांचा शहा, मुख्य बादशहा.

**शिरपेंच**—पागोट्यावर बांधावयाचा दागिना. हा मुंडावळीप्रमाणें पागोट्यावर बांधावयाचा. मुंडावळीस लोंबणारे पदर असतात, तसे यास नसतात.

**सरखेल**—आंग्र्यांना मिळालेला किताव. मूळचा अर्थ स्वारांच्या तुकडीचे अधिकारी, असा आहे.

**सरदेशपांडेगिरी**—चौथाई व सरदेशमुखीसारखा एक हक्क होता. परंतु यांत वसुलावर शेंकडा पांच टक्के घ्यावयाचे असें होतें.

**सरनोबत**—सेनापति.

**साक्षेप**—उद्योग.

**सामोपचारानें**—गोडीगुलाबीनें.

**साहेबनौबत**—यजमानापुढें वाजवावयाची नौबत.

**सिताब**—लवकर.

**सूत्रें असणें**—संबंध असणें.

**हक्क**—कर. उदाहरणार्थ चौथाईचा हक्क वसूल करणें.

**हलकारा**—जासूद.

**हलाखीची स्थिति**—दुर्दशा.

**हवालदिल**—चिन्ताक्रान्त.

**हुजरात**—खास पेशव्यांची फौज.सरदारांची नव्हे.

**हुल्लड**—हल्ला.

**हुजूर मजलस**—मुख्य सभा.

**हैराणगत**—वाईट स्थिति.

**होड**—अवघड काम.

# राष्ट्रीयशिक्षणमाला.

( ४ ) **बीजगणित** ( दुसरी आवृत्ति लवकरच प्रसिद्ध होईल ):—सोपपत्तिक व अत्यंत सुलभ विवेचन. प्राचीन आर्य पद्धति व अर्वाचीन पद्धति यांचा सुंदर मिलाफ. ट्रेनिंगकालेजचे परीक्षेस, प्रवेशपरीक्षेस, वाङ्मय, औद्योगिक व इतर शास्त्रांचें अध्ययन करणाऱ्यांस सुमारें जरूर तेवढा भाग यांत आला आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचा विकास व्हावा व तें व्यवहारांत उपयोगी पडावें अशी रचना केली आहे. किं. दोन रु. पृष्ठें ४००.

**वि. सू.—मुंबई व मध्यप्रांत येथील विद्याखात्यांनीं मंजूर केलें आहे.**

## बीजगणित पुस्तकावरील अभिप्राय.

**R. P. Paranjpye,** *M. A. B. Sc. Principal & Prof. of Mathematics,* FERGUSSON COLLEGE, **Poona**.

I have seen the first part of a text–book in Algebra in the Marathi language by Messrs OKA and DESAI. **Such a book was a long-felt want** in our language and the **book** in question **will prove very useful.** The present book treats of the elementary operations of Algebra, H. C. F., L. C. M. Fractions, Elementary Factors, Simple Equations and Elementary Problems. There are numerous exercises which are well-selected. **The theory is well-explained and good illustrative practical examples given.** In several places interesting historical information bearing chiefly on Indian algebra is inserted and in foot–notes many of the Shlokas in the Bija–Ganita of Bhaskaracharya are quoted. I wish that some similar information about Western Mathematicians were also given...... The terminology used has been mostly that of the Sanskrit text-books though a few new words had to be invented. Most of these are happy... . On the whole I think **the book is remarkably well done.**

**रा. शिवराम हरी गोखले, एम्. ए., प्रिन्सिपॉल नॉर्मल स्कू[ल] फॉर मेन, उमरावती**:—पुस्तकांतील ऋणसंख्यांचें व गुणपृथक्करणाचें हा प्रकरणें फार चांगलीं साधलीं आहेत...प्रश्नावरून समीकरणें तयार करणें हेंही चांगलें साधलें आहे...परिभाषा फारच सुंदर वठली आहे.

**वे० शा० विनायकशास्त्री खानापूरकर, ज्योतिर्षी, मु० औंध**:— आनंदानें साद्यंत लक्षपूर्वक वाचलें. **विद्यार्थ्यांस फारच उपयोगी पडेल** यांत बिलकुल शंका नाहीं.कारण, **महाराष्ट्र भाषेंत अशा नमुन्याचें पुस्तक आजपर्यंत कोणींही श्रम करून लिहिलेलें नाहीं.** जीं कांहीं लिहिलीं गेलीं आहेत त्यांमध्यें उपपत्ति मुळींच नाहीं. आपण **श्रीमत् भास्कराचार्य-कृत बीजगणितांतील धनर्णषड्विधादि क्रम स्वीकारून आचार्यांचीं सूत्रें दिलीं आहेत व त्या सूत्रांची उपपत्ति देखील उत्तम तऱ्हेनें लिहिली आहे. त्यामुळें हें पुस्तक शिक्षकवर्गासही फारच उपयोगीं पडेल** यांत शंका नाहीं. **बीजगणिताचा आचार्यमान्य असा मुख्य समीकरणविषय हा आपण प्रथम दिल्यानें विद्यार्थ्यांना हें पुस्तक कंटाळवाणें न होतां करमणुकीचें होईल व विषय उत्तम तऱ्हेनें सहज कळेल.** हें पुस्तक पुणें ट्रेनिंग कॉलेजादि संस्था अवश्य सुरू करतील अशी मला पूर्ण आशा आहे.

**राव. ब. चिंतामण विनायक वैद्य**, एम्. ए , एल् एल्. बी., माजी चीफ जज, ग्वाल्हेरः—**भाषा सरळ, सोपी व सुलभ असल्यामुळें विद्यार्थ्यांस सहज समजेल.**

**केसरी** ( २६ डिसेंबर १९११ ):— देशी भाषेंतून पुस्तकी ज्ञान देण्याचा प्रघात पडल्यास मुलांस विषय सुलभ रीतीनें समजावून देतां येतो ...... देशी परिभाषा लहानपणापासून तोंडीं बसली म्हणजे प्रौढपणांत एकदम गांठ पडल्यामुळें देशी परिभाषा व पद्धति यांजविषयीं वाटणारा चमत्कारिक[पणा] आपोआप नाहींसा होईल. वरील सिद्धांत रा. ओक व रा. देसाई यां[च्या] राष्ट्रीयशिक्षणमालेंतील इतर पुस्तकांपेक्षां बीजगणितावरील त्यांच्या प्रस्[तुत] पुस्तकानें अधिक सिद्ध होण्यासारखा आहे. सदर पुस्तकांत बीजगणितांत[ील] **अनेकवर्णसमीकरणा**पर्यंत स्थूल माहिती दिलेली असून मराठी पांच इय[त्ता] नंतरच्या मुलांस व हायस्कुलांतील मुलांस सदर पुस्तकावरून बीजगणिताचीं मूल[त]त्त्वें सुलभ रीतीनें शिकवितां येतील. अल्पवयी व अल्पबुद्धी मुलांस [illegible]

**रा. शिवराम हरी गोखले, एम्. ए., प्रिन्सिपॉल नॉर्मल स्कूल फॉर मेन, उमरावती**:—पुस्तकांतील ऋणसंख्यांचें व गुणपृथक्करणाचें हीं प्रकरणें फार चांगलीं साधलीं आहेत...प्रश्नावरून समीकरणें तयार करणें हेंही चांगलें साधलें आहे...परिभाषा फारच सुंदर वठली आहे.

**वे० शा० विनायकशास्त्री खानापूरकर, ज्योतिषी, मु० औंध**:—आनंदानें साद्यंत लक्षपूर्वक वाचलें. **विद्यार्थ्यांस फारच उपयोगी पडेल** यांत बिलकुल शंका नाहीं.कारण, **महाराष्ट्र भाषेंत अशा नमुन्याचें पुस्तक आजपर्यंत कोणींही श्रम करून लिहिलेलें नाहीं.** जीं कांहीं लिहिलीं गेलीं आहेत त्यांमध्यें उपपत्ति मुळींच नाहीं. आपण **श्रीमत् भास्कराचार्यकृत बीजगणितांतील धनर्णषड्विधादि क्रम स्वीकारून आचार्यांचीं सूत्रें दिलीं आहेत व त्या सूत्रांची उपपत्ति देखील उत्तम तऱ्हेनें लिहिली आहे. त्यामुळें हें पुस्तक शिक्षकवर्गासही फारच उपयोगीं पडेल** यांत शंका नाहीं. **बीजगणिताचा आचार्यमान्य असा मुख्य समीकरणविषय हा आपण प्रथम दिल्यानें विद्यार्थ्यांना हें पुस्तक कंटाळवाणें न होतां करमणुकीचें होईल व विषय उत्तम तऱ्हेनें सहज कळेल.** हें पुस्तक पुणें ट्रेनिंग कॉलेजादि संस्था अवश्य सुरू करतील अशी मला पूर्ण आशा आहे.

**राव. ब. चिंतामण विनायक वैद्य**, एम्. ए , एल् एल्. बी., माजी चीफ जज, ग्वाल्हेरः—**भाषा सरळ, सोपी व सुलभ असल्यामुळें विद्यार्थ्यांस सहज समजेल.**

**केसरी** ( २६ डिसेंबर १९११ ):— देशी भाषेंतून पुस्तकी ज्ञान देण्याचा प्रघात पडल्यास मुलांस विषय सुलभ रीतीनें समजावून देतां येतो ...... देशी परिभाषा लहानपणापासून तोंडीं बसली म्हणजे प्रौढपणांत एकदम गांठ पडल्यामुळें देशी परिभाषा व पद्धति यांजविषयीं वाटणारा चमत्कारिक[illegible] आपोआप नाहींसा होईल. वरील सिद्धांत रा. ओक व रा. देसाई यां[illegible] राष्ट्रीयशिक्षणमालेंतील इतर पुस्तकांपेक्षां बीजगणितावरील त्यांच्या प्र[illegible] पुस्तकानें अधिक सिद्ध होण्यासारखा आहे. सदर पुस्तकांत बीजगणितां[illegible] **अनेकवर्णसमीकरणा**पर्यंत स्थूल माहिती दिलेली असून मराठी पांच इय[illegible] नंतरच्या मुलांस व हायस्कुलांतील मुलांस सदर पुस्तकावरून बीजगणिताचीं मूल तत्त्वें सुलभ रीतीनें शिकवितां येतील. अल्पवयी व अल्पज्ञानी मुलांस इंग्रजी

.वेश करून देण्यास अत्यंत उपयोगी. या पद्धतीचें व इंग्रजी कोणत्या शिकावें याचें सविस्तर विवेचन. ३७ नमुन्याचे धडे व शिक्षकांस . किं. ८८.

रामा विद्या

## अभिप्राय.

अधिष्ठाते **लाला बालकृष्ण**:—

" A boon to school teachers... ..excellently designed... follows he latest and best system of teaching languages...... wish is book should be adopted as a text by all Indian schools. "

रा. ब. **केशव गणेश देशपांडे**, बॅरिस्टर.

" Embodies your experience of teaching English to students the latest scientific methods;......as such will prove a valu-le help to teachers. I have not seen a similar book which is ually suitable to the conditions of Indian life. "

## THE LEADER, ALLAHABAD 8th SEP. 1910:--

" The Direct Method of learning languages is now univer-lly recognised as the most scientific way of learning them. he present mode of learning English has been condemned so many that we welcome this attempt on the part of essrs. Oka and Desai to make its acquisition more easy to aratha youths. We have no doubt that a careful study of will enable teachers to make the learning of spoken English ore easy than it is now. The chapter on hints to the eacher with which the booklet opens ought to prove use-ul to him.

**केसरी** ( ता. ३० ऑगस्ट १९१० ):–सविस्तर अभिप्राय.

" खासगी शाळांतील शिक्षकांनीं यांतील पद्धतीचा अवश्य उपयोग करून ाहावा. कामचलाऊ इंग्रजी समजण्यास या पुस्तकांतील पद्धत उपयोगीं पडेल असें ाटतें. "—**विविधज्ञानविस्तार**, ऑगस्ट १९१०.

( ३ ) **प्रथमगुच्छ**:–संस्कृत प्रवेशाच्या पुढील वाचनपुस्तक. रामायण, भारत, ंचतंत्र, हितोपदेश यांमधील बोधपर, मनोरंजक गोष्टी; उदात्त व सुंदर काव्यांचे वेचे–मराठी स्पष्टीकरण व कठिण शब्दांचा कोश, किं. १ रु. यावरील अभिप्राय.

**संस्कृतप्रवेश** पुस्तकानें जशी संस्कृताच्या शिकण्याच्या तऱ्हेस निराळ दिशा लागली आहे, त्याप्रमाणेंच नवीन वेंचे विद्यार्थ्यांकरितां कसे असावे य बद्दलच्या समजुतीस निराळी दिशा लागेल असें मला वाटतें. संस्कृतांत रामाय महाभारत, मनुस्मृति, रघुवंश अशा पुस्तकांतील भाषा, विचार व कवित्व विद्य र्थ्यांच्यापुढें यावें हें सर्व दृष्टीनें विशेषतः नीतीच्या व आपल्या परंपरेच्या दृष्टी फारच अवश्य आहे. घरीं संस्कृत शिकणारास किंवा शिक्षकांची थोडी मदत घेऊ शिकणारास सुलभ जावें म्हणून मराठींत टिप्पणीही जोडली आहे. त्यामुळें पुस्तकाचें उपयोगित्व अधिकच वाढलें आहे. सारांश, हें पुस्तक फार उपयोग असून लोकांच्या आदरास पात्र होईल अशी मला पूर्ण आशा आहे.'

—**चिंतामण विनायक वैद्य.**

वेंचे, फारच सुंदर, नीतिपर व उदात्त असे असून जगन्मान्य पुस्तकांतून घेत असल्यामुळें ते वाचण्याची सहाजिकच गोडी विद्यार्थ्यांस उत्पन्न होईल व त्यामुळे वर्गांतील नियमित वेळांत होणारे आकुंचित वाचनाला सुबोध व उदात्त वाङ्मया सहाजिक विस्तृत अशी जोडणी प्राप्त होईल अशी मला खात्री वाटते. यास्त हायस्कुलांतील प्रत्येक चवथ्या व पांचव्या इयत्तेच्या विद्यार्थ्यांचे खाजगी वाचनां तरी हें पुस्तक येईल तर फार चांगलें होईल असें माझें मत आहे. **-हरी महा देव भडकमकर,** बी. ए., संस्कृत प्रोफेसर वुइल्सन कॉलेज.

**केसरी**-( १९ सप्टेंबर १९११ ):-**संस्कृतप्रवेश** पुरा झालेल्या विद्य र्थ्यांस भाषेच्या वाङ्मयाचें ज्ञान देण्यास हा **गुच्छ** फार उपयोगी आहे.... स्वकपोलकल्पित संस्कृत वाक्यें किंवा अर्वाचीन संस्कृत वाङ्मयांतील कृत्रिम, अव घड किंवा नीरस वेंचे भाषांतरास देण्याची वहिवाट असे व आहे. ही अनिष्ट व अपायकारक आहे...विद्यार्थ्यांस उपयुक्त व उदात्त विचार ग्रथित करणारे आणि जिवंत संस्कृताचें स्वरूप दाखविणारे निवडक चाळीस उतारे यांत दिले आहेत. त्यामुळें विद्यार्थ्यांस भाषाज्ञानाबरोबरच हिंदूंच्या राष्ट्रीय धर्मव्यवहारनीतीशींही सहज परिचय या पुस्तकामुळें होणार आहे.

**विविधज्ञानविस्तार**-( आक्टोबर १९११ ):-घेतलेले वेंचे विशेषतः छात्रवृत्तीसंबंधाचे असून सुंदर आहेत...एकंदरीनें या पुस्तकाचे उपयोगानें मराठी जाणणाऱ्या विद्यार्थ्यांस संस्कृत भाषेचें ज्ञान विशेष आयास न पडतां पायाशुद्ध रीतीनें होईल. **ज. वि. ओक, तळेगांव दाभाडे ( जि. पुणें. )**

पणापासूनच त्याच्या अंगीं असणारा स्वाभिमान शाहूच्या लक्षांत आल्याशिवाय राहिला नाहीं. त्यामुळें शाहूची बाजीरावावर सहज मर्जी बसली, हा आपल्या बापाच्या सवाई होणार असें शाहू नेहमीं म्हणे. बाळाजी वारल्यावर कर्ता माणूस नाहींसा झाला म्हणून शाहूस दुःख झालें, पण बाजीरावामुळें तें दुःख फार वेळ टिकलें नाहीं. त्यानें बाजीरावास एकदम पेशवाईचीं वस्त्रें दिलीं; व बाळाजीप्रमाणेंच पराक्रम करून स्वामिसेवा करण्याविषयीं उत्तेजन दिलें. बाजीरावानें पेशवाई मिळाल्याबरोबरच खानदेशाकडे स्वारी केली. मोंगलांच्या मुलखांतील चौथाई न देणाऱ्या फौजदारांचें पारिपत्य केलें. दोन तीन वर्षांत माळव्यावर त्याच्या तीन मोहिमा झाल्या. त्याचें धाडस कांहीं विलक्षण होतें. त्याच्यामुळें मराठे शिलेदारांवर त्याचा तेव्हांच वचक बसला; व ते त्याच्या आज्ञेखालीं वागूं लागले.

बाजीरावानें मोंगलांच्या मुलुखांत उडविलेला दंगा पाहून श्रीपतराव प्रतिनिधीच्या छातींत धडधडूं लागलें. एके दिवशीं दरबार भरला होता त्या वेळेस संधि साधून श्रीपतराव म्हणाला, " पेशवे माळव्यांत व इतर ठिकाणीं जबरदस्तीनें मोंगलांपासून खंडणी घेत आहेत ही गोष्ट भयंकर नाहीं काय ? अशा उद्धटपणाच्या वर्तनानें मोंगलांस चीड येणार नाहीं काय ? मी युद्धास कचरतों असें मुळींच नाहीं. लढाईचा प्रसंग आल्यास पेशव्यांप्रमाणें मीही स्वारीवर जाण्यास तयार आहें. परंतु खोल विचारांअंतीं मला असें वाटतें कीं, उत्तरेकडचा मुलूख मिळविण्याचा तूर्त तरी पेशव्यांनीं नाद सोडावा. " प्रतिनिधीनें हें जें भाषण केलें त्याला भीति हें एक कारण होतेंच, पण दुसरें एक कारण होतें; तें हें कीं, बाजीरावाचा उत्कर्ष प्रतिनिधीस सहन होत नव्हता. दोन तीन वर्षांच्या बाजीरावाच्या शूरत्वाच्या कृत्यांमुळें चोहोंकडे त्याचें तेज फाकत चाललें होतें. हें पाहून प्रतिनिधीला वाटलें कीं, असाच पेशव्यांचा उत्कर्ष होत गेला तर आपण निर्माल्यवत् होणार. तेव्हां याची वेळींच तजवीज केली पाहिजे.

तें प्रतिनिधीचें भाषण ऐकून बाजीरावास आश्चर्य वाटलें; प्रतिनिधीच्या भाषणानें दरबारांतील लोकांच्या मनांत उत्पन्न झालेला संशय दूर करण्याकरितां बाजीरावानें पुढीलप्रमाणें भाषण केलें. तो म्हणाला, "आजपर्यंत जीं कांहीं युद्धें मीं केलीं आहेत तीं मोंगलाशींच केलीं आहेत व त्यावरून मोंगलांचें सामर्थ्य किती हें मला कळून चुकलें आहे. मोंगल या नांवाची प्रतिनिधीस इतकी भीति कां वाटते हें मला समजत नाहीं. मोंगलांइतके चैनी या भूपृष्ठावर दुसरे नसतील. मोंगलांच्या राज्याचा वृक्ष वठला आहे. याच्या निरनिराळ्या फांद्या तोडण्याची गरज नाहीं. महाराजांनीं आज्ञा मात्र द्यावी, मी दिल्लीस जाऊन या जुनाट वृक्षाच्या मुळाशींच घाव घालतों. **मूळच उपटलें कीं फांद्या आपोआप खालीं येतील** " हें बाजीरावाचें वीरश्रीयुक्त भाषण ऐकून सर्व सरदारांस आवेश चढला. खुद्द शाहूच्या अंगांत शिवाजीचें वारें संचरलें व त्यांनें पेशव्यास म्हटलें, " तुमच्यासारखे वीर काय करणार नाहींत ? किन्नरखंडांत नेऊन मराठ्यांचा भगवाझेंडा लावण्यास आमची तुम्हांस परवानगी आहे. "

---

## ४० निजामाची खोड मोडली.



**मोंगलांच्या** ताब्यांत नर्मदेच्या दक्षिणेस जो मुलूख होता त्यास दक्षिणचा सुभा असें नांव होतें. या वेळीं दक्षिणच्या सुभ्यावर निजामुल्मुल्क हा होता. त्यास महमदशहा बादशहानें वजीर नेमिलें, म्हणून तो आपल्या सुभ्याची व्यवस्था लावून शके १६४३ ( सन १७२१ ) च्या शेवटीं दिल्लीस गेला. परंतु तेथें त्याचें व बादशहाचें पटेनासें झालें. निजामुल्मुल्क कर्तृत्ववान् होता. त्याला दर-